विषय निबंध
सं. क्र. २०९३

शिक्षण, शील व संस्कार

गुरु-शिष्यांचे अनुभव

लेखक
ग. श्री. रवेर
एम्. ए. पीएच्. डी.

REFBK-0015151

15 कोल
७५५८७
२०/३/७१.
2023.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

शिक्षण,

शील

व

संस्कार

डॉ. अण्णासाहेब खैर यांची पुस्तके

१ जगातील समाज-क्रान्ती व हिंदुस्थान
(मराठी व हिंदी)
२ पाश्चिमात्य शिक्षण पद्धती
(मराठी व गुजराथी)
३ जपानची जीवनक्रान्ती
[वरील तिन्ही पुस्तके शिल्लक नाहीत.]

४ सदाचार चिंतनी
५ गीतेतील मुख्य विचार
६ शिक्षण, शील व संस्कार
[वरील तीन पुस्तके उपलब्ध आहेत]

सहसंपादित-माला

१ मराठी वाचनमाला इयत्ता १ ते ४
मुंबई व महाराष्ट्र राज्य
२ भारत वाचनमाला इयत्ता ५ ते ७ (नामंजूर)
३ नवभारत वाचनमाला इयत्ता ८ ते १०
४ मराठी गद्य पद्य संग्रह, एस्. एस्. सी. बोर्ड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्र०
क्रमांक ७५५८७ दि: ता.२.६१
वर्ग क्र ८०९३ बों: दि: २०।३।७१

शिक्षण, शील व संस्कार

[गुरु-शिष्यांचे अनुभव]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र ७५५८७
संदर्भ शाखा (स्थलक्र)

संकलक
डॉ. ग. श्री. खैर
एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0015151

किंमत रु. ७·००

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन, पुणे २

● प्रकाशक :

डॉ. गं. श्री. कोशे
अ. वि. गृह प्रकाशनासाठी,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २

© प्रकाशकाधीन

● प्रथम आवृत्ती

कोजागरी १५
आश्विन शु. १५ शके १८८८
दि. २८–१०–६६

● मुद्रक :

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २

अर्पण-संकल्प

माझे पूर्वविद्यार्थी,
सहकारी,
मित्र,
बंधू
आणि
हितचिंतक

श्री. दिगंबर दामोदर तथा **श्री. बाबासाहेब गांगल**
एम्.एस्सी.

यांना त्यांच्या

षष्टचब्दिपूर्तीनिमित्त

शतायुष्य चिंतनपूर्वक

सप्रेम समर्पण

प्रकाशकाचे निवेदन

अपरिपक्व मनाच्या विद्यार्थ्यांबर, त्यांना भावी जीवनात उपयोगी पडतील असे सुसंस्कार करणे हे शिक्षकाचे खरे काम. हे काम डॉ. खैर यांनी कितपत चोखपणे पार पाडले याचे मूल्यमापन त्यांच्या विद्यार्थ्यांनी या पुस्तकात केले आहे. प्रस्तावनेत डॉ. खैरांनी स्वतःची कैफियत मांडली आहे. त्यांनी जसे विद्यार्थ्यांना घडविले तसे विद्यार्थ्यांनीही त्यांना घडविले असे ते कबूल करतात. विद्यार्थ्यांवर संस्कार करीत असताना विद्यार्थ्यांवरोबर शिक्षकाचीही कशी उत्क्रांती होत जाते ते या पुस्तकांत वाचकांना पाहावयास मिळेल.

वाचकांना सर्व पुस्तक वाचता आले नाही तरी त्यांनी प्रारंभीची डॉ. खैर यांची प्रस्तावना व शेवटची डॉ. कोशे यांची 'फलश्रुती' ही दोन प्रकरणे जरूर वाचावीत. विद्यार्थ्यांच्या अनुभवांतील काही निवडक व प्रातिनिधिक उताऱ्यांच्या सहाय्याने केलेले 'फलश्रुती'मधील डॉ. खैर यांच्या शैक्षणिक विचारांचे पृथक्करण आणि काही शैक्षणिक तत्त्वांचा ऊहापोह ही वाचनीय व चिंतनीय आहेत.

या ग्रंथांत मुख्यतः त्यांच्या विद्यार्थीजीवनविषयक कार्याचा विस्तार आहे; इतर शैक्षणिक व्यापाचा यात विस्तार केलेला नाही. तो अन्य ग्रंथात करावा लागेल.

डॉ. खैरांनी आपल्या अध्यापकीय जीवनात अनेक शैक्षणिक उपक्रम केले. अनेक अडचणींना तोंड देऊन त्यांनी महाराष्ट्र विद्यालय चालविले, आणि हे सर्व करीत असताना त्यांनी शाळेबाहेरील शिक्षणक्षेत्रातही भरीव कार्य करून दाखविले. एक विचारवंत आणि प्रयोगशील शिक्षणज्ञ म्हणून भारतात मान्यता मिळविली. तळमळ आणि अविरत व्यासंग यांच्या जोरावर शिक्षकाला किती साध्य होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे डॉ. खैर. म्हणून शिक्षणक्षेत्रात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने वाचावे असे हे पुस्तक झाले आहे.

शिक्षणशास्त्राचा अभ्यास करताना सर्व शिक्षक काही शैक्षणिक तत्त्वे शिकतात. पण या तत्त्वांचा आचार सर्वांच्या हातून होतोच असे नाही. अभ्यासिलेली शैक्षणिक तत्त्वे आचरणात आणली तर त्यांचा विद्यार्थ्यांना किती उपयोग होतो हे या पुस्तकाच्या वाचनाने समजेल. शिक्षणशास्त्र आणि शैक्षणिक व्यवहार यांची क्रियाशील सांगड घातल्यास त्याचे परिणाम किती प्रभावी ठरतात याचे प्रत्यंतर या ग्रंथात पहावयास सापडेल.

डॉ. खैर आणि या ग्रंथाच्या लेखनात सहभागी होणारे त्यांचे माजी विद्यार्थी व सहकारी यांचे या ग्रंथनिर्मितीबद्दल आम्ही आभारी आहोत. शिक्षणक्षेत्रात तळमळीने व जिद्दीने वावरणाऱ्या कार्यकर्त्यांस हा ग्रंथ सतत मार्गदर्शन देत राहील.

या ग्रंथातील डॉ. खैर यांचे छायाचित्र ही श्री. केकी मूस यांची कलाकृती आहे.

प्रकाशक.

संकलकाचे निवेदन

या ग्रंथाचे प्रयोजन प्रारंभीच्या प्रस्तावनालेखात तपशीलवारपणाने आलेले आहेच. त्यात ज्या गोष्टींचा उल्लेख करता आला नाही, तो या निवेदनात केला आहे. माझ्या आवाहनाला प्रतिसाद देऊन माझ्या अनेक विद्यार्थी-मित्रांनी व शिक्षकांनी आपापले अनुभव पाठविले, त्यामुळेच हा ग्रंथ अस्तित्वात येऊ शकला; म्हणून सर्व लेखकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. लेखनद्वारा त्यांनी जसे काम केले, तसेच या ग्रंथाच्या प्रसाराच्या कामीही सहाय्य करावे अशी विनंती करतो. मराठी भाषेत एखादा ग्रंथ लिहिणे व तो छापून प्रसिद्ध करणे शक्य आहे. पण त्याची विक्री आणि प्रसार करणे हे काम फार कठिण आहे. त्यामुळे अनेक चांगले ग्रंथ छापून शिल्लक पडलेले आहेत. तसे या ग्रंथाचे न व्हावे ही जबाबदारी अंशतः तरी लेखकांनी घ्यावी ही विनंती.

शंभरपेक्षा अधिक लेख आले. ते आलेल्या स्वरूपात जसेच्या तसे छापले असते तर ग्रंथाची ७००/७५० पाने झाली असती. त्या मानाने कागद, छपाई, बांधणी इत्यादी खर्च वाढून ग्रंथाची किंमत आवाक्याबाहेर गेली असती. म्हणून ग्रंथाची मर्यादा सुमारे २०० पाने धरून लेखांना संक्षिप्त स्वरूप देणे अपरिहार्य होते. लेखकांची तशी परवानगी व अपेक्षाही होती. तरी पण लेख संपूर्ण छापता न आल्याबद्दल लेखकांची क्षमा मागणे अवश्य आहे. आपलेपणाने ते ती करतील व आपला लेख पूर्ण स्वरूपात न आल्याबद्दल रागावणार नाहीत, अशी खात्री आहे. मजकडे आलेले सर्व लेख प्रसिद्ध केले आहेत. एकही लेख अप्रसिद्ध ठेवला नाही.

लेखांचा संक्षेप व त्यांचे संकलन करताना काही तत्त्वे पाळली आहेत. टीकेचा व प्रतिकूल अनुभवांचा भाग मुळीच गाळला नाही. कारण अनुभवांचे दृष्टीने तो महत्त्वाचा आहे. बराचसा संक्षेप पुनरावृत्ती व तपशील गाळण्याचे दृष्टीने केलेला आहे. एखाद्या अनुभवाचा, उपक्रमाचा किंवा प्रयोगाचा उल्लेख वारंवार येणे अपरिहार्य होते. त्याची पुनरावृत्ती दोन तीन वेळापर्यंत ठेवणे आवश्यक होते. कारण त्याशिवाय त्या गोष्टीला नियमाचे व निरपवादाचे स्वरूप येत नाही. त्यापेक्षा अधिक पुनरावृत्ती मात्र गाळली आहे.

मुख्य लेखाला शीर्षके आणि परिच्छेदांना मथळे देण्याचे काम मुख्यतः मीच केले आहे. सहकारी शिक्षकांनीही या कामी सहाय्य केले आहे. लेखावरोबर लेखकाचा फोटो, त्याच्या शिक्षणाचा कालखंड, व्यवसाय आणि त्याचे वैशिष्ट्य या गोष्टी मुद्दाम दिलेल्या आहेत. त्यामुळे या शैक्षणिक कार्यातील कालक्रमानुसार होत गेलेले संक्रमण वाचकांच्या लक्षात येईल. लेखकाचे व्यक्तित्त्व, त्याचा व्यवसाय, कालखंड

आणि वैशिष्ट्य कळल्यामुळे लेखकाचा अधिकार व लेखातील अनुभवाचे महत्त्व अजमावण्याचे कामी वाचकाला सहाय्य होईल. गेल्या ४५ वर्षांतील एकेक प्रौढ माजी विद्यार्थी व्यासपीठावर येऊन गुरूविषयी आपले अनुकूल-प्रतिकूल अनुभव सांगून जात आहे, असे चित्र वाचकांचे डोळ्यांपुढे उभे राहावे अशी माझी योजना आहे.

या सर्व अनुभवांची व उपक्रमांची फलश्रुती काय ती प्रत्येक वाचक आपापल्या परीने ठरवीलच. परंतु साकल्याने विचार करून एका अनुभवी शिक्षणतज्ज्ञाला काय वाटते ते कळावे म्हणून डॉ. कोशे यांचा सिंहावलोकनात्मक व समारोपात्मक असा 'फलश्रुती' हा विस्तृत लेख शेवटी दिला आहे.

या संकलनाचे कामी माझे सहकारी व आजीव सेवक सर्वश्री डॉ. कोशे, शिदोरे, राव, प्र.भ. कुलकर्णी, जळूकर व कस्तुरे यांनी व संस्थेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फार मदत केली आहे. लेखाची मुद्रणप्रत करणे, नवीन शुद्ध लेखनाचे दृष्टीने बदल करणे, परिच्छेद मथळे देणे, प्रुफे तपासणे, अनुक्रमणिका करणे इत्यादि कामी मला त्यांचे सहाय्य झाले आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. लोकसंग्रह छापखान्यातील सर्वश्री सोनार, काशीकर इत्यादि मंडळींनीही आपलेपणाने सर्व काम मुदतीत पुरी करण्याची पराकाष्ठा करून हा ग्रंथ मूर्त स्वरूपात वाचकांचे हातात ठेवल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

अशा स्वरूपाचे ग्रंथ निरनिराळ्या रूपांत मराठी भाषेत प्रसिद्ध होऊन शैक्षणिक वाङ्मयात भर पडो असे इच्छितो.

'विद्या' १९१२ सदाशिव, पुणे २.
*माझ्या मातेचा ५० वा स्मृतिदिन
आश्विन शु. ६, १८८८.
दि. १९।१०।६६.



---

* ही स्मृतिदिनाची आठवण होण्याला कारण आहे. १९१६ साली मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर मी आईला म्हणालो, "माझा तुला काही उपयोग होणार नाही. मी समाजसेवेला आयुष्य वाहणार आहे." त्यावेळी तिच्या नेत्रातून निघालेल्या अश्रूंचे परिमार्जन मी कसे करू! त्याच वर्षी ती प्लेगने वारली.

अनुक्रमणिका

क्रम	लेखाचे नाव	लेखक	पृष्ठ
प्रस्तावना : मी दिलेले शिक्षण व संस्कार		डॉ. ग. श्री. खैर	१
१.	चारित्र्य-संवर्धनाचे प्रयत्न	श्री. दि. दा. गांगल	२८
२.	१९२५ आणि १९६५ मधील अंतर	श्री. रा. व्यं. कानिटकर	३०
३.	मोठ्या बंधुत्वाचे नाते	श्री. र. पां. साने	३२
४.	शिस्तीचा आदर्श	श्री. का. नी. जोशी	३४
५.	गजाभाऊ, गुरुवर्य अण्णा व डॉ. खैर	श्री. दे. शं. लुकतुके	३५
६.	विलोभनीय चित्र	श्री. सि. ग. दाते	३८
७.	पूर्वपुण्याईची गोष्टच !	श्री. ग. ब. जोशी	३९
८.	माझ्या शिक्षणातील शिस्त, शील व संस्कार	श्री. शं. व. सुखटणकर	४०
९.	यावत् जीवन्ति विद्यया	श्री. पां. र. अंबिके	४४
१०.	चाळीस वर्षांनंतर	श्री. मु. ल. जोशी	४५
११.	आयुष्याला वळण लागले	श्री. द. वि. कालेकर	४८
१२.	तीस वर्षांनी मला ओळखले	श्री. अ. गो. भवाळकर	४९
१३.	ब्रह्मदेवाची चतुर्विध भूमिका	श्री. आ. स. अत्रे	५२
१४.	जगात अडत नाही	श्री. वि. द. जतकर	५४
१५.	आधुनिक उपनिषदच	प्रा. दे. द. कुलकर्णी	५५
१६.	खैरांचे खोड मूळ चंदनाचे	डॉ. मुंजाजी गजेवार	५७
१७.	चिंतनशीलतेचा संस्कार	श्री. ग. शं. पेंडसे	५८
१८.	आजच्या पिढीला बोध	श्री. द. गो. पटवर्धन	५९
१९.	कडकपणा ऐकला, अनुभवला नाही !	डॉ. के. बी. चंद्रात्रे	६०
२०.	तीच आग अजून आहे	श्री. दि. द. गोगटे	६२
२१.	पूर्वीचे आणि आजचे अण्णा	डॉ. शां. रा. महाजन	६३
२२.	आता आम्ही जवळ आलो	श्री. स. ग. सावरकर	६६
२३.	मी तुझा कोणी लागतो की नाही ?	श्री. ना. मा. भंडारे	६८
२४.	माझा व कुटंबियांचा मार्गदर्शक	श्री. मो. ल. कुलकर्णी	६९
२५.	प्रत्येक क्षेत्रातील मार्गदर्शन	वैद्य न. पां. सामंत	७०
२६.	सवयी कायम आहेत	श्री. ज. म. वाठारे	७२
२७.	शिकवणाराही शिकतो–घडवणाराही घडतो	श्री. उ. र. सेवलेकर	७३
२८.	शिक्षण म्हणजे संस्कार	प्रि. रा. ना. झोळ	७९

क्रम	लेखाचे नाव	लेखक	पृष्ठ
२९.	नवीन ज्ञान—नवीन स्फूर्ती	डॉ. व. मो. उपाध्ये	८२
३०.	दुरावा दूर केला	डॉ. दु. का. संत	८४
३१.	एक वाचनीय ग्रंथ	डॉ. मा. गो. दाभाडे	८६
३२.	जगाला थोर पण आम्हांला अण्णाच !	प्रा. शं. रा. विट्ठांस	८९
३३.	वातावरणाचा परिपाक	श्री. वि. का. करमरकर	९१
३४.	विशाल अंतःकरणाचा अनुभव आला	श्री. द. म. वनछोड	९३
३५.	अष्टपैलुत्वाचे शिक्षण-संस्कार	लेफ्ट. क. प्र. का. सोमण	९४
३६.	माझ्या प्रगतीचा उगम	श्री. कृ. ना. ठकेकर	९६
३७.	माझ्या स्वप्नावर आघात	श्री. ग. गो. अतीतकर	९८
३८.	नेताजी सुभाष बोस व आम्ही	श्री. प. ल. पोहरकर	९९
३९.	डॉ. खैर इज माय गुरु	श्री. वा. ग. काणे	१०१
४०.	अण्णांमधील माणूस	प्रि. ना. गो. जोशी	१०३
४१.	आपल्या आशीर्वादाने	डॉ. गो. के. कुलकर्णी	१०६
४२.	मुले सुधारण्याचे प्रयोग	श्री. कृ. के. आठलेकर	१०७
४३.	कैऱ्या पाहून जिभेला कोरड	श्री. रा. प. जोशी	१०८
४४.	उपदेशाला कृतीचे पाठबळ	श्री. य. कृ. नानिवडेकर	१०९
४५.	आठ आण्याची आठवण	श्री. के. भा. खोत	११०
४६.	शिक्षणसोयीत वाढ झाली	श्री. वा. म. गोरे	१११
४७.	आदर्श मुख्याध्यापक	श्री. वि. कृ. बवरे	११२
४८.	उपनिषदांची आठवण होते	श्री. रा. आ. घाटगे	११४
४९.	छिन्नी चालूच आहे	श्री. वा. दा. घाटे	११६
५०.	बाहेर पडल्यावर समजलेले मोठेपण	श्री. म. वि. पुरोहित	११७
५१.	वाममार्गाचा पैसा नाकारला	श्री. रा. वि. मनोहर	११८
५२.	निष्कारण शिक्षेचा प्रसंग	श्री. श्री. बा. भट	११९
५३.	कडकपणा परिणामी हिताचा	श्री. गो. ग. गुजराथी	१२०
५४.	शिकलो तसे वागत आहोत	श्री. दा. शि. भावसार	१२२
५५.	यश देणारे संस्कार व विचार	श्री. वि. ना. वैद्य	१२४
५६.	सुसंस्कार व विशाल दृष्टिकोन	श्री. मा. वा. दहिफळे	१२५
५७.	यशाची सूत्रे	श्री. ना. म. फाटक	१२६
५८.	सजीव लेणी	श्री. बा. ना. कुलकर्णी	१२७
५९.	अध्यापनाची नवी पद्धत	श्री. कृ. रा. देवळे	१२९
६०.	सुधारणा-मंदिरातील रत्ने	श्री. चिं. गो. वीरकर	१३०
६१.	शिक्षणमंत्री इंजिनियर झाला	श्री. गो. गो. गायकवाड	१३२

क्रम	लेखाचे नाव	लेखक	पृष्ठ
६२.	पायावर डोके ठेवून–	श्री. भ. गं. देशपांडे	१३३
६३.	नवे नवे उपक्रम आणि प्रयोग	श्री. शं. रा. देवळे	१३५
६४.	मुलींना भाऊ हवा !	श्री. दा. क. चिवटे	१३७
६५.	एकलव्याचे अनुकरण	श्री. म. ना. वैद्य	१३८
६६.	आध्यात्मिक साधनेचा पाया	श्री. वा. म. चितळे	१३९
६७.	१९४२ मधील आम्ही विद्यार्थी	डॉ. वा. रा. जोशी	१४०
६८.	एकच साष्टांग नमस्कार	श्री. मा. पां. फणसे	१४३
६९.	उपाशी राहू नका	डॉ. ग. ज. कुलकर्णी	१४४
७०.	त्यावेळचे प्रयोग	श्री. यशवंत ना. पेंडसे	१४५
७१.	फेरी मारण्याचा कंटाळा नाही !	श्री. ल. श्री. पिसोळकर	१४६
७२.	आळशाला माफी मिळाली	श्री. ल. म. कर्वे	१४७
७३.	आज त्या गोष्टींचा अर्थ समजतो	श्री. वि. ल. चाफेकर	१४८
७४.	१९४१ च्या आगे मागे	श्री. स. गो. साठये	१४९
७५.	शासन आणि शाबासकी	श्री. शं. ज. थत्ते	१५२
७६.	नेहमी पाठीवर, एकदा हातावर	श्री. वि. सि. पाटील	१५३
७७.	मी फार थोडे घेतले ही हुरहूर	श्री. पां. म. गोखले	१५५
७८.	मी प्रयोगशीलता घेतली	श्री. भा. द. नवाथे	१५७
७९.	काही गुण, काही दोष	श्री. वा. रा. शिदोरे	१५९
८०.	आता आपण उपास सोडू	श्री. एच्. के. साळुंखे	१६२
८१.	'देवापुढे निश्चय करा'	श्री. एम्. बी. थोरात	१६४
८२.	अध्यापकांचे प्राध्यापक पण माझे बंधू	डॉ. गं. श्री. कोशे	१६५
८३.	विचारांची जोपासना करीत आहे	प्रा. प्र. र. जोशी	१६८
८४.	पंधरा वर्षांनंतर : माझे प्राध्यापक	प्रा. चंद्रकुमार डांगे	१७०
८५.	घडाघडा बोलायला शीक	श्री. म. द. कस्तुरे	१७४
८६.	बागवान आणि पालक	श्री. त्र्यं. ग. बापट	१७५
८७.	'माझेही पब्लिक स्कूल, गरिबांकरिता'	लेफ्ट. प. भ. कुलकर्णी	१७७
८८.	तुला विद्वान करून मगच सोडणार	डॉ. गो. शं. तांबे	१७९
८९.	अस्सा राग यायचा !	श्री. चंद्रकांत अंबाडे	१८१
९०.	सोन्यासारखी दानत	श्री. मा. श्री. देशपांडे	१८२
९१.	जेवणाप्रमाणे व्यायाम आवश्यक	श्री. व. खं. कुलकर्णी	१८३
९२.	कुतुबमिनारावर माझ्या फुल्या	श्री. बा. ल. ओक	१८४
९३.	माझे मानलेले गुरू	डॉ. पां. वि. जायदे	१८५
९४.	तेजस्वी दर्शन	प्रा. य. ज. धारूरकर	१८७

क्रम	लेखाचे नाव	लेखक	पृष्ठ
९५.	चार वर्षांत एकदाच दर्शन	श्री. म. बा. बरवे	१८८
९६.	संस्थाचालकांचे गुरू	श्री. भा. द. राव	१८९
९७.	भाववाचक संस्कार	श्री. ज. र. जोशी	१९१
९८.	त्रिबक खुशाल आहे	श्री. त्रि. द. ताम्हनकर	१९३
९९.	कोलंबसाजवळ पत्ताही नव्हता	श्री. श्री. दि. कुलकर्णी	१९५
१००.	चिंतनाची किंमत आता कळली	श्री. बा. म. सिंधये	१९६
१०१.	स्वतःला प्रायश्चित्त	श्री. वा. श्री. देशपांडे	१९७
१०२.	गृहशिक्षणाचा एक नमुना	कु. प्रभा गजानन खैर	१९८
१०३.	फलश्रुती	डॉ. गं. श्री. कोशे	२०४

लेखकांचे वर्गीकरण

प्रवेशकाल	शिक्षणपूर्णकाल	लेखक संख्या	लेखक्रमांक
१९२० ते १९३१	१९२२ ते १९३८	३६	१ ते ३६
१९३२ ते १९४२	१९३६ ते १९४९	४०	३७ ते ७६
१९४३ ते १९५८	१९४७ ते १९६१	२६	७७ ते १०३

लेखकांचे व्यवसाय व लेखक्रमांक

१) अध्यापक-मुख्याध्यापक–१०, ३३, ३८, ४०, ४३, ४७, ४८, ५३, ६२, ६३, ७४, ७६, ७८, ७९, ८०, ८२, ८५, ८६, ८७, ९४, ९६, १०३.
२) प्राध्यापक-प्राचार्य–१५, २८, ३०, ३१, ३२, ८३, ८४
३) इंजिनिअर–२३, २४, ५८, ६१, ६६, ७७, ९१, ९८, ९९, १००, १०१, १०२.
४) सरकारी अधिकारी–३६, ३७, ४९, ५१, ५४, ५६, ५७, ५९, ७५, ८१.
५) सरकारी सेवक–१८, ४२, ४६, ५०, ६४, ६८, ७१, ८९, ९०, ९२.
६) डॉक्टर-वैद्य–१६, १९, २१, २५, २९, ४१, ६७, ६९, ८८, ९३.
७) औद्योगिक क्षेत्र– २०, २२, ४४, ४५, ५२, ९५,
८) स्वतंत्र व्यवसाय–७, ९, ६५, ७०, ७२ ९७,
९) व्यापार-बँका इ. ३, १७, २६, ५५, ६०, ७३
१०) समाजसेवक–१, ५, ८, १३,
११) सेवानिवृत्त–२, ४, ६, ११,
१२) शिक्षणाधिकारी–२७, ३४,
१३) संरक्षण–खाते ३५, ३९,
१४) वकील–१४
१५) स्थानिक-स्वराज्य–१२

मराठी ग्रंथ संग्रहालय
वर्ग क्र. ७५५
नोंदणी क्र. ७५५५७ दि: निवड
दाखल दि. 2083 नो. दि: 20/3/69

प्रस्तावना : मी दिलेले शिक्षण व संस्कार

डॉ. गजानन श्रीपत खैर
एम्. ए.; पीएच्. डी.

सिंहावलोकन व मूल्यमापन आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन करण्याचा विचार प्रत्येकाच्या मनात केव्हाना केव्हा तरी येतोच. पण हे सिंहावलोकन एकतर्फीच आणि व्यक्तिनिष्ठ असते. आपण केलेल्या आपल्या मूल्यमापनात पुष्कळ वेळा स्वतःला उदारपणाने गुण देण्याची प्रवृत्ती असते. जीवनाचे हे सिंहावलोकन आणि मूल्यमापन आपल्या भोवतालच्या लोकांनी केले तर हे मोजमाप कदाचित निराळ्या पद्धतीनेही होईल. आपल्या कामगिरीबद्दल आपण स्वतःला दिलेले गुण आणि इतरांनी आपणाला दिलेले गुण यांत बराच फरक पडेल असे मला वाटते.

१९२० सालापासून आज-कालपर्यंत जवळ जवळ पंचेचाळीस वर्षे मी शिक्षणाचे व समाजसेवेचे काम करीत आहे. स्वतःच्या दृष्टिकोनातून विचार केला म्हणजे झालेल्या कामाबद्दल काही अंशी कृतकृत्यता वाटते. पण लगेच मनात असा विचार येतो की, ही भावना आत्मवंचनेची तर नाही ना? आपण आपली फसवणूक तर करून घेत नाही ना? ज्यांच्याकरता आपण इतकी वर्षे हयात वेचून हे काम केले त्यांच्या भावना काय असतील? स्वतःच्या जीवनकार्याकडे ज्या रीतीने आपण पाहातो त्याच मापाने इतर लोक पहात असतील काय? ज्यांच्याकरता आपण काम केले त्यांच्या मूल्यमापनाला जास्त महत्त्व आहे. ते विचारात घेतल्याशिवाय स्वतःच्या कार्याचे सिंहावलोकन पूर्ण होऊ शकत नाही.

विद्यार्थ्यांचा अभिप्राय महत्त्वाचा गेल्या पंचेचाळीस वर्षांत शेकडो विद्यार्थ्यांना मी शिक्षण दिले आणि निकटचे अथवा दूरचे असे संबंध प्रस्थापित केले. मी दिलेले शिक्षण आणि संस्कार यांचे महत्त्व त्यांना किती वाटते? जीवनात त्यांना ते उपयोगी पडले, का काहीच उपयोग झाला नाही? काहींना त्याचा जीवनात अडथळा झाला की काय? या विद्यार्थ्यांना मी चांगले शिक्षण दिले असा मी स्वतः कितीही दावा केला तरी त्याला फारशी किंमत नाही. दिलेले शिक्षण विद्यार्थ्यांच्या पदरात किती पडले आणि वाया किती गेले याचा पुरावा विद्यार्थीच देऊ शकतील. 'विद्येचे ग्रहण झाल्याशिवाय विद्येचे दान झाले असे म्हणता येणार नाही,' या विचारसरणीतून प्रस्तुत ग्रंथाचा जन्म होत आहे.

१९६५ मध्ये माजी विद्यार्थ्यांचे एक संमेलन भरले असताना त्यांच्यापुढे मी हा प्रश्न टाकला. मी त्यांना असे आवाहन केले की गुरू आणि शिष्य या नात्याने त्यांचे व माझे जे संबंध आले त्यांच्या निमित्ताने त्यांना मी काय शिक्षण दिले, कोणते

संस्कार करण्याचा प्रयत्न केला, शील बनविण्याचे दृष्टीने काय केले, आणि या सर्वांचा त्यांच्या जीवनात किती प्रमाणात उपयोग झाला किंवा झाला नाही, याचे लेखी निवेदन त्यांनी मला द्यावे. या निवेदनाचा उपयोग पुढील पिढीतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना होणार असल्याकारणाने ते स्पष्टपणाने, चिकित्सक वृत्तीने, आणि निःसंकोच मनाने लिहिले जावे. त्या लेखनाचा उद्देश शैक्षणिक उपयुक्तता हा असावा. एखाद्या व्यक्तीचे केवळ गुणवर्णन हा उद्देश नसावा. माजी विद्यार्थ्यांकडून मानपत्र घेणे हा या संकलनाचा उद्देश नाही. निःपक्षपाती दृष्टीने आपल्या गुरुजींनी दिलेल्या शिक्षणाकडे पाहून, आपल्या त्यावेळच्या विद्यार्थी-अवस्थेचा विचार करून, त्यानंतरच्या स्वतःच्या सांसारिक आणि सामाजिक जीवनाचा विचार करून, स्वतःच्या अनुभवावर आधारलेला प्रत्येकाचा लेख असावा. माजी विद्यार्थ्यांच्या या अनुभवांतून भावी पिढीतील शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांचा मार्ग दिसावा. पूर्व पिढीतील गुरुजींच्या आणि विद्यार्थ्यांच्या चुकांची पुनरावृत्ती त्यांनी करू नये. त्यांच्यांतील चांगल्या गोष्टींची परंपरा पुढे चालवावी, यशस्वी व उपयुक्त झालेले उपक्रम पुढे चालवावेत, अयशस्वी आणि निरुपयोगी उपक्रमांचा फेरविचार करावा—ह्या हेतूने लेखांचे संकलन केले जात आहे.

लेखकांची विविधता स्वतःचे अनुभव देणाऱ्या या विद्यार्थ्यांमध्ये पंचवीस वयापासून साठ वयापर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शिक्षण झाल्यानंतर त्याचा उपयोग करून त्याचे मूल्यमापन करण्याइतका अनुभव आणि प्रगल्भता या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी आली आहे. गुरुजींच्या भीडमुर्वतीखातर स्वतःचे प्रामाणिक मत लपवून ठेवतील अशा परिस्थितीत हे विद्यार्थी नाहीत. समाजातील निरनिराळे अनेक व्यवसाय करणारे हे विद्यार्थी आहेत. स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचे आणि संस्कारांचे प्रश्न त्यांच्या पुढेही उभे आहेत. अशा या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजींचे आणि स्वतःला मिळालेल्या शिक्षणाचे स्वतः केलेले मूल्य-मापन भावी शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरेल असे वाटते. शिक्षण-शास्त्राचा हा कच्चा मालमसालाच आहे.

या ग्रंथातील लेखकांमध्ये विविध प्रकारचे लेखक आहेत. माझ्या पंचेचाळीस वर्षांच्या कामाच्या कालखंडांत अनेक विद्यार्थ्यांशी कमी अधिक संबंध आले. त्यांपैकी काहींना मी शालेय विषय शिकविले. काही जणांना मास्टर ऑफ एज्युकेशन या वर्गातील पोस्ट ग्रॅज्युएट पातळीवरील विषय शिकविले. काही जणांना मधून मधून मार्गदर्शन केले. काही जणांचा संबंध वसतिगृहाचे निमित्ताने आला. काही जणांचा महाराष्ट्र विद्यालयाचे निमित्ताने केवळ शाळेपुरता आला. काही जणांच्या बाबतीत अधिक काळ आणि जास्त निकटचा संबंध आला, तर काही जणांच्या बाबतीत महिन्यातून अथवा आठवड्यातून एखाद्या तासापुरता आला. काहींचा संबंध कामाच्या निमित्ताने वारंवार आला, तर काहींचा संबंध एखाद्या अपराधाकरता शिक्षेपुरताच आला. ज्याचा ज्याचा जेथे जेथे जितका वेळ संबंध आला त्या वेळात त्याला अधिकाधिक शिक्षण आणि

मार्गदर्शन करण्याचा माझा स्वभावच बनून गेलेला आहे. प्रारंभीच्या काळात माझे व विद्यार्थ्यांचे संबंध अधिक निकटचे आले. संस्थेबाहेरील शैक्षणिक कार्याचा माझा व्याप जसजसा वाढत गेला तसतसे विद्यार्थ्यांचे संबंध कमीकमी होत गेले. मी दिलेले शिक्षण आणि मागदर्शन लेखकांच्या विद्यार्थीदशेपुरतेच मर्यादित राहिलेले नाही. शिक्षण संपवून ते बाहेर पडल्यानंतरही त्यांच्याशी संबंध ठेवून शक्य तितके त्यांना मार्गदर्शन व वैचारिक शिक्षण देण्याचा माझा सतत प्रयत्न चाललेला आहे. अशा रीतीने विविध स्वरूपांत माझ्याकडून शिक्षण आणि संस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या लेखांचे हे संकलन आहे.

अनेक प्रकारचे संबंध या संग्रहांतील बहुसंख्य लेखक पुणे–नाशिक अ. वि. गृह आणि महाराष्ट्र विद्यालय यांतील माजी विद्यार्थी आहेत. काही थोडे लेखक माझे एम्. एड्. चे विद्यार्थीमित्र व काही महाराष्ट्र विद्यालयातील शिक्षक–सहकारी आहेत. ही योजना समजल्यानंतर विद्यार्थी किंवा सहकारी नसलेल्या परंतु माझे काम पाहिलेल्या एक दोन मित्रांनी स्वयंस्फूर्तीने आपले लेख पाठविले आहेत. स्वतःच्या घरी शिक्षण-संस्कारांचा काय उजेड आहे हे कळण्याकरता माझ्या मुला-मुलींचे लेखही दिले आहेत. या सर्व लेखांतून वाचकांचे दृष्टीपुढे गुरु-शिष्य-विषयक शिक्षणकार्याचे एक संपूर्ण चित्र उभे राहील.

ग्रंथाच्या मर्यादा प्रत्येक व्यक्तीचे शिक्षण अनेक गुरूंकडून होत असते. त्यातून अमुक एका गुरूने दिलेले शिक्षण वेगळे काढून त्याचा विचार करणे थोडे कठीण तर खरेच ! पण तोही प्रयत्न सर्व लेखकांनी केलेला आहे. इतर गुरुजींनी दिलेल्या शिक्षणाचे उल्लेख मुद्दाम टाळले आहेत. कारण या ग्रंथात मी दिलेल्या शिक्षणाचा माझ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार हाच मुख्य विषय आहे. लेखकांचे व्यक्तिमत्त्व बनविण्यात जसा माझा हात आहे तसाच त्यांच्या पालकांचा आणि इतर शिक्षकांचाही आहे. त्यांचे श्रेय त्या प्रमाणात त्यांनाही द्यायलाच पाहिजे. सर्वच श्रेय माझे नाही.

संभाव्य दोष अपरिहार्य लेखकांकडून आलेल्या मजकुराचे संकलन आणि संपादन करणे आवश्यक होते. सर्वांचेच मूळ लेख कायम ठेवले असते तर ग्रंथाचा आकार फार मोठा झाला असता. या ग्रंथाचे संपादन मीच करीत असल्यामुळे माझ्या-विषयी येणाऱ्या स्तुतीचा भाग शक्य तेथे मी गाळलेला आहे. लेखकाच्या भावनांची कदर करण्याच्या आणि मुद्द्यांच्या दृष्टीने त्यांतील काही भाग ठेवला आहे. सर्व लेखक एकाच गुरूविषयी लिहीत असल्यामुळे काही मुद्द्यांची पुनरावृत्ती होणे अपरिहार्य आहे. मूळ मुद्दा कायम ठेवून अशी पुनरावृत्ती शक्य तेथे गाळली आहे. काही थोड्या ठिकाणी भाषाशुद्धीच्या दृष्टीने हात फिरविला आहे. वाचकांना लेखांचे आकलन सुलभ जावे या दृष्टीने संपूर्ण लेखाला आकर्षक असे शीर्षक आणि परिच्छेदांना उपशीर्षके दिलेली आहेत.

वाङ्मयीन महत्त्व या ग्रंथाला मुख्यतः शैक्षणिक वाङ्मय म्हणून अस्तित्व यावे अशी माझी मूळ कल्पना; परंतु प्रत्येक लेखाला लेखकाच्या अनुभवाचा आणि

भावनेचा वास असल्यामुळे त्याला काही काही ठिकाणी भाषेच्या व कथानकाच्या दृष्टीने ललित वाङ्मयाचेही स्वरूप आले आहे. लेखात व्यक्त झालेल्या भावना प्रामाणिक आहेत. गुरूविषयी प्रेम, आदर, श्रद्धा, कृतज्ञता इत्यादी भावनांचा आविष्कार झालेला आहे. त्याचबरोबर राग, भीती, तिटकारा, नाराजी, अशाही भावना संयमाने पण प्रामाणिकपणे व्यक्त केल्या गेल्या आहेत.

भावनांचा छेद अनेक ठिकाणी माझ्या व संस्थेच्या काही गोष्टींविषयी सौम्य अथवा तीव्र टीकात्मक भाग आला आहे. त्याविषयी आत्मसमर्थनात्मक टीपा न देता मी तो मजकूर तसाच ठेवला आहे. कारण त्या त्या वेळी किंवा नंतर विद्यार्थ्यांच्या मनावर गुरूच्या वागण्याचा काय परिणाम होतो व राहातो हा महत्त्वाचा विषय आहे. इतर शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे हा मुख्य उद्देश आहे.

या ग्रंथातील लेख वाचक कुतूहलाने आणि निर्विकार मनाने वाचतील, परंतु माझ्या ठिकाणी त्यांनी अनेक मिश्र भावना निर्माण केल्या आहेत. कधी पश्चात्ताप, कधी स्वतःची कीव, कधी निराशा, कधी दुःख, कधी विफलता अशा भावना निर्माण झाल्या. परंतु त्याचबरोबर कृतकृत्यता, धन्यता आणि आशावाद यांही भावनांचा जन्म होऊन दोन्ही विकारांनी परस्परांना छेद दिला; आणि शेवटी मन निर्विकार झाले.

माझ्यातील उत्क्रांती या लेखांचा क्रम कालानुक्रमाने लावलेला आहे. गेल्या पंचेचाळीस वर्षांतील कालखंडात ज्या क्रमाने माझ्या हाताखाली विद्यार्थी आले तोच क्रम कायम ठेवला आहे. त्यामुळे माझ्या कामातील, विचारातील व वागण्यातील संक्रमण आणि उत्क्रांती लेखांच्या रूपाने प्रत्ययाला येईल. मी विद्यार्थ्यांना शिकविले, घडविले आणि बनविले; तितक्याच प्रमाणात विद्यार्थ्यांनीही मला शिकविले, घडविले आणि बनविले ! १९२० सालचा मी १९३० सालात राहिलो नाही; १९३० सालातील मी १९६५ साली निराळ्या स्वरूपाला पोहोचलो. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या एका व्यक्तीची उत्क्रांती या ग्रंथात अनुभवावयास मिळेल.

तीन कालखंड माझ्या शैक्षणिक जीवनाचे सिंहावलोकन मी केले त्यात मला तीन अवस्था मुख्यतः दिसून आल्या. एक प्रारंभीची अनुकरणात्मक अवस्था; दुसरी मध्यकालातील प्रयोगात्मक अवस्था, आणि तिसरी उत्तरकालखंडातील प्रसारात्मक अवस्था. अनुकरण, प्रयोग आणि प्रसार अशा तीन सूत्रांत माझ्या उत्क्रांतीचे मी क्रमवर्णन करू शकेन.

अनुकरण-खंड माझ्या पहिल्या कामातील कालखंड १९२० ते ३१ आहे. मला माझ्या विद्यार्थीदशेत ज्या ज्या गुरुजींनी शिकविले आणि घडविले त्यांचेच अनुकरण मी पहिल्या कालखंडातील पूर्वभागात केले. मी स्वतः शिक्षण घेतले तो काल विसाव्या शतकातील पहिल्या वीस वर्षांचा होता. शिक्षणातील नवीन विचारांचे वारे फारसे आलेले नव्हते. जुन्या कठोर पद्धतीत भरीव शिक्षण आणि भरीव शिक्षा यांचे प्राधान्य जास्त होते. चांगले शिक्षक आणि शिक्षा ह्या दोन्ही गोष्टी

निगडित झालेल्या होत्या. मला प्राथमिक शाळेत इयत्ता चौथी आणि पाचवीमध्ये जे दोन शिक्षक मिळाले त्यांनी माझ्यावर बौद्धिक शिक्षणाच्या आणि चारित्र्य-शिक्षणाच्या संस्कारांचे चिरस्थायी आणि बलवत्तर परिणाम केले. वर्गात माझा गुणक्रमांक पहिल्या पाचांत असे. पण या शिक्षणाचे संक्रमण गुरूकडून माझ्यासारख्या विद्यार्थ्याकडेही छडीच्या माध्यमानेच झाले ! अभ्यासातील अथवा वर्तनातील लहान सहान चुकांकरताही या हातावर छडचा मिळाल्या आहेत ! एका प्रसंगी तर बाल-स्वभावानुरूप घडलेल्या एका क्षुल्लक अपराधाबद्दल या हाताने लागोपाठ दहा छडचा खाल्ल्या आहेत. मी आश्रमात दाखल झाल्यानंतरही शिस्त आणि शील शिकविण्याकरता छडीचा वापर मुक्तहस्ताने झालेला पाहिला आणि स्वतः अनुभवला. आमच्या प्रेमळ मातुश्रींचे प्रेमळ हात जसे पोटात गेले तसे कैक वेळी पाठीकडेही वळले आहेत ! सारांश, शिक्षण, शील आणि शिक्षा यांचे साहचर्य अभेद्य आहे अशी समजूत, विद्यार्थी-दशेतून शिक्षक-व्यवसायात पदार्पण केल्यानंतर प्रारंभीच्या काळात मी करून घेतलेली होती. त्यावेळी मला शिक्षा करणारांनी ती कर्तव्यबुद्धीने व माझ्या हिताकरता केली. या श्रद्धेमुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात कधी अनादरवृत्ती आली नाही. हेच गुरु-शिष्य संबंध स्वाभाविक आहेत अशी माझी धारणा होती.

आत्मनिरीक्षण स्वतःच्या अनुभवावर चिंतन करण्याची सवय मला याच कालखंडात लागली. आपल्या वागण्यामुळे मुलांच्यावर काय परिणाम होतो, मानसिक प्रतिक्रिया काय होते, सुधारणा कितपत होते, गुरुविषयी त्यांची भावना काय होते, इत्यादी गोष्टींचा मी विचार करू लागलो आणि मला नवीन मार्ग दिसू लागले. या चिंतनाच्या जोडीला शिक्षणशास्त्रावरील वाङ्मयाचे वाचनाचीही जोड मिळाली. त्यामुळे पहिल्या सहा-सात वर्षांच्या कालखंडात माझ्यात पुष्कळ सुधारणा झाली. आंधळेपणाने सरसकट शिक्षा करण्याचे मी सोडून दिले. मुलांचे मानसशास्त्र म्हणून काही विचार-सरणी अस्तित्वात आहे तिला अनुसरून आपण वागले पाहिजे असे ठरविले; त्यामुळे विद्यार्थ्यांशी वागण्यात माझ्या ठिकाणी समजूतदारपणा, मुलांच्या मनःस्थितीचा विचार करण्याची वृत्ती आणि क्षमाशीलता या गुणांचा प्रादुर्भाव झाला. हा फरक मी चिंतनपूर्वक, विचारपूर्वक आणि परिश्रमपूर्वक माझ्यात घडवून आणला. त्याच सुमाराला शिक्षणशास्त्राच्या अभ्यासाकरता मी अमेरिकेत व युरोपला दोन अडीच वर्षे गेलो. अमेरिकेला जाण्यापूर्वीच माझ्यात बदल झालेला होता. अमेरिकेला गेल्यामुळे व तेथून आल्यामुळे मी बदललो असे झाले नाही. बदल झाला म्हणूनच अमेरिकेला व युरोपला गेलो. बारा वर्षांच्या अनुभवाने व कामाने शिक्षणशास्त्र व पद्धती या विषयी जिज्ञासा उत्पन्न झाली म्हणून पुनः शिक्षण सुरू केले.

सद्‌गुणांचा अट्टाहास माझ्या विद्यार्थी-दशेतील शिक्षकांनी माझ्यावर जे बलवत्तर असे संस्कार केले, त्यांत चारित्र्य, शील आणि शिस्त यांवर फार मोठा भर होता. साधेपणाची राहाणी, स्वदेशीचे व्रत, अभ्यासू वृत्ती, निरलसता आणि कोणत्याही आपत्ती आल्या तरी शिक्षणाची कास न सोडणे—हे वळण मला माझ्या आईकडून व पूर्व शिक्षकां-

कडून मिळाले. स्वाभाविकपणेच शिक्षकव्यवसायातील माझ्या पहिल्या कालखंडात आणि त्यानंतरही वरील सद्‌गुण तरुण पिढीमध्ये रुजविण्याचा मी अट्टाहास केला. असे करण्यात माझ्या ठिकाणी प्रारंभीच्या काळात वाजवीपेक्षा जास्त कडकपणा आणि कठोरपणा आला. पुढे विचाराने आणि चिंतनाने हा कठोरपणा कमी कमी होत गेला. कालानुक्रमाने या लेखांचे वाचन केल्यास वरील विधानाची सत्यता पटेल.

प्रयोगवृत्ती-खंड माझ्या शैक्षणिक जीवनातील दुसरा कालखंड सामान्यपणे १९३१ ते ४८ असा पडतो. या कालखंडात मी अमेरिका, युरोप, जपान इत्यादी देशांतील शिक्षणाचे निरीक्षण केले. तिकडे जाण्यापूर्वी बारा वर्षांचा शिक्षण-कार्याचा अनुभव माझ्या संग्रही होताच. शिक्षण-कार्याला मी सुरुवात केली त्यावेळी मनापुढे दोन उद्देश प्रामुख्याने होते. पहिला उद्देश गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे कार्य करण्याचा आणि दुसरा उद्देश राष्ट्रीय शिक्षण देण्याचा. पहिल्या कालखंडात या दोन उद्देशांनी मुख्यतः कार्य केले. दुसऱ्या कालखंडात वरील उद्देशांच्या जोडीला शैक्षणिक प्रयोग करण्याच्या उद्देशांची भर पडली. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय याच्या तपशीलाचा मी जास्त विचार केला, व तो अंमलात आणला. महाराष्ट्र विद्यालयात निरनिराळे प्रयोग केले. त्यांचा उद्देश प्रांतातील व देशातील सर्वसामान्य शाळांकरिता व शिक्षणाकरिता एक चांगला आदर्श निर्माण करावा असा होता. प्रचलित अभ्यासक्रमात सुधारणा, स्वतंत्र क्रमिक पुस्तकांचा उपयोग, आधुनिक काळाला उपयुक्त अशा नवनवीन विषयांची अभ्यासक्रमात भर, बौद्धिक विषयांव्यतिरिक्त शारीरिक शिक्षण, औद्योगिक शिक्षण, धार्मिक व नैतिक शिक्षण, लष्करी शिक्षण, व्यवसाय-मार्गदर्शन, स्वतंत्र ग्रंथलेखनाचे शिक्षण इत्यादी अनेक प्रकारचे प्रयोग दुसऱ्या कालखंडात मी केले. कधीकाळी या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिल्यास त्यांचे सविस्तर विवेचन करता येईल.*

माझ्या या स्वतंत्र प्रेरणांचा उल्लेख दुसऱ्या कालखंडातील लेखकांनी तुरळक तुरळक केलेला आढळून येईल. ज्या विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी बाहेरच्या शाळेचा अनुभव घेऊन मी दिलेले शिक्षण पाहिले, त्यांना माझ्या शैक्षणिक उपक्रमांची कल्पना आली असेल. इतर शाळांशी तुलना करण्याची संधी ज्यांना मिळाली नाही त्यांना या उपक्रमांचे वैशिष्ट्य लक्षात येणे शक्य नव्हते. हा नेहमीच्याच शिक्षणाचा भाग आहे असा त्यांचा समज झालेला असावा, किंवा या उपक्रमांचा त्यांना फारसा फायदा झालेला नसावा.

प्रसार-खंड माझ्या शिक्षण-कार्यातील तिसरा कालखंड १९४८ सालापासून आजतागायतचा. पहिल्या आणि दुसऱ्या कालखंडांतील मुख्य उद्देश गरिबांचे शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण आणि शैक्षणिक प्रयोग अशा प्रकारचे होते. या वेळेपर्यंत शैक्षणिक कामांच्या अध्ययनाचा, विचारांचा, चिंतनाचा आणि प्रयोगांचा पंचवीस-तीस वर्षांचा

*गुरुवर्य रँ. आप्पासाहेब परांजपे एकदा विद्यालय पहाण्याकरता आले होते. त्यावेळी त्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, सरकारी विद्याखात्यानेही या शाळेतील उपक्रम पाहून त्यांचा आपल्या शिक्षणपद्धतीत समावेश करून घ्यावा.

त्यावेळी अनुभव माझ्या पदरी साठलेला होता. तिसऱ्या कालखंडात मागील सर्व उद्देश पुढे चालू ठेवून त्यांच्या भरीला प्रसारात्मक आणि प्रचारात्मक कामांचे धोरण मी स्वीकारले. विद्यालयाची अधिक मोठ्या प्रमाणात वाढ करून त्याचे अनेक विभाग वाढविले आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्या संख्येत वाढ केली. प्रयोगांनी यशस्वी झालेल्या संस्कारांचे क्षेत्र व्यापक करून अधिक शिक्षकांना, शाळांना व विद्यार्थ्यांना ते द्यावेत असे वाटू लागले. संस्थेच्या कामाव्यतिरिक्त संस्थेबाहेरील व्यापक शैक्षणिक कार्याला दुसऱ्या कालखंडात थोड्या प्रमाणात प्रारंभ केला होता. त्याचा विस्तार तिसऱ्या कालखंडात मी अधिक प्रमाणात केला. एक पाय संस्थेत ठेवून दुसरा पाय महाराष्ट्रातील व भारतातील शिक्षणक्षेत्राचे कार्य करण्यासाठी उचलला. कंपासाचे एक टोक स्थिर राहून दुसरे टोक व्यापक स्वरूपाचे वर्तुळ घेते. त्याचप्रमाणे संस्थेचे काम केंद्र समजून संस्थेबाहेरील व्यापक शैक्षणिक कामाचे वर्तुळ मी अधिकाधिक वाढवीत गेलो. स्वाभाविकपणेच संस्थेतील आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांशी संबंध कमीकमी येत गेला. तितक्याच प्रमाणात बाहेरील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणसंस्था यांच्यांशी व्यापक स्वरूपाचा वैचारिक संबंध वाढला. यासंबंधी माझी विचारसरणी अशी – माझ्या शाळेतील विद्यार्थी हे एवढेच माझे विद्यार्थी नसून अखिल महाराष्ट्रातील, इतकेच नव्हे तर सर्व भारतातील विद्यार्थी, हेही माझेच विद्यार्थी आहेत. त्यांना चांगले शिक्षण कसे मिळेल, त्या शिक्षणात सुधारणा कोणत्या करावयास पाहिजेत, विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या अडीअडचणी काय आहेत, आपल्या राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप कसे असावे, अशाच प्रकारचा सतत विचार करून, त्यांचा प्रसार व त्याला अनुरूप असे कार्य बाहेरील व्यापक संस्थांच्यामार्फत मी केले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या संघटना, मुख्याध्यापकांच्या संघटना, मुंबई-पुणे विद्यापीठे, लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, निरनिराळी शैक्षणिक मंडळे व समित्या यांच्यामार्फत मी यथाशक्ती काम केले. पुणे, मुंबई आणि कर्नाटक विद्यापीठांतर्फे चाललेल्या 'मॉस्टर ऑफ एज्युकेशन' पदवीच्या पोस्ट ग्रॅज्युएटच्या अभ्यासक्रमातील अनेक विद्यार्थ्यांना १९४८ पासून पुढे अनेक वर्षे मी Education Comparative (तुलनात्मक शिक्षण पद्धती) हा विषय शिकविला व त्याच्या अनुषंगाने माझ्या मनात असलेले उत्कट शैक्षणिक विचार व कल्पना भावी कालातील शिक्षकांना दिल्या. अशाच काही शिक्षकांचे लेखही या संग्रहात आहेत. उत्तर कालखंडात माझ्या विद्यार्थ्यांशी माझे कमी संबंध आले पण तितक्याच प्रमाणात बाहेरचे शिक्षक व विद्यार्थी यांचेशी माझे संबंध जास्त आले. विद्यादानाचे काम कुठे तरी चालूच होते.

माझ्या प्रेरणा वसतिगृहात अथवा विद्यालयात विद्यार्थ्यांशी वागताना माझ्या मनात काही निश्चित विचारसरणी व तत्त्वे होती. त्या तत्त्वांवर श्रद्धा असल्याकारणाने विद्यार्थ्यांशी वागण्यात कालपरत्वे आणि प्रसंगपरत्वे माझ्या ठिकाणी कठोरपणा अथवा सौम्यपणा विद्यार्थ्यांच्या प्रत्ययाला आला असेल. भावी काळातील शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता या तत्त्वांचा थोडक्यात निर्देश करतो.

गरिबांच्या शिक्षणार्थ जीवन मी स्वतः बालवयात गरिबीची पुष्कळ झळ सोसली. उन्हात, पावसात, थंडीत मधुकरी मागून शिक्षण केले आणि शिक्षण संपल्यावर अशाच गरीब मुलांच्या सेवेला आयुष्य वाहिले. त्यामुळे गरीब मुलांनी आपले शिक्षण पूर्ण करून कर्तबगार व्हावे आणि उत्कर्ष साधावा, आपल्या घराण्याचा नावलौकिक वाढवावा, ही तळमळ मनामध्ये सतत होती व आहे. एकदा संस्थेत आलेला विद्यार्थी संस्थेतच राहावा व अधिकाधिक शिक्षण पूर्ण करून त्याने बाहेर पडावे ही अंतःकरणातील इच्छा व अपेक्षा. यामुळे संस्था सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा मला प्रारंभी प्रारंभी राग येत असे. पुढे पुढे या वृत्तीत सौम्यपणा आला. एकदा सान्निध्यात आलेला विद्यार्थी हा संस्थेत अथवा बाहेर असला तरी जन्मभर आपला विद्यार्थी आणि मित्र राहावा आणि आपल्या मार्गदर्शनाचा, विचारांचा व अनुभवांचा फायदा त्याला सतत मिळत राहावा, ही मनोवृत्ती नकळत माझ्या ठिकाणी आली. प्रारंभीच्या माझ्या कठोरतेमुळे काही विद्यार्थी दुरावले तरी काहींना नंतर माझी अंतरीची तळमळ प्रत्ययास आली, आणि ते पुनः जवळ येऊन मला माझ्या धाकट्या भावासारखे झाले. ही तळमळ ज्यांना आधी आणि नंतरही दिसली नाही ते दूरच राहिले. पण त्यांच्याविषयी माझे प्रेम कायम आहे.

बुद्धीच्या उपयोगावर भर बुद्धिमान मुलांनी आपल्या बुद्धीचा अधिकाधिक उपयोग करावा; त्याचप्रमाणे सामान्य बुद्धीच्या मुलांनीही यशाकरिता आपली पराकाष्ठा करावी अशी प्रेरणा मी देत आलो आहे. बुद्धी असून निर्बुद्धपणे वागणाऱ्या, बुद्धी न वापरणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी मला अतिशय राग येत असे. या रागाचा व तापटपणाचा प्रसाद अनेक विद्यार्थ्यांना मिळालेला आहे.

भावी जीवनाकडे लक्ष आश्रमाच्या राहणीकरता आणि विद्यालयातील शिस्तीकरता मी अनेक नियम केले व तत्त्वे घालून दिली. या नियमांच्या मागे एक व्यापक दृष्टी होती. विद्यार्थी भावी काळात लष्करी सैनिक, जबाबदार अधिकारी, सामाजिक कार्यकर्ता, संशोधक अशा पातळीचा नागरिक होईल असे त्याचे भावी स्वप्न मी पहात असे. त्या दृष्टिकोनातून त्याची विद्यार्थी-अवस्था शिस्तीत राखण्याचा मी प्रयत्न करी. लष्करी कामात, कारखान्यात, अधिकाराच्या वापरात, सार्वजनिक कामात, थोडीशी जरी चूक झाली तरी सर्व समाजावर तिचे गंभीर परिणाम होतात. म्हणून प्रत्येक काम शिस्तवार आणि बिनचूक झाले पाहिजे या धोरणाने मी मुलांचे नियमन करी. त्यामुळे मुलांकडून चूक किंवा अपराध झाल्यास त्याच्या भावी जीवनाचे दृष्टीने मला अत्यंत गांभीर्य वाटे. परिणामी वागण्यात, बोलण्यात आणि शिक्षा करण्यात कडकपणा व कठोरता येई. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थी भावी स्वातंत्र्यकाळाचा नागरिक या दृष्टीने मला दिसे. माझी ही भूमिका विद्यार्थ्यांना न सांगता मी वागल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे प्रारंभी गैरसमज झाले व त्यांच्या ठिकाणी माझ्याविषयी कटुता वाढली. अनुभवाने हे माझ्या लक्षात आल्यावर मी मुलांना या गोष्टी समजावून सांगत असे,

आणि शिक्षा करावयाची झाल्यास अपराध आणि त्याचे भावी परिणाम सांगूनच शिक्षा करीत असे.

मुलांची बाजू मुलांनाही त्यांची बाजू आहे असे मला नेहमी वाटे. ती ऐकून घेतल्याशिवाय कोणताही निर्णय मी घेत नसे. अपराध करणारे, अभ्यास टाळणारे, नापास होणारे, शिस्त मोडणारे, नियमांचे उल्लंघन करणारे असे विद्यार्थी बोलावून मी त्यांची विचारपूस करी, आणि वेळप्रसंगी शिक्षा करण्याचा योग आला तरी अंतःकरणातील सहानुभूती कधी कमी झाली नाही. गंभीर अपराधानंतर मुलाची बाजू रास्त वाटल्याने त्याला माफी आणि अपराध सौम्य पण स्पष्टपणे सांगण्यास नकार दिल्याबद्दल कडक शिक्षा असे काही प्रकार माझ्याकडून झाले. शिक्षकांच्या सभेत विद्यार्थ्यांच्याबद्दल गैरसहानुभूतीचे अथवा असहिष्णुतेचे वातावरण असल्यास मला वाईट वाटे, आणि सहकाऱ्यांपुढे मुलांची बाजू ठेवण्याचा मी नेहमी प्रयत्न करी. आजचा अपराध करणारा उद्या संत-महात्माही होईल असे मला वाटते.

सुधारणा-प्रयोग अनेक गुन्हेगार विद्यार्थ्यांना सुधारण्याचे प्रयत्न मी केले आहेत. तो एक माझ्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषयच आहे. माझ्या लहानपणी आईची देखरेख नसती तर मीही गुन्हेगार आणि गुंड मुलांच्या तावडीत सामील झालो असतो. योग्य व सुवेळी मार्गदर्शन मिळाले तर मुलांच्या जीवनात क्रांती होऊ शकते. अशा रीतीने उपदेशाने, मार्गदर्शनाने आणि सहानुभूतिपूर्वक केलेल्या शिक्षेने मी सुधारलेले विद्यार्थी आज निरनिराळ्या क्षेत्रांत जबाबदारीची कामे करीत आहेत.

मुलांना वाली हवा महाराष्ट्र विद्यालयात मुख्याध्यापक असताना वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांनाच एखादा विषय शिकविण्यापेक्षा प्रत्येक वर्गावर आठवड्यातून एकेक तास मी घेत असे. मुलांचा अभ्यास, व्यायाम, गृहपाठ, गृहस्थिती, छंद, सुटीतील कार्यक्रम, अभ्यासाच्या पद्धती व चालू घडामोडी यांविषयी चर्चा करून मुलांच्या अडीअडचणी विचारीत असे. शाळेतील गैरसोयी, शिक्षकांचे अध्यापन, अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके इत्यादी विषयींचे अनेक दोष मुले नजरेला आणीत. त्यामुळे आपले ऐकणारा कोणीतरी आहे, आपल्याला वाली आहे असे विद्यार्थ्यांना वाटे. विद्यार्थ्यांचीही बाजू नेहमी ऐकली पाहिजे असे माझ्या सहकाऱ्यांना मी नेहमी सांगतो. "माझ्या राज्यात अन्याय होणार नाही." असे मी नेहमी विनोदाने म्हणतो.

माहितीनंतर निर्णय विद्यार्थ्यांविषयी कोणतेही प्रकरण पुढे आले असताना त्या विद्यार्थ्याविषयी संपूर्ण माहिती मिळविल्याशिवाय निर्णय घ्यावयाचा नाही असा माझा कटाक्ष असे. झटपट निकाल हे शास्त्र माझ्याजवळ नाही. अनियमितपणा, अनभ्यास, गैरशिस्त, उनाडपणा इत्यादी गोष्टींबद्दल एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षकांनी मजकडे आणले म्हणजे त्यांना असे वाटे की अण्णांनी तावडतोब काहीतरी शिक्षा करावी. मुलांनाही तशीच भीती वाटे. परंतु त्या मुलाची घरची परिस्थिती,

त्याचा अभ्यास, त्याचे पूर्वीचे वर्तन, त्याच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे त्याच्याविषयी मत, या सर्व गोष्टी जमविण्याला वेळ लागे. पण त्या पुढे आल्याशिवाय विद्यार्थ्यांविषयी मी निर्णय घेत नसे. शिक्षकांना हे माझे वर्तन दीर्घसूत्रीपणाचे वाटे. पुढे पुढे मी असे तंत्र बसविले होते की त्यामुळे शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याची जरूर ती माहिती व पार्श्वभूमी मी एका मिनिटात देत असे. माझ्या टेबलावर मी अशी एक वही तयार ठेवी की जिच्यात प्रत्येक विद्यार्थ्याचे प्रत्येक परीक्षेतील विशेष कमी किंवा विशेष अधिक गुण, त्याच्या अनियमितपणाचे प्रमाण, त्याच्या अभ्यासाच्या सवयी, त्याचे सद्वर्तन अथवा दुर्वर्तन व त्याला झालेल्या शिक्षा–या सर्व गोष्टींची थोडक्यात नोंद असे. विद्यार्थ्याबद्दल तक्रार आल्याबरोबर किंवा कार्यालयात पालक आले तर एका मिनिटात ही माहिती मी त्यांना सांगत असे. हे पाहून त्यांना अचंबा वाटे. विद्यार्थ्याबद्दल तक्रार पुढे आली आणि माझ्या माहितीप्रमाणे तो विद्यार्थी हुशार, अभ्यासू, सद्वर्तनी आहे असे दिसले तर माझा कल सौम्यपणाकडे व सहानुभूतीकडे होई. उलट ज्या विद्यार्थ्याविषयीची नोंद अनभ्यासी, अनियमितपणा, दुर्वर्तन या सदरांत जास्त असे, त्याच्याविषयी मी कडक धोरण ठेवी.

कृतज्ञता-शिक्षण विद्यार्थ्यांनी नेहमी संस्थेशी कृतज्ञ राहावे अशी माझी अपेक्षा आणि ही कृतज्ञता स्वाभाविकपणेच न शिकविता येते असे मला वाटे. त्यामुळे कृतज्ञता न दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी एक प्रकारचा संताप आणि चीड वाटत असे. कालांतराने व अनुभवाने मला असे कळून आले की कृतज्ञतेचा गुण हा मुलांना हळूहळू शिकवावा लागतो. निरनिराळ्या प्रसंगाने त्यांच्या मनावर तो ठसवावा लागतो. या बाबतीत माझे स्वतःचे शिक्षण व हा शोध यांना उशीर लागल्यामुळे पहिल्यापहिल्या कालखंडातील अनेक विद्यार्थी बाहेर पडले व दूर गेले, ते पुन्हा जवळ आले नाहीत. जे थोडे पुनः भेटले ते मित्रासमान झाले. उलट दुसऱ्या व तिसऱ्या कालखंडातील विद्यार्थी बाहेर पडले तरी संस्थेशी व माझ्याशी निगडित राहिले. माझ्या आणि संस्थेच्या जीवनाचा ते अविभाज्य भाग बनले. माझ्या संस्थेचे आणि कामाचे भावी आधारस्तंभ तेच आहेत.

कृतज्ञतादर्शन व ऋणविमोचन शिक्षण देणारी संस्था व गुरुजी यांचेविषयी कृतज्ञताबुद्धी ठेवावी ही शिकवण पुष्कळ प्रमाणात जुन्या विद्यार्थ्यांनी आचरणात आणलेली आहे. या संस्थेतून बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या पहिल्या प्राप्तीतूनच संस्थेला पहिली प्रेमाची गुरुदक्षिणा पाठविली आहे आणि नंतर नियमितपणे ती चालू ठेवली आहे. अनेकांनी हप्त्या–हप्त्याने अथवा एकमुठी एक हजार किंवा अधिक रुपयांचे ऋणमोचन केले आहे. आपल्या हयातीत केव्हा तरी संस्थेला सहस्र रुपये देऊन ऋणमुक्त व्हावे व पुढेही हे दक्षिणादान चालू ठेवावे अशी अनेक विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा असते. कित्येकजण स्वयंसेवावृत्तीने इतरांच्याकडून मदत जमवून ती नियमितपणे पाठवीत असतात. कृतज्ञतेची व ऋणमोचनाची माझी शिकवण हळूहळू दृढमूल होत चालली आहे. माजी विद्यार्थ्यांची मदत हा कालांतराने संस्थेचा एक विश्वासाचा आधार होणार आहे.

व्यक्तिशः माझ्याविषयी अनेक विद्यार्थ्यांनी अलोट प्रेम, कृतज्ञता आणि कौटुंबिक आपलेपणा ठेवलेला आहे. त्याचे मोजमाप करता येत नाही. मला ते त्यांच्या वडील भावासारखा आणि मित्रासारखा मानतात. माझी षष्ठ्यब्दिपूर्ती झाली त्यावेळी मला आलेल्या रोख भेटी मी संस्थेकडे देऊ लागलो. त्या भेटी मी स्वतः ठेवाव्यात म्हणून माझ्या विद्यार्थ्यांनी त्या कपाटे, फर्निचर, कापड इत्यादी स्वरूपांत दिल्या. आयुष्यात सजला नाही इतका माझा संसार माझ्या साठीनंतर सांसारिक वस्तूंनी एखाद्या नव-परिणित कुटुंबाप्रमाणे सजला ! माझ्या माजी विद्यार्थ्यांच्या प्रेमामुळे, कृतज्ञतेमुळे व गुरुदक्षिणेमुळे मी ऐश्वर्यसंपन्न झालो आहे.

माजी विद्यार्थी-संघटना कृतज्ञता-संवर्धनाच्या या कल्पनेतूनच माजी विद्यार्थी-संघटनेची योजना पुढे आली. गेल्या तीस वर्षांच्या काळात संस्थेच्या या संघटनेने चांगला जोर धरला आहे. मला असे अभिमानाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्रातच काय, अखिल भारतातही अशी संस्था सापडणार नाही, की जिने आपल्या माजी विद्यार्थ्यांची संघटना अनाथ विद्यार्थी गृहासारखी प्रभावी केली आहे. ही पुढे चालवून बलशाली करणे सेवक व विद्यार्थी यांच्या भावी पिढीवर अवलंबून आहे. या संघटनेमुळे संस्था सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांनाही एका वैचारिक पातळीवर आणि ध्येयवादाच्या वातावरणात ठेवणे शक्य झालेले आहे. मी सुरू केलेले "समाचार" मासिक हे संघटनेचे आणि वैचारिक वातावरणाचे कार्य गेली सोळा वर्षे करीत आलेले आहे आणि पुढेही करीत राहील.

माझ्या या माजी विद्यार्थ्यांकडे पाहिले म्हणजे अभिमान वाटतो. या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी काही समान अशा सद्गुणांचे संवर्धन झालेले आहे. याची जाणीव त्या विद्यार्थ्यांनाही नसेल. त्रयस्थ दृष्टीने पाहणाऱ्या माणसाला मात्र या शिक्षणातून बाहेर पडलेला आदर्श (टाईप) निराळाच आहे हे लक्षात येते. साधी राहणी, निर्व्यसनता, अंगीकृत कामात निष्ठा, प्रामाणिकपणा, कष्टांची तयारी, आत्मविश्वास, राष्ट्रीय दृष्टी, समाजहिताची बुद्धी, संघटना-कौशल्य इ. अनेक गुणांचा समुच्चय या विद्यार्थ्यांचे ठिकाणी दिसून येतो. ही संपत्ती मी या जन्मात मिळविली.

शिक्षाविषयक प्रयोग वसतिगृहाचे आणि शाळेचे जीवन म्हणजे त्याठिकाणी काही शिस्त आणि नियम येणे अपरिहार्यच आहे. मला माझ्या मातेने आणि शिक्षकांनी शिस्तीत वाढविले आणि शिस्तीची गोडी लावली. शिस्तशील जीवनाचे हेच लोण पुढील पिढीला देण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न केला. शिस्तीचे नियम केल्यानंतर त्यांचे उल्लंघन करणारे लहान मोठे विद्यार्थी निघणारच. असे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी वागण्यात मला माझ्या पहिल्या भूमिकेत अनुभवाने पुष्कळ बदल करावा लागला. छडीच्या अथवा अन्य शारीरिक शिक्षा प्रथम मी सरसकट देत असे. माझ्या गुरूजींनी माझ्यावर जो प्रयोग केला, तो माझ्या विद्यार्थ्यांवर मी केला. पुढे पुढे विचाराने असे कळून आले की मुलांना सुधारण्याकरता शारीरिक शिक्षेचे ऐवजी अन्य मार्गांचाही उपयोग केला पाहिजे. मुलाला त्याचे अपराध पटवून देणे, त्याला उपदेश करणे, चांगल्या विचारांचे ग्रंथवाचन त्याला देणे अशा प्रकारचे मानसिक सुधारणेचे प्रयोग मी केले. काही

वेळेला स्वतःला देहदंड व उपवास असेही प्रयोग केले. शारीरिक शिक्षा अजिबात न देण्याच्या दुसऱ्या टोकाला मी गेलो. माझ्या या नवीन धोरणाचा उपयोग काही विद्यार्थ्यांचे बाबतीत अनुकूल झाला. परंतु काही थोड्यांच्या बाबतीत या सौम्य मार्गांचा उपयोग झाला नाही. असे अनेक विद्यार्थी असतात की चांगल्या मार्गाने जावे असे त्यांना वाटते पण तसे वागण्याइतके संयमन त्यांच्या ठिकाणी नसते. माझ्यापुढे असे प्रसंग आले की या विद्यार्थ्याला या वेळी शिक्षा केली नाही तर त्याचा तो सुधारू शकत नाही म्हणून त्याचे आयुष्य वाया जाईल. अशा वेळी एकदाच, पण लक्षात राहण्यासारखी, शारीरिक शिक्षा मी कर्तव्यबुद्धीने करीत असे. मला असे वाटे की हा विद्यार्थी पुढे गुन्हेगार निघाला म्हणजे म्हणेल की, 'विद्यार्थीदशेतील माझ्या अपराधाला अण्णांनी प्रतिबंधक अशी शिक्षा केली नाही म्हणून मी बिघडलो आणि गुन्हेगार झालो. त्यावेळी माझे हित मला कळत नव्हते पण अण्णांना कळायला पाहिजे होते!' अगदी लहानपणी वाचलेली अशाच अर्थाची व प्रसंगाची गोष्ट मला नेहमी आठवत असे. एका लहान चोरीबद्दल आईने शिक्षा केली नाही म्हणून मुलगा गुन्हेगार झाला आणि लहानपणी आपल्याला शिक्षा न केल्याबद्दल गुन्हेगार झाल्यावर त्यानेच आईला शिक्षा केली. शरीरिक शिक्षा सरसकट करणे आणि ती अजिबात न करणे यांतील मधला मार्ग काढला पाहिजे. सामान्यपणे उपदेश आणि मानसिक शिक्षा यांचा प्रयोग, परंतु अपरिहार्यच असेल तेथे परिणामकारक शारीरिक शिक्षा, असे तत्त्व मी अनुभवाने बसविले होते. मला माझ्या आईने किंवा गुरुजींनी शारीरिक शिक्षा दिल्या म्हणून त्यांच्याविषयींचा आदर आणि प्रेम नष्ट झाले नाही. तसेच इतर विद्यार्थ्यांच्या बाबतीत होईल असे मला वाटले. पण अनुभव विविध प्रकारचा आला. शिक्षेमुळे काही विद्यार्थी माझ्यापासून दुरावले, तसेच काही विद्यार्थी सुधारले आणि त्यांनी माझ्याशी आपलेपणाचे संबंध ठेवले.

राष्ट्रीय शिक्षणाचे ध्येय मी पदवीधर झालो तो काळ १९२० चा म्हणजे महात्मा गांधींच्या असहकारितेचा होता. त्याच्या पूर्वीचा पंधरा वर्षांचा म्हणजे १९०५ ते १९२० चा काळ लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळींचा काळ होता. लोकमान्यांच्या कार्यक्रमाच्या चतुःसूत्रीत राष्ट्रीय शिक्षण ही एक प्रमुख गोष्ट होती. असहकारितेच्या चळवळीतही सरकारी शिक्षणावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार हे प्रमुख धोरण होते. ह्या दोन्ही कालखंडांचा माझ्या कामावर व शैक्षणिक विचारांवर परिणाम झाला. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, सुरेन्द्रनाथ बानर्जी, अशांचे राष्ट्रीय शिक्षणावरील लेख व भाषणे यांच्या वातावरणात मी वाढलो. ग्रंथालयाचा मी मंत्री असल्याने प्राचीन शिक्षण पद्धतीवरील ग्रंथ आणि लेख यांचे परिशीलन केले. या सर्वांचा परिपाक म्हणून राष्ट्रीय शिक्षणाची काहीएक कल्पना मी मनात ठेवली. तिला अनुसरून अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके, शारीरिक व लष्करी शिक्षण, औद्योगिक शिक्षण, भारतीय संस्कृतीची माहिती, धार्मिक व नैतिक शिक्षण, स्वातंत्र्य-संग्रामातील राष्ट्रीय घडामोडींची माहिती इ. अनेक मार्गांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. याचा इष्ट तो परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर झाला आहे असे मला वाटते.

स्वतंत्र शिक्षण-प्रयोग बौद्धिक विषयांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने राष्ट्रीय शिक्षण म्हणजे नेमके काय याचा मी बराच विचार केला, आणि त्या दृष्टीने त्या वेळी विद्याखात्यामध्ये मान्य असलेल्या अभ्यासक्रमात व क्रमिक पुस्तकांत काही फेरबदल केले. १९४८ सालपर्यंत सरकारी विद्याखात्याची मान्यता अथवा मदत विद्यालयाने घेतली नाही, त्या कारणाने हे स्वातंत्र्य मी भोगू शकलो. प्रत्येक विषयाच्या द्वारे भारतीय संस्कृतीची आणि राष्ट्रीय विचारांची जोपासना कशी करता येईल या दृष्टीने अभ्यासक्रमाची मांडणी केली होती. हे स्वातंत्र्य सरकारमान्य व अनुदान घेणाऱ्या शाळांना नव्हते.

शारीरिक शिक्षणावर भर संस्थेत शारीरिक शिक्षण पूर्वीपासून चालूच होते. परंतु माझ्या देखरेखीखाली मी या विषयाकडे विशेष लक्ष देण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांमध्ये व्यायामाची, खेळांची व योगासनांची आवड उत्पन्न करून, या शिक्षणाची सर्व साधने उपलब्ध करून देणे हे मी महत्त्वाचे मानीत असे. 'व्यायाम नाही तर जेवण नाही,' असा माझा दंडक असे. प्रत्येक विद्यार्थ्याने जितके पौंड स्वतःचे वजन असेल तितके नमस्कार अथवा जोर, तितक्याच बैठका आणि निदान दहा मल्लखांबाच्या उड्या—इतका किमान व्यायाम घेतला पाहिजे असा माझा दंडक असे. मुलांना आसने व प्राणायाम मी स्वतः शिकवी. श्री. पळणीटकर गुरुजींसारख्या चांगल्या शिक्षकांच्या नेमणुकी केल्या, आणि त्यांना दीर्घकाळ सांभाळून घेतले. मुलांना वारंवार व्यायामाची स्फूर्ती दिली. मुलांची वैयक्तिक चौकशी करताना 'तू व्यायाम काय घेतोस' असा माझा एक प्रश्न अजूनही असतो. माझ्या देहयष्टीकडे पाहणाऱ्याचा कदाचित वरील गोष्टीवर विश्वास बसणार नाही ! पण विश्वास ठेवा की हे सत्य आहे. जादुगार रघुवीर भोपळे यांच्यासारखे माजी विद्यार्थी याची साक्ष देतील. इतर शाळांत एन्. सी. सी. सुरू होण्यापूर्वी माझ्या शाळेत लष्करी शिक्षणाची प्रथम सुरुवात झाली होती.

औद्योगिक शिक्षणाचे प्रयत्न औद्योगिक शिक्षणाच्या विभागाकडेही माझे वैयक्तिक लक्ष असे. १९२० सालापासून आजतागायत या विषयाचा सतत विचार, विवंचना, प्रयोग आणि प्रयत्न मी करीत आलेलो आहे, त्यामुळे कोठल्याही समितीत अथवा मंडळात मी अधिकारवाणीने बोलू शकतो व मार्गदर्शन करू शकतो. या प्रयत्नांचे फळ म्हणून आमचे विद्यालय ही आज एक आदर्श अनेकविध औद्योगिक शिक्षणाची शाळा झाली आहे. गरिबांच्या या शाळेत फी न देता जितके औद्योगिक विषय शिकण्याची सोय आहे त्याच्या एक दशांशही सोय फी घेऊन शिकविणाऱ्या श्रीमंतांच्या शाळांत नाही. या शाळेतून बाहेर पडलेले विद्यार्थी भावी व्यवसायाचे दृष्टीने आत्मविश्वास-संपन्न असेच बाहेर पडले. कोणी बेकार राहिला नाही. माझी शाळा गरीब असली तरी तिने औद्योगिक आणि शारीरिक शिक्षणावर सढळ हाताने खर्च केला आहे.

व्यवसाय-मार्गदर्शन-प्रारंभ व्यवसाय-मार्गदर्शन (व्होकेशनल गायडन्स) या विषयाचा प्रारंभ महाराष्ट्रात आणि भारतात माझ्याच शाळेत प्रथम झाला.

त्यानंतर सरकारी विद्याखात्यात या विषयाची सुरुवात झाली. या मार्गदर्शनामुळे शालेय शिक्षण घेत असतानाच विद्यार्थी आपला भावी मार्ग ठरवीत असे.

धार्मिक व नैतिक शिक्षण काही वर्षे धार्मिक आणि नैतिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व अध्यापन यांची व्यवस्था मी केलेली होती. 'सनातन धर्मप्रवेश' यासारखी क्रमिक पुस्तके लावून विद्यार्थ्यांना भारतीय विचारसरणीचा परिचय करून दिला. शाळेच्या दैनंदिन, मासिक आणि वार्षिक कार्यक्रमांत आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीमधील काही उपयुक्त उपक्रमांचा समावेश केला. रोजच्या प्रार्थना व नैमित्तिक, धार्मिक आणि राष्ट्रीय उत्सव यांना व्यवस्थित स्वरूप दिले. पूर्वीच्या पद्धतीतील श्रावणी व गुरुपौर्णिमा यांना आधुनिक स्वरूप दिले. ज्या ज्या वेळी मी वर्गात जात असे त्या त्या वेळी पहिली दोन तीन मिनिटे सर्व वर्गाला दहा प्राणायाम व आपल्या इष्ट देवतेचे चिंतन करायला शिकवीत असे. अभ्यास सुरू करण्यापूर्वी प्राणायाम व चिंतन करावे अशी माझी शिकवण असे. उत्सवांच्या निमित्ताने रामायण, महाभारत, दासबोध, भगवद्गीता इत्यादी ग्रंथांचे काही दिवस पारायण राममंदिरात होत असे. गीतेचा अभ्यास विचारांच्या दृष्टीने व्हावा, केवळ अर्थहीन पाठांतर होऊ नये म्हणून 'गीतेतील मुख्य विचार' हे पुस्तक लिहून शाळेच्या रोजच्या प्रार्थनेत एक एक विचारवाचनाची प्रथा सुरू केली. शाळेत मिळणारे हे शिक्षण विद्यार्थी बाहेर पडला तरी 'समाचार' मासिकातील लेखांच्या रूपाने सतत घेतच असतो. 'सदाचार-चिंतनी' या माझ्या चिंतनिकेतील विचार प्रार्थनेच्या वेळी वाचले जातात. गीतेतील विचार व सदाचार-चिंतनी ही पुस्तके बहुतेक माजी विद्यार्थ्यांच्या संग्रही असतात व ते त्यांचा प्रचार करतात.

शाळेचे विशिष्ट वातावरण प्रत्यक्ष शिक्षणाने विद्यार्थी शिकतात तितकाच शाळेच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर होतो. हे वातावरण विशिष्ट प्रकारचे ठेवण्याचा माझा सतत प्रयत्न असे. स्वच्छता, व्यवस्थितपणा, साधेपणा, शिस्त, आणि कष्टांची सवय ह्या चार सदाचारांचे वातावरण अनेक विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पडले असावे. महात्मा गांधींच्या मूलोद्योग शिक्षणातील 'सफाई' या तत्त्वाचा प्रचार होण्याचे आधी कितीतरी वर्षे माझ्या शाळेत स्वच्छतेच्या शिक्षणाला अग्रक्रम दिला जात असे. वसतिगृहातील आणि शाळेतील सर्व ठिकाणी कमालीची स्वच्छता असली पाहिजे या दृष्टीने कित्येक वर्षे सर्व आवारात दोन दोन, तीन तीन वेळेला मी चक्कर मारीत असे. एक कागदाचा तुकडाही इकडे तिकडे पडता कामा नये असा माझा कटाक्ष असे. एकदा एक जर्मन गृहस्थ संस्था पाहाण्यास आले असता "या शाळेतील स्वच्छता आमच्या जर्मन शाळेतील स्वच्छतेप्रमाणे आहे"— असा त्यांनी शेरा दिला. गोष्ट लहान पण महत्त्व मोठे असे हे शिक्षण आहे.

शिस्तीवर कटाक्ष शाळेच्या शिस्तीवर माझा अतिशय मोठा कटाक्ष असे. शारीरिक तपासणीचे वेळी गावातील जे डॉक्टर तपासणीकरता येत ते याविषयी स्पष्टपणे आपला अभिप्राय देत की—" इतर शाळांपेक्षा तुमच्या शाळेत शिस्त जास्त

असल्यामुळे तपासणीचे काम लवकर होते व आनंद वाटतो." माझ्या शाळेत अर्धकाळ अध्यापनाला येणाऱ्या शिक्षकांचेही असेच मत ते वारंवार बोलून दाखवीत. या वातावरणाचा झालेला फायदा मोजमापात न येता माजी विद्यार्थ्यांच्या राहाणीतच दिसणार.

कष्टाचे बाळकडू शारीरिक कष्टाचे कोणतेही काम करण्याची लाज वाटता कामा नये या आश्रमीय शिक्षणाला मी तत्त्वाचे व आचाराचे स्वरूप दिले. शाळेत येणारा विद्यार्थी गरीब असो अथवा श्रीमंत असो त्याने वर्गाची 'झा. पा.' केलीच पाहिजे, असा दंडक प्रस्थापित झालेला आहे. 'झाडण्याची पाळी' या शब्दांना 'झा. पा.' असे संक्षिप्त रूप मुलांनीच दिलेले आहे! आश्रमाची आणि शाळेची वार्षिक रंगरंगोटी विद्यार्थ्यांच्याकडूनच झाली पाहिजे असा माझा आग्रह असे. जे शाळेत तेच घरी. माझे नवीन घर झाल्यानंतर त्याला रंग देण्याचे काम माझ्या मुलांमुलींनीच केले.

स्वतःवर बंधन स्वच्छता, शिस्त व कष्ट यांच्या जोडीला साधेपणाची शिकवण मी विचाराने आणि स्वतःच्या आचाराने दिलेली आहे. गरिबीत साधेपणा शिकायला फार श्रम पडत नाहीत असे वाटण्याचा संभव आहे. काही अंशी ते खरेही आहे. पण साधेपणा हे तत्त्व म्हणून स्वीकारून गुरुजीने स्वतःच्या आचरणात त्याचा वापर करून, हे व्रत जन्मभर पाळून विद्यार्थ्यांच्या पुढे वावरणे, ह्या गोष्टीलाही एक प्रकारचा निग्रह व श्रद्धा लागते. त्याचा परिणाम न कळत विद्यार्थ्यांच्यावर होतो व तो तसा झालेला आहे. शिक्षकाची स्वतःची राहाणी ही त्याची एक अध्यापनपद्धतीच आहे हे माझे तत्त्व मी स्वतः आचरलेले आहे.

सद्‌गुणसंवर्धनाचे प्रयोग शिक्षणाने विद्यार्थ्यांचे शील व चारित्र्य बनले पाहिजे या तत्त्वावर अगदी प्रारंभापासून माझा कटाक्ष आहे. माझ्या स्वतःच्या शिक्षणात माझ्या मातेने आणि माझ्या गुरुजींनी या गुणांवर लक्ष दिले होते. हे शिक्षण देण्याच्या अनेक योजना आणि अनेक प्रयोग मी १९२० पासूनच्या कालखंडात केले. काही चालू राहिले, काही बंद पडले. कधी हे शिक्षण प्रत्यक्ष शिकवणीने दिले जाई तर कधी अप्रत्यक्षपणे दिले जाई. विद्यार्थ्यांच्या ठिकाणी सद्‌गुणांची आणि सदाचारांची वाढ व्हावी याविषयीच्या योजना आणि प्रयत्न यांत कधीच खंड पडला नाही. केवळ याच विषयावर लिहावयाचे झाल्यास एक स्वतंत्र लेख होईल, तरीपण थोडक्यात दिग्दर्शन करतो. अगदी पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना एक 'सद्‌गुणाष्टक' म्हणजे आठ गुणांचा रोजचा आचार आवश्यक ठेवलेला होता. त्याला गुण दिले जात असत. हा प्रयोग काही अंशी यशस्वी, काही अंशी अयशस्वी झाला. काही विद्यार्थी प्रामाणिकपणे आचरण करीत, तर काही विद्यार्थी माझी फसवणूक करीत. मी त्यात एवढेच समाधान मानीत असे की चांगले सद्‌गुण म्हणजे कोणते असे विचारले तर निदान आठ सद्‌गुणांची यादी मुलांना सांगता येईल. रोजचे चिंतन, बंधुसेवा, धार्मिक वाचन, रोजचा अभ्यास, नियमित व्यायाम इत्यादी आठ गुणांचा समावेश या सद्‌गुणाष्टकात केलेला होता. विद्यालयात दर शनिवारी सर्व विद्यार्थ्यांची सभा भरत

असे. त्या वेळी चारित्र्य आणि शीलसंवर्धनाच्या दृष्टीने एखाद्या सद्‌गुणाचे मी विवेचन करीत असे. त्याला एका लहान सूत्राचे स्वरूप देऊन विद्यार्थ्यांना त्याची संथा देत असे; आणि शेवटी सर्वांना वीरासन घालावयास लावून डोळे मिटून एक मिनिटभर त्याचे चिंतन करावयास लावीत असे. चारित्र्य-शिक्षणाचे हे एक तंत्र आहे. मुलांच्या ठिकाणी कोणते सद्‌गुण असावेत याची श्लोकबद्ध सूत्रे करून त्यांचे पठण रोजच्या आचारात ठेवीत असे. चि. भास्करच्या उपनयनाच्या वेळी त्याला मी पुढील गुरु-मंत्र दिला होता. त्याचा शाळेत आणि बाहेर मी यथाशक्य प्रसार करीत असतो.

आनंदी आत्मविश्वासू सदाचारी पराक्रमी ।
अखंड ज्ञानजिज्ञासू मिताहारे शतायुषी ।।

कॉलेज विद्यार्थ्यांच्यासाठी निघालेल्या 'सदाचार वसतिगृहा'तील विद्यार्थ्यांसाठी मी पुढील श्लोक करून दिलेला होता :—

शरीरा नित्य व्यायाम मनासी नित्य चिंतन ।
बुद्धीला नित्य व्यासंग आचारा धर्मवाचन ।।

वसतिगृहाला नावच "सदाचार वसति-गृह" असे मी सुचविले आणि माझ्या सहकाऱ्यांना ते आवडले. त्यावरून शिक्षणात सदाचारावर माझा आग्रह किती आहे ते समजेल.

गीता-विचारांचा प्रसार समाचार मासिकातील अग्रलेख हे देखील मुलांच्या चारित्र्य आणि शीलसंवर्धनाच्या दृष्टीनेच योजलेले असतात. त्यामुळे शाळेत असताना आणि शाळा सोडून गेल्यावरही विद्यार्थ्यांचे चारित्र्यशिक्षण चालू राहाते. "गीतेतील मुख्य विचार" या ग्रंथलेखनाचा आणि प्रसाराचा उद्देश चारित्र्य-शीलसंवर्धनाचाच आहे. आदर्श मानवाच्या ठिकाणी कोणते सद्‌गुण असावेत याचा विस्तार व विवेचन गीतेत अनेक ठिकाणी केलेले आहे. निदान त्या गुणांच्या माहितीचा प्रसार व प्रचार प्रयत्नाने करावा असे मला वाटते.

माझे उदाहरण नैतिक शिक्षणाच्या मानसशास्त्रात असे एक सूत्र आहे की—"मॉरल् एज्युकेशन इज् कॉट्–नॉट् टॉट्". म्हणजे नैतिक शिक्षण शिकवून येत नाही, ते अप्रत्यक्षपणे गुरुजींच्या व वडील माणसांच्या उदाहरणाने न कळत घेतले जाते. त्या दृष्टीने विचार करून स्वतःच्या राहणीला व आचरणाला नियमन घालून विद्यार्थ्यांपुढे व माजी विद्यार्थ्यांपुढे आदर्श राहण्याचा मी बुद्धिपुरःसर प्रयत्न केलेला आहे. साधेपणा, निर्व्यसनीपणा, शुद्ध आचार व विचार, सतत उद्योग, सेवावृत्ती, आत्मसंयम, इत्यादी गुणांचा स्वतःचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे राहावा असा माझा सतत प्रयत्न आहे हे सांगणे या संदर्भात जरूर आहे. आता याचा संस्कार विद्यार्थ्यांवर किती प्रमाणात झाला व तो त्यांच्या लक्षात आला ते तेच सांगू शकतील. मला तरी त्यांच्या जीवनात तसा झालेला दिसतो व त्याबद्दल कृतकृत्यता वाटते.

मी असा होतो—असा आहे मी मूळचा मोठा आदर्श शिक्षक होतो असे मुळीच नाही. अगदी उलट, अत्यंत रागीट, तापट, असहिष्णू, उतावळा, मारकट,

उग्र, कठोर, निष्ठुर असे माझ्या पहिल्या जीवनखंडाचे वर्णन घरचे लोक आणि पहिल्या पिढीतील विद्यार्थी करतात ते अक्षरशः खरे आहे. काही त्या वेळचे आज पन्नाशीला-साठीला आलेले विद्यार्थी त्या वेळच्या संस्कारांनी अद्यापही मला भितात इतके ते माझ्यापासून दुरावलेले आहेत. पण शिस्त या दृष्टीने आपल्यात सुधारणा व्हायला पाहिजे या जाणीवेने मी बुद्धिपुरःसर प्रयत्न करून स्वतःचा स्वभाव सुधारला. मी पूर्वी कसा होतो याची कल्पना आजच्या माझ्या स्वभावावरून कोणाला येणार नाही. निसर्गाने माझ्या ठिकाणी तापटपणा आणि कठोरता हे गुण देऊन जन्मास घातले. मी त्यांच्यावर प्रयत्नाने मात करून सौम्यपणा आणि मृदुता या गुणांचा विकास केला. माझ्या या नैतिक आणि आध्यात्मिक संक्रमणाचे वर्णन तपशीलवारपणे केव्हा तरी मी करणार आहे. पण मुद्द्याच्या दृष्टीने समारोप स्वरूपाने सांगतो की नैतिक चारित्र्याचा आणि शीलाचा आदर्श मुलांच्या पुढे राहावा असा मी माझ्या जीवनात बदल घडवून आणला आहे.

डॉ. रंगनाथन्‌चे स्वप्न साकार शाळेच्या विद्यार्थ्यांमधून अभ्यासू लेखक आणि वक्ते निर्माण व्हावेत ह्याकरता अगदी प्रारंभापासून मी अनेक प्रयत्न केले. प्रत्येक विद्यार्थ्याला काही निवडक पुस्तकांचे वाचन करून त्यांचा सारांश काढून मला दाखविणे आवश्यक असे. हा उपक्रम बरीच वर्षे चालला. दरवर्षी सहा-सात उत्कृष्ट पुस्तके या हिशेबाने शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत चाळीस ते पन्नास उत्कृष्ट ग्रंथांचे वाचन व्हावे अशी कल्पना होती. विद्यार्थ्यांना ही सक्ती जाचकच वाटत असे. परंतु अनेक विद्यार्थी प्रामाणिकपणे या योजनेची अंमलबजावणी करीत. इतरांनी लिहिलेल्या सारांशाची नक्कल करून मला काही जणांनी फसविले व वेळ मारून नेली ! त्यानंतर 'प्रबंध-लेखना'ची योजना अमलात आणली. महाराष्ट्र विद्यालयातील या योजनेची प्रसिद्धी महाराष्ट्रात व इतरत्र बरीच झाली आहे. या योजनेप्रमाणे इयत्ता आठवी, नववी, दहावीतील विद्यार्थ्यांनी दरवर्षी एक स्वतंत्र हस्तलिखित पुस्तक लिहून ते शाळेकडे द्यावयाचे असते. इयत्ता आठवीतील मुले आत्मचरित्र लिहितात, आणि नववी-दहावीतील विद्यार्थी आपापल्या आवडीचे स्वतंत्र विषय निवडतात व संपूर्ण पुस्तक तयार करतात. प्रत्यक्ष निरीक्षण करून व अनुभव घेऊन लेखन करावे यावर माझा कटाक्ष असे. या पद्धतीने प्रत्येक विद्यार्थी शाळेतून बाहेर पडण्यापूर्वी स्वतःची तीन हस्तलिखित पुस्तके विद्यालयाच्या ग्रंथालयाकडे देतो. एकदा ग्रंथालय-शास्त्रज्ञ डॉ. रंगनाथन् हे संस्था पाहावयास आले असता ग्रंथालयातील हा मुलांच्या हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह त्यांनी पाहिला तेव्हा त्यांनी एकदम उद्‌गार काढले "माय ड्रीम हॅज् कम ट्रू हिअर" 'माझे स्वप्न येथे साकार झाले आहे'. लेखनकला शिकण्याच्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्याने एक 'वर्ग साप्ताहिक' संपादन करून प्रसिद्ध करावे अशी सक्ती आहे. अशी सहा-सात साप्ताहिके काढण्याची संधी प्रत्येकाला मिळते. या सर्व प्रयत्नांचा परिणाम मुलांना लेखनकला शिकविण्यात झाला. पण

शाळेतून बाहेर पडल्यावर या कलेचा विकास आणि उपयोग करणारांची संख्या अपेक्षेपेक्षा फारच थोडी निघाली.

वक्तृत्वही आवश्यक लेखनाप्रमाणे वक्तृत्वाचे शिक्षण देण्याचेही अनेक प्रयत्न केले. प्रत्येक विद्यार्थ्याला धीटपणाने अस्खलित रीतीने चांगल्या भाषेत दहा-पंधरा मिनिटे बोलता येणे जरूर आहे. त्या दृष्टीने वर्गात अथवा सभेत मुलांना वक्तृत्वाचे शिक्षण देण्यात येई.

अल्पकाल प्रयोग शैक्षणिक प्रयोग आणि उपक्रम या दृष्टीने गेल्या पंचेचाळीस वर्षांत अनेक गोष्टी सुरू केल्या, परंतु त्या सर्वच सर्वकाळ चालू ठेवल्या असे नव्हे. शाळेत पूर्ण वेळ काम करणारा मी एकटाच होतो. बाकीचे शिक्षक अर्धवेळ काम करणारे, आपापल्या विषयांपुरते येणारे असत. त्यामुळे प्रयोगांचे व उपक्रमांचे सातत्य व अखंडत्व राहिले नाही. ज्या ज्या कालखंडात जे जे प्रयोग झाले त्या प्रयोगांचा फायदा त्या वेळच्या विद्यार्थ्यांना झाला. इतरही काही उपक्रमांचा पुढे त्रोटक उल्लेख करीत आहे.

यंत्रशास्त्राचा ओनामा आजचे युग हे यंत्रयुग आहे. व्यवहारात हरघडी निरनिराळ्या ज्या ज्या यंत्रांशी संबंध येतो त्यांच्या रचनेची माहिती विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. त्याकरता ही यंत्रे सोडवून किंवा उघडून आतील रचना मुलांना दाखविणे जरूर असते. याकरता जाहिरात देऊन मी पुष्कळ जुनी यंत्रसामग्री जमा केली आणि 'यंत्रशास्त्राचा ओनामा' असा एक अभ्यासक्रम सुरू केला. पण योग्य शिक्षकाच्या अभावी तो फार काळ चालू शकला नाही.

अर्थशास्त्राचा ओनामा आजचे आपले आर्थिक जीवन बदलले आहे व बदलत आहे. पैसे मिळविण्याच्या, साठवण्याच्या आणि देण्याघेण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे. या नवीन अर्थयुगाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून 'अर्थ-शास्त्राचा ओनामा' अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू करून तो दोन वर्षे चालविला.

संगीत रसग्रहण 'संगीताचे रसग्रहण' अशा प्रकारचा अभ्यासक्रम तयार केला होता. आणि दोन-तीन महिने तो चाललाही. पुढे योग्य शिक्षकाच्या अभावी तो बंद पडला.

जबाबदारीचे शिक्षण विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष राहावे, त्यांचा अभ्यास चांगला व्हावा व त्यांना सहज मार्गदर्शन करता यावे, याकरता शाळेच्या दैनंदिन कारभारात मी अनेक नवीन उपक्रम केले. परंतु या ग्रंथात त्यांचा अधिक विस्तार करीत नाही. आश्रमातील व विद्यालयातील विद्यार्थी सर्वांगपरिपूर्ण आणि चौरस कसा होईल ही विवंचना मला नेहमी असे. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला अनेक प्रकारच्या कामांतून व अनुभवांतून जायला लावावे असे माझे धोरण असे. सर्व प्रकारची जबाबदारीची कामे मी विद्यार्थ्यांच्याकडून करवून घेई. कित्येक वर्षे केवळ विद्यार्थ्यांच्या मदतीनेच मी शाळेचा सर्व कारभार करून घेतला आहे. अशी कामे करून घेताना कडू व गोड असे अनेक प्रकारचे प्रसंग येत. परंतु या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या कर्तबगारीत भरच पडली असे मला वाटते.

विद्यार्थ्यांची वृत्ती या ठिकाणी एक गोष्ट मान्य केली पाहिजे की या सर्व उपक्रमांत माझा जेवढा उत्साह असे तितका सर्वच विद्यार्थ्यांना नसे. काही जणांनी त्यांचा फायदा घेतला, काही उदासीन राहिले, आणि काहींनी शिरसलामत सुटून जाण्याचा प्रयत्न केला. पण हे सर्व मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. अनेक प्रयोगांमुळे विद्यार्थ्यांचा फायदा झाला. सर्वांग-परिपूर्ण असे शिक्षण त्यांना मिळाले. काही उपक्रमांमुळे काही विद्यार्थ्यांचा तोटा झाला आणि त्या बाबतीत मला धोरणे बदलावी लागली. बौद्धिक विषयात मागे असलेल्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक शिक्षणाकडे जावे असे मला वाटे, पण ही सक्ती विद्यार्थ्यांना आवडली नाही. त्यामुळे माझे धोरण बदलून अभ्यासक्रम निवडीबाबत सल्लामसलत द्यावयाची, परंतु सक्ती करावयाची नाही असे धोरण मी स्वीकारले. विद्यार्थ्यांनीही मला शिकविले याचे हे एक ठळक उदाहरण आहे.

बौद्धिक स्वावलंबनाची पद्धती शिक्षक, प्राचार्य आणि प्राध्यापक या नात्याने मी पाचव्या इयत्तेपासून मास्टर ऑफ एज्युकेशनपर्यंत सर्व वयाच्या व पातळीच्या विद्यार्थ्यांना शिकविले. शाळेमध्ये ए. बी. सी. डी. आणि पहिल्या प्रायमरपासून मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना मेकॉलेचे 'होरेशस्' हे काव्य, चार्लस डिकन्सचे 'ए टेल ऑफ टू सिटीज्' इत्यादी भाग शिकविले. संस्कृत हाही विषय माझा आवडता होता. पहिल्या कालखंडातील अनेक विद्यार्थ्यांना रघुवंश, शाकुंतल, आपटे यांचे संस्कृत कांपोझिशन इत्यादी भाग शिकविले. मराठी भाषा हा विषय आवडता असल्यामुळे व्याकरण, शुद्धलेखन, प्रबंधलेखन, अवांतर वाचन, इत्यादी भाग विद्यार्थ्यांना शिकविले. हे अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांना स्वतः प्रयत्न करावयास लावणे आणि बौद्धिक दृष्टीने स्वावलंबी करणे या पद्धतीवर माझा भर असे. त्यामुळे प्रयत्नशील व उद्योगी विद्यार्थ्यांना फायदा झाला. परंतु स्वप्रयत्न-पराङ्मुख आणि गुरूंवरच अवलंबून राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पद्धती जाचक वाटली. शिक्षकाने आयते शब्दार्थ द्यावेत व तयार सारांश काढून घ्यावेत अशा प्रकारची प्रथा आपल्या शिक्षणात आहे. जे शाळेत तेच कॉलेजमध्ये. माझ्या एम्. ए. च्या अभ्यासाच्या वेळी कॉलेजची अध्यापनाची काहीच सोय नसल्यामुळे बौद्धिक स्वावलंबनाने सर्व अभ्यास माझा मीच पुरा केला, त्याचा फायदा मला चांगला झाला. पुढे सात-आठ वर्षांनी अमेरिकेत गेल्यानंतर तेथील शिक्षणपद्धतीने मला बौद्धिक स्वावलंबन अधिक प्रमाणात शिकविले. हीच माझी अध्यापनाची पद्धती कायम झाली. विद्यालयातील अनेक उपक्रम याचीच साक्ष देतील. शालेय विद्यार्थ्यांच्याकडून लिहून घेतलेले 'प्रबंध' आणि मास्टर ऑफ एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतलेले निबंध आणि भाषणे या पद्धतीवरील माझ्या श्रद्धेची साक्ष देतील.

प्रत्येक विषयाच्या अध्यापनात आणि शालेय कारभारात काही ना काहीतरी प्रयोग करीत राहाणे हा माझा दुसरा आवडीचा छंद. इंग्रजी संभाषणाचा सराव वर्गातील दोन-दोन विद्यार्थ्यांनी, अशा रीतीने एकदम वीस जोड्यांनी करावा, या

पद्धतीचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला. मॅट्रिकइतके शिक्षण झाले असूनही पदवीधर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त सफाईदारपणे ते बोलू शकतात. इंग्रजी कॉंपोझिशन बिनचूक लिहिले जावे आणि ते तपासताना शिक्षकाचा फार वेळ जाऊ नये याच्या प्रयोगसिद्ध पद्धती मी बसविल्या. वाईट हस्ताक्षर असलेल्या माध्यमिक शाळेतल्या विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर कसे सुधारावे याकरता मी एक पद्धती बसविली. असे अनेक प्रयोग निरनिराळचा कालखंडांत केले.

मार्गदर्शनाला प्राधान्य प्रत्यक्षात अध्यापनाला वेळ थोडा आणि इतर कामे जास्त; त्यामुळे एखादा विषय शिकविण्यापेक्षा विद्यार्थि-जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्यांना मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे काम मी केले. मी असे पाहिले की इतर विषय शिकविण्याकरता शिक्षक मिळतात पण सर्वांगीण मार्गदर्शन करण्याचे काम फार थोडे शिक्षक करू शकतात. विद्यार्थ्याच्या जीवनात त्याला हे मार्गदर्शन आजन्म उपयोगी पडते. शाळेत शिकलेले विषय कालांतराने विसरून जातात. माध्यमिक शाळेत व कॉलेजमध्ये प्रत्येक शिक्षक आपापला विषय शिकवितो; तो पुरा झाला की आपले काम झाले असे समजतो आणि चालू लागतो. त्यामुळे जीवनाचे मार्गदर्शन करण्याला कोणीच उपयोगी पडत नाही. तरुण वयातील विद्यार्थ्यांना अनेक अडीअडचणी असतात, बिकट प्रश्न असतात, जिज्ञासा असते; परंतु या सर्व गोष्टींविषयी त्यांच्याशी बोलण्याला पालकांना फुरसत नसते आणि शिक्षक आपल्या विषयाच्या अध्यापनात मग्न असतात. त्यामुळे विद्यार्थी साक्षर आणि शिक्षित होतो परंतु सु-शिक्षित आणि सु-संस्कृत असा होत नाही. शिक्षित लोकांची चारित्र्यहीनता हा या शिक्षणपद्धतीचा परिपाक आहे.

अखंड संबंध विद्यार्थ्यांना अखंड मार्गदर्शन हेच मी माझे काम योजले. घरी अभ्यास कसा करावा, कच्चे विषय कसे सुधारावेत, अधिकाधिक गुण कसे मिळवावेत, इतर वाचन कसे करावे, आरोग्य कसे सुधारावे, धार्मिक व नैतिक वाचन काय करावे, गुरुजींशी कसे वागावे, घरी भावंडांशी कसे वागावे, शाळेतील सर्व सोयींचा अधिकाधिक फायदा कसा घ्यावा, अक्षर कसे सुधारावे, सुटी उपयुक्त रीतीने कशी घालवावी, मॅट्रिक किंवा एस्. एस्. सी. झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी काय करावे, शाळेतल्या विषयांचे महत्त्व आयुष्यात काय आहे, अखेरच्या परीक्षेत मिळालेला तिसरा वर्ग जन्मभर कसा नडतो आणि पहिला वर्ग जन्मभर कसा उपयोगी पडतो—अशा अनेक प्रश्नांवर मी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असे. शाळेतील अभ्यास, समाजातील व्यवहार, स्वतःचे चारित्र्य आणि शील, या क्षेत्रातील अनेक विषयांचा ऊहापोह मी करीत असे. हे माझे मार्गदर्शन विद्यार्थी शाळा सोडून गेला तरीही त्याच्याशी संबंध असेपर्यंत चालूच असते. प्रौढ विद्यार्थ्यांनाही त्यांच्या सांसारिक आणि सार्वजनिक जीवनात मार्गदर्शन पाहिजे असते. गुरुशिष्यांचे संबंध एकदा जोडल्यानंतर ते आजन्म राहतात. जो एकदा विद्यार्थी झाला तो जन्मभर माझा विद्यार्थी, घाकटा भाऊ आणि मित्र राहिला. मी देत असलेले शिक्षण आणि मार्गदर्शन हे विद्यार्थिदशेपुरतेच मर्यादित राहात नाही, ते विद्यार्थ्यांच्या जीवनात त्याला अखंडपणे चालू असते व मिळत असते.

प्रेरणा-स्फूर्तीची संधी हे मार्गदर्शन सामुदायिक रीतीने वर्गात होत असते आणि कधी कधी विद्यार्थ्यांशी वैयक्तिक रीतीने होत असते. दोन्ही पद्धतींचा चांगला उपयोग झाला. सर्वसामान्य गोष्टी समुदायात सांगता येतात परंतु वैयक्तिक गुणदोषांची चर्चा आणि वैयक्तिक सुधारण्याची किंवा उत्कृष्ट यश मिळविण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती वैयक्तिक भेटीतच देता येते. विशेष प्रसंगाने एखाद्या विद्यार्थ्याशी झालेली चार-पाच मिनिटांची भेट ही त्याच्या जीवनात अत्यंत मार्गदर्शक आणि क्रांतिकारक ठरते. माझी संस्था आणि इतर संस्था, माझी कामाची पद्धती आणि इतरांची कामाची पद्धती, यांतील गुणात आणि यशापयशात फरक या मार्गदर्शनाच्या पद्धतीमुळे पडतो असे मला वाटते. मार्गदर्शन हा शिक्षणाचा फार महत्त्वाचा भाग आहे.

जात-गोत-रहित दृष्टी आश्रमात किंवा शाळेत विद्यार्थी घेतल्यानंतर मुलाच्या जातगोताकडे मी पाहिले नाही. माझा विद्यार्थी म्हणून मी त्याला पंक्तीला घेत असे. सर्व जातीचे व ज्ञातीचे विद्यार्थी शिकून गेले. त्यांचे माझे संबंध एका कुटुंबातील भावासारखे आहेत. मी त्यांच्या घरी जेवतो, ते माझ्या घरी जेवतात. प्रत्येक ज्ञातीला तिच्यातील दोन-तीन बुद्धिमान विद्यार्थी अधिकाधिक शिक्षण देऊन कार्यकर्ते म्हणून तयार करून द्यावेत, त्या त्या ज्ञातीचे नेते पुरवावेत, अशा प्रकारचे माझे धोरण असे. माझ्या माजी विद्यार्थी कुटुंबात ब्राह्मण, मराठे, वैश्य, कुणबी, धनगर, सोनार, माळी, भावसार, लिंगायत, जैन, गुजराथी, हरिजन इत्यादी सर्व प्रकारचे माजी विद्यार्थी आहेत.

मास्टर ऑफ एज्युकेशनचे विद्यार्थी गेल्या पंचेचाळीस वर्षांच्या कालखंडात शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रे किंवा चळवळी यांत मी फारसे लक्ष घातले नाही. सार्वजनिक जीवनात पडलेल्या व्यक्तीला राजकीय व सामाजिक अशा अनेक कामांत व चळवळींत ओढण्याचा प्रयत्न होतो, परंतु त्या मोहाला मी बळी पडलो नाही. 'माझे कार्यक्षेत्र शिक्षणाचे आहे, त्यातील वाटेल ते काम मला सांगा' असे माझे उत्तर असे. या क्षेत्रातील केवळ माध्यमिक शिक्षणाला चिकटून न राहता, त्याच्या आधीच्या आणि नंतरच्या सर्व शिक्षणक्षेत्रांशी मी संबंध ठेवला आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, विद्यापीठे, प्रौढशिक्षण, कामगारशिक्षण इत्यादी क्षेत्रांत मी काय काम केले याचे वर्णन येथे करीत नाही. परंतु ज्या क्षेत्रात मला विद्यार्थी मिळाले व माझ्या हाताखाली शिकून ते बाहेर पडले असे एक उच्च शिक्षणाचे क्षेत्र होते. मी १९४८ सालापासून प्राध्यापक आहे आणि मास्टर ऑफ एज्युकेशन-च्या विद्यार्थ्यांना शिकवितो व त्यांना पीएच्. डी. पर्यंत मार्गदर्शन करतो याची माहिती फार थोड्यांना असेल. मुंबई, कर्नाटक आणि पुणे विद्यापीठातून माझ्याकडे " तुलनात्मक शिक्षण पद्धती " हा विषय शिकून अनेक विद्यार्थी बाहेर पडले. त्यांना मी अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, रशिया, जपान, चायना, फिलीपिन्स, ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, ईजिप्त, तुर्कस्थान इ. देशांतील शिक्षणपद्धतींची माहिती देत असे. तिच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आणि भारतातील शिक्षण कसे आहे व कसे असावे याविषयी माझे विचार सांगत असे.

माझ्या वर्गाचे नाव नसलेलेही विद्यार्थी केवळ हौसेने व जिज्ञासेने, स्वयंस्फूर्तीने माझी भाषणे ऐकण्याकरता येत. असे हे विद्यार्थी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ व काही इतर प्रांतांतही पसरले आहेत. आपला विषय शिकविण्यापुरते अध्यापन मर्यादित न करता शिक्षणशास्त्राचा पुढे विद्यार्थ्यांनी जास्त अभ्यास करावा आणि देशाच्या शैक्षणिक घडामोडीत अभ्यास, लेखन, वक्तृत्व, प्रयोग इत्यादी रूपाने शिक्षण सुधारणेला हातभार लावावा, या क्षेत्रात पुढाकार घ्यावा असे मोठ्या तळमळीने मी सांगत असे. या पातळीवरील माझे विद्यार्थी,—यांना विद्यार्थी म्हणण्यापेक्षा मित्र म्हणणे जास्त श्रेयस्कर ठरेल—आज जबाबदारीच्या जागेवर कामे करीत आहेत. यांतील काही जणांशी माझे चांगले संबंध आहेत.

अनुल्लेखित भाग हा निबंध किंवा हा ग्रंथ हे माझे आत्मचरित्र नाही किंवा माझ्या जीवन-कार्याचे संपूर्ण वर्णन नाही. 'गुरु-शिष्य-संबंध' हाच एक महत्त्वाचा विषय या ग्रंथात प्रामुख्याने घेतला आहे. मी विद्यार्थ्यांना काय शिकविले, कोणते संस्कार दिले व कशा प्रकारे मार्ग-दर्शन केले याचे सिंहावलोकन मी या प्रस्तावनेत केलेले आहे. माझ्या या कामाला यश किती आले आणि या शिक्षणपद्धतीची फलश्रुती काय झाली त्याचे वर्णन माझ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या लेखात केलेले आहे. याशिवाय असे अनेक अनुल्लेखित विषय आहेत की ज्यांचा परामर्श येथे घेतलेला नाही. माझे बालपण आणि विद्यार्थी-अवस्था, संस्था-चालक या दृष्टीने आलेले अनुभव, शालेय कारभाराची कामे व त्यातील प्रयोग, मुंबई व पुणे विद्यापीठांतील सभासद या नात्याने अनुभव, सेकंडरी एज्युकेशन बोर्ड आणि एस्. एस्. सी. बोर्ड यांतील कामे, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, आणि मुख्याध्यापक यांच्या संघटनांमधून केलेली कामे, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये केलेले काम, राज्य सरकारच्या आणि मध्यवर्ती सरकारच्या निरनिराळ्या शैक्षणिक समित्यांमधील कामे इत्यादी अनेक गोष्टींचा परामर्श या लेखात किंवा ग्रंथात घेता आलेला नाही. त्यांचा अन्य ठिकाणी विस्तार करावा लागेल.

सर्वस्व-समर्पणाचा पुरा संकल्प १९२० साली बी. ए. पदवीधर झाल्यावरोबर गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आपले आयुष्य वाहावे असा मी संकल्प सोडला. आज त्याला ४६ वर्षे झाली. मी विद्यार्थ्यांच्याकरता काय केले असा प्रश्न स्वत:च्याच मनाशी विचारतो आणि स्वगतच त्याचे उत्तर देतो. माझ्या संकल्पाप्रमाणे मी शेवटपर्यंत काम करीत आहे आणि अखेरपर्यंत करीत राहीन. आर्थिक दृष्टीने विचार केला तर असे दिसून येईल की संस्थेकडून कमीत कमी निर्वाहापुरता मोबदला घेऊन मी काम केले आहे, इतकेच नव्हे तर इतरत्र मिळालेल्या मानधनाचेही उदक संस्थेच्या हातावर सोडले आहे. शारीरिक दृष्टीने विचार करता कोठलेही सुख, चैन, विलास किंवा विश्रांती यांची पर्वा न करता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला वाहून घेतलेले आहे. मानसिक दृष्टीने विचार करता विद्यार्थ्यांचे हित, विकास आणि उत्कृष्ट शिक्षण कसे होईल हाच निदिध्यास ठेवला आहे. वेळेच्या दृष्टीने विचार करता हे काम करताना रात्र आणि दिवस, कामाचे दिवस आणि सुटी, असा विचार न करता सतत काम करीत आलो आहे.

सरकारी नोकर वर्षाकाठी महिना दीड महिना रजा घेतात अशा रजा फारशा घेतल्या नाहीत. प्रकृती बिघडली असता 'सहा महिने पूर्ण विश्रांती घ्या' असे डॉक्टरांनी सांगितले असताही तो सल्ला मानला नाही आणि कामात खंड पाडला नाही. जीवनातील उमेदीचा आणि निवृत्तीचा असे दोन्ही कालखंड विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरताच दिले आहेत. या कामातून काही काळ बाजूला काढून मी विद्वत्ता संपादनाकरता दिला असता तर विद्वान् म्हणून अधिक कीर्ती मिळविता आली असती. परदेशातील उच्च पदव्या संपादन करून आल्यानंतर आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून बोलबाला झाल्यानंतर दाराशी चालत आलेल्या मोठ्या वेतनाच्या आणि मानाच्या जागा नाकारल्या. या साऱ्या तपश्चर्येत माझी पत्नी आणि मुलेदेखील एकरूप झाली. विद्यार्थिदशेत दुर्दैवाने मला गरिबी आली. शिक्षण संपल्यावर सांसारिक जीवनात मी गरिबी ओढवून घेतली आणि ती मुलाबाळांवर लादली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता यापेक्षा काही अधिक करावयाचे राहिले आहे असे मला वाटत नाही. सारांश, तन-मन-धन-काळ-कुटुंब या सर्वांचा उपयोग विद्यार्थी, शिक्षण आणि संस्था यांकरिताच मी करीत आलो आहे. आजही मी निवृत्त झालेलो नाही. सध्याही माझे काम यथाशक्ती चालू आहे. ते अखेरपर्यंत चालू ठेवण्याचा निर्धार, उमेद आणि संकल्प आहे.

जीवनाचे सेक्शन ड्रॉइंग या सर्व गोष्टी स्वतःच्या तोंडाने सांगण्यात काही उद्देश आहे. यात अहंकार नाही किंवा आत्मस्तुती नाही. अनेक विद्यार्थ्यांशी माझे चांगले संबंध आहेत. त्याचप्रमाणे नाखूष होऊन गैरमर्जी करून गेलेल्या विद्यार्थ्यांचेही थोडे प्रमाण आहे. या सर्वांना या गोष्टी स्पष्टपणे कळल्या पाहिजेत. मनुष्य मोठा झालेला अनेकांना दिसतो आणि ते मोठेपण आपल्यालाही मिळावे असे प्रत्येकाला वाटते. पण मोठेपणाच्या पायात कोणता मालमसाला घातला आहे त्याचे सेक्शन ड्रॉइंग काढून दाखविल्याशिवाय मोठेपणाची महत्त्वाकांक्षा बाळगणारांना मार्ग दिसणार नाही. "ए सेंट हॅज ए पास्ट, ए सिनर हॅज ए फ्यूचर." साधूसंतांच्या पूर्व जीवनात बरा-वाईट इतिहास असतो, पापी माणसालाही भावी काळात सुधारता येईल. मोठा माणूस चुका आणि प्रयोग करीत करीत मोठा होतो. त्याचे कौतुक करणारे असतात, तसेच त्याला शाप देणारेही असतात. या दोन्ही गोष्टी निर्विकार मनाने स्वीकारणे हीच मोठेपणाची तपश्चर्या आहे. व्यक्तीचे मानमरातब झालेले दिसतात; त्याच्याच जोडीला त्याची तपश्चर्या दिसावी आणि दोन्ही गोष्टींचे समीकरण घातले जावे.

जमा-खर्च व नफा-तोटा या ग्रंथातील बहुसंख्य लेखांवरून माझ्या कामाला यश आलेले आहे असा एक प्रकारचा आभास होतो. पण खोल विचार केल्यानंतर मला असे वाटते की जितके यश आहे तितकेच अपयशही आहे. स्वयंस्फूर्तीने लेख लिहिणारे आहेत त्यापेक्षा संख्येने अधिक न लिहिणारे आहेत. या न लिहिणारांत अनेक प्रकार असू शकतील. वेळ नाही, लेखनकला नाही किंवा मुद्दे सुचत नाहीत म्हणून न लिहिणारांचा वर्ग बाजूला ठेवला तरी या वर्गात असंतुष्ट असलेले, दुरावलेले, आपल्याला

काहीही फायदा झाला नाही असे वाटणारे, आपले नुकसान झाले म्हणून रुष्ट असणारे असेही अनेक विद्यार्थी असण्याचा संभव आहे. त्यांना जमेला धरूनच मी आपल्या जीवनाचे मूल्यमापन करतो. मला खूप वाटते की शिक्षणात अनेक प्रयोग केले परंतु या प्रयोगांचा उल्लेख विद्यार्थ्यांच्या लेखात नसणे हे त्या प्रयोगांचे अपयशच आहे. सारांश, फार मोठे यश मिळाले अशी मी कल्पना करून घेत नाही व फार मोठे अपयश आले असेही मानीत नाही. जीवनात जमा आणि खर्च, नफा आणि तोटा, अशा दोन्हीही बाजू असतात. भावी काळातील शिक्षक आणि विद्यार्थी यांना त्या दोन्ही समजणे अवश्य आहे. पण या लेखसंग्रहामुळे एक गोष्ट झाली. माझ्या स्वभावातील न्यूनगंड नाहीसा झाला. आपण काहीतरी चांगले केले आणि त्यामुळे काही जणांचा तरी फायदा झाला; आपल्यावर गाढ प्रेम करणारे व आपल्या यशात आनंद मानणारे काही विद्यार्थी आहेत या कल्पनेने मनाला विरंगुळा वाटतो. हीच जीवनाची एक सार्थकता आहे असे वाटते.

आजच्या व भावी पिढीकरता आपल्या स्वतःच्याच हाताने स्वतःचा गौरव-ग्रंथ काढावा अशी माझी कल्पना नाही. तसे मी लेखकांना अनेक वेळा स्पष्ट केले. आपल्या अनुभवाचा फायदा चालू आणि भावी पिढीतील शिक्षकांना, विद्यार्थ्यांना आणि पालकांना देणे हे आपले कर्तव्य आहे. हेही त्यांना एक मार्गदर्शनच आहे. इतक्या विद्यार्थ्यांचे अनुभव हाही शिक्षणशास्त्राचा आणि मानसशास्त्राचा कच्चा मालमसालाच आहे. पुढे मागे कोणी याचा जास्त उपयोग करून घेईल. माझी ही कल्पना अनेकांनी वाखाणली म्हणून मी ती साकार केली. आजच्या व उद्याच्या शिक्षकाला माझी कार्यपद्धती सोदाहरण कळेल. त्यातील चुका त्यांना टाळता येतील, चांगल्या गोष्टी पुढे चालू ठेवता येतील आणि नवीन उपक्रम सुचतील. विद्यार्थ्यांनाही या ग्रंथापासून पुष्कळ बोध मिळेल. विद्यार्थि-दशेत काही गोष्टी कंटाळवाण्या, त्रासाच्या आणि कष्टाच्या वाटतात. परंतु पुढे पाच-पंचवीस वर्षांनी संसारात त्यांचा काय उपयोग होणार आहे त्याची कल्पना त्यांना येईल. आपल्याला अप्रिय वाटणाऱ्या शिक्षकांचा आणि शिक्षणाचा अन्वयार्थ कसा लावावा हेही त्यांना समजेल.

शिक्षकाला उद्या मानाचे स्थान शिक्षकाला समाजात मानाचे स्थान मिळत नाही अशी तक्रार ऐकू येते. यापुढील काळात प्रत्येक नागरिक शालेय शिक्षण घेऊन बाहेर पडणार आहे. शिक्षकाच्या शिकवणकीचा संस्कार प्रत्येक भारतीयावर होणार आहे. हे संस्कार आणि ही शिकवण विद्यार्थ्याला उपयुक्त आणि मोलाची वाटली तरच ते शिक्षकाला मान देतील. भावी समाजाकडून मानपत्र अथवा अपमानपत्र मिळविणे हे सर्वस्वी आजच्या शिक्षकांच्या हातात आहे. आपल्या हाताखालून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांविषयी आणि ह्या व्यवसायाविषयी आदर आणि प्रेम वाटेल अशा प्रकारचे शिक्षण आणि संस्कार देणे शिक्षकांच्या हातात आहे. आज शाळेत असलेल्या विद्यार्थ्याला शिक्षकांविषयी आदर वाटला नाही तर तो उद्याच्या समाजालाही वाटणार नाही. आपण करीत असलेले कार्य विद्यार्थ्यांच्या दीर्घकाल उपयोगाच्या

क्रमांक ५५५८७ दि: नि.व.सं.
क्रमांक २०१३ दि: ३०।३।७९

दृष्टीने पाहणारा शिक्षक मुलांच्याही अधिक काळ लक्षात राहतो. तो शिक्षक आणि ते शिक्षण जन्मभर त्यांच्या बरोबर राहतात.

शिक्षकाचे दुहेरी काम प्रत्येक शिक्षकाचे काम दुहेरी स्वरूपाचे असते. स्वतःचा विषय उत्कृष्टपणे शिकवून त्या विषयाची गोडी आणि अखंड जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये उत्पन्न करणे ही या कामाची एक बाजू आहे. विद्यार्थ्याला जीवनाचा मार्ग दाखविणे, चांगले विचार देणे, ध्येयवादाचे संवर्धन करणे, चारित्र्य आणि शील यांच्याविषयी आदर निर्माण करणे ही शिक्षकाच्या कामाची दुसरी बाजू आहे. ही दोन्हीही कार्ये करणारा शिक्षक विद्यार्थ्यांच्या अखंड आदराला पात्र होतो. वर्गात शिकविलेले विषय पुढेमागे विसरून जातात, किंवा त्या विषयांच्या क्षेत्रात पुढेमागे विद्यार्थीच शिक्षकांपेक्षा जास्त विद्वान होतो. त्यामुळे विषयाचे महत्त्व प्रत्यक्ष अभ्यास-क्रमापेक्षा त्या विषयासंबंधी शिक्षकाने निर्माण केलेल्या जिज्ञासेत आणि अभिरुचीत जास्त आहे. जीवनात दीर्घकाल उपयोगी पडणारा आचाराचा आणि सद्वर्तनाचा मार्ग दाखविणे हा विषय अभ्यासक्रमात घातलेला नाही किंवा ठराविक वेळापत्रकातही तो घालणे शक्य नाही. या विचारांचे वातावरणच निर्माण करणे शक्य आहे. शिक्षकाचा स्वतःचा आदर्श हेही या शिक्षणाचे बलवत्तर साधन आहे.

देण्यासारखे काय आहे ? प्रत्येक शिक्षकाने आपल्या मनाशी असा विचार करावा की या दोन स्वरूपाचे शिक्षण देण्याला आपण पुरेसे समर्थ आहोत, का आप-ल्यात काही उणीव आहे ? उणीव असल्यास ती कशी भरून काढता येईल ? आपण जे विषय शिकवतो त्या विषयांत 'विद्वान्' असे विशेषण लावण्याइतकी विद्वत्ता आपल्यात आहे काय ? की निव्वळ कामचलाऊ ज्ञान आहे ? आपल्या विषयातील विद्वत्तेविषयी आदर वाटेल इतकी ज्ञानाची खोली आहे काय ? हे विषयांसंबंधी झाले. दुसरी बाजू विचारात्मक आणि आचारात्मक मार्गदर्शनाची. विद्यार्थी न कळत शिक्षकाच्या आचाराचे अनुकरण करीत असतात. प्रत्येक शिक्षकाच्या हाताखालून त्याच्या हयातीत एक हजार तरी विद्यार्थी जात असतात. इतक्या सर्व विद्यार्थ्यांनी आपले अनुकरण केले तरी ते सदाचारी नागरिक होतील इतके शुद्ध आपले वर्तन आहे काय ? उपनिषदातील उपदेशाप्रमाणे 'यानि अस्माकम् सुचरितानि तानि सेव्यानि' या न्यायाने आपल्याजवळ पुरेशी सुचरिते म्हणजे अनुकरणीय गुण आहेत काय ? असले तर ते विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणा. ते विद्यार्थ्यांच्या नेहमी लक्षात येतातच असे नाही. त्याचबरोबर असा विचार करा की नैतिक वर्तन, जीवनाची ध्येये, राष्ट्रीय वृत्ती, मानवता-दृष्टी, आदर्श जीवन इत्यादी शाश्वत मूल्यांच्या दृष्टीने आपले स्वतःचे विचार आणि श्रद्धा काय आहेत, विद्यार्थ्यांना देण्यासारखे शाश्वत स्वरूपाचे कोणते विचार आहेत, कोणत्या निष्ठेशी व विचारांशी तुमचे स्वतःचे जीवन आणि ध्येयवाद निगडित आहे, हे सर्व विद्यार्थ्यांना स्पष्टपणे कळू द्या. अशा शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना नेहमी आदर वाटतो असा माझा अनुभव आहे.

आजपासूनच योजना ठेवा गेल्या पंचेचाळीस वर्षांत माझ्या हाताखालून जे विद्यार्थी गेले त्यांपैकी अनेक विद्यार्थ्यांशी माझा अद्यापही जिव्हाळ्याचा संबंध आहे.

असे सर्व विद्यार्थी महाराष्ट्रभर पसरले आहेत. ही गोष्ट मी योजनापूर्वक केली असे नव्हे, ती हळूहळू व न कळत माझ्याकडून घडत गेली आणि पुढे तिला तत्त्वाचे व धोरणाचे स्वरूप आले. जी गोष्ट मी आपोआप न कळत केली ती नवीन पिढीतील शिक्षकांना बुद्धिपुरस्सर व योजनापूर्वक करता येईल. पंचवीस-तीस वर्षे शिक्षकाचा व्यवसाय करणाऱ्या शिक्षकाच्या हाताखालून दरवर्षी चाळीस ते शंभर या हिशेबाने एक हजार ते तीन हजार विद्यार्थी जात असतात. आपल्या व्यवसाय-निवृत्तीच्या वेळी तुम्हांला असे शे-सव्वाशे तरी विद्यार्थी दाखविता यावेत, की ज्यांना तुम्ही विद्यार्थिदशेनंतरही मार्गदर्शन केले आहे आणि ज्यांच्याशी गुरु-शिष्याचे संबंध अखंड ठेवले आहेत. दरवर्षी तुमच्या हाताखाली येणाऱ्या विद्यार्थ्यांतून असे चार-पाच विद्यार्थी तरी निवडा की ज्यांना तुम्ही सर्व प्रकारचे मार्गदर्शन करू शकाल. हे तुमच्या हातून घडण्याला विद्यार्थ्यांविषयी आंतरिक तळमळ, आस्था पाहिजे. त्यांना देण्यासारखे ज्ञान, विचार आणि ध्येयवाद आपल्या स्वतःजवळ पाहिजे. विद्वत्ता आणि शील या दोन महत्त्वाच्या गोष्टी शिक्षकाजवळ देण्यासारख्या असतात. त्या तुमच्यापासून पूर्णपणे घेणारे चार-पाच तरी विद्यार्थी असू द्या. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही त्यांच्या प्रगतीविषयी आस्था, कुतूहल व कौतुक जागृत ठेवा. योग्य वेळी त्यांना उत्तेजन, प्रेरणा, स्फूर्ती, धैर्य आणि दिलासा द्या. वर्षातून त्यांना एखादे तरी पत्र पाठवा. अशा रीतीने वागणाऱ्या शिक्षकाला विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळाल्याशिवाय राहणार नाही.

हेच माझे धन शिक्षकांनी विद्यार्थ्यांविषयी आस्था ठेवून निर्हेतुकपणे त्यांना मार्गदर्शन केले तर विद्यार्थ्यांकडूनही किती प्रमाणात प्रेम मिळू शकते ते या ग्रंथातील अनेक लेखांवरून दिसून येईल. मी विद्यार्थ्यांना असे आवाहन केले होते की मी त्यांना दिलेल्या शिक्षणाविषयी अनुकूल अथवा प्रतिकूल अशा दोन्ही प्रतींच्या गोष्टी लिहाव्यात. मला निव्वळ मानपत्रे नको आहेत. इतके सांगितले तरीही बहुसंख्य लेखांत गुरूंविषयी प्रेम, कृतज्ञता, गौरव, अभिमान आणि कौतुक या भावना व्यक्त झाल्या आहेत. मला माझ्या विद्यार्थ्यांकडून जी कृतज्ञता आणि जे प्रेम मिळाले तेच प्रत्येक शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यांकडून मिळू शकेल. शेवटी शिक्षकाची हीच संपत्ती मोलाची आहे, हे शिक्षकांना कळावे याकरताच मी हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे.

उद्याचे स्वप्न यात पाहा दुसऱ्या एका प्रकाराने आजच्या शिक्षकांना या ग्रंथाचा उपयोग होईल. तीस-चाळीस वर्षांपूर्वी माझ्या हाताखाली दहा ते वीस वयांतील अनेक प्रकारचे विद्यार्थी होते. हुशार आणि सामान्य, सशक्त आणि अशक्त, तडफदार आणि मेंगरूळ, उद्योगी आणि चुकार, अभ्यासू आणि उडाणटप्पू—असे अनेक वृत्तीचे व दर्जाचे विद्यार्थी होते. आज त्यांच्यातूनच हे लेखक निर्माण झाले आहेत. व्यापारी, कारखानदार, मुख्याध्यापक, सैनिक, अधिकारी, इंजिनिअर, डॉक्टर,—असे अनेक यशस्वी नागरिक तीस-चाळीस वर्षांपूर्वी बाल्यावस्थेत होते. आजच्या शिक्षकालाही आता कल्पना करता येईल की आजचे बालविद्यार्थी पुढच्या पंचवीस-तीस

वर्षांनी काय होतील. त्या वेळी त्यांनीही आजच्या शिक्षकांबद्दल अधिक आदराचे, गौरवाचे आणि कृतज्ञतेचे उद्‌गार काढावेत—असे काम आजच्या शिक्षकांनी करावे असा या ग्रंथाचा संदेश आहे.

अशा वाङ्मयाचा उपयोग माझ्या कल्पनेप्रमाणे अशा स्वरूपाचा ग्रंथ अद्याप प्रकाशित झाला नाही. शैक्षणिक वाङ्मयात हा एक नवीन प्रकार आहे असे मला वाटते. इतर शिक्षकांनीही अशा प्रकारचे वाङ्मय प्रसिद्ध केल्यास शैक्षणिक मानसशास्त्राच्या वाढीला त्याची चांगली मदत होईल. हे वाङ्मय याच स्वरूपात प्रसिद्ध झाले पाहिजे असे नाही. त्याचे अनेक प्रकार संभवतात. एकाच शिक्षकाविषयी अनेक विद्यार्थ्यांना काय वाटते, हा एक प्रकार झाला. अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या अनेक शिक्षकांबद्दल काय वाटते, त्याचे संकलन हा दुसरा प्रकार होईल. एकाच विद्यार्थ्याला प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन शिक्षण होईपर्यंत शिक्षण देणाऱ्या अनेक शिक्षकांविषयी काय वाटते, हा तिसरा प्रकार होऊ शकेल. स्वतःची कल्पना लढविणाऱ्या लेखकाला इतरही प्रकार सुचू शकतील.

दोन विद्वान् – एकाला 'समजले' पेशवाईच्या काळातील एक छोटीशी गोष्ट देऊन ही प्रस्तावना पुरी करतो. पर्वतीच्या रमण्यात दक्षिणा घेण्याकरता अनेक ब्राह्मण जमले होते. दोन सारख्याच विद्वत्तेचे ब्राह्मण दक्षिणेकरता पुढे आले. त्यांतील एकाला दोन ओगराळी दक्षिणा मिळाली व दुसऱ्याच्या पदरात एकच ओगराळे ओतले गेले. दुसऱ्या विद्वानाला त्याचा राग आला आणि त्याने त्वेषाने विचारले, "आमची दोघांची विद्वत्ता सारखी असून दक्षिणेत असा पक्षपात का?" तेव्हा त्या ब्राह्मणाला उलट सवाल विचारला गेला "तुझ्या इतके विद्वान् शिष्य तू किती तयार केलेस?" त्याला एकही नाव घेता येईना. पहिल्या ब्राह्मणाला हाच प्रश्न विचारल्याबरोबर त्याने आपल्या पाच-पंचवीस शिष्यांची नावे सादर केली. तक्रार करणारा ब्राह्मण म्हणाला, "समजलं!"

हीच कसोटी लावा तुम्हांला समजलं का? शेवटी शिक्षकाच्या कामाची हीच कसोटी आहे. चांगले शिष्य तुम्ही किती तयार केले? मलाही तुम्ही हीच कसोटी लावा.

रा. श्री.

१. चारित्र्यसंवर्धनाचे प्रयत्न

श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.

व्यवसाय : कार्यवाह, पुणे अ. वि. गृह

शिक्षणकाल १९२१ ते १९३०

अ. वि. गृहाचे कर्तबगार आजीव सेवक, औद्योगिक रसायन-विभाग, यांत्रिक व्यापार-विभाग, मुद्रण-प्रकाशन इ. चे संचालक

१९२१ साली जन्मलेलो आम्ही तिघे पुणे अनाथ विद्यार्थी गृह १९०९ साली स्थापन झाले, पुढच्या वारा वर्षांत संस्थेची एक शाखा चिंचवडला सुरू झाली आणि संस्थेच्या कार्याची सर्वांगीण वाढ तेथे करावी व पुण्यास फक्त उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी ठेवावेत अशा कल्पनेने कार्यकर्ते काम करीत होते. पण १९२० च्या अखेरीस चिंचवड शाखेने आपली उद्दिष्टे आणि नाव बदलून स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळा या नावाने स्वतंत्र व्यवहार सुरू केला. अर्थात १९२१ च्या सुरुवातीस संस्थेची पुणे शाखा म्हणजेच सध्याचे पुणे अनाथ विद्यार्थी गृह स्वतंत्रपणे काम करू लागले होते. डॉ. अण्णासाहेब खैर नुकतेच पदवीधर होऊन संस्थेत आजीव सेवक म्हणून काम करू लागले होते, आणि संस्था अलग झाल्यानंतर संस्थेत प्रथमतःच विद्यार्थ्यांची भरती झाली त्यात मला प्रवेश मिळून, मी विद्यार्थी म्हणून दाखल झालो. अशा रीतीने १९२१ साली संस्थेचा जन्म किंवा पुनर्जन्म, डॉ. अण्णासाहेब खैर यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्यकर्ता म्हणून जन्म व संस्थेतील विद्यार्थी म्हणून माझा जन्म एकाच वेळी झाला असे म्हणण्यास हरकत नाही. या तिघांच्या जीवनप्रवाहाचा त्रिवेणी संगम गेली ४५ वर्षे सतत चालू आहे. त्यामुळे या कालात किती गंगा वाहून गेली व किती तीर्थ शिल्लक राहिले हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

राष्ट्रीय शिक्षण १९२१ साली जी राष्ट्रीय चळवळ सुरू झाली तीत इतर गोष्टींबरोबर राष्ट्रीय शिक्षण सुरू करण्यावरही भर देण्यात येत होता. राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेत सामान्यतः त्या वेळच्या प्रचलित शिक्षणातील क्रमिक पुस्तकांतून राष्ट्रीय वृत्ती निर्माण होणाऱ्या वाङ्मयाचा अंतर्भाव करून त्याच्या जोडीस कलाशिक्षण, धंदेव्यवसाय शिक्षण, शारीरिक शिक्षण, धर्म व नीतिशिक्षण आणि चारित्र्यसंवर्धन या गोष्टींचा समावेश अपेक्षित होता.

१९२१ सालीच डॉ. अण्णासाहेब खैर व डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना केली आणि वरील विचारसरणीस अनुसरून वसतिगृह व विद्यालय यांत सर्व उपक्रम सुरू केले.

शीलसंवर्धनाचे प्रयत्न संस्थेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी दैनिक कार्यक्रम रेखीवपणाने आखण्यात आले. त्यांत प्रार्थना, ब्रह्म-कर्म-उपासना, स्वच्छता, इतर वाचन, औद्योगिक शिक्षण, व्यायाम, गायन, धार्मिक वाचन यांना ठराविक वेळ देण्यात आला होता.

सद्‌गुणाष्टकाचे यशापयश त्याचप्रमाणे शुद्ध आचारासाठी एक सद्‌गुणाष्टक आखून देण्यात आले होते. १. कर्तव्यदक्षता (सर्व कामे चांगली करणे), २. नियमितपणा (वेळेवर कार्यक्रम करणे), ३. व्यवस्थितपणा (कपडे, पुस्तके, सामान इ. टापटिपीने ठेवणे), ४. व्यायाम (दोन्ही वेळेस नेमलेला व्यायाम घेणे), ५. सत्याचरण (परवस्तूस स्पर्श, भांडण, अपशब्दोच्चार न करणे), ६. बंधुसेवा (निदान १० मिनिटे दुसऱ्याला मदत करणे), ७. ज्ञानार्जन (अभ्यासाव्यतिरिक्त वाचन करणे), व ८. चिंतन (कोणत्याही विषयावर एकाग्र विचार) असे हे आठ गुण रोजच्या जीवनात सक्तीचे असत.

या सद्‌गुणाष्टकाची रोज नोंद केली जाई व गुणानुक्रमाने दर महिन्यास विद्यार्थ्यांना अनुक्रम देण्यात येई व मधून मधून कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षाही होई. डॉ. अण्णासाहेब खैर यांनीच हे सद्‌गुणाष्टक केले असल्यामुळे अनेक वेळा ते सायंप्रार्थनेस येत व सद्‌गुणाष्टकाची चौकशी करीत. यांपैकी ज्या गोष्टींवर देखरेख इतरांनी करणे शक्य असे त्यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना दक्ष राहावेच लागे. बाकीच्या बाबतीत शिक्षा होऊ नये इतपत खोटे बोलून दिवसाची वेळ भागवून नेण्याची सामान्य प्रवृत्ती असे. पण तात्पुरती वेळ भागवून नेली तरी या सद्‌गुणाष्टकाची कार्यवाही व्हावयास पाहिजे अशी मनात बोचणी मात्र सतत राहावयाची; त्यामुळे जमेल तेवढे गुण प्रामाणिकपणे मिळविण्याची मनाची प्रवृत्तीही असे. या शिस्तीतून जे विद्यार्थी बाहेर पडले त्यांपैकी काहींनी इतकी हाय खाल्ली की त्यांनी संस्थेत पुन्हा पाय ठेवला नाही; पण बहुधा अधिक प्रमाणात असे विद्यार्थी निघाले की, ज्यांनी संस्थेतून बाहेर पडल्यानंतर ५–१० वर्षांनी मुद्दाम पत्रे पाठवून संस्थेच्या या सद्‌गुणाष्टकाचा व व्यायाम, स्वावलंबन इ. सामान्य शिस्तीचा आपल्याला चालू व्यवसायात फार फायदा झाला आणि जेथे इतर लोक कमी पडले तेथे आपण कमी पडलो नाही असे वारंवार कळविले आहे. एकूण या प्रयोगातील प्रथम असलेला कडकपणा कमी झाल्यावर त्याचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर अधिक चांगला परिणाम झाला असे वाटते.

व्यायामात आघाडी सद्‌गुणाष्टकाएवढाच कटाक्ष विद्यार्थ्यांच्या व्यायामाबाबत असे. व्यायामात सक्तीचे नमस्कार, जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, मर्दानी व मैदानी खेळ व काही दिवस लष्करी कवाईत या गोष्टी येत. जरुरीप्रमाणे बाहेरच्या व्यायाम शाळांतूनही विद्यार्थी जात असत. याचा अतिशय उत्कृष्ट परिणाम विद्यार्थ्यांच्या शरीरांवर व मनांवर झालेला स्पष्ट दिसून येई. मध्यंतरी ८–१० वर्षांचा काळ असा होऊन गेला की, त्या वेळी संस्थेत फरीगदगा, लाठी, लेजीम व हुतुतूसारखे खेळ यांचे उत्कृष्ट शिक्षण मिळाल्यामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांच्या तुकड्या पुणे शहरातच नव्हे तर महाराष्ट्राच्या

स्पर्धांमध्ये चमकत असत. या काळात विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर तरतरीतपणा दिसे व इतरांनी आपल्या संरक्षणास येण्याची जरुरी नाही, आपण इतरांच्या संरक्षणास जाण्या-इतके खास मजबूत आहोत असा आत्मविश्वास दिसत असे. गेल्या १०-१५ वर्षांत मात्र सरकारच्या शाळेतील व्यायाम नियंत्रणामुळे हा जोम वाढण्याऐवजी कमी कमी झालेला दुर्दैवाने दिसतो. त्याचबरोबर सांघिक शिस्तीलाही नरमाई आलेली आहे. कदाचित स्वातंत्र्यापूर्वी आपल्याला इंग्रजांशी मुकाबला करावयाचा आहे अशी मनात सदैव जाणीव असावी. स्वातंत्र्य मिळाल्यावर ही ईर्षा नाहीशी झाली असेही असेल.

शिस्तीची उतरती भाजणी गेल्या ४५ वर्षांत एक महायुद्ध होऊन गेले. देशाला स्वातंत्र्य मिळाले. समाजात फार बदल झाले. कार्यकर्त्यांच्याही तीन पिढ्या झाल्या. या सर्व बदलांमुळे संस्थेतील विद्यार्थ्यांच्या नित्यक्रमातही फार बदल झाले. त्यामुळे २५ वर्षांपूर्वीचा संस्थेचा माजी विद्यार्थी संस्थेत एखादा दिवस राहून गेला म्हणजे सध्याच्या विद्यार्थ्यांना आपल्यापेक्षा कितीतरी कमी कष्टाचे जीवन जगण्यास मिळते, पण आपल्या वेळच्यासारखी कडक शिस्त राहिली नाही असे त्यास वाटते. पण त्याच वेळी ४-६ वर्षांपूर्वी बाहेर पडलेले विद्यार्थी संस्थेतील राहणीचा आपल्याला बाहेर गेल्यावर फार उपयोग झाला असे म्हणतात ! अर्थातच संस्थेच्या आतापर्यंतच्या कार्यात विद्यार्थ्यांनी काढलेले उद्‌गार ही एक समाधानाची गोष्ट आहे.

□ □ □

२. १९२५ आणि १९६५ मधील अंतर

श्री. रा. व्यं. कानिटकर,

व्यवसाय : सेवानिवृत्त पोस्टमास्तर

शिक्षणकाल १९११ ते १९२५

निवृत्तीनंतर संस्थेत स्वयंसेवेला रुजू झालेले निष्ठावान माजी विद्यार्थी

अरे गजानन अण्णा व नाना हे त्या वेळचे कै. दादांचे डावे-उजवे हस्त. विशेषतः अण्णा ! "अरे गजानन हे कर, ते कर" असे दादांचे आदेश वारंवार कानावर पडत. अण्णांकडून त्यांना प्रतिसाद मिळाला नाही असे घडल्याचे स्मरत नाही. दादांची हाक येताच अण्णा त्याच क्षणाला कोणतेही काम करण्याला तयार असत. अण्णा विद्यार्थ्यांकडून वेळोवेळीच सर्व गोष्टी करून घेण्यात रागीट पण शांत मुद्रेचे भासत. आताची अण्णांची हसतमुख मुद्रा व मार्दवयुक्त प्रेमळ बोलणे त्या वेळी आम्हांला उपलब्ध नव्हते. त्यामुळे आम्हांला त्यांची थोडीशी भीतीच वाटे म्हणा ना ! मला स्वतःला अण्णांकडून एखादी शिक्षा मिळाल्याचा प्रसंग घडलेला आठवत नाही. त्याचप्रमाणे मोठीशी शाबासकी मिळाल्याचेही एखादे उदाहरण मला स्मरत नाही.

कर्तव्यनिष्ठुरता अण्णांच्या कर्तव्य-निष्ठुरतेचा मला एक प्रसंग आठवतो. श्री. नाना अमेरिकेला गेल्यावर महाराष्ट्र विद्यालयाची सर्व जबाबदारी गुरु. अण्णांवर पडली. त्या वेळी विद्यालय प्रायोगिक अवस्थेतील व केवळ आश्रमातील विद्यार्थ्यांकरताच होते. एकदा तिसऱ्या अगर चौथ्या वर्षातील एका विद्यार्थ्याने चांगला लिहिला नसलेला परीक्षेचा पेपर रात्री हस्तगत करून केवळ मार्क चांगले मिळावे या हेतूने त्या जागी दुसरा पेपर रातोरात लिहून ठेवला. अण्णांच्या हे ध्यानात आले व परिणामी सदर विद्यार्थ्यास घरी पाठवण्यात आले. सदर विद्यार्थी हुषार व एरवी निखालस सद्वर्तनी होता याची अण्णांना जाणीव होती, पण केवळ कर्तव्यकठोर बाण्यामुळे त्यांना सदर निर्णय घ्यावा लागला. सदर विद्यार्थी पुढे संस्थेबाहेर दूर शहरी वारावर जेवून शिकला; व आता तो सरकारी स्थापत्यशाखेत एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरच्या हुद्द्यावर आहे. सदर बाबतीतील अण्णांचा निर्णय जास्त कठोर झाला असे वाटते !

नमस्काराचे प्रात्यक्षिक आम्हांला व्यायामाची आवड लावण्याकरिता अण्णा फार दक्ष असत. काही दिवस रोज सायंकाळी स्वतः काचा मारून १ ते ८ अंक मोजून आम्हांला नमस्कारांचे प्रात्यक्षिक करून दाखवीत व आमचेकडून तसे नमस्कार घालून घेत. या व्यायामपद्धतीची मला बरीच गोडी लागली व माझ्या नोकरपेशीय आयुष्यात नेहमी त्या पद्धतीचे साष्टांग नमस्कार घालण्याची आवड निर्माण झाली. आजही मी तसे नमस्कार घालतो. त्यामुळे आरोग्यरक्षणाला चांगलीच मदत झाली आहे.

देवीचा प्रसाद एके दिवशी खूप ताप येऊन मी रात्री बेचैन झालो. मला वाटते वातात बडबडलो व धावलो असावा. माडीवर हॉलमध्ये होतो. अण्णांना ते कळताच ते रात्री अनेकवार मला पाहून गेले. मला देवी आल्याची निश्चिती झाली. दुसरे दिवशी मला प्रेमळ शब्दात "तुला डॉक्टरांकडे जावयाचे आहे" असे सांगून अण्णांनी मला टांग्यात बसवले व मोठ्या दुःखाने सांसर्गिक रोगांच्या हॉस्पिटलमध्ये नेऊन ठेवले. मला कोठे नेत आहेत तेच कळेना. तेथे डॉक्टरला सांगून मला हॉस्पिटलमध्ये ठेवले. अण्णांनी डोळ्यात पाणी आणून मला तेथे का नेले ते सांगितले व डॉक्टरांना मला मच्छरदाणी वगैरे थोडी स्पेशल व्यवस्था करण्यास विनविले. त्यामुळे त्या अत्यंत निकृष्ट अवस्थेत असलेल्या हॉस्पिटलमध्येसुद्धा माझी बरी व्यवस्था लागली. कित्येक दिवस अण्णा दररोज सायकलवरून येऊन मला पाहून जात. रोज दुपारी एक विद्यार्थी माझे सोबतीला साबुदाण्याची खीर व फळे घेऊन पाठवीत. रोजच्या फेरीत अत्यंत आस्थेने विचारपूस करीत. अण्णांच्या कर्तव्यतत्परतेचा व प्रेमळपणाचा प्रत्यय मला त्या वेळी मोठ्या प्रमाणावर आला. माझ्या वडिलांना सदर वृत्त कळल्यावर ते पुण्यास धावून आले व माझे शुश्रूषेकरिता राहिले. मी जवळ जवळ २।। महिने त्या हॉस्पिटलमध्ये होतो; व मग गावी गेलो. बरा होऊन नोव्हेंबरमध्ये पुन्हा आश्रमात दाखल झालो. संस्थेचे चालक विद्यार्थ्यांना किती आस्थेने—आपुलकीने—वागवतात त्याचा मला प्रत्यय आला. व्यक्तिशः अण्णांनी मजकरता फार त्रास घेतला.

आश्रमीय जीवमाचा ठसा आश्रमात त्या वेळी बाणलेल्या शिस्तीचा मजवर कायमचा ठसा राहिला. लवकर उठणे, थंड पाण्याने स्नान, व्यायाम, कपडे धुणे वगैरे मला जडलेल्या सवयी आजही कायम आहेत. संस्थेने लावून दिलेली शिस्त कायमची अंगी बाणलेले, निर्व्यसनी राहिलेले खूपच माजी विद्यार्थी संस्थेबाहेर आहेत. तो आश्रमीय वारसा म्हणून मोठ्या अभिमानाने ते सांगत असतील.

१९२५ पूर्वीचे थोडेसे रागीट चेहऱ्याचे (फक्त तसे भासणारे) मितभाषी अण्णा व आताचे शांत मुद्रा, प्रेमळ गोड वाणी व आस्थेवाईक भावनांचा आविष्कार प्रथम-दर्शनीच करणारे अण्णा हा मोठा फरक दिसून येतो. यामुळे विद्यार्थ्यांच्या घरी अण्णा एकदा जरी आले तर मोठी धन्यता वाटते. अत्यंत आपुलकीने चुलीपर्यंत चौकशी विचारपूस करण्याच्या अण्णांच्या पद्धतीमुळे कुटुंबातील यच्चयावत माणसांना फारच धन्यता वाटते. अण्णांनी वारंवार आपल्याकडे यावे असे वाटते. अण्णा आमच्याकडे येण्याची संधी मी महाडला असताना मला एकदा लाभली.

□ □ □

३. मोठ्या बंधुत्वाचे नाते

श्री. र. पां. साने

व्यवसाय : लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन

शिक्षणकाल १९२० ते १९२३

कृतज्ञतेची जाणीव ठेवून संस्थेशी सतत संबंध ठेवला आहे

वेळापत्रकाचा उपयोग झाला वेळापत्रक आखून त्याप्रमाणे वागणे, हाच शिस्तीचा पहिला धडा आहे असे मला वाटते. हा पहिला धडा मला अनाथ विद्यार्थी गृहानेच शिकविला व मी त्याचे यथाशक्ती पालन केल्यामुळे मला पुढील सर्व आयुष्यात समाधान लाभले. वेळापत्रक आखताना सर्व वेळेचा जास्तीत जास्त सदुपयोग व्हावा अशा दृष्टीनेच त्याची आखणी होत असल्याने माझ्या सर्वांगीण शिक्षणाची सोय येथे झाली.

आश्रमीय जीवन स्वतःची सर्व कामे म्हणजे स्वयंपाक-पाणी, धुणी-भांडी, खोली झाडून सारवून स्वच्छ करणे, बिछाना घालणे व गुंडाळून ठेवणे, मधुकरी मागणे, भिक्षा मागणे, संस्थेची डायरी कॅलेंडरे विकणे वगैरे सर्व कामे विद्यार्थ्यांना आळीपाळीने करावी लागत व ती सर्व आम्ही विद्यार्थी हसत-खेळत करीत असू. आरोग्य, व्यायाम, खेळ वगैरेंचे शिक्षण नियमित दिले जात असे. आजारी मुलांचे औषधपाणी वेळेवर करणे, त्यांची शुश्रूषा करणे, त्यांच्या पथ्यपाण्याची व्यवस्था करणे वगैरे सर्व कामे विद्यार्थीच करीत असत. सकाळी सूर्यनमस्कार, कुस्ती, मल्लखांब वगैरे व्यायाम व संध्याकाळी हुतूतू वगैरे खेळ नियमित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांची प्रकृती सुदृढ राहात असे.

धार्मिक व नैतिक : धार्मिक शिक्षणात वेदपठण व गीता वगैरे धर्मग्रंथांवर पाठ अगर व्याख्याने आठवड्यातून दोन अगर तीन वेळा होत असत. सामाजिक सेवेत स्वदेशीव्रताला च प्राधान्य दिले जाई. शक्य तर आपणांस लागणाऱ्या वस्तू (महाग मिळाल्या तरी) स्वदेशीच घ्यावयाच्या असा नियम असे. वसंत व्याख्यानमालेच्या वेळी अगर अशाच सार्वजनिक कामात विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून भाग घेत असत.

एप्रिल व मे महिन्यांत साधारण दीड महिना सुटी असे. त्या वेळी विद्यार्थीगृहाच्या लायब्ररीतील पुस्तकांचे वाचन पाच अगर सहा तास दररोज नियमाने करावे लागे. थोर पुढाऱ्यांची चरित्रे, धार्मिक ग्रंथ, निवडक कथा-कादंबऱ्या वगैरे ग्रंथांचे वाचन या सुटीत चांगले होई. याच सुटीच्या दिवसांत पुण्याच्या आसपासच्या सर्व प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याकरता सहली निघत असत. अशाच सहलीत मी अनेक स्थळे पाहिली.

संगीतकला संगीत, पेटी, तबलावादन, वगैरे शिक्षण आठवड्यातून दोन वेळा मिळत असे. 'विद्यार्थी' मासिक चालविण्यात येत असे. माझे लेख एक अगर दोन वेळा प्रसिद्ध झाले होते. गणपती-उत्सवाप्रीत्यर्थ आमचा मेळा दोन-तीन वर्षे चालू होता.

मित्रत्वाचे संबंध आयुष्याची दोन-चार वर्षेच का होईना पण वरीलप्रमाणे सर्वांगीण व सुसंस्कारी शिक्षण मिळाल्यामुळे आजपर्यंतच्या सुमारे ४० वर्षांत मला, माझे आता कसे होईल असे कोणत्याही कठीण प्रसंगी वाटले नाही.

संस्था सोडल्यानंतरही गुरु. अण्णांचे व माझे संबंध मित्रत्वाचे राहिले आहेत. गुरु. अण्णांची केव्हाही गाठ घ्यावी व सल्लामसलत विचारावी. मोठ्या बंधुत्वाच्या नात्याने त्यांनी मला योग्य तोच सल्ला दिला आहे. गुरु. अण्णांच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढतच गेला व त्यांची समाजातील प्रतिष्ठा अविरत व ध्येयनिष्ठ कार्यामुळे सतत वाढली; परंतु त्यांनी एकदा ज्याला आपले म्हटले त्याकडे त्यांनी कधीच पाठ फिरविली नाही. त्यांनी आम्हां सर्व शिष्य-गणांस आईच्या प्रेमाने वागविले आहे व वडिलांच्या प्रेमाने कर्तव्यपालन योग्य रीतीने करण्यास शिकविले आहे. त्यांच्या ध्येयवादाने प्रेरित व मायेच्या प्रेमाखाली चाललेली अनाथ विद्यार्थी गृह ही आदर्श शिक्षण-संस्था आहे. अशा शिक्षण-संस्था अनाथ मुलांकरताच असाव्या असे माझे म्हणणे नाही. सनाथ मुलांकरताही अशा प्रकारचे सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या संस्थांची जरुरी आहे.



४. शिस्तीचा आदर्श

श्री. का. नी. जोशी
व्यवसाय : शिशुशिक्षण-तज्ज्ञ अध्यापक
शिक्षणकाल १९२१ ते १९२२
मुलांचे अत्यंत आवडते, यशस्वी व प्रयोगशील
सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक

अपवाद करून प्रवेश माझी चाचणी झाली. तोंडी चौकशी झाली. पण त्या इयत्तेच्या मानाने मी वयाने खूपच मोठा असल्यामुळे प्रवेशाबद्दल चालकांत मतैक्य होईना. तेव्हा अण्णांनी विनूभाऊंशी काही विचारविनिमय करून चालकांशीही चर्चा केली तेव्हा मला दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला. गुरु. अण्णांनी त्या दोन दिवसांत काही खटपट केली नसती तर माझे शिक्षण आणि पुण्यातील वास्तव्य तेथेच संपणार होते.

सहनशीलतेचा घडा एकदा मार्च-एप्रिलच्या सुमारास दुपारी जादा तास घेण्याकरिता आम्ही एका खोलीत बसलो. त्या खोलीवरील पत्रे आमच्या डोक्याच्या वर जेमतेम फूट दीड फूट असतील. उन्हाळा म्हणत होता मी. उकाडा काही विचारू नका. पण अण्णांनी सदरा, कोट, टोपी, सर्व कपडे व्यवस्थित घालून तास घेतला. आमच्याप्रमाणे त्यांच्याही अंगातून घामाच्या धारा टपकत होत्या; पण खिशाकडे हात नाही, रुमालाने दहा वेळ तोंड टिपणे नाही, हश्श नाही, हुश्श नाही. सर्व तास गंभीरपणे घेतल्यानंतर ते त्यांच्या ऑफिस नावाच्या खोलीत गेले, कपडे उतरले आणि चौकात येऊन त्यांनी त्यांचा खादीचा अंडरवेअर अक्षरशः पिळून उन्हात वाळत घातला. अ. वि. गृहातील वागणूक घरासारखी असताही शिस्तीचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे ह्याशिवाय कसा राहणार ?

प्रवृत्तीला वळण असाच एकदा दुपारच्या वेळी भूगोलाचा तास घेत असता, अण्णांनी मला ऑफिसातून नकाशा आणावयास सांगितला. काम संपल्यावर तो परत नेत असता, तो मी लाठीप्रमाणे या हातातून त्या हातात, डोक्यावरून, अंगाभोवती फिरवीत जात होतो. अण्णांनी ते पाहिले; लागलीच मला जवळ बोलावून विचारले, "तुला लाठीचे हात शिकायचे आहेत काय? ठीक आहे." आणि जवळून जात असलेल्या एका मुलास सांगितले, "याला लाठीचे चार हात शिकीव. मी पुढच्या गुरुवारी सायंकाळी ६ वाजता पाहीन." पुढे त्या मुलाने मधल्या घराच्या खिडकीजवळ मला लाठीचे चार हात मोठ्या कसोशीने शिकविले, आणि ते ठरल्या दिवशी अण्णांनी पाहिलेही.

५. गजाभाऊ, गुरुवर्य अण्णा व डॉ. खैर

श्री. दे. शं. लुकतुके, एम्. एस्सी., बी. टी.

व्यवसाय : सेवक, पुणे अ. वि. गृह

शिक्षणकाल १९२१ ते १९३७

यांत्रिक व औद्योगिक विभागाचे व्यवस्थापक, विज्ञानशिक्षक, आंतर-राष्ट्रीय व आंतर-प्रांतीय विभाग-संचालक

राष्ट्रीय वृत्तीची आचारसंहिता राष्ट्रीय वृत्तीची जोपासना हे विद्यालय शिक्षणाचे एक प्रमुख अंग होते. त्यासाठी भाषाविषयाची क्रमिक पुस्तके विशेष कटाक्षाने निवडलेली असत. चार वर्षांत चिपळूणकरांची निबंधमाला, माडखोलकरांचे कविपंचक, रे. टिळकांची कविता अशा तऱ्हेच्या पुस्तकांचा व्यापक अभ्यास आम्ही केला. ग्रंथपरीक्षण व टीकात्मक लेखन यांवरही भर दिला जात असे, आणि विद्यार्थी ते करीत. शिक्षकही त्या दृष्टीने मुलांकडून वाचन-लेखन करवून घेत. विशेष निबंधांसाठी स्वतःच्या पैशाने बक्षिसे देत. श्री. कुलकर्णी नावाच्या एका शिक्षकांनी 'चिपळूणकरांची निबंधमाला' हे बक्षिस मराठीतील प्राविण्यावद्दल ठेवले होते व ते मला मिळाले होते.

परदेशी साखर न खाणे, परदेशी वस्तू न वापरणे, या त्या वेळच्या आचार संहितेमधील दोन प्रमुख गोष्टी होत्या. हॉटेलमध्ये खाणे त्याज्य मानले जाई, आणि चहा न पिणे हे राष्ट्रभक्तीचे लक्षण होते. गणेशोत्सवात मेळ्याच्या रूपाने राष्ट्रीय भावना चेतविण्याचे काम विद्यार्थी करीत. स्वदेशी कागदावर छापलेली डायरी व दिनदर्शिका विकणे हा कार्यक्रम देशकार्य आणि विक्रेत्याचे प्रात्यक्षिक शिक्षण अशा जोड हेतूने अमलात येत होता. या विषयात मला कधीच गोडी वाटली नाही.

शिक्षणातील नवीन प्रयोग व कल्पना व्यायामाचे निरनिराळे प्रकार, नमस्कार, आसने, लष्करी कवाईत, देशी खेळ या बाबतींतही सर्व शिक्षकांचे विशेषतः गुरुवर्य अण्णांचे विशेष लक्ष असे. स्वतःच्या प्रकृतीस्वास्थ्यासाठी ते निरनिराळे व्यायाम घेत असत व त्यांची माहिती ते मुलांना देत असत. त्यासाठी त्यांनी मॅकफेडनच्या ज्ञानकोशाचा अभ्यास केला होता.

त्या वेळी संस्थेत वीज नव्हती आणि मॅजिक लँटर्नच्या साहाय्याने मुलांना चित्रे दाखवावयाची होती. गुरुवर्य अण्णांनी आरशाच्या साहाय्याने सूर्याचे किरण घेऊन चित्रे दाखविण्याचा उपक्रम केला होता.

मुलांचे नैतिक आचरण शुद्ध असावे व ती शीलवान बनावी म्हणून निरनिराळ्या मार्गांनी प्रयत्न केले जात. धार्मिक शिक्षण हा त्यातला एक भाग होता. गीतेचा अर्थ सांगण्यासाठी केसरीचे संपादक कै. ज. स. करंदीकर येत असत.

प्रचलित राजकारणाची माहिती मुलांना व्हावी म्हणून 'केसरी'चे दुसरे एक सपादक कै. दा. वि. ऊर्फ बाबूराव गोखले यांची भाषणे होत असत.

पण या कार्यक्रमाचा त्यावेळच्या विद्यार्थ्यांना किती फायदा झाला? थंडीमुळे आंघोळीची टाळाटाळ, अपुऱ्या झोपेमुळे कार्यक्रमात चुकारपणा, सर्वच विषयांत सारखी गोडी नसल्यामुळे काही कार्यक्रमांच्या वेळी दुर्लक्ष, असे प्रकार जरूर होत असत. पण एकंदरीत आत्मसंयमनाच्या दृष्टीने फायदा झाला. व्यापक विचारसरणी व सर्वकष आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने या सर्व कार्यक्रमांचा उपयोग मला तरी फार झाला.

व्यायामपटूंना दूध संस्थेबद्दल अधिक जिव्हाळा वाटण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे चालकांची आस्था. आम्ही रोज ५०० नमस्कार घालणारे काही विद्यार्थी होतो. त्यांना स्वतंत्र रीतीने रात्री दूध दिले जात असे. त्यासाठी गुरुपत्नी घरच्याप्रमाणे आस्थापूर्वक कष्ट घेत असत. गुरुवर्य दादा, गुरुवर्य अण्णा व गुरुवर्य मामा यांच्या दोन खोल्यांच्या एकत्र कुटुंबाच्या घरकुलात ही जी आमची व्यवस्था होत होती तिचा विशेष परिणाम झाला.

तसेच गुरुवर्य अण्णा इंग्रजी, संस्कृत या विषयांत वैयक्तिक काम देऊन ते तपासणे व मार्गदर्शन करणे हे पाहात. त्याचाही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही.

त्यावेळचे गजाभाऊ विद्यार्थीदशेत मी जरी अण्णांचा विशेष आवडता विद्यार्थी नसलो तरी माझ्याबद्दल त्यांनी खूप मोठ्या आशा मनात बाळगलेल्या होत्या. मला त्यांचा एक शेरा अजून आठवतो. "Talent without hard work is of no use." दीर्घ प्रयत्नांच्या अभावी मी माझ्या बुद्धिमत्तेचा संपूर्ण उपयोग करून घेऊ शकलो नाही.

उसळते रक्त, गरिबांसाठी कष्ट करण्याचा ध्येयवाद आणि २०-२५ वर्षांपलीकडील कालात जाऊन पोचणारी दूरदृष्टी हे अण्णांचे विशेष म्हणून सांगता येतील. स्वत: अत्यंत तळमळीने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी झटत असताना आपल्या कष्टांचे चीज विद्यार्थ्यांकडून झाले नाही तर किती निराशा होते व त्या निराशेच्या पोटी कसा राग येतो, याची जाणीव बहुतेक प्रत्येकास असतेच. "गजाभाऊं"च्या अवस्थेत अण्णांचे स्वरूप डोंगरमाथ्यावरून उतारावर धडधड उड्या घेत वेगाने येणाऱ्या व वाटेत आलेल्यांची ससेहोलपट करणाऱ्या जलौघासारखे होते. मी जे सांगतो ते मुलाच्या कल्याणाचे आहे व ते करणे त्याचे कर्तव्य आहे, ते त्याने केलेच पाहिजे अशी आग्रही वृत्ती त्यांची असे. नैतिक वर्तन, शिस्तपालन, अभ्यासू वृत्ती हे गुण जेथे दिसतील तेथे ते अतिशय प्रेमळ असत. पण या बाबतीत थोडीशीही शिथिलता आली की ते अतिशय कठोर होत.

अण्णांच्या कठोरपणाचा अनुभव प्रत्यक्ष मला फारसा अनुभवावयास मिळाला नाही आणि मला आश्चर्य असे वाटते की, त्यांचा अपेक्षाभंग माझ्या हातून झाला असताही तो त्यांनी कसा सहन केला!

पंतोजीचे मित्रात रूपांतर १९३१ सालानंतर अण्णा पूर्वीचे गजाभाऊ राहिले नाहीत. त्यांचे अण्णात रूपांतर झाले. अमेरिकेहून आल्यानंतर तर त्यांच्या स्वभावात विशेष फरक झाला. त्यांच्यातील पंतोजीचे मित्रात रूपान्तर झाले. आणि मला वाटते, अण्णांच्याबद्दल नितान्त श्रद्धा, आदर व आपुलकी ही १९३१ ते १९५० पर्यंतच्या त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये जितकी आढळते तितकी ती त्या कालापूर्वीच्या व नंतरच्या विद्यार्थ्यांत आढळत नाही. या काळातील अण्णांचे जीवन नदीच्या मधल्या भागासारखे धीरगंभीर व भोवतालची जमीन सुपीक करणारे असे आहे. तसेच ते त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व व महत्त्व वाढविणारे आहे.

या मधल्या काळात मी अण्णांच्या प्रत्यक्ष निकट सहवासात नव्हतो. पण १९५७ साली पुन्हा त्यांच्या संनिध आलो, त्या वेळी ते अ. वि. गृहाचे फारसे राहिले नव्हते. त्यांचा जीवनप्रवाह समाजसागराशी एकजीव होऊ लागला होता. प्रवाहाला अनेक फाटे फुटले होते व निरनिराळचा मार्गांनी समाजजीवनाशी ते एकरूप होत होते. साहजिकच संस्थेतील व त्यांचे लाडके अपत्य जे महाराष्ट्र विद्यालय, त्यातील विद्यार्थ्यांशी त्यांचा संबंध कमी येऊ लागला.

संस्कारांचा परिणाम आपल्या सबंध जीवनात अण्णांनी गरीब विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शक्य ती सर्व साधने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचे कंकणच हाती बांधले होते. विद्यार्थी पुस्तकातला किडा न व्हावा म्हणून, इतर विविध तऱ्हेच्या शिक्षणक्रमांची सोय त्यांनी विद्यालयात व आश्रमात केली. धार्मिक शिक्षण, नैतिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, समाजात धीटपणाने वावरता यावे या दृष्टीने डायरी-कॅलेंडर विक्रीच्या रूपाने व्यापारी शिक्षण, औद्योगिक शिक्षण असे सर्व पैलू त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीला पाडले होते. संगीत शिक्षणासाठीदेखील एक स्वतंत्र वर्ग चालविला होता.

त्यांनी देऊ केलेल्या या संस्कारांचा स्वतंत्र परिणाम काय झाला त्याचे मूल्यमापन त्या त्या व्यक्तीलाच करता येईल. पण या सर्व प्रयत्नांचा संकलित परिणाम असा झाला की, महाराष्ट्र विद्यालयातील वातावरण काही तरी विशेष आहे, याची जाणीव सर्वांना होत असे. हा सर्व ध्येयवाद प्रारंभीच्या काळात त्यांनी इतक्या शक्तीने खेचला की त्या प्रवाहात सापडलेले दगडधोंडे इतस्ततः विखुरले गेले. पण ते ज्या ठिकाणी पडले, तेथे त्यांनी अण्णांच्यापासून घेतलेल्या शक्तीचा उपयोग चांगल्या तऱ्हेने चालविला आहे. अण्णांनी आपल्या कार्याने विस्तृत केलेल्या या ज्ञानगंगेच्या सुपीक खोऱ्यात अनेक जीव सुखी जीवनाचा अनुभव घेत आहेत. आज अण्णांची जीवनगंगा अनेक धारांनी समाजसागराला मिळून त्रिभुज प्रदेश निर्माण करीत आहे व त्या भागातही सुखी आणि संपन्न जीवनाचा प्रसार होत आहे. या भागात अण्णा डॉ. खैर या नावाने प्रसिद्ध आहेत. तेव्हा हा खैर प्रदेश म्हणता येईल.

□ □ □

६. विलोभनीय चित्र

श्री. सि. ग. दाते
व्यवसाय : लेखनिक, अकौन्टस् खाते, पश्चिम रेल्वे
शिक्षणकाल १९२२ ते १९२४
संस्थेशी व गुरुजनांशी सतत प्रेमाचे संबंध ठेवणारे माजी विद्यार्थी

माजी विद्यार्थी-संघटक अण्णा मे १९२२ साली मला संस्थेत प्रवेश मिळाला. अ. वि. गृह आश्रमात विद्यार्जनाबरोबरच दिनचर्येतील सांघिक शिस्तपालन व सुसंस्कार यांची सर्व दृष्टीने वाढ झाली. गरिबी व अकाली पोरकेपणा प्राप्त झालेल्या मुलांच्या जीवनावर प्रासंगिक लाचारीची व अगतिकपणामुळे नैराश्यवृत्तीची सदैव उदास छाया असते; वात्सल्य हरपल्यामुळे मन खट्टू होते; असे वैराण जीवन निर्लज्जपणे जगण्यापेक्षा जीवनातून कायमचे निवृत्त व्हावे असे आत्मघातकी विचार मनात डोकावतात. पण असे अमंगल विचार मनातून घालवून स्वावलंबन, सदाचार व सद्गुणांच्या बळावर स्वाभिमान रक्षण करून, दैवी व मानवी शक्तींकडून मिळालेल्या मदतीचा सुयोग्य उपयोग करून आत्मविकास कसा करावा हे शास्त्र व इतर अनेक चांगल्या गोष्टी मी संस्थेत शिकलो. जातिनिरपेक्ष बंधुभाव निर्माण झाला. जीवनाविषयी व्यापक प्रमाणात कुतूहल निर्माण झाले. एकंदर वातावरण पोषक व अनुकूल असल्यामुळे आशावादित्वाला नवीन अंकुर फुटले. पराक्रमी जीवन जगण्याची जिद्द निर्माण झाली. बुद्धीची झेप वाढली. असहाय्यता व दुर्बळता लोप पावली. आत्मविश्वास वाढला. १९२२–२४ दोन वर्षे संस्थेचा लाभ झाला. या कालात गुरुदेव डॉ. रवींद्रनाथ टागोर व स्वामी श्रद्धानंदजी या जगन्मान्य थोर विभूतींनी आश्रमाला भेट दिल्यामुळे त्यांचे जवळून दर्शन घडले. आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

गुरु. अण्णा या काळात एम्. ए. चे विद्यार्थी असल्याने अभ्यासाचे गडबडीत होते. त्या दोन वर्षांतील तपशीलाच्या आठवणी आता बऱ्याच पुसट झाल्या असल्या तरी अण्णांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा अजूनही माझ्या मनावर ताजा आहे. काही विद्यार्थ्यांस शिस्तभंगाबद्दल अण्णांनी कडक शारीरिक शिक्षा केल्याचे आठवते. पण अशा प्रसंगी अण्णांच्या अंतःकरणात होणारी कालवाकालव त्यांच्या चर्येवर दिसत असे. आश्रमात उच्च संस्कारांची जडणघडण होऊन बाहेर पडणारे आपले विद्यार्थी भावी आयुष्यात मुशीतून काढलेल्या बावन्नकशी सोन्याप्रमाणे निर्दोषपणे चमकावेत, त्यांच्या गुणांचे जगात चीज व्हावे, त्यांचा सदैव उत्कर्ष व्हावा हीच अण्णांच्या अंतरीची त्यावेळची तळमळ, अजूनही ते भेटतात तेव्हा प्रत्येक वेळी जाणवते. गेल्या दहा वर्षांत अण्णांच्या व माझ्या प्रासंगिक गाठीभेटी झाल्या. प्रत्येक वेळी त्यांनी आपुलकीने कौटुंबिक विचारपूस केली. त्यांची भाषा मित्रत्वाची व प्रोत्साहनपर असते. गुरु. अण्णांचे

प्रोत्साहनामुळेच हल्ली जागोजाग माजी विद्यार्थ्यांचे संघ निर्माण झाले असून सर्व संघांचे अण्णा केंद्रबिंदू आहेत. संघांचे प्रासंगिक कार्यक्रमास ते जातीने उपस्थित राहून मार्गदर्शन करून, आशीर्वाद देतात. या नवीन उपक्रमामुळे माजी विद्यार्थ्यांचा परस्पर परिचय वाढत असून तो अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरत आहे. गतायुष्यांत गरिबीच्या समान भूमिकेत हाल-अपेष्टा भोगून एकत्र वाढलेले कित्येक माजी विद्यार्थी आपला शिक्षणक्रम यशस्वी रीतीने पुरा करून आज जीवनाच्या विविध क्षेत्रांत भीमपराक्रम गाजवून आपल्या कुटुंबीयांसमवेत प्रतिष्ठेने जीवन फुलवीत आहेत. आनंद व समाधान या भावनांनी ओसंडून जाणारे अंतःकरण एकमेकांजवळ खुले करीत आहेत. याच वेळी व्यक्तीविषयक कौटुंबिक अडीअडचणी व त्यांतून सोडवणूक यांचेही रसभरित वर्णन होत आहे. असे हे विलोभनीय चित्र आहे.

□ □ □

७. पूर्वपुण्याईची गोष्टच !

श्री. **ग. व. जोशी**, डी. इ. इ, इले. इंजीनिअर

व्यवसाय : पॉप्युलर (इम्पोर्ट-एक्स्पोर्ट) ट्रेडिंग कं. फोर्ट मुंबई १

शिक्षणकाल १९२२ ते १९२७

नोकरी करून स्वतंत्र व्यवसायही करतात

श्री. गुरुवर्य अण्णांच्या बाबतीत थोडक्यात लिहावयाचे म्हणजे आम्हां सर्व विद्यार्थ्यांस ते पितृस्थानीच आहेत असे वाटते. आपणास काहीतरी ध्येय आहे, शिस्त आहे व त्याप्रमाणे कटिकोरपणे वागले पाहिजे, हा त्यांचा पहिल्यापासूनचा कटाक्ष असे. लहानपणी मला त्यांच्या या कडक शिस्तीचा काही काही वेळा फार राग येत असे; परन्तु आज एकंदर जगातील व त्यातल्या त्यात विद्यार्थी-जगातील बेशिस्तीचे प्रकार पाहून असे वाटते की इतकी कडक शिस्त असेल तरच मुलांच्या मनावर संस्कार दृढ होत जातात व खऱ्या आयुष्याचा पाया मजबूत बांधण्यास त्याची फार जरुरी असते.

गुरु. अण्णांना खोटे बोलण्याचा अत्यंत तिटकारा असे, व त्याबद्दल सात्त्विक संतापही येत असे. त्यामुळे प्रसंगानुसार खोटे बोलणे ह्या गुन्ह्याबद्दल विद्यार्थ्यांना कडक शिक्षाही झाल्याशिवाय राहात नसे.

त्या वेळेचा एम्. ए. चा विद्यार्थी आम्ही ज्या वेळी इंग्रजी पहिलीत अगर दुसरीत होतो, त्यावेळी गुरु. अण्णा हे बी. ए. पास होऊन एम्. ए. च्या टर्मस् भरीत होते. परन्तु एम्. ए. च्या वर्गात असताना सुद्धा ते साध्या दोन ड्रीलच्या जाड्या शर्टावरच राहात असत. त्यांच्या साधेपणाबद्दल आजही कौतुकच करावेसे वाटते. त्या वेळच्या वातावरणात गुरु. अण्णा एखाद्या तपस्व्याप्रमाणे भासत असत.

आम्हांला छडचा—स्वतःला लंघन शिस्त राखण्याबद्दल आजही त्यांचा पूर्ण कटाक्ष आहे. मला पूर्ण आठवते. काही एका लहानशा गुन्ह्याबद्दल सर्व मुलांची सभा

बोलाविली गेली व गुन्हा कोणी केला म्हणून प्रत्येकास विचारण्यात आले. पण कोणीच कबूल होईना. तेव्हा कडक शिस्त म्हणून त्यांनी प्रत्येकास हात पुढे करावयास सांगून दोन दोन छडचा सामुदायिक शिक्षा म्हणून जोरजोराने हातावर लगावल्या व स्वतःही त्या दिवशी चोवीस तास संपूर्ण लंघन केले.

आजही आमचा आदर्श अत्यंत साधी राहणी, शांत पण विचारी गंभीर स्वभाव, तपस्वी जीवन, आपला हेका न सोडता दुसऱ्याचीही विचारसरणी शांतपणे ऐकून घेऊन स्वतःचा यत्किंचितही बडेजाव न दाखविता दुसऱ्यांना हाती घेऊन कार्य करण्याची हातोटी, नियमित राहाणी, तनूने, मनाने, इतकेच काय पण धनाने सुद्धा कार्याला वाहून घेण्याची सेवावृत्ती, हे सर्व पाहिल्यावर वाटते की आज आमच्या पुढील हा आदर्श, आम्हांस दिलेले शिक्षण, त्यांचा सहवास व मार्गदर्शन ही केवळ आमच्या पूर्वपुण्याईचीच गोष्ट म्हटली पाहिजे.

□ □ □

८. माझ्या शिक्षणातील शिस्त, शील व संस्कार

श्री. शं. ब. सुखटणकर, बी. ए., बी. टी., एल्एल्.बी.
डिप्. एड्. (एडिंबरो)
व्यवसाय : आजीव सेवक, रयत शिक्षण संस्था
शिक्षणकाल १९२२ ते १९३०
म. राज्य 'आदर्श शिक्षक पारितोषिका'चे मानकरी

आश्रमीय जीवनातील संस्कार सुदैवाने मला अनाथ विद्यार्थी गृहात प्रवेश मिळाला. सन १९२२ सालची ही गोष्ट. त्यावेळी कसबा पेठेत आश्रम होता. संस्थेचे महाराष्ट्र विद्यालय सुरू होऊन एकच वर्ष झाले होते व ते सरकारमान्यही नव्हते. पण चालकांनी ते मुलांना राष्ट्रीय शिक्षण मिळावे व त्यांच्यावर नैतिक व शीलसंवर्धक संस्कार व्हावेत म्हणून सुरू केलेले होते. गुरु. दादा, गुरु. अण्णा, गुरु. मामा हे आश्रमातच राहात असत. ते आमचे शिक्षक होते व वसतिगृहाचे कामही तेच पहात असत. आम्ही सर्व विद्यार्थी पण तेथेच राहात होतो. त्यामुळे आमचा त्यांचा चोवीस तास संबंध येत असे. तेच आमचे शिक्षक व तेच आमचे पालक होते. नवीन दाखल झालेले विद्यार्थी सुरुवातीला बिचकत असत व खेड्यांतून आल्यामुळे बुचकळ्यासारखे होत असत. पण गुरु. दादा वडिलांच्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला धीर देत असत. उपदेशाच्या दोन गोष्टी सांगत असत. गुरु. अण्णा वडील भावाप्रमाणे वाटत असत. असे जरी असले तरी त्यावेळची शिस्त मोठी कडक वाटावयाची. गुरु. दादा खरोखरीच वडिलांच्याप्रमाणे वाटावयाचे. तसा त्यांचा व आमचा संबंध फार थोडा येत असे. ते बाहेरच्या गोष्टी पाहात असत. खरा संबंध आमचा व गुरु. अण्णांचा येत असे. त्यावेळी ते एम्. ए. चा

अभ्यास करीत होते. आम्हाला इंग्लिश, मराठी हे विषय शिकवीत असत व वसतिगृहाची व्यवस्थाही तेच पाहात असत. अण्णांची शिस्त मोठी कडक असे. कामाची पद्धतही वैशिष्ट्यपूर्ण असे. ते स्वतः पहाटे लवकर उठत असतच. पण सर्व मुलेही पहाटे पाच वाजता उठतात की नाही, सकाळच्या प्रार्थनेला सर्वजण हजर राहातात की नाही, प्रार्थनेनंतर पुन्हा कोण झोपतो की काय हे स्वतः हिंडून पाहात असत. हातात वेताची लांब छडी घेतलेली, अंगात नुसता सदरा व धोतर नेसलेली, आमच्या हॉलमधून हिंडत असलेली अण्णांची मूर्ती अद्यापि समोर दिसते. जे विद्यार्थी झोपले असतील त्यांच्या पायावर सपासप छड्या ओढीत असत. अण्णा आले अशी आम्हाला चाहूल लागली की, कोण आमची धांदल उडत असे. पुष्कळांना अण्णांचा हा प्रसाद भल्या पहाटेसही मिळत असे. मलाही तो मिळालेला आहे. ऐन थंडीचे दिवस असले तरी अण्णांचा हा प्रसाद मिळत असे. त्यामुळे कोण हा त्रास, नको हे शिक्षण, असे वाटल्यावाचून राहात नसे. पहाटे पाच वाजता उठणे हा जसा नियम होता, तसा दुसरा एक नियम होता. तो म्हणजे उन्हाळ्याचे दिवस असोत, पावसाळ्याचे दिवस असोत, ऐन थंडीचे दिवस असोत, सर्वांनी सकाळी ६ वाजण्याचे आत आंघोळ आटोपलीच पाहिजे व व्यायाम केलाच पाहिजे. विद्यार्थ्यांना हे दोन नियम त्रासदायक वाटत असत. पण त्याला काही इलाज नसे. आमचे विद्यालय सकाळी ६।।। ला सुरू होत असे. थंडीच्या दिवसांत तर दिवे लावून विद्यालयाचे काम चालत असे. सर्व कामे घड्याळाप्रमाणे वेळच्या वेळी चालत असत. अशी सात वर्षे मी आश्रमात काढली. याचा परिणाम माझ्यावर खूप झालेला आहे, असे मी पाहातो. मुलांच्या तारुण्यावस्थेच्या कालात झालेल्या संस्कारांचे खोलवर परिणाम होत असतात. बोले तैसा चाले, किंवा आधी केले मग सांगितले, याचा आदर्श गुरु. अण्णांच्या रूपाने आमच्यापुढे होता. लवकर उठणे, लवकर आंघोळ करणे या ज्या सवयी त्यावेळेपासून लागलेल्या आहेत त्या अद्यापि मला चिकटून आहेत. वेळच्या वेळी व शिस्तबद्ध काम करण्याची सवयही मला त्यामुळेच लागलेली आहे असे मला वाटते.

वाचन व लेखनाची सवय आणखी एका विशेष संस्काराचा मला उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. तो संस्कार म्हणजे वाचन व लेखन यांचा. मला जी काही थोडीबहुत वाचनाची व लेखनाची सवय आहे त्याचे मूळ गुरु. अण्णांनी महाराष्ट्र विद्यालयात केलेल्या संस्कारांत आहे. आम्ही महाराष्ट्र विद्यालयात असताना अण्णा आमच्याकडून पुष्कळ कविता, आख्यानेच्या आख्याने पाठ करून घेत असत. शिवाय दरमहा दोन किंवा तीन पुस्तके वाचावयास लावीत असत. ते नुसते वाचन नव्हे, तर जे पुस्तक वाचले असेल त्याचा सारांश पुस्तकाच्या एक तृतीयांशाएवढा एका वहीत लिहावयास लावीत असत. त्यामुळे कसे लिहावे याचा धडा मिळत असे. शिवाय दरवर्षी आपण निवडलेल्या एकाद्या विषयावर प्रबंध लिहावयास लावीत असत. महाराष्ट्र विद्यालयात हल्ली असे विद्यार्थ्यांनी लिहिलेले अनेक प्रबंध पाहावयास मिळतात. या प्रबंधामुळेच मला पुढे लिहिण्याची सवय लागली व

मी काही पुस्तके लिहू शकलो. एखादे पुस्तक लिहावयाचे म्हणजे किती वाचावे लागते, कसे वाचावे लागते व जे वाचले असेल ते आत्मसात करून लोकांपुढे कसे मांडावे याचे प्रात्यक्षिकच त्यावेळी गुरु. अण्णांनी महाराष्ट्र विद्यालयात आमच्याकडून करून घेतले असे म्हणायास हरकत नाही. यामुळेच मला वाटते महाराष्ट्र विद्यालयातून बाहेर पडलेले पुष्कळ विद्यार्थी पुढे चांगले लेखक बनलेले आहेत.

स्वदेशाभिमान व समाजसेवेचे बाळकडू महाराष्ट्र विद्यालय राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या दृष्टीने सुरू केले होते हे वर सांगितलेच आहे. आम्हांला निरनिराळ्या इयत्तांतून जी क्रमिक पुस्तके नेमलेली होती ती काही सरकारने शाळांसाठी मंजूर केलेली पुस्तके नव्हती. आमचे विद्यालय सरकारमान्य नव्हतेच. त्यामुळे सरकारने मंजूर केलेली पुस्तके नेमण्याचा प्रश्नच नव्हता. इंग्रजी किंवा मराठी विषयासाठी चांगली निवडक पुस्तके नेमलेली होती. मला त्या वेळची काही पुस्तके अद्याप आठवतात. मराठीसाठी एका इयत्तेत आम्हाला श्री. ल. ब. भोपटकर यांचे "नवरत्नांचा हार" हे राष्ट्राभिमान उत्पन्न करणारे शिवाजीमहाराजांच्या वीरांची चित्तथरारक माहिती देणारे पुस्तक होते. परशुरामपंत गोडबोल्यांच्या नवनीतातील काही निवडक आख्याने अभ्यासासाठी होती. एका इयत्तेत इंग्रजीसाठी पायोनिअर्स ऑफ सायन्स अँड इन्व्हेनशन हे मानवजातीची सेवा करणाऱ्या शास्त्रज्ञांची माहिती देणारे पुस्तक होते. एका इयत्तेत संस्कृतसाठी रघुवंशातील काही सर्ग नेमलेले होते. एकंदर अभ्यासक्रमच असा होता की, त्यामुळे मुलांमध्ये मानवतेची व राष्ट्राची सेवा त्यागपूर्वक करता यावी अशी वृत्ती निर्माण व्हावी. प्रत्यक्ष शिकवणारे तसे वागणारे होते. त्यावेळी ब्रिटिशांचे राज्य होते व त्यातून मुक्तता करून घेण्याचे प्रयत्न आपल्या लोकांचे चाललेले होते त्यामुळे सरकारी नोकरी करणे राष्ट्रद्रोह आहे अशी एक प्रकारची शिकवणच मिळत असे. मला आठवते की अण्णा अमेरिकेहून पीएच्. डी. होऊन आलेले होते व त्यांना एका सरकारी कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून मोठ्या पगारावर नेमणूक होण्याची शक्यता होती. पण अण्णांनी ती स्वीकारली नाही. त्यांनी लहानशा महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम करण्याचे ठरविले. हा त्यांचा मोठा त्याग होता. त्याचा माझ्यासारख्या विद्यार्थ्यांवर निश्चितच परिणाम झाला. मीही त्यावेळी मनाशी ठरविले की आपणही सरकारी नोकरी करावयाची नाही. अण्णा जसे गोरगरीब विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी गरिबीत राहूनही प्रयत्न करतात तसेच आपण करण्याचा प्रयत्न करीत राहावयाचे. म्हणूनच मला वाटते मी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेकडे ओढला गेलो व मनासारखे काम करण्यास मला येथे मिळाल्यामुळे मी येथे स्थिरावलो. मुलांमध्ये नुसता पोशाखीपणा येऊ नये, त्यांना कष्ट करण्याचीही सवय लागावी म्हणून महाराष्ट्र विद्यालयात एखाद्या धंद्याचे शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती. पुण्यातील निरनिराळ्या उद्योगधंदेवाल्यांची मदत याकरता घेतली जात असे. मी तेथे असताना कंपोझिंग, बुक बाइंडिंग शिकलो. त्या धंद्यात मी पडलो असतो तर त्यातही माझी चांगली प्रगती

झाली असती, कोणी सांगावे ? माझ्याबरोबरचे जे विद्यार्थी इतर धंदे शिकले व ज्यांना पुढचे शालेय शिक्षण घेता आले नाही ते विद्यार्थी तो शिकलेला धंदा पुढे चालवून त्यात चांगला पैसा मिळवीत असल्याचे दिसून येत आहे. आश्रमात कोणीही नोकर नव्हता. झाडलोट करणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे, फ्लशिंगचे संडास साफ करणे या गोष्टी विद्यार्थ्यांना आळीपाळीने कराव्या लागत. त्यामुळे काम करण्यात कमीपणा आहे अशी वृत्तीच मुळी निर्माण होत नसे.

आश्रमात मी सात वर्षे होतो. या काळात आश्रमात व महाराष्ट्र विद्यालयात अण्णांचा व माझा अगदी निकटचा संबंध आला. ते माझे पालकच झाले. या कालात मी त्यांचेपासून शिकलो. त्यांचे माझ्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे अनेक संस्कार झाले. आश्रमाच्या बाहेर पडल्यावरही त्यांचे माझे संबंध कायम राहिलेले आहेत. घरोबा निर्माण झालेला आहे. माझ्या घरी येणे म्हणजे आपल्या मुलाच्या घरी जात आहोत असे त्यांना वाटते. यातच मला खरा आनंद होतो.

तीन अण्णांचे सान्निध्य ज्यांच्या शिक्षणाचा, शिस्तीचा व संस्कारांचा माझ्यावर फार मोठा परिणाम झाला, असे मी माझे तीन गुरू समजतो. या तिघांनाही सर्वजण 'अण्णा' असेच म्हणतात. कालानुसार म्हणावयाचे तर गुरु. अण्णा बाबर, गुरु. अण्णा खैर, व कर्मवीर अण्णा. पण तो काल संपल्याबरोबर त्यांचा संबंध तुटला असे नव्हे, तर तो अधिकाधिक दृढ होत गेला. अद्यापीही मी त्यांच्याकडून शिकतो आहे. माझी अशी समज आहे की आपली कोणावर तरी नितांत श्रद्धा पाहिजे. अशी माझी श्रद्धा या तीन अण्णांच्यावरच आहे. जरुरीनुसार मी त्यांच्याकडे जातो व त्यांचा सल्ला घेतो. निरपेक्षतेने, श्रद्धेने, निष्ठेने लोकसेवा करीत राहावे, असाच या तीन अण्णांचा मला आदेश आहे, असे मला सतत वाटत असते. हा त्यांचा आदर्श मी पाळीत आलो आहे. मीही यांच्या पावलावर पाऊल ठेवून वागण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणूनच मला वाटते मलाही आदर्श शिक्षण सेवा व लोकसेवा केल्याबद्दल गेल्या वर्षी राज्य-पारितोषिक मिळाले आहे. यांपैकी कोणीही पारितोषिक मिळावे म्हणून कामे केलेली नव्हती.

माझ्यावर झालेले संस्कार पाहून मला नेहमी वाटते की शाळा या वसतीगृहयुक्त असावयास पाहिजेत. गुरु-शिष्य संबंध सतत व निकटचे असले पाहिजेत. आदर्श गुरूंचे चांगले संस्कार मुलांवर येथे होत असतात. या दृष्टीने पाहिले तर अनाथ-विद्यार्थी गृह व महाराष्ट्र विद्यालय या संस्था आदर्श आहेत. निवृत्त झाल्यानंतरही गुरु. अण्णा खैर जे संस्थेसाठी काम करतात, त्याचाही आमच्यासारख्या विद्यार्थ्यांवर संस्कार होत राहतो व अंगात शक्ती असेपर्यंत निष्ठेने, निरपेक्षतेने काम करीत राहावे अशी स्फूर्ती मनात उत्पन्न होते. हाही संस्कार का लहान आहे ?

□ □ □

९. यावत् जीवन्ति विद्यया

श्री. पां. र. अंबिके

व्यवसाय : संपादक, महा-राष्ट्र मासिक व मुद्रक

शिक्षणकाल १९२३ ते १९२९

माजी विद्यार्थी संघटना व बृहन्महाराष्ट्र संघटना सहाय्यक

लेखन व वाचन मी १९२३–२८ या कालात आश्रमात होतो. त्यावेळी गुरुवर्य अण्णासाहेब हे आश्रमाची अंतर्व्यवस्था व महाराष्ट्र विद्यालयाचे कामकाज पहात असत. लहानपणापासून माझा कल अभ्यासाकडे नसे. शालेय पुस्तकांव्यतिरिक्त वाचन करणे, लेखन करणे व सार्वजनिक कार्यात लक्ष घालणे, यांतच माझा वेळ जात असे. भाऊसाहेबांची बखर, रघुवंश, नवरत्नांचा हार, नवनीत, हितोपदेश, Getting on इ. पुस्तके वाचण्यातच मला आनंद वाटत असे. तसेच ग्रंथ वाचून त्यांचा सारांश लिहून काढणे, विद्यार्थी मासिकात लेख लिहिणे यातच माझा वेळ जात असे. याही सर्व उपक्रमास गुरु. अण्णांचे मार्गदर्शन व सहाय्य होत असे. निरनिराळ्या विषयांवर विद्यार्थ्यांच्याकडून वर्षातून एखादा प्रबंध लिहून घेण्याची प्रथा गुरु. अण्णांनी त्याच वेळी सुरू केली. मीही काही प्रबंध लिहिलेले आहेत.

चांगले वळण विद्यार्थ्यांना चांगले वळण लागावे म्हणून गुरु. अण्णांनी एक शिस्तबद्ध योजना आखलेली होती. बंधुसेवा, व्यायाम, प्रार्थना, अभ्यास, वाचन, चिंतन वगैरे अनेक विषयांचे पृथक्करण करून, त्यांची विभागणी सहा गटांमध्ये केलेली होती. प्रत्येक गटाला एक गुण दिला जात असे. या गटांतील गुण मिळण्यास त्याची पूर्तता करणे जरूर असे. ती न झाल्यास तो गुण मिळत नसे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात वैगुण्य निर्माण होत असे. हे वैगुण्य प्राप्त न व्हावे म्हणून प्रत्येक विद्यार्थी मनापासून झटत असे. आपापले प्राप्य कर्तव्य करण्याची सवय लागत असे. या सर्वांचा साकल्याने सुपरिणाम दैनंदिन जीवनात झाल्याशिवाय राहात नसे. गुरु. अण्णांच्या या शिक्षणामुळे आश्रमीय जीवनानंतरही या त्यांच्या शिक्षणाचे प्रतिबिंब शेवटपर्यंत पडल्याशिवाय राहात नाही. सारांश, गुरु. अण्णांच्या शिक्षणामुळे अखंड असा माझ्या जीवनात फायदाच झालेला आहे.

१०. चाळीस वर्षांनंतर

श्री. मु. ल. जोशी, बी. एस्सी., एम्. एड्.
व्यवसाय : माजी मुख्याध्यापक,
नूतन मराठी हायर सेकंडरी हायस्कूल, दिल्ली
शिक्षणकाल १९२३ ते १९२८
यशस्वी शिक्षक, मुख्याध्यापक, लेखक आणि वक्ते

दुःखद स्मृतींची खपली चाळीस वर्षांपूर्वीच्या या आठवणींचा शैक्षणिक आणि सामाजिक विचारांच्या दृष्टीने निश्चित उपयोग होऊ शकेल, असे आवाहन आग्रहपूर्वक मिळाल्यामुळेच मी प्रथम काहीसा दुःखद स्मृतींना उजाळा देणारा भाग लिहीत आहे.

शैक्षणिक इतिहासाची दृष्टी आता वयपरत्वे व्यवसाय-निवृत्तीच्या सीमेवर पोचलेल्या मला, माझ्या शालेय जीवनातील अनुभवाबद्दल थोडे निर्लेप बुद्धीने लिहिता येईल अशी खात्री वाटत आहे. आणि म्हणूनच केवळ त्या काळातील शैक्षणिक इतिहासामध्ये अल्पशी भर टाकण्याच्या सामाजिक हितबुद्धीनेच पुढील विवेचन केले आहे.

निष्कारण कष्टमय जीवन त्या काळात करावी लागलेली सर्वच कामे अत्यंत कष्टकारक असत. विद्यार्थीदशेमध्ये अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या स्वावलंबनाच्या कामांचे महत्त्व मी समजू शकतो. परंतु त्या काळातही तज्ज्ञांच्या सल्ल्याने व थोडा अधिक खर्च करणे शक्य असल्यामुळे, वरील कामे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अधिक सुकर करणे शक्य तर होतेच, परंतु संस्थेच्या मूलभूत अशा शैक्षणिक ध्येयाच्या दृष्टीने आवश्यक होते.

काही अन्य अप्रिय स्मृती दिलेला अभ्यास पुरा झाल्यामुळे अभ्यासाच्या वेळामध्ये मी एकदा केसरीकर्ते केळकर यांचेवरील एका राजकीय खटल्याची पुस्तिका वाचण्यात व कोर्टातील उलट तपासणीत दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या केळकरांच्या वादकुशल बुद्धिचापल्यामध्ये रंगून गेलो होतो. त्याबद्दलही मला जबर शिक्षा झाल्याचे स्मरते.

अतज्ज्ञ शिक्षक व अपुरा वेळ महाराष्ट्र विद्यालयाने योजिलेल्या शिक्षणक्रमात भावी परीक्षेचा अभ्यासक्रम, शिक्षकवर्ग, शाळेचा अपुरा वेळ आणि मुख्यतः खेड्यांतील दरिद्री कुटुंबांतून येणारा संस्थेचा विद्यार्थी वर्ग, या वस्तुस्थितीचा अधिक विचार होणे आवश्यक होते. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांचा विचार करून त्यानुसार त्यांना अभ्यासामध्ये मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था हे वसतिगृहीन शिक्षणाचे प्रमुख तत्त्व कुठेच निदर्शनास येत नव्हते.

आमच्या वेळचे फारसे काय पण दहा टक्के विद्यार्थी देखील, पुढील आयुष्यक्रमात त्यांच्या बुद्धिमत्तेच्या वा परिश्रमांच्या मानाने डोळ्यात भरेल असे यश मिळवू शकले नाहीत. शारीरिक व मानसिक दृष्ट्या एक प्रकारचा खुजेपणा वा न्यूनता आम्हा १९२३ ते १९३२ पर्यंतच्या दहा बारा वर्षांतील आश्रमीय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये निर्माण झाली.

वीस वर्षांनी भावबंधन वैयक्तिक दृष्टीने विचार करता १९४८ सालानंतर, म्हणजे संस्था सोडल्यानंतर वीस वर्षांनी माझे आणि गुरु. अण्णांचे संबंध अधिक निकटचे होण्याचा योग आला. कायदेमंडळाच्या किंवा युनिव्हर्सिटी वा अन्य सरकारी कामांच्या निमित्ताने गुरु. अण्णांच्या मुंबईस होणाऱ्या खेपा बऱ्याच वाढल्या. माझ्या निवासस्थानी घरचे वडील बन्धू यावेत, त्यांच्या वैयक्तिक सुखस्वास्थ्याची जोपासना मनापासून करण्यात आम्हां सर्वांना धन्यता वाटावी, आनंद व्हावा, शैक्षणिक, कौटुंबिक वा सामाजिक प्रश्नांवर विचारविनिमय करण्यात तासचे तास मजेने व्यतीत व्हावेत, असे होऊ लागले. गुरु. अण्णांशी कौटुंबिक संबंध वाढीस लागले तसे संस्थेच्या प्रकाशन विभागातर्फे उभयपक्षी हितकारक असे संबंध जोडले गेले.

त्या वेळच्या परिस्थितीमध्ये आम्हांला मिळू शकलेले शालेय शिक्षण जरी बऱ्याच कमी दर्जाचे असले तरी आश्रमीय जीवनामुळे कित्येक गोष्टींचे सुसंस्कार आमच्या मनावर झाले आहेत. आश्रमात असताना निरनिराळ्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या आश्रमास भेटी होत असत. पुण्यात त्यांची व्याख्याने होत, त्यामुळे मनामध्ये व्यापक अशा सामाजिक व राष्ट्रीय भावनेची जोपासना उत्तम प्रकारे केली गेली. सामाजिक जाणीवेचा पाया त्यामुळे माझ्या मनात चांगल्या प्रकारे घातला गेला. त्या काळात दारिद्र्यामुळे अपरिहार्यपणे जडलेली काटकसरीची व स्वावलंबनाची सवय व प्रवृत्ती पुढील आयुष्य यशस्वी होण्याच्या बाबतीत अतिशय उपयुक्त ठरलेली आहे. निर्व्यसनीपणा व कोणतेही काम करण्यात कमीपणा न वाटणे हा संस्कार तर सर्वच आश्रमीय विद्यार्थ्यांमध्ये दीर्घकालावधीनंतरही बहुशः प्रत्ययास येतो; मग त्या विद्यार्थ्याला ऐहिक जीवनात अपेक्षित यश मिळालेले असो वा नसो. आश्रमीय जीवनात जडलेली व्यायाम-खेळांची आवड आणि दैनंदिन जीवनात विचारपूर्वक आखलेला नियमितपणा यामुळे चाळीस वर्षांनंतरही आरोग्यरक्षणासाठी मला फारसे प्रयत्न करावे लागत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. केवळ परीक्षेकरता एखाद्या विषयाचा अभ्यास न करता, व्यापक अवांतर वाचनातून मिळणाऱ्या ज्ञानामुळे प्राप्त होणाऱ्या आनंदामध्येही एक प्रकारचे सुख आहे, स्वतःची उन्नती आहे ही जाणीव कामानंतर मिळणाऱ्या विपुल फावल्या वेळाचा सदुपयोग करण्याचे कामी मला फार उपयोगी झालेली आहे. त्यामुळेच माझे जीवन एकमार्गी, एकांगी न बनता अनेकविध क्षेत्रांमध्ये थोडेफार यशस्वी झालेले आहे. विद्यार्थीदशेमध्ये अनाहूतपणे केल्या गेलेल्या संस्कृत, इंग्लिश, मराठी पाठांतराचा, योग्य वेळी समर्पकपणे उपयोग

केल्यामुळे, अल्प बौद्धिक श्रमांमध्ये श्रोतृसमाजावर यशस्वीपणे स्वतःची छाप पाडण्याचे प्रसंग माझ्या आयुष्यात अगणित वेळा आलेले आहेत. सभाधीटपणा आणि वक्त्याच्या विवेचनातील गुणदोष काळजीपूर्वक जाणून घेण्याची सवय या दोहोंचा उपयोग मला परदेशातील वास्तव्यात फार प्रकर्षाने लक्षात आला. हरएक ग्रंथ संपूर्णपणे वाचण्यात वेळ न घालविता कमीतकमी श्रमांत ग्रंथ-वाचनापासून जास्तीत जास्त फायदा कसा करून घेता येईल, हे मला आश्रमात उपलब्ध होणाऱ्या देशी विदेशी नियतकालिकांच्या व विपुल ग्रंथांच्या वाचनाकरता मिळालेल्या संधीमुळेच शक्य झाले आहे. पुस्तके विकत घेण्याची ऐपत नसल्यामुळे अल्पकाळ उपलब्ध झालेल्या क्रमिक पुस्तकांतील महत्त्वाच्या भागांच्या 'नोट्स' काढून ठेवण्याची सवय तर संस्था सोडल्यानंतरच्या शिक्षणक्रमात मला फार लाभदायक झालेली होती. प्रसंगोपात्त संधी मिळाल्यानंतर परक्या स्थळी गेल्यावर तेथे पाहण्यासारख्या, जाणून घेण्यासारख्या ज्या ज्या गोष्टी असतील, त्या सर्व थोडीफार वैयक्तिक गैरसोय सोसूनही योजनापूर्वक पाहाण्याच्या प्रवृत्तीची जोपासना, आश्रमीय जीवनामध्येच केली गेली. इंग्लंडमधील माझ्या दोन वर्षांच्या वास्तव्यामध्ये लहान-मोठ्या सुट्यांचा उपयोग मला वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी युनिव्हर्सिटयांतील तरुण विद्यार्थ्यांकरता योजिलेल्या युरोपातील सहा देशांच्या अभ्यास-सहली मध्ये (Study tours) प्रयत्नपूर्वक सामील होऊन करता आला. त्यामुळे अल्प खर्चात जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क या देशांतील दुसऱ्या महायुद्धोत्तर जीवन समस्यांचा समक्ष अभ्यास करणे शक्य झाले, ते देश डोळसपणे पाहाता आले. माझ्या बरोबरच्या दुसऱ्या अकरा शिक्षकांपैकी अन्य कोणीही इतका लाभ पदरात पाडून घेऊ शकला नाही, हे लक्षात घेतल्यास माझ्या यशामागच्या मूलभूत प्रेरणेचा उगम आश्रमीय जीवनांत रुजलेल्या ज्ञानाकरता धावपळ (Wander lust) करण्याच्या प्रवृत्तीत आहे असे मी निःसंदिग्धपणे म्हणू शकतो.

माझ्या गुणांचा व यशाचा पाया माझे कौटुंबिक जीवन सर्वच दृष्टींनी बरेचसे यशस्वी आहे. त्यात नशिबापेक्षा प्रयत्नांचाच भाग अधिक आहे. अगदी अलीकडेच एका पत्रद्वारे मी 'ध्येयवादी, कष्टाळू, बाणेदार आणि विद्वान्' असल्याचे गुरु. अण्णांनी त्यांच्या एका मित्राला लिहिल्याचे, मला ते पत्र वाचायला मिळाल्यामुळे कळले. वर वर्णिलेले चारपाच गुण ही माझी आश्रमीय जीवनाच्या पायावर उत्तरायुष्यात कमावलेली संपत्ती आहे.

□ □ □

११. आयुष्याला वळण लागले

श्री. द. वि. कालेकर

व्यवसाय : पोलिसखात्यातून सेवानिवृत्त

शिक्षणकाल १९२३ ते १९३०

विद्यार्थिदशेत शारीरिक शिक्षणाची व कुस्तीची आवड असे

संस्कार संस्कार उपयोगी पडले आपल्या शिक्षणातील शिस्त, शील व संस्कार माझ्या सबंध आयुष्याला मार्गदर्शक ठरले आहेत. आश्रमातील अण्णांची शिस्त वाखाणण्यासारखी होती. पहाटे ४-३० वा. उठणे, प्रार्थना, स्नान, व्यायाम यामुळे माझ्या सर्व आयुष्याला चांगले वळण लागले आहे. त्यांतल्या त्यात मी पोलीस खात्यात होतो, त्यामुळे सकाळी उठणे, स्नान, नंतर परेड (व्यायाम) हे वळण मला फार उपकारक व उपयोगी पडले. सरकारी नोकरी संपल्यावरसुद्धा आश्रमातील अण्णांच्या शिस्तीमुळे व संस्कारांमुळे आता निवृत्तीचे आयुष्य फारच उत्तम चालले आहे. अशा दुष्काळी व महागाईच्या दिवसांत, आश्रमातील "नानाची पेठ" धान्याची फार आठवण येते. त्यामुळे कोंड्याचा मांडा करून साधे व ताजे अन्न खाण्याची सवय जडली आहे. मला सध्या जे निवृत्तीवेतन महागाईसह येते ते अपुरे आहे तरी आपल्या आश्रमातील वागणुकीमुळे, मी खरेपणाने, लांडी लबाडी न करता चार मुलांची व चार मुलींची लग्ने पार पाडली. मी इंग्रजी टाईप-रायटिंग मशीन घेऊन कोर्टात टाईप करण्याचे काम करतो. त्यामुळे मला जोडधंदा म्हणून महिना ५०।६० रुपये जास्त मिळतात. आश्रमातील कष्ट करण्याची सवय अंगी बाणल्यामुळे रिकामा वेळ वाया जात नाही. "आराम हराम है" या नेहरू उक्तीमुळे मी रिकामे वेळी टिळकांचे गीतारहस्य वाचीत असतो व त्यातील विचारांचे चिंतन, मनन, ध्यान करीत असतो. त्यामुळे माझ्या मनाला शांती व सुख मिळते.

पुढेही उपयोगी पडतील आश्रमातील आपल्या शिस्त व संस्कारामुळे असेल त्यात व मिळेल त्यात सुख मानण्याची वृत्ती व सवय अंगी बाणली आहे. दैवापेक्षा प्रयत्नावर माझा विश्वास असल्यामुळे मी परमेश्वरावर विश्वास ठेवून कष्ट करीत आहे.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

या गीता-वचनाप्रमाणे मी आश्रमातील शिस्त, शील व संस्कार यांच्या जोरावर उर्वरित आयुष्य घालविण्याचा निश्चय केला आहे ! परमेश्वर मला उपाशी ठेवणार नाही.

□ □ □

१२. तीस वर्षांनी मला ओळखले

श्री. अ. गो. भवाळकर
व्यवसाय : ऑफिस सुपरिन्टेन्डेन्ट,
सीनिअर लीगल ॲडव्हायसर, पुणे म्यु. कॉर्पो.
शिक्षणकाल १९२४ ते १९२८
सात्त्विक वृत्तीचे ध्येयवादी आणि कृतज्ञ माजी विद्यार्थी

अण्णांनी असे शिकविले मी सन १९२४ ते १९२९ महाराष्ट्र विद्यालयात होतो. गुरु. अण्णा तेव्हा सुपरिंटेंडेंट होते. शिवाय तासही घेत असत. त्यांना नीटनेटकेपणा व शिस्त प्रिय होती. विद्यार्थ्यांनी गबाळेपणाने राहू नये आणि वर्गात नीट लक्ष द्यावे याकरिता, प्रत्येक तासाच्या सुरुवातीस ते मुलांना चार पाच उठाबशा काढण्यास लावीत. सदऱ्याच्या व कोटाच्या गुंड्या लावून घेत. टोप्या सरळ बसवून घेत. पेन्सिलीला टोके केलेली आहेत किंवा नाहीत, ते पाहून घेत. ताठ बसण्यास लावीत व नंतर शिकविण्यास सुरुवात करीत. वर्गाबाहेर कोठेही त्यांची गाठ पडली, तरी त्यांचे लक्ष विद्यार्थ्यांच्या नीटनेटकेपणाकडे असे. त्यामुळे केव्हाही त्यांच्या समोर जावयाचे म्हणजे गुंड्या, टोपी वगैरे तपासूनच जावे लागे. माझ्या बाबतीत तरी ही सवय बव्हंशी अजून टिकून आहे. अण्णा समोर दिसले की, माझे हात गुंड्या व टोपीकडे वळतात.

गुरु. अण्णांना आवश्यकतेप्रमाणे सर्व विषयांचे तास घ्यावे लागत व सर्वच विषय ते सहज समजतील व दीर्घकाळ लक्षात रहातील अशा प्रकारे शिकवीत. तथापि इंग्रजी व संस्कृत, विशेष करून, इंग्रजी शिकविण्याची त्यांची निराळी पद्धती मला विशेष आवडत असे. इंग्रजी धड्यातील मजकुरात छापील विरामचिन्हे असत, परंतु काही वेळा ती बऱ्याच अंतरा–अंतरावर असत. त्यामुळे दोन विरामचिन्हांमधील मजकूर सलगपणे वाचणे विद्यार्थ्यांना कठीण पडे. गु. अण्णांनी धडा शिकवावयास घेतला की, ते प्रथम छापील विरामचिन्हांमधील मजकुराचे, सोयीस्कर असे सुटसुटीत विभाग करून तेथे पेन्सिलीने स्वल्पविराम करवून घेत; नंतर त्या धड्याचा अर्थ सांगत. कठीण शब्दांचे अर्थ केवळ मराठीमधूनच देत नसत. तर त्या शब्दांच्या अर्थाचे इतर सोपे इंग्रजी शब्द सांगत. हे शब्द इंग्रजी शब्द-कोषाच्या पद्धतीनुरूप अक्षरवारीने सांगत. उदाहरणार्थ, face शब्द आला, तेव्हा Appearance, Countenance, Face, Look असे चार शब्द त्यांनी दिले. हे शब्द नंतर ते वर्गाकडून घोकून घेत. अशा प्रकारे एक धडा पूर्ण करण्यास थोडासा जास्त वेळ लागत असे; पण त्यामुळे त्या त्या धड्यावरील प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी आपोआप होत असे व पुढील धडे सोपे जातअसत.

मधून मधून इंग्रजी डिक्टेशन घालीत असत. काही वेळा ३ रे व ४ थे वर्ष किंवा ४ थे व ५ वे वर्ष अशा दोन वर्गांतील विद्यार्थ्यांना एकत्र डिक्टेशन घालीत. तसेच

ओळीने उभे करून स्पेलिंग व शब्दार्थ विचारीत. बरोबर उत्तर देणारास ओळीत वरचा क्रमांक मिळे. या दोन्हीमुळे विद्यार्थ्यांत चढाओढीची वृत्ती निर्माण होत असे व पाठांतर होत असे.

इंग्रजीची क्रमिक पुस्तके 'पामर्स्टन रीडर्स' नावाची असत. इतर प्रशालांमध्ये ही रीडर्स आढळत नसत. स्थूल वाचनासाठीसुद्धा चांगली पुस्तके असत. तिसऱ्या वर्षासाठी 'कोरल आयलंड्स्' नावाचे एक छान पुस्तक होते. तीन धाडसी मुलांनी उष्ण कटिबंधातील काही बेटांवर केलेल्या प्रवासावर ते आधारलेले आहे. गुरु. अण्णांनी त्याचा सुरुवातीचा थोडासाच भाग शिकविला. परंतु तो इतका स्पष्ट समजला की, राहिलेले सर्व पुस्तक मी कोणाच्याही मदतीशिवाय त्याच वर्षी वाचून काढले. या पुस्तकाच्या सुरुवातीचा परिच्छेद मला अद्यापीही पाठ म्हणता येत असून, मी केव्हा केव्हा तो मनाशीच म्हणतो. दूरच्या प्रवासास निघालेले एक जहाज आपल्या समोर आहे, त्यावरील खलाशांची चाललेली धावपळ प्रत्यक्ष दिसत आहे, व त्यावरील विविध ध्वनी कानावर आदळत आहेत, असा मला तेव्हा भास होतो.

काड्याच्या पेटचा विकून जगणाऱ्या एका गरीब परंतु प्रामाणिक मुलाचा धडा एका रीडरमध्ये होता. आजही अतिशय कडाक्याच्या थंडीत, एखाद्या दिवशी, मला त्या धड्यातील मुलगा मनःश्चक्षूसमोर दिसतो. मला असे वाटते की, गुरु. अण्णांच्या शिकविण्याच्या तळमळीमुळे व पद्धतीमुळे अशा गोष्टी माझ्या स्मरणात राहिल्या आहेत. रघुवंशामधील गुरु. अण्णांनी शिकविलेला भागही माझ्या लक्षात राहिला आहे.

इंग्रजीच्या एका तासाला गुरु. अण्णा एक इंग्रजी मासिक वर्गात घेऊन आले व त्यांनी त्यातील एक मोठे छायाचित्र वर्गास दाखविले. एका मोठ्या जलाशयाच्या कडेला एक मोठा केसाळ कुत्रा, एका लहान बेशुद्धावस्थेतील मुलाजवळ बसला आहे आणि उंचावर काही पक्षी उडत आहेत, असे चमत्कारिक परंतु सुंदर दृश्य त्यात होते. अंकात त्याबद्दलची गोष्टही छापलेली होती. परंतु ती समजण्याइतके इंग्रजीचे ज्ञान आमच्या वर्गास आलेले नव्हते. चित्राची गोष्ट काय असावी, याबद्दल त्यांनी सर्वांना आपापल्या कल्पना विचारल्या आणि वर्गाकडूनच ती गोष्ट तयार करून घेतली व प्रत्येकाला ती लिहून काढण्यास व योग्य नाव देण्यास सांगितले. गोष्टीच्या सुरुवातीस ते चित्र काढण्यास सांगितले. चांगले चित्र काढता येणार नाही अशी मुलांनी तक्रार केली, तेव्हा मासिकातील ते चित्र त्यांनी देऊ केले व कोणास पाहिजे ते विचारले. साहजिकच प्रत्येक जण ते चित्र मागू लागला. तेव्हा "या छायाचित्राचे तुकडे करून सर्वांना देतो" असे म्हणून त्यांनी खिशातून कात्री काढली व ते चित्र कापण्याचा आविर्भाव केला; तेव्हा आम्ही सर्वजण मोठ्याने हळहळलो. गुरु. अण्णांना त्यामुळे समाधान वाटले असावे. कारण त्यांनी हसून लगेच कात्री खाली ठेवली व त्याच मासिकाच्या अंकात त्या चित्राच्या अगदी लहान आकारात २०-२५ प्रती छापल्या होत्या त्या कापून त्यांनी सर्वांना वाटल्या. गोष्ट लिहून झाल्यावर एका विद्यार्थ्याने सुचविलेले 'Saved' हे नाव अंकातील गोष्टीस दिले होते, म्हणून त्यांनी त्या विद्यार्थ्यास शाबासकी दिली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. मुंबई
अनुक्रम ५५५८८ वि: निबंध...
दान दि. 2023 ... नों. दि: २०/३/७१

व्यापक संस्कार अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन, लेखन, कला वगैरेसही गुरु. अण्णा उत्तेजन देत असत. बुकर टी वॉशिंग्टन, स्वामी सत्यदेव परिव्राजक वगैरे पुष्कळ चांगली पुस्तके वाचण्याची संधी त्यांच्या मार्गदर्शनामुळे मला मिळाली.

इतर शाळांमधून न मिळणाऱ्या परंतु महाराष्ट्र विद्यालयात मिळालेल्या फायद्याच्या दोन तीन विशेष गोष्टींचा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे. त्या म्हणजे काही महापुरुषांचे जवळून दर्शन घडले व परदेशांतून आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे अनुभव ऐकण्यास मिळाले.

दररोज सकाळी मल्लशाळेत व्यायाम चालत. सायंकाळी हुतुतूसारखे सांघिक खेळ होत. गुरु. अण्णा त्या ठिकाणी काही वेळा जातीने हजर राहात असत. एक वर्षी तर त्यांनी सहामाही परीक्षेनंतर पतंग उडविण्यासाठी आम्हांस चतुःशृंगीच्या टेकडीवर नेले होते. त्या दिवशी अण्णांनी स्वतः एक वावडी उडविली.

गणेशोत्सव, टिळक-पुण्यतिथीस मंडईमध्ये अन्नाचे वाढप, वर्गांची हस्तलिखित नियत-कालिके, गीतेचे वर्ग इत्यादी प्रकारांनी विद्यार्थ्यांना बौद्धिक व सामाजिक शिक्षण देण्यात येत होते. संस्थेचे कुलगुरू कै. दादासाहेब केतकर व गुरु. अण्णा यांना त्या बाबतचे श्रेय द्यावे लागेल असे मला वाटते.

अण्णा मला विसरले नाहीत विद्यार्थी म्हणून महाराष्ट्र विद्यालयाशी संबंध सुटल्यावर मी फारच थोडा काळ संस्थेत जातो. अशा प्रत्येक वेळी गुरु. अण्णांशी भेटीची संधी मिळत नाही व त्याचे कारणही नसते. परंतु तरीही माझा चेहरा त्यांच्या आठवणीत असल्याचा विलक्षण अनुभव मला आला. १९५८ साली म्हणजे महाराष्ट्र विद्यालय सोडल्यावर एकोणतीस वर्षांनी मी माझ्या काही नातेवाईकांसह पेशवे उद्यानावरून पर्वतीस जात होतो. आमच्या पुढे थोडचा अंतरावर गुरु. अण्णा व सौ. ताईसाहेब पर्वतीच्याच दिशेने फिरावयास जात होते. आम्ही त्यांच्यापेक्षा थोडचा जलद चालीने चाललो होतो. गुरु. अण्णा एकटे नसल्यामुळे, माझ्याबरोबर नातेवाईक असल्यामुळे आणि अण्णा मला ओळखीत असतील अशी कल्पनाही नसल्यामुळे मी त्यांना मागे टाकताना, आणि आता तो उद्धटपणा वाटतो, साधा नमस्कारसुद्धा केला नाही. फक्त साहजिकपणे आम्ही एकमेकांकडे वळून पाहिले होते. परंतु आम्ही दहा पाच पावले पुढे जातो न जातो तोच "जोशी, जोशी" म्हणून अण्णांच्या हाका ऐकू आल्या. वळून पाहातो तो हात उंचावून ते मलाच हाक मारीत होते. जवळ गेल्यावर त्यांनी माझी किरकोळ विचारपूस केली व मला निरोप दिला. विद्यालयात असताना मी अगदी साधारण विद्यार्थी होतो, म्हणून नाव विसरले तरी माझा चेहरा त्यांनी लक्षात ठेवल्याबद्दल मला धन्यता वाटली.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वा. क्र. ९५१५१

१३. ब्रह्मदेवाची चतुर्विध भूमिका

श्री. आ. स. अत्रे

व्यवसाय : दलित समाजाची सेवा, जळगाव

शिक्षणकाल १९२५ ते १९२८

दलित समाज, विशेषतः भंगी समाजाच्या सेवेला आयुष्य वाहिले आहे

ब्रह्मदेवाची चतुर्विध भूमिका परमपूज्य गुरुदेव ती. अण्णांच्याविषयी काय लिहू, तेच समजत नाही. पुणे अनाथ विद्यार्थी गृह, महाराष्ट्र विद्यालय व नाशिक येथील अनाथ विद्यार्थी गृह यांतील आजी व माजी विद्यार्थ्यांचे ते 'गुरुमाउली' आहेत ! आम्हा विद्यार्थ्यांवरील त्यांच्या प्रेमात आईचे वात्सल्य, पित्याची संगोपन दृष्टी व सद्गुरूचे अचूक मार्गदर्शन यांचा मधुर संगम आहे !

माझ्या कार्याचे स्फूर्तिस्थान गुरुदेव ती. अण्णांच्या निकट सान्निध्यात राहाण्याचे सद्भाग्य लाभण्याइतकी पुण्याई माझ्या पदरी नव्हती. १९२५ ते १९२८ च्या दरम्यान महाराष्ट्र विद्यालयातील एक विद्यार्थी या नात्याने त्यांचे मला जे दर्शन घडले, त्याचे स्मरणही भावी जीवनात स्फूर्ती व प्रेरणा देणारे ठरले. अनाथ विद्यार्थी गृहातील पूज्य अण्णा ही चैतन्य-शक्ती ! अनाथ विद्यार्थी गृहास या देशात जी प्रतिष्ठा लाभली, त्यात गुरु. अण्णांच्या तपश्चर्येचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या या ध्येयनिष्ठ तपस्वी जीवनापुढे सारा महाराष्ट्र नतमस्तक होईल. सार्वजनिक जीवनात कार्य करताना गेली ३०–३५ वर्षे पू. अण्णांची ही ध्येयनिष्ठा ध्रुवताऱ्यासारखी मला मार्गदर्शन करीत आहे. कार्याशी समरस होऊन प्राणपणाने अंगीकृत कार्य करण्याची मला जी किंचितशी शक्ती लाभली, त्या श्रेयात या गुरुमाउलीचा फार मोठा वाटा आहे.

राष्ट्रीय शिक्षणाची शाळा महाराष्ट्र विद्यालय हे पुण्यातील त्या काळचे विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने सर्वांत चिमुकले, परंतु शैक्षणिक वैशिष्ट्ये व ध्येयवाद या दृष्टीने सर्वांहून आगळे असे विद्यालय होते. आम्ही शिकत असताना विद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या २००च्या आतच असावी. परंतु हे विद्यालय राष्ट्रीय शिक्षणातील विशेषतांनी युक्त असे त्याही वेळी होते. मातृभाषेतून शिक्षण हा राष्ट्रीय शिक्षणाचा आत्मा समजला जात असे. विद्यालयातील शिक्षण मातृभाषेतून दिले जात होते. तथापि, ध्येयवाद व व्यवहार यांची सांगड घालण्याचा चालकांचा दृष्टिकोन असल्यामुळे, सरकारमान्य मॅट्रिक परीक्षेस पुढील शिक्षणाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना बसता यावे, याकरिता, मॅट्रिकसाठी आम्हा विद्यार्थ्यांना नूतन मराठी विद्यालयात प्रवेश मिळण्याची सोय केली होती.

धार्मिक शिक्षण मानवातील मानवता जागृत होऊन विकसित होत जावी या करिता धार्मिक शिक्षणाची जरूर आहे. अर्थात तसे करताना सांप्रदायिकतेच्या संकुचितपणासही टाळावयास हवे. ही दृष्टी ठेवून महाराष्ट्र विद्यालयात धार्मिक व नैतिक शिक्षणाची सोय होती. मला धार्मिक एकात्मतेचे जे दर्शन घडत आहे व मानवताप्रेमी मंडळामार्फत त्या दिशेने जे काही प्रयोग आज मी करू शकतो त्यांची दीक्षा महाराष्ट्र विद्यालयातील या धार्मिक शिक्षणाने मला मिळाली. आज जो देशात नैतिक ऱ्हास वाढत आहे तो टाळण्यासाठी मानवतेच्या भूमिकेतून धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची जरुरी असल्याचे महाराष्ट्र विद्यालयातील या अनुभवाने विश्वासपूर्वक म्हणावेसे वाटते.

व्यापक शिक्षण नौकरीसाठी परीक्षा व परीक्षेसाठी शिक्षण अशी सामान्यतः शिक्षणाची स्थिती आहे. त्यामुळे खऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वत्र अभाव जाणवत असून विद्यार्थ्यांचे कारखाने सर्वत्र सुरू आहेत. महाराष्ट्र विद्यालय या दोषापासून मुक्त होते. त्याचे एक महत्त्वाचे कारण पाठ्यक्रमाखेरीज अभ्यासक्रमातच सामान्यवाचन या विषयाचा समावेश हे होय ! विद्यार्थीदशेत चांगल्या ग्रंथांचे वाचन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली झाल्यास ते ज्ञान भावी जीवनातील शिदोरी बनते, हा माझा नम्र अनुभव आहे. याशिवाय विद्यार्थ्यांची शारीरिक, बौद्धिक व मानसिक तयारी व्हावी, यासाठी हस्तलिखित मासिके, वादविवादसभा, शारीरिक शिक्षणाची सोय आदी विशेषतायुक्त असे महाराष्ट्र विद्यालय होते. या सर्व वैशिष्ट्यांच्या मागे पू. अण्णांची शैक्षणिक दृष्टी होती हे लिहिण्याचीही जरुरी नाही. पू. अण्णांपासून लाभलेली ही शिक्षणविषयक व्यापक दृष्टी हा मी व्यक्तिगत मोठा लाभ समजतो.

राजकीय सहिष्णुता महाराष्ट्र विद्यालयाचे अंतरंगदर्शनही त्यावेळी अभिमानास्पद होते. नम्रता व निर्भयता, शिस्त व सहृदयता, स्वावलंबन व संग्राहकता आदी गुणांचे दर्शन त्या बालवयातही मला पू. अण्णांच्या संचालकत्वात दिसत होते. सार्वजनिक जीवनात जरूर असते सहिष्णुवृत्तीची; तिचा व्यक्तिगत मनमुराद अनुभव मी विद्यालयात घेत होतो. विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी हे प्रतिसहकार पक्षाकडे झुकत असताना मी एकच खादीधारी व असहकारतेवरील निष्ठा असणारा विद्यार्थी महाराष्ट्र विद्यालयात असूनही सर्व दृष्टींनी त्यांच्याच पैकी एक पूर्णत्वाने बनलो होतो. याचे श्रेय पू. अण्णांच्या मातृहृदयासच द्यावे लागेल. शिस्तीकरता रागावलेले पू. अण्णा मला अद्यापही आठवतात, परंतु त्या रागातच विद्यार्थ्यांवरील वात्सल्याने विरघळणाऱ्या त्यांच्या हृदयाचे दर्शन त्यांच्या दृष्टीत होत असे. विद्यालयातील विद्यार्थी विनम्र असले, तरी ते निर्भय होते. स्वावलंबनाचा विद्यालयाचा आदेश असला तरी विद्यालयात परोपकारी वृत्तीची वाढ होत होती. अर्थात् याच्यापाठीमागे पू. अण्णा व त्यांचे सहकारी आमचे थोर गुरुदेव यांची जीवननिष्ठा होती, जी आज मला सर्वोदयाच्या कामातही मार्गदर्शन करीत आहे.

□ □ □

१४. जगात अडत नाही

श्री. वि. द. जतकर

व्यवसाय : वकील, विटे

शिक्षणकाल १९२५ ते १९३१

यशस्वी वकील; संस्थेच्या कामात सर्वतोपरी सहाय्य

आश्रमातील अर्ध्या तपाच्या आयुष्याने माझ्या बुद्धीला विशालता आणली. संस्कारांचे आसन बळकट झाले. राजकारणाचे धडे तेथेच मिळाले व वाङ्मयीन वाचन, लेखन यांची इतकी आवड निर्माण झाली आहे की रोज काही वाचल्याशिवाय झोपत नाही. धर्म म्हणजे काय, धर्माचे अंतरंग–अध्यात्म–म्हणजे काय, यांचेही धडे येथेच मिळाले. भगवद्गीता, दासबोध ह्यांचे वाचन कटाक्षाने आश्रमात होत होते. त्यामुळे धार्मिक संस्कारांचे आजही आचरण चालू आहे. आश्रमात विविध विषयांवर मोठमोठ्या विद्वानांची व्याख्याने, प्रवचने होत. बाहेरही शहरात कार्यक्रमास जाण्यास परवानगी असे. त्यामुळे विद्यार्थी विशाल बुद्धीचा, व्यवहारचतुर व बहुश्रुत होऊन बाहेरच्या जगात पडत असे व त्यामुळे त्याचे कोठेही अडत नसे.

महाराष्ट्रातील हल्लीचा विद्यार्थी म्हणजे धर्माचा अभिमान नष्ट झालेला, आपल्या संस्कृतीपेक्षा पाश्चिमात्य संस्कृतीकडे आकृष्ट झालेला, व्यवहारज्ञान फारच अपुरे, वाचनाची आवड नसलेला, फॅशन व सिनेमा यांच्या आहारी गेलेला, ध्येयाचा व श्रद्धेचा अभाव असलेला, स्वाभिमानाची तोंडओळख नसलेला, व्यायामाची मूलतः आवड नसलेला, राष्ट्रीयत्वाची जाणीव नसलेला, किंकर्तव्यमूढ झालेला व परावलंबी असा दिसून येतो. हे स्थित्यंतर पाहिले म्हणजे आश्रमातील शिक्षण व संस्कार यांची पातळी किती तरी उच्च असल्याचे दिसून येते.

अशा वेळी ध्येयनिष्ठ शिक्षण, भारतीय परंपरेचे संस्कारयुक्त शिक्षण, राष्ट्रीयत्व जागृत करून त्याचा अभिमान वाढवील असे शिक्षण, आपला न्यूनगंड घालविणारे व स्वतंत्र भारताचे स्वाभिमानी नागरिक बनविणारे शिक्षण हेच राष्ट्राला तारणार आहे. तेमके तेच शिक्षण अनाथ विद्यार्थी गृहात दिले जाते व त्यामुळे आश्रमातील विद्यार्थी, आदर्श नागरिकाची सर्व मूल्ये घेऊन तेथून बाहेर पडतो व याच विद्यार्थ्यांतून. एखादा असामान्य विद्यार्थी महाराष्ट्राचे आज ना उद्या धुरीणत्व पत्करील अशी खात्री वाटते.

आश्रमाची मला पदोपदी उठता बसता आठवण होते. आश्रम माझी वैचारिक, सांस्कृतिक व व्यावहारिक संस्कारांची आणि स्वाभिमानाची जननी आहे, तिचे विस्मरण मला कधीच घडणे शक्य नाही. या पेक्षा मी माझ्या भावना किती उघड्या करू ?

१५. आधुनिक उपनिषदच

प्रा. दे. द. कुलकर्णी, एम्. ए.

व्यवसाय : हिंदीचे प्राध्यापक, सोलापूर,

शिक्षणकाल १९२५ ते १९३२

हिंदी वाङ्मय आणि ज्ञानेश्वरी यांचे एकनिष्ठ अभ्यासक

गुरु. अण्णांचे व्यक्तिमत्त्वाचापरिणाम गुरु. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप संस्थेत प्रवेश केल्यापासून ती आजतागायत माझ्या मनावर कायम आहे. त्यांच्या मुखावर विलसत असलेले विद्वत्तेचे तेज, तुरळक केसांतून तरळणारा शुभ्र शिरोभाग, शुभ्र अंग-कांती, सुटसुटीत, नीटनेटकी आणि साधी राहाणी नेहमीच विलोभनीय वाटतात. संस्थेत असताना नेहमी वाटायचे, न्यूयॉर्कहून डॉक्टरेट घेऊन आलेला हा गृहस्थ या एवढ्याशा संस्थेला वाहून घेतो कसा ! अण्णांच्यामुळे संस्थेला मोठेपण आले हे कोणीही कबूल करील. गुरु. दादा केतकर म्हणायचे, 'अण्णांना भेटलास का, अण्णांना विचार !' सुटीहून परत आलो की दादांचा हा ठराविक प्रश्न असे— 'अण्णांना भेटलास का ?' गुरु. दादांच्या मनात त्यांच्याबद्दल किती आत्मीयता आणि आदराची भावना होती याची यावरून सहज कल्पना येते.

एवढा नावाजलेला शिक्षणतज्ञ, पण टेबलावर बेलसुद्धा नाही. बेल म्हणून पूजेतील घंटी पाहून मला विस्मय आणि विषाद वाटला. साध्या राहाणीचा काय हा आदर्श ! १४ मे १९३४ चा दिवस. त्या दिवशी मला संस्थेत प्रवेश मिळाला. माझे गाव त्यावेळच्या हैद्राबाद संस्थानातल्या तुळजापूर तालुक्यात होते. माझे नाव देवीदास. चाचणीच्या वेळी अण्णांनी विचारले "कोणत्या देवीचा रे दास तू ?" मी म्हणालो, "विद्या देवीचा." अण्णांनी स्मित हास्य करून विनोद केला—"तू तुळजापूरच्या देवीचा दास दिसतोस."

वक्तशीरपणाचा धडा १९३५ ची गोष्ट. नाशिकला नाशिक जिल्हा शैक्षणिक परिषद झाली. अध्यक्ष गुरु. अण्णा होते. परिषद नाशिक आश्रमात भरली होती. काही कारणांमुळे तेथील स्थानिक मुख्याध्यापकांनी परिषदेत भाग न घेण्याचे ठरविले होते. अर्थात् त्यामुळे श्रोते फारच कमी होते. पण वैशिष्ट्य असे की, अण्णांनी कार्यक्रम बरोबर संध्याकाळी पाच वाजता सुरू केला. वक्तशीरपणाचा धडा अण्णांनी त्या वेळी सर्वांनाच दिला.

जशास तसे मी नाशिक शाखेत होतो. त्यावेळची एक गोष्ट आठवते. दुपारी तीन वाजता गु. अण्णा 'व्यवसायसंशोधनावर' बोलत होते. मी त्या वेळी

चौथीत होतो. पलीकडेच श्री. भार्गवे मास्तर व्ह. फा. चा इंग्रजी तास घेत होते. मुलांना त्यांनी इंग्रजी स्पेलिंग घोकावयास सांगितले. त्यामुळे अण्णांच्या व्याख्यानात व्यत्यय आला. अण्णांनी आम्हांस इकडेही तसेच काहीतरी घोकावयास सांगितले. भार्गवे यांच्या लक्षात आपली चूक आली व सर्व तास शांतपणे झाला.

नाशिक आश्रमाच्या तपासणीसाठी मधून मधून अण्णा येत असत. आले की आश्रमात चैतन्य संचारल्यासारखे होई. विद्यालयाचे वर्ग सकाळी असत. ती ठराविक जाड बाउंडवही घेऊन वेगवेगळ्या वर्गांत बसत. काही सूचना लिहीत. आम्हांस त्यांच्या जवळून जावयास सुद्धा भीती वाटत असे.

शिक्षक–पालक नाते व आदरातिथ्य तीन वर्षांपूर्वी उन्हाळ्याच्या सुटीत आम्ही कुटुंबीय पुण्यास गेलो होतो. बरोबर वृद्ध मातोश्रीही पण होत्या. त्यांना राममंदिराच्या सभामंडपात बसविले होते. मी अण्णांना भेटलो. ते कोठे तरी बाहेर निघाले होते. अण्णांनी मुद्दाम आईची भेट घेतली. विचारपूस केली. मला धन्यता वाटली. त्याचप्रमाणे आश्चर्यही !

एस्. एस्. सी. बोर्डाच्या कामानिमित्त पुण्यास बऱ्याच वेळा जाणे होत होते. घरी गेलो की, सौ. ताईंनी नेहमीच्या हसतमुखाने स्वागत करावे, कौटुंबिक विचारपूस करावी ! त्यात दिवाळीचे दिवस असावेत, आग्रह करून फराळ ठरलेलाच. खैर कुटुंबात प्रत्येक माजी विद्यार्थी हा कुटुंबीय समजला जातो.

मुख्याध्यापकांचे प्रतिनिधी म्हणून अण्णा कौन्सिलवर निवडून यावयाचे होते. मी स्थानिक मुख्याध्यापकांकडे जाऊन मते मिळवीत होतो. हे करण्यात मला सात्त्विक आनंद वाटत होता. अण्णा निवडून आले. आभाराचे पत्रही त्यांनी पाठविले.

'समाचार'चे अग्रलेख म्हणजे आधुनिक खैरोपनिषदच होय.

आवडलेल्या विचारांसंबंधी जेव्हा जेव्हा लिहिले, तेव्हा तेव्हा आभाराचे पत्र अण्णांनी पाठविले.

परवाची १० हजारांची देणगी तर अण्णांच्या त्यागाची परिसीमा आहे. त्याच-वेळी पत्र पाठवून मनोगत कळविले होते. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे मीही म्हणेन––

यालागी आता । स्तुति सांडूनि निवांता । चरणी ठेविजे माथा । हेचि भलें ।।

(ज्ञानेश्वरी अ. १४–१५)

□ □ □

१६. खैरांचे खोड मूळ चंदनाचे

डॉ. मुंजाजी गजेवार, एल्. सी. पी. एस्.
व्यवसाय : सरकारी वैद्यकीय–खाते, सिव्हिल हॉस्पिटल, शिरोळ, जि. कोल्हापूर
शिक्षणकाल १९२६ ते १९३७
संस्था व गुरुजन यांविषयी आस्था व आरोग्यक्षेत्रात समाजसेवा

विचारांना आध्यात्मिक बैठक अण्णांनी माझ्या उत्कर्षासाठी मला जे वैयक्तिक मार्गदर्शन केले ते त्यांच्या हस्ताक्षरातील शब्दांवरून दिसून येईल. विद्यार्थ्याने आपला विकास कसा करावा याची तळमळ त्यांच्या मनाला कशी लागली होती हे त्या मजकुरावरून सहज स्पष्ट होण्यासारखे आहे. यातच त्यांच्या आध्यात्मिक विचारांची बैठक दिसून येते. ते जसे ज्ञानेश्वराचे भोक्ते आहेत, तसेच पाश्चात्य कवी ब्राउनिंगचेही चहाते आहेत. संस्कृतचे श्लोक एकामागून एक म्हणून दाखविणारे गुरु. अण्णा ज्ञानेश्वरीच्या ओव्यावर ओव्या म्हणून दाखवितात.



माझे सद्गुण-दर्शक एम्. ए. झालेल्या गुरु. अण्णांनी विद्यार्थ्यांना घालून दिलेले अष्टपैलुत्वाचे गुण मांडण्याचे साधे कामसुद्धा स्वतः केलेले आहे. ते आठ गुण कशाचे द्योतक होते हे सर्वांना माहीत आहे. त्यांनी मला दिलेल्या सद्गुणदशकावरोबर त्यांची तुलना करता यावी म्हणून मी त्यांचा उल्लेख करीत आहे.

कर्तव्यनिष्ठा, सात्त्विक विचार, आनंदी–उल्हसित–उत्साही वृत्ती, आत्मसंयमन, सत्यनिष्ठा, व्यवसायप्रियता, शिस्त-पालन, परोपकार वृत्ती (सार्वजनिक हित बुद्धीने काम करणे), कृतज्ञता आणि जिज्ञासू स्वभाव किंवा ज्ञानार्जनाची आवड.

दैनंदिनीचा फायदा गुरु. अण्णांचा दैनंदिनी लेखनाविषयी मोठा अट्टाहास होता. दुसऱ्या कोणाला त्याचा अनुभव आला किंवा नाही हे मला माहीत नाही. दैनंदिनी लेखनाचे काम माझ्याकडून नियमाने व्हावे म्हणून मला त्यांनी खूप रागावून सांगितले. त्याचा परिणाम म्हणजे मी तात्त्विक विचार लिहू लागलो. अनुभवाच्या उणीवेमुळे त्यातून मला शहाणपणाची व्यावहारिक दृष्टी विशेष लाभली नाही.

धारदार शब्दांचे विस्मरण मजवर शारीरिक शिक्षेचे प्रसंग क्वचितच आले; अर्थात नाही असे म्हणता येणार नाही. तथापि गुरु. अण्णांनी टाचा उचलून पुढील चवडचावर उभे राहून लांब धरून ठेवलेल्या तळहातावर मारलेल्या छडचांच्या वेदनांपेक्षा त्यांचे मनाला बोचणारे – जिव्हारी लागणारे – शब्द ऐकून होणाऱ्या वेदना अधिक तीव्रतर होत्या असा माझा वैयक्तिक अनुभव आहे. ते प्रसंग मात्र त्यांचे विस्मरण झाल्याकारणाने देता येत नाहीत. मला वाटते त्यांच्या धारदार शब्दांपाठीमागे मजविषयी त्यांना वाटणारी कळकळच होती. या त्या वेळच्या जाणीवेमुळे मला त्या कटु शब्दांचा विसर पडला. बोचक अपमानकारक शब्दांचा सहसा मला विसर पडत नाही.

संभाषणाची गोडी त्यांच्या अंतःकरणाची मार्दवता अनुभवल्याशिवाय शब्दांत वर्णन करता येणार नाही. ते मायेने उल्हसित अंतःकरणाने बोलायला लागले म्हणजे त्यांच्या शब्दांना जी गोडी–मधुरता–येते ती खरोखरच अवर्णनीय आहे. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि तेज आगळे असते. त्यापासून कोणाला कशी प्रेरणा अथवा कशा प्रकारचे चैतन्य मिळाले असेल ते ज्याचे त्यानेच सांगितलेले बरे. मोजके रसाळ शब्द, तुटक पण अर्थपूर्ण वाक्ये आणि त्यांत मार्मिक विनोदाची भर, यामुळे त्यांच्या संभाषणातील विशिष्ट अशी गोडी अवीट आहे.

▱ ▱ ▱

१७. चिंतनशीलतेचा संस्कार

श्री. ग. शं. पेंडसे, सी. ए.
व्यवसाय : जॉइंट चीफ अकौन्ट्स ऑफिसर
महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड, मुंबई

शिक्षणकाल १९२६ ते १९३१

स्वतःची कर्तबगारी आणि सचोटी या गुणांचे जोरावर यशस्वी

गुरु. अण्णांच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी ज्या गुणांचा माझ्यावर परिणाम झाला, त्यांचा माझ्या अल्प निवेदनशक्तीनुसार येथे उल्लेख करीत आहे.

हाती घेतलेल्या कामाबद्दलची त्यांची अढळ व जाज्वल्य निष्ठा. ह्या अविचल निष्ठेमुळेच ते आजतागायत संस्थेत एकचित्ताने व निरलसपणे कार्य करीत राहिले आहेत. बाह्य जगातील कोणत्याही प्रलोभनाला–धन, प्रसिद्धी ह्यांना ते बळी पडले नाहीत.

माझ्या मनावर बिंबलेला गुरु. अण्णांचा दुसरा गुण म्हणजे त्यांची अखंड प्रयत्नशीलता–प्रयोगशीलता. आपले काही प्रयोग अपेक्षेइतके यशस्वी झाले नाहीत म्हणून ते कधीही नाउमेद झाले नाहीत. त्यांच्या ह्या दुर्दम्य आशावादाचा मला सुमारे दहा वर्षांपूर्वी चांगलाच उपयोग झाला.

गुरु. अण्णांच्या स्वभाववैशिष्ट्याचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची सहृदयता.

दुसऱ्याची अडचण, मग तो विद्यार्थी, सहकारी अगर साधा परिचित कोणीही असो, समजून घेऊन त्याला त्याच्या अडचणीत, अंगीकृत कार्यात शक्य ती सर्व मदत तावडतोब करावयाची असा त्यांचा परिपाठ आहे. हा गुण सौ. ताई खैर ह्यांच्यापाशीही तितकाच उत्कट आहे; इतका की, गुरु. अण्णांनी तो त्यांचेकडून घेतला आहे की काय असा संभ्रम होतो.

त्यांच्या ठिकाणी उत्कटतेने वास करीत असलेला आणखी एक गुण म्हणजे त्यांचा-पराकाष्ठेचा साधेपणा व निगर्वीपणा. त्यांचा साधेपणा इतका पराकोटीला गेला आहे की आजची पिढी त्यांच्या पोषाखाकडे पाहून त्याची बावळेपणाच्या किंवा गबाळेपणाच्या पोषाखातच गणना करील. पण असे ज्यांना वाटत असेल त्यांची मी मूर्खांतच गणना करीन. साध्या राहाणीच्या अभ्यासाशिवाय खऱ्या त्यागाची वृत्ती अंगी बाणत नाही. वरील दोन्ही गुणांच्या शिकवणुकीचा मला माझ्या दैनंदिन व्यवहारात बराच उपयोग होतो. त्यांचा आणखी एक स्वभावविशेष म्हणजे चिंतनशीलता. त्यांच्या ह्या गुणाचाही मला काही प्रमाणात फायदा झाला आहे. चिंतनाचे अंतिम फलित म्हणजे तत्त्व किंवा सत्यदर्शन, किंवा त्याच्या जवळपास जाणे. ह्यापासून होणारा प्रत्यक्ष फायदा म्हणजे मनःशांती व समाधानी वृत्तीची निर्मिती की ज्या गोष्टींची मानवी जीवित-साफल्यासाठी अतिशय आवश्यकता आहे.

□ □ □

१८. आजच्या पिढीला बोध

श्री. द. गो. पटवर्धन
व्यवसाय : नोकरी, चीफ गुड्स् सुपरवायझर,
वेस्टर्न रेल्वे, मुंबई
शिक्षणकाल १९२७ ते १९३३
तरुण पिढीने स्वतंत्र उद्योगधंदा करावा असा घरीच उपक्रम करणारे

सदाचार चिंतनीचे प्रात्यक्षिकच गुरु. अण्णांनी अमेरिकेत असताना पत्ररूपी भेटी पाठविल्या त्या सुसंगतीत आम्हांला वाटल्या जात. स्वतः आल्यावर त्यांनी ज्या नाविन्यपूर्ण सुधारणा व उपक्रम सुरू केले त्यांत मला सूर्यस्नानाची (Sun–Bath) स्मृती होते. मधल्या सुटीत मैदानात सर्व विद्यार्थ्यांना सांघिक सूर्यस्नान घडविण्यात येत असे. बऱ्याच विद्यार्थ्यांच्या तोंडून गुरु. अण्णा हे मारकुटे होते असे ऐकण्यात येते, परंतु मला जे त्यांचे व्यक्तिदर्शन व अनुभव मिळाला तो वडिलांकडून मुलाला मिळणाऱ्या प्रेमाचा मिळाला; काहींना सुनेला मिळणारा अनुभव मिळाला असेल. पण माझ्या मते तेच खरे भाग्यवान होत; कारण बापाचा वारसा मुलीला न मिळता सुनेला मिळतो.

गुरु. अण्णांच्या शिक्षणातील शिस्त, शील व संस्कार यांबद्दल विचार केल्यास सदा-

चार-चिंतनी म्हणजे साक्षात अण्णाच होत असे थोडक्यात म्हणता येईल. त्या काळी गुरु. अण्णा सदाचार-चिंतनीच्या विचारांचे, गाजावाजा न करता, स्वतः आमच्यावर संस्कार घडविण्याचे प्रात्यक्षिक करीत असत, व आता 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे केलेल्या प्रयोगांचे लेखी संकलन करीत आहेत असेच म्हणावे लागेल.

खोटे अश्रू–खरे अश्रू अण्णांना वनविणाऱ्यांनी चांगल्या अर्थाने वनविलेही असेल. मात्र म्हणण्यासारखे अण्णांना वनविण्याच्या प्रयत्नात स्वतःच वनले असेच म्हणावे लागेल. कारण हावभाव व थापा मारून कृत्रिम, निरागस आभास निर्माण करून आम्ही अण्णांना वनवले, व त्यांचा खरा रस आम्हांला न मिळता आम्ही मात्र खऱ्या अर्थाने वनलो. त्याचा दोष मात्र आम्ही अण्णांनाच देणार. कारण अण्णा गुन्हेगाराला चांगले शासन करीत असत पण त्यांना लबाड लोकांना ओळखण्याची कला हवी तेवढी साध्य नव्हती. त्यामुळे डोळ्यांत अश्रू दिसले म्हणजे एखाद्याला दुःख झाले असे ते समजत. परंतु आमच्या सारख्यांनी डोळ्यांना पाणी लावून पश्चात्तापाचा निर्माण केलेला आभास त्यांना खराच वाटायचा. अर्थात त्यामुळे नुकसान आमचेच झाले व आता मात्र खरोखरच रडण्याची पाळी येते. तरी ह्यापुढील विद्यार्थ्यांनी यातून बोध घेऊन आपापला फायदा करून घ्यावा. कारण जे आम्हांला जमले नाही ते आमच्या धाकट्या भावंडांना जमले तर त्याबद्दल आम्हांला आनंदच होईल.

थोडक्यात म्हणजे अण्णांच्या शिक्षणातील शील व शिस्त घडविण्याची पद्धती अत्यंत आदर्श व अंतर्बाह्य मधुरच होती असे म्हणावे लागेल.

□ □ □

१९. कडकपणा ऐकला, अनुभवला नाही!

डॉ. के. बी. चंद्रात्रे, आयुर्विद्या विशारद

व्यवसाय : प्रमुख, सर्वोदय दवाखाना, करंजाळी, जि. नाशिक

शिक्षणकाल १९२८ ते १९३३

वैद्यकीय क्षेत्रात ग्रामीण जनतेची एकनिष्ठेने सेवा

ती सुप्रभात आम्ही पुण्यास प्रथम आलो त्या वेळी गुरुवर्य अण्णा नव्हते. त्यांच्या स्वागत समारंभाची ती रम्य उत्साही सु-प्रभात अजूनही आठवते. प्रथम दर्शनी शांत पण तेजस्वी मुद्रेचा कायम पगडा बसला. पुढे ही भीतिमिश्रित आदराची भावना कायम टिकली. गुरु. अण्णा अमेरिकेतून जाऊन आल्यावर पहिल्या तपातील अण्णा बहुधा राहिले नसावेत, कारण तितका कडकपणा आम्ही ऐकला होता, पण अनुभवला नाही. म्हणजे फारसा दिसला नाही. अण्णा आम्हांस "रघुवंश" शिकवीत व इंग्लिशही घेत. त्यांची शिकविण्याची पद्धती व गती सावकाश असे.

आदर्श राहाणी साध्या राहाण्याच्या सात्त्विक प्रवृत्तीचा माझ्या चारित्र्यावर फार परिणाम झाला–घडवून आणला. त्यामुळे मला नसती ऐट करण्याची सवय जडली नाही, गाजावाजा न करता प्रत्यक्ष मरीव काम करीत राहाण्याचा पिंड बनला. गुरु. अण्णांच्या आध्यात्मिक तथा चिंतनशील प्रवृत्तीचाही माझ्यावर परिणाम झाला आहे. पावसाळ्यात वा अन्यवेळी इन्डोअर गेम्स ऐवजी आसने करण्याचे बाळकडू मिळाल्याने मी आजही किरकोळ आसने करतो. त्याशिवाय चैनच पडत नाही. गुरु. अण्णा व्यायामशाळेत लांबट सतरंजीवर गंजीफ्रॉक घालून, धोतराचा काचा मारून आसने करीत अाहेत वा शांत बसले आहेत हे चित्र आजही माझे स्मृतिपटलावर कायम आहे !

" सदाचार " हा अण्णांच्या शिक्षण–हेतु–तत्त्वांचा गाभा असावा म्हणूनच त्यांनी नवीन कॉलेज-वसतिगृहास ते नाव दिले, व खरोखर तेच सार्थ व सुयोग्य आहे. माझाही पिंड वा प्रवृत्ती तशीच असल्याने त्यांचे शिकवणीचा फार उपयोग होऊन अभिमान वाटतो.

अभ्यासाचे वेळी झोपणारा दुपारी १२ ते २–२।। अभ्यासाचे वेळी भिंतीकडे तोंड करून, अर्थात पुस्तकावर उजेड घेऊन बसावे लागे. मन एकाग्र होण्यास खरोखर त्याचा फार उपयोग झाला. अभ्यास करण्याची त्या वेळी अशी शिस्त होती. अण्णांची त्या वेळी एखादी फेरी व्हायाचीच. ती मात्र अगदी मांजराचे पावलाने. एकदा काय झाले, मला डुलकी लागली व त्याच वेळी अण्णांनी हॉलमध्ये प्रवेश केला. मग त्यांचे काकदृष्टीतून मी कसा सुटेन ? त्यांनी माझी शेंडी धरून डोके वर केले. केस ताणल्याने चिडून वर पाहातो तो अण्णा जवळ उभे राहिलेले ! अर्थात काही न बोलता...! अरे बापरे, केवढे ब्रह्मांड आठवले ! हा प्रसंग ३१–३२ साली झाला असेल, पण अजूनही आठवतो.

एकदा सहकुटुंब भेटीला येऊन आम्ही अण्णांच्या कार्यालयामध्ये कोचावर आसनस्थ झालो. अण्णांनी सर्व चौकशी शांतपणे, आस्थेवाईकपणे केली. मग माझ्या सौ. कडे वळून–" तुमचे शिक्षण कोठपर्यंत झाले ? फावल्या वेळी काय करता ? पतीच्या व्यवसायात मदत करता काय ? ती माहिती जरूर करून घ्यावी. उपयोग होईल, वेळ जाण्यास मदत होईल " वगैरे उपदेश केला, तो बहुमोल होता. अण्णा कसे द्रष्टे आहेत, हे आता वीस वर्षांनंतर पटते.

१९६२ च्या माजी-विद्यार्थी स्नेह-संमेलनास मी मुद्दाम सहकुटुंब हजर राहिलो. फोटो, संमेलन व भोजन प्रसंगी अण्णांचा विनोदी व सात्त्विक सहवास लाभला. त्यांच्या घरी गेल्यावरही त्यांनी आस्थेवाईकपणे चौकशी केलीच ; पण एकांती भेटीची इच्छा योगायोगाने पूर्ण झाली. अण्णांची अगदी सकाळी फेरी असते असे समजले म्हणून लागलीच ती शांत मूर्ती जणू मोजून पावले टाकीत असलेली मी निलगिरीच्या झाडाजवळ गाठलीच. अण्णा मला त्या वेळी एखाद्या ऋषीमुनीप्रमाणे स्थितप्रज्ञ वाटले. मोजकेच बोलणे, " गुरु. बाबांबरोबर संबंध ठेवा, वाढवा. मी आता फारसे पाहात नाही. "

धार्मिक वृत्तीही आयुष्याचे निकोप स्थैर्यास कारणीभूत असते. "चिंतन" हीही एक सवय अण्णांच्या शिकवणीमुळेच अल्पमात्र का होईना अंगी बाणली आहे. सत्प्रवृत्ती व सदाचार ह्यामुळे समाजात आपल्याला एक विशिष्ट स्थान आपोआप मिळते. आपली नैतिक बाजू खंबीर असल्यावर एक प्रकारची निर्भयता, आत्मविश्वास उत्पन्न होतो व तोच आपली उन्नती करून पुढीलांसही मार्गदर्शनास उपयुक्त ठरतो. आश्रमातील बंदे-शिक्षण, बंधुप्रेम, सहकार, त्याग, प्रामाणिकपणा, संयम ह्या गुणांचे प्रत्यक्ष शिक्षण मिळाल्याने आपल्याकडे अग्रेसरत्व येऊन समाज आपोआप कौतुकाने मान देतो. हे सर्व माझ्या भाग्याने आश्रम शिक्षणाचे अध्वर्यू अण्णांमुळे लाभले ही केवढी अभिमानाची गोष्ट!

२०. तीच आग अजून आहे

श्री. दि. द. गोगटे

व्यवसाय : नोकरी, कॅशिअर, ए. सी. सी. लि.
न्यू पोरबंदर वर्क्स, सौराष्ट्र
शिक्षणकाल १९२८ ते १९३४
नोकरी सांभाळून सतत संस्थेचा प्रचार व स्वयंसेवा

कान बधिर झाले परवाच दिवाळीत मी एका सद्गृहस्थाच्या खोलीत बसलो होतो आणि याच वेळी व्हरांड्यात एका दिवाळखोर मुलाने मोठ्या ताकदीचा आपटबार फोडला, आणि माझा त्याच्या बाजूचा कान बधिर झाला. घरी आलो आणि दुसराही कान बधिर झाला तो रु. १०,००० ची ती. स्व. गुरु. अण्णांची स्वकमाईची देणगी वाचून! वाटले, हे एवढे आकाशाएवढे उंच लोक, यांचे हे अफाट हृदय यांच्या सामान्य आकाराच्या शरीरात मावते तरी कसे? यांचे हृदय अनेकांच्या हृदयात निवास करते म्हणून त्याला जागा पुरते.

वैयक्तिक प्रसंग १९६२ साली गुरु. अण्णा माझ्या घरी शहाबादला आले. मी त्यांना म्हटले "हे रु. २० स्वतःला ठेवा." ते म्हणाले, "तसे नको. आश्रम आणि मी एकच आहोत."

आश्रमाची मला देणगी १९२८ ते १९३४ पावेतो मी आश्रमात होतो. ज्या बाई आमच्या समाईक झोळीत मूठपसा धान्य टाकीत किंवा पाटाखालचे वाढलेले ताट

माझ्यापुढे सरकवीत, त्या दुबळ्या होत्या. त्यांची वस्त्रे फाटलेली होती. त्यांची ही भिक्षा वाढण्याची किंवा जेवू घालण्याची सांपत्तिक स्थिती नव्हती, हे मी ओळखे. वाटे, " किती या देवीचे थोर हृदय ! स्वतः उपाशी राहून दुसऱ्याला–एका सामान्य माणसाला वर आणण्याचा प्रयत्न ! ! केवढे मोठे हे गुप्तदान ! यांच्यासाठी मला काहीतरी केले पाहिजे. तीच आग अजून आहे, वाढते आहे. मी माझ्या ज्या ज्या आश्रमबंधूंना भेटलो त्यांच्या ठिकाणी हीच जाणीव, धगधगणारी धुनी मी पाहात असतो.

पटले तसे वागले गुरु. नानासाहेब परुळेकर यांनी परदेशी स्त्रीशी विवाह केला, तेव्हा कै. ती. स्व. दादा खूप रागावलेले मला चांगले आठवतात. गुरु. अण्णा त्यांच्यावर रागावले नाहीत. आपल्याला जे पटले तसेच ते वागले. त्यांनी आपले विचार स्वतंत्रच ठेवले. हे त्यांचे वागणे मला योग्यच वाटले.

त्यांची टापटिपीची आवड, सौंदर्यशोधक दृष्टी, विद्यार्थ्याने दाही दिशांना चोवीस तास पाहात राहिले पाहिजे हे त्यांचे म्हणणे, त्यांच्या वागण्यात मला सतत दिसे.

□ □ □

२१. पूर्वीचे आणि आजचे अण्णा

डॉ. शां. रा. महाजन, एल्. सी. पी. एस्.

व्यवसाय : स्वतंत्र दवाखाना, बेळगाव

शिक्षणकाल १९२८ ते १९३७

शांत, गोड आणि सात्त्विक स्वभावाचे एक डॉक्टर

वरवर दिसणारा फरक तोंडी परीक्षा आटोपली आणि मी संस्थेत दाखल झालो. त्यावेळी मी प्रथम पाहिलेले गुरु. अण्णांच्या चेहऱ्यावरील सात्त्विक हास्य आणि त्यानंतर १९६४ सालपर्यंत पाहात असलेले हास्य यांमध्ये काडीचाही फरक नाही. त्यांची त्या वेळची जी देहयष्टी तीच आताची ! फरक फक्त चेहऱ्यावर आत्ताशा दिसत असलेल्या थोड्याशा सुरकुत्यांचा. त्या वेळी अण्णांचा चेहरा गंभीर दिसायचा. विद्वत्तेचे तेज तेच ! बोलणे जरा मोजकेच. खूपशा बोलण्यात थोडेसे हसणे. पण आता मात्र गंभीरपणा कमी होऊन खेळकरपणा अधिक ! आता हसणे अधिक, बोलणे कमी ! त्यावेळी ते बोलताना विचारात मग्न असल्याचे दिसत. आता त्यांचे विचार बोलण्यात नि हसण्यातच प्रगट होत असतात.

दिवसाचा आढावा दुपारच्या अभ्यासाच्या वेळी कोणीही गडबड केलेली त्यांना खपत नसे. बहुतेक वेळा खोल्यांतून चक्कर मारताना ते मांजराच्या पावलांनी येत. आपल्या येण्याने मुलांचे अनावधान होऊ नये म्हणून असेल किंवा मुले कितपत एकाग्रतेने अभ्यास करीत असतात ते पाहावयाचे म्हणून असेल, जे काय त्यांनी त्या फेरी-मधून पाहिले असेल त्याची नोंद रात्री सुसंगतीत होत असे. ही सुसंगती म्हणजे आश्रमा-तील सर्व मुलांच्या दिवसभरातील बऱ्यावाईट कृत्यांचा पाढा वाचण्याची जागा ! चांगल्या कृत्यावद्दल वाहवा व वाईटावद्दल सुधारण्याची सूचना रात्री सुसंगतीच्या वेळी मिळावयाच्या.

जुलमाचा फायदा झाला 'विद्यार्थी' मासिकातून लिखाण करणे, ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडून त्यांचा सारांश लिहून गुरु. अण्णांना दाखविणे; दर आठवड्यातून एकदा वक्तृत्व-सभा घेऊन त्यामधून प्रत्येक विद्यार्थ्याला आळीपाळीने बोलावयास भाग पाडणे, ह्या सर्वांचा त्या वेळी एक तऱ्हेचा जुलूम वाटावयाचा ! पण आता इतक्या वर्षांनी त्याचे महत्त्व समजते.

चांगल्या सवयींची दीक्षा आश्रमात असताना ज्या गोष्टी अंगवळणी पडल्या त्या पुढील आयुष्यात आपल्या वागणुकीला व्यवस्थितपणा आणण्याच्या दृष्टीने फायदेशीर होत असतात, ही प्रत्येक आश्रमवासी विद्यार्थ्याच्या अनुभवाची गोष्ट आहे. रोजचा नियमित व्यायाम, रोजचे आन्हिक, व्यवहारातील सचोटी, व्यसनाधीन नसणे, चांगल्या गोष्टींची सवय लावून घेणे ह्या सर्व बाबी गुरु. अण्णांनी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी विचारपूर्वक आखून दिलेल्या दैनंदिन शिकवणुकीचाच भाग होय. माझ्याकडे आलेले पाहुणे आश्चर्याने विचारतात-- "तुम्ही रोज व्यायाम अजूनही करता ? तुम्ही चहा पीत नाही ? सकाळचे आन्हिक झाल्यावाचून काही खात नाही ?" मी नम्रपणे सांगत असतो की, "हा सर्व ज्या आश्रमात मी माझ्या आयुष्याची पहिली वर्षे घालविली तेथील शिक्षणाचा परिणाम ! हे श्रेय मला नाही. तेथील गुरुजनांना आहे."

घरगुती वागणूक डॉक्टर झाल्यावर पहिली चार वर्षे मी रेल्वेत असल्यामुळे माझी निरनिराळ्या हॉस्पिटलमध्ये बदली होत असे. निवडणुकीच्या कार्यासाठी म्हणा अगर व्याखानाच्या निमित्ताने गुरु. अण्णा त्या गावी आले म्हणजे "तुझ्याकडे येणार आहे" असे पुण्याहून पत्र पाठवून येत असत. ते आले म्हणजे आम्हां सर्व कुटुंबीयांना किती आनंद होत असे म्हणून सांगू ! घरी आले की अण्णा सर्वांशी मिळून-मिसळून राहतात. घरात जाऊन "मंदा, आज भाजी कसली करणार' म्हणून विचारणार. "तिखट बेतानेच घाल बरं," असे सांगतात. मी मुंबईस असताना ते प्रथम माझ्याकडे आले तेव्हा माझे नुकतेच लग्न झालेले होते. "तुला चहा करता येतो का ?" म्हणून सौ. मंदाकिनीला त्यांनी विचारले. हिने लाजत लाजत "होय" म्हणून सांगितले. "तुझा नवरा चहा पीत नाही तर तुला कशाचा येणार आहे ?" असे म्हणून लगेच पाट घेऊन बसले व स्टोव्ह कसा पेटवावयाचा इथपासून चहा कपात ओतण्यापर्यंतचे

प्रात्यक्षिक करून दाखविले. मलकापूरला १९५० साली माझ्याकडे ते आले असता सौ. मंदाकिनी थोडीशी आळसावलेली होती. माझी दुसरी मुलगी पोटात होती. एकूण रागरंग पाहून अण्णा म्हणाले, " मंदा, अधिक काही करण्याच्या भानगडीत पडू नकोस. पाट-पाणी वगैरे चिल्लर कामे आम्ही करतो. तू विश्रांती घे वधू. " आता सांगा, असे अण्णा घरी आल्यावर परके कोणी आल्यासारखे वाटेल का ?

मागील आठवणी १९६४ च्या सुरुवातीची गोष्ट. नंदगड येथील मराठी शाळेचा शतसांवत्सरिक उत्सव गुरु. अण्णांचे अध्यक्षतेखाली होणार होता. त्यांनी मला नंदगडबद्दल माहिती विचारून आपल्या वरोबर तिकडे येण्याविषयी पुण्याहून पत्र पाठविले. उत्सव-समितीला पण मला " निमंत्रण पाठवा " लिहायला ते विसरले नाहीत. जाताना गाडीत इकडच्या तिकडच्या गप्पा चालू असताना " अरे तुझा तो डॉ. गजेवार भेटला होता " असे सांगून त्याचेविषयी माहिती सांगितली. आश्रमात असतानाच्या वेळच्या जोडचा लक्षात ठेवून वेळप्रसंगी त्याचा उल्लेख खेळकरपणे करणे हे गुरु. अण्णाच करू जाणोत त्या छोटचाशा प्रवासात मी विसरून गेलेल्या एका प्रसंगाची आठवणही त्यांनी करून दिली. " तू आश्रमात असताना पिकनिकच्या वेळी गाणी म्हणत होतास तुला आठवते कारे ? " " आजि लागे हृदयी हुरहूर " हे तुझे गाणे मला अजूनही आठवते " असे सांगून माझी त्यावेळची नक्कल करीत म्हणून सुद्धा दाखविले. मी आणि दुसरे माजी विद्यार्थी बाबुराव पाळधीकर पोट धरधरून हसलो.

हिशेबी चोख गुरु. अण्णांचा चोख हिशोबीपणा त्याप्रसंगी पाहायला मिळाला. उत्सव-समितीच्या चालकांनी " प्रवासाचा खर्च किती द्यायचा " असे विचारले; गाडी-भाडचाचा जो झाला तोच सांगितला. मला परत जाण्यासाठी रिझर्व्हेशन करायला सांगितले होते. मी ३० रु. देऊन रिझर्व्हेशन केले. बेळगावहून जाताना ते पैसे देऊ लागले तेव्हा मी " आश्रमाची वार्षिक वर्गणी २४ रुपये व समाचार मासिक्राची १ रु. तेवढी भरा " म्हणून सांगितले. पुण्याहून मला पुढे दोनच्या ऐवजी तीन पावत्या आल्या. तिसरी पावती पाच रुपये आश्रमाला देणगी म्हणून माझे नावे जमा झाली त्याची होती. गुरु. अण्णांच्या सारखी निर्व्यसनी, निःस्वार्थी, अंगीकृत कार्यामध्ये निरंतर रत असणारी व चोख हिशेबी माणसेच सार्वजनिक कार्याची वाढ निरागसपणे करू शकतात.

शिक्षेपेक्षा शिक्षण गुरु. अण्णांच्याकडून शिक्षा करून घेण्याचा प्रसंग माझ्यावर आला नाही. माझ्या नऊ वर्षांच्या आश्रमीय आयुष्यात दुसऱ्या कोणाला पण शिक्षा करताना मी पाहिले नाही. जे प्रसंग तेव्हा व नंतर आले ते त्यांचेकडून शिक्षण घेण्याचेच. त्यांतील काही जसे आठवले तसे लिहिले. गुरु. अण्णांचा मला लाभलेला व मधून मधून लाभत असलेला सहवास हा माझ्या आयुष्यातील आठवणींचा अमोल ठेवा आहे, असे मी मानतो.

२२. आता आम्ही जवळ आलो

श्री. स. ग. सावरकर

व्यवसाय : सेक्रेटरी, सिताराम मिल्स, मुंबई व भिवंडी सहकारी सूत कारखान्याचे संस्थापक.

शिक्षणकाल १९२८ ते १९३६

औद्योगिक कारभार आणि संघटना या क्षेत्रांत वाकबगार

आमची बालदृष्टी आमच्या दृष्टीने मॅट्रिकची परीक्षा म्हणजे फार मोठी परीक्षा होती. परीक्षा पास व्हावयाच्या अगोदरही आम्हांला नोकऱ्या दिसत होत्या. काव्यमय आयुष्य दिसत होते. शाळेतले आयुष्य तुरुंगमय झाले होते. कंटाळलो होतो आम्ही, मधुकरी मागावयास, संडास झाडण्यास आणि शेण आणण्यास. संस्थेतील प्रत्येक गोष्ट त्यामुळे आम्हांला वाईट दिसत होती. परिस्थितीने आम्ही असहाय आहोत, आमच्या शिक्षणाची सोय कोठे नाही आणि आहे हीही सोय नाहीशी झाली तर आम्हांला हॉटेल, खाणावळी यांशिवाय दुसरा रस्ता नव्हता, हे सुद्धा आम्ही विसरलो होतो.

अण्णांचा दृष्टिकोन १९३४ मध्ये गुरु. अण्णा अमेरिकेहून परत आले. अत्यंत कडक शिस्तीचे व शासनाचे ते भोक्ते होते अशी त्यांची ख्याती होती. आमचा सर्व वर्गच बंडखोर, नालायक व संस्थेत राहाण्यास अयोग्य अशा विद्यार्थ्यांचा होता. आपलीही आता खैर नाही असे आम्हांस वाटत होते.

गुरु. अण्णांना अमेरिकेहून आल्यावर इतर सर्व कार्यक्रमांमुळे आमच्या वर्गाकडे पाहाण्यास फारच थोडा वेळ मिळाला. १९३४–३५ मध्ये ते सरासरी आठवड्यातून एखादाच तास आमच्यावर येत असत असे मला स्मरते. पण विशेष म्हणजे त्यांचा आमच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित नव्हता. त्यामुळे आमचा त्यांच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलत होता. आमच्या अस्मितेला धक्का लागेल असे वाक्ताडन करण्याचे तर राहूनच गेले, पण एक प्रकारचा विश्वास निर्माण करण्याची त्यांची भावना आम्हांस जाणवू लागली होती.

बाहेरचे जग मे १९३५ मध्ये मी शाळा सोडली. पिंजऱ्यातून बाहेर पडण्याचाच आनंद जेमतेम काय तो समजला. घरची परिस्थिती अत्यंत स्फोटक होती. तीर्थरूप आणि मातोश्री डोळे लावून दिवस काढीत होती. त्यांच्या विरुद्ध मला कसलीही कुरकुर करण्यास जागा नव्हती. जास्तीत जास्त शारीरिक मेहनत करूनही, मुलांना आणि त्यांना 'माध्यान्ह' काळ कसा भागविता येईल या विवंचनेतून त्यांची सुटका होतच नव्हती. काळच फिरला होता. २५ रुपयांच्या नोकरीसाठी ५००।५०० अर्जदार कचेऱ्यांमधून गर्दी करीत होते. शाळेतल्या कसल्याच शिक्षणाचा

आता आम्हांस उपयोग नव्हता. चार ठिकाणी जाऊन चौघांसमक्ष खुर्चीवर बसून बरोबरीने बोलण्याचेही आम्हाला मनोधैर्य नव्हते. समाजात वावरावयाचे शिक्षण मला आता आपोआपच मिळावयास लागले होते.

आम्हांला आवाहन १९४४ किंवा १९४५ मध्ये श्री. अप्पासाहेब मराठे ह्यांचा ब्राह्मणसभेत सत्कार झाला. गुरुवर्य अण्णांनी आम्हा सर्व हजर असलेल्यांना अत्यंत कळकळीने आवाहन केले आणि त्या दिवसापासून माझ्या मनाने पलट खाल्ली. माझ्या मनातले सर्व गैरसमज बाजूला होऊ लागले. सर्व गोष्टी स्पष्ट दिसू लागल्या. १९४७ मध्ये गुरुवर्य अण्णांना आश्रमात जाऊन भेटलो. माझ्या दृष्टीला सर्वच गोष्टी पालटलेल्या दिसू लागल्या. आश्रमात जाऊन यावेसे वाटू लागले. सर्व गुरुजनांना भेटण्याची उत्कंठा लागू लागली व १९५२ नंतर या ना त्या प्रसंगाने शाळेत जाण्याची संधी मी शोधू लागलो.

'मासिक समाचार' वर्गणी न भरताही सतत येऊ लागला. मासिकाच्या रूपाने गुरु. अण्णा आमचेशी बोलत आहेत असे मला प्रत्यही वाटावयास लागले. अंतर्मनातून आंदोलन सुरू झाले. आम्ही माजी विद्यार्थ्यांनी आपले ऋण फेडले नाही तर हां पसारा, हे चालू असलेले कार्य पुरे कसे पडणार अशी वोचणी सुरू झाली.

सी. डीं. चे भाषण १९५९ मध्ये श्री. सी. डी. देशमुखांच्या हस्ते नवीन इमारतींचे उद्घाटन झाले. त्यांनी केलेले भाषण आजही मला चांगले स्मरते. "विद्यालयाचा शिक्षकवर्ग जितका प्रेमळ तितकाच तो त्यागी आहे. महाराष्ट्रातल्या भौगोलिक परिस्थितीचे आश्रमात वास्तव दर्शन होते. एवढा मोठा पसारा पण अण्णा म्हणतात, 'आजची काळजी आपण करू या, उद्याची सोय परमेश्वरावर ठेवू या.' अशा तऱ्हेच्या त्यांच्या उद्गारांत त्यांची तळमळ, त्यांची निष्ठा यांचेच दर्शन होते. अशा तऱ्हेचे ते काही म्हणाल्याचे मला स्मरते.

आता आम्ही जवळ आलो या आणि अशा तऱ्हेच्या प्रत्येक प्रसंगाने मला आता गुरुवर्य अण्णांचे विशाल दर्शन घडत आहे, आणि तितका तितका मी त्यांच्याजवळ ओढला जात आहे.

गीतेवरील त्यांचे विचार आणि त्यांचे कर्मयोगी जीवन मला आता फार जवळून पाहाता येत आहे, आणि जितका मी त्यांना जवळून पाहात आहे तितक्याच गतस्मृती मला धक्का देत आहेत.

कोणी सांगावे त्यांच्या विशाल आणि अहंकारशून्य व्यक्तिमत्वातून अजूनही आम्हांला चांगले आणि उज्ज्वल मार्ग दिसतील.

□ □ □

२३. मी तुझा कोणी लागतो की नाही ?

श्री. ना. मा. भंडारे, डी. एम्. इ. इ.
व्यवसाय : इलेक्ट्रिकल इंजिनिअर, साखरवाडी, सातारा

शिक्षणकाल १९२९ ते १९४१

नोकरी सांभाळून कामगार व ग्रामीण जनतेची सेवा करतात

कॉलेजप्रवेश व फीचा प्रश्न मॅट्रिक झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण आश्रमात राहून घेण्याचा योग फार कमी विद्यार्थ्यांना लाभत असे. गुरु. अण्णांच्या सहानुभूतीमुळे मला आश्रमात राहाण्याचा योग मिळाला. मी त्यांच्या संमतीने इंजिनिअरिंगमधील मेकॅनिकलचा डिप्लोमा कोर्स घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कॉलेजमध्ये अर्ज केला. लागणाऱ्या खर्चाकरिता भावाकडून मदत मिळाल्यास पाहावे म्हणून मी पैठणला गेलो. भाऊ पैसे द्यावयास काही अटींवर तयार होता, पण त्या मला मान्य नसल्याने मी त्याची मदत नाकारली. या सगळ्या प्रकरणात मला बेळेवर पुण्यास येता आले नाही. कॉलेजमध्ये प्रवेश मिळून त्याचा उपयोग झाला नाही. गुरु. अण्णांनी तातडीचे पत्र पाठवून असेल तसे बोलावून घेतले. मी पैसे मिळाले नसल्याने येण्याचे टाळले. त्यांनी मला मूर्खांतच काढले. ते मला म्हणाले, "तुला शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशाची काळजी करणारा मी आहे. मी तुझा कोणी लागतो की नाही ? या वर्षी नाहीतर पुढच्या वर्षी प्रयत्न कर. तो पर्यंत तू प्रात्यक्षिक शिक्षण घेण्यास जवळच्या 'मराठे मोल्डिंग शॉप' मध्ये जात जा." इतक्या आपुलकीने कोण कोणाची चौकशी करतो ? मला गुरु. अण्णा परमेश्वराप्रमाणे लाभले आणि म्हणूनच केवळ त्यांच्या या सहानुभूतीमुळे मी माझा इंजिनिअरिंग कोर्स पुरा करू शकलो.

बारा वर्षे आणि भावी आयुष्य गुरु. दादा व गुरु. अण्णांचा आदर्श सतत बारा वर्षे डोळ्यांपुढे होता. त्यांचेकडून ज्या चांगल्या गुणांची देणगी मिळाली तिचा मला माझ्या भावी आयुष्यात सतत फायदा होत गेला. नोकरीवर असताना पुष्कळच बऱ्या-वाईट सवयीच्या लोकांशी संबंध आला. परंतु ज्या गोष्टी वर्ज्य करण्याची आवश्यकता होती त्यांपासून मी दूरच राहात आलो.

सामाजिक कामाची दीक्षा समाजाच्या उपयोगी पडावे म्हणून गेल्या निवडणुकीत ग्रामपंचायतीत निवडून आलो. पुष्कळच योजना पुऱ्या केल्या आहेत; त्या कामगारांचे दृष्टीने त्यांना उपयोगी पडतील.

गरीब विद्यार्थ्यांना जरूर ती मदत करण्याचा प्रयत्न चालू असतो. मला मिळालेली मदत ही अंशतः जरी समाजास परत करता आली तर बरे असा माझा प्रयत्न असतो.



२४. माझा व कुटुंबियांचा मार्गदर्शक

श्री. मो. ल. कुलकर्णी, डी. एम्. इ. इ.
व्यवसाय : इरेक्शन इंजिनियर, वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. वालचंदनगर

शिक्षणकाल १९२९ ते १९३६

स्वतःच्या अनुभवाने व कर्तबगारीने वरच्या श्रेणीला चढले

नासिक शाखेमध्ये मी फक्त एकच वर्ष होतो. नंतर पुढच्या वर्षी पुण्यास आलो. गुरुवर्य अण्णा त्यावेळी अमेरिकेत होते. अण्णा आता लवकरच मायदेशी परत येणार आहेत, अशी बातमी एक दिवस कोणीतरी सांगितली. संस्थेमधील सर्व विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलून गेले. वातावरण अतिशय आनंदी झाले. मी पण अण्णांना भेटण्यास उत्सुक होतो. गुरु. अण्णा एक दिवस क्लासमध्ये आले व तो सोनियाचा दिवस उजाडला.

मी १९३६ साली मॅट्रिक पास झालो. महाराष्ट्र विद्यालयातून परीक्षेस जाणारी आमचीच पहिली बॅच. गुरु. अण्णा त्यावेळी आम्हांला शिकवत असत. संस्थेच्या इतर कार्यक्रमांमध्ये पण भाग घेत. अशाच एका रात्रीच्या प्रार्थनेच्या वेळी त्यांनी "लोकसंग्रह" या शब्दावर फारच सुंदर उपदेश केला. लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे, श्री. आगरकर यांची उदाहरणे देऊन त्या शब्दाचा अर्थ विशद केला. गुरु. अण्णांच्या बुद्धिमत्तेचा हा जो पैलू मी जवळून पाहिला व जे संस्कार मनावर झाले ते अद्यापही कायम आहेत. अगदी आईवडिलांच्या प्रेमाने संस्थेने आम्हांस वाढविले व आजन्म ऋणी केले.

थोडक्यात मी असे सांगू शकेन की गुरु. अण्णांनी संस्थेत असेच शिक्षण दिले की त्यामुळे विद्यार्थ्यांपुढे काहीतरी ध्येय निर्माण झाले व ध्येयाकरता प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली. शिक्षण ही तपस्या आहे. त्याकरता केवढेही कष्ट केले तरी कमीच असतात. 'समाचार' काढून त्यांनी माजी विद्यार्थ्यांची अतिशय चांगली संघटना उभी केली आहे. त्यांच्या प्रेमामुळेच संस्थेवर असंख्य माजी विद्यार्थी प्रेम करीत आहेत हे त्यांचे व संस्थेचे ऋण फार मोठे आहे. 'समाचार' मधील पहिले पान गुरु. अण्णांच्या विद्वत्तेचा उत्तम नमुना आहे व माझ्यासारख्या त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांचा हा अमोल ठेवा आहे. 'समाचार' माझा व माझ्या कुटुंबियांचा मार्गदर्शक आहे.

□ □ □

२५. प्रत्येक क्षेत्रातील मार्गदर्शन

वैद्य न. पां. सामंत, आयुर्विद्या विशारद, टि. म. वि. पुणे
व्यवसाय : वैद्यकी, ठाणे. माजी संपादक, आरोग्यमंदिर

शिक्षणकाल १९२९ ते १९३८

'आरोग्यमंदिर' मासिकातून लेख व मुलाखती यांच्याद्वारे आरोग्यज्ञानाचा प्रसार

प्रत्येक क्षेत्रात लक्ष गुरुवर्य अण्णा ऐन तिशीत होते त्या कालात माझा आश्रमात प्रवेश झाला. त्यानंतरची सुमारे दहा वर्षे त्यांचे मला सान्निध्य लाभले, म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाच्या गेल्या ४५ वर्षांपैकी ३६ वर्षांचे जीवन माझ्या दृष्टीपुढे आहे. त्यावेळचे अण्णा आजही मनःचक्षूपुढे उभे राहतात. काळ्याभोर मिशा, काळा कोट, काळी टोपी, पांढरे शुभ्र धोतर, डोळ्यांवर सोनेरी काडीचा चष्मा आणि गौरकाय तरतरीत व्यक्ती – अशा स्वरुपात त्यांचे प्रथम दशन झाले. त्यावेळी मी पंधरा वर्षांचा नवीन विद्यार्थी होतो. विद्यालयात अण्णांचा अध्यापक म्हणून, तर इतर अनेक क्षेत्रांमधून मार्गदर्शक म्हणून हरघडी जवळून संबंध येई. विद्यालयातील अध्ययन-अध्यापन यांकडे लक्ष देत असताना, तर व्यायाम शाळेत आम्ही मल्लखांबावरून उड्या मारीत असतानाही अण्णा आम्हांस नकळत जवळपास उभे दिसत. उडी किती उंचीवर टाकावी ते अण्णा सप्रयोग सांगत. व्यायामाच्या वेळात अण्णा स्वतः आसने करून दाखवीत, एवढेच नव्हे तर आसनांची आरोग्यदृष्ट्या फलश्रुती सांगत. आमच्या अभ्यासाच्या वेळात निवासातून फेरी करीत तेव्हा अभ्यासाला कसे बसावे, काय वाचावे, काय वाचू नये ते सांगत, आणि इतकेही करून अनेक विशेष प्रसंगी रात्री 'सुसंगती' मध्ये उद्बोधक विचार सांगत. तात्पर्य, अण्णा आम्हांला आमच्या आश्रमातील प्रारंभीच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये बहुमोल मार्गदर्शन करीत. त्यांचा माझ्या सर्वांगीण जीवनावर परिणाम झाला आहे. सर्वांचा हाच अनुभव असणार !

अध्ययनातील मार्गदर्शन आमच्या वेळचे मॅट्रिकचे विद्यार्थी अभ्यास खूपच करीत असत. तसा अभ्यास करण्याची प्रवृत्ती मी आधी आणि नंतरही पाहिली नाही. एका सुसंगतीमध्ये अण्णांनी अभ्यास कसा व किती करावा याचे उत्तम मार्गदर्शन केले. घोकंपट्टी करण्यापेक्षा अभ्यासाच्या वेळी चित्तप्रवृत्तीची स्थिरता व चिंतन आणि मनन यांवर भर द्यावा असे ते वारंवार सांगत. या मार्गदर्शनाचा मला विद्यार्थीदशेत आणि पुढील आयुष्याच्या कालात लेखन वाचनाच्या व्यवसायात मोठा फायदा झाला. विशेषतः 'आरोग्यमंदिर' मासिकासाठी लेखन करताना थोरामोठ्यांची भाषणे, मुलाखती,

विचार इत्यादी स्वरुपाचे लेखन करताना चिंतन, मनन आणि टिपण यांचा अधिक उपयोग झाला. याचे श्रेय अण्णांच्या त्यावेळच्या मार्गदर्शनाला दिले पाहिजे.

वाचनाची आवड लावली आश्रमीय विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाकडे अण्णांचे विशेष लक्ष असे. आमच्या त्या वेळच्या कार्यक्रमामध्ये ज्ञानार्जन (सामान्य ज्ञान व इतर वाचन) हा एक सक्तीचा कार्यक्रम होता. चरित्र-ग्रंथ, शास्त्रीय, ऐतिहासिक, धार्मिक वाङमय, प्रत्येकाने नित्य थोडे तरी वाचन करायचे आणि त्याचे टिपण करायचे असा अण्णांचा कटाक्ष होता. या टिपणांच्या आमच्या वह्या अण्णा मधून मधून स्वतः पाहात असत. त्या त्या विषयावर कोणते पुस्तक अगर अधिक संदर्भ कसा उपलब्ध करता येईल तेही सांगत. त्याचाच परिणाम म्हणून विद्यार्थीदशेत माझे भरपूर वाचन झाले व त्याचा पुढे जीवनात लाभही झाला. माझ्या स्मरणाप्रमाणे त्यावेळी म्हणजे वयाच्या १६–१७ व्या वर्षी स्वामी विवेकानंद, रामतीर्थ, स्वा. सावरकर, केळकर, खांडेकर, ना. ह. आपटे यांचे वाङमय, लो. टिळक, म. गांधी, सुभाषचंद्र बोस, टागोर, न्या. रानडे, इ. भारतातील महान व्यक्तींची चरित्रे वाचून झाली. विशेषतः विद्यार्थीदशेतील थोरांच्या चरित्रवाचनाचा माझ्यासारख्या भावनाविवश मनावर फार परिणाम झाला. एक-एक व्यक्ती आपल्या जीवनात केवढे महत्त्वाचे कार्य करू शकते हे वाचून स्फूर्ती मिळाली.

सूर्यस्नानाचे प्रात्यक्षिक अण्णांना ज्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या हिताच्या वाटत त्यांचा ते लगेच अंगीकार करीत. सूर्यस्नानाचे प्रात्यक्षिक हा एक त्यांतीलच उपक्रम आहे. त्यावेळच्या विद्यालयात सकाळ सायंकाळचे वर्ग असत. मला वाटते १९३४ साल असावे. सकाळच्या आठ-साडेआठच्या सुमारास दोन पीरियड्सच्या मधल्या सुटीत अण्णा विद्यार्थ्यांना घेऊन उन्हात जात. स्वतः कपडे काढून उन्हात उभे राहात आणि आम्हा विद्यार्थ्यांची उन्हात कवायत करून घेत. कपडे काढून उन्हात कवायत आणि दीर्घश्वसन करावयाचे अशासारखा तो उपक्रम होता. वीस मिनिटे हा नित्य कार्यक्रम चाले. सकाळच्या वालरवीच्या त्या किरणांमध्ये मनास मोठा आल्हाद वाटे. आश्रमातून बाहेर गेल्यानंतरही मी तशा प्रकारचे सूर्यस्नान काही काल घेत असे.

लांबून जवळचे संबंध गेल्या सुमारे पंचवीस वर्षांमध्ये अण्णांचा लांबून संबंध आला. या कालात अण्णांच्या वर्षातून दोनदा तरी भेटी होत. ते माझ्या प्रचलित कार्याबद्दल नेहमी प्रोत्साहन देत. त्यामुळे अंगीकृत कार्याबद्दल काम करण्यास माझा उत्साह वाढे. अशा प्रकारे आश्रमाच्या बाहेर गेल्यावरच अण्णांचे जवळून संबंध आले. प्रत्येक भेटीमध्ये अण्णा अधिक मनमोकळेपणाने वागत. किंबहुना गुरुशिष्याचे नाते क्षणभर बाजूला ठेवून आता ते मित्रत्वाने वागू लागले. उत्तरोत्तर त्यांच्यामध्ये अधिकाधिक खेळकर वृत्ती दिसून येते. अण्णांच्या वृत्तीमध्ये अशा स्वरुपाचा बदल झालेला दिसला तरी त्यांच्या विचारांचे गांभीर्य, पावित्र्य आणि प्रगल्भता कायमच असलेली दिसून येते.

अण्णांच्या सुविचारांचे सातत्य आम्ही विद्यार्थी आश्रमात असताना अण्णा अनेक प्रसंगी सुविचार सांगत, मार्गदर्शन करीत. आता 'समाचार' मासिकामधून नियमितपणाने ते सद्‌विचारांचा प्रसार करीत आहेत. वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक अशा नित्य नैमित्तिक बाबी संबंधांचे विचार अण्णा साध्या पण परिणामकारक भाषेमध्ये मांडीत असतात. अण्णांचे प्रसिद्ध होत असलेले हे विचार उद्‌बोधक आणि आत्मसंशोधन करण्यास लावणारे व प्रत्यक्ष अंगीकार करण्याजोगे असतात. 'समाचार' हाती पडताच मी तरी प्रथम अण्णांचे हे पहिल्या पानावरील सुविचार वाचून तेथे थोडा वेळ थांबून मग पुढे जातो. अण्णांचे अलीकडील हे लघुलेखन बहुमोलाचे ठरले आहे. 'आरोग्यमंदिरा' कडे असताना अण्णांचे हे विचार मी अनेक वेळा पुनर्मुद्रित केले आहेत. महाराष्ट्रामधील इतर अनेक लहानमोठ्या नियतकालिकांमधूनही त्यांचे हे विचार पुनर्मुद्रित होत असतात.

अण्णांचा संपर्क आल्यापासून आजतागायत माझ्यासारख्या हजारो व्यक्तींना अण्णांनी अशा प्रकारे शिक्षण दिले आहे, प्रेरणा दिली आहे.

▱ ▱ ▱

२६. सवयी कायम आहेत

श्री. ज. म. वाठारे

व्यवसाय : नोकरी, ईगल स्टार इन्शुअरन्स कं. लि. फायर डिपार्टमेंट

शिक्षणकाल १९२९ ते १९३४

विमा व्यवसायात अनुभवाने व कर्तबगारीने कार्य

स्वतःच्या मनाची शिक्षा आश्रमात असताना एका रविवारी आम्हा आश्रमीय विद्यार्थ्यांना गावातील नातलगांना भेटायला जायची परवानगी मिळाली. मी व इतर काही मित्र मिळून सिनेमाला गेलो. नंतर ही बातमी गुरुवर्य अण्णांना समजली. अण्णांचा स्वभाव फार रागीट आहे याची आम्हांला कल्पना होती. आता ते आपल्याला चांगलीच शिक्षा करणार याची आम्हांला भीती वाटू लागली. परंतु प्रत्यक्षात निराळाच प्रकार घडला. गुरुवर्य अण्णांनी आम्हांला आमचा अपराध समजावून सांगून प्रत्येकाने स्वतःच्या मनाने शिक्षा घ्यावी असे सांगितले. गुरुवर्य अण्णांना शारीरिक शिक्षा देण्यापेक्षा मानसिक शिक्षा घ्यावयास लावणे अधिक पसंत पडे. यामुळे आमची वर्तणूक सुधारून आमचा पुष्कळ फायदा झाला.

त्यावेळी गुरुवर्य अण्णांच्या स्वभावातील एक नवा पैलू आमच्या दृष्टीस पडला.

आयुष्याची शिदोरी संस्थेतील शिक्षणामुळे मला चांगले वळण लागून माझे आयुष्य सुखी व समाधानी झाले.

आईवडील नसताना व कोणाचा धाक नसताना मी प्रथम मुंबईसारख्या अफाट शहरात आलो ते संस्थेची शिस्तीची आणि उत्तम वागणुकीची शिदोरी घेऊनच ! व ती शिदोरी मला माझ्या आयुष्यात पुरत आहे आणि पुरत राहील !

गुरुवर्य अण्णांनी माझ्यावर पुत्रवत प्रेम केले व संस्थने माझे आईसारखे पालन केले. संस्थेत असताना मला आईची उणीव एकदाही भासली नाही. संस्था म्हणजे माझे माहेर आहे व त्यामुळे वर्षांतून एकदा तरी मी तिला भेट देतो व भेट दिल्यावर मुलगा जसा आपल्या आई-वडिलांना भेटून येतो तसे अवर्णनीय समाधान मला होते.

२७. शिकवणाराही शिकतो–घडवणाराही घडतो

श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए., एम्. एड्.
व्यवसाय : डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य
शिक्षणकाल १९२९ ते १९३५
शिक्षण खात्यातील एक कर्तबगार तरुण प्रशासक

दोन प्रभावी संस्कार कर्ते संस्थेचा जन्म १९०९ साली झाला. मी संस्थेत १९२९ साली पदार्पण केले व सन १९३५ साली माझे सहा वर्षांचे वास्तव्य पूर्ण करून संस्था सोडली. आज संस्थेच्या निर्मितीपासून ५५ वर्षांचा कालावधी लोटला आहे. या ५५ वर्षांच्या अवधीत संस्थेच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. ही सर्व स्थित्यंतरे गुरुवर्य कैलासवासी दादा केतकर व गुरुवर्य अण्णा खैर यांच्या जीवनातील स्थित्यंतरांशी निगडित आहेत. संस्थेशी वेळोवेळी संबंध आलेल्या व आजन्म संस्थेची सेवा करणाऱ्या अनेक गुरुवर्यांच्या जीवनाचाही या स्थित्यंतरांशी कमी संबंध आलेला नाही. परंतु ज्या दोन अत्यंत प्रखर व प्रभावी व्यक्तींनी संस्थेचे जीवन घडविले, बनविले व बदललेही त्यांत जास्तीत जास्त वाटा दादांचा व अण्णांचा आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाही. या दोन महान व्यक्तींपैकी दादांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव

जीवनाची चिरंतन स्वरूपाची मूल्ये आश्रमीय जीवनात रुजवण्यास व वाढवण्यास कारणीभूत झाला. आश्रमाचे स्थायी जीवन दादांनी घडविले व बनविले. अण्णांनी जीवनातील प्रवाही व बदलणारे स्वरूप लक्षात घेऊन दादांनी निर्माण केलेल्या प्रथांना शास्त्रीय भूमिकेवर आणले व आश्रमीय जीवनाचे दादांनी जे एक रेखीव व आखीव यंत्र बनविले होते व त्यात यांत्रिक कृत्रिमपणा आणला होता तो अण्णांनी घालविला. अण्णांनी जीवनाचे चैतन्यशील स्वरूप व बदलणारे शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र ओळखून विद्यार्थ्यांचे जीवन या यंत्राच्या कचाट्यातून सोडविले व त्याला स्वच्छंदाने व नैसर्गिकरीतीने वाढू देण्याची मुभा दिली. दादांनी एकतेची बीजे रुजविली व अण्णांनी व्यक्तिवैचित्र्य व जीवनातील विविधतेचे तत्त्व ओळखून दादांनी निर्माण केलेल्या एकतेत विविधतेला मानाचे स्थान दिले. या दोन असामान्य व्यक्तींनी, गेल्या ५५ वर्षांत जे हजारो विद्यार्थी आश्रमात आले आणि गेले, त्यांपैकी प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कायमचे ठसे उठविले. जीवनात कोठेही न मिळणारी जीवनमूल्ये रुजविली. आश्रम सोडून गेलेला असा एकही विद्यार्थी आज नाही की गुरु. दादा आणि गुरु. अण्णा यांचे हे ऋण मानीत नाही. आश्रमात राहून गेलेल्या विद्यार्थ्यांना तर या गोष्टीची जाणीव आहेच पण त्या विद्यार्थ्यांच्या सहवासात आलेल्या इतर व्यक्ती आश्रमातील जीवनात आम्ही जी जीवनमूल्ये कमविली, ती मानतात. तुम्ही दादांचे वा अण्णांचे विद्यार्थी आहात असे ते आम्हांला संबोधतात. या साध्या वाक्यात आम्हाला आमचा गौरव झाल्यासारखा वाटतो व दादा आणि अण्णा यांनी आमच्या जीवनात जी प्रकाशज्योत लावली त्याबद्दल अभिमानाने छाती फुगते. शाळेतील पुस्तकातले चार धडे शिकविण्याचे गुरुत्व व साऱ्या जीवनातल्या लहान लहान वृत्तीवर प्रक्रिया व संस्कार करून सारा जीवनप्रवाह बदलणे, व व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना पूरक, सहाय्यक व पोषक होईल असे विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व घडविणे यांतील गुरुत्व सारखे कसे असणार!

जीवनमूल्यांचे वातावरण मी संस्था सोडल्यापासून ३० वर्षांचा काळ लोटला आहे. मी नौकरी करावयास सुरुवात करूनही २५ वर्षांचा कालावधी लोटला आहे. मी शिक्षणक्षात्यातच नौकरी करीत असल्याने गेल्या २५ वर्षांत शिक्षणसंस्था, वसतिगृहे, आश्रम या व तत्सम अशा शेकडो संस्थांचा व माझा सतत संबंध आला. पण अनाथ विद्यार्थी गृहासारखी एकही संस्था माझ्या दृष्टोत्पत्तीस आली नाही. अनेक वसतिगृहे मी पाहिली. प्रत्येक वसतिगृहाचे स्वरूप एखाद्या व्यक्तित्वाच्या स्वरूपासारखे असते. किंबहुना सामाजिक संस्था देखील आपापल्यापरीने आपले व्यक्तित्व घडवीत असतात. मी शेकडो संस्थांची ही घडविलेली व्यक्तित्वे अगदी जवळून पाहिली आहेत. पण अनाथ विद्यार्थी गृहासारखे निश्चित, प्रभावी व प्रखर व्यक्तित्व मी एकाही संस्थेत पाहिले नाही, हे मी माझे दुर्दैव मानतो व पर्यायाने राष्ट्राचेही. अनेक विद्यार्थी एकत्र राहू लागल्यानंतर विद्यार्थी-जीवनातील असामान्य स्वरूपाची मूल्ये त्या वातावरणात वावरली नाहीत तर त्या जीवनाला काही अर्थ राहात नाही. दुर्दैवाने अनेक संस्था अशा पाहाव्या लागल्या की उत्कट जीवनमूल्यांचा त्या ठिकाणी नुसताच अभाव नव्हता तर

अनावश्यक जीवनमूल्ये त्या ठिकाणी जोमाने वाढत होती. अशा अनेक संस्था-चालकांना काही दिवस संस्थेत येऊन राहण्याचा मी आग्रह केलेला आहे. संस्थेतील आश्रमीय जीवनाची ही झाली एक झगझगीत व प्रकाशमान बाजू. याच्याबरोबर आश्रमीय जीवनाला दुसरीही बाजू आहे. ती म्हणजे कडक व कडव्या शिस्तीची. हा कडकपणा व कडवेपणा व पर्यायाने कडवटपणादेखील संस्थेच्या पूर्व आयुष्यात अतिरेकाला गेलेला होता.

व्यक्तिमत्त्वाची मीमांसा अनेक व्यवस्थापक आश्रमीय वातावरणात वाढले. त्यांतील प्रत्येकाचे व्यक्तित्व विशिष्ट स्वरूपाचे बनले. आश्रमातील विद्यार्थी व शिक्षक या सर्वांवर गुरुवर्य दादांच्या असामान्य त्यागाच्या व शिस्तीच्या जीवनाचे कमी अधिक प्रमाणात प्रतिबिंब पडले. अण्णांचेच व्यक्तित्व असे घडले की त्यांनी सामान्य माणसांच्या जीवनातील व असामान्य त्यागी माणसांच्या जीवनातील जीवनोपयोगी, समाजोपयोगी व राष्ट्रोपयोगी जीवनमूल्ये वेचली व आपल्या व्यक्तित्वात त्यांना अशा रीतीने सामावून घेतले की त्यांचे व्यक्तित्व सर्वच दृष्टींनी असामान्य व अनन्यसाधारण झाले. त्यांच्या जीवनात खऱ्या संसारी माणसांचा प्रेमळपणा आला, वात्सल्य आले, सहानुभूती आली, कारुण्य आले; किंबहुना मानवी जीवनाची स्खलनशील-ताही त्यांनी मानली. त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तित्वात दादांच्या शिस्त, त्याग, या सर्व सद्गुणांचा तितक्याच प्रकर्षाने आविष्कार झाला. अण्णांचे व्यक्तित्व म्हणजे मानवी जीवनातील अनेक मूल्यांचा व सद्गुणांचा सुरेख संगम. त्या व्यक्तित्वाचे शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. ते व्यक्तित्व त्यांच्या सहवासात हरघडी जाणवते.

या व्यक्तित्वाला अनेक दृष्टींनी असामान्यत्व आले. माझ्या मते त्याचेही विवेचन करता येण्यासारखे आहे. काही माणसे सद्गुणी असतात. सद्गुणी असणे हे पुष्कळ वेळा व्यक्तिनिष्ठ किंवा आत्मानुदर्शी असते. (सब्जेक्टिव्ह्). काही माणसे सद्गुणी असून त्यांचे हे व्यक्तित्व विषयानुदर्शी (ऑब्जेक्टिव्ह्) बनते. अण्णांच्या व्यक्तित्वात विषयानुदर्शित्व आले. त्यांचे व्यक्तित्व त्यांच्या सद्गुणांच्या बाबतीत इतरांना त्यांच्या सहवासात सारखे जाणवते. अण्णांच्या व्यक्तित्वाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची विद्वत्ता आणि त्यांचा बहुश्रुतपणा. विशेषतः शिक्षण व शैक्षणिक प्रश्नांवर अण्णांनी मिळविलेली विद्वत्ता व त्यामुळे त्यांना मिळालेली कीर्ती यामुळे अण्णांना नुसत्या महा-राष्ट्रातच नव्हे तर सर्व भारतात एक असामान्य बुद्धीचा शिक्षणशास्त्रज्ञ मानतात. शिक्षणशास्त्राचा गाढा अभ्यास करणारे पुष्कळ विद्वान भारतात आहेत. पण संस्थेच्या अनुषंगाने अण्णांच्या विद्वत्तेला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभवाचा ओलावा व जिव्हाळा आलेला आहे. त्यामुळे त्यांचे कोणत्याही प्रश्नांचे विवेचन वा निवेदन इतर तज्ज्ञांनी केलेल्या विवेचनापेक्षा वेगळे वाटते.

त्यांची मते नेहमीच ग्राह्य मानली जातात. अनेक प्रश्नांवर त्यांचा शब्द हा अखेरचा शब्द मानला गेला आहे. खऱ्या खुऱ्या अर्थाने ते विद्यामहर्षी आहेत. माझा संबंध शिक्षणखात्याशी आहे आणि अण्णा नामवंत शिक्षणतज्ज्ञ आहेत. माझा आणि

त्यांचा सरकारी शिक्षणखात्याच्या कामकाजात नेहमीच अधिकृत असा संबंध आला. अनेक शैक्षणिक प्रश्नांचा निर्णय घेण्याचे अगोदर 'अण्णांचे या संबंधी काय म्हणणे आहे' हा प्रश्न विचारल्यावर व अण्णांनी आपले विचार मांडल्यावर चर्चित असलेल्या प्रश्नाचा अखेरचा निर्णय झालेला आहे. अनेक वेळा तर, बैठकीत झालेल्या चर्चेचा प्रवाह पूर्णतः बदलून अण्णांचे मत तेच सर्वांचे मत असे निर्णय घ्यावे लागले आहेत.

अण्णांची मते ही त्यांनी वाचलेल्या ग्रंथांतूनच निर्माण झालेली नाहीत. त्यांच्या मतांना प्रत्यक्ष अनुभवांची बैठक आहे. त्यांच्या जीवनात जे हजारो विद्यार्थी आले, त्यांच्या जीवनावर जो त्यांनी संस्कार करण्याचा प्रयत्न केला, या प्रयत्नात त्यांना जे बरे वाईट अनुभव आले व विद्यार्थी–जीवनावर त्यांच्या विचारांच्या ज्या प्रक्रिया व प्रतिक्रिया झाल्या, त्याचा परिपाक म्हणजे त्यांची मते व पर्यायाने त्यांचे व्यक्तित्व होय. हे व्यक्तित्व त्यांनी संस्थेच्या आश्रमीय जीवनात मोठ्या कसोशीने कमावले. त्यासाठी त्यांनी स्वतःचे मन नवीन विचारांचे व आचारांचे स्वागत करण्यासाठी, किंबहुना स्वतःच्या व्यक्तित्वात ते रुजवण्यासाठी व सामावण्यासाठी उघडे ठेवले. त्यांनी स्वतःचे शिक्षण कधीच थांबविले नाही. अण्णांनी मनाचे दरवाजे सताड उघडे ठेविले. मनाला न रुचणाऱ्या अनेक गोष्टींसाठीही त्यांनी मनाचे दरवाजे सतत उघडे ठेविले. त्यांचे अष्टपैलू व्यक्तित्व त्यांच्या मोठेपणामुळे बनले.

इतरांच्या व्यक्तित्वाचा आदर या त्यांच्या व्यक्तित्वाच्या घडणीत दुसऱ्या एका वैशिष्ट्याचा उल्लेख करावासा वाटतो. ते म्हणजे त्यांनी प्रत्येक व्यक्तीचे जे काही व्यक्तित्व बनले असेल त्याला आदराने मानले. किंबहुना प्रत्येकाच्या जीवनाकडे पाहताना ते स्वतःच्या दृष्टीने पाहत नाहीत. ज्याचे जीवन पहावयाचे त्यांच्या अंतःकरणात शिरून त्यांच्याबद्दलच्या सहानभूतीने, त्याच्याच दृष्टीने ते त्याच्याकडे पाहतात. त्यामुळे त्यांच्याशी संबंध येणाऱ्या माणसाचे त्यांना सम्यक ज्ञान होते. अण्णा प्रत्येकाच्या सुखदुःखांत समरस होऊ शकतात. हा अण्णांच्या स्वभावाचा मोठेपणा त्यांना मोठे करू शकला. ते माझ्या घरी अनेक वेळा आले. ते आले म्हणजे मला माझ्या वडिलांचेच दर्शन त्यांच्या दर्शनात व्हावे यात काही वावगे नाही, पण माझ्या पत्नीलाही श्वशूर घरी आल्यासारखे वाटावे व मुलांना आजोबा घरी आल्यासारखे वाटावे यातच अण्णांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी मन लवचिक ठेवले आणि जीवनाबद्दलचे खरेखुरे कारुण्य मानले व त्याची प्रतिष्ठाही मानली. आपली विचाराची व ध्येयधारणेची उंची त्यांनी कधी सोडली नाही पण त्याच वेळी कमी उंचीच्या माणसाची उंची ते समजू शकले. व्यक्तिविशिष्टता व व्यक्तिविशिष्टतेच्या मर्यादा त्यांनी ओळखल्या व अंतःकरणातल्या जिव्हाळ्याच्या व प्रेमळपणाच्या जोरावर हजारो विद्यार्थी त्यांनी त्यांच्या कुटुंबातीलच सदस्य बनविले. हजारो विद्यार्थी अण्णांना आपापल्या कुटुंबात पितृस्थानी व गुरुस्थानी मानतात. ते स्वतः हजारो विद्यार्थ्यांच्या कुटुंबात आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी या नात्याइतक्याच महत्त्वाच्या नात्याने घरात शिरकाव करतात.

त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक जीवनात अण्णा हे एक पदसिद्ध सदस्य आहेत. ही एकच गोष्ट अण्णांचे असामान्य व्यक्तित्व सिद्ध करावयास पुरेशी आहे.

स्वानुभवाने प्रथा बदलल्या संस्थेतील प्रथा या संशयातीत होत्या. मुलांचे कल्याण व त्यांच्या कुटुंबाच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणास उपयुक्त होईल अशी व्यक्तित्वाची वाढ हेच त्या प्रथांचे साध्य होते. हे साध्य सिद्ध करण्यासाठी संस्थेच्या पूर्वायुष्यात कडक व प्रखर साधने वापरण्यात आली. ही प्रखरता अण्णांना जास्तीत जास्त जाणवली असावी. त्यांचे मन अत्यंत मऊ. त्यांच्या व्यक्तित्वाच्या प्रभावाची मी चांदण्यातील शीतल किरणांशी तुलना करतो ती यासाठीच. त्यांनी शिस्तीतील कडकपणा व कडवेपणा हळूहळू सौम्य केला. निसर्गसिद्ध जीवनातील स्वातंत्र्य, स्वच्छंदता, विविधता व वैचित्र्य याला त्यांनी अधिकृतपणे मान्यता दिली. अण्णांचे या बाबतीतले शिक्षण ते विद्यार्थी असतानाच सुरू झाले होते. त्यांच्या मनावर आश्रमीय शिस्तीचे झालेले सर्वच संस्कार त्यांना प्रिय नसावेत. शिस्तीच्या पचविलेल्या अप्रिय गोष्टीही त्यांच्या मनात घरे करून बसलेल्या असाव्यात. व्यवस्थापक म्हणून काम पाहताना त्यांनी आपला दृष्टिकोन बदलला. वृत्ती बदलली. प्रथा बदलल्या. आश्रमीय जीवनात यांत्रिकपणाच्या ठिकाणी चैतन्य आणले, जिवंतपणा आणला. अण्णांच्या व्यक्तित्वाचा स्थायीभाव म्हणजे सौम्यता, शांतता, सोज्वळता व धीरोदात्तपणा. या सर्वांबरोबरच त्यांनी अत्यंत परिश्रमाने प्राप्त केलेली विद्वत्ता. विद्वत्तेच्या बाबतीत अण्णा म्हणजे संस्थेने समाजाला दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी होय.

रसिकता आणि विनोद अण्णांच्या याच गुणावरोबर अण्णांच्या रसिकतेबद्दल व कलासक्तीबद्दल फारच थोड्या विद्यार्थ्यांना जाणीव आहे. अण्णा हार्मोनियम वाजवीत बसतात. त्यांना चित्रपट-संगीतापासून तो उच्च प्रतीच्या संगीताची नुसतीच आवड नाही तर विलक्षण आसक्ती आहे. आश्रमीय जीवनात व त्यानंतरच्या अनेक वर्षांच्या गाठी-भेटीत, मला त्यांच्या या रसिकतेचा शोध लागला नव्हता. मी औरंगाबादला असताना एकदा अण्णा, माझ्या घरी मुक्कामास होते. अण्णा सुरेल आवाजात एका चित्रपटातील लोकप्रिय गीत गुणगुणत होते. हे गीत चित्रपटातील तर होतेच पण शृंगारिकही होते. त्या गीताची पहिली ओळ होती 'जिंदगीभर नहीं भूलेगी यह बरसातकी रात'. माझ्या पत्नीने हे गाणे ऐकले व तिलाही फार आश्चर्य वाटले. तिने अण्णांजवळ आश्चर्य व्यक्त केले व मलाही गाणे ऐकावयास लावले. माझ्या पत्नीचाच काय पण माझा देखील अण्णांच्या या रसिकतेवर एरव्ही विश्वास बसला नसता. अण्णांना संगीताचे विलक्षण वेड आहे. ते आणि ताई उत्कृष्ट संगीताचा कार्यक्रम टिपून रेडिओवर ऐकत बसतात. रेडिओवरच्या गाण्याला आपल्या हार्मोनियमने स्वरजुळणी करीत बसणे तर त्यांचा नेहमीचा छंदच आहे. एका मुक्कामात परभणी येथे एका स्थानिक कलावंताच्या गाण्याचा कार्यक्रम मी आयोजला. त्या दिवशी आम्ही सर्वजण जवळ जवळ सकाळपासून सायंकाळपर्यंत कामे करीत होतो. तरीही रात्री दोनपर्यंत म्हणजे सर्व कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत अण्णा गाणे ऐकत बसले.

अण्णांच्या या रसिकतेमुळे अण्णा नुसते रुक्ष विद्वान राहिले नाहीत. त्यांच्या विद्वत्तेला व प्रज्ञेला त्यामुळे आगळीच शोभा आली. त्यामुळेच त्यांच्या बोलण्याचालण्यात विनोद आला, खिलाडूवृत्ती आली. १९३५ सालचे अण्णा आणि १९६५ सालचे अण्णा यांत फार फरक झाला. अण्णांची वृत्ती नेहमी अति व्यापक राहिली, उमदी राहिली, उदात्त तर ती नेहमीच होती.

काही कडू काही गोड मला एकदा अण्णांचा वाईट अनुभव आला. १९४५ साली मॅट्रिकचा निकाल लागला. १९०९ ते १९३५ पर्यंतच्या २५-२६ वर्षांत मी संस्थेतील विद्यार्थ्यांनी मॅट्रिकच्या परीक्षेत मिळविलेल्या यशांच्या बाबतीत १९३५ अगोदर जे रेकॉर्ड होते ते मोडले. निकाल लागला त्या किंवा त्या सुमारच्या एक-दोन दिवसात मी अण्णांच्या खोलीकडे जात असताना अण्णा मला रस्त्यात भेटले. त्यांनी माझ्या यशाबद्दल आनंद प्रदर्शित करण्याऐवजी मला खूपच सुनविले. 'तू शेफारून गेला असशील, तुला वाटत असेल की तू आकाशाला हात टेकविलेस' या व अशा स्वरूपाचे अण्णा काहीतरी बोलले व त्यांनी माझी चांगलीच निर्भत्सना केली. अण्णांनी हे असे का केले ते मी पुढेही व आजतागायतही कधी त्यांना विचारले नाही. अण्णांना त्याचा विसर ते ज्यावेळी बोलले त्याच सुमारास केव्हातरी पडला असावा. आम्ही अनेकदा भेटलो पण याबद्दल आम्ही कधीच बोललो नाही. मला वाटते माझेच त्यावेळी काही चुकले असावे. गर्वाने फुगून मी कोणाशी काहीतरी दर्पोक्तीचे बोललो असेन. अण्णांना कोणीतरी काहीतरी तसे सांगितले असावे. मला त्यावेळी फार वाईट वाटले. माझ्या नादानपणाने मला त्यावेळी वाटत होते की अण्णांनी माझे कौतुक का केले नाही—निर्भत्सना का केली. आम्ही आश्रमीय जीवनात रुळलेली मुले. अण्णा असे बोलले म्हणून वाईट वाटवून घेतले. अण्णांचा राग केला नाही—आई रागावते म्हणून आपण आईचा कधी राग करीत नाही. अण्णांना आम्ही पितृस्थान देत असलो तरी खऱ्या अर्थाने ते आईच्याच प्रेमाने वागतात हा प्रसंग एवढ्याचसाठी निवेदन केला की अण्णा म्हणतात त्याप्रमाणे आम्हीही अण्णांना शिकविले—घडविले—बदलले देखील. मानवी जीवनच असे मजेदार आहे. ज्याला आपण शिकवितो तो देखील आपल्याला शिकवितो. शिक्षणशास्त्रातला केवढा मोठा सिद्धान्त आहे हा!

शिकवणी चालूच आहे आम्ही आश्रम सोडून आता ३० वर्षे लोटली आहेत आश्रमात न राहतानाही आजही अण्णा आम्हाला शिकवीतच आहेत. त्यांचे आम्हांस शिकविणे कधी थांबत नाही. अव्याहत वाहणारा असा तो प्रवाह आहे. आम्ही त्या प्रवाहात सारखे शुचिर्भूत होत असतो व पावन होत असतो. अण्णांनी सर्व आयुष्य आमच्यासाठी व आमच्यासारख्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी झिजविले. संस्थेला अण्णांनी नुकतीच १०००० रु. ची देणगी दिली व २५००० रु. देण्याचा संकल्प केला. अण्णांच्या त्यागाला मर्यादाच नाहीत. त्यांच्या या व अशा वागण्याने आमच्या शिक्षणात आजही भरच पडत आहे. अण्णांच्या त्यागाच्या पार्श्वभूमीवर आम्ही किती स्वार्थी आहोत याचीच काय ती

तीव्रतेने जाणीव होते. अण्णा आमचे सदैव स्फूर्तिस्थान आहेत. त्यांच्यामुळे आमच्या प्रेरणा जाग्या होतात. संस्थेतला विद्यार्थी, मग तो कोणत्याही क्षेत्रात असो, त्याच्या विशिष्ट वृत्तीमुळे उठून दिसतो. त्याची समाजकल्याणाची धडपड, गरीबांबद्दलची कळकळ व खऱ्या राष्ट्रीय वृत्तीची तळमळ त्यांच्या सहवासात येणाऱ्यांना जाणवते. ही तळमळ सहवासात येणाऱ्यांच्या जीवनात निर्माण करण्याचा ते प्रयत्न करतात व अशा रीतीने संस्थेचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करतात.

आम्हीही अण्णांना घडविले संस्थेने आम्हांस जे दिले त्यातील अण्णा या व्यक्तीने जे दिले त्याचा वाटा सर्वांत मोठा आहे. निदान माझ्या जीवनात संस्थेकडून जे मी मिळविले त्यातील जास्तीत जास्त वाटा अण्णांचा आहे असे मी मानतो. अण्णांनी मला व आम्हाला कसे घडविले व आमच्यामुळे अण्णा कसे घडले याचा हा इतिहास एवढ्याचसाठी निवेदन केला की तोच इतरांनाही उद्‌बोधक व्हावा. परमेश्वराने अण्णांना उदंड आयुरारोग्य द्यावे व आमच्या सारख्या हजारो विद्यार्थ्यांना घडविण्याचे पवित्र कार्य अव्याहतपणे चालू रहावे हीच परमेश्वरचरणी माझी प्रार्थना आहे.

□ □ □

२८. शिक्षण म्हणजे संस्कार

प्रि. रा. ना झोळ एम्. ए., बी. टी.

व्यवसाय : प्राचार्य, बेसिक ट्रेनिंग कॉलेज, धुळे

शिक्षणकाल १९२९ ते १९३४

शिक्षणशास्त्रावर अनेक पुस्तके लिहिली आहेत

शिस्तीची कठोरता कमी झाली गुरुवर्य अण्णांचा व माझा आश्रमात प्रत्यक्ष असा संबंध फारच थोडा आला. कारण, मी पुण्याला १९३१ ते १९३४ या कालखंडात होतो तर अण्णांचा हाच काळ परदेशगमनाचा होता. पण मी जे त्यांच्याबद्दल ऐकले व थोडेसे अनुभवलेही त्यावरून अण्णा सुरुवातीच्या जीवनात अत्यंत कठोर व कडक शिस्तीचे भोक्ते होते असे मला समजले होते. अर्थात 'अपराध्यालाच शासन होई' हेही सर्वजण मान्य करीत.

मात्र अपराध्याला किती प्रमाणात कठोर शिक्षा करावी यावर अण्णांनीही पुढे विचार केला असावा; बालमानसशास्त्राचा त्यांचा अभ्यास कदाचित वाढला असावा; परदेशगमनामुळे मिळविलेली अनुभवसंपन्नताही त्यांचा दृष्टिकोन विशाल बनविण्यास कारणीभूत झाली असावी व त्याप्रमाणे त्यांनी आपल्या वागण्यात बदल केला असावा!

केवळ या बाबतीतच काय पण अण्णांचे सर्व जीवन जर बारकाईने न्याहाळून पाहिले तर ते स्वतः आपले व्यक्तित्व हवे तसे घडवीत आहेत याचाच प्रत्यय येतो. अण्णांची आजची विद्वत्ता, शिक्षणतज्ञ म्हणून त्यांनी मिळविलेली विद्वन्मान्यता; त्यांचा विनय, त्यांची शालीनता, चारित्र्यसंपन्नता, साधी, निर्व्यसनी, संयमी व निग्रही राहणी इ. गुणांची जोपासना त्यांनी आपल्या जीवनात पद्धतशीरपणाने व निर्धारपूर्वक केलेली आढळते.

ऋषितुल्य जीवनाचे रहस्य 'गीतेतील मुख्य विचार' त्यांनी आज मराठी वाचकांना दिले पण ते त्यांनी आज दोन-तीन तपे तरी स्वतः आचरणात आणलेले स्पष्ट दिसतात. त्या त्या विचाराप्रमाणे ते आपले जीवन घडवीत गेलेले दिसतात ! त्यांची 'सदाचार-चिंतनी' ही केवळ त्यांच्या वाचन-मननातूनच निर्माण झालेली नसून तिला त्यांच्या स्वतःच्या आचाराची व अनुभवाची भक्कम बैठक लाभलेली आहे ही गोष्ट अण्णांना जवळून पाहाणारांना ताबडतोब समजून येते. विद्वत्तेचा, ज्ञानाचा व सुविचाराचा उपयोग अण्णांनी आपले स्वतःचे जीवन आदर्श रीतीने घडविण्यासाठीच केलेला स्पष्टपणे दिसून येतो. त्यांचे आज जे ऋषितुल्य जीवन दिसत आहे तो त्यांनी तसे जाणूनबुजून, जागरूकपणाने, निकराने, निग्रहाने व सातत्यपूर्वक केलेल्या प्रयत्नांचाच परिपाक आहे असे मला ठामपणाने वाटते. म्हणूनच माझी खात्री आहे की 'स्वतःच्या व्यक्तित्वाचा विकास कसा झाला ?' यासंबंधी ते जे जे लिहितील त्याची गणना अमर साहित्यात तर होईलच पण असे करणाऱ्यांनाही ती एक भगवद्गीता ठरेल; गजानन–गाथा बनेल ! !

स्पर्धा की सहकार्य अण्णांच्याबद्दल हे जे मी लिहिले ते त्यांना अगदी जवळून पाहून लिहिले आहे. यांच्या सहवासाचा, प्रेमळपणाचा व मार्गदर्शनाचा अनुभव घेऊन लिहिले आहे. या वेळी काही प्रत्यक्ष अनुभवांचाही उल्लेख करणे प्रस्तुतच होईल.

'हुशार विद्यार्थ्यांनी ध्येयवादी असले पाहिजे; आपणापेक्षा कमी बुद्धीच्या, अडचणीत असणाऱ्या, कच्च्या विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केलीच पाहिजे, स्वतःचे नुकसान सोसूनही केली पाहिजे' अशी अण्णांची शिकवण १९३१ सालापासूनची आहे. अण्णा परदेशात असताना त्यांची पत्रे आश्रमात येत व ती 'सुसंगतीत' वाचून दाखवली जात. ता. २८ जुलै १९३६ रोजी सुसंगतीत अण्णांचे जे पत्र गुरु. दादांनी वाचून दाखविले त्यांची नोंद मी माझ्या दैनंदिनीत त्या वेळीच केली आहे. त्यात अण्णांनी स्पष्ट लिहिले होते की, 'आपला नंबर थोडा खाली गेला तरी चालेल पण हुशार मुलांनी आपल्यापेक्षा कच्च्या मुलांना मदत करून वर आणण्यासाठी प्रयत्न केलाच पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. इतरांना वर्धिष्णू करण्यासाठी झटतो, तोच हुशार हीच दृष्टी विद्यार्थ्यांत यावी म्हणून अण्णांची तळमळ असे असे, स्पष्ट दिसून येते.

अखंड मार्गदर्शन आश्रम सुटल्यानंतर देखील अण्णांचे मार्गदर्शन मला वेळोवेळी लाभले आहे. मॅट्रिकनंतरही मला आश्रमात राहता आले असते तर आजच्या पेक्षा माझे जीवन आणखी निराळे झाले असते. पण तो योग नव्हता ! मी आश्रमातून बाहेर पडलो. पण प्रखर ध्येयवाद घेऊनच ! अत्यंत खडतर परिस्थितीतूनही पदवीधर व्हायचेच हा ध्येयवाद आणि या ध्येयवादाच्या सिद्धीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा

करावयाची प्रेरणा घेऊनच ! या कॉलेजजीवनाच्या काळात येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी गुरु. दादांनी व गुरु. अण्णांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. म्हणूनच मी माझ्या कॉलेजजीवनाचा टप्पा यशस्वी रीतीने गाठू शकलो हे नमूद करणे माझे कर्तव्य आहे.

सत्तेचा उपयोग – सेवा कॉलेजचा अभ्यासक्रम पार पडल्यानंतर काही वर्षांनी मी बी.ए.,बी.टी. झाल्यामुळे सरकारी शिक्षणखात्यात नोकरी मिळवू शकलो. १९४६ साली पुण्याच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेचा मी बोर्डिंग सुपरिंटेंडेंट झालो त्यावेळी, किंवा १९४७ साली मी लेन्ट सव्हिसवर जळगावला प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजचा प्राचार्य झालो त्या वेळी, मी अण्णांचे आशीर्वाद घेतले होते. त्यांनी ते मला तोंड भरून दिले होते. त्याच वेळी त्यांनी मला माझ्या जीवनात अधिक कार्यक्षम होण्यासाठी सतत प्रेरणा देणारा विचारही दिला होता. 'सत्तेपेक्षा सेवेचे व्रत' डोळ्यांपुढे सतत ठेवण्याची जणू दीक्षाच दिली होती. 'अधिकाराच्या जागा स्वीकारताना मान-मरातब, प्रतिष्ठा, अधिकार या पेक्षा कार्यात येणाऱ्या अडचणी व पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या यांकडेच सतत लक्ष ठेव' असा संदेश त्यांनी मला लिहून कळविला होता. आज जवळ जवळ १६ वर्षे मी ट्रेनिंग कॉलेजचा प्राचार्य म्हणून विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करीत आहे. या माझ्या सर्व कार्याची प्रेरणा अण्णांनी मला दिलेल्या वरील संदेशात व दीक्षेतच आहे !

सतत प्रोत्साहन शिक्षणखात्यात हे माझे नित्य व दैनंदिन कार्य चालू असताना मी काही शिक्षणलेख लिहिले; काही पुस्तकेही लिहिली. माझ्या लेखांबद्दल अभिनंदन करून मला त्यांनी उत्तेजन दिले आहे. माझ्या पुस्तकांवर अभिप्राय देऊन मला प्रोत्साहन दिलेले आहे. माझ्या या कृतीचे त्यांनी केलेले कौतुक हाच माझा खरा निर्भेळ आनंद आहे.

घरगुती आपुलकी माजी विद्यार्थ्यांशी वागताना अण्णांची भूमिका अत्यंत जिव्हाळ्याची असते. अण्णा जेव्हा जेव्हा दौऱ्यावर असतात तेव्हा तेव्हा ते वेळ काढून त्या त्या ठिकाणच्या आश्रमीय विद्यार्थ्यांना आवर्जून भेटतात. सुखदुःखाच्या कौटुंबिक गोष्टींपासून समाजकार्य, शिक्षणकार्य इ. अनेक प्रश्नांवर चर्चा करतात. मी जळगावला प्राचार्य म्हणून काम करीत असताना ते माझ्या संस्थेत आले, एवढेच नव्हे, तर ते माझ्या घरी आले, आणि माझ्या जीवनातील अत्यंत समाधानाच्या एका दिवसात त्यांनी कायमची भर टाकली. आमच्या घरात त्यांनी अत्यंत आपलेपणाने, घरगुती वातावरणात आमच्याबरोबर पोटभर जेवणही घेतले ! !

अण्णांच्या ठिकाणच्या माजी विद्यार्थ्यांबद्दलच्या या कौटुंबिक जिव्हाळ्यास कोठेही तोड सापडणार नाही. त्यांच्या ठिकाणचे हे अलौकिक वैशिष्ट्य त्यांना कशामुळे प्राप्त झाले ? त्याचे कारण एकच ! माझ्या मते 'शिक्षण म्हणजे चांगले संस्कार–जीवन म्हणजे चांगले संस्कार, या तत्त्वावर असलेली त्यांची नितांत श्रद्धा हेच होय ! या त्यांच्या श्रद्धेमुळेच त्यांनी आपले स्वतःचे जीवनही संस्कारसंपन्न असेच घडविले आहे; इतके की

ते पाहूनच तरुण पिढीला–शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या कोणाही सुजाण व्यक्तीला–ते संस्कारप्रेरकच ठरावे

शिक्षण म्हणजे संस्कार तरुण वयात मुलांशी वागताना अण्णा कठोर झाले असतील ! पण पुढे पुढे संस्कार करण्याचे साधन 'शिक्षा' या विचारावरून संस्कार करण्याचे एकमेव व अमोघ साधन म्हणजे 'स्वतःचे सुसंस्कारसंपन्न, आदर्श जीवनच' या विचाराप्रत ते आले असले पाहिजेत. अनुभवाने, चिंतनाने या विचारावरच त्यांची अचल श्रद्धा बसली असेल ! म्हणूनच, इतरांवर संस्कार करण्यासाठी स्वतःच संस्कार-संपन्न होणे या मार्गावर त्यांनी प्रयत्नपूर्वक आक्रमण केले असले पाहिजे. आज त्यांच्या जीवनाकडे पाहताना मला तर निःसंशयपणे असे म्हणता येते की, शिक्षण म्हणजे संस्कार या तत्त्वाचे मूर्तिमंत, साकार प्रतीक म्हणजे अण्णांचे आदर्श जीवन !

अण्णांच्या या आदर्श जीवनापासून त्यांचे आजी-माजी असंख्य विद्यार्थी प्रेरणा घेत आहेत, घेत राहतील. त्यांच्या जीवनाचा, त्यांनी दिलेल्या संदेशाचा व शिकवणीचा मागोवा घेत घेत आपणही आपले जीवन त्यांच्याप्रमाणे बनविण्याचा प्रयत्न करू या ! त्यांच्यापासून मिळालेल्या प्रेरणेमुळे संस्कारसंपन्न झालेल्या अशा कार्यकर्त्यांकडून उद्याच्या भारताच्या विकासाचे महन्मंगल कार्य अधिकाधिक होत जावो आणि हे होणारे मंगलकार्य पाहण्यासाठी, केवळ स्वतःच्या जीवनाचे अखंड स्फूर्तीचे जिवंत झरे निर्माण करण्यासाठी परमेश्वर अण्णांना शतायू करो हीच प्रार्थना !

□ □ □

२९. नवीन ज्ञान–नवीन स्फूर्ती

डॉ. ब. मो. उपाध्ये, डी. ए. एस्. एफ्.
व्यवसाय : आयुर्वेद वैद्यकी
शिक्षणकाल १९३० ते १९३३
ग्रामीण जनता व समाज यांच्या सेवेविषयी आस्था

मी १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहात पेण येथील शिबिरात दाखल झालो. त्यात सर्व प्रकारचे अनुभव, हालअपेष्टा सहन करीत असतानाच मला आपली शैक्षणिक लायकी वाढविली पाहिजे अशी जाणीव झाली व मी संस्थेत दाखल झालो.

चोरून पाहिलेले नाटक एका सत्याग्रही विद्यार्थ्याला संस्थेत प्रवेश दिला आहे व तो अबेळी, ही बातमी हा हा म्हणता त्या वेळच्या आश्रमातील विद्यार्थ्यांत पसरली. त्या वेळची वृत्तपत्रे वाचून त्यांच्या मनात अगोदरच सत्याग्रहासंबंधीची अनुकूल भूमिका तयार झालेली होती. गुरु. अण्णांनी त्या तरुण मनाच्या स्फूर्तीला व भावनेला युक्तीने वळण दिले. आमच्या संघाला 'स्वदेशी प्रचार संघ' हे नाव देण्यात आले. माझी

अध्यक्ष म्हणून निवड झाली व गुरु. अण्णा सल्लागार नियंत्रक. पुण्याच्या अठराही पेठांतून या स्वदेशी प्रचार संघाने खूप खूप प्रचार केला. स्वदेशी प्रचार संघाची स्वदेशी मालाची विक्री, जाहिरात खाते, मुलाखतीचे खाते, मेळा व प्रचार अशी अनेक खाती पाडण्यात आली. मी स्वदेशी प्रचार संघाचा होतो, तसाच मुलाखत व प्रचार खात्याचाही लोकनियुक्त अध्यक्ष होतो. प्रचारासाठी मी मेळ्याबरोबर जात असे. प्रथम लोकांचे आकर्षण होण्यासाठी मेळ्यातील पदे, नंतर व्याख्यान हा कार्यक्रम असे. हे सर्व कार्यक्रम देवळांतून होत. एके दिवशी मेळ्याचा कार्यक्रम व नंतर माझे व्याख्यान झाले. रात्रीचे १२ वाजले होते. मेळ्यातील सर्व मुले आश्रमात गेली. पण मी व माझा मित्र मा. दि. देशपांडे सर्वांच्या हातावर तुरी देऊन नाटकाला गेलो. चौकशी झाली. शिक्षा तीन दिवस उपोषण व संडास धुणे अशी होती. गुरु. अण्णांनी अगदी करडया नजरेने इशारा देऊन शिक्षा सांगितली. त्यांच्या डोळ्यांतील कठोरपणाचे तेज अद्याप माझ्यापुढे आहे. असत्य, अन्याय, अनीती यासंबंधीचे एखादे कृत्य माझ्या हातून घडत नाही ना ? असा सवाल माझ्या दैनंदिन जीवनात प्रत्येक क्षणाला ते तेज माझ्या मनाला अद्यापि विचारीत असते. हा आदरयुक्त भीतीचा अंकुश !

गुरु-शिष्य भेटीचे चित्र गेल्या चाळीस वर्षांत तयार झालेला अण्णांचा शिष्यवर्ग अखिल भारतात विखुरलेला असून तो भारताचा आदर्श नागरिक म्हणून वावरत आहे. ही गोष्ट महाराष्ट्राला खास भूषणावह आहे. यांपैकी पुष्कळसे विद्यार्थी अ. वि. गृहाच्या वाढदिवशी जमतात. माजी विद्यार्थ्यांचे सम्मेलन घेण्यात येते. त्या वेळी हा शिष्यगण गुरु. अण्णांचे चरणाशी विनम्र भावनेने बसलेला असतो. गुरु. अण्णा हे काहीतरी नवीन ज्ञान, नवीन स्फूर्ती देतील या आशेने आलेला असतो. नुकतेच दि. २७-९-६४ ला माजी विद्यार्थ्यांचे संम्मेलन भरले होते. गुरु. अण्णा व त्यांचा शिष्यगण साध्या सतरंजीवर बसलेला होता. अगदी शांत आणि प्रसन्न वातावरण होते.

पुराणकाळी ऋषी व मुनी मानवाच्या सुखाचे कार्य सतत चालू राहावे म्हणून शिष्यपरंपरा तयार करीत असत. त्यांच्याजवळ मेणाप्रमाणे मृदू मातृहृदय व जरूर तेथे वज्राप्रमाणे कठोर हृदय असे.

असे असंख्य गुरू हवेत दि. २६-९-६४ चा समारंभ. नुकत्याच झालेल्या संस्थेच्या वाढदिवसाच्या समारंभाच्या दिवशी गुरु. अण्णांनी अ. वि. गृह संस्थेला दहा हजार रुपयांची देणगी दिली व गुरूने असंग्रह वृत्तीने राहावे हा आदर्श संस्था-चालकांपुढे ठेवला. त्या समारंभाचे अध्यक्ष, भारतीय संरक्षण खात्याचे मंत्री, ना. यशवंतराव चव्हाण यांचे हृदय भरून आले. डोळे आनंदाश्रूंनी भरून आलेले सर्वांना दिसले. त्यांनी गुरु. अण्णा खैर व अ. वि. गृह संस्था यांचेविषयी समाधानाचे उद्गार जाहीररीतीने काढले. हा गुरु. अण्णांच्या आयुष्यातील अत्युच्च क्षण असेल का ? असा विचार त्या वेळी माझ्या मनात आला. ज्या ज्या वेळी मी आमच्या देशाविषयी विचार करतो त्या त्या वेळी मला असे वाटते की अशा असंख्य गुरुंची आमच्या देशाच्या पुनर्रचनेसाठी जरुरी आहे.

□ □ □

३०. दुरावा दूर केला

डॉ. दु. का. संत, एम्.ए., पीएच्.डी.

व्यवसाय : मराठीचे प्राध्यापक, गोखले कॉलेज कोल्हापूर

शिक्षणकाल १९३० ते १९३५

'मराठी स्त्री,' 'साहित्य आणि संस्कृती,' 'संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग' इ. ग्रंथांचे लेखक

जीवनातील कटू अनुभव गेले वर्ष दीडवर्ष आमच्या कुटुंबाला इतके कटू अनुभव आले, काही दैवी संकटे पण कोसळली की आमच्या संवेदना बधिर होऊन गेल्या. मी तर अक्षरशः विमनस्क झालेलो आहे.

अपुरे शिक्षण दिले त्यामुळे वाटले, औरंगजेबाने आपल्या गुरूला जसे खडखडीत पत्र लिहिले, तसे काहीतरी लिहावे. आपण राजपुत्र होतो हे जाणून घेऊन राजपुत्राला आवश्यक असे शिक्षण न देता, साधे कुराणाचे नुसते पठण करण्याचे धार्मिक शिक्षण दिले, म्हणून गुरूला औरंगजेबाने बादशहा झाल्यावर दोष दिला आहे. त्या धर्तीवर गुरु. अण्णांना लिहावे की तुम्ही आमच्या मनावर सचोटीचे, प्रामाणिकपणाचे, कष्टांच्या महतीचे, कर्तव्यदक्षतेचे, स्वतःच्या क्षेत्रात पुढे पुढे राहण्याचे महत्त्व पटवणारे शिक्षण दिले, ते संस्कार केले, अस्मानी संकटांनी हताश न होता धीराने पुनः प्रयत्नास लागावे ह्यासाठी गीतेच्या अभ्यासाची महती पण पटविली, तिचे सार आमच्यापुढे आणून ठेविले, पण मनुष्याच्या अंतरंगातला दुष्टपणा, क्षुद्रपणा, द्वेष, मत्सर, संकुचितपणा हा एवढा प्रबल आहे की तो तुमच्या गुणांचे, चांगुलपणाचे मातेरे करील असा गंभीरपणे दिलेला इशारा कुठेच वाचण्यात आला नाही. 'सदाचार-चिंतनी' पुनः पुनः वाचली; 'गीतेतील विचार' वाचले, पण माझ्या मनाची कवाडे झाकली गेली होती म्हणून म्हणा अगर अन्य काही कारणांनी म्हणा, मला तसे विरंगुळा वाटणारे काही आढळले नाही.

इंग्रजी संवादाचा प्रयोग आठवड्यातील एका तासाला आमच्या वर्गातील दोघां दोघांच्या जोड्या केल्या व त्या तासात दोघांनी एकमेकांशी हलके हलके फक्त इंग्रजीतून बोलावयाचे. नंतर काय बोलणे झाले याची ते चाचणी घेत असत. इतक्या दिवसांनंतर आजही त्या प्रयोगाचे नाविन्य माझ्या लक्षात राहिले आहे. माझ्या गेल्या २४ वर्षांच्या शिक्षक व्यवसायात असला प्रयोग करण्याची संधी मला कधीच लाभली नाही. कुणी तसा प्रयोग केल्याचेही ऐकिवात नाही.

मने पालटली मॅट्रिक झाल्यानंतर मी संस्थेबाहेर पडलो. पुढच्या क्षेत्रातील माझे शैक्षणिक यश हे सर्व परिचित आहे. कोवळ्या वयात आलेला कडक शिस्तीचा,

कठोर अवलंबनाचा अनुभव ताजा असल्याने व मनात थोडा कडवटपणा असल्यामुळे संस्था सोडताना आमच्या मनात एक प्रकारचा अकारण रोष असे. आम्ही माजी विद्यार्थी एकत्र जमलो तरी आश्रमाविषयी थोड्या नाराजीने बोलत असू. कदाचित आमचे चुकत असेल, कदाचित त्या वेळच्या चालकांचे धोरण वा आमच्यापासूनच्या अपेक्षा वेगळ्या असतील, पण विद्यार्थ्यांच्या मनात संस्थेविषयी एक प्रकारचा सूक्ष्म दुरावा होता, हे आज तीस वर्षांनंतर मान्य करावयास हरकत नाही. अर्थात हा मानवी अपरिपक्वतेचा परिणाम आहे; असे नंतर आलेल्या तशा प्रकारच्या अनेकविध अनुभवांनी सिद्ध होते. गुरु. अण्णांनी या परिस्थितीत बदल घडवून आणला. त्यांनी आश्रमीय 'समाचार' सुरू केला व त्या रज्जूने आमची सर्वांची मने आमच्या मातृ-संस्थेकडे पुन्हा आकृष्ट करून घेतली. संस्थेच्या प्रगतीबद्दल एक प्रकारचे औत्सुक्य निर्माण केले. डॉ. खैरांनी आमच्या जीवनात संस्थेस परत आणले व आम्हांस नव्याने संस्थेत आणले. त्यांनी निर्माण केलेले हे संबंध केवळ माजी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीपुरते मर्यादित न ठेवता त्यांचे क्षेत्र व्यापक करून त्यांच्या कुटुंबियांपर्यंत त्यांची कक्षा वाढविली. त्यामुळे गुरु. अण्णांविषयी स्वतः माजी विद्यार्थ्यांपेक्षा त्यांच्या सहधर्मचारिणींना व कुटुंबियांना विलक्षण आत्मीयता वाटते.

वैयक्तिक संबंध परंतु गुरु. अण्णांनी हे संबंध केवळ 'समाचार' पुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यांत व्यक्तिगत जाण्या-येण्यामुळे एक प्रकारची दृढता आणली आहे. १९५० नंतर निरनिराळ्या कारणांनी अण्णांचे माझ्या घरी मधून मधून सतत येणे होत गेले.

डोळ्यांदेखत वाढले आम्ही हायस्कूलमध्ये असताना साधे शिक्षक असणारे अण्णा आज भारतात एक नामवंत ऋषिमुनितुल्य शिक्षणतज्ज्ञ झाले आहेत. आमच्या डोळ्यांदेखत ते मोठेपणाची एकएक पायरी चढत होते, चढत आहेत. 'समाचार' मधील मासिक विचारांनी त्यांनी असंख्यांच्या जीवनात स्वतःला स्थान निर्माण करून घेतले आहे. 'समाचारा' ला एक दिवस विलंब झाला तर आम्हांला चुकल्या चुकल्यासारखे होते. आमच्या मनाचे भरणपोषण आजही प्रत्यही 'समाचार' मधील विचारांनी होते.

त्यांच्याशी गप्पागोष्टींना सुद्धा खूप रंग येतो. विनोदाची फार मोठी देणगी त्यांना मिळालेली आहे. त्यांनीही ते अंग खूप वाढविले आहे. घेतलेले कष्ट, मिळविलेले गुण, व त्यांना मिळालेली सार्वत्रिक मान्यता, त्यायोगे त्यांचे मूळचे प्रसन्न व्यक्तित्व अधिकच संपन्न झालेले आहे.

दोन पिढ्यांवर संस्कार गुरु. अण्णांनी कोणते संस्कार माझ्या मनावर केले? सांगणे कठीण आहे. पण माझ्या व्यक्तित्वाची, विचारांची, जीवनविषयक तत्त्वज्ञानाची

जडण-घडण माझ्या ज्या काही थोड्या आदरणीय गुरुवर्यांनी केली, त्यांच्यांत गुरु. अण्णांचे स्थान फार वरचे आहे. 'सरस्वती भवन' (पूर्वीचा ६१७ कसबा,) मध्ये असता गुरु. अण्णा मुलांना फार कडक शिक्षा करीत असत, असे मित्रांकडून अनेक वेळा ऐकले होते. पण आमच्या वाटयाला आला तो त्यांच्या मनाचा प्रसन्नपणा नि नर्म विनोद.

गुरु. अण्णांचे संस्कार माझ्या पिढीपुरतेच मर्यादित आहेत असे नाही. रोज दोन वेळा जेवावयास बसण्यापूर्वी माझी मुले गुरु. अण्णांनी स्वहस्ते लिहून दिलेली

आनंदी आत्मविश्वासू । ब्रह्मचारी पराक्रमी ।
अखंड-ज्ञानजिज्ञासू । सदाचारे शतायुषी ॥

अशी प्रार्थना म्हणतात. त्यांच्या पिढीपर्यंत गुरु. अण्णांचे संस्करण पोचले आहेत या परता वेगळा दुवा मी काय देणार ?

□ □ □

१३. एक वाचनीय ग्रंथ

डॉ. मा. गो. दाभाडे एम्.ए., पीएच्.डी.

व्यवसाय : मराठीचे प्राध्यापक, माधव कॉलेज, उज्जैन

शिक्षणकाल : १९३१ ते १९३८

अनेक मराठी ग्रंथांचे लेखक ; संत वाङ्मयाचे अभ्यासक

पोरकटपणाचे लक्षण त्या दिवशी रात्री मला लवकर झोप येईना. बराच वेळ जागून मी विचार करीत होतो की या सिगारेटच्या व्यसनापासून आपल्याला मुक्त होता येईल की नाही ? मुक्त व्हावयाचे असेल तर आपण काय करायला हवे ? खूप विचार केला पण काही उपाय सुचेना. कारण 'उद्या सिगारेट ओढायची नाही' असा निश्चय मी यापूर्वी अनेकदा केला होता. पण तो एकदाही यशस्वी झाला नव्हता व आताही यशस्वी होईल असे मला वाटत नव्हते.

असा विचार माझ्या मनात येताच मी टेबलावरचे 'गीतेतील मुख्य विचार' हे पुस्तक वाचायला घेतले. पुस्तकात सुरुवातीला जे 'मनातले' लिहिले ते प्रथम वाचून प्रत्येक प्रकरणातला फक्त 'व्यवहार' तेवढाच मी वाचायला घेतला. वाचता वाचता "मन चंचल असणे हे पोरकटपणाचे व अपक्व बुद्धीचे लक्षण आहे. शिकलेल्या प्रौढ माणसाचा आपल्या मनावर ताबा पाहिजे. नसल्यास तो मोठा दोष आहे." हे वाचता क्षणीच माझे मन मला सारखे टोचू लागले. "हे पोरकटपणाचे लक्षण

आहे, अपक्व बुद्धीचे लक्षण आहे." हे वाक्य मी मनातल्या मनात हजारदा उच्चारले.

मी आंथरुणावरून उठून टेबलाजवळ गेलो. ड्रॉवर उघडून होत्या नव्हत्या तेवढ्या गोल्डफ्लेकच्या सर्व सिगारेटस् चोळा मोळा करून चुलीत फेकून दिल्या आणि त्याला काडी लावून दिली. सिगारेटस् पेटताक्षणीच त्यांच्या जाळाकडे पाहता पाहता माझे मन म्हणाले, की 'तू अण्णांचा आदर्श समोर ठेव. अरे तू अण्णांचा आदर्श समोर ठेवायला हवा! हे तेच अण्णा की ज्यांनी.....'

अण्णांचा आत्मा म्हणजे त्या वेळची माझ्या स्मरणात राहिलेली आणखी एक गोष्ट त्यांच्या स्वभावाची ठेवण हुबेहुब व्यक्त करणारी अशी आहे. त्या वेळी माझ्याकडे वाचनालयाची व्यवस्था आणि नाशिकला दर आठवड्याला पाठविण्यात येणाऱ्या साप्ताहिकाचे लेखन करायचे, अशी दोन कामे होती. वाचनालयाच्या कामानिमित्त दादांच्या किंवा अण्णांच्या घरून वर्तमानपत्रे आणण्यासाठी एखाद्या दिवशी मी त्यांच्याकडे जात असे. तेव्हा दादांच्या किंवा अण्णांच्या घरी चार साडेचारच्या सुमाराला गेल्यावर वर्तमानपत्रे हातात घेऊन जिन्याच्या पायऱ्या उतरता उतरता अण्णांच्या खोलीतून 'सतारीचे बोल' मला हटकून ऐकायला मिळत. तेव्हा मला वाटते अण्णा बहुधा सतार वाजवायला शिकत होते. तेव्हा तो सतारीचा तालबद्ध मंजुळ आवाज ऐकता ऐकता नि जिना उतरता उतरता माझ्या मनात विचार यायचा 'हे असे आहेत आपले अण्णा! वेळ कधीही फुकट जाऊ देत नाहीत. काही ना काही शिकण्याविषयी केवढी हौस. जो खरा शिक्षक असतो त्याला कशाची ना कशाची जिज्ञासा असते. नवीन नवीन गोष्टी समजावून घेण्याची त्याला सतत तळमळ वाटते.'

प्रसिद्धीला नकार ज्यांची समाजात फारशी प्रसिद्धी नाही, परंतु जग काय म्हणते, यापेक्षा आपले मन काय म्हणते इकडे जे अतिशय लक्ष देतात, अशा आदर्श व्यक्तींची ओळख स्वतः करून घेऊन इतरांनाही करून देण्यासाठी मी लेखमाला लिहायला सुरुवात केली आहे.

हे लेख लिहिण्यातला माझा हेतू असा की जास्तीत जास्त ५-६ पृष्ठांच्या आत हा लेख तर पूर्ण व्हावाच, पण त्यात त्या व्यक्तीच्या जीवनाचा ठसा जास्तीत जास्त प्रभावीपणाने उमटलेला असावा. म्हणजे सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत हा लेख वाचता वाचता वाचकाला कंटाळा येऊ नये. असे परिचयात्मक लेख पुष्कळदा कंटाळवाणे असतात, असे मला आढळून आले आहे. म्हणून वाचकांची उत्सुकता कायम राहील अशा कलात्मक पद्धतीने हे लेख लिहिलेले असले पाहिजेत, हा मनाशी ठरविलेला नियम मी मोठ्या कटाक्षाने पाळला होता.

हे सर्व सांगायचे कारण असे की अशा तऱ्हेचा लेख अण्णांच्याबद्दलही लिहावा हा विचार माझ्या मनात, बऱ्याच वर्षांपासून होता. म्हणून १९६१ मध्ये 'निबंध लेखन'

पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मी पुण्यास गेलो असता, अण्णांना त्यांच्या कार्यालयामध्ये जाऊन भेटलो आणि त्यांना माझा आशय थोडक्यात सांगितला. तेव्हा ते म्हणाले, 'माधवराव' माझ्याबद्दल काय लिहिण्यासारखे आहे?"

"पण मी जे काही लिहिणार आहे ते स्वतंत्रच असेल याविषयी आपण खात्री बाळगा!"

"तूर्त तरी तसे काही एक नको!"

त्यानंतर त्यांनी मला लेखनाविषयी प्रोत्साहनच दिले आहे. मी अभ्यास कसा करावा म्हणून त्यांनी मला योग्य मार्गदर्शन केले आहे, हे मला येथे मुद्दाम सांगावेसे वाटते.

गीतेतील विचार व व्यवहार "गीतेतील मुख्य विचार" या पुस्तकाबद्दल माझा वैयक्तिक अनुभव असा आहे की त्यातला 'व्यवहार' जितक्या वेळा वाचावा तितक्या वेळा त्याची गोडी वाढतच जाते. म्हणून मी फक्त एवढेच सांगतो की प्रत्येकाने हे पुस्तक निदान एकदा तरी वाचावे.

असा आशीर्वाद द्या अण्णा, आपल्याला सांगायला आनंद वाटतो की ४ जानेवारी १९६५ पासून मी सिगारेट ओढली नाही. मी अण्णांच्या आश्रमात होतो, हा विचार माझ्या मनात इतका प्रबळ झाला आहे की मनन नि लेखन यांत दिवसेंदिवस अधिकाधिक गुंग होऊन जात आहे. अशा तऱ्हेने मी साहित्याचा जो निदिध्यास धरला आहे त्यात खंड न पडता तो तसाच चालू राहील असा आशीर्वाद आपण मला द्या.

हा वाचनीय ग्रंथ इ. स. १९३८ मध्ये मॅट्रिक झाल्यावर मी अण्णांना विचारले होते की, "अण्णा असे एखादे पुस्तक सांगा की जे मी वाचलेच पाहिजे." हे ऐकून अण्णा म्हणाले होते, "असे एकच एक पुस्तक सांगता येणार नाही, परंतु जे जे योग्य वाटेल ते ते वाचायला हवे!"

परंतु आता २७ वर्षांनंतर वाचलेच पाहिजे असे एक पुस्तक मला सापडले आहे.

अण्णा आपले आयुष्य म्हणजे उत्कृष्ट चारित्र्याचा आदर्श नमुनाच होय. आपण आश्रमाच्या आवारात राहता, परंतु सर्व समाजाला सन्मार्ग दाखवावयाचा आहे, हा विचार आपल्या मनात पुन्हा पुन्हा उचंबळून येत असला पाहिजे. असे नसते तर 'समाचार' मधून पहिल्याच पृष्ठावर व्यक्त होणारे आत्मिक बोल तात्त्विक चर्चा वाटली असती. परंतु तसे न होता आपल्या विचारांना अनुभवांची जोड मिळाल्यामुळे व आपण आपले जीवन सार्वजनिक कार्यासाठी वाहून घेतल्याकारणाने आपल्या बोलण्याला, लिहिण्याला फार मोठी मातब्बरी आहे. म्हणूनच आम्हा वाचकांना 'सदाचार चिंतनी' वाचाविशी वाटते. कारण त्या आत्मिक बोलांत जणू काही आपण करीत आलेल्या सद्विचारांचे मंथन प्रतिबिंबित झालेले असते. स्वतः विचाराने, वाणीने, वागणुकीने आपण निर्मळ जीवन जगत आहात म्हणूनच असे सुविचार सुचतात. आपल्या अनुभवांचा सुगंध दरवळत असतो. कारण सुविचारांचा नंदादीप सतत तेवत ठेवल्याशिवाय अंतःकरणरूपी देव्हाऱ्यात सत्कार्य करण्याची स्फूर्ती होत नाही. आपल्या देशात विचारवंतांची वाण

नाही. उच्च विचार करून दाखविणारे वाचीवीरही खूप आहेत. परंतु कृती करणारे मात्र थोडे. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात की 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.' आपले जीवन म्हणजे सद्विचार, सदाचार आणि उच्चार यांचा त्रिवेणी संगमच होय.

आपली आठवण झाली म्हणजे आपली आदर्श मूर्ती माझ्या मनःचक्षूसमोर उभी राहते. तो आपला साधा पोशाख व मध्यम उंचीची कृश अंगकाठी आणि ती आपल्या चेहऱ्यावरील तपस्येची चमक इत्यादी अनेक गोष्टी माझ्याशी बोलू लागतात. त्यामुळे आपले गेल्या २५–३० वर्षांचे चरित्र पुन्हा पुन्हा अवलोकन करावे अशी इच्छा उत्पन्न होते. आणि मग, मला वाटते की मी वाचलेच पाहिजे असे पुस्तक म्हणजे अण्णांचे 'जीवनचरित्र' होय.

ईश्वर आपल्याला उदंड आयुरारोग्य देवो अशी त्या भगवंताच्या चरणी नम्र प्रार्थना आहे.

□ □ □

३२. जगाला थोर पण आम्हांला अण्णाच!

प्रा. शं. रा. विद्वांस, एम्. ए., बी. एड्.
व्यवसाय : सीनियर रीचर्स ऑफिसर (सोशिऑलाजी)
इन्स्टि. आफ रीजनल प्लॅनिंग, वर्धा

शिक्षणकाल १९३१ ते १९३४
योगशास्त्र, समाजसेवा, अध्यापन, ग्रामसेवा,
काव्यरचना, इ. विविध आवडी

शिफारसपत्र नाकारले आश्रमाच्या बाहेर पडल्याबरोबर शिक्षणाची काही-तरी व्यवस्था करणे भाग होते. खाजगी कोणाकडून मदत घ्यावयाची म्हणजे मी पूर्वी कोठे होतो हा प्रश्न येणारच. आश्रमाचे एक चांगले शिफारसपत्र घ्यावे म्हणून आश्रमात गेलो. हाच अण्णांचा व माझा भेटीचा पहिला प्रसंग. मी माझी हकीकत त्यांना सांगितली. त्या वेळी त्यांच्या मनात पुष्कळच कटुता निर्माण झाली असावी. मला त्यांनी सर्टिफिकेट देण्याचे नाकारले व सांगितले की आश्रम सोडून जाण्याचे खरे कारण लोकांना सांगावे व मदत मिळवावी.

या वेळेनंतर आपल्या जीवनात अण्णांचा फारसा उपयोग आपल्याला होणार नाही असे मला वाटले.

कै. दादांच्या निधनानंतर पहिल्याच दिवशी मी परगावाहून आल्यामुळे आश्रमात उशीरा गेलो. कै. दादांचे अन्त्यदर्शन मात्र होऊ शकले नाही. अण्णा ऑफिस-मध्ये होते. ते कागदपत्र चाळण्यात गढले होते. मी त्यांना विचारले, "आज तरी ऑफिस बंद का नाही ? दादांच्या मृत्यूचे दुःख आमच्यापेक्षाही तुम्हांला अधिक असेल." त्यांनी म्हटले, "व्यवहार हा चालू राहिलाच पाहिजे. दुःख करीत बसले तर कर्तव्य कसे होईल." ? या विचाराने माझ्या मनात चांगलेच घर केले. अण्णांची स्थितप्रज्ञ वृत्ती दिसून आली.

विद्येविषयी प्रेम आपल्या स्वतःच्या घराला 'विद्या' हे नाव देऊन त्यांनी आपले विद्याप्रेम व्यक्त केले आहे. कोणीही काही शैक्षणिक प्रयोग करीत असेल, शास्त्रीय दृष्टीने संशोधन करीत असेल तर अण्णांचा जरूर पाठिंबा मिळतो.

सायकॉलॉजीवर काही संशोधन करावे असा १९५० साली माझ्या मनात विचार आला. एक कच्चे टाचण अण्णांना मी दाखविले, त्यांनी ताबडतोब प्रा. डॉ. कोठूरकरांना ओळख दिली व भेटावयास सांगितले.

१९५०–५१ च्या दरम्यान मी 'कैवल्यधाम'मध्ये होतो. त्या वेळी अण्णा कुतूहलाने योगाच्या वऱ्याच अंगांविषयी चर्चा करावयाचे. सुट्टीत विद्यार्थ्यांकरिता मी वर्ग चालवावेत याकरिता योजना सुचवावयाचे. स्वतःचा नियमित अभ्यास कसा चालतो तेही सांगावयाचे.

शिफारसपत्र मिळाले १९६४ सालची गोष्ट आहे. मी बी. एड्. परीक्षा देऊन व्यवसायाच्या संशोधनात होतो. अण्णांच्या इच्छेप्रमाणे मी महाराष्ट्र विद्यालयात गेलो नव्हतो. पण त्या वेळी मी एका व्याख्यात्याच्या जागेकरिता अर्ज करीत होतो. मी अण्णांना भेटावयास गेलो त्या वेळी नुकतेच ते मालवणहून आले होते. प्रवासाचा शीण त्यांना खूपच आला होता. मी त्यांच्याशी माझा मनोदय बोललो; क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी माझ्याकरिता शिफारसवजा पत्रे लिहिली व ती परस्पर संबंधित व्यक्तींना धाडली. एके काळी मला अण्णांनी सर्टिफिकेट दिले नसले तरी जीवनाच्या मध्यान्ह-काळात अखेर अण्णाच उपयोगी पडले.

नव्या कल्पनांचे स्वागत अण्णांच्या सहवासांत थोडेसे जरी गेलो तरी शिक्षण-क्षेत्रातील दोन-चार नव्या कल्पना ते मांडतील. आपण काही नवीन करीत असू तर ते ऐकून घेतील, उत्तेजन देतील व वेळ पडल्यास काही रस्ताही दाखवतील. अण्णांचा पिंड शिक्षकाचा आहे. देशातील व देशाबाहेरील घडामोडी, मग त्या शास्त्रीय असोत, राजकीय असोत वा शैक्षणिक असोत, त्यांकडे डोळे उघडे ठेवून पाहा असे ते सांगतील. त्यांचा कल भारतातील कोणत्या राजकीय पक्षाकडे आहे ते मला तरी अद्याप गूढ आहे. तरी पण प्रस्थापित सत्तेला त्यांच्या विद्वत्तेबद्दल, कर्तृत्वाबद्दल आदर आहे.

विशुद्ध चारित्र्य धुतल्या तांदळाप्रमाणे अण्णांचे चारित्र्य शुद्ध आहे. संघर्ष असा त्यांच्या जीवनात मी तरी कधी पाहिला नाही ; तरी पण ज्या नैतिक बैठकीवर ते आहेत तिचे ते स्वतःच्या बाबतीत फार स्तोम माजवीत नाहीत.

शास्त्रीय वाढीबरोबर आपले आचारविचार बदलणे, दृष्टी उदार करणे, पूर्व-संस्कृतीचे गुणविशेष जपणे या गोष्टींवर त्यांचा फार जोर आहे असे मला वाटते.

मी जेव्हा जेव्हा अण्णांकडे जातो तेव्हा तेव्हा काही तरी नवी दृष्टी घेऊन येतो. त्यांच्याविषयीचे माझे अंदाज साफ चुकले आहेत. आश्रमाचा विशाल पसारा त्यांनी वाढवला आहे. पूर्वापेक्षा कितीतरी विद्यार्थी संख्येने व गुणाने आश्रमाचा फायदा घेत आहेत. भारतात एक आदर्श शिक्षण-संस्था म्हणून आश्रमाची कीर्ती पसरली आहे. परदेशस्थ मंडळी एक उत्कृष्ट शैक्षणिक प्रयोग म्हणून बघत आहेत.

सत्तामोहाचा त्याग आज निरनिराळ्या धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक संस्थांमधून सत्तेचे केन्द्रीकरण मोठ्या प्रमाणावर आढळते. वयामुळे काम होत नाहीसे झाले तरी सत्तेचा मोह आवरत नाही. पण अण्णा याला अपवाद आहेत. ठराविक वयानंतर ते संस्थेच्या प्रत्यक्ष कामातून निवृत्त झाले. स्वत:चे बिऱ्हाड संस्थेच्या जागेतून हलविले. संस्थेचे एक सल्लागार म्हणूनच ते आता या सर्व पसाऱ्याकडे बघतात. केवढातरी विलक्षण धडा आम्हांला आहे हा !

जगाला अण्णा फार थोर पुरुष, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आहेत. पण आम्हा सर्वांना ते अण्णाच आहेत व हेच आमचे भाग्य आहे.

□ □ □

३३. वातावरणाचा परिपाक

श्री. वि. का. करमरकर, बी. ए., बी. एड्.

व्यवसाय : शिक्षक, र. वा. टेक्निकल हायस्कूल, विलेपार्ले

शिक्षणकाल १९३१ ते १९३४

व्यायामशिक्षण देण्याची हौस; स्वप्रयत्नाने पदवीपर्यंत शिक्षण

संस्थेतील शिक्षण संस्थेतील शिक्षणात शिस्त आणि संस्कार यांची विचारपूर्वक योजना केलेली होती. आश्रमव्यवस्थेचे सारे नियम नीट पाळावे लागत. त्यामुळे स्वावलंबन, काटकपणा, सहकार्य, आज्ञापालन, साधेपणा, मितव्ययता, सहनशीलता, नियमितपणा व निर्व्यसनीपणा आदी गुणांचे बीजारोपण केले गेले.

वरील आचारांविचारांबरोबरच उच्च विचारांचे संस्कारही अनेक प्रकारे केले गेले. जयंत्या, पुण्यतिथी, उत्सव यांच्या निमित्ताने अनेक बौद्धिकवर्ग घेतले जात. चरित्रवाचन करून घेतले जाई. त्यांतून स्वार्थत्याग, देश-प्रेम, सेवाबुद्धी इत्यादीचे पाठ

मिळत. श्रेष्ठ पुढाऱ्यांच्या शहरात होणाऱ्या भाषणास पाठविले जाई. त्यातून राष्ट्रीय वृत्तीची जोपासना होई.

राष्ट्रीय शिक्षण संस्थेत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हे होते, ही गोष्ट फार महत्त्वाची. माझा स्वाभिमान त्यामुळे जागृत राहिला. आज स्वराज्यात १९६५ साली आपले मराठी माध्यम बदलून इंग्रजी माध्यम सुरू करणाऱ्या गुलामी वृत्तीच्या महाराष्ट्रीय शाळा पाहिल्या की ३०–३५ वर्षांपूर्वी ऐन ब्रिटिश राजवटीत अट्टाहासाने मातृभाषेमधून शिक्षण देणाऱ्या चालकांच्या तेजस्वितेची आणि मूलग्राही शैक्षणिक विचारांची प्रचीती येते. नुसते पुस्तकी शिक्षण कुचकामाचे आहे. यांत्रिक आणि औद्योगिक शिक्षण खऱ्या मोलाचे आहे असे आता-आता कोठे लोकांना पटू लागले आहे. त्या दृष्टीने विचार करता ३०–३५ वर्षांपूर्वीच संस्थेच्या शिक्षणात औद्योगिक शिक्षणाचा अंतर्भाव करणाऱ्या चालकांचे द्रष्टेपण प्रत्ययास येते.

गुरुजनांची वागणूक संस्थेच्या शिक्षणपद्धतीबरोबर गुरुजनांच्या वागणुकीचे संस्कारही मजवर झाले आहेत. विचार, उच्चार आणि आचार यांचा संगम आश्रमीय शिक्षकांत आढळे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी यांचे दर्शन त्यांच्यात घडे. संस्थेतील सारे वातावरण जणू उच्चतेने भारलेले असे. क्षुद्रतेस तेथे वाव नसे. आपल्या बाजूचे सारे उंच उंच आहे आणि आपण त्या मानाने फार म्हणजे फारच खुजे आहोत असे अनेकदा मनात येऊन जात असे.

गुरुवर्य अण्णा (डॉ. ग. श्री. खैर) यांचे व्यक्तित्व प्रसन्न आणि शीतल वाटे. त्यांच्या बोलण्यात विद्वत्तेची छाप जाणवे. अंतःकरणाला हात घालणारी आपुलकी त्यांच्या बोलण्या-वागण्यात प्रत्ययास येई, पण मला त्यांचा सहवास अल्प लाभला. कारण मी ज्या काळात आश्रमात होतो त्याच काळात गुरुवर्य अण्णा अमेरिकेस गेले होते.

गंगाजलाचा लाभ गंगेचा प्रवाह कितीही अथांग आणि पवित्र असला तरी ज्याच्या त्याच्या घागरीच्या आकारमानाच्या प्रमाणातच त्याला गंगाजलाचा लाभ होणार. आश्रमाच्या ज्ञानगंगेसंबंधी तेच म्हणता येईल. माझी कुवत लहान. तिच्या प्रमाणात अल्पांशाने मी काही गोष्टी ग्रहण करू शकलो आहे. माझ्या जीवनात काही निष्ठा निर्माण झाल्या आहेत. जे जीवन माझ्या वाट्याला आले आहे त्याबद्दल उबग नाही; उलट संतोष आहे. ज्या जागी मी आहे, त्या पदाचे कर्तव्य आपल्या कुवतीप्रमाणे प्रामाणिकपणे करीत राहण्याची जिद्द उत्पन्न झाली आहे. माझ्या व्यक्तिगत योग्यतेच्या मानाने किंचित वरच्या स्थानापर्यंत मी पोहोचलो आहे आणि त्याचे श्रेय संस्थेतील शिक्षण-पद्धतीला आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

□ □ □

३४. विशाल अंत:करणाचा अनुभव आला

श्री. द. म. बनछोड, एम.ए., एम्.एड्.

व्यवसाय : शिल्प संघटक; शिक्षण-संचालक-कार्यालय, पुणे

शिक्षणकाल १९३१ ते १९४१

संस्था व शिक्षक यांच्याशी घनिष्ट स्नेहाचे संबंध ठेवणारे माजी विद्यार्थी

शुद्धलेखन सुधारा १९३९ साली ज्युनियर एम्. ए. चा अभ्यास चालू होता. त्या वेळी संस्थेच्या पत्रव्यवहाराचे थोडेफार काम मी पाहात असे. पत्रे लिहिल्यानंतर ती गुरुवर्य अण्णांच्याकडून मान्य करून घ्यावयाची व नंतर ती पुढे रवाना व्हावयाची असा क्रम असावयाचा. एकदा एक पत्र वाचल्यानंतर गुरुवर्य अण्णांनी शुद्धलेखनाच्या काही चुका दाखविल्या व ग्रंथालयातून शुद्धलेखनाचे पुस्तक घेऊन त्याचा अभ्यास करावयास सुचविले. मी त्यांना सांगितले की 'आता शुद्धलेखनाच्या पुस्तकाचा अभ्यास करून माझे शुद्धलेखन सुधारेल असे मला वाटत नाही.' त्यावर गुरु. अण्णा म्हणाले, "तुझ्यासारख्या पदवीधरास शुद्धलेखनाच्या नियमांचा अभ्यास करून जर सुधारणा करता आली नाही तर या पदवीचा उपयोग काय?" असे म्हणून त्यांनी तो विषय तेथेच सोडून दिला.

एक-दोन दिवसांनी या प्रसंगाचा मी शांतपणे विचार केला व यापुढे आपल्या लेखनात शुद्धलेखनाची साधी चूकही राहू द्यावयाची नाही असे मी ठरविले. शुद्धलेखनावरील पुस्तके मिळवून त्यांचा मी अभ्यास केला व लवकरच शुद्धलेखनात प्राविण्य मिळविले.

रागातील आत्मीयता मे १९३९ : मी सीनिअर एम्. ए. च्या वर्गात गेलो. फीची व्यवस्था होईना. म्हणून जून १९३९ पासून संस्थेच्या बाहेर राहून काम करावे व शिकावे असे मी ठरविले. त्याकरिता मी परिचित मंडळींशी पत्रव्यवहार सुरू केला. अशा वेळी गुरुवर्य अण्णांनी हायस्कूल विद्यार्थ्यांची एक तुकडी सिंहगड येथे प्रवासास नेण्यास मला सांगितले. मी त्यांना माझी अडचण सांगितली. 'जून १९३९ पासून मी बाहेर राहून अभ्यास करणार असल्याकारणाने काम मिळविण्याचा माझा प्रयत्न चालू आहे. काही ठिकाणी पत्रव्यवहार चालू आहे. अशा परिस्थितीत मला पुण्यासच राहणे जरूर आहे.' गुरुवर्य अण्णांनी हेच उत्तर लेखी मागितले. मी ते दिले. त्यावर 'थँक्स्' असे इंग्रजीत त्यांनी लिहून जरा रागातच ती चिठ्ठी मजकडे पाठविली. मी ती मजजवळ ठेवून घेतली. त्यानंतर गुरुवर्य अण्णांनीच संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत माझ्या फीची अडचण मांडून एम्. ए.च्या वर्गाच्या फीची रक्कम संस्थेकडून मंजूर करून घेतली. असे काही

त्यांच्याकडून माझ्या बाबतीत घडेल असे मला वाटले नव्हते; कारण प्रवासी तुकडी सिंहगडास नेण्यासंबंधी त्यांची आज्ञा मी पार पाडू शकलो नव्हतो. या वेळी गुरुवर्य अण्णांच्या विशाल अंतःकरणाचा मला अनुभव आला.

माझी निवड केली पण जून १९४१ साली आश्रम सोडल्यानंतर मी चांदवड (जि. नाशिक) येथील श्री नेमिनाथ जैन हायस्कूलमध्ये काम करू लागलो. माझ्या कामासंबंधी फार चांगला अहवाल गुरुवर्य अण्णांच्या कानी गेला. त्यानंतर मी संस्थेत काम करावे अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार सुरू झाला तो पुढे २–३ वर्षे चालू होता. समक्ष भेटीत गुरुवर्य अण्णा म्हणाले होते "I have selected you as a Principal of the Maharashtra Vidyalaya after me." उमेदवारीच्या काळासंबंधी घटनात्मक अडचणीमुळे ही कल्पना मूर्त स्वरूपात आली नाही.

संस्थेविषयी अपप्रचार आश्रमात मी पूर्ण १० वर्षे काढली. या दहा वर्षांच्या अवधीत आपण एखाद्या जातीय संस्थेत वावरत आहोत अशी एकाही प्रसंगाने जाणीव झाली नाही. संस्थेत सर्व जातींची मुले अगदी गुण्यागोविंदाने समरस होऊन राहात असत. गुरुवर्य दादा, गुरुवर्य अण्णा अगर इतर गुरुजन यांच्यामध्ये जातीय दृष्टिकोन यत्किंचितही नव्हता असे मी छातीठोकपणे सांगू शकतो. संस्थेचे काम खरोखरच आपण एक राष्ट्रीय कामगिरी पार पाडीत आहो या भावनेनेच होत असे व आजही होत आहे. असे असता ही ब्राह्मणांची संस्था आहे, या संस्थेत ब्राह्मणेतरांना वाव नाही अशी टीका बाहेर कानावर येई, त्या वेळी मनस्वी सात्त्विक संताप येत असे.

□ □ □

३५. अष्टपैलुत्वाचे शिक्षण-संस्कार

लेफ्ट. कर्नल प्र. का. सोमण

व्यवसाय : संरक्षणखाते

शिक्षणकाल १९३१ ते १९३८

हौसेने व निग्रहाने संरक्षणखात्यात देशसेवा म्हणून काम करणारे

आमच्या गुणांचा उगम गुरुवर्य अण्णांनी आम्हा विद्यार्थ्यांना 'काय दिले' हा प्रश्न विचारण्यापेक्षा त्यांनी आम्हाला 'काय दिले नाही' हा प्रश्न जास्त सयुक्तिक ठरेल. कारण यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य या षड्गुणांचा जो काही कणभर भाग आम्हा माजी व आश्रमस्थ विद्यार्थ्यांत दिसून येत असेल, त्याचे फार मोठे श्रेय गुरुवर्य अण्णांना व कै. गुरुवर्य दादांना आहे.

त्यांच्यासारखे उदात्त चरित्र आणखी ते कोणते असणार? असे आदर्श आम्हा विद्यार्थ्यांसमोर जागृत स्वरूपात मूर्तिमंत उभे असताना उत्तमोत्तम गुणांचा आविष्कार आम्हा विद्यार्थ्यांत झाला नाही तरच नवल करावे लागेल.

बहुविध शिक्षण आमच्या आश्रमात विद्यार्थ्यांना नुसतेच अन्नदान, वस्त्रदान व विद्यादान देऊन कार्यभाग संपत नाही, तर त्यांच्या भावी आयुष्याचीही तरतूद केली जाते. काही नशीबवान विद्यार्थी कॉलेजचेही शिक्षण घेऊ शकतात व तेही सर्वस्वी आश्रमाचे खर्चाने !! पण बाकी सरसकट सारे, सुतारकाम, बागकाम, रसायनशास्त्र, कंपोझिंग, बाइंडिंग यांसारख्या हस्तकला आत्मसात करू शकतात. अगदी भाकरी भाजण्यापासून ते भिक्षा मागण्यापर्यंत विद्यार्थी स्वतःची कामे स्वतःच करतात, पण त्याच्याच जोडीला आत्मचरित्र-लेखन, निबंध-लेखन, प्रवास, दूरच्या सहली, देशी खेळ, धार्मिक शिक्षण, गीता-पठण, 'समाचारा'सारखे मासिक चालविणे वगैरे कलात्मक बौद्धिक व शारीरिक कामेही विद्यार्थ्यांकडून करून घेतली जातात. जीवनाचे एकही अंग हाताळल्याशिवाय राहात नाही व आश्रमीय विद्यार्थी स्वावलंबी बनतो. तो कोठल्याही क्षेत्रात टाकला तरी आपली कर्तबगारी दाखवून प्रकाश पाडल्याशिवाय राहात नाही.

साक्षात त्यागमूर्ती गुरुवर्य अण्णांच्या वैयक्तिक स्वार्थत्यागाला तर तोड नाही. अंगात एवढी पात्रता असताना आपल्या अंगच्या शिक्षणाच्या जोरावर इतर शिक्षण-तज्ज्ञांप्रमाणे त्यांनाही पैसा फावडचाने ओढता आला असता; पण विद्यादानाच्या समाजकारणामुळे द्रव्यार्जनाची गोडी अधिक वाटली असती तर ते "आमचे अण्णा कसे झाले असते !! " हे सारे पाहून या त्यागमूर्तीच्या पायी नम्रतेने शिर झुकते व मन स्तुतीने व आदराने भरून येते.

गुणांचे शिक्षण निर्व्यसनीपणा, साधी राहणी व सामाजिक कार्याबद्दलची आत्मीय कळकळ या गुणांचा संग्रह करण्यासाठी आम्हा आश्रमीय विद्यार्थ्यांना निराळे कष्ट घ्यावे लागत नाहीत. गुरुवर्य अण्णांचे व इतर आश्रमीय गुरुजनांचे प्रत्यक्ष जीवन दररोज पाहून त्यांचे अंकुर हृदयात आपोआप फुटतात व ह्या आश्रमाचे वातावरणात उत्तम पोसलेल्या समृद्ध वेलीसारखी त्यांची वाढ होते.

सौ. ताईचे मोठेपण मोठ्या माणसाचे संगतीत सारीच माणसे मोठेपण प्राप्त करू शकतात, हा सर्वसामान्य नियम आहे. हे जरी सारे खरे असले तरी सौ. ताईचे स्वत्व असे काही निराळेच आहे. त्यांची पतिनिष्ठा व कार्यनिष्ठा असाधारण आहे. त्यांच्यात त्यागाचे व सद्भावनेचे स्फुल्लिंग सतत जागृत होतेच. ते गुरुवर्य अण्णांच्या सान्निध्यात अधिक प्रज्वलित झाले, म्हणून गुरुवर्य अण्णांच्या संसाराला अवीट गोडी आली. गुरुवर्य अण्णांच्या त्यागाला जर सौ. ताईचा दुजोरा नसता तर त्यांच्या त्यागाचे अर्धेही ब्रेज प्रकाशले नसते.

बाहेर पडल्यावर कळते पण एकदा विद्यार्थी आश्रम सोडून बाहेर पडला म्हणजे मग आश्रमाची व तेथील गुरुजनांची खरी महती व प्रेमाची पारख त्याला होऊ लागते. मग वाटू लागते की केवढा मोठा गोड प्रेमसागर आश्रमाच्या रूपाने व त्या सुहृद गुरुजनांच्या रूपाने आपल्या मागे सदैव उभा आहे !

या आपलेपणाच्या भावना बलवत्तर होण्यास खरे काय कारण असेल तर हेच की कुलगुरू कै. गुरुवर्य दादा, गुरुवर्य अण्णा व सारे इतर आश्रमीय गुरुजन यांची विद्यार्थ्यांकडे

पाहण्याची आत्मीयतेची भावना ! यां गुरुजनांचे जिते-जागते त्यागाचे जीवन विद्यार्थ्यांना आश्रम सोडल्यावर आठवते व त्यास तोड बाहेरच्या जगात दिसून येत नाही. तेव्हा मग आदरभावना अधिकच वाढते व आश्रम आणखी जवळचा वाटू लागतो.

माजी विद्यार्थी-संघटन आम्हा माजी विद्यार्थ्यांना स्वतःचे घर व आश्रम यांत फरक वाटत नाही. नव्हे, आश्रम हा आमच्याच घराचा एक कायमचा अंग झालेला असतो. माजी विद्यार्थ्यांतील आश्रमाबद्दलच्या प्रेमाची खात्री अनुभवाने गुरुवर्य अण्णांना पटली व त्यांनी एक महान कार्य हाती घेतले. 'माजी विद्यार्थी-संघटन' हे ते मोठे कार्य गुरुवर्य अण्णांची चिरकाल स्मृती राखण्यास समर्थ आहे. माजी विद्यार्थ्यांच्या रूपाने आश्रमाची एक मोठी सुप्त शक्ती आश्रमाच्या बाहेर समाजात वावरत होती. ती गुरुवर्य अण्णांनी संघटित केली. 'समाचार' हे मासिक मोठ्या कुशलतेने सुरू करून त्याचा माजी विद्यार्थी-संघटनांसाठी उत्तम उपयोग करून घेतला व त्यालाही नावारूपाला आणले. 'समाचारात' दर वेळी एक नवा विधायक विचार देऊन 'समाचार' हे साऱ्या विद्यार्थिगणात मोठे आवडते मासिक करून टाकले.

□ □ □

३६. माझ्या प्रगतीचा उगम

श्री. कृ. ना. ठकेकर, बी. ए.

व्यवसाय : प्रिन्सिपॉल, फॉरेस्ट स्कूल, बोर्डी, फॉरेस्ट डिपार्टमेंट

शिक्षणकाल १९३२ ते १९३६

देशसेवेच्या भावनेने वृक्षांचो सेवा करणारे अभ्यासू सेवक

गुरुवर्य अण्णांसारखी विद्वान्, थोर, त्यागी व विद्यार्थ्यांच्या भवितव्याची खरी आत्मीय कळकळ कायम बाळगणारी आदर्श ध्येयवादी माणसे जोपर्यंत आपल्या समाजात आहेत, तोपर्यंत आपल्या समाजास ऊर्जितावस्था येणार यात थोडाही संदेह नाही.

इंग्लिश बोलण्याला प्रोत्साहन अमेरिकेहून परत आल्यावर टीचर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून आलेली नेमणूक नाकारून गुरुवर्य अण्णांनी आपल्या पूर्वीच्या महाराष्ट्र विद्यालयाचा ताबा घेतला. प्रथम ते फक्त आचार्य म्हणून व्यवस्था पाहात होते. मात्र आम्हा इंग्रजी ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी उत्तम लिहिता व बोलता यावे म्हणून व्याख्यानमाला सुरू केली. प्रत्येकाने ठराविक विषयावर इंग्रजीत आपले विचार प्रकट करावयाचे. गुरुवर्य अण्णा ह्या व्याख्यानमालेस हजर असत. आमच्यांपैकी श्री. गानू

वगैरे विद्यार्थी इंग्रजीत काहीतरी बोलत, परंतु माझ्यावर प्रसंग आला म्हणजे मला डोंगर कोसळल्यासारखे वाटायचे. दोन शुद्ध वाक्ये देखील मी बोलू शकत नसे. तेव्हा गुरुवर्य अण्णांनी आम्हांस प्रोत्साहन देताना " There is enough place at the top " ह्या म्हणीचा अर्थ विशद केला. तेव्हापासून माझी इंग्रजी बोलण्याची घिटाई वाढत गेली व आता मी सव्हेंइंग, फॉरेस्ट लॉ वगैरे विषय इंग्रजीतच चांगले शिकवू शकतो. "इंडियन फॉरेस्टस्"सारख्या जागतिक मासिकात माझा एक लेख प्रसिद्ध झाला, तेव्हा मला गुरुवर्य अण्णांची आठवण झाली, कारण पूर्वी इंग्रजीत र-ट-फ करणारा ठेकेकर गुरुवर्य अण्णांच्या प्रोत्साहनाने सुधारला.

माझे कौतुक १९३६ च्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेचा शे. २८ टक्के निकाल लागला. त्या वर्षी मी ६६ टक्के गुण मिळवून महाराष्ट्र विद्यालयात पहिला आलो. ज्या दिवशी निकाल समजला त्या दिवशी गुरुवर्य अण्णांनी मला चेंडूसारखा वर उचलला. त्यांच्या मुलांमुलींनी शिक्षणात असेच यश दाखविले आहे; परंतु त्यांना त्यांनी असे उचलून घेतले नसेल. माझ्या व्यवसायातील व जीवनातील सर्व प्रगतीचा उगम गुरुवर्य अण्णांच्या शिकवणीत आहे.

वनरक्षक प्रशिक्षण विद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास शिस्त व वर्तणुकीबद्दल १०० गुण असतात. ह्या १०० गुणांची वाटणी मी आश्रमीय जीवनात अण्णांनी शिकविलेल्या अष्टसूत्रीला धरून (नियमितपणा, व्यवस्थितपणा, अभ्यास, चिंतन आदि) केली आहे.

ऋण-विमोचन गुरुवर्य अण्णांनी ऋणविमोचनाची कल्पना काढली. त्या कल्पनेची आपल्या हातून परिपूर्णता कशी होणार हा विचार मला नेहमी भेडसावीत असे. तेव्हा शेवटी एकमुठी ऋणविमोचन करण्याची ताकद येईपर्यंत आजन्म वार्षिक वर्गणी आश्रमास पाठविणेबद्दल संकल्प केला. तो संकल्प आजतागायत व्यवस्थित पार पडत आहे. शिवाय गरजूंना मदत करण्याचे काम चालूच आहे. मला ही प्रेरणा गुरुवर्य अण्णांनी दिली.

श्री. मायकेल इ. सॅडलर लिहितात :—

" The essential things in education are intellectual interest, freshness of teaching, human sympathy and devotion to high aims. These are spiritual things. "

ह्या सर्व स्वर्गीय देणग्या गुरुवर्य अण्णांच्या व्यक्तिमत्वात परिपूर्ण भरलेल्या आहेत, म्हणूनच त्यांच्या शिष्यांना तद्वत शिक्षण लाभत आहे व हे शिष्य ठिकठिकाणी विखुरल्यावर समाजोन्नतीच्या राष्ट्रीय कार्यास हातभार लावीत आहेत.

□ □ □

३७. माझ्या स्वप्नावर आघात

श्री. ग. गो. अतीतकर

व्यवसाय : टेक्निकल ऑफिसर, सेंट्रल डिझाइन ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली

शिक्षणकाल १९३२ ते १९३६

कडू स्मृतींचेही गोड स्नेहात रूपांतर करणारे माजी विद्यार्थी

माझी विनंती अमान्य झाली १० वी ची सहामाही परीक्षा झाली. त्यात मला सर्व विषयांत चांगले गुण ५० ते ६० टक्के पडले. गणितात तर मी सर्व विषयांपेक्षा चांगले गुण मिळविले. पण इंग्लिशमध्ये मात्र नापास झालो.

ह्याच वेळी जे अभ्यासात चांगले नाहीत त्यांना घंदेशिक्षण द्यावयाचे ही नवी कल्पना तुम्ही अमलात आणण्याचे ठरवलेत, आणि मी इंग्लिशमध्ये नापास झालो, म्हणून माझे शिक्षण बंद करून मी घंदेशिक्षण घ्यावे असे मला सांगण्यात आले. मी आपणास विनंती केली व १० वीच्या वार्षिक परीक्षेत चांगले गुण न पडल्यास माझे पुढचे शिक्षण बंद करावे असेही सुचविले. पण आपण माझी विनंती अमान्य केलीत व संस्थेत राहावयाचे असल्यास फक्त घंदेशिक्षणच घ्यावे लागेल, असे मला सांगण्यात आले.

स्वप्नावर आघात १० वीत असतानाच माझ्या आवडीनुसार मी संस्थेतील 'इलेक्ट्रिक व दिवाबत्ती' या विषयांचा सेक्रेटरी होतो. त्या वेळी पुढे चांगले शिकून इंजिनियर व्हावे अशी माझी इच्छा होती. पण आपल्या योजनेमुळे ह्या माझ्या स्वप्नावर मोठा आघात झाला.

पुन्हा संबंध जोडले हजारो विद्यार्थी संस्थेतून शिकून बाहेर विविध क्षेत्रांत वावरत आहेत. अशा माजी विद्यार्थ्यांशी संबंध वाढवावा व शक्य तर त्यांच्याकडून हस्ते परहस्ते मदत मिळवावी व संस्थेच्या वाढत्या व्यापास त्यांचा हातभार लागावा ही तुमचीच कल्पना. ही कल्पना अगदी योग्य व स्तुत्य होती. ह्या कल्पनेतूनच आपण जेथे जाता अशा ठिकाणी माजी विद्यार्थ्यांना एकत्र बोलावून विचारविनिमय करता. अशा एका प्रसंगातूनच आपले संबंध पुन्हा प्रस्थापित झाले. मला आपल्याविषयी व आपल्या कार्याविषयी फार आदर वाटतो.

संस्थेत झालेल्या संस्कारांचा व शिस्तीचा माझ्या पुढील आयुष्यात मला पुष्कळ उपयोग झाला. संस्थेत असताना अनेक चांगले मित्र मिळाले. त्यांपैकी काही जणांशी अजूनही उत्तम मैत्री टिकून आहे.

□ □ □

३८. नेताजी सुभाष बोस व आम्ही

श्री. प. ल. पोहरकर

व्यवसाय : माध्यमिक शाळा शिक्षक, अमरावती

शिक्षणकाल १९३२ ते १९३६

कै. सुभाषचंद्र बोस यांच्या स्वातंत्र्य-संग्रामातील सैनिक

माझ्या भारतीयत्वाचे मूळ उमरखेड ! यवतमाळ जिल्ह्यातील, सन १९२८ ते १९३९ पर्यंत ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ आणि काँग्रेसचा सत्याग्रह, ह्या चळवळींनी गाजलेले खेडे ! उमरखेडचा ब्राह्मणेतर वाद नाशिक व पुणे ह्या दोन्ही आश्रमांत माझ्या अनुभवास अणुमात्रदेखील आला नाही. उलट मी ब्राह्मण झालो नाही, मराठा ठरलो नाही, एक भारतीय नागरिक म्हणूनच अंतर्बाह्य जीवन भोगीत आहे. त्याचे एक खास महत्त्वाचे मूळ कारण म्हणजे पुणे अ. वि. गृहाच्या महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्य व्यवस्थापक गुरुवर्य अण्णासाहेब यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मला लाभलेले राष्ट्रीय आणि नैतिक शिक्षण हे होय.

साहेबी पोषाखात आणि नंतर अचानक एके दिवशी एक व्यक्ती आश्रमात कवठीच्या झाडाखाली उभी असलेली दिसली. पायात बूट, अंगावर काळसर रंगाचा सूट, गळ्यात नेकटाय, डोळ्यावर चष्मा आणि डोक्यावर विचरलेले विरळ केस. अशा साहेबी थाटात मी त्या व्यक्तीला दुरून पाहिले. मनात म्हटले, "हा साहेब इथे का आला ?" दुसऱ्या दिवशी सकाळी सातच्या सुमारास मी स्वयंपाकगृहाकडे जाताना मला एक व्यक्ती दिसली. पायात खडावा, पांढरे शुभ्र धोतर, अंगात एक पांढरी शुभ्र बनियन, डोळ्यावर चष्मा, उजव्या हातात जाड जाड पुस्तके छातीशी धरलेली, डोक्याच्या केसाची ठेवण तीच. अशा महाराष्ट्रीय पेहरावात ती मूर्ती पाहिली. "हेच ते अण्णासाहेब खैर". मला आनंद झाला. पुढे दोन वर्षे मी आश्रमात राहिलो. अण्णा मला एकदाही साहेबी पोषाखात दिसले नाहीत.

नेताजी सुभाष, गुरु. अण्णा व मी सन १९३५ चे वर्ष. पुण्यात काँग्रेस व हिंदुसभा हे दोन्ही पक्ष गाजत होते. नेताजी सुभाषचंद्रांनी आश्रमास भेट दिली. मी त्या वेळी रांगोळीच्या पिठाचा भारताचा नकाशा काढला. त्यावर तिरंगी झेंडा व भगवा झेंडा यांची फुली करून तिरपे काढले. फुलीच्या रिकाम्या भागात "१९——" असा अंक लिहिला. नेताजी त्या नकाशापाशी थांबले. अण्णांस काही प्रश्न विचारू लागले. अण्णांनी स्वत: काहीच उत्तर न देता मला बोलवून घेतले. आज्ञेप्रमाणे मी नेताजींच्या पुढे उभा राहिलो. नेताजींनी विचारले,

" What do you want ? "

मी— " We want India free ! "

नेताजी " When will she be ? And who will do it ? "

मी " You or Hindu Sabha ! "

नेताजी—" O, My boy ! That is left to you all. "

सर्व मंडळी हसली. अण्णांनी माझी पाठ थोपटली. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तींना पोसणारे, विचारसरणीस चालना देणारे आणि प्रत्यक्ष प्रसंगी त्यांनाच पुढे करणारे शिक्षणशास्त्रज्ञ फारच विरळा ?

सैन्यात आणि नोकरीत कसोटी आश्रमात घडलेला "नेताजी सुभाष-प्रसंग" आठवून, नेताजींच्या आय. एन्. ए. स मिळता यावे म्हणून आई व पत्नी यांच्या मनोभावनांची पर्वा न करता मी सैन्यात वेधडक भरती झालो. आम्हा सोळा महाराष्ट्रीयांत मी व तांबे मिलिटरी ट्रेनिंगला मुळीच थकलो नाही. व्यावसायिक शिक्षणातही हरलो नाही. मिलिटरीच्या त्या बरॅक्समध्ये मनापासून खरोखर आठवण कोणाची होत असेल तर ती अण्णांची व बापूसाहेब लुकतुके यांची ! कारण उघडच होते. बापूसाहेबांनी ड्रिल शिकविली होती. अण्णांनी तर थोर नेताजींचे प्रत्यक्ष दर्शन घडविले होते. त्यानंतर माजी मध्य-प्रदेश व वऱ्हाडच्या धान्य विभागात गोदाम-सुपरिंटेंडेंट झालो आणि मार्च १९५४ पर्यंत नोकरी केली. या काळात गरिबांना मदत करणे, गरीब चपराश्यांना शैक्षणिक उत्तेजन देणे, आणि काळा बाजार करणाऱ्यांना कडक शासन करणे इत्यादी मार्ग कार्यपद्धतीत आपोआपच उतरले आहेत, असे माझे मलाच दिसू लागले. ह्याचे वास्तविक कारण म्हणजे महाराष्ट्र विद्यालयात अण्णांच्या कारकीर्दीत माझ्यावर घडलेले संस्कार हे होय !

मार्गदर्शन चालूच आहे सन १९३९ पासून आश्रमाचा दुरावलेला संबंध सन १९६१ च्या एप्रिलमध्ये पत्रद्वारे पुनश्च प्रस्थापित केला. गुरुवर्य अण्णांनी कळविले की, तुझ्या मुलास भरपूर शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात येईल. वर्षे लोटली तरी अण्णा आपल्या विद्यार्थ्यांना विसरत नसतात. उलट त्यांना शैक्षणिक, व्यावसायिक मार्गदर्शन करण्यात सदोदित तत्पर असतात, ह्या त्यांच्या स्वभावधर्माची साक्ष मला पटली. समाचाराच्या मासिक अंकाच्या मुखपृष्ठावरील जीवनोपयोगी वस्तुनिष्ठ विचार आणि आतील मजकूर मला गेल्या चार वर्षांत इतका उपयुक्त झाला की, मी आपल्या कौटुंबिक जीवनात तथा व्यवसायात लाभदायक बदल करू शकलो. मी चारशे मैल दूर असलो तरी अ. वि. गृहाच्या आवारातच वावरत आहे असा मला मनोरंजक अनुभव येतो.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ७५५८६ दि: निर्लेखित
वर्ग क्र. २०९३ बो: दि: 20/3/92

३९. डॉ. खैर इज् माय गुरू

श्री. बा. ग. काणे, डी. एम्. ई., ए. एम्. आय्. ई.

व्यवसाय : एम्. ई. एस्. डिपार्टमेंटमध्ये नोकरी,
गॅरिसन इंजिनियर, पणजी, गोवा.

शिक्षणकाल १९३२ ते १९४१

स्वदेशसेवाव्रताच्या निष्ठेने संरक्षणखात्यात काम करीत आहेत

सदा धावपळ १९३३ साली गुरु. अण्णा मायदेशी परत आले त्यावेळी नाशिक शाखेत डॉ. बा. शि. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार झाला. सत्काराला खूप गर्दी झाली होती. अण्णा त्यावेळी कामात अतिशय गुंतलेले असत. नुसते कपडे घेण्यासाठी अगर पाणी पिण्यासाठी सुद्धा चार पावले जायचे असले तरी ते पळत जात असत. आम्हाला वाटायचे, एवढा मोठा माणूस; परदेशातून जाऊन आलेला; आणि लहान मुलासारखा पळतोय काय ?

इंग्रजी संभाषणाची प्रेरणा दर शनिवारी गुरु. अण्णा इंग्रजी Conversation चा एक तास प्रत्येक वर्गावर घेत असत. त्या काळात इंग्रजी भाषेतून संभाषण करणे ही गोष्ट आम्हा शाळेतील मुलांना किती अवघड व अशक्य वाटत असे. कालांतराने आम्ही नुसते इंग्रजीतच नव्हे तर संस्कृतमध्येही संभाषणे करू लागलो.

पहिले पुस्तक परदेशातून परत आल्यावर अण्णांनी 'जगातील समाज क्रांती व हिंदुस्तान' असे एक पुस्तक मराठीतून लिहिले होते. केवळ अण्णांनी लिहिलेले पुस्तक म्हणून एखाद्या धर्मग्रंथाप्रमाणे आम्ही ते वाचीत असू. या पुस्तकाच्या कित्येक प्रती आम्ही घरोघर फिरून विक्री करून संपविल्या.

निवडणुकीतील यशाचा परिणाम आमचे अण्णा खुल्या मैदानात लढत लढवून प्रथमच युनिव्हर्सिटीत निवडून आले. आश्रमातील कोणाही व्यक्तीने यापूर्वी आश्रमाबाहेरील कार्यात भाग घेऊन, सर्व जनसमाजाला व्यक्तिशः आव्हान देऊन, आम्हीही कोणीतरी आहोत, ही जाणीव देण्याचा प्रयत्न त्या वेळेपर्यंत केलेला नव्हता. अण्णा निवडून आले व आम्हाला कृतकृत्यता व धन्यता वाटली. व्यक्तिशः मला माझ्या कॉलेज-जीवनात खेळ, वक्तृत्व इ. खुल्या चढाओढीत भाग घेण्याचे धैर्य गुरु. अण्णांच्या या उदाहरणानेच आले. यापूर्वी आश्रमातून कॉलेजमध्ये जाणारे विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त कॉलेजच्या कोणत्याच कार्यक्रमात भाग घेत नसत. आमचा बुजरेपणा बहुतांशी त्याला कारण होता; तो अण्णांनी घालविला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. ९५१५१

पराक्रमास प्रोत्साहन महाविद्यालयातील अभ्यासाव्यतिरिक्त खेळ, लष्करी शिक्षण, वक्तृत्व इ. कार्यक्रमात भाग घेण्याची संधी व धैर्य आम्हास अण्णांच्या प्रोत्साहनानेच मिळाले; व त्यात कमी अधिक प्रमाणात आम्ही यशही मिळविले. अशा कार्यक्रमांतून भाग घेणारी आमची पहिलीच तुकडी होती. त्यापूर्वी विद्यार्थी अशा प्रकारच्या कार्यक्रमात भाग घेणे म्हणजे वेळेचा अपव्यय व शिस्तबाह्य वर्तन समजत असत.

माझा फायदा अण्णांच्या आयुष्यातील विशेष गोष्ट माझ्या मनावर प्रामुख्याने ठसली असेल तर ती म्हणजे त्यांची सतत व पद्धतशीर काम करीत राहण्याची सवय, निरभिमानता, कर्तव्याची तळमळ व बरोबरीच्या व हाताखालच्या माणसांना आपलेपणा, जिव्हाळा लावून त्यांना आपल्या बरोबर घेऊन पुढे जाण्याची पद्धत. त्यांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून मी माझ्या आयुष्यात स्वतःचा खूपच फायदा करून घेतलेला आहे.

डोळ्यादेखत जिवंत स्मारक अण्णांच्या आयुष्यात त्यांच्या नजरेसमोर साकार झालेले स्मारक म्हणजे आश्रमाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना. एक काळ असा होता, की आश्रमातून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याला "मी आश्रमाचा माजी विद्यार्थी आहे", असे सांगण्यात कमीपणा वाटत असे, त्यांच्यात न्यूनगंड असे. इतकेच नव्हे तर ही सत्य गोष्ट इतरांना कळू नये म्हणून तो काळजी घेत असे. कारणे इतर काय असतील ती असोत ! अण्णांच्या प्रतिष्ठेने व प्रोत्साहनाने ही भावना आता संपूर्ण नाहीशी झाली आहे. इतकेच नव्हे, तर आमची संघटना हा आज एक मोठा वटवृक्ष झाला आहे. निव्वळ या वटवृक्षाच्या छायेत सुद्धा आम्ही आमचा आश्रम अबाधित चालवू शकू, असा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. गुरु. अण्णांचे हे जिवंत स्मारक—याची देही याची डोळा—आज अण्णा पाहात आहेत, याची आम्हाला धन्यता वाटते.

असंग्रह वृत्ती कायम गुरु. अण्णा पीएच्. डी. झाल्यावर व युनिव्हर्सिटीत निवडून आल्यापासून त्यांची प्रतिष्ठा दिवसेंदिवस वाढत चालली. वेळोवेळी निरनिराळ्या मानाच्या जागांवर त्यांची नेमणूक होऊ लागली. शैक्षणिक क्षेत्रातील एक अधिकारी तज्ज्ञ म्हणून सरकारसुद्धा त्यांचा सल्ला घेऊ लागले. कीर्तीबरोबरच त्यांना वेळोवेळी मानधन पण मिळू लागले. अण्णांनी आणखी काही पुस्तके लिहिली व ती खूपच लोकप्रिय होऊन त्यांतही त्यांना अर्थप्राप्ती होऊ लागली. वाढती कीर्ती, मान्यता व संपदा यांबरोबर प्रवाहपतिताप्रमाणे वाहात न जाता तपस्वी अण्णा अजूनही तपस्वीच राहिले.

शिक्षणक्षेत्रात अधिकार आश्रमातून विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडल्यावरसुद्धा अण्णांचे त्याच्यावर लक्ष असते व त्यालाही अण्णांचा अभिमान व प्रेम वाटते.

समाजात वावरत असताना गुरु. अण्णांसंबंधी लोक काय म्हणतात याची कल्पना म्हणून दोनच प्रसंग सांगतो. महाराष्ट्र सरकारचे Director of Education डॉ. देशपांडे यांच्या जवळ बोलत असताना सहज त्यांची व अण्णांची ओळख आहे काय

असे मी विचारले. ते म्हणाले, "ओळख ? He is one of the most known persons in the field of education, who is consulted as an authority on the subject by Govt. and private institutions alike."

डॉ. खैर इज माय गुरू ! कालच ३ जाने. १९६५ रोजी मी बेळगावला गेलेलो असताना तेथे किंग जॉर्ज (पब्लिक) स्कूलचे प्रिन्सिपॉल श्री. मणी यांची भेट झाली. बोलणी संपल्यावर मी सहज त्यांना विचारले की आपण डॉ. खैरांना ओळखता काय ?" ते म्हणाले, "There are only two persons in this country in the field of education whom I respect most. One of them is Dr. Khair and the other is Dr. Zakir Hussain." हे ऐकून माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले आणि कंठ भावनेने सद्गदित झाला. त्यांनी विचारले. "Why are you so much moved ? बराच वेळ माझ्या तोंडातून शब्दच बाहेर उमटेना. त्यानी माझ्या खांद्यावर हात ठेवला. मी म्हणालो Dr. Khair is my गुरू."

▱ ▱ ▱

४०. अण्णांमधील माणूस

प्रि. ना. गो. जोशी, एम्. ए., बी. टी.

व्यवसाय : प्राचार्य, आर्. एम्. भट हायस्कूल, परळ, मुंबई १२

शिक्षणकाल १९३२ ते १९४५

जपान, अमेरिका इ. प्रवास; शिक्षणक्षेत्रात लेखन व कार्य; महा. राज्य आदर्श शिक्षक पारितोषिकाचे मानकरी व मुख्याध्यापक परिषद १९६६ चे अध्यक्ष

आमच्यावर सगळे प्रयोग ! आमच्यावर सगळे प्रयोग ! गुरु. अण्णांनी काढलेले महाराष्ट्र विद्यालय म्हणजे शैक्षणिक प्रयोगशाळा, व ते प्रयोग सर्व आमच्यावर. शाळा म्हणजे सगळा प्रयोगच. पुस्तके, वाचन, मनन, धंदेशिक्षण, स्वाध्याय, प्रबंध, शारीरिक शिक्षण, धार्मिक शिक्षण; कोणत्या तऱ्हेचे प्रयोग आमच्यावर झाले नाहीत ? आमच्यापैकी बऱ्याच जणांची बुद्धी बऱ्या दर्जाची असल्याने या सर्व प्रयोगांना कसेबसे तोंड देऊन आम्ही शिल्लक राहिलो. त्यांच्या त्या प्रयोगाचे महत्त्व आज माझ्यावर शाळेची जबाबदारी असताना कळते. अण्णांचा प्रयोगाचा हेतू लक्षात येतो. परंतु त्यावेळी ते सर्व ओझे वाटावयाचे. एखादेवेळी अण्णांचा हुकूम सुटावयाचा. परीक्षा आहे असे समजून प्रश्नपत्रिका तयार करा. मला वाटायचे ही काय उरफाटी तऱ्हा ! प्रश्न कसले काढायचे ? आज त्यांचा प्रयोग मला कळतो व मी विद्यार्थ्यांना तेच सांगतो. विद्यार्थ्यांना काय वाटत असेल कोण जाणे ?

उग्र दर्शन आश्रमात कौटुंबिक भावना व जिव्हाळा वाटत नसे. तसे दादा, अण्णा, बाबा, तात्या सगळे होते. परंतु ही कुटुंबाची एक बाजू होती. दुसरी बाजू छड्या, शिक्षा, मार यांनी सावरलेली होती. गुरुवर्यांत ऋषीमुनींची प्रचंड उग्रताच असे. त्यामुळे जुन्या विद्यार्थ्यांत आश्रमीय राहणीच्या, गोड ऐवजी कटू भावना फार असत. माझ्यावर चौदाव्या रत्नाचे प्रयोग फारसे झाले नसताही, आश्रमाबद्दल कटू भावना सुरुवातीला होती, हे नाकबूल करण्याचे कारण नाही. परंतु ती लवकर मावळली आणि त्याला कारणही अण्णांचा बदललेला स्वभावच असावा.

वैयक्तिक कृपालोभ माझ्या बाबतीत अण्णांना फार आस्था व प्रेम आहे. मी परदेशात जावे म्हणून अण्णांचे माझ्यापेक्षाही जास्त प्रयत्न व इच्छा. शैक्षणिक क्षेत्रात मी हळूहळू भाग घेऊ लागलो. त्याचा जास्त आनंद अण्णांनाच. मुख्याध्यापक संमेलनाचे वेळी मी एकदा प्रेक्षणीय स्थळे पहाण्यात वेळ घालवला, तेव्हा अण्णांनी स्पष्ट शब्दांत नापसंती दर्शवून पुढे 'तू या कामात पुढे यावेस व चांगले काम करावेस' अशी आज्ञार्थक इच्छा प्रकट केली. त्याचा फायदा मला आज दिसतो. ते बोलले त्यावेळी अर्थात माझे तोंड उतरले होते व पहाण्यालायक झाले होते. असे आहेत अण्णा—गोड खरे पण मधूनच औषधी कारल्याने भरलेले.

ज्ञानलालसेचे बाळकडू आता मला अण्णांचे बोलणे बरेच कळते. त्यांचा प्रत्येक विषयाकडे पाहाण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन, नवीन ज्ञानाची लालसा, प्रत्येक विषय समजून घेण्याची धडपड व दुसऱ्याचे (प्रसंगी टाकाबू) ऐकून घेण्याची कला, काही प्रसंगांची चटकन उकल, चर्चा व शेवटी कॅरम ! अण्णांच्या सहवासात येणे ही भाग्याची संधी, त्यामुळे आपोआपच अण्णांचा गुण नाही पण बाण लागला व आयुष्यात पुष्कळ साध्य झाले.

स्वभावात क्रांती अण्णांच्या मध्ये जमीन अस्मानाचा फरक झालेला आज दिसतो. त्याचे कारण अण्णा चाकोरीतून बाहेर पडले व त्यांची विचारधारा बदलत गेली. एके काळी जबर शिक्षा देणारे अण्णा, मानसशास्त्राची कास धरू लागले. एकदा एका विद्यार्थ्याला छड्या मारताना त्यांनी मला साक्षीदार म्हणून बोलाविले. मला त्यावेळी कसेसेच वाटले. पण बोलण्याची काय छाती होती ? आज मोकळेपणाने बोलण्याइतका खास बदल झाला आहे.

ध्येयवादाची गंगोत्री बी. ए. झाल्यावर मी महाराष्ट्र विद्यालयात शिकविले. पहिली ते तिसरी. माझ्यावर अण्णांची सावली पडली आहे, असे त्यावेळी मुलेच म्हणत. मला त्यात अभिमान वाटे, बरे वाटे.

देशासाठी, समाजासाठी काही करावे हा विचार माझ्या मनात आश्रमात असताना उगवला व अण्णांच्या ध्येयवादी जीवनाकडे पाहून दृढ झाला.

अजूनही मला कधी कधी उदासीनता येते. गेल्या वर्षी गुरुवर्य अण्णांच्या कार्यालयात बसलो होतो. अनेक वर्षांनी त्यांचे टेबल, खुर्ची पाहिली. साधेपणाचा कळस दिसला. ही उंची आपल्याला साधत नाही म्हणून खंत वाटली. एका माजी विद्यार्थ्याला

परदेशी जाण्यासाठी निरोप देताना अण्णा म्हणाले, "गेली ४० वर्षे मी हे गरिबांच्या शिक्षणासाठी धडपडण्याचे काम करतो आहे. पण मला या कामाचा कंटाळा वाटत नाही." अण्णांचे हे विचार एखाद्या उंच टेकडीवर असणाऱ्या दीपगृहाप्रमाणे मार्गदर्शक वाटले. समाजसेवा, देशसेवा, त्याग या सर्वांचा समुच्चयच अण्णांच्या आयुष्यात मला आढळला, एकदा नव्हे, अनेक वेळा.

अण्णांमधील "माणूस" अण्णांमधील 'माणूस' मला फार उशिरा प्रतीत झाला. अण्णासाहेब हे विनोदी, रसिक, प्रपंचात रस घेणारे गृहस्थ आहेत याची जाणीव प्रथम मला नव्हती. आश्रमात असताना ते समजणे अवघड होते. पण पुढे व्यवसायात पडल्यावर व जीवनातील अनेक अनुभव येत असताना ज्यावेळी अण्णांची ओळख नव्याने होऊ लागली, तेव्हा त्यांच्या जीवनातील हे आकर्षक पैलू मला दिसू लागले.

अण्णांच्याबद्दल चांगले मत होण्यासाठी, त्यांच्याशी निरनिराळ्या तऱ्हेने विविध पैलू लक्षात घेऊन संबंध येणे फार आवश्यक आहे.

कामाचा व्याप आता अण्णा खरे पाहिले तर एक संस्थाच झाले आहेत. शिक्षणातील कार्य, लेखन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, विचार, मंथन व चिंतन हे सर्व धागे अण्णांच्या ठिकाणी एकत्र आले आहेत; आणि तेही स्वत्व न सोडता. कौटुंबिक भावना, संस्कार, संस्कृती व आपले आचरण यांतील वैशिष्ट्य ठेवून. अण्णांच्याबद्दल गैरसमज जुन्यांत जास्त व नवीनांत कमी. कारण नवीन विद्यार्थीवर्गाचा संबंध अण्णांशी जास्त आला. कित्येक वेळा अण्णांनी जिंकलेले अनेक कठीण माजी विद्यार्थी पाहिले. हे काम अण्णाच करू जाणोत, ते इतरांच्याने होणे कठीण.

प्रेमाने पोट भरलेले आहे मी लग्नाआधी अण्णांना म्हटले, "मुलगी तुम्ही पहा." अण्णा खरोखरच मुलगी पहायला आले. चर्चा केली व संमती दर्शविली. एम्. ए. होण्यासाठी मदत अण्णांची. चांगले गुण मिळाल्यामुळे शाबासकी त्यांचीच. मी त्यांना एकदा सहज म्हटले की, "मला जर आश्रमात प्रवेश मिळाला नसता व तुमची मदत झाली नसती तर खेडेगावात शेतात कुठेतरी रावत राहिलो असतो." अण्णांना माझे बोलणे आवडले नाही. "छे! तू कृषिपंडित झाला असतास!" त्यांना मी काही सामान्य असावे हे पटलेच नाही.

विद्यार्थ्यांसाठी गुरूने काय करावे? अण्णांनी माझ्या बाबतीत काही करावयाचे बाकी ठेवले नाही. नुकतीच माझी रात्रशाळा–राज्यसमितीवर नेमणूक झाल्यावर अण्णांचेच अभिनंदनाचे व मार्गदर्शनाचे पहिले पत्र. मी योग्य विश्रांती घ्यावी, कामाला पद्धतशीरपणा ठेवावा. एक ना अनेक सूचना. मी १९३२ साली ३२ वर्षांपूर्वी गरिबीमुळे, पोरक्या पोरासारखा घराबाहेर पडलो व आश्रमात आलो. आप्तेष्ट, नातेवाईक, कौटुंबिक जिव्हाळा या सर्वमान्य प्रेमापासून मी फार दूर राहिलो. परंतु अण्णांनी या सर्वांची उणीव भरून काढली आहे. अण्णांच्या प्रेमाने माझे पोट भरले आहे.

□ □ □

४१. आपल्या आशीर्वादाने

डॉ. गो. के. कुलकर्णी, डी. ए. एस्. एफ्.

व्यवसाय : मेडिकल ऑफिसर, नाशिक टी. बी. इन्स्टिट्यूट.

शिक्षणकाल १९३३ ते १९४३

नाशिक टी. बी. सानाटोरियमचे अखंड व निष्ठावान सेवक

शिस्तीत न्यायबुद्धी गुरु. अण्णा फार कडक शिस्तीने वागत ! त्यांना गैरशिस्त झालेले काहीही खपत नसे. त्याला उदाहरण म्हणून मी सांगतो ! इंग्रजी ६ वीत असताना इंग्रजी विषयाचे शिक्षक गुरु. साठे यांनी एक निबंध लिहून आणावयास सांगितला होता. आश्रमातील कामामुळे मला वेळ मिळाला नाही ! मी तो लिहू शकलो नाही. गुरु. अण्णा वर्गात फेरी मारावयास आले ! त्यांना सर्व हकीकत कळली. त्यांनी स्पष्ट बजावले की " ज्यांनी निबंध लिहून आणला नसेल त्यांनी वर्गाचे बाहेर जावे व योग्य कारण असेल तरच त्यांना वर्गात घेतले जाईल ! " गुरु. अण्णांना मी माझे त्या दिवशीचे काम सांगितले. त्यांना कारण पटले म्हणूनच मी वर्गात बसू शकलो. त्या वेळेपासून मी घडा शिकलो की, नेमून दिलेले काम नियमित वेळी काळजीने केले पाहिजे; व आज तागायत मी ते व्रत पाळले आहे.

आपुलकी महाविद्यालयातून परत येण्यास काही वेळा मला विलंब लागत असे ! आश्रमात कधी कधी अन्न काही शिल्लक असावयाचे, काही नसावयाचे; अशा वेळी अण्णांची फार बारकाईने नजर असे. त्यांनी मला त्यांचेकडे भोजन घालावे !

आजाऱ्यांची काळजी आश्रमात एखादा विद्यार्थी आजारी असला तर त्याची गुरु. अण्णा कितीतरी काळजी घेत ! विद्यालय सुटल्यानंतर कार्यालयातून बाहेर पडले की, घरी जाण्यापूर्वी ते रुग्णालयात येत असत ! विद्यार्थी आजारी असला तर त्याला औषध दिले किंवा नाही, त्याची चौकशी करीत ! डॉक्टरांचे सल्ल्यानुसार त्याला काही चहा, कॉफी द्यावयाची असल्यास गुरु. अण्णा स्वतःचे घरी तयार करून पाठवीत असत. विद्यार्थ्यांबद्दल त्यांची आत्यंतिक प्रेमाची भावना आहे !

सुखदुःखाच्या गोष्टी कामानिमित्त गुरु. अण्णा वारंवार नाशिक येथे येतात. त्यावेळी मी त्यांची भेट घेतो ! भेटीत माझी आस्थेने विचारपूस करतात ! त्यांना सुखदुःखाची सर्व कहाणी सांगितली की माझ्या मनाचा भार हलका होतो ! गुरु. अण्णा अगदी वडील बंधूप्रमाणे आमची चौकशी करतात.

४२. मुले सुधारण्याचे प्रयोग

श्री. कृ. के. आठलेकर
व्यवसाय : अप्पर डिव्हि. क्लार्क,
इंडियन नेव्हल डॉकयार्ड, मुंबई १
शिक्षणकाल १९३४ ते १९४१
स्वयंसेवा वृत्तीने निधी जमवून पाठवीत असतात

गुरु. अण्णांचे प्रयोग, शिक्षा व शिक्षण गुरु. अण्णा अमेरिकेतून आल्यावर शाळेत व आश्रमात त्यांनी विविध प्रयोग सुरू केले. विद्यार्थ्याने काही चूक किंवा गैरवर्तन केले तर त्याला उपदेश करावयाचा; त्याची चूक त्याला समजावून पटवून द्यावयाची व त्या अपराधी विद्यार्थ्याने स्वतःच आपल्या मनाने योग्य ती शिक्षा घ्यावी व गुरु. अण्णांना अमुक एक शिक्षा घेतल्याचे सांगावे. एकदा दोन विद्यार्थ्यांच्या भांडण्याची तक्रार गुरु. अण्णांचेकडे गेली. त्यांनी ती ऐकून घेतली, न भांडण्याबद्दल थोडक्यात समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण कार्यबाहुल्यामुळे किंवा दुसऱ्या काही कारणाने त्या दोन विद्यार्थ्यांचे मतभेद मिटले नाहीत. तक्रारीचे निवारण झाले नाही. गुरु. अण्णांनी त्यांना दोघांनाही राममंदिरात एकमेकासमोर बसून चिंतन करून एकी झाली म्हणजेच तेथून उठण्यास परवानगी दिली. अशा प्रकारच्या मानसिक किंवा वैचारिक शिक्षा अण्णा देत असत. त्यामुळे त्यांची आम्हा विद्यार्थ्यांना धाक-भीती कधीच वाटली नाही. विद्यार्थ्यांच्या मताने अण्णांच्या शिक्षा निरुपयोगी होत्या. मत-परिवर्तन, व मानसिक–वैचारिक सुधारणा यासंबंधी देशात अलीकडेच जे प्रयोग झाले व होत आहेत (दरोडेखोर गुन्हेगारांची वैचारिक सुधारणा, तुरुंगातील कैद्यांना मिळणाऱ्या सवलती वगैरे) त्यांच्याकडे समाज आजही ज्याप्रमाणे साशंकतेने पाहातो, तसेच अण्णांचे विद्यार्थी अण्णांच्या प्रयोगाविषयी व परिणामांविषयी साशंक होते.

मॅट्रिकनंतर अण्णांनी पेंटस् अँड व्हार्निशेसचा तांत्रिक कोर्स सुचवला पण तो चांगला नसल्याचे समजले. म्हणून मी व श्री. प्र. द. मेढी यांनी निराश होऊन शिक्षणच बंद ठेवायचे व एक प्रयोग म्हणून भाजीचे दुकान पुरंदरे बागेत उघडावयाचे व स्वतंत्र व्यवसाय सुरू करावयाचे ठरविले. शिक्षण बंद ठेवण्याची ही गोष्ट गुरु. अण्णांना मुळीच पसंत नव्हती. त्यांनी आम्हांला पूर्ण विचार करण्यासाठी बजावले. पण आमचा बेत बदलण्याचे आम्ही नाकारले. तेव्हा अण्णांनी आमच्या पालकांची परवानगी मागितली. त्यामुळे माझा नाईलाज झाला व मी बी. एस्सी. चा कोर्स घेतला. माझी प्रकृती वारंवार बिघडे व वजनही कमी म्हणून शरीर सुधारण्याबद्दल अण्णांनी बरेच वेळा सांगितले.

□ □ □

४३. कैऱ्या पाहून जिभेला कोरड

श्री. रा. प. जोशी, रा. भा. पंडित, हिंदी शि. सनद
व्यवसाय : शिक्षक, इंग्लिश स्कूल, गोरेगाव, कुलाबा
शिक्षणकाल १९३५ ते १९३९
व्यायाम विषयाची विशेष आवड

गीतेचे पारायण १९३५ ते १९३९ मी आश्रमातील एक विद्यार्थी होतो. सकाळी आमचा शारीरिक शिक्षणाचा तास होता. सर्व विद्यार्थी रांगेत उभे होते. मी रांगेतच पण जरा मागेपुढे होतो. आमच्या लीडरची व माझी काही प्रश्नोत्तरेही झाली. हा सर्व प्रकार गुरुवर्य अण्णा ऑफिसमधून पाहात होते. त्यांनी मला व गैरशिस्त वागणाऱ्या १–२ विद्यार्थ्यांना बोलावून घेतले व आमच्या चुकीचे माप आमच्या पदरात टाकून याबद्दल तुमची शिक्षा तुम्हीच ठरवा असे सुचविले. पण आम्हास काहीच सुचत नाही असे पाहून त्यांनी राममंदिरात बसून गीतेच्या १८ अध्यायांचे पारायण करण्यास सांगितले. आम्ही ती शिक्षा मुकाट्याने भोगली.

चार चार छड्या देऊन असे गैरवर्तन यापुढे चालणार नाही असे सांगणे सहज शक्य होते. पण प्रसंग लक्षात राहून शिस्तीचे संस्कार घडावे म्हणून अभिनव शिक्षा दिली होती त्यांनी !

जिभेचे पाणी अटले आम्ही ३–४ विद्यार्थी पाणी पिण्याकरिता भोजनगृहाकडे गेलो होतो. तितक्यात पलीकडील आंब्यावर लटकणाऱ्या हिरव्यागार कैऱ्यांकडे लक्ष गेले आमचे. ८–१० कैऱ्या पाडल्या. त्यातील २–३ कैऱ्या पऱ्यावर पडल्यामुळे तो आवाज गेला अण्णांच्या व दादांच्या कानावर ! ते रागाने पाहात होते आमच्याकडे. पाचावर धारण बसली आमची.

रात्रौ नेहमीप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांची बैठक भरली. २–२॥ शेर कैऱ्या असलेली पिशवी आमच्या पुढे करण्यात आली. २ सुऱ्या, ताटे, तिखट, मीठ व तेल मागविण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांसमोर आम्हांस कैऱ्यांच्या फोडी करण्याची आज्ञा झाली. फोडी झाल्या. तिखट, मीठ, तेल लावले गेले. तोपर्यंत आम्हांस कल्पना नव्हती की, त्या सर्व फोडी सर्व विद्यार्थ्यांसमोर आम्हांस खाव्या लागतील. पण शेवटी आज्ञा झाली की, त्या सर्व फोडी सर्वांसमोर आम्ही खाल्ल्याच पाहिजेत. ही शिक्षा ऐकून आमच्या चटोर जिभेचे पाणी आटले व नाइलाजाने आम्ही त्या फोडी खाल्या. पण त्या प्रसंगाचा ठसा आजही माझ्या मनावर ताजा आहे.

४४. उपदेशाला कृतीचे पाठबळ

श्री. य. कृ. नानिवडेकर
व्यवसाय : टेक्निशियन्, मर्क शार्प अँड डोमे ऑफ इंडिया
शिक्षणकाल १९३५ ते १९४१
औद्योगिक रसायन–विषयाची विशेष आवड

चिंतनाचा उपयोग आश्रमात गुरु. अण्णांनी सुरू केलेली एक नवीन पद्धती म्हणजे चिंतन!! एखादा लहानसा विचार घेऊन दोन मिनिटे एकाग्र मनाने त्यावर चिंतन करणे. प्रत्यक्ष व्यवहारात अशा चिंतनाचा उपयोग विशिष्ट परिस्थितीत मानसिक तयारी करण्यासाठी होतो असा माझा अनुभव आहे.

व्यापक शिक्षण महाराष्ट्र विद्यालयात गुरु. अण्णांचे जसे आमच्या अभ्यासाकडे लक्ष असे, तसेच व्यायाम, वंदेशिक्षण, प्रबंधलेखन, वक्तृत्वसभा व गायन या विषयांकडे असे; व त्यासाठी सक्रिय प्रोत्साहन दिले जाई.

प्रबंध लेखनाचा फायदा गुरु. अण्णांनी विद्यालयात सुरू केलेली 'प्रबंध-लेखन' ही एक नवीन पद्धती होती. प्रबंध-लेखनासाठी किती परिश्रम घ्यावे लागले, त्याची अजून चांगलीच आठवण आहे. एखाद्या विषयाची मुद्देसूद मांडणी करण्याची कला अशा प्रबंध-लेखनामुळेच चांगली वाढते.

सेवेची शिकवण आश्रमात असताना गुरु. अण्णांचे त्यागमय जीवन प्रत्यक्ष पाहण्यास मिळाले व त्या मुळेच ते जो वेळोवेळी उपदेश करीत, त्याला प्रत्यक्ष कृतीचे पाठबळ असे; व तो उपदेश फार परिणामकारक होत असे. आश्रमातील शिक्षण समाजाच्या मदतीवर चालते, म्हणून शक्य तेव्हा व शक्य तितके सामाजिक कार्य निरपेक्षपणे करण्याबद्दल गुरु. अण्णांनी सांगितले. ते माझ्या मनावर पक्के बिंबले असल्यामुळेच मी कोणत्या ना कोणत्याही सार्वजनिक कार्यात नेहमी गुंतलेला असतो. आणि हे माझे कर्तव्य आहे, अशी सतत जाणीव असते.

हजामतीचा विनोद सहज संभाषणात विद्यार्थ्यांकडून कशा प्रकारचे उत्तर येते, हे गुरु. अण्णा बारकाईने पाहात, व अपेक्षित उत्तर मिळाले म्हणजे त्यांना समाधान झालेले त्यांच्या चेहऱ्यावरून कळे. आमची मॅट्रिकची परीक्षा संपल्यावर एका रविवारी मी नापिताकडे निघालो होतो. समोरून गुरु. अण्णा आले. ते हसून म्हणाले, "आता हजामतीची जरुरी नाही, युनिव्हर्सिटी करीलच." मी म्हणालो, "युनिव्हर्सिटी माझी हजामत करणे शक्य नाही." तेव्हाचे त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान मला अद्याप आठवते.



४५. आठ आण्याची आठवण

श्री. के. भा. खोत

व्यवसाय : बिझिनेस ऑफिस, किर्लोस्करवाडी

शिक्षणकाल १९३५ ते १९४३

कामगार-संघटना-क्षेत्रातील कार्यकर्ते

इंग्रजी चौथ्या इयत्तेत असतानाची एक आठवण समोर येते. धुळ्याहून शिक्षण संपवून माझे वडील बंधू घरी परतताना मला भेटावयास आश्रमात आले होते. आमची वार्षिक परीक्षा चालू होती. उत्तरपत्रिका घेण्यासाठी त्यांचेकडून मी आठ आणे घेतले, आणि पेटीत ठेवले. पैसे घेताना आणि ठेवताना 'पैसे स्वतःजवळ ठेवावयाचे नाहीत' या आश्रमाच्या बंधनाचे स्मरण राहिले नव्हते. खोलीच्या मंत्र्याने ते आठ आणे अण्णांच्याकडे नेऊन दिले, याचाही मला पत्ता नव्हता. उत्तरपत्रिका आणण्यासाठी पैसे शोधू लागलो. तेव्हा पैसे गायब झाल्याचे कळले, आणि त्या भरात 'पैसे चोरीला गेले' असे मी बोलून गेलो.

पैसे चोरीला गेल्याचे बोलून गेलो खरा, पण आश्रमाचे बंधन ध्यानात आल्यावर आपल्या हातून गुन्हा झाल्याची जाणीव झाली आणि परत एकदा खोटे बोललो "माझे पैसे चोरीला गेले नाहीत." अण्णांनी विचारले, "केशव, तुझे पैसे चोरीला गेलेत काय ?" मी ताडकन सांगितले, "माझ्याजवळ पैसे नव्हतेच तर चोरीला जातील कसे ?" अण्णांनी क्षणभर रोखून पाहिले आणि न बोलता टेबलाच्या खणातून आठ आणे काढून माझ्यापुढे ठेवले. आणि अण्णांचा पारा चढला. त्यांनी हातात वेताची छडी घेतली आणि चार-पाच वेताच्या छड्या मारून सांगितले, "आता खोटे बोललास तर जन्मभर खोटाच राहशील. पुन्हा खोटे बोलू नकोस, जा". त्यांनी मला पहाटे उठून राममंदिरात जाऊन रोज अर्धा तास मनाच्या श्लोकाचे मनन करावयाची व आठ दिवस संडास झाडण्याची शिक्षा दिली.

प्रसंग साधा आहे, पण अण्णांच्या करडेपणामुळे आणि प्रेमळपणामुळे त्याचा मनावर इतका खोल ठसा उठला आहे की, आज इतक्या वर्षांनीही मी तो विसरू शकत नाही, आणि खोटेही बोलू शकत नाही. खोटे बोलावयाची वेळ आलीच तर माझ्या मनाच्या गाभाऱ्यात गुरुवर्य अण्णांचा प्रेमळ, करडा व कापरा आवाज घुमू लागतो. "आता खोटे बोललास तर जन्मभर खोटाच राहशील". आणि मोहाच्या काठावरून तोल सावरून मी मागे परततो.

खरे बोलण्यातील सात्त्विक आनंद अण्णांनी माझ्यात रुजवला आहे. त्या आनंदाची श्रीमंती माझ्याजवळ आहे.

□ □ □

४६. शिक्षणसोयीत वाढ झाली

श्री. बा. म. गोरे
व्यवसाय : सिनीअर क्लार्क-सेंट्रल रेल्वे इंजिनिअरिंग डिपा. ब्रिज इंजि. ऑफिस

शिक्षणकाल १९३५ ते १९४१
संस्थेचे एकनिष्ठ माजी विद्यार्थी

मनमाड स्टेशनवरील भेटी नोकरीनिमित्त गेली अठरा वर्षे मी मनमाड, जिल्हा नाशिक येथे रहात आहे. संस्थेच्या आणि विद्यापीठांच्या कामासाठी नागपूर, मराठवाडा, खानदेश वगैरे भागात जाताना मनमाडमार्गे गुरुवर्य अण्णासाहेब जात. त्यांना सात-आठ वेळा मनमाड स्टेशनवर भेटण्याचा योग आला. तेव्हा ते आपलेपणाने कुटुंबातील माणसांबद्दल तसेच मुलांबद्दल व त्यांच्या शिक्षणाविषयी चौकशी करीत. संस्थेतून बाहेर पडल्यावरही माझे चांगले संबंध टिकून आहेत.

शिस्त--ती व ही संस्थेत पूर्वी शिस्त फार कडक होती, अशी समजूत बहुतेकांची आहे. आमच्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांना अधिक कडक शिस्तीतून जावे लागत असे. हल्लीच्या विद्यार्थ्यांना शिस्तीचा व कामाचा त्रास पूर्वीपेक्षा पुष्कळ कमी आहे. मला वाटते की शिस्तीतूनच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडत. शिस्त ही शिक्षा करण्यासाठी वापरली जात नसे. शिस्तीच्या कडकपणाचे स्वरूप हल्ली पुष्कळ सौम्य झाले आहे. जरी शिस्त कडक होती, तरी विद्यार्थ्यांचे नुकसान करण्याचे किंवा संस्थेतील मदत बंद करण्याचे धोरण नसे. शक्य तितक्या सवलती देऊन विद्यार्थ्यांस पुढील शिक्षणास संधी मिळत असे.

दोन उपयुक्त प्रयोग संस्थेतील व विद्यालयातील शिक्षणात व औद्योगिक शिक्षणात होणारे बदल व प्रयोग विचारपूर्वक केलेले असत. आपल्या महाराष्ट्र-विद्यालयात गुरुवर्य अण्णासाहेबांनी मराठी माध्यमाचा प्रयोग सुरू केला व त्यात यश मिळविले. आज सबंध प्रांतातील हायस्कूलांतून मराठी माध्यम सुरू आहे. तसेच अनेक विद्यालयांतून औद्योगिक शिक्षणाची जोडही देण्यास सुरुवात झाली आहे. मराठी माध्यम व बौद्धिक शिक्षणाला जोडून औद्योगिक शिक्षण या दोन्ही गोष्टी गुरुवर्य अण्णांचे विचार किती दूरदर्शी असतात हे दाखवितात.

आजच्या सोयी संस्थेच्या कार्यामुळे हजारो गरीब विद्यार्थी मोफत शिक्षण घेऊन निरनिराळ्या क्षेत्रांत कार्य करीत आहेत. आज तिने शिक्षणविषयक क्षेत्रात व औद्योगिक शिक्षणाच्या क्षेत्रात कितीतरी वाढ केली आहे. विद्यार्थ्यांना राहाण्यास चांगल्या इमारती बांधल्या आहेत. उच्च शिक्षणाची सोय, मुद्रणशाळेतील शिक्षणाची सोय इत्यादीत वाढ करून आजच्या विद्यार्थ्यांच्या राहण्यात सुलभता आणलेली आहे.

□ □ □

४७. आदर्श मुख्याध्यापक

श्री. वि. कृ. बवरे, बी. ए., एल् एल्., बी. बी. टी.
व्यवसाय : मुख्याध्यापक व चिटणीस, कॅम्प एज्यु. सोसायटीचे हायस्कूल, पुणे
विद्यालय शिक्षक १९३९ ते १९६१
महाराष्ट्र विद्यालयातील निष्ठावान माजी शिक्षक

शिक्षकाचे अनुभव महाराष्ट्र विद्यालयात सुमारे दोन तपे शिक्षक म्हणून काम केल्यामुळे गुरुवर्य अण्णांना अतिशय जवळून पाहण्याची संधी लाभली.

शिक्षकांवर पूर्ण विश्वास सुमारे १९३९–४० सालची गोष्ट असेल. अण्णा म्हणाले, "तुम्हाला श्री. डाके यांनी पाठविले आहेना ? ठीक आहे, मग मला जास्त काही विचारावयाचे नाही. उद्यापासून काम सुरू करा. तुमचे वेळापत्रक तयार आहे." नंतर अण्णांनी स्वतः माझ्याबरोबर हिंडून सर्व संस्था मला दाखविली व संस्थेसंबंधी तपशीलवार माहिती दिली. अगदी अपरिचित गृहस्थांशी इतकी आपुलकीची वागणूक कोणत्या मुख्याध्यापकांच्यामध्ये दिसून येईल ?

विशिष्ट अध्यापन-पद्धतीबद्दल आग्रह नाही एका विशिष्ट पद्धतीनेच शिकविले पाहिजे असा अण्णांचा आग्रह नाही. ते म्हणतात, "तुम्ही कोणत्याही पद्धतीने शिकवा. विद्यार्थ्यांना उत्तम रीतीने समजेल असे पहा." अध्यापनपद्धतीचे स्वातंत्र्य असल्यामुळे सर्व शिक्षक अत्यंत तळमळीने व हौसेने काम करीत. इतर मुख्याध्यापकांनी यापासून खूपच बोध घेण्यासारखा आहे.

शिक्षक-सभांवर कटाक्ष शिक्षकांच्या मासिक सभेवर अण्णांचा फार कटाक्ष असे. या सभेत शिक्षकांना आपापली मते निर्भीडपणे मांडण्यास मोकळीक असे व ती मते विचारात घेतली जात.

अण्णांची कचेरी त्यांच्या कचेरीचे द्वार सर्वांना खुले असे. मात्र अण्णांकडे जाणाऱ्यांना काही संकेत पाळावे लागत. आपले काम काय आहे ते थोडक्यात सांगावे लागे. काम आटोपल्यावर मात्र अण्णांच्या कचेरीत रेंगाळता कामा नये. कोणी अधिक वेळ घेत आहे असे दिसल्यास स्मितपूर्वक "वरं आहे," असे म्हणून अण्णा आपल्या कामात पुन्हा गढून जात.

एक अभिनव योजना शिक्षकांनी उशिरा येऊ नये म्हणून अण्णांनी एक अभिनव योजना आखली होती. सही करण्याच्या टेबलावर तांबडी व काळी अशी दोन प्रकारची शाई ठेवलेली असे. उशीर झालेल्या शिक्षकांनी तांबड्या शाईने सही करावी अशी अपेक्षा असे. उशिरा आलेले शिक्षक तांबड्या शाईनेच सही करतील असा अण्णांचा

पूर्ण विश्वास असे. प्रत्यक्ष उशिरा येण्याचे कारण विचारण्यापेक्षा ही शिक्षा जबरदस्त वाटे, कारण ती आपण होऊन शिक्षकांनी घेतलेली असे.

कळकळीने काम करणाऱ्यास उत्तेजन एक दिवस "तास संपल्यावर मला भेटावे" अशी अण्णांच्याकडून मला चिठ्ठी आली. "बबरे, मी तुमचे अभिनंदन करण्याकरिता तुम्हाला बोलावले आहे," असे अण्णा मला म्हणाले. मला काहीच न समजल्यामुळे मी नुसताच त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रा करून पाहात राहिलो म्हणून अण्णांनी लगेच खुलासा केला, "गृहपाठ न करणाऱ्या विद्यार्थ्यांची जी यादी तुम्ही मजकडे पाठविली, त्याबद्दल मला फार आनंद झाला. असे लक्ष घालून काम करणारे शिक्षकच मला पाहिजेत." गोष्ट दिसावयास लहान आहे, परंतु माझ्या मनावर याचा किती परिणाम झाला, याचे मी वर्णन करू शकत नाही. अशा तऱ्हेने शिक्षकांना उत्तेजन देणारे किती मुख्याध्यापक सापडतील ?

विद्यालयातील शिक्षकांबद्दल जिव्हाळा एक दिवस काही अत्यंत महत्त्वाच्या बाबतीत मला अण्णांचा सल्ला हवा होता. मला वाटते तो गुढी-पाडव्याचा दिवस असावा. विद्यालयास सुट्टी होती. म्हणून मी अण्णांच्या घरी गेलो. बाहेरूनच विचारले, "अण्णा आहेत का ?" आम्ही सर्व शिक्षक व विद्यार्थी अण्णांना "सर", "साहेब" वगैरे न म्हणता "अण्णा" या घरगुती नावानेच संबोधीत असू. अण्णा त्या वेळी स्वयंपाकघरात बसले होते. मला पाहिल्यावर "या बबरे, आत या" असे अण्णा म्हणाले. मला प्रथम थोडा संकोच वाटला. पण पुन्हा अण्णांनी मला आत बोलावले व स्वत: पाट मांडून आपल्या-जवळ बसण्यास सांगितले व येण्याचे कारण विचारले. मी लगेच माझ्या कामाची त्यांना कल्पना दिली व त्यांचा सल्ला विचारला. अण्णांनी लगेच अत्यंत मोकळ्या मनाने मला योग्य तो सल्ला दिला. मला फार धन्यता वाटली. मी गेलो त्या वेळी अण्णा सौ. ताईना घरकामात मदत करीत होते. हे पाहिल्यावर मी कमालीचा चकित झालो. एवढे मोठे अण्णा, परंतु घरातसुद्धा मदत करीत होते; हे पाहून त्यांच्या सर्वांगीण मोठेपणाची कल्पना आली. विद्यालयातील शिक्षकांबद्दल केवढी ही आपुलकी ! माझा अण्णांच्या बद्दलचा आदर शतपटीने वाढला.

प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी उपस्थिती विद्यालयाचा छोटा, मोठा कोणताही कार्यक्रम असो, शिक्षकांची सहल असो, अल्पाहार असो किंवा भोजन असो, अण्णा न चुकता अशा प्रसंगी उपस्थित असत व अत्यंत मोकळ्या मनाने भाग घेत. मुख्याध्यापक म्हणून एका बाजूला न बसता मध्येच कोठेतरी शिक्षकांच्या जवळ येऊन बसत. अण्णांच्या शेजारी बसण्याचा मान, अशा तऱ्हेने मिळाल्यावर अननुभूत आनंद होत असे. पोहोण्यात, खेळात इ. अण्णा आघाडीवर असत.

शिक्षकांच्या आर्थिक अडचणींची सदैव जाणीव विद्यालयात अल्पकाळ काम करणाऱ्या शिक्षकांना "टाइम स्केल" नसे. मानधन म्हणून काही रक्कम मिळे. परंतु वाढती महागाई लक्षात घेऊन, अण्णांनी अशा शिक्षकांच्या मानधनात एकदम वाढच

प्रमाणात वाढ केली. सरकारी आदेशाची वाट पाहिली नाही. माझ्या माहितीप्रमाणे वाढत्या महागाईची दखल घेणारे अण्णा पहिलेच मुख्याध्यापक होते.

इतरांबद्दल कमालीची सहानुभूती १९५० साली माझ्या कुटुंबावर अनेक दैवी आपत्ती आल्या व मी अगदी खचून गेलो. प्रकृतीवरही फारच परिणाम झाला. कशातच मन रमेना. अशा विषण्ण मनःस्थितीत मी माझे काम संपवून विद्यालयातून घरी निघालो होतो. विद्यालयाची पाहाणी करीत अण्णा समोरून आले. मला पाहिल्यावर थांबले व म्हणाले, "काय बवरे, प्रकृती बरी नाही काय ?" इतक्या आपुलकीने विचारल्यावर मी माझ्या मनःस्थितीची त्यांना थोडक्यात कल्पना दिली. त्या वेळी आम्ही विद्यालयाच्या दरवाजात उभे होतो. परंतु ही गोष्ट विसरून अण्णांनी मला त्यांच्या स्वतःवर आलेल्या अनेक आपत्तींची माहिती दिली व म्हणाले, "काही विशिष्ट वयात अशा आपत्ती येतातच. त्यांना धैर्याने तोंड दिले पाहिजे. असा धीर सोडून कसे चालेल ?" या धीराच्या शब्दांचा माझ्यावर इतका परिणाम झाला की, त्या दिवसापासून माझी प्रकृती झपाटयाने सुधारू लागली व कामातही मन रमू लागले. हा प्रसंग मी कधीही विसरणार नाही.

अण्णांना दीर्घायुरारोग्य लाभो व त्यांच्या ज्ञानाचा महाराष्ट्रास व भारतास अधिकाधिक लाभ होत जावो, हीच इच्छा.

□ □ □

४८. उपनिषदांची आठवण होते

श्री. योगीराज रा. आ. घाटगे, बी. एस्सी., बी. टी.
व्यवसाय : शिक्षक व योगाभ्यासप्रचारक, मुंबई
शिक्षणकाल १९३६ ते १९४२
व्यवसाय सांभाळून योगाचा उत्साहाने प्रचार

टिपणे ठेवली आहेत गुरुवर्य अण्णांच्या सहवासात माझे आठवीपासून पुढील शिक्षण चालू होते. त्या अवधीत त्यांनी मला कितीतरी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या बऱ्याच व्याख्यानमाला, विद्यार्थीसभा, सुसंगती, विद्यालय-सभा इत्यादी वेळी ते काय बोलले त्याची टिपणे मी अद्याप जपून ठेविली आहेत व मधून मधून केव्हातरी ती पाहात असतो. गुरुवर्य अण्णा जपानहून परत आले होते. इ. स. १९३८ साली त्यांनी 'आजचा जपान' ह्या विषयावर सहा व्याख्याने दिली. त्या वेळी त्यांनी केलेले मार्गदर्शन आजच्या विद्यार्थ्यांना, समाजाला व आपल्या राष्ट्राला कितीतरी उपयुक्त आहे.

अनुभवाचा आग्रह दिनांक ८–३–१९३८ रोजी महाराष्ट्र विद्यालयाच्या वाढदिवसानिमित्त बोलताना गुरुवर्य अण्णा म्हणाले, "तुम्ही सेवा व सहकार्याने वागा व मी सांगितलेल्या गोष्टी नुसत्या ऐकून न सोडता त्यांचा स्वतः अनुभव घ्या. ज्ञान देता येते व शहाणपण मिळवावे लागते."

व्यवसाय-मार्गदर्शनाची दृष्टी दिनांक ११–५–, ९–७ व ६–८–१९३८ रोजी व्यवसाय-संशोधनावर बोलत असता गुरुवर्य अण्णा म्हणाले, "आजच्या समाजातील सर्व व्यवसायांची सामान्य माहिती व आपल्या आवडीच्या व्यवसायाची विशेष माहिती आपणास असावी. अगोदर शैक्षणिक तयारी करावी, अनुभव घ्यावा व आत्मनिरीक्षण करून मग व्यवसायात पदार्पण करावे. आत्मनिरीक्षण करताना आपल्या बुद्धीचा, शक्तीचा व प्रकृतीचा आपण विचार करावा. महाराष्ट्रीय समाज व्यापारात व उद्योग-धंद्यात मागे आहे. तेव्हा आपण काय निर्माण करू शकू व काय विकू शकू याचा विचार करून आपण व्यापार व उद्योग ही क्षेत्रे आपलीशी केली पाहिजेत." व्यवसाय संशोधनाचे हे सूत्ररूपाने सार आहे.

सुधारणेची प्रवृत्ती दिनांक १९–६–१९३८ रोजी शास्त्रीय शोधांच्या उत्क्रांतीवर बोलताना गुरुवर्य अण्णा म्हणाले, "पूर्वापार चालत आलेल्या ठराविक साच्याच्या पद्धतीने कामे न करता सतत विचार करून कामात नेहमी सुधारणा केली पाहिजे. थोडचा वेळात व कमी श्रमात काम कसे करता येईल याचा विचार तुम्ही स्वयंपाकघरातसुद्धा केला पाहिजे." ही वाक्ये किती महत्त्वाची आहेत !

विचारसूत्रे दिनांक १४–१, १८–२, व २४–६–१९३९ च्या तीन 'सुसंगती' सभांमध्ये गुरुवर्य अण्णा म्हणाले, "तुम्ही नेहमी आत्मनिरीक्षण व चिंतन करीत जा. तुमचे शरीर व मन नेहमी स्वच्छ व शांत ठेवा. आई, वडील व गुरुजी हे तुमच्या हितासाठी तुम्हास बोलतात. ते त्यांचे बोलणे कटू समजू नका. ज्ञानाची तुम्हास तहान लागली पाहिजे. ज्ञानग्रहण करण्याची तुमची तीव्र इच्छा पाहिजे. पुढे जाणारा आपल्या गुणांनी पुढे जातो व मागे राहाणारा आपल्या दुर्गुणांनी मागे राहातो. येथे आम्ही देत असलेले बौद्धिक, धार्मिक, शारीरिक व औद्योगिक शिक्षण तुमच्या आवडीने झाले पाहिजे. त्या सर्व शिक्षणाचा नीट उपयोग करा."

उपनिषदे गुरुवर्य अण्णांच्या ह्या उपदेशावरून मला उपनिषदांची आठवण झाली. उपनिषदे म्हणजे गुरूंजवळ त्यांच्या आसनाचे थोडे खाली बसून ज्ञान ग्रहण करण्याच्या उत्कट इच्छेने ग्रहण केलेले ज्ञान होय. ज्ञान ग्रहण करणारास ज्ञानाची तहान असली पाहिजे व ते ग्रहण करण्याची उत्कट इच्छा पाहिजे.

योगाचे सार "तुमचे शरीर व मन नेहमी स्वच्छ व शांत ठेवा" असा उपदेश जेव्हा गुरुवर्य अण्णांनी आम्हास केला, तेव्हाच सर्व योगशास्त्राचे सार त्यांनी आम्हास सांगितले, असे योगाभ्यास झाल्यानंतर मला वाटले.

□ □ □

४९. छिन्नी चालूच आहे

श्री. वा. दा. घाटे, बी. एस्सी. डिप्. टेक्. (रेडिओ)
व्यवसाय : डिव्हि. इंजिनियर रूरल ब्रॉडकास्टिंग स्कीम
शिक्षणकाल १९३६ ते १९४०
एक आस्थेवाईक माजी विद्यार्थी

नॉमिनल गवई "तुझी मोठा गवई होण्याची इच्छा आहे काय ?" मी उत्तरलो, "हो, मला एक नॉमिनल गवई व्हावयाचे आहे." त्यावर मोठा हशा पिकला. माझ्या कल्पनेप्रमाणे "नॉमिनल" म्हणजे "नामवंत" ! गुरुवर्य अण्णांनी त्या वेळी मला सांगितले की, "इंग्रजी शब्द विनाकारण अधून मधून घालून बोलण्याची सवय वाईट, आणि त्यातच अर्थ न समजता परभाषेचे शब्द वापरणे आणखी वाईट." झाले ! संस्थेच्या प्रवेशापासूनच छिन्नी-हातोडा घेऊन गुरुवर्य अण्णा "घडविण्याच्या" कामी लागले. त्या वेळेपासून माझ्या चार वर्षांच्या वास्तव्यात एकही दिवस असा गेला नसेल की, ज्या वेळी छिन्नीची धार मला जाणवली नाही ! फार काय, अजूनही "समाचार" चे पहिले पान वाचताना त्याच तीक्ष्ण धारेचा व हातोड्याच्या ठोक्यांचा पुन्हा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही ! अगदी लहान लहान प्रसंगातून स्थायी महत्त्वाची जीवनमूल्ये समजावून सांगणारे गुरुवर्य अण्णा मला अजूनही डोळ्यासमोर त्या स्वरूपात दिसत आहेत. वेदांतील ऋचा म्हणताना ज्याप्रमाणे हातांची एक ठरीव हालचाल केली जाते, त्याच प्रकारची हालचाल अशा वेळी गुरुवर्य अण्णा करीत असत.

व्यायामाचा आग्रह नियमित व्यायामाची महती सांगताना गुरुवर्य अण्णांनी दंड व स्नायू कसे पिळदार पाहिजेत, हे आपल्या स्वतःच्या दंडांवरून हात फिरवून सांगितले ! त्यांच्या विनोदी बुद्धीचा ज्यांना परिचय आहे, त्यांना ह्या प्रसंगी त्यांनी कसा अभिनय केला असेल ह्याचे कल्पनाचित्र डोळ्यांसमोर उभे करता येईल.

विद्यार्थी व राजकारण १९३६ ते १९४० च्या दरम्यान संस्थेमधील विद्यार्थ्यांमध्ये विविध पक्षांच्या राजकीय अभिनिवेशाचा अकारण प्रादुर्भाव झाला होता. त्या वेळची गुरुवर्य अण्णांनी विद्यार्थ्यांना दिलेली शिकवण व दृष्टी, म्हणजेच राजकीय दृष्टीने अगदी तटस्थ अशा संस्थेच्या आजच्या भूमिकेची नांदीच म्हणावी लागेल. त्यांचे ह्या बाबतीत असे सांगणे असे की, विद्यार्थी-दशेत विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या तत्त्वज्ञानाचा व त्यांच्या कार्यक्रमांचा डोळसपणाने अभ्यास केला पाहिजे. कोणत्याही पक्षाचा गंडा बांधून त्याचे तत्त्वज्ञान स्वतःला संपूर्ण समजण्याच्या आधीच, त्याचे दुसऱ्यांना घोट पाजण्याचा प्रयत्न करणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अयोग्य आहे.

५०. बाहेर पडल्यावर समजलेले मोठेपण

श्री. म. वि पुरोहित
व्यवसाय : क्लार्क, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट
शिक्षणकाल १९३६ ते १९४०
सात्त्विक वृत्तीचे एक माजी विद्यार्थी

शिस्तीची शिकवण गुरुवर्य अण्णा हे शिस्तीचे भोक्ते. सर्व विद्यार्थी आपले कार्यक्रम योग्य रीतीने पार पाडीत आहेत किंवा नाहीत, याकडे त्यांचे फार बारकाईने लक्ष असे. सकाळची प्रार्थना झाल्यानंतर पुन्हा एकदा विद्यार्थी आपले जागेवर जाऊन झोपी गेला आहे काय, नेमून दिलेल्या जागेची स्वच्छता झाली आहे किंवा नाही, सकाळचे व्यायामाचे वेळेत विद्यार्थी व्यायाम घेत आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी अगदी सकाळीच अण्णा सर्व खोल्यांतून फेरी मारत असत. प्रत्येक खोलीत त्या वेळी आठ विद्यार्थी राहात असत. खोलीची रोजची स्वच्छता पाळीपाळीने करावी लागे. खोलीची स्वच्छता व्यवस्थित रीतीने केली आहे किंवा नाही, याकडे गुरुवर्य अण्णांचे लक्ष असे. कोणी आपले कपडे अव्यवस्थितपणे ठेवलेले पाहिले तर त्याची ते कानउघाडणी करीत. कपडे साधे असले तरी ते स्वच्छ असावेत; व नीटनीटकेपणाने घातलेले असावेत असे ते नेहमी सांगत असत. दुपारचा तीन ते पाच वाजेपर्यंतचा वेळ अभ्यासासाठी असे. त्या वेळी सर्वजण आपापल्या जागेवर बसून अभ्यास करीत आहेत किंवा नाहीत, हे पाहण्यासाठी गुरुवर्य अण्णा या वेळात एक फेरी मारत असत. या वेळात कोणा विद्यार्थ्यास खोलीबाहेर काही कारणास्तव जाणे भागच पडले तर खोलीचे दारावर एक स्लेटपाटी व पेन्सिल अडकविलेली असे. त्या पाटीवर बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यास जाण्याचे ठिकाण, वेळ व कारण नमूद करावे लागे. या सर्व गोष्टी करावयास लावण्यामागे विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त बाणली जावी, हाच हेतू त्यांच्या मनात असे. शारीरिक शिक्षणाची परीक्षा पास झाल्याखेरीज इतर विषयांत पास असूनही वरच्या वर्गात जाता येणार नाही, असा गुरुवर्य अण्णांनी नियमच करून टाकला.

सर्वांगीण प्रगतीची संधी संगीतासारखा विषय. सर्वांना गाता येणे शक्य नाही, पण गायनशास्त्राची प्रत्येकास थोडीबहुत माहिती असावी म्हणून 'गांधर्व महाविद्यालया' तील गायनशिक्षकांनी आठवड्यातून एक तास येऊन गायनशास्त्राबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी अशी सोय अण्णांनी केली. धार्मिक शिक्षण म्हणून गीतेचे

१८ अध्यायांचे पठण दर एकादशीस संस्कृत शिक्षक श्री. गोरे यांचे देखरेखीखाली करण्याची व्यवस्था केली.

एकदा कैवल्यधामचे स्वामी कुवलयानंद हे अण्णांच्या ऑफिसमध्ये आले होते. लागलीच अण्णांनी माझ्यासारख्या भरपूर उंच पण शरीराने सडपातळ अशा ४, ५ विद्यार्थ्यांना बोलावून, त्यांना स्वामींच्या पुढे उभे करून आसनादी व्यायामाने या मुलांच्या प्रकृतीत कितपत सुधारणा घडवून आणता येईल यावद्दल चौकशी केली. यावरून आश्रमातील विद्यार्थ्यांबद्दल त्यांना किती आस्था असे हे दिसून येईल.

द्यायलाही शिका "आज परिस्थितीने तुम्हाला दुसऱ्यापुढे हात उताणा करावा लागत आहे. उद्या स्वतः कमाई करू लागल्यावर इतरांच्या अडचणी तुम्ही जाणून तुमचा हात उपडा करावयाला शिका; म्हणजेच दुसऱ्याकरता काही त्याग करावयास शिका." अण्णांची ही शिकवण 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' या प्रकारची नव्हती, तर 'आधी केले मग सांगितले' अशा प्रकारची होती.

५१. वाममार्गाचा पैसा नाकारला

श्री. रा. वि. मनोहर, एल्. टी. एम्.

व्यवसाय : इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज (टेक्स्टाइल) म. रा.

शिक्षणकाल १९३६ ते १९४०

एक सुखवस्तू ग्रामस्थ माजी विद्यार्थी

दोन सवयी लागल्या मी १९३६ मध्य ग्रामस्थ म्हणून शाळेत प्रवेश केला. मला वाटते मी व माझ्याबरोबर जे दोघे-तिघे विद्यार्थी आले तेच पहिले ग्रामस्थ विद्यार्थी असावेत. तोपर्यंत असे फी देणारे दार विद्यार्थी घेण्याची प्रथा नव्हती. मला अशा रीतीने प्रवेश मिळाला. त्यामुळे माझे पुढील आयुष्य नक्कीच बदलले असे म्हणावे लागते. प्रामुख्याने दोन गोष्टींचा परिणाम माझ्यावर झाला. एक म्हणजे लवकर उठण्याची सवय, जी आजपर्यंत मी पाळीत आलो आहे. दुसरी गोष्ट, साधी राहणी व प्रामाणिकपणा. अजूनसुद्धा इतर सर्व गोष्टी अनुकूल असूनही कपड्यांच्या बाबतीत मी जरा कंजूषच आहे. मोजके कपडे व ते सुद्धा साधारण. शाळा सोडल्यावर व शिक्षण संपल्यावर माझ्या नोकरीमुळे आतापर्यंत कितीतरी वेळा असे प्रसंग आले की, वाममार्गाचा पैसा आपणहून

माझ्याकडे येत असताना, तो नाकारण्याचे मनोधैर्य व काही वेळा कठोरपणा करता आला, व ते प्रसंग निभावले. याचे सर्व श्रेय मला नसून माझ्या गुरुजींना व त्यांच्या शिकवणीलाच द्यावे लागेल. याचा मुख्य फायदा जो मला झाला, तो म्हणजे मला अजूनपर्यंत काही कमी पडले नाही व माझे समाधान आतापावेतो टिकले आहे व पुढे टिकेल याची मला खात्री आहे.

चिंतनाची शिकवण गुरुवर्य अण्णा आम्हाला इंग्रजी शिकवावयाचे. तेव्हा आपण काहीतरी मोठे आहोत असे मला वाटावयाचे व मी माझी कॉलेजच्या मुलांबरोबर तुलना करायचो. इतरांना मिळू शकले नाही असे इंग्रजी भाषेचे शिक्षण मला मिळू शकले. त्या शिक्षणाचा पुढील आयुष्यात मला फार फायदा झाला.

□ □ □

५२. निष्कारण शिक्षेचा प्रसंग

श्री. श्री. वा. भट
व्यवसाय : औद्योगिक क्षेत्रात नोकरी
शिक्षणकाल १९३७ ते १९४२
सात्त्विक व त्यागी वृत्तीचे माजी विद्यार्थी

गुरुवर्य अण्णा ज्या वेळी आश्रमीय आंतर्व्यवस्था पाहात होते त्या वेळी धार्मिक-साठी व जनरल सेक्रेटरी म्हणून एक विद्यार्थी नेमलेला होता व दररोजच्या घडामोडींचा अहवाल रोजनिशीमार्फत त्यांच्या टेबलावर जावा ह्यावर त्यांचा कटाक्ष होता. आश्रमात असताना हे जे मंत्री नेमलेले होते ते नेहमीच त्यांना आश्रमातील बऱ्यावाईट सर्व गोष्टींची माहिती देत असत, परंतु मी नेहमीच आश्रमीय नियमानुसार चालत असल्याने, मी केव्हाही गुन्ह्यात सापडलो नाही असे मला वाटते. परंतु इंग्रजी (मॅट्रिकमध्ये) ७ वीत असताना आश्रमीय सेक्रेटरीपैकी धार्मिकचा सेक्रेटरी आपल्या मर्जीनुरूप दोन घंटांमधील वेळ ठेवू लागला व ह्याचा अभ्यासात व्यत्यय येण्यात परिणाम होऊ लागला, म्हणून एके दिवशी दुपारी धार्मिकची पहिली घंटा झाल्यावर दुसऱ्या घंटेस जास्त वेळ होत आहे असे पाहून मी धार्मिक चालू केले. त्याचा अहवाल दररोजच्या रोजनिशीतून अण्णांना मिळाला आणि त्यांनी दुसऱ्या दिवशी आपल्या कार्यालयात बोलावून मला त्यांच्या हातातील छडी मारली व मी ती मुकाटचाने सहन करून निघून गेलो. त्यांचा कल मी काही सांगितल्यास ऐकून घेण्याचा दिसला नाही. त्यामुळे माझे समाधान झाले नाही. मला आश्रमाने शिक्षणाची संधी देऊन उपकृत केले आहे यात शंकाच नाही. विद्यार्थी-संमेलनाचे निमित्ताने पुण्यास आलो असता आश्रमीय वसतिगृहे आता भव्य झाली आहेत हे पाहून समाधान झाले; परंतु आश्रमात हिंदी संस्कृतीची तुळस पाश्चात्य संस्कृतीच्या वटवृक्षाखाली काळवंडून चालली आहे असे मला वाटले.

□ □ □

५३. कडकपणा परिणामी हिताचा

श्री. गो. ग. गुजराथी, बी. एस्सी., बी. टी.
व्यवसाय : उपप्रमुख, पेठे हायस्कूल, नाशिक
शिक्षणकाल १९३७ ते १९४६

औद्योगिक रसायन आणि रांगोळी चित्रकला यांची आवड

जेवायला बोलाविले आश्रमात असतानाच हायस्कूल व कॉलेजचे माझे शिक्षण पूर्ण झाले. या काळात शिक्षणावरोबरच आजच्या जीवनात उपयोगी पडत असलेले अनेक अनुभव मला मिळाले.

मला खालील प्रसंग नेहमी आठवतो. आश्रमात येऊन मला एक वर्ष झाले होते. त्या काळी "सद्वर्तन पारितोषिक" नावाचे एक बक्षीस असे. त्याची निवड विद्यार्थीच करीत असत. त्या वर्षी माझी निवड होऊन मला बक्षीस मिळाले. दुसऱ्या दिवशी गुरुवर्य अण्णांनी मला जेवावयास बोलाविले. बक्षिसापेक्षाही या गोष्टीचा मला फार बहुमान वाटला. अनेक शब्दांनी देता येणार नाही, अशी शाबासकी त्यांनी आपल्या कृतीने दिली !

नवे नवे उपक्रम विद्यालयात अण्णांचे नवीन नवीन उपक्रम सतत सुरू असत. त्यांनी फर्निचरवर अवाढव्य खर्च करण्याऐवजी प्रयोगशाळा व ग्रंथालय सुसज्ज करण्यावर भर दिला. प्रबंध-योजना, आत्मवृत्त-लिखाण, साप्ताहिक सभा व त्याला जोडून विद्यार्थ्यांच्या गुणदर्शनाचा कार्यक्रम, सुविचार-चिंतन इ. उपक्रमांचे महत्त्व आता अधिक पटते. गुरुवर्य अण्णा आम्हाला ९ वी १० वीत Rapid Reader शिकविण्यासाठी होते. मला आज ९ वी १० वीतील क्रमिक पुस्तकांची नावेही नीट सांगता येणार नाहीत, परंतु त्यांनी शिकविलेली पुस्तके चांगली आठवतात. विद्यार्थ्यांना पाळीपाळीने एकेक भाग तयार करावयास सांगून तो पुढील वेळी विद्यार्थ्यांना सांगावा लागत असे. त्यामुळे अर्थातच तो भाग पक्का होत असे. त्यांच्या अध्यापनातही "स्वावलंबनाने अध्ययन" यावर विशेष भर असे.

आजच्या सौम्यपणाचा परिणाम आम्हीही अनेक चांगले उपक्रम शाळेत सुरू करण्याचा प्रयत्न करतो, परंतु त्यांतील काही यशस्वी होत नाहीत. याची कारणे शोधताना असे वाटते की, विद्यार्थ्यांना त्यांचा निष्काळजीपणा, अभ्यास न करणे, अनियमितपणा, बेशिस्त, इ. बद्दल पुरेसे शासन होत नाही. शाळांमधील व घरांतील

"धाक" नाहीसा झाला आहे. या गोष्टीशी तुलना केली म्हणजे असे वाटते की, अण्णा विद्यालय प्रमुख असताना "कडक" होते, तेच परिणामी विद्यार्थ्यांच्या हिताचे होते.

विकासाला वाव विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भरपूर वाव देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. यासाठीच गुरुवर्य पळनीटकर यांच्या देखरेखीखाली व्यायामशाळा सुसज्ज केली व शारीरिक शिक्षणावर विशेष भर दिला. याचा लाभ माझ्याप्रमाणेच अनेकांना झाला. यातूनच "रघुवीर" निर्माण झाले ! मला चित्रकलेची प्रथमपासूनच आवड होती. विद्यार्थी मासिकातून मला चित्रकला वाढविण्यास भरपूर वाव मिळाला. गुरुवर्य अण्णांच्या व गुरुवर्य दादांच्या प्रोत्साहनानेच मला रांगोळी चित्र-कलेत बरीच प्रगती करता आली. अनेक प्रदर्शनांमध्ये माझ्या रांगोळी चित्रांचे खूप कौतुक झाले. "ही कला आपण कोठे संपादन केली ?" अशा अनेकांच्या प्रश्नास "आश्रमात संपादन केली" असे उत्तर देताना अभिमान वाटतो.

राजकारणात निःपक्षपाती दृष्टी गुरुवर्य दादांचा दृष्टिकोन 'हिंदुसभा'वादी होता; परंतु अण्णांचा दृष्टिकोन 'राष्ट्रीय' होता. त्यामुळेच त्यांनी विद्यार्थी मासिकाच्या "हिंदुसभा विशेषांक" व "काँग्रेस खास अंक" यांचे सारखेच कौतुक केले व त्यांतून अनेकांच्या भावनांना प्रतिसाद दिला. या गोष्टीचे महत्त्व आता अधिक वाटते.

गौरवपूर्वक निरोप आश्रम सोडताना गुरुवर्य अण्णा व गुरुवर्य दादा यांनी सुद्धा सुसंगतीत येऊन मला समारंभपूर्वक निरोप दिला. हे भाग्य आश्रम सोडताना फार थोड्यांच्या वाट्याला येत असे. बरेच विद्यार्थी आश्रमातील कडक शिस्तीला कंटाळून जात. मला मात्र आश्रमीय राहणी मानवली होती. कारण कडक शिस्तीमागील तत्त्व कळले होते.

माझ्या कुटुंबातलेच गुरुवर्य अण्णांच्या घरी निरनिराळ्या वेळी आलो असता त्यांनी व सौ. ताई यांनी दाखविलेला जिव्हाळा, तसेच ज्या ज्या वेळी अण्णांची गाठ पडते, त्या वेळी ते एकेरी नावाने हाक मारून कुटुंबियांची आपलेपणाने चौकशी करतात त्यामुळे ते आमच्या कुटुंबियांपैकीच आहेत असे वाटते.

हे मात्र खटकले ! नुकत्याच झालेल्या वास्तूच्या अनावरणप्रसंगी गुरुवर्य अण्णांनी दिलेली देणगी व केलेला संकल्प फार थोर व आदर्श आहेत यात शंका नाही, पण मला मात्र ही गोष्ट फार खटकली. आयुष्यभर अल्प वेतनावर राहून त्यांनी आश्रमाची सेवा केली. त्यांचा काटकसरीचा संसारही आम्ही जवळून पाहिला आहे. अशा परिस्थितीत सेवानिवृत्तीच्या काळात तरी त्यांनी सुखासमाधानात राहावे हीच मनापासून इच्छा आहे. यासाठी तरी निदान त्यांनी त्यांना मिळालेल्या सन्मान्य वेतनाचा उपयोग केला असता तर मला अधिक समाधान वाटले असते.

□ □ □

५४. शिकलो तसे वागत आहोत

श्री. दा. शि. भावसार, बी. ए.
व्यवसाय : टी. टी. आय्., सेंट्रल रेल्वे
शिक्षणकाल १९३७ ते १९४४
श्रद्धाशील, सात्त्विक, आध्यात्मिक वृत्तीचे माजी विद्यार्थी

गुरुवर्य अण्णांच्या शिक्षा गुरुवर्य अण्णांनी आपल्याला कधी बोलावूच नये असे मला वाटत असे. थोडेसे कुठे चुकले की, ते रागावतात व शिक्षा करतात. रागावल्यावर मानसिक त्रास होत असे. गुरुवर्य अण्णा छडचा मारतात, उपवास करायला सांगतात, संडास झाडायला लावतात. आपला लहानसा अपराध त्यांना त्यांच्या दुर्बिणीतून मोठा दिसतो. तेव्हा त्यांचा संबंध येऊ नये असे त्या वेळी मनात येऊन जाई.

खुराकाचा प्रसंग माझ्याकडे शेंगदाण्याचा खुराक रात्री शिजविण्याचे काम काही महिन्यांसाठी दिलेले होते. थंडीचे दिवस होते. आदल्या दिवशी रात्री शेंगदाणे शिजविण्याचा मी कंटाळा केला. तसाच झोपी गेलो. सकाळी उठून सगळ्यांना व्यायामानंतर रात्री पाण्यात भिजत घातलेले शेंगदाणे वाटून टाकले. ही गोष्ट गुरुवर्य अण्णांना समजली. जेवणाच्या आधीच गुरुवर्य अण्णांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावून विचारणा केली. ते म्हणाले, "हे पाहा, शिजविलेले शेंगदाणे व नुसते पाण्यात भिजत घातलेले शेंगदाणे खाल्लेल्या दोन माणसांची दोन्ही प्रकारची विष्टा काचेच्या ट्यूबमध्ये घालून त्यावर डॉ. केलॉग या अमेरिकन शास्त्रज्ञाने प्रयोगानिशी सिद्ध केले आहे की, कच्च्या अथवा भिजविलेल्या शेंगदाण्यापेक्षा शिजविलेले शेंगदाणे पचनास हलके असतात व त्याचा परिणाम शरीरावर चांगला होतो. तेव्हा तू तुझ्या हलगर्जीपणामुळे शंभर मुलांचे नुकसान केले आहेस. तू हात पुढे कर!" असे म्हणून गुरुवर्य अण्णांनी अंगात असलेल्या सर्व बळानिशी माझ्या उजव्या हातावर वेताच्या छडीने २–३ छडचा मारल्या. ही गोष्ट मी प्रामाणिकपणाने सांगू इच्छितो की, माझ्या मनावर एवढा परिणाम झाला की, अजूनही गुरुवर्य अण्णांना पाहिल्यावर आपणास काही शिक्षा वगैरे तर करणार नाहीत ना अशी भीती वाटते.

शिकवणीचे स्मरण संस्थेत असताना जे जे काही शिकलो, त्या त्या सर्व शिकवणुकीचा प्रत्यक्षात उपयोग करण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असतो.

'गोरगरिबांना मदत करा, प्रामाणिकपणाने, सचोटीने वागा, स्वतःजवळ जे काही असेल ते इतरांना देत जा, हातांना देण्याची सवय लावा' इ. पुष्कळसे धडे गुरुवर्य अण्णांनी आम्हाला शिकविले.

'साधी राहाणीं—उच्च विचारसरणी' हा घडा ते सर्वांना देत आहेत. आम्हा सर्वांवर चांगले संस्कार व्हावेत अशीच त्यांची सतत दृष्टी असते.

स्वच्छता, टापटीप यांचीही शिकवण त्यांनी आम्हाला दिली.

'समाजात वावरताना त्यागाची भावना सतत जागृत असू द्या. जे काही कराल ते अंतःकरण ओतून करा. तळमळीने करा.' असे गुरुवर्य अण्णा आम्हाला सांगत. त्याचा आमच्या आचरणावर चांगलाच परिणाम झाला आहे.

मी पुणे अ. वि. गृह ही संस्था १९४४ साली सोडली. तरीही 'समाचार' मासिकाच्या द्वारे गुरुवर्य अण्णांनी आम्हांला संस्कारांचे शिक्षण देण्याचे कार्य चालू ठेवले आहे.

स्वतः विचार करा कुठलाही विचार सांगितल्यावर अण्णा म्हणतात, 'तुम्ही विचार करा. चिंतन करा. 'तुम्ही स्वतः तुमच्या बुद्धीने विचार करा. अनुभवाने तपासून पाहा. पटल्यासच त्या विचारांचा स्वीकार करा. तुमचे स्वतःचे असे काही तरी स्वतंत्र असू द्या. तुम्ही जगाला काही तरी नवीन द्या. तुमचे विचार प्रभावी बनवा. तुमची बुद्धी ही गंजता कामा नये. तिला उजाळा दिला पाहिजे.'

सप्तरंगी व्यक्तिमत्त्व आजही केव्हाही संस्थेत गेले तरी ते आस्थेवाईकपणाने चौकशी करतात. प्रेमाने विचारपूस करतात—आईला आपल्या मुलांची जशी काळजी वाटते तशी संस्थेच्या सर्व माजी विद्यार्थ्यांची त्यांना काळजीच वाटते. विचारपूस, मार्गदर्शन हा त्यांचा दैनंदिन परिपाठच झाला आहे. आम्हाला बरोबरीच्या नात्याने ते वागवतात.

गुरुवर्य अण्णा म्हणजे मार्गदर्शनाचा, स्नेहाचा, सुसंस्काराचा, तत्त्वज्ञानाचा बुद्धिमत्तेचा, व्यावहारिकतेचा, हास्याचा, विनोदाचा, प्रेमाचा जणू धबधबाच आहेत असे वाटते. गुरुवर्य अण्णा, तुम्ही आमच्या अंतःकरणात सदैव आहात. तुम्हास आवडतील अशीच कृत्ये आम्ही करू व तुमचा आदर्श आम्ही जीवनात उतरविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करू.

ते प्रश्न नकोत अण्णा आम्हाला जनरल इंग्लिश शिकवीत. त्यावेळी ते आम्हाला प्रश्न विचारीत. त्यांनी मला प्रश्न विचारल्यानंतर फारच क्वचित प्रसंगी मी त्यांना समाधानकारक उत्तर दिले असेल. त्यावेळी असा एक विचार मनात येऊन जाई की, " आपणाला असे शिक्षक पाहिजेत की जे आपणाला कधी काही प्रश्नच विचारणार नाहीत. "

ही माझी इच्छा आता पूर्ण झाली आहे ! कारण माझे आध्यात्मिक गुरू अवतार श्री मेहेरबाबा हे १९२५ सालापासून मौन आहेत.

□ □ □

५५. यश देणारे संस्कार व विचार

श्री. वि. ना. वैद्य, बी. ए., एल्एल्. बी.
व्यवसाय : एजंट, स्टेट बँक ऑफ इंडिया लि., धरणगाव
शिक्षणकाल १९३७ ते १९४१
माजी कार्यकर्ते कै. ना. वि. वैद्य यांचे सुपुत्र

पावित्र्य आणि त्याग त्या वेळेस माझ्या दृष्टीने तरी आश्रमीय व शाळेचे वातावरण स्वदेशभक्तीपर व त्यागमय असे होते. पारतंत्र्याचा काळ असल्याने त्यागाचा आदर्श असणाऱ्या व देशाकरता झीज सोसणाऱ्या अनेक व्यक्ती माझ्यासमोर काम करीत होत्या. सारांश, एक प्रकारच्या उच्चतम, पवित्र व त्यागी वातावरणात माझी शालेय शिक्षणाची वर्षे निघून गेली.

आमच्यावरचे ते प्रयोग ! गुरुवर्य अण्णा आम्हाला "ए टेल् ऑफ् टू सिटीज्" हे पुस्तक शिकवीत असत. मला स्वतःला हा तास कंटाळवाणा वाटत असे. व्यापक ज्ञान, सामान्य ज्ञान, वादविवाद सभा, प्रबंध लिहिणे इत्यादी शैक्षणिक प्रयोग गुरुवर्य अण्णा आमच्यावर करीत असत. परंतु माझ्या स्वतःच्या बाबतीत त्यांच्या दृष्टीने मी किती यशस्वी झालो याची शंकाच आहे.

संस्कार आणि विचार गुरुवर्य अण्णांनी माझ्या शिक्षणात अगदी पहिल्यापासून अत्यंत जिव्हाळ्याने लक्ष घातले होते. मी पण त्यांना अगदी आदर्श पुरुष म्हणून समजत असे. आश्रमाचा व माझा संबंध केवळ शाळेपुरताच आला असे नाही.

निरनिराळ्या प्रसंगी हौशी छायाचित्रकार म्हणून मी कित्येक छायाचित्रे घेतली आहेत. त्यावेळीही गुरु. अण्णांनी छायाचित्रासंबंधीच्या प्रश्नावर मला अधिक कळते म्हणून काही काही गोष्टी विचाराव्यात. A hero is a hero every where. The importance of an examination lies in its preparation. अशा तऱ्हेचें मौलिक विचार समजावून सांगावेत. त्यांनी दिलेले संस्कार व मौलिक विचार यामुळेच मला सध्याचे यश प्राप्त झालेले आहे असे मी मानतो.

पितृतुल्य जिव्हाळा ती. तात्या गेल्यावर त्यांची पोकळी गुरुवर्य अण्णांनी भरून काढली असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही. ती. तात्या असेपर्यंत जगाच्या व्यवहारासंबंधी मी अगदी अज्ञानात होतो असे म्हटले तरी चालेल. आणि आता वयाच्या चाळीशीमध्ये मी आयुष्यात स्थिर व यशस्वी होत आहे याचा बराचसा वाटा गुरुवर्य अण्णांच्याकडे जातो. ते नेहमी म्हणत 'Life starts at forty.' माझ्या बाबतीत ते सत्य आहे.

५६. सुसंस्कार व विशाल दृष्टिकोन

श्री. मा. वा. दहिफळे, एम्. एस्सी.(अग्री.), डिप. एजी.
(वेल्स. यू. के.)
व्यवसाय : ॲग्रॉनॉमिस्ट, फर्टिलायझर कॉर्पो. ऑफ इंडिया, ट्रॉम्बे
मुंबई विभाग
शिक्षणकाल १९३८ ते १९४५
कृषिशास्त्रातील एक उच्च दर्जाचे संशोधक

पदोपदी मार्गदर्शन गुरुवर्य अण्णा म्हणजे शिस्तीचे भोक्ते. केवळ शाळेतच नव्हे तर इतर वेळीही प्रसंगानुसार ज्ञानदान व मार्गदर्शन करीत असत. तेही एकांगी नव्हे तर सर्वांगीण. प्रत्येकाने असलेल्या गुणांची वृद्धी व नसलेले गुण आत्मसात करण्यासंबंधी वारंवार सूचना असत. राष्ट्रीय व धार्मिक कार्यक्रम घडवून आणवून त्या वेळी विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार घडविणे, सूत्ररूपाने माहिती देणे ही गुरुवर्य अण्णांची खास वैशिष्ट्ये. चूक घडल्यास सोदाहरण पटवून देऊन पुन्हा तशा प्रकारची चूक होऊ न देण्याबद्दल दक्षता ते घेत. शाळेतील विविध व्यवसाय शिक्षण, विविध उपक्रम, नवनवीन विचार, योजना, प्रबंध व आत्मवृत्त लिखाण इ. बाबतीत विद्यालय नेहमीच आघाडीवर होते. अनेक शाळांनी येथील उपक्रमांचे अनुकरण केले. रात्रीच्या प्रार्थना व "सुसंगती" नंतरचे चिंतनांच्या विषयांची तर अद्याप आठवण येते. "मी निर्भय आहे. दुर्बल नाही. बलवान आहे. सत्याने वागेन." इ. विषयांचे चिंतन आपोआपच वारंवार होत असते. आश्रमात झालेल्या सुसंस्कारामुळे वाईट सवयींपासून आतापर्यंत मी दूर राहू शकलो.

'समाचारा'विषयी घरोघरी आवड आश्रमातील विशाल दृष्टिकोन व गुरुवर्य अण्णांचे उच्च विचार व मार्गदर्शन यामुळे मी सध्या नोकरीत असूनही होमगार्ड, सार्वजनिक उत्सव, गरिबांचे शिक्षणासाठी शाळा बांधणे इ. स्वरूपाची सामाजिक कामे अद्याप हौसेने करीत असतो. आमचे घरातील सर्वजण "आश्रम समाचार" फारच आवडीने वाचतात. विशेषत: 'समाचार'मधील पहिल्या पानावरील विचारांचे तर पारायण केले जाते. तसेच सदरहू विचारांचा सभेच्या वेळी मुद्दे म्हणून फारच चांगला उपयोग होतो. ते सूत्रमय विचार अनेक वर्तमानपत्रांतूनही उद्धृत केल्याचे आढळून येते.

देणगी परत केली खालील आठवण तर मी कधीच विसरू शकत नाही. मी इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी जाण्यापूर्वी गुरु. अण्णांची गाठ घेण्यासाठी गेलो होतो. त्या वेळी संस्थेस देणगी म्हणून रु. १० अण्णांचे हातावर ठेवले. तेव्हा अण्णांनी ते मला परत करून सांगितले की, "संस्थेला पैशाची जरुरी आहेच; परंतु तुला ह्याची सध्या

जास्त जरुरी आहे. परदेशात पैसा अधिक लागतो." तेव्हा विचार आला, किती थोर अंत:करणाचे आपले अण्णा आहेत.

माझे सद्‌भाग्य अद्यापही गाठ पडली तर अण्णा अतिशय आपुलकीने कुटुंबीय मंडळींची चौकशी करतात. मनमोकळेपणाने बोलतात. गुरु. अण्णांच्याकडे पाहताच मन भारले जाते. अण्णांचे कर्तृत्व, लिखाण, शैक्षणिक व सामाजिक कामगिरी यांमुळे ते आता फक्त आश्रमाचे अगर महाराष्ट्राचे राहिले नाहीत, तर ते भारतातील एक थोर सत्पुरुष म्हणूनच त्यांची गणना करावी लागेल.

□ □ □

५७. यशाची सूत्रे

श्री. ना. म. फाटक
व्यवसाय : अ. स्टे. मास्तर, सेंट्रल रेल्वे
शिक्षणकाल १९३८ ते १९४०
मिळालेल्या विचारांचे व संस्कारांचे प्रचारक

यशाचे श्रेय आश्रमाला अण्णा, मी गेल्या गत कालखंडाचा सिंहावलोकनात्मक आढावा घेऊ लागलो तर वाटते की गेल्या अर्ध शतकात संस्थेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांपैकी हजारोंनी आपले जन्माचे कल्याण करून घेतले आहे, समाजात प्रतिष्ठा मिळविली आहे. या सर्वांचे श्रेय आश्रमातील वातावरण व संस्कार यांना आहे, हा एक मुद्दा प्रामुख्याने डोळ्यासमोर उभा रहातो.

वेदान्ततुल्य शिकवण आश्रमात शिकवलेला वेदान्त मात्र थोड्या फार फरकाने प्राचीन आश्रमात चर्चिल्याप्रमाणेच असावा. त्यात नैतिक, सामाजिक व वैयक्तिक उत्कर्षाचे धडे होते. सामाजिक शिक्षण व गृहशिक्षण होते. नव्हते काय तर फक्त आई, मावशी, वहीण, मामा इ. वात्सल्याने वागणारी मंडळी जवळ नव्हती.

उपदेशांचा परिणाम तुमचे संदेश, आदेश व उपदेश हे कधी प्रत्यक्ष तर कधी 'समाचार' मधील अग्रलेखांच्या रूपाने मिळत गेले व अद्याप मिळतच आहेत. मी पदवीधर झालो नाही. तथापि एक सामान्य नागरिक म्हणून नांदत आहे. मी माझ्या जीवनात तुमच्या शिकवणींना "अण्णांचे पंचतंत्र" असे नाव दिले आहे.

तुम्ही प्रेरक, तुमचे तंत्र म्हणजे प्रेरणा व त्याचे कार्य म्हणजे माझ्या यशस्वी जीवनाचे रहस्य.

□ □ □

५८ .सजीव लेणी

श्री. बा. ना. कुलकर्णी, डी. एम्. इ. इ.
व्यवसाय : डेप्युटी इंजिनियर, बीज व पाटबंधारे खाते
शिक्षणकाल १९३९ ते १९४९
व्यायामपटू, कर्तबगार व उत्साही इंजिनियर

वातावरणाचा परिणाम विद्यालयात जी शिस्त व ध्येयनिष्ठा होती, त्यामुळे एक वेगळेच वातावरण निर्माण झाले होते. मी इंग्लिश ५–६ वीत असताना आम्हांस डॉ. कर्वे गणित विषय शिकवीत. ते त्या वेळेस स. प. महाविद्यालयात प्राध्यापक होते. पहिले दोन दिवस शाळेत शिकवावयास येताना ते पाश्चात्य पोषाखात आले. परंतु तिसऱ्या दिवशी मात्र प्राध्यापक महोदय टोपी घालून आलेले पाहून आम्ही विद्यार्थी चकित झालो. परंतु डॉ. कर्व्यांनीच खुलासा केला की, "या विद्यालयाच्या मुख्याध्यापकांना मी लहानपणापासून बघत आहे व त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल मला फारच आदर आहे. विद्यालयातील सर्व विद्यार्थी टोपी घालतात. विद्यालयाचे एकूण वातावरण ध्येयनिष्ठ म्हणूनच शिस्तबद्ध आहे व या वातावरणाचा माझ्यावर एवढा परिणाम झाला की, या वातावरणाला अनुरूप असाच पोषाख केल्याने मला येथे आल्यावरोबर समाधान वाटले. तुमचे विद्यालय म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण देणारी शाळा नसून मानवी जीवनाचे यथायोग्य ज्ञान करून देणारी ज्ञानगंगा आहे."

आश्रमातील अग्निप्रलय महात्मा गांधींच्या वधानंतर १९४८ साली महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी जी काही जाळपोळ व लुटालूट झाली, त्याची झळ संस्थेलाही लागली. एके दिवशी काही विघ्नसंतोषी लोकांनी दुपारी छापखान्याचे बाजूने संस्थेच्या आवारात प्रवेश करून संस्थेच्या छापखान्यास व बाहेर जो कागद ठेवला होता त्याला आग लावून दिली. आगीत सर्व छापखाना भस्मसात झाला. छापखान्यातील लोखंडी यंत्रे तापून लाल व निकामी होऊन बाजूस पडली होती. या वणव्याची झळ सेवाश्रमात राहणाऱ्या कै. कुलगुरू दादासाहेब केतकर व गुरु. अण्णासाहेब खैर यांच्या कुटुंबियांना लागत होती. याच वेळी कुलगुरू दादासाहेबांची मुलगी अत्यवस्थ होती. बाहेर आगीचा डोंब उसळला होता. आश्रमातील विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या जागेस देखील आगीची झळ पोहोचण्याची शक्यता होती. आश्रमातील सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनाची जबाबदारी गुरुवर्यांवर होती. त्या वेळी गुरु. अण्णांनी सर्व विद्यार्थ्यांना आपआपल्या जागेवर मंदिरात बसण्यास सांगितले, व मंदिराचे दरवाजे लावून घेतले. आम्ही पाच सहा कॉलेज विद्यार्थी फक्त बाहेर होतो. प्रसंग फार बाका होता. केव्हा काय घडेल हे सांगता येत नव्हते.

अशा वेळी गुरु. अण्णासाहेब राममंदिरात बसून सर्व परिस्थितीचे निरीक्षण करून आम्हांस मार्गदर्शन करीत होते. याच वेळी ते गीता म्हणत असल्याचे मला चांगल्या प्रकारे आठवते. गुरु. अण्णांनी गीता नुसती सांगितली नाही तर ती प्रत्यक्ष कृतीत आणली. कर्मधर्मसंयोगाने वेळेवर पोलिस आल्याकारणाने वसतिगृहाचे काही एक नुकसान झाले नाही. सर्व विद्यार्थी सुरक्षित राहिले. या प्रसंगाचा ठसा माझ्या मनावर खोलवर बिंबला आहे. सश्रद्धेने आपले कर्तव्य करीत असताना कठीण प्रसंगीदेखील मनाचा तोल ढळत नाही, हीच शिकवण या प्रसंगाने मला मिळाली.

शिकून मग जा गुरु. अण्णा शिस्तप्रिय व कर्तव्यतत्पर असूनही कठोर नव्हते. मी विद्यालयात शिकत असताना आश्रमात काही महाविद्यालयीन विद्यार्थी होते. त्यांच्याकरिता काही नियम व बंधने असत. एका प्रसंगी आश्रमातील बी. ए. (ज्युनिअर) मधील विद्यार्थ्याला कै. गुरु. दादासाहेबांनी काही कारणास्तव रागावून ताबडतोब संस्थेच्या बाहेर जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे तो विद्यार्थी गुरु. अण्णांना बाहेर जाण्याचे तयारीत भेटावयास गेला. मी उद्यापासून संस्थेच्या बाहेर जाणार आहे असे त्याने सांगितले. तो प्रसंग माझ्या डोळ्यासमोर अद्यापही आहे. गुरु. अण्णा म्हणाले "गेली आठ वर्षे तुझे शिक्षण संस्थेत झाले. या काळात तुझ्यावर काही संस्कार झाले आहेत व संस्थेने तुझ्यासाठी खर्चही केला आहे. तेव्हा संस्थेच्या नियमांचे चौकटीत राहून राहिलेली दोन वर्षे तू येथे पूर्ण कर. पदवी संपादन करूनच बाहेर जा. म्हणजे मग आम्हालाही आनंद वाटेल." त्याप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो विद्यार्थी संस्थेच्या बाहेर पडला. तो आज सुस्थितीत आहे.

विद्यार्थ्यांनी रोज नियमित व्यायाम घेतलाच पाहिजे यावर अण्णांचा कटाक्ष असे. जास्त व्यायाम घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्यांनी शेंगदाणे, खजूर अशा पौष्टिक आहाराची व्यवस्था केली होती. अण्णांच्या प्रोत्साहनाने मी दोन वेळा अखिल महाराष्ट्र सामन्याकरता मुंबई व अमरावती येथे गेलो होतो व फरीगदगा या वैयक्तिक खेळात दोन्ही ठिकाणी नैपुण्य मिळविले.

सजीव लेणी अशा प्रकारे शांत व ध्येयप्रवृत्त वातावरणात माझे शिक्षण झाले आश्रमात प्रवेश मिळून पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची संधी मिळाल्यामुळेच मी यशस्वी जीवन व्यतीत करीत आहे. गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण मिळाल्यामुळे निरनिराळ्या क्षेत्रांत यशस्वी झालेले कितीतरी विद्यार्थी आज देशभर विखुरले आहेत. हजारो वर्षांपूर्वी कोरलेली लेणी बघण्यास आपण अजिंठा वेरूळकडे धाव घेतो, पण माझ्या गुरुवर्यांनी घडवलेली ही सजीव लेणी आयुष्यपथावर जागोजागी आपणास बघावयास सापडतील.

□ □ □

५९. अध्यापनाची नवीन पद्धत

श्री. कृ. रा. देवळे

व्यवसाय : येरवडा सेंट्रल प्रिझनमध्ये सुतारकामाच्या कारखान्याचे प्रमुख

शिक्षणकाल १९३५ ते १९४१

स्वप्रयत्नाने व्यवसायात वरिष्ठ-स्थान-प्राप्ती

इंग्लिश अध्यापनाची नवी तऱ्हा तसे म्हणावयाचे तर अण्णांचा दर आठवड्यातून फक्त एकच 'तास' असे. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष परिचय असावा म्हणूनच जणू तो तास होता. विषय होता इंग्रजी शीघ्रवाचन. पहिल्या तासालाच त्यांनी अभ्यासाची नवीन पद्धत सांगितली. ती अशी–पुस्तकाची पहिली दहा पाने पुढल्या वेळी वाचून या. त्यांतील कठीण शब्द, अर्थ न समजलेले शब्द, व वाक्प्रचार वहीत लिहून आणा. वर्गात आल्यावर ते विचारीत Any difficulties from page...? कोणीही अडीअडचण विचारावी. ते समजावून सांगत. पहिल्या पानावरच्या अडचणी संपल्या की पुढील पान असे सबंध पुस्तक संपे. कुणी काहीच विचारले नाही, तर ते स्वतःच प्रश्न विचारीत.

विद्यार्थीच शिक्षक झाले या पद्धतीत पुढे आणखी बदल झाला. त्यांनी पुस्तकांची पाने विद्यार्थ्यांना वाटून दिली. पहिली दहा पाने देवळे, दहा ते वीस जोशी, याप्रमाणे. वर्गाला एक जाड वही दिलेली होती. आपल्या वाट्याला आलेल्या पुस्तकाच्या पानांतील कठीण शब्द, कठीण वाक्प्रचार, त्यांचे अर्थ कोषाच्या साहाय्याने वहीत तयार करून आणावयाचे. तासाची घंटा झाली की ते वर्गात येत. प्रेक्षकासारखे खुर्चीत बसत. ज्याची पानांची पाळी असे तो विद्यार्थी उभा राहून विचारी Any difficulty from page...? इतर विद्यार्थी शंका विचारीत. वहीत तयार करून आणलेल्या टिपणांच्या साह्याने तो विद्यार्थी आपल्या वाट्याला आलेल्या पानांतील वर्गाच्या शंका दूर करी. तशीच अवघड किंवा नवी कल्पना असली तर ती अण्णा स्वतः समजावून देत.

आज फायदा कळतो पुढे वरच्या वर्गांतील शिक्षण घेताना मात्र मला या पद्धतीचा खूपच फायदा झाला. आजही माझे जाड स्पेलिंग-बुक मी ठेवले आहे. इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या माझ्या दोन मुलांनाही मी ही अभिनव सवय लावली आहे.

संपन्न ग्रंथालयाचा उपयोग महाराष्ट्र विद्यालयाचे ग्रंथालय हे एक भूषण आहे. इतर संस्थांनाही ग्रंथालये आहेत. ग्रंथालयाचा उपयोग स्वाध्यायासाठी करण्याचे मात्र महाराष्ट्र विद्यालयात ती. अण्णांनी शिकविले. शिक्षकांच्या अनुपस्थितीत सबंध वर्ग ग्रंथालयात जाई. तेथे विद्यार्थी पुस्तके वाचीत आणि फुकट जाणारा वेळ कारणी लावीत.

दोन रुपयांत स्वतःचे फर्निचर मी विद्यालयात असताना वर्गासाठी चौरंग व लहान सतरंज्या प्रत्येकाने विकत घ्यावयाच्या होत्या. त्याची किंमत दोन रुपये होती. मला ती. अण्णांनी दिलेल्या स्वावलंबनातून मी चौरंग आणि वर्गात बसण्याच्या लहान सतरंजीचे पैसे देऊ शकलो.

डोके चालवून श्रमदान महाराष्ट्र विद्यालयात 'श्रमदानाची' पद्धत होती. बागेत काम, ग्रंथालयात काम, वर्गांची सफाई आळीपाळीने करावी लागे. मला एका गुलाबाच्या झाडाची व्यवस्था करण्याचे काम होते. काही केल्या गुलाबाला फुले येत नव्हती. "स्वतःचे डोके चालवून जरा काम करा" असे ती. अण्णांनी सांगितले. माझ्या मनानेच आळे खोल खणले, तण काढले. नियमित पाणी घातले. काही आठवड्यात गुलाब फुलला. आजही अडीअडचणीत "डोके चालवून काम करा" हा संदेश उपयोगी पडतो.

मुलांचे प्रकल्प भूगोल आणि शास्त्राच्या विषयांतील काही विषयांचे तक्ते किंवा वस्तू तयार कराव्यात, अशी एक कल्पना ती. अण्णांची होती. मला आठवते की या कल्पनेमुळे कित्येक उपयुक्त तक्ते आणि छोट्या वस्तू विद्यालयांतील वर्गात होत. त्यांचा उपयोग, शिक्षण केवळ पुस्तकीच न राहता, साधनांचा उपयोग करण्याची सवय विद्यार्थ्यांना लागत असे.

या कित्येक बाबींमुळे शिक्षण केवळ "पुस्तकातील किड्या" प्रमाणे न होता, नवी दृष्टी मिळाली आणि हे सारे मुख्यतः गुरुवर्य अण्णांच्या सहवासाने मिळाले. हे कृतज्ञतापूर्वक नमूद करण्यास धन्यता वाटते, अतीव समाधान वाटते.

□ □ □

६०. सुधारणा-मंदिरातील रत्ने

श्री. चिं. गो. वीरकर, बी. कॉम्.

व्यवसाय : स्टोअर असिस्टंट, बी. इ. एस्. टी. अंडरटेकिंग; आयुर्विमा प्रतिनिधी

शिक्षणकाल १९३९ ते १९४२

व्यवहारकुशल व संघटनाचतुर कार्यकर्ते

सुधारणा-मंदिर बरखास्त मी प्रवेश केल्यावर लागलीच आमची रवानगी सुधारणा-मंदिरात झाली. सुधारणा-मंदिर हा अण्णांचा प्रयोग होय. यात विशेषतः शहरातील विद्यार्थ्यांचा भरणा असे. शहरातील मुलांना आश्रमातील नियम फार जाचक वाटत. त्यामुळे मन बंड करून उठत असे.

हा प्रयोग फसल्यावर ताबडतोब तो बंद करण्यात आला. सुधारणा-मंदिरातील विद्यार्थ्यांपैकी आज एकजण मुंबईच्या एका कॉलेजचा प्राचार्य आहे. दुसरा एकजण

लष्करातील वरच्या श्रेणीचा अधिकारी आहे. आणखी एकजण परदेशी कंपनीत सेल्स-मॅनेजरची जागा भूषवीत आहे. मी माझा पदवीपर्यंतचा अभ्यास पुरा करून पार्ल्यातील सामाजिक जीवनात उलाढाली करण्याचा प्रयत्न करीत आहे. आज मात्र आमच्या-विषयीचे गैरसमज गुरु. अण्णांच्या मनात नाहीत याची शंभर टक्के खात्री झाली आहे.

चालकांतील एकी आपल्याला आदरणीय असलेल्या व्यक्तींकरिता ते आपल्या मनास मुरड घालतात. गुरु. दादांचे विचार सर्वस्वी त्यांना मान्य असतच असे नाही. परंतु ते विचार गुरु. दादांचे आहेत, सबब त्यांचा मान राखला गेला पाहिजे याच्यावर गुरु. अण्णांचा कटाक्ष असे. याच गोष्टीमुळे संस्था चालविण्यास आवश्यक असलेली एकजूट राहून संस्थेची भरभराट होण्यास फार मोठी मदत झाली आहे.

स्वभावाला वळण गुरु. अण्णांचा स्वभाव तापट होता असे जर आज कुणाला सांगितले तर खरेही वाटणार नाही. त्यांना तरी त्याची आठवण आहे की नाही शंकाच आहे. वयाबरोबर त्यांचा तापटपणा कमी झाला नसून त्यांनी तो संयमपूर्वक कमी केला आहे. त्यांची प्रकृतीही तोळामासा असून ती सुसंयमित वागण्यामुळे त्यांनी उत्तम प्रकारे जोपासली आहे.

लोकसंग्रही वृत्ती आपल्या स्नेह्यासोबत्यांशी संपर्क ठेवण्यात अण्णांचा हातखंडा आहे. देणगीदार असो, विद्यार्थी असो किंवा इतर कोणीही असो, नितान्त आपुलकीने अण्णा त्यांच्याशी संपर्क ठेवतात. एकदा गुरु. अण्णांचे पत्र आले. त्यात त्यांनी संस्थेच्या एक देणगीदार वृद्धा पार्ल्यात रहात होत्या, त्यांना भेटून येण्यास सांगितले. त्या वृद्धेकडे जाऊन "मी गुरु. अण्णा खैरांकडून आलो आहे" असे सांगितल्यावर त्या बाईंना कृतज्ञता वाटली. अशाच उदाहरणामुळे देणगीदारांना संस्थेबद्दल आपुलकी वाटत आली आहे. अण्णा ज्या ठिकाणी जातील त्या ठिकाणच्या माजी विद्यार्थ्यांना व देणगी-दारांना वेळात वेळ काढून भेटून येतील. मुक्कामातील कामाव्यतिरिक्त हा कार्यक्रम महत्त्वाचा असतो. त्यांना हॉटेलात उतरण्याचा प्रसंगच येत नाही, तर उलट मोजका वेळ सर्वांना कसा वाटून द्यावा हाच प्रश्न पडतो. त्या ठिकाणचे माजी विद्यार्थी व देणगी-दार यांचे स्नेहसंमेलन हा ठरलेला अनौपचारिक कार्यक्रम असतो. त्या वेळेस ते कोणाचे आजोबा, कोणाचे काका व कोणाचे स्नेही असतात. अशा संमेलनाचे एकूण वातावरणच अत्यंत खेळीमेळीचे व आपुलकीचे असते. अशा संमेलनातून बहुतेक प्रत्येक व्यक्ती जीवनासक्तीच घेऊन बाहेर पडते व हल्लीच्या धकाधकीच्या व निराशायुक्त जीवनात आशेचे अंकुर पल्लवित होतात.

सर्वसंग्राहक वृत्ती हा तर अण्णांचा स्थायीभाव आहे.

वैचारिक संपत्तीचा परिणाम जीवनाच्या सुरुवातीपासून "की घेतले व्रत न हे अंधतेने" या वृत्तीने ते वागले व समृद्ध जीवन जगले आहेत. त्यांनी व्यवहार व ध्येयवाद यांची सांगड घातली आहे. 'सदाचार चिंतनी' व 'गीतेतील मुख्य विचार' या ग्रंथां-वरून त्याची प्रचीती येते. हजारो विद्यार्थ्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. अण्णांच्या

सहवासात आम्ही दिवस घालवले आहेत, त्याचा आम्हांला अभिमान वाटतो. विशेषतः इतरांचा आमच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन एकदम बदलतो. याचा मी स्वतः अनुभव घेतला आहे. वरील पुस्तकांच्या बाबतीतदेखील माझा फार निराळा अनुभव आहे. ज्या ज्या लोकांनी ती पुस्तके वाचावयास नेली त्यांनी ती विकतच घेऊन टाकली. म्हणून मला म्हणावयाचे आहे की, " अण्णा, आम्हांला आमच्या समाजाला आपले सार्वकालिक मार्गदर्शन हवे आहे."

□ □ □

६१. शिक्षणमंत्री इंजिनियर झाला

श्री. गो. गो. गायकवाड, डी. सी. इ.

व्यवसाय : डेप्युटी इंजिनियर, पी. डब्ल्यू. डी., नागपूर

शिक्षणकाल १९३९ ते १९४४

एकनिष्ठ सेवेने वरिष्ठपदाला पोहोचले

स्पर्धांना प्रोत्साहन कोणतीही स्पर्धा असो, अण्णासाहेब, महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांना तीत भाग घ्यायला लावीत. व्यायाम-विषयक स्पर्धांत त्या विषयाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड होई व त्यात व्यायाम-शिक्षक लक्ष घालीत. परंतु निबंध-स्पर्धा, हस्तलिखित-स्पर्धा यांत अण्णासाहेबच लक्ष घालीत. निबंध-स्पर्धा व हस्तलिखित-स्पर्धा यांत माझे नाव हमखास असायचे व त्यात मी पहिले किंवा दुसरे बक्षीस मिळवायचा. अर्थात हे महाराष्ट्र विद्यालयास भूषणावह होत असल्याने माझीही पाठ थोपटली जायची. तथापि या यशाच्या मुळाशी मराठीचे शिक्षक श्री. कानेगावकर व अण्णाच असत. कारण, काय लिहावे, कसे लिहावे, कशा उपमा द्यायच्या, अलंकार कोठे पेरायचे इ. बारकाईने सांगत. थोडक्यात म्हणजे ते मला लेखक करू पाहात होते. पण मी आपला दगड धोंडे, नि माती मुरुम यांत येऊन पडलो ही गोष्ट वेगळी.

बोधाचे ओव्हर डोस अण्णासाहेबांचे सुसंगती व विद्यालय-सभांतून आम्हाला बोधामृतांचे डोस कायम चालूच असायचे. एवढे मात्र खरे की, या बोधामृताचा मला आज पावलोपावली उपयोग होत आहे व दुसऱ्यांनाही होत असेल. त्यांचे ते विचार लहानपणी इतके पक्के डोक्यात बसलेले असत की, त्या चाकोरीच्या बाहेर गेले की, मनाला चुकल्यासारखे वाटते. थोडक्यात म्हणजे अण्णासाहेबांनी सगळचा गोष्टींना लक्ष्मणरेषा आखून दिलेली आहे.

चिंतनाचे शिक्षण आणखी सांगायचे म्हणजे असे की आमच्या वेळी म्हणजे साधारणतः १९४२ चे सुमारास त्यांनी चिंतनाची एक नवीनच पद्धती सुरू केली. हे चिंतन-प्रकरण कसे करायचे त्याचे आधी ते विद्यार्थ्यांपुढे विवेचन करीत. कोणता तरी एखादा चांगला विषय घेऊन (उदा. ' मी चांगला अभ्यास करीन ' इ.) व बसल्या

वसल्या डोळे मिटून त्या विषयावर ५ ते १० मिनिटे मन एकाग्र करावयाचे. आम्ही सगळे हायस्कूलचे विद्यार्थी आठवड्यातून दर शनिवारी राममंदिरात चिंतन करायचे. अण्णासाहेब आम्हांस चिंतनाचा विषय देऊन डोळे मिटण्यास सांगत व ५ मिनिटे त्या विषयावर एकाग्र मन करण्यास सांगत. असे करता करता मन एकाग्र करण्याची सवय लागली. तेव्हा अजूनही माझे मन अवांतर विषयांत भटकायला लागले की मी लगेच डोळे मिटून चिंतन सुरू करतो.

सिव्हिल की मेकॅनिकल ? मी इंजिनिअरिंगच्या तीन वर्षांच्या कोर्सला जाऊ इच्छित होतो. तेव्हा शाळेचे व आपले सर्टिफिकेट पाहिजे असे अण्णांना सांगितले. ते म्हणाले, " कोणती शाखा ? " मी म्हणालो " सिव्हिल. " " म्हणजे तू सरकारी खात्यात ओव्हरसीअरकी करणार. त्यापेक्षा तू मेकॅनिकलला जा ! " " मला त्या कोर्सची आवड नाही " म्हणून मी सांगितले. अण्णांना हे माझे म्हणणे पटले व त्यांनी मला लागणारी सर्व सर्टिफिकिटे दिली, आणि त्यांचे एक प्रोफेसर मित्र प्रो. गुपचुप यांना एक चिठ्ठीही लिहिली.

त्यांचाच झालो विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी अण्णांची किती ही कळकळ, किती ही आस्था. मी कोण ? कुठला ? पण संस्थेत गेल्यावर त्यांचाच झालो. तेथे नाही जातिभेद ! नाही पंथभेद ! नाही अहंपणा, नाही स्वार्थवृत्ती ! किती विशाल, निर्मल आणि सरळ मन !

□ □ □

६२. पायावर डोके ठेवून—

श्री. भ. गं. देशपांडे, बी. एस्सी. एम्. एड्.
व्यवसाय : मुख्याध्यापक, लोकमान्य विद्यालय, पंढरपूर
शिक्षणकाल १९३९ ते १९४७
संस्था व गुरुवर्य यांविषयी नितांत प्रेम

प्रारंभ 'अरे भगवंत तू मुद्रणकलेच्या शेवटच्या तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेत पहिला आलास ! तुला संस्थेचे चार रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे.'

असे जेव्हा मला सांगण्यात आले त्या वेळी 'बरे झाले, आता यावेळी घरून पैसे मागवावयाला नकोत !' असे मी चटकन बोलून गेलो.

'अरे तुम्हांला देण्याची सवय कशी लागणार ? जशी घेण्याची सवय आहे तशी दान देण्याची सवय ठेवा' गुरु. अण्णा म्हणाले.

हा सुविचार ऐकल्यानंतर त्यावर्षी पारितोषिके मिळविणाऱ्या आम्ही काही विद्यार्थ्यांनी विचारविनियम केला, व पारितोषिकाच्या रकमेत स्वतःची अल्पशी भर घालून संस्थेला आमची पहिली देणगी दिली.

दानधर्म करणे हा आपल्या कर्तव्याचा एक भाग आहे, याची जाणीव या प्रसंगातून आमच्या मनावर कायम स्वरूपात नोंदली गेली.

संस्थेवरील एकनिष्ठ प्रेम 'आई माझा तुला उपयोग होणार नाही. मी संस्थेत फक्त अन्न व वस्त्र घेऊन काम करणार आहे.'

शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरुवर्य अण्णांनी हा निर्णय आपल्या आईला सांगितला होता. हे त्यांच्याकडून समजल्यानंतर मला वाईट वाटले. 'तुम्ही असे सांगावयास नको होते' असे मी त्यावेळी चटकन बोलून गेलो. आज मात्र गुरुवर्य अण्णांचा त्यावेळचा निर्णय त्यांनी हाती ते तलेल्या कार्याच्या दृष्टीने योग्य होता हे प्रपंचाच्या अनुभवाने पटले आहे. गुरु. अण्णांनी संस्थेलाच आपली आई मानले, म्हणूनच आमच्यासारखी सहस्रावधी लेकरे तिच्या मांडीवर मोठी झाली.

संकटसमयी शांत वृत्ती म. गांधींच्या वधानंतर झालेल्या दंगलीत लोकसंग्रह छापखान्याला आग लागली होती. बाहेर गोळीबाराचे आवाज येत होते. आश्रमात कुलगुरू दादासाहेब केतकर यांची कन्या (कै. गंगूताई) विषमज्वराने आजारी होती. मी बाहेर राहात होतो. धावत आश्रमात आलो. गुरु. दादा व गुरु. अण्णा यांना बाहेर पडण्याबद्दल आग्रह केला. त्यांना हे पटले नाही. मलाच त्यांनी सुरक्षितपणे बाहेर पाठविले, व काळजी घेण्यास सांगितले.

टिळक कॉलेजातील प्रसंग १९६३ चा मे महिना होता. मी पुण्यातील टिळक कॉलेजच्या वसतिगृहाकडून कॉलेजकडे जात होतो. कॉलेजच्या बाहेरच्या पायरीवर गुरु. अण्णा अचानकपणे अनेक वर्षांनी दिसले. मी चटकन नेहमीच्या पद्धतीने त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. त्यांच्या मागे गुरुवर्य प्रा. पाटणकर होते. अवती-भवती एम्. एड्. चे काही विद्यार्थी होते. सर्वजण हल्लीच्या दिवसात, विशेषतः कॉलेजच्या आवारात, सहसा न आढळणाऱ्या या दृश्याकडे कुतूहलाने पाहात होते. असे आहेत गुरु. अण्णांचे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे संबंध !

गुरु. अण्णांचे व्यक्तिमत्व चौरस आणि परिपूर्ण आहे. त्यांनी शिक्षण द्वारा केलेल्या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सौ. ताईंचा फार मोठा वाटा आहे. गुरु. अण्णांनी संस्थेचा प्रपंच केला. सौ. ताईंनी घरचा प्रपंच सांभाळून संस्थेच्या प्रपंचात गुरु. अण्णांना बहुमोल मदत केली आहे. सौ. ताईंच्या रूपाने विद्यार्थ्यांना आईची माया मिळाली आहे.

□ □ □

६३. नवे नवे उपक्रम आणि प्रयोग

श्री. शं. रा. देवळे

व्यवसाय : शिक्षक, महाराष्ट्र विद्यालय

शिक्षक १९४० ते १९५८ आणि १९६५ पासून चालू

बालवाङ्मयाचे लेखक व अनेक पारितोषिकांचे मानकरी

प्रतिज्ञा पुरी केली "पुणे अनाथ विद्यार्थी गृह संस्थेच्या मदतीने आणि आपल्या आशीर्वादाने अमेरिकेला जाऊन उच्च शिक्षण घेण्याची संधी मला मिळत आहे. तेथे मिळणारे जास्तीत जास्त ज्ञान मी जिज्ञासेने ग्रहण करीन आणि तेथून परत आल्यावर माझ्या ज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या देशातील बुद्धिमान पण गरिबीमुळे वाया जाणाऱ्या विद्यार्थीवर्गाच्या उन्नतीसाठी करीन." या आश्वासनाने सभागृहात आनंदाने टाळ्यांचा गजर झाला. या आजीव सेवकांनी दिलेले हे आश्वासन पुढे अमेरिकेतून परत आल्यानंतर शब्दशः कृतीत आणले. हे आजीव सेवक म्हणजे डॉक्टर अण्णासाहेब खैर आणि हा प्रसंग म्हणजे मला घडलेले त्यांचे पहिले दर्शन. १९४० ते १९५८ या काळात कार्यालयाचे काम आणि शिक्षकाचे काम केल्यामुळे, गुरुवर्य अण्णांचा सहवास मला अगदी जवळून लाभला आणि शिक्षकाच्या जीवनात मार्गदर्शक होणाऱ्या किती तरी गोष्टी मला त्यांच्याकडून घेता आल्या.

प्रयोगशीलता 'महाराष्ट्र विद्यालय' ही पुणे अनाथ विद्यार्थी गृहाची एक शाखा आहे. महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना १९२१ साली झाली– आणि स्थापनेच्या दिवसापासून १९६३ सालापर्यंत डॉ. खैर हे तिचे मुख्याध्यापक होते. एका विद्यालयाचे त्रेचाळीस वर्षे मुख्याध्यापक असणे ही गोष्ट आपल्या महाराष्ट्रातच काय पण भारतातही एकमेव असण्याची शक्यता आहे. ह्या काळात गुरु. अण्णांनी अनेक शैक्षणिक प्रयोग केले. कित्येक प्रयोग यशस्वी झाल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक शाळांनी त्यांचे अनुकरण केले.

रिकाम्या तासांकरता 'स्वाध्यायमाला' ह्या काळात महाराष्ट्र विद्यालयात सर्व शिक्षक अर्धवेळ म्हणजे दोन तीन तास काम करणारे असत. पूर्ण वेळ काम करणारे शिक्षक फक्त एकच आणि ते म्हणजे फक्त गुरुवर्य अण्णा. एखादे शिक्षक रजेवर असले तर त्यांचे तास रिकामे पडत. या रिकाम्या पडणाऱ्या तासांचा सदुपयोग कसा करावा, या चिंतनातून गुरु. अण्णांना स्वाध्याय-मालेची कल्पना सुचली. एका तासिकेत म्हणजे सुमारे पस्तीस ते चाळीस मिनिटांत वाचून होतील अशा पुस्तिका तयार करावयाच्या. त्याच्या पन्नास प्रती वर्गातील मंत्र्याने ग्रंथालयातून घेऊन जायच्या आणि रजा असलेल्या शिक्षकांच्या अनुपस्थितीत ती पुस्तके वाचून ज्ञान मिळवावयाचे. या स्वाध्याय-मालेच्या सुमारे दोनशे पुस्तिका महाराष्ट्रातील लेखकांकडून आणि शिक्षकांकडून त्यांच्या

फावल्या वेळात लिहून घेतल्या, लोकसंग्रह प्रेसच्या फावल्या वेळात त्या छापून घेतल्या, आणि महाराष्ट्र विद्यालयाच्या रिकाम्या तासांना विद्यार्थ्यांना त्या वाचावयास पुरविल्या. अण्णांची स्वाध्यायमालेची कल्पना इतकी यशस्वी झाली की महाराष्ट्रातील कितीतरी शाळांनी आपल्या रिकाम्या तासांसाठी मालेचे संच ग्रंथालयात ठेवले.

अडचणीतील शिक्षकांना आसरा कोणी शिक्षक अन्य काही परिस्थितीने अडचणीत सापडल्यास अशा शिक्षकांचा उपयोग ते महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी करून घेत आणि त्या शिक्षकांनाही जीवनात सुस्थिर व्हायला मार्गदर्शन करीत. उदाहरणार्थ, संगमनेरचे हायस्कूल सोडून आलेले तेथील मुख्याध्यापक, नूतन मराठी विद्यालय सोडलेले एक मुख्याध्यापक आणि भावे स्कूल सोडायला लागलेले तेथील शिक्षकसंघटनेचे अध्यक्ष अशी कितीतरी नामवंत शिक्षकांची उदाहरणे उल्लेखनीय आहेत.

जागतिक इतिहासाची दृष्टी इतिहास विषय शिकविताना केवळ महाराष्ट्र किंवा केवळ भारत आपल्या डोळ्यांपुढे न धरता जगाच्या इतिहासाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन भारताचा इतिहास शिकवावा व आपल्या प्राचीन पूर्वजांच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन विद्यार्थ्यांना करावयास लावावे, म्हणजे त्यांच्यात एक प्रकारची व्यापक बुद्धी निर्माण होईल असे अण्णा सांगत. पुढे कित्येक वर्षांनी दुय्यम शाळेच्या अभ्यासक्रमात जगाच्या इतिहासाची पार्श्वभूमी समाविष्ट झाली.

लोकशाहीचे वातावरण गुरुवर्य अण्णांच्यामध्ये लोकशाही वृत्ती पूर्णपणे मुरलेली आहे. विद्यार्थ्यांच्यामध्ये लोकशाही वृत्ती बाणावी, म्हणून अण्णांनी महाराष्ट्र विद्यालयात काही प्रयोग केले. वर्गसभा आणि विद्यालयसभा हा ह्या प्रयोगाचा एक भाग आहे. वर्गसभांचे काम फार पद्धतशीर चाले. कोणतेही काम करायचे असले तर आपल्या सहकाऱ्यांची, सहकारी शिक्षकांची सभा बोलावतील. सर्वांना विषय समजावून सांगतील. सहकाऱ्यांची मते, प्रसंगी विरोधी मतेही मनःपूर्वक व लक्षपूर्वक ऐकून घेतील आणि साऱ्या चर्चेचा साकल्याने विचार करून मगच निर्णय घेतील. शिक्षकांना एखाद्या कामाची चौकट ते आखून देतील. मग ज्याने त्याने आपली अक्कल लढवून ते काम त्या चौकटीत पूर्ण करावे. मध्ये मध्ये मग अण्णा त्या कामात हात घालणार नाहीत. काम पूर्ण झाले म्हणजे ते काम करणाराला शाबासकी द्यायला कधीही विसरणार नाहीत.

अनेकविध भूमिका व स्वरूपे अशा प्रकारे महाराष्ट्र विद्यालयात गुरुवर्य अण्णांनी अनेक शिक्षणविषयक प्रयोग केले आणि त्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचा उपयोग इतर विद्यालयांनी करून घेतला. शाळेच्या सुरुवातीपासून चाळीस वर्षांपेक्षा अधिक वर्षे ते मुख्याध्यापक असले तरी त्यांच्यातला अध्यापक कायम राहिला आहे. ते विद्यार्थ्यांचे शिक्षक आहेत, तसे पालकही आहेत. आपल्या हाताखालच्या शिक्षकांचे ते उत्तम मागदर्शक आहेत. शिक्षकांच्या मनामध्ये शिक्षकाच्या पेशासंबधी आपुलकी आणि विश्वास कायम ठेवावयाला गुरुवर्य अण्णांचे शब्द कारणीभूत झालेले आहेत.

□ □ □

६४. मुलींना भाऊ हवा !

श्री. दा. क. चिवटे

व्यवसाय : स्टेशनमास्तर, भवानीनगर, सदर्न रेल्वे

शिक्षणकाल १९४० ते १९४४

संस्था व गुरू यांविषयी नितांत प्रेम

माझे कौतुक वर्ग-साप्ताहिक काढण्याची एकदा माझ्यावर पाळी आली. माझ्या सर्व बुद्धीचा आणि कलेचा मनःपूर्वक वापर करून, मी अत्यंत प्रामाणिकपणे परिश्रमपूर्वक ते तयार केले. ते साप्ताहिक अण्णांच्या छाननीसाठी गेले. माझी हुशार विद्यार्थ्यांत गणना कधीच नव्हती. त्यामुळे अण्णा आता काय लिहितात, याबद्दल मी मात्र चिंतातूर होतो. कौतुकाची गोष्ट अशी की माझे साप्ताहिक अण्णांना अत्यंत आवडले. गुरु. अण्णांनी त्याबद्दल माझ्या साप्ताहिकात खालील अभिप्राय लिहिला. ' आस्था आणि कळकळ यांच्या जोरावर सामान्य बुद्धीसुद्धा अलौकिक कार्य करू शकते.' ह्या त्यांच्या एकाच ओळीच्या शेऱ्यामध्ये माझे सर्व काही कौतुक होते.

कॉपीची संधी दिली आम्हास पेपर दिला गेला. वेळ पण दिली गेली. पेपर सोडविण्यास सांगून अण्णा वर्गातून निघून गेले. सहाजिकच मुलांनी ' कॉपी ' केली. गुरु. अण्णांनी हा बनाव मुद्दाम घडवून आणला, हे आम्हास नंतर कळले.

वेळ संपल्यानंतर अण्णा वर्गात आले. जे काही होणार याची कल्पना त्यांना अगोदरच असल्याने प्रथम आमची चूक आम्ही कबूल करावी, म्हणून अण्णांनी आमची मानसिक तयारी केली. त्यांच्या त्या प्रवचनाचा असा काही परिणाम झाला की, ज्यांनी ज्यांनी ' कॉपी ' केली होती, त्यांना ' नाही ' म्हणण्याचे धाडसच झाले नाही ! एक दोन विद्यार्थी सोडल्यास आम्ही सर्वजण या जाळ्यात सापडलो. एवढीच शिक्षा आम्हास भरपूर झाली. विद्यार्थ्यांना घसरण्यास वाव देऊन नंतर सावरण्याचे हे अण्णांचे तंत्र अभिनव वाटले. असे यशस्वी शैक्षणिक प्रयोग अण्णांनी विद्यार्थ्यांवर अनेक केले.

स्टेशनवरील भेटीत एका दौऱ्याचे वेळी मी अण्णांना कोरेगाव स्टेशनवर भेटलो. अगोदरच कळविल्याप्रमाणे, त्यांच्या आवडीचा स्वयंपाक डब्यात घालून मी अण्णांसाठी नेला होता. गाडीच्या पाचच मिनिटांच्या मुक्कामात माझी घरची सर्व विचारपूस अण्णांनी करून घेतली. मी माझ्या दोन मुलींना बरोबर घेऊन गेलो होतो. अण्णांनी त्यांची अगोदर चौकशी केली. त्यांच्याशी थोडा विनोद पण केला. नंतर अण्णा माझ्याकडे वळून म्हणाले, " दोन मुली आहेत. भाऊबिजेची भेट द्यायला आता त्यांना भाऊ हवा ! " माझ्या मनात काय आहे, ते त्यांनी अचूक ओळखले !

फावल्या वेळात लिहून घेतल्या, लोकसंग्रह प्रेसच्या फावल्या वेळात त्या छापून घेतल्या, आणि महाराष्ट्र विद्यालयाच्या रिकाम्या तासांना विद्यार्थ्यांना त्या वाचावयास पुरविल्या. अण्णांची स्वाध्यायमालेची कल्पना इतकी यशस्वी झाली की महाराष्ट्रातील कितीतरी शाळांनी आपल्या रिकाम्या तासांसाठी मालेचे संच ग्रंथालयात ठेवले.

अडचणीतील शिक्षकांना आसरा कोणी शिक्षक अन्य काही परिस्थितीने अडचणीत सापडल्यास अशा शिक्षकांचा उपयोग ते महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी करून घेत आणि त्या शिक्षकांनाही जीवनात सुस्थिर व्हायला मार्गदर्शन करीत. उदाहरणार्थ, संगमनेरचे हायस्कूल सोडून आलेले तेथील मुख्याध्यापक, नूतन मराठी विद्यालय सोडलेले एक मुख्याध्यापक आणि भावे स्कूल सोडायला लागलेले तेथील शिक्षकसंघटनेचे अध्यक्ष अशी कितीतरी नामवंत शिक्षकांची उदाहरणे उल्लेखनीय आहेत.

जागतिक इतिहासाची दृष्टी इतिहास विषय शिकविताना केवळ महाराष्ट्र किंवा केवळ भारत आपल्या डोळ्यांपुढे न धरता जगाच्या इतिहासाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन भारताचा इतिहास शिकवावा व आपल्या प्राचीन पूर्वजांच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन विद्यार्थ्यांना करावयास लावावे, म्हणजे त्यांच्यात एक प्रकारची व्यापक बुद्धी निर्माण होईल असे अण्णा सांगत. पुढे कित्येक वर्षांनी दुय्यम शाळेच्या अभ्यासक्रमात जगाच्या इतिहासाची पार्श्वभूमी समाविष्ट झाली.

लोकशाहीचे वातावरण गुरुवर्य अण्णांच्यामध्ये लोकशाही वृत्ती पूर्णपणे मुरलेली आहे. विद्यार्थ्यांच्यामध्ये लोकशाही वृत्ती वाणावी, म्हणून अण्णांनी महाराष्ट्र विद्यालयात काही प्रयोग केले. वर्गसभा आणि विद्यालयसभा हा ह्या प्रयोगाचा एक भाग आहे. वर्गसभांचे काम फार पद्धतशीर चाले. कोणतेही काम करायचे असले तर आपल्या सहकाऱ्यांची, सहकारी शिक्षकांची सभा बोलावतील. सर्वांना विषय समजावून सांगतील. सहकाऱ्यांची मते, प्रसंगी विरोधी मतेही मनःपूर्वक व लक्षपूर्वक ऐकून घेतील आणि साऱ्या चर्चेचा साकल्याने विचार करून मगच निर्णय घेतील. शिक्षकांना एखाद्या कामाची चौकट ते आखून देतील. मग ज्याने त्याने आपली अक्कल लढवून ते काम त्या चौकटीत पूर्ण करावे. मध्ये मध्ये मग अण्णा त्या कामात हात घालणार नाहीत. काम पूर्ण झाले म्हणजे ते काम करणाराला शाबासकी द्यायला कधीही विसरणार नाहीत.

अनेकविध भूमिका व स्वरूपे अशा प्रकारे महाराष्ट्र विद्यालयात गुरुवर्य अण्णांनी अनेक शिक्षणविषयक प्रयोग केले आणि त्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचा उपयोग इतर विद्यालयांनी करून घेतला. शाळेच्या सुरुवातीपासून चाळीस वर्षांपेक्षा अधिक वर्षे ते मुख्याध्यापक असले तरी त्यांच्यातला अध्यापक कायम राहिला आहे. ते विद्यार्थ्यांचे शिक्षक आहेत, तसे पालकही आहेत. आपल्या हाताखालच्या शिक्षकांचे ते उत्तम मागदर्शक आहेत. शिक्षकांच्या मनामध्ये शिक्षकाच्या पेशासंबधी आपुलकी आणि विश्वास कायम ठेवावयाला गुरुवर्य अण्णांचे शब्द कारणीभूत झालेले आहेत.

□ □ □

६४. मुलींना भाऊ हवा !

श्री. दा. क. चिवटे

व्यवसाय : स्टेशनमास्तर, भवानीनगर, सदर्न रेल्वे

शिक्षणकाल १९४० ते १९४४

संस्था व गुरू यांविषयी नितांत प्रेम

माझे कौतुक वर्ग-साप्ताहिक काढण्याची एकदा माझ्यावर पाळी आली. माझ्या सर्व बुद्धीचा आणि कलेचा मनःपूर्वक वापर करून, मी अत्यंत प्रामाणिकपणे परिश्रमपूर्वक ते तयार केले. ते साप्ताहिक अण्णांच्या छाननीसाठी गेले. माझी हुशार विद्यार्थ्यांत गणना कधीच नव्हती. त्यामुळे अण्णा आता काय लिहितात, याबद्दल मी मात्र चिंतातूर होतो. कौतुकाची गोष्ट अशी की माझे साप्ताहिक अण्णांना अत्यंत आवडले. गुरु. अण्णांनी त्याबद्दल माझ्या साप्ताहिकात खालील अभिप्राय लिहिला. 'आस्था आणि कळकळ यांच्या जोरावर सामान्य बुद्धीसुद्धा अलौकिक कार्य करू शकते.' ह्या त्यांच्या एकाच ओळीच्या शेऱ्यामध्ये माझे सर्व काही कौतुक होते.

कॉपीची संधी दिली आम्हास पेपर दिला गेला. वेळ पण दिली गेली. पेपर सोडविण्यास सांगून अण्णा वर्गातून निघून गेले. सहाजिकच मुलांनी 'कॉपी' केली. गुरु. अण्णांनी हा बनाव मुद्दाम घडवून आणला, हे आम्हास नंतर कळले.

वेळ संपल्यानंतर अण्णा वर्गात आले. जे काही होणार याची कल्पना त्यांना अगोदरच असल्याने प्रथम आमची चूक आम्ही कबूल करावी, म्हणून अण्णांनी आमची मानसिक तयारी केली. त्यांच्या त्या प्रवचनाचा असा काही परिणाम झाला की, ज्यांनी ज्यांनी 'कॉपी' केली होती, त्यांना 'नाही' म्हणण्याचे धाडसच झाले नाही ! एक दोन विद्यार्थी सोडल्यास आम्ही सर्वजण या जाळ्यात सापडलो. एवढीच शिक्षा आम्हास भरपूर झाली. विद्यार्थ्यांना घसरण्यास वाव देऊन नंतर सावरण्याचे हे अण्णांचे तंत्र अभिनव वाटले. असे यशस्वी शैक्षणिक प्रयोग अण्णांनी विद्यार्थ्यांवर अनेक केले.

स्टेशनवरील भेटीत एका दौऱ्याचे वेळी मी अण्णांना कोरेगाव स्टेशनवर भेटलो. अगोदरच कळविल्याप्रमाणे, त्यांच्या आवडीचा स्वयंपाक डब्यात घालून मी अण्णांसाठी नेला होता. गाडीच्या पाचच मिनिटांच्या मुक्कामात माझी घरची सर्व विचारपूस अण्णांनी करून घेतली. मी माझ्या दोन मुलींना बरोबर घेऊन गेलो होतो. अण्णांनी त्यांची अगोदर चौकशी केली. त्यांच्याशी थोडा विनोद पण केला. नंतर अण्णा माझ्याकडे वळून म्हणाले, "दोन मुली आहेत. भाऊबिजेची भेट द्यायला आता त्यांना भाऊ हवा !" माझ्या मनात काय आहे, ते त्यांनी अचूक ओळखले !

६५. एकलव्याचे अनुकरण

श्री. म. ना. वैद्य डी. एम्. इ.

व्यवसाय : शास्त्रीय उपकरणांचा स्वतःचा कारखाना

शिक्षणकाल १९४० ते १९४५

स्वप्रयत्नाने उदयास आलेले लघु-उद्योग कारखानदार

निकटचे संबंध गुरुवर्य अण्णांचे व माझे संबंध अनेक तऱ्हेने आले. विद्यार्थी-दशेत विद्यार्थी-शिक्षक या संबंधापासून सुरुवात होऊन पुढे वेगवेगळ्या बेमालूम हृद्य छटा त्यात मिसळत गेल्या प्रेमळ पित्याचे निरपेक्ष प्रेम, जिवलग मित्राचे निःस्वार्थी मार्गदर्शन, कौटुंबिक स्नेह्याची अनौपचारीक जवळीक, शिक्षण-शास्त्रज्ञाचे व्यावहारीक मार्गदर्शन अशा अनेकविध तऱ्हांनी हे संबंध दृढ होत गेले.

घरच्या संस्कारांना पूरक ज्यांना घरचा कोणताही आधार, मार्गदर्शन किंवा संस्कार नाहीत असे विद्यार्थीसुद्धा गुरु. अण्णांच्या सुयोग्य मार्गदर्शनाने उत्तम शिक्षण घेऊन आयुष्यात पुढे आले व मोठेपणाला पोहोचले. गुरु. अण्णांच्या शैक्षणिक मार्गदर्शना-मुळे व सुसंस्कारांमुळे केवळ ते त्या पदास पोहोचले, ही भावना त्यांना असावी यात नवल नाही. परंतु घरचे मार्गदर्शन व सुसंस्कार असूनही गुरु. अण्णांच्या मार्गदर्शन व सुसंस्काराच्या अभावी काही अपूर्णताच राहिली असती असे उत्कटतेने वाटणारे माझ्या सारखे अनेकजण असतील, यातच गुरु. अण्णांच्या योग्यतेची साक्ष पटते.

शिक्षा-स्वातंत्र्य एकदा आम्हास शास्त्र शिकवणारे शिक्षक एक दिवस शाळेत येणार नव्हते. ते येणार नसल्याचे मला योगायोगाने समजलेले होते, परंतु तसा निरोप शाळेत सांगण्याचे त्यांनी मला सांगितले नव्हते व माझ्याही लक्षात आले नाही. मी हा निरोप कार्यालयात वेळेवर न सांगितल्याने संपूर्ण वर्गाचा एक तास वाया गेला व शाळेच्या शिस्तीवरही प्रतिकूल परिणाम झाला, याबद्दल अण्णांनी मला दोषी ठरविले व मी चूक कबूल केली. तेव्हा माझी मीच शिक्षा ठरवून घ्यावी असे त्यांनी सांगितले. सर्व तास संपल्यावर घरी जेवणास जाण्यापूर्वी श्रीराममंदिरात एक तास बसून गीतेचे पारायण करण्याची शिक्षा मी मागून घेतली व ती त्यांनीही मान्य केली. आपल्या चुकीमुळे इतर जनांचे नुकसान होऊ नये, ही जबाबदारीची मोठीच जाणीव त्यांनी या प्रसंगाने मला करून दिली.

एकलव्याचे अनुकरण व्यवहारातील प्रत्येक अडीअडचणीला दुसऱ्याचा सल्ला मागावयास जाणे शक्य नसते. स्वतःच्या कुवतीप्रमाणेच विचारपूर्वक प्रत्येकजण मार्ग काढतो. पण चांगले विचार पूर्वसंस्कारांशिवाय कोठून येतील ? अशा प्रसंगी निर्णय ठरविण्याचा मी एकलव्याप्रमाणे अभिनव मार्ग काढत असतो. तो म्हणजे आपण

आपंला प्रश्न सर्व तन्हेने द्रोणाचार्यांना समजावून सांगितल्यानंतर ते त्याचा साकल्याने विचार करून आपणांस मार्गदर्शन करीत आंहेत असे चित्र डोळ्यासमोर आणतो. अशा विचारसरणीतून मिळणारा निर्णय हा गुरु. अण्णांच्या आपल्यावर झालेल्या संस्कार-शिक्षणाचेच फळ आहे, म्हणजे त्यांनीच तो निर्णय केला आहे, मार्गदर्शन केले आहे व ते अचूक असणारच अशा दृढ विश्वासाने त्याचे अनुसरण करतो. मला सार्थ अभिमान वाटतो की माझ्या या श्रद्धेस धक्का बसेल असा एकही निर्णय मी अद्याप घेतलेला नाही. अर्थात ही सर्व पुण्याई त्यांच्या संस्कार–शिक्षणाचीच नव्हे काय ?

गुरुपौर्णिमेचा प्रसंग गेले ८–१० वर्षे मी नियमाने श्रीगुरुपौर्णिमेचे रात्री गुरु. अण्णांच्या घरी त्यांचे चरणी श्रीफल व रु. ११ अर्पण करण्यास जातो. त्या-निमित्ताने माझी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मी घेत असतो. श्रीफलाची भेट ते प्रेमभराने ठेवून घेतात व गुरुदक्षिणा रु. ११ ची दुसऱ्या दिवशी सकाळी बिनचूक घरपोच पावती अनाथ विद्यार्थी गृहातून येते ! यात एकदाही खंड पडलेला नाही. निष्ठा व निःस्वार्थीपणाचे याहून आदरणीय कोणते उदाहरण पाहिजे !

▱ ▱ ▱

६६. आध्यात्मिक साधनेचा पाया

श्री. वा. म. चितळे, बी. इ. (सिव्हिल)

व्यवसाय : सुपरिन्टेंडिंग एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर, मध्यप्रदेश

शिक्षणकाल १९४० ते १९४४

सात्त्विक वृत्तीचे बुद्धिमान माजी विद्यार्थी

माझे इंग्रजी चौथी ते मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र विद्यालयात झाले. गुरु. अण्णांच्या विचार-छत्राखाली मी १९४१ ते १९४४ या चार वर्षांत होतो. विद्या शब्दाचा अर्थ " सा विद्या या विमुक्तये " असा आहे. मुक्ती म्हणजे सुटका. विमुक्ती म्हणजे बंधनातून कायमची सुटका. खरी विद्या म्हणजे केवळ पोटापाण्याची विद्या नव्हे. खरी विद्या ती आहे, जी बंधनातून कायमची सुटका करून देते. महाराष्ट्र विद्या-लयात पोटापाण्याच्या विद्येबरोबरच क्षुद्रतेच्या बंधनापासून मुक्ती मिळण्याचे शिक्षण शनिवारच्या सभेतून गुरु. अण्णांनी दिले. आध्यात्मिक साधनेची सुरुवात गुरुकुलातच व्हावयास हवी. या आध्यात्मिक साधनेकरिता मानसिक भूमी माझ्या शालेय शिक्षणात गुरु. अण्णांनी तयार केली. शनिवारच्या सभेतील चांगले विचार मी एका वहीत लिहून ठेवत असे आणि घरी गेल्यावर सर्वांना सांगत असे.

▱ ▱ ▱

६७. १९४२ मधील आम्ही विद्यार्थी

डॉ. बा. रा. जोशी, डी. ए. एस्. एफ्.
व्यवसाय : स्वतःचे जोशी हॉस्पिटल, इस्लामपूर
शिक्षणकाल १९४० ते १९४५
कर्तबगार डॉक्टर आणि समाजसेवक

१९४१ साली आमची तुकडी नाशिकहून पुण्यास आली. पुणे आश्रमातील वातावरण नाशिकपेक्षा थोडे गंभीर होते. गुरु. अण्णा अमेरिका, जपान, रशिया आदी देशांत फिरून आल्याने व त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांवरून व वागण्यावरून गुरु. अण्णा आम्हास पुरोगामी वृत्तीचे वाटत होते.

शाळेवर पिकेटिंग १९४२ ऑगस्टमध्ये 'छोडो हिंदुस्थान'ची चळवळ झाली. सर्व पुढाऱ्यांची धरपकड झाली व चळवळीचा आगडोंब सर्व देशभर पसरला. पुण्यातही सभा, मिरवणुका, हरताळ, गोळीबार चालू होता. स. प. कॉलेजसमोरील, काँग्रेस हाऊससमोरील, अप्पाबळवंत चौकातील गोळीबार, मला प्रत्यक्ष पहावयास मिळाले. त्यावेळचे सर्व वातावरण चेतना देणारे होते. आमच्या हायस्कूलमध्येही चळवळीच्या दृष्टीने एक मोठा गट निर्माण झाला. १९४२ सप्टेंबरच्या पहिल्या आठवडचात हायस्कूलची तिमाही परीक्षा होती. आम्ही सर्वांनी ती परीक्षा होऊ द्यावयाची नाही असे ठरविले. ज्या दिवशी परीक्षा सुरू त्या दिवशी सकाळी प्रार्थनेसाठी सर्व शाळा एकत्र जमली. प्रार्थना झाली व ठरल्याप्रमाणे मी सर्वांना सांगितले की, "आपण आपली राष्ट्रीय शाळा म्हणवितो; देशात चाललेल्या चळवळीच्या आगीत आपण परीक्षेस बसू शकत नाही. जरूर लागल्यास पिकेटिंग करून परीक्षा बंद करू." ही बातमी हा हा म्हणता गुरु. अण्णांच्या कानावर गेली. गुरु. अण्णा घरातून तसेच सभेच्या ठिकाणी आले. त्यावेळी मी बोलत होतो. माझे बोलणे झाल्यावर गुरु. अण्णा पुढे आले. त्यावेळी अण्णा रागाने लाल झाले होते–आम्ही सुद्धा त्यांच्याकडे पाहून जरा घाबरलोच होतो. –परंतु अण्णा बोलू लागले "ही शाळा माझी राष्ट्रीय शाळा म्हणून जोपासली आहे. माझ्या शाळेवर पिकेटिंग चालले आहे हे ऐकून मला फार वाईट वाटले. तुम्ही जर मला येऊन भेटला असता तर मी परीक्षाच बंद ठेविली असती. तुम्ही सर्वांनी राष्ट्रनिष्ठा दाखवून हा कार्यक्रम केलात, याबद्दल मला अभिमान वाटतो. परंतु मला न कळविता हा प्रकार झाला याबद्दल वाईट वाटते. मी असे जाहीर करतो की, तिमाही परीक्षा बंद ठेवली आहे. देश स्वतंत्र करण्याच्या या लढचात इंग्रजी ५ ते ७ (९ वी ते ११ वी) विद्यार्थ्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे भाग घ्यावा. तुम्ही पुन्हा केव्हाही परत या. माझ्या शाळेची दारे तुम्हांस खुली आहेत." असे हे गुरु. अण्णांचे जळजळीत व तेजस्वी उद्‌गार ऐकून आम्ही तर बेभान झालो.

भूमिगत चळवळीनंतर दुसरे दिवशी सर्व शाळा सोडून ४२ च्या चळवळीत सर्वार्पण करण्यासाठी कोणकोण तयार आहेत त्याची यादी केली. आम्ही २२ मुले तयार झालो. यांपैकी आम्ही काही ग्रामस्थ होतो व काही आश्रमस्थ होतो. सर्वच निराधार होणार होतो. एकदा आश्रम सोडल्यावर परत विद्यालयात प्रवेश मिळेल परंतु आश्रमात प्रवेश मिळणार नव्हता. पुढच्या परिणामाची तमा न बाळगता आम्ही २२ जणांनी चळवळीत पडण्याचे ठरविले. आमच्यापैकी बरेच लोक पकडले गेले. त्यांना शिक्षा झाल्या. काही लोक भूमिगत चळवळीत गुंतले होते. चळवळीचा जोर ओसरल्यानंतर जानेवारी, फेब्रुवारीत परत आम्ही सर्वजण पुण्यात जमलो. त्यावेळी आम्ही सर्वजण निराधार झालो होतो. गुरु. अण्णांनी शब्द दिल्याप्रमाणे आम्हाला शाळेमध्ये लगेच प्रवेश दिला.

गुरु. अण्णांनी वरचेवर विचारपूस करून जी सहानुभूती दाखविली, विद्यालयाच्या बाबतीत ज्या ज्या सवलती देण्याजोग्या होत्या त्या सर्व सवलती दिल्या. त्याबद्दल गुरु. अण्णांच्याबद्दल सर्व मित्रांना आदरयुक्त प्रेम व बंधुभाव वाटतो ! गुरु. अण्णा म्हणजे थोरल्या भावासारखे वाटतात.

फरासखान्याचे दर्शन धुळे खजिना लुटीबद्दल झडतीत पोलीसांना माझ्या खोलीचा पत्ता मिळाला. लगेच पहाटे माझ्या खोलीवर पोलिसांची धाड आली व सर्व खोलीची झडती घेऊन एक दिवस आम्हाला फरासखान्यात ठेवले, परंतु पुन्हा आम्हाला सोडून दिले. त्यावेळी अण्णांनी मला खूप सहानुभूती दाखवून धीर दिला. दुसऱ्या एखाद्या हायस्कूलमध्ये मी असतो तर मला केव्हाच रस्टिकेट केले असते. परंतु त्यावेळी अण्णांनी मला एक प्रकारचा सरकारी रोषाचा धोका पत्करून प्रोत्साहन दिले.

वर्गाच्या मताला मान मी सातवीच्या (मॅट्रिकच्या) पूर्व परीक्षेत दोन विषयांत २–३ मार्कांनी नापास झालो होतो. त्यामुळे मला मॅट्रिकचा फॉर्म मिळत नव्हता. मी अण्णांना सांगितले की, मला फॉर्म द्या. मी अभ्यास एकाग्र चित्ताने झटून करीन. परंतु अण्णांना ते पटले नाही. ते वर्गात आले व वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना विचारले की, बा. रा. जोशी हा दोन विषयांत नापास आहे. त्यास फॉर्म द्यावा असे वर्गाला वाटते का ? वर्ग त्याच्या अभ्यासाची जबाबदारी घेणार आहे का ? तेव्हा सर्व वर्गाने एकमुखाने सांगितले की मला फॉर्म द्यावा. माझ्याकडून अभ्यास करून घ्यावयाची जबाबदारी सर्व वर्गाने घेतली; आणि हा लोकशाहीचा कौल अण्णांनी मान्य करून मला फॉर्म दिला.

पंचा नेसून परीक्षेला गेला मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी माझा एक मित्र स. रा. कुलकर्णी म्हणून होता. त्याचा संस्कृत विषय चांगला होता. तो शंकरशेट स्कॉलरशिपसाठी प्रयत्न करीत होता. ज्या दिवशी संस्कृतचा पेपर होता त्या दिवशी त्याने उघडा होऊन, गुडघ्यापर्यंत अर्धा पंचा नेसून भस्म वगैरे लावून पेपरला जावे, असे आम्ही त्याला हुलीवर घातले व तो गेला तर ५ रु. ची पैज लावली. ठरल्याप्रमाणे स. रा. कुलकर्णी आंघोळ करून गुडघ्यापर्यंत अर्धा पंचा नेसून उघडा, भस्म लावून संस्कृत पेपरला स. प.

कॉलेजमध्ये गेला. स्वस्थ मनाने पेपर लिहून तो परत यावयास निघाला, तो त्याच्या भोवती मुलामुलींची उत्सुकतेने खूप गर्दी जमलेली. आम्ही पैज हरलो. ही गोष्ट जेव्हा अण्णांना कळली तेव्हा त्यांनी स. रा. कुलकर्णीच्या धैर्याचे कौतुक करून त्याची पाठ थोपटली.

वरील सर्व अनुभव हे माझ्या शालेय जीवनातील झाले. पुढे शालेय जीवन आणि महाविद्यालयीन शिक्षण संपवून मी माझ्या व्यवसायाला लागलो.

विवाहाविषयी सल्ला मी माझ्या व्यवसायाला लागल्यानंतर माझ्यापुढे विवाह-समस्या उभी राहिली. माझ्या आईवडिलांचा माझ्या ठरलेल्या विवाहास धार्मिक तत्त्वावर विरोध होता. मला काही मार्ग सुचेना. त्याचवेळी गुरु. अण्णा सातारला आले होते. मी सातारला गेलो व अण्णांना माझे मनोगत सांगितले व अडचणही सांगितली. अण्णा काय सल्ला देतील तो शिरसावंद्य मानावयाचा मी ठरविले. अण्णांनी सांगितले की, "हल्लीच्या काळात असे लग्न करावयास काहीच हरकत नाही. आणखी १०–१५ वर्षांत ह्या सर्व रूढी मोडून जातील. त्यामुळे पश्चातापाची पाळी मुळीच येणार नाही. फक्त पालकांचा विरोध मतपरिवर्तन करून घालवावा!"

गुरु. अण्णांचा सल्ला योग्य होता, हे मी आता १४ वर्षे संसार झाल्यानंतर सांगू शकतो. माझा संसार कसा चालला आहे, माझा व माझ्या पत्नीचा व्यवसाय कसा चालला आहे, सध्या सार्वजनिक कामे कोणकोणती चालली आहेत, वगैरे विचारपूस अण्णा नेहमी करीत असतात. मी ज्यावेळी वास्तू बांधणेस घातली तेव्हा अण्णांना खरा आनंद झाला. माझी वास्तू पूर्ण होऊन मी जेव्हा त्यांना वास्तुशांतीचे निमंत्रण पाठविले त्यावेळी त्यांचे आशीर्वादात्मक पत्र आले व "लौकरच तुझी वास्तू पाहाण्यास येत आहे" असे कळविले. आणि खरोखरच आठ दिवसाच्या आत अण्णांनी मजकडे येऊन वास्तू पाहून समाधान व्यक्त केले.

माझी ही घडण माझी जी काय घडण-जडण झाली आहे, त्यात बराचसा मोठा वाटा गुरु. अण्णांच्या शिक्षणाचा, संस्कारांचा, प्रोत्साहनाचा, सांभाळून घेण्याच्या वृत्तीचा, विद्यार्थ्याला आपला धाकटा भाऊ मानून केलेल्या कर्तव्यकर्माचा आहे, हे मला नाकबूल करून चालणार नाही व हे ऋण फेडण्याच्या आवाक्याबाहेरचे आहे. अशाप्रकारे गुरु. अण्णांचे शिस्त-शील–संस्कार माझ्या जीवनावर झाले आहेत.

□ □ □

६८. एकच साष्टांग नमस्कार

श्री. मा. पां. फणसे

व्यवसाय : कॅशियर, सिनिअर क्लार्क पोस्ट व तारखाते, मुंबई

शिक्षणकाल १९४० ते १९४४

मुंबईतील माजी विद्यार्थीसंघटनाकार्यकर्ते

मार्कांत खाडाखोड आणि नमस्कार जुलै, १९४३ साली मी आमच्या ज्ञाती-संस्थेकडे आर्थिक मदतीसाठी अर्ज केला होता. अर्जात वार्षिक गुण मी माझ्या मनाप्रमाणे प्रत्येक विषयात शेकडा ८०, ८५, ९० असे भरले. गुरु. अण्णांनी जेव्हा हे गुण वार्षिक परीक्षेत मिळालेल्या गुणांशी पडताळून पाहिले तेव्हा ते खऱ्या गुणांच्या दीडपट भरले. त्यावेळी मात्र गुरु. अण्णा संतापाने लाल झाले होते. त्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या एक एक शब्दावरोबर माझ्या अंगाचा थरकाप वाढत होता. माझे हातपाय गळाले व धीर खचला. गुरु. अण्णा म्हणाले, "तुला अर्जात हे खोटे गुण भरण्याचे कारण काय? तुला काहीच लाज कशी वाटली नाही? तू माझ्या हाताखाली रात्रंदिवस चांगले शिक्षण घेतोस. असल्या खोट्या गोष्टी करून तू तुझी व माझी प्रतिष्ठा समाजात कमी करीत आहेस. तुला मी अतिशय कठोर शिक्षा देणार आहे. त्यामुळे इतरही विद्यार्थ्यांना बोध मिळेल." मी मनात विचार करीत होतो की कोणत्या दिव्य प्रसंगाला मला तोंड द्यावे लागणार आहे? वेताची छडी, श्रीमुखात किंवा दुसरी एखादी कठोर शारीरिक शिक्षा. परंतु गुरु. अण्णांनी प्रसंगावधान राखून व रागावर ताबा ठेवून मला एक साष्टांग नमस्कार घालावयास व यापुढे "मी खोटे कृत्य करणार नाही," अशी प्रतिज्ञा कर म्हणून सांगितले. ह्या साष्टांग नमस्काराचा खरोखर माझ्या आठही अंगांवर चांगला परिणाम झाला. आश्रमात असताना मी हजारो साष्टांग नमस्कार घातले आहेत. परंतु गुरु. अण्णांना ह्या प्रसंगी घातलेल्या साष्टांग नमस्काराचा माझ्या विद्यार्थीजीवनावर व भावी आयुष्यावर खरोखर चांगला परिणाम झाला.

घोंगडीच्या भेटीचे जतन १९४२ च्या नोव्हेंबर महिन्यात मी गुरु. अण्णांना माझ्या घरी विणलेली एक लोकरीची घोंगडी व एक खुर्चीवर ठेवण्याची बैठक दिली होती. त्यानंतर १९५२ साली म्हणजे आश्रम सोडल्यावर आठ वर्षांनी मी आश्रमात गेलो व गुरु. अण्णांना भेटलो, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे गुरु. अण्णांनी ती फाटलेली बैठक मला खुर्चीच्या खालून काढून दाखविली. फाटक्या लोकरीच्या बैठकीची किंमत ती काय? परंतु त्यातूनही गुरु. अण्णांचे माझ्यावरचे प्रेम दिसत होते. त्यांनी माझ्या-बद्दल वाटणारे प्रेम व आपुलकी जपून ठेवली होती. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता.

शिक्षण चालू ठेव मी माझ्या खाजगी कारणासाठी आश्रम इ. ६ वीतून सोडला. त्यावेळी गुरु. अण्णा म्हणाले, "आश्रम इतक्या लवकर का सोडतोस ? मॅट्रिकपर्यंत राहावयास पाहिजे होते. संस्थेच्या मदतीचा उपयोग आणखी का करून घेतला नाहीस ?" इतक्या कळकळीने व तळमळीने शिक्षणाचे महत्त्व सांगणारे गुरु. अण्णा माझ्या आयुष्यातील पहिले व शेवटचे गुरुवर्य होत.

आज येणारे संबंध त्यानंतर मी मुंबईस स्थायिक झालो. गुरु. अण्णांना भेटण्याचा योग मला खूप वेळेस आला. परंतु माझा भेटण्याचा उद्देश ठरलेला आहे. त्यांचे वैचारिक मौल्यवान चार शब्द, आश्रमीय समाचार व शैक्षणिक विचार ऐकणे, त्यांचा हसरा व प्रसन्न चेहरा पाहून मनाचा थकवा नाहीसा करणे व जे कशानेही मिळणार नाही ते मानसिक समाधान त्यांच्या भेटीने मिळविणे.

आईवडिलांहूनही प्रेमळ गुरु. अण्णांच्या ठिकाणी लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, जास्त शिकलेला, कमी शिकलेला असा भेदभाव नाही. लहान मुलांबरोबर ते कॅरमबोर्ड खेळतील तर मोठ्या माणसाबरोबर ते शैक्षणिक व आश्रमीय गोष्टींची चर्चा करतील. माझ्या आई वडिलांच्या नंतर जर कोणी वंदनीय व पूजनीय व्यक्ती असेल तर ती गुरु. अण्णा हे होत. गुरु. अण्णांचे प्रेम व ऋण हे काही बाबतीत आईवडिलांच्याहून अधिक आहे.

६९. उपाशी राहू नका

डॉ. ग. ज. कुलकर्णी, डी. ए. एस्. एफ्.
व्यवसाय : स्वतंत्र दवाखाना, सोलापूर
शिक्षणकाल १९४० ते १९४५
जन्मजात सेवा–शुश्रूषा वृत्तीचे एक डॉक्टर

कर्तबगारीची तालीम 'निसर्गोपचार, व्याख्यानमाला' या नावाने एक चांगला उपक्रम अण्णांनी योजला होता. महिन्यातून निदान एक-दोन व्याख्याने या विषयावर होत. उरुळी कांचनच्या निसर्गोपचार आश्रमातील एका तज्ज्ञाचे आणि कै. वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांचे अशी दोन व्याख्याने मला चांगली आठवतात. या मालेतून समाजशिक्षण हाच हेतू होता. वर्तमानपत्रातून जाहिरात देणे, सभेची व्यवस्था ठेवणे, मुख्य वक्त्यांना आणणे, पोचविणे इ. गोष्टी विद्यार्थ्यांनी जबाबदारीने कराव्यात आणि यांतूनच कर्तबगारी विकास पावावी हा अण्णांचा हेतू होता. संस्थेचा विद्यार्थी मोठी जबाबदारीही पेलू शकेल अशी अण्णांची खात्री होती.

इंग्रजीचे शिक्षण व सामान्यज्ञान कॉलेजमधील विद्यार्थ्यांना घरी बोलावून त्यांचेकडून टाइम्स ऑफ इंडियाचा अग्रलेख अण्णा वाचून घेत. त्यामुळे इंग्रजीचे ज्ञान वाढावे हा मुख्य हेतू आणि सामाजिक, राजकीय घडामोडींचे ज्ञान असणे कसे आवश्यक आहे हे विद्यार्थ्याला कळावे हा दुसरा हेतू या उपक्रमात होता. आजकाल वाचकांना काय वाचावे हेही कळत नाही. अण्णांच्या या शिकवणीचा परिणाम म्हणजे, मला सध्या जी वर्तमानपत्रे मिळतात त्यातील अग्रलेख वाचल्याशिवाय मनाचे समाधानच होत नाही.

आईची माया सौ. ताई या देखील इतक्या प्रेमळपणाने वागत की, आईची आठवण व्हावी. आजारी विद्यार्थ्यांची चौकशी करीत, स्वयंपाकघरात चक्कर टाकून काय काय चालले आहे याची देखरेख करीत. त्यामुळे काम करणाऱ्यावर दरारा तर राहीच, पण काही कमी पडल्यास "घरून घेऊन जा, उपाशी राहू नका" असे सांगत.

▱ ▱ ▱

७०. त्या वेळचे प्रयोग

श्री. यशवंत ना. पेंडसे, बी. एस्सी. (ॲग्री.)
व्यवसाय : बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर व व्यापारी
शिक्षणकाल १९४० ते १९४५
सौजन्यपूर्ण वागण्याने व्यवसायात यशस्वी

व्यायामास महत्त्व आपल्या शाळेत व्यायामाला जे अनन्य साधारण महत्त्व दिले त्यामुळे खरोखरच फार चांगला फायदा झाला. जाता जाता एका गोष्टीचा मात्र उल्लेख करावासा वाटतो. आपल्या शाळेत फक्त भारतीय खेळच शिकविण्यात आले. त्यामुळे पुढे कॉलेज जीवनात पाश्चात्य खेळांमध्ये अनभिज्ञ पडल्याने आपण मागे असल्याचा न्यूनगंड निर्माण होतो. इतर बरोबरीचे विद्यार्थी त्यांच्या बालपणापासूनच ते खेळ खेळत असल्याने ते सहजतेने त्यात भाग घेऊ शकतात. आपल्या सारख्यांना मात्र जरा कुचंबल्यासारखे होते.

लक्षात राहिलेले उपक्रम अण्णा आठवड्यातून एक तास आमच्या वर्गावर शिकविण्यासाठी येत असत. Rapid Readingचा तास असे जरी त्याचे नाव असले तरी तो घेण्याचा त्यांचा उद्देश शाळेतील प्रत्येक मुलाचे जवळून निरीक्षण करण्याचे साधन असा होता. मुख्य विषयासोबतच अण्णा जो इतर अनेक गोष्टींचा व त्यांच्या अनुभवांचा विनिमय करीत, त्यामुळे सर्वसामान्य ज्ञानात चांगली भर पडत असे. वीरासन घालून बसणे, अभ्यासास सुरुवात करण्यापूर्वी २–३ मिनिटे डोळे मिटून मन एकाग्र करणे व मग मुख्य अभ्यासास सुरुवात करणे, इत्यादी पद्धती निश्चितच उल्लेखनीय वाटतात.

एकदा मासिक परीक्षेत वर्गातील काही विद्यार्थ्यांनी कॉपी केली होती. त्या वेळी सर्वांनी डोळे मिटून कागदाच्या छोट्या तुकड्यावर आपणास ठाऊक असलेल्या कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांची फक्त नावे लिहिण्यास सांगून अण्णांनी ते कागद एकत्र गोळा केले व तलास काढला. ही अभिनवपद्धती परिणामकारकच ठरली.

□ □ □

७१. फेरी मारण्याचा कंटाळा नाही !

श्री. ल. श्री. पिसोळकर
व्यवसाय : स्टोअर कीपर सरकारी नोकरी
शिक्षणकाल १९४१ ते १९४४
कृतज्ञतावृत्तीचे माजी विद्यार्थी

फेरी फेरी फेरी दुपारी स्वच्छतेचा तास संपल्यानंतर नियमितपणे सर्व वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थी अभ्यास करतात की नाही, स्वच्छता कशी केली, या गोष्टींची देखरेख कंटाळा न करता गुरु. अण्णा स्वतः करीत, तसेच त्यांची रोज सकाळी सर्व हॉलस्मधून एक फेरी असावयाची. त्यावेळी विद्यालय सुरू असावयाचे. शाळेत जाण्यास कोणी चुकारपणा केला काय, हाही मुलांच्या हिताच्या दृष्टीने सर्व मंदिरांतून फेरी करण्याचा त्यांचा हेतू असावा. नंतर सर्व वर्गावर शिक्षक येऊन क्लासेस सुरू केले की नाही; यासाठी विद्यालयाकडे एक फेरी, नंतर मुले भाकरी कशी करतात, कशी भाजतात; यासाठी भोजनगृहात फेरी. तेव्हा आम्हा मुलांच्या मनात त्यावेळी विचार यावयाचा की, "अण्णांना फेरी मारण्याचा कंटाळा कसा नाही ?"

मी गाढव आहे विद्यालयातील खालच्या वर्गातील एका व्रात्य विद्यार्थ्याने दुसऱ्या मुलाच्या पाठीमागील भागावर 'हा गाढव आहे' असे वाक्य लिहिले होते. त्याला "मी गाढव आहे" हे अक्षर एका छोट्याशा कागदावर छान अक्षरात लिहून आणावयास सांगून ती चिटोरी पुठ्ठ्यावर चिकटविण्यास सांगितली. ती छोटीशी पाटीच तयार केली. नंतर त्यास कडक पुठ्ठ्याची उभी पट्टी बसविण्यास सांगितले. अण्णा असे का सांगतात हे त्याला कळेना ? परंतु त्याने सांगितल्याप्रमाणे कृती केली. अण्णांनी पाटीची उभी पट्टी टोपीच्या खोपणीत घालून त्यास राममंदिरात जाऊन डोळे मिटून वीरासन घालून एक तास बसावयास सांगितले. राममंदिरात येणारे-जाणारे "मी गाढव आहे" ही त्याच्या डोक्यावरील पाटी वाचून हसावयाचे. त्याची खोड मोडण्यासाठी त्यास मार न देता शिक्षा देण्याची ही अजब तऱ्हा म्हणून मुलांना नवल वाटावयाचे. तेव्हापासून त्या मुलाने आपला व्रात्यपणा सोडला.

□ □ □

७२. आळशाला माफी मिळाली

श्री. ल. म. कर्वे

व्यवसाय : शेती व किराणा-दुकान

शिक्षणकाल १९४१ ते १९४४

स्वतंत्र व्यवसाय व ग्रामसेवा यांची आवड

आळशाला माफी, असत्याला शासन विद्यालय सुरू होऊन १–२ महिने झाले होते. इंग्रजीचा गृहपाठ करून न आणल्याने विद्यालय सुटल्यानंतर सकाळी १०।। वाजता आपली गाठ घेण्यास वर्गशिक्षकांनी सांगितले. माझ्याबरोबर इतर ३–४ जण होते. भीत-भीतच आपल्या कार्यालयात शिरलो. इतर मुलांनी न पटणाऱ्या सबबी सांगितल्या व त्यामुळे आपणास राग येऊन आपण त्यांना छड्या मारल्या. माझ्यावर वेळ आली. मी तर मनातून खूपच घाबरलो होतो व आपला मार नक्कीच चुकणार नाही असे वाटले. "गृहपाठ का केला नाही ?" असे आपण विचारले. मी केवळ आळसामुळे गृहपाठाकडे दुर्लक्ष केले असे खरे तेच सांगितले व छडीसाठी हात पुढे केला. पण काय चमत्कार ! छडी तर बसली नाहीच, पण आपण प्रेमळपणे हात पाठीवर फिरवून राहिलेला गृहपाठ राममंदिरात बसून पुरा करावयास सांगितला. "चूक झाली तरी ती प्रांजलपणे कबूल करणे यातच मनःशुद्धी आहे" असे सांगितलेत, व आपणास असत्याची किती चीड आहे हे पटवून दिलेत.

आपल्या शिकवणुकीची पताका आपल्या शिक्षणाबद्दलच्या कळकळीच्या, तळमळीच्या व स्वार्थत्यागाच्या शिकवणुकीने मी १९४६ साली जेव्हा खेडचात प्रवेश केला तेव्हा ठाम ठरवले की, आपणाकडून जे शिकलो ते अज्ञानी शेतकऱ्यांना थोडेफार तरी शिकवावे. आमचे गावात शाळा अज़िबात नव्हती. तेव्हा प्रथम सर्व व्यवसाय सांभाळून रात्रीची शाळा सुरू केली. आज सदर शाळा बोर्डाची झाली असून १५० पर्यंत मुले शिकतात. शाळेसाठी नवीन इमारत पण पूर्ण होत आली आहे. आज ह्या ज्ञानमंदिराच्या कळसाकडे जरी सर्वजण बघत असले तरी आपल्या शिकवणुकीचे माझ्यासारखे फत्तर पायात आहेत ह्यातच मनाला एक प्रकारचे सात्त्विक समाधान आहे. आपल्या शिकवणुकीची पताका झळकत आहे.

आईला आठवते मी संस्थेत असताना माझी आई व भावंडे पुण्यातच होती. एकदा विद्यालय वर्ग चालू होते. माझी आई मला भेटण्यासाठी आली होती. पेरूच्या झाडाखाली उभी होती. आपण विद्यालयात फेरी मारण्यास निघाला होतात. माझ्या आईची आपण आपुलकीने चौकशी करून तिला राममंदिरात बसावयास सांगून मला

आपण स्वतः बोलवून राममंदिरात पाठवून दिलेत. वास्तविक विद्यालयाच्या व आश्रमाच्या नियमबाह्य ही गोष्ट होती. पण आपण जितके करारी व शिस्तप्रिय तितकेच प्रेमळ असल्याचे उदाहरणावरून आपण दाखवून दिलेत. गरीब स्थितीत प्रेमळपणे दिलेली वागणूक मी आजन्म विसरणार नाही. माझी आई पण आपले गुणगौरव नेहमी करीत असे. आणि म्हणूनच अजूनही गरीब परिस्थितीतील व्यक्ती पाहिली की, त्याबद्दल दया वाटते, व आपणास होईल ती मदत शक्यतो करावीशी वाटते.

□ □ □

७३. आज त्या गोष्टींचा अर्थ समजतो

श्री. वि. ल. चाफेकर, बी. ए.
व्यवसाय : सेवक ला. इं. कॉर्पोरेशन सातारा व सार्वजनिक कार्य

शिक्षणकाल १९४१ ते १९४५

निष्कामवृत्तीने समाजसेवा करणारे नागरिक

अपक्ष राष्ट्रीयत्वाची जोपासना गुरु. अण्णांची विचारसरणी ही पूर्णपणे राष्ट्रीय. पक्षीय अभिनिवेश कधी त्यांच्यात दिसला नाही. १९४२ ची चळवळ सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर अण्णा राष्ट्रीय विचार ऐकवीत. इंग्रज सरकारविषयी बऱ्याच वेळा कडकपणे बोलताना त्यांना अनेकांनी ऐकले असेल. विद्यालयातील काही विद्यार्थी चळवळीसाठी शाळा सोडून गेले; परंतु ४–६ महिन्यांनी ते परत आले तेव्हा अण्णांनी त्यांच्याशी अत्यंत सहानुभूतीची वागणूक ठेवली.

लोकशाहीचे शिक्षण बैठे डेस्क, बसायला एक छोटी सतरंजी, पाठीमागे टेकायला काही नसल्याने आपोआप ताठ पाठ करून बसण्याची विद्यार्थ्यांना सवय लागली. साधेपणा हा सर्वत्र इतका ओसंडत होता की, त्याचे निराळे शिक्षण द्यावे लागत नसे. विद्यार्थ्यांच्या लोकसभा, मंत्रिमंडळे, खातेवाटप इ. सगळे आठवले तर त्या छोट्याशा राज्यातील मंत्री कसे होते हे आठवले तरी मनाला प्रसन्नता वाटते. लोकशाहीचे शिक्षण जणू अण्णांनी त्या काळात विद्यार्थ्यांना दिले. अर्थात् त्या वेळी इतके समजण्याची दृष्टी आमच्यात नव्हती पण आज त्या गोष्टींचा अर्थ समजतो.

अपराध आणि शासन विद्यार्थी-दशा म्हटली की, गुरुजनांकडून मिळणारी शिक्षा ही ओघानेच आली. पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा अभ्यास करूनही अण्णांनी छडी टाकली नव्हती. त्यामुळे त्यांच्या छडीचे फटके कितीतरी विद्यार्थ्यांना बसले

असतील. शाळेत गृहपाठ आणला नाही की, सभामंडपात जाऊन पाठांतराची शिक्षा ठरलेली असे. अप्रामाणिकपणा केला किंवा त्या कामी साह्य केले की, राममंदिरात जाऊन चिंतन करीत बसावे लागे. काही वेळा अण्णा विद्यार्थ्यास स्वतःच आपणहून शिक्षा घ्यावयास सांगत. मग एक वेळचे उपोषण ही शिक्षा तर सर्वसामान्य होती. या सर्वांतून विद्यार्थी सुधारण्याचा हेतू होता हे निःसंशय. परंतु ते वय असे असते की, अपमानाची तीव्र बोच कोवळ्या मनाला चटकन वाटते. त्यामुळे जेथे शिक्षेचा अतिरेक होई, चारचौघात अपमान होई तेथे विद्यार्थी अण्णांविषयी अनादराने बोलताना पण दिसे. अर्थात तो बालसुलभ राग पुढे किती काळ टिकला असेल कोण जाणे ?

नैतिक वळण गुरु. अण्णांच्या दृष्टीने श्रमाचे मोल अत्यंत होते. हा विचार विद्यार्थ्यांवर ते बिंबवीत. एका परीक्षेच्या वेळी बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी कॉपी केली. सर्वांना प्रामाणिकपणाचे आवाहन करून अण्णांनी चूक कबूल करून घेतली. विद्यार्थ्यांना दंड केला तो श्रमदानाच्या रूपाने वसूल केला. आणि यापुढे परीक्षेच्या वेळी कोणीही निरीक्षक असणार नाही, तर 'शेजाऱ्याचे डोळे हेच निरीक्षक' असा नैतिक संकेत घातला. पुन्हा परीक्षेच्या वेळी कॉपी केल्याचे उदाहरण घडले नाही.

□ □ □

७४. १९४१ च्या आगे मागे

श्री. स. गो. साठचे, डी. एम्. इ. इ., ए. एम्. आय्. ई.
व्यवसाय : सुपरिन्टेन्डेन्ट, नॉर्थकोट टेक्नि. हायस्कूल, सोलापूर
शिक्षणकाल १९४१ ते १९४५
औद्योगिक शिक्षण दानाचे रूपाने समाजसेवा

पाच तास औद्योगिक जे विद्यार्थी विद्यालयीन वार्षिक परीक्षेत बरेच कमी गुण मिळून अनुत्तीर्ण होत. त्यांच्यासाठी अण्णांनी एक खास योजना त्या काळात आखली होती. तिचे परिचित नाव "पा. ता. औ.". या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांस शालेय शिक्षण चालू ठेवण्यास एका अटीवर परवानगी मिळे. ती म्हणजे त्यांनी सकाळची शाळा आटोपून भोजन संपल्यावरोबर दुपारी साडेबारा ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत असे पाच तास औद्योगिक शिक्षणासाठी छापखान्यात जावयाचे. अर्थातच विद्यार्थी–जगतात ही योजना अप्रियच होती. तिचे महत्त्व त्यावेळी लक्षात येणे जरा कठिणच होते. ते आज सहज येऊ शकते.

बंडखोरांची शरणागती बहुधा आम्ही वर्ष ५ वे मध्ये असतानाची गोष्ट आहे. अण्णा आम्हाला इंग्रजी शिकवीत असत. अण्णांचे तास रॅपिड रीडिंग व लेखनाची सवय यासाठी असत. नियमित शालेय इंग्रजीसाठी दुसरे शिक्षक होते. नियमित विषयांच्या अभ्यासाच्या धबडग्यानेच आम्ही हबकून जात असू. त्यामुळे अण्णांनी रोज १५ ते २० ओळी मजकूर इंग्रजीतून लिहून काढण्याची व त्यांच्या तासाच्या वेळी तो त्यांना दाखविण्याची केलेली सक्ती आम्हाला फार कंटाळवाणी वाटे. एक दिवस आम्ही धिटुकले बनून त्याविरुद्ध बंड पुकारण्याचे ठरविले. सदरची सक्ती काढून टाकण्यासंबंधीचा एक भला मोठा अर्ज लिहून त्यावर वर्गातील सर्वांनी स्वाक्षऱ्या केल्या व अण्णा वर्गात येण्यापूर्वी तो टेबलावर ठेवून दिला. एवढे पुरेसे होणार नाही अशी खात्री असल्याने, आम्ही सर्वजण आपापल्या चौरंगाकडे पाठ करून व खाली मान घालून रॅपिड रीडर वाचीत बसलो. वर्गात शिरताच अण्णांनी लढ्याचे वातावरण ओळखले नि टेबलावरील तहाच्या अटी ताबडतोब वाचल्या. आम्हाला कोठे धीर होता ? अण्णांचे अर्जाचे वाचन शेवटापर्यंत पोचले असेल नसेल तोच त्यांनी न सांगताच आम्ही योग्य दिशेकडे तोंडे फिरवून उत्सुकतेने निर्णय ऐकण्यास सिद्ध झालो. ते म्हणाले, "तुमचा अर्ज सरकारकडून फेटाळण्यात येत आहे". अर्थातच आम्ही फार खट्टू झालो, पण जास्त काहीही करणे शक्य नव्हते. रॅपिड रीडिंगच्या प्रत्यक्ष सरावाला सुरुवात झाली व पेल्यातील वादळाचा शेवट झाला. शिस्तीचा तो डोस उपयुक्त नव्हता असे आमच्यापैकी कोणालाही आज वाटणार नाही. मला तर नाहीच नाही.

शोकावस्थेत रामनवमी अष्टमीचा दिवस. दुसरे दिवशी रामजन्मोत्सव साजरा व्हावयाचा असल्याने सर्व वातावरण चैतन्यपूर्ण बनले होते. रात्री झोपण्यापूर्वी पश्चिमेकडील लोखंडी प्रवेशद्वारावर रोषणाईसाठी लावलेले विद्युत्दीप काढीत असता विजेचा धक्का बसून एक विद्यार्थी तत्काल निधन पावला. एकदम रंगाचा बेरंग झाला. सारा उत्साह पार मावळला. दुसरे दिवशीचा सोहळा अर्थातच नेहमीच्या पद्धतीने पार पडणे शक्यच नव्हते.

धीरोदात्त समतोलत्व ! सकाळी स्नाने वगैरे आटोपून सर्व विद्यार्थी बाहेरील भोजनगृहात एकत्र जमले. भजनाचा कार्यक्रम पार पाडावयाचा होता. परंतु रात्री घडलेल्या दुःखद प्रसंगाने वातावरण अतिशय गंभीर बनले. काय करावे ते कोणासच सुचत नव्हते. एवढ्यात गुरु. अण्णांची धीरगंभीर मूर्ती तेथे आली. तावडतोब ते विद्यार्थ्यांमध्येच बसले व त्यांनी स्वतःच "आरंभी वंदीन अयोध्येचा राजा । पावतसे काजा भक्तांचिया ।" हे भजन धीरोदात्त स्वरात सांगितले. विद्यार्थ्यांनी अनुकरण केले व भजनाचा कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडला. धार्मिक दृष्टीने जेवढे कमीत कमी करणे आवश्यक होते तेवढे विधी पार पाडून प्रसंग साजरा करण्यात आला.

नीग्रो सैनिकाच्या पहाऱ्यातून दुसरा प्रसंग १९४२ सालच्या ऑगस्ट महिन्यातला आहे. "भारत सोडा" चळवळ व पुढाऱ्यांची धरपकड झाल्यावेळचा. अप्पा बळवंत

चौकात दुपारी गोळीबार होऊन काही जीव हकनाक मृत्युमुखी पडले. तो किंवा त्या आधीचा दिवस असावा. सर्व राष्ट्रच बेचैन व चवताळलेले होते. अर्थात् पुणेही होतेच. ठिकठिकाणी लष्करी पहारा होता. विश्रामबाग वाड्यासमोर तर नीग्रो सैनिक पहारा देत होते. शनिपाराजवळील चौकात पोलिस उभा होता. हमरस्त्यावरील लष्करी पहाऱ्यामुळे सामसूम वाटत असली तरी गल्लीबोळांतून धडपडणारी मंडळी होतीच. त्यात मीही होतो. मी रस्त्याकडे पाहात होतो. सायंकाळी पाच साडेपाचची वेळ असेल. अण्णांची निर्भय मूर्ती शनिपाराकडून पोलिसाजवळ येऊन ठेपली. पोलिस आश्चर्यचकित झाल्याचे दिसत होते. कारण हमरस्त्यावर येणे, त्या प्रसंगी तरी लष्कराच्या रोषाला मूर्तिमंत आव्हान होते. अण्णांनी पोलिसाजवळ काय विचारणा केली हे ऐकू येण्याइतके आम्ही जवळ नसलो तरी त्यांनी रस्ता रहदारीस मोकळा आहे काय ? अशी विचारणा केल्याचे त्यांच्या व पोलिसांच्या हालचालीवरून स्पष्ट दिसत होते. 'मंडईकडील रस्त्याला जाऊ नका, खाली लक्ष्मीपथाच्या चौकाकडे जाण्यास प्रत्यवाय नाही.' अशी सूचना तोंडी व हातवारे करून अण्णांना मिळाली असावी. आपली छत्री काठीप्रमाणे धरून ते निर्भयपणे नीग्रो सैनिकांच्या पहाऱ्यावरून पुढे गेले. काहीही अनपेक्षित घडले नसले तरी प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करता प्रसंग बाका होता. अण्णा दिसेनासे होई-पर्यंत मी त्यांच्याकडे निरखून पाहण्याचा प्रयत्न करीत होतो. नीग्रो सैनिकही टक लावून पाहात होते. पण एकदा पोलिसाकडून रस्ता मोकळा असल्याची ग्वाही मिळालेल्या अण्णांच्या इतर बाजूच्या गोष्टी गावीही नव्हत्या.

वरील दोन प्रसंग आज अगदी किरकोळ वाटतील. परंतु पहिल्याने बिकट प्रसंगी न डगमगण्याचा व दुसऱ्याने निर्भयत्वाचा घडा माझ्या मनावर तरी ठसविला.

शिक्षणमंत्री मी अण्णांच्या दैनंदिन कार्यातील व्यवस्थितपणाचे बरेचसे बारकावे जवळून पाहण्याचे भाग्य मला लाभले. कारण महाराष्ट्र विद्यालयाच्या शिक्षणमंत्र्याचे पद भूषविण्याची गौरवास्पद कसरत मी केली आहे. कसरत का म्हणतो ते "जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे". तसेच अण्णा जेव्हा प्रथमच मुंबई विद्यापीठाच्या निवडणूक आखाड्यात उतरून यशस्वी झाले त्या वेळी संबंधीत कार्याचा काही भार उचलण्याचा उपद्व्याप देखील मला करावयास मिळाला. त्यामुळे पत्रव्यवहाराचे बाबतीतील अण्णांचा कटाक्ष विद्यालय दैनंदिनीच्या नोंदीतील काटेकोरपणा, एकंदर कामातील नीटनेटकेपणा असे अनेक पैलू मी पाहिले आहेत. त्यावेळी चिंतन हा संस्कार विद्यालयीन विद्यार्थ्यांचे मनात प्रथम अण्णांनीच रुजविला. एखाद्या विशिष्ट विषयावर चिंतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना डोळे मिटून बसविण्यात येत असे. प्रथमतः आम्ही या प्रकाराची टिंगल करीत असू. पण काही कालानंतर त्याची वैचारिक उपयुक्तता लक्षात येऊ लागली.

□ □ □

७५. शासन आणि शाबासकी

श्री. शं. ज. थत्ते, कोविद

व्यवसाय : असि. सुपरिन्टेन्डेन्ट, महाराष्ट्रराज्य माध्यमिक शिक्षणमंडळ, पुणे

शिक्षणकाल १९४२ ते १९४७

संस्था व गुरुजी यांचेशी निकटचे संबंध

क्लासविषयी नापसंती बाहेरील क्लासमध्ये आपल्या विद्यालयातील कोणीही जाऊ नये, असा शाळेचा दंडक होता. तरीसुद्धा मी नाना क्लासमध्ये प्रवेश केला. मॅट्रिकला गणितात संपूर्ण मार्क मिळावेत या एकाच इच्छेने. त्या क्लासला मी रात्रीच्या बॅचमध्ये जात असल्यामुळे व स्वतःजवळ सायकल नसल्यामुळे कधी कधी मला सकाळी उठण्यास व शाळेत पोहोचण्यास उशीर होई. प्रार्थना नाही मिळाली तरी वर्ग सुरू होण्याअगोदर मी पोहोचत असे. एक दिवस मी असाच उशिरा आलो व वर्गात लगबगीने जाऊ लागलो. गुरु. अण्णांनी हे पाहिले व उशीरा का येतोस असे रागाने विचारले. माराच्या भीतीने मी खरे कारण सांगून टाकले. लगेच त्यांनी छडी आणवली व त्या थंडीच्या दिवसात माझ्या हातावर दोन छड्या लगावल्या. मला खराखरा त्यांचा राग आला पण द्वेष उत्पन्न झाला नाही. शिस्त मोडली पण त्याहीपेक्षा क्लासमध्ये जाणे हेच मुळी शाळेला भूषणावह नाही हाच शुद्ध विचार त्यांच्या मनात शिक्षा करण्यामागे होता. हे किती महत्त्वाचे आहे, हे मी आज जाणू शकतो. स्वतंत्रपणे विचार केला तर विद्यार्थ्यांनी बाहेरच्या क्लासला जाऊच नये, असे माझे सध्या मत आहे. माझ्या मुलांनीही क्लासला जाण्यापासून व गाइडस् वापरण्यापासून मी परावृत्त करीन.

शाबासकी व शासन गणित चांगले असल्यामुळे मोकळा तास असल्यास कधी कधी गुरु. अण्णा मला वर्गातील विद्यार्थ्यांच्या गणितविषयक अडचणी सोडविण्यास सांगत. अशाच एका प्रसंगी मी फळ्यावर शिकवीत असताना गुरु. अण्णा वर्गात येऊन मागे हळूच बसले. बराच वेळ हे कोणाला कळले नाही. नंतर त्यांनी ऑफिसमध्ये बोलावून मला शाबासकी दिली. मला शाबासकी देणारे गुरु. अण्णाच व क्लासला गेल्यामुळे, शाळेत उशिरा आल्याबद्दल दोन छड्या लगावणारे गुरु. अण्णाच. पोटात मातृतुल्य माया असल्याशिवाय असा विरोधाभास अशक्यच !

सभा-समित्यांमधील अनुभव बोर्डात आणि समित्यांवर काम करताना नियमितपणा, कामाचा उरक व त्याबद्दल वाटणारी आत्मीयता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे

गुंतागुंतीच्या अनेक प्रश्नांना व्यावहारिक पण योग्य तोडगे शोधून काढण्याची गुरु. अण्णांची हातोटी तेव्हाच दिसून येते. सभासद असताना काही कामानिमित्त एखाद्या सभेला ते येऊ शकले नाहीत तर त्यांची अनुपस्थिती नुसतीच जाणवते असे नव्हे; तर सभेच्या कामकाजावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही हे मी अगदी जवळून पाहिले आहे. त्यांच्या घरी मी कधी गेलो तर गुरु. अण्णा घरात असोत वा नसोत, आपुलकीच्या भावनेत फरक दिसत नाही. म्हणूनच एखाद्या पवित्र वास्तूत आपण शिरत आहोत असा अनुभव येतो. शिक्षणक्षेत्रातील ते एक प्रगतिशील सुधारणामतवादी व प्रयोगऋषी आहेत. गुरु. अण्णा सरकारनियुक्त व इतर अनेक समित्यांवर व संस्थांत आज दीर्घकाल काम करीत आहेत व निरीच्छ मार्गदर्शन करीत आहेत. शासनाला त्यांची किंमत फार उशिरा कळली व आता ती पूर्ण समजली आहे.

▱ ▱ ▱

७६. नेहमी पाठीवर एकदा हातावर

श्री. वि. सि. पाटील, एम्. ए., बी. एड्., पंडित
व्यवसाय : चिटणीस, शिक्षण प्रसारक मंडळ, गोटखिंडी
शिक्षणकाल १९४४ ते १९४९
ग्रामीण शिक्षणाला वाहिलेले स्वावलंबी जीवन

स्वतः झाडू घेत आश्रमाच्या स्वच्छतेबाबतीत अण्णा अत्यंत बारकाईने लक्ष देत. स्वच्छ आवार, निर्मळ मन, चांगला अभ्यास यांवर कटाक्ष, हे शाळेचे विशेष होते. आमच्यांपैकी अनेकजण कामात काही वेळा चुकारपणा करीत. संस्थेस कोणी भेट देणार असल्यास स्वच्छतेबद्दल विशेष काळजी घेतली जात असे. आमच्यांपैकी कोणी चुकारपणा केला असल्यास अण्णा आपल्या हातात झाडू घेत व झाडण्यास सुरुवात करीत. त्यावेळी अनेकांची त्यांच्या हातातील झाडू घेण्याची कोण धांदल होत असे.

"समाज-सेवा" वर्गामध्ये आश्रमीय विद्यार्थ्यांत मी, हणमंत साळुंके व घुले या तिघांनाच त्या काळचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर राजा महाराजासिंग यांच्या हस्ते सर्टिफिकेटस् मिळाली. गांधीवधानंतरच्या जातीयवादाने महाराष्ट्रातले वातावरण, त्यावेळी गढूळ झाले होते. परंतु गुरु. अण्णांनी आम्हाला कार्यालयात बोलावून 'या ज्ञानाचा पुढील आयुष्यात योग्य उपयोग करा' असे सांगितले. अण्णांच्याशिवाय या गोष्टीचे कोणीही कौतुक केले नाही.

एक लुहारकी हिंदीमध्ये एक म्हण आहे, 'सौ सुनारकी, एक लुहारकी'. गुरु. अण्णांनी अनेक वेळा अभिनंदन केले, कौतुक केले, पण एकदा अण्णांचा चांगला मार खाण्याचा योग आला. श्री. फडके नावाच्या ग्रामस्थ विद्यार्थ्याने मला वर्गात शिवी दिली. आम्ही दोघेही मित्र. पण शिवी देताच मी त्याची मानगुट पकडली. फडके माझे तावडीतून सुटला तो थेट अण्णांचे कार्यालयात. माझ्या दुर्दैवाने अण्णा कार्यालयात होते. अण्णांचा राग, मग काय ? मला बोलावले. मी मारले याची कबूली देताच "का मारले ते सांग" असे अण्णा म्हणाले. पण मी शिवी कशी सांगणार ? त्यामुळे काहीच बोलू शकलो नाही. अण्णांनी छडी आणली. ३–४ छडचा मारल्या.

पश्चात्ताप आणि प्रायश्चित्त आश्रमात मी परत आलो. तो मी दोन दिवस जेवलोच नाही. माझी बाजू अण्णांना समजली. त्यांना वाईट वाटले. त्यांनी चित्तशुद्धीसाठी उपोषण केले. मला फार वाईट वाटले. त्या प्रसंगानंतर अण्णांचे व माझे संबंध जास्तच चांगले झाले. चांगल्या गोष्टींच्या वेळी पाठीवर थाप मारावी अण्णांनी व चुकीच्या वेळी पाठीवर तडाखे मारावे अण्णांनीच.

आत्मज्ञानाचा झंकार काही असो. घरची दैविक देणगी, अण्णांचा संस्कार, कदाचित आणखी एखादी प्रेरणा असेल. आश्रमात असतानाच आध्यात्मिक ज्ञानाची थोडीशी झुळूक येऊन गेली. आश्रमात कळीच्या स्वरूपात असलेली ही गोष्ट ३–४ वर्षांनी पूर्ण विकसित फुलासारखी झाली. आश्रमाच्या वातावरणाने आणि अण्णांच्या संस्काराने दिलेली ही एक मोठी देणगी असे मला वाटते.

अण्णांचे ऋण आमच्या संस्थेच्या अनेक कामानिमित्त मी अण्णांच्याकडे गेलो असताना कामात सुलभता आणून देण्याचे काम अण्णांनी अनेकवेळा केले. गुरु. अण्णांनी सुरू केलेला मासिक समाचार म्हणजे संस्थेच्या संबंधितामधले टेलिफोन एक्स्चेंज खातेच आहे. चातकासारखी मासिक समाचारची आम्ही वाट पहातो.

काय दिले काय दिले नाही ? अण्णांनी काय दिले ? असे विचारण्यापेक्षा मी म्हणेन अण्णांनी काय दिले नाही ? विद्येमध्ये आमचे कुलदैवत असलेले, योग्यांमध्ये नसूनही योगी वाटणारे, राष्ट्रीयता आणि प्रामाणिकपणा कणाकणात भरलेले, चुकल्या वेळी शिक्षा देणारे, चांगल्या गोष्टींचे कौतुक करणारे, ज्ञानाची गंगा वाहाते पण गर्वाचा गंध नसलेले, भारतीय संस्कृतीचा आदर करणारे परंतु सनातनी प्रवृत्तीचा तिटकारा करणारे, जातीयतेला स्पर्श न करणारे, मोडेन पण वाकणार नाही—प्रवृत्तीच्या बहुगुणी गुरु. अण्णांना माझे शतशः प्रणाम !

□ □ □

७७. मी फार थोडे घेतले ही हुरहूर

श्री. पां. म. गोखले, बी. इ. (मेटालर्जी)
व्यवसाय : इंजिनियर, प्रिमिअर ऑटोमोबाइल्स कं. लि., मुंबई
शिक्षणकाल १९४४ ते १९५४
उत्साही मधुर स्वभावाचे इंजिनियर

चिंतनाची शिक्षा सणाचे दिवशी बाहेर जेवावयास जात असल्याने, बरेच वेळा जेवण जरा जास्तच होई. अशा वेळी अण्णा नेहमी सांगत की, "अन्नदान हे विद्यार्जनाचे आड येऊ नये." असेच एक दिवस जेवण जास्त झालेले असल्यामुळे अभ्यासाच्या वेळी टेबलावर पुस्तके बाजूला सरकवून व डोके टेकून पडलो असता मला झोप लागली. योगायोगाने गुरु. अण्णा मागाहून येऊन पाहून गेले. मला इतकी गाढ झोप लागली होती की, अण्णा आल्याचेही मला समजले नाही. एवढेच नव्हे तर ते माझी बाजूची पुस्तकेही घेऊन गेले. शेजारील विद्यार्थ्याला त्यांनी मला न उठवण्याबद्दल व जाग आल्यावर ऑफिसमध्ये पाठवून देण्याबद्दल सांगितले. अण्णा निघून गेल्यावर मुलांनी मला उठवले. मला तर धडकीच भरली. कसाबसा तोंड धुऊन घाबरत, घाबरतच अण्णांच्या ऑफिसमध्ये गेलो. त्यांनी विचारले, "तुला परीक्षेत किती मार्क मिळतात ?" मी सांगितले, "शे. ६५।६७ मिळतात." अण्णांनी मारले तर नाहीच पण असे समजावून सांगितले की, जर झोपण्याऐवजी मी जास्त अभ्यास केला तर जास्त गुण मिळतील. माझ्या वरील गुन्ह्याबद्दल मला एक शिक्षा दिली, ती अशी की, तीन दिवस मी राम-मंदिरात रामाचे समोर दररोज १५ मिनिटे बसून चिंतन करावयाचे व या चिंतनातून जे चांगले विचार सुचतील ते एका डायरीत लिहून ती डायरी अण्णांना दाखवावयाची. या गुरु. अण्णांच्या शिक्षेमागील गुपित मला पुढील आयुष्यात समजून आले ते म्हणजे कोणत्याही माणसात खरी सुधारणा मनुष्य आत्मसंशोधन करून चुका सुधारतो तेव्हाच होते.

शिकवण्याला खंड नसे विद्यार्थी शाळेतील असो, अगर कॉलेजमधील असो, शाळेतील शिक्षक असोत, अगर बाहेरील कोणी गृहस्थ असोत, अण्णा झालेली चूक अत्यंत स्पष्टपणे सांगत. व्यक्तीत सुधारणा व्हावी हा त्यामागील हेतू असे.

याबाबत अनेक प्रसंग स्मरतात. एकदा अण्णांचे ऑफिसमध्ये काही कामानिमित्त बसलो असता, एक गृहस्थ, हॅट घालून आत आले व कोचावर बसले. अण्णा पुढील कोणतेही बोलणे करण्याचे पूर्वी त्यांना म्हणाले, "हे पाहा, राग मानू नका पण सांगतो. साहेबाप्रमाणे वागावयाचे तर पूर्णपणे अनुकरण करावे. हॅट घालून ऑफिसमध्ये अगर घरात कोणत्याही व्यक्तीस भेटण्यास गेल्यास ' हॅट काढून आत प्रवेश करावा. नाहीतर

त्या व्यक्तीचा अपमान केल्यासारखे होते. तुम्ही मला भेटाल, त्या वेळी हॅट नाही काढली तरी चालेल, पण दुसऱ्या कोणाला भेटाल त्यावेळी मात्र असे करू नका." गृहस्थ खजील झाले, पण चूक दाखविल्याबद्दल त्यांनी अण्णांचे आभार मानले.

एकदा मी व अण्णा त्यांचे घराहून ऑफिसमध्ये येत असता ग्राउंडवर छापखान्यातील एक मनुष्य दिसला. अण्णांनी त्याला बोलाविले व हातातील पत्रे त्याचेजवळ देऊन त्याला ती छापखान्यात नेऊन देण्याबद्दल सांगितले. तो गृहस्थ डुलत डुलत सावकाश जाऊ लागला. त्याला अण्णांनी परत बोलाविले व सुनावले की, मी आता म्हातारा झालो आहे तरी तुझ्यापेक्षा जोराने जाईन. जरा चलाखीने काम करावयास शिका. गृहस्थ पळतच निघून गेला.

असाच आणखी एक प्रसंग स्मरतो. गुरु. अण्णांकडे परीक्षेचे पेपर्स तपासण्यासाठी आले होते. मार्कांची बेरीज करण्यासाठी आम्हा दोन तीन कॉलेजमधील विद्यार्थ्यांना त्यांनी रात्री बोलाविले होते. निरनिराळ्या प्रश्नांना दिलेल्या गुणांची बेरीज करून पेपरावर लिहून ठेवण्याचे काम आम्ही केले. त्या बेरजा तपासून पाहताना अण्णांना त्यांत एक चूक आढळली. आणि मग आम्हांला अण्णांनी बोलाविले व जे काही रागावले व जे बोलले ते मी कधी विसरणार नाही. अण्णा इतके कधी रागवत नसत. पण त्या रागामागील भूमिकाही त्यांचे बोलण्यात प्रगट झाली होती. समजा, आमच्या त्या चुकीमुळे एखादा विद्यार्थी नापास झाला असता तर त्याला अण्णा जबाबदार झाले असते व त्यांच्यावर निष्काळजीपणाने काम केल्याचा दोष आला असता. अण्णांचे कामाची शिस्त अशी होती. ते काम त्यांनी केलेले असो अगर त्यांच्या विद्यार्थ्यांनी केलेले असो, त्यात चुका व गबाळपणा याला स्थान नसे.

गुणांची पारख व कौतुक अण्णांनी माझ्यातील एक गुण मलाही न कळत ओळखला होता व मी जेव्हा आश्रमातील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडलो त्यावेळी निरोप समारंभाच्या वेळी तो बोलून दाखविला. अण्णा म्हणाले, "गोखलेमध्ये मला एक मोठा गुण आढळला. त्याला कोणतेही काम केव्हाही सांगा, तो हसतमुखाने म्हणणार की, "हो मी करतो ना." अण्णांनी त्यांना आढळलेला माझ्यातील हा गुण जरी दहा वर्षांनी बोलून दाखविला तरी ओळखला होता खूप पूर्वीपासून. त्यामुळे अण्णा मला वेळोवेळी अनेक कामे सांगत व मीही ती आत्मीयतेने करीत असे. ही कामे करताना मला कितीतरी गोष्टी शिकता आल्या.

अण्णांच्या सानिध्यात रहावयास मिळणे हे एक परम भाग्याचे लक्षण होते. आम्ही गरीब होतो या "क्वालिफिकेशन" वर तो लाभ आम्हाला मोफत मिळाला. आता युरोपचा प्रवास केल्यावर असे वाटते की अशा व्यक्तीच्या सान्निध्यात आपल्या मुलांना ठेवण्यासाठी श्रीमंत पालक शेकडो पौंड देखील खर्च करतील. अण्णांनी खूप दिले पण मीच फार थोडे घेतले, हीच हुरहूर मनाला सतावते. अण्णा म्हणत "Nothing is given unless it is taken." किती खरे आहे ते !

□ □ □

७८. मी प्रयोगशीलता घेतली

श्री. भा. द. नवाथे, बी. एस्सी., बी. टी.
व्यवसाय : शिक्षक, कर्जत
शिक्षणकाल १९४४ ते १९४६
प्रयोगशील व विधायक शिक्षणकार्यास वाहिलेले जीवन

प्रबंधाची सक्ती प्रबंध-लेखनाच्या बाबत सूट देण्याची त्यावेळी तरी प्रथा नसे. गुरु. अण्णांकडे यातून सूट मिळावी म्हणून मी गेलो होतो. पण त्यांनी निश्चित सुचविले की, गुरु. कानेगावकरांनाच याबाबत सर्वाधिकार आहेत. या त्यांच्या धोरणाचा मी येथे S. T. C. चा प्रमुख म्हणून काम करीत असता मला फार उपयोग झाला. सहकाऱ्यांकडून काम करून घेताना त्यांच्यावर आंतरिक विश्वास असावा लागतो. याचा पाया या छोट्या प्रसंगातून माझ्यामध्ये घातला गेला.

प्रबंध-लेखनात सूट नसल्याने मला फार वाईट वाटले. प्रबंध पूर्ण केला झाले, पण मनाने व्यायाम करा किंवा रागावून करा, त्याचा शरीरावर१०० टक्के नसला तरी ९० टक्के परिणाम होतोच. या त्यांच्या करारी वागण्यामुळे मी येथील संस्थेत एस्. एस्. सी. विभाग प्रमुख म्हणून काम करीत असता विद्यार्थी शिक्षकांकडून प्रोजेक्ट पूर्ण करून घेऊ शकलो. अण्णा असे प्रयोगशील होते व आहेत, म्हणूनच मला त्यांच्या शिकवणुकीचा सतत उपयोग होत आहे, हे कृतज्ञपणे बोलावेसे वाटते. त्यात संकोच होत नाही.

अभ्यासातील स्वावलंबन मी इ. ६ वीत असता गुरु. अण्णा प्रत्यक्ष इंग्रजी शिकवीत. त्यावेळी त्यांच्या पद्धतीचा मला राग येई, कारण त्यात आमचा अभ्यास आम्हाला अगोदर करावा लागे; अवघड शब्द शोधावे लागणे, त्यांचा आगाऊ अर्थ पाहाणे, पॅरिग्राफ व प्रश्नोत्तरे स्वतःच तयार करणे, वर्गात ती विचारणे–यामुळे घडे फार थोडे होत परंतु पक्के होत. केवळ आर्थिक बाबतीत नव्हे तर बौद्धिक बाबतीतही कसे स्वावलंबी व्हावे याचे खरेखुरे मार्गदर्शन गुरु. अण्णांच्यामुळेच मला मिळाले. अगदी वैयक्तिक बाबतीतही त्यामुळे मला फायदा झाला, तो नमूद करावासा वाटतो. तो असा, मी मॅट्रिकनंतर बी. एस् सी. झालो व पुढे बी. टी. झालो. त्यामुळे माझा मराठी विषयाचा संबंध सुटला पण माझी पत्नी घरून बी. ए. झाली. तिला मराठी शिकविताना मला फक्त अण्णांच्याच मार्गदर्शनाचा उपयोग झाला. संसार सांभाळूनही ती द्वितीय श्रेणीत B. A झाली. याला अप्रत्यक्षरीत्या अण्णाच कारणीभूत आहेत.

नवनवे उपक्रम शाळेत असता आम्हांला साप्ताहिक वर्तमानपत्र काढून त्यात लेख लिहावे लागत. त्यात गुरु. अण्णा एक विचार देत. शाळेत असताना जरी त्याचे "अतिपरिचयात् अवज्ञा" या न्यायाने महत्त्व कळले नाही तरी आजपर्यंत मी शिक्षक

म्हणून काम करीत होतो, तोपर्यंत व त्यानंतरही मला त्याचे महत्त्व पटले. ज्या शैक्षणिक प्रयोगांचा आज उदोउदो चालतो ते मी माझ्या विद्यार्थीदशेतच शाळेत अनुभविले आहेत. हा प्रयोग मला शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असता करता आला नाही; पण त्याचे महत्त्व मला उमजले आहे. मोठे हस्तलिखित वार्षिक समारंभपूर्वक प्रसिद्ध करून कपाटात ठेवण्याऐवजी छोट्या पत्रिका असाव्यात असे मत मी वाचले आहे व त्याची सुरुवात गुरु. अण्णांनी खूपच वर्षांपूर्वी महाराष्ट्र विद्यालयात केली आहे. हे मी या संदर्भात प्रकट करू इच्छितो.

व्यापक शिक्षण शाळेत त्यावेळी "वाणीविकास" सभा होत असे व त्यातून सामान्यतः कोणीही सुटत नसे. मी पण सुटलो नाही. पण जो भाग घेतला तो मात्र "पाटी टाकण्याच्या" वृत्तीने. त्याचा परिणाम मला आज भोगावा लागत आहे. तो म्हणजे सभेत बोलण्याची मला आजही भीती वाटते.

गणपती-उत्सव त्यावेळी इ. १० वीचे विद्यार्थी घडवून आणत. त्यावेळी जबाबदारीचे काम करण्याचा पाया घातला जातो. मी ज्यावेळी येथील शाळेत प्रमुख म्हणून स्नेहसंमेलनात भाग घेतला, त्यावेळी या पायामुळे मला माझे काम चोखपणे व सहकार्याने पार पाडता आले.

आदर्श मुख्याध्यापक बी. टी. ला असता 'मूर्ताकडून अमूर्ताकडे' असा एक भाग विशेष सांगितला जाई. मुख्याध्यापकाचे गुण हा विषय शिकविताना मी तर खुशाल गुरु. अण्णांचे चित्र मनासमोर आणून ऐकत असे व मला तो विषय समजे. उदाहरणानेच स्पष्ट करतो. "मुख्याध्यापक शिस्तीचा भोक्ता असावा, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेण्याइतकी सहृदयताशील दृष्टी त्याच्या अंगी असावी." मी असे मूर्त स्वरूप अनुभविल्यामुळे मला हा विषय आंतरिक रीत्या समजे.

विद्यार्थ्याविषयी आपुलकी गुरु. अण्णा हे मोठे असूनही आम्हाला जवळचे वाटतात. कारण ते जवळ येऊ शकतात. तसे येण्यात त्यांना 'बिलो डिग्निटी' वाटत नाही. खाजगी गोष्ट या संदर्भात सांगावीशी वाटते. माझ्या लग्नाच्या वेळी आशीर्वाद देण्याकरता सायंकाळी आश्वासन दिल्यावेळी ते येऊन गेले. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात या गोष्टीला फार मोठे महत्त्व आहे. दुसरा प्रसंग पहा. कर्जतच्या बहिःशाल मंडळाच्या पुणे विद्यापीठाच्या उत्सवाला ते पाहुणे म्हणून येणार होते. त्यांच्या कार्यक्रमाची मला आगाऊ कल्पना होती. त्याप्रमाणे ते माझ्या व अण्णा ओक यांच्याकडे घरी येऊन गेले. खऱ्या अर्थाने 'साधुसंत येती घरा तोचि दिवाळी-दसरा' हा अनुभव माझ्या पत्नीलाही आला. अण्णांच्याबरोबर सौ. ताईही आल्या होत्या. जणू दुधात साखरच. पण याही पेक्षा त्यांचे मुख्याध्यापकपण मला त्या अल्प वास्तव्यात दिसून आले तो प्रसंग नमूद करतो. "आपले महाराष्ट्र विद्यालय वाढविण्याची योजना आहे. तू तिकडे चल. तुझा होकार आल्याबरोबर पुढील काम करणे सुखाचे जाईल." अगदी मोजक्या शब्दात एका मुख्याध्यापकाने इतक्या जवळून बोलवावे याची धन्यता वाटली. मी एक महिना काहीच

कळविले नाही. तेव्हा त्यांचे पत्र आले व मी नकार कळविला. पण यामुळेही ते कधीही रागावले नाहीत.

माझी शाळा सुधारीन १९४७ साली माझ्या धाकट्या भावाने महाराष्ट्र विद्यालय सोडण्याचा निश्चय केला. त्यामुळे मला त्याच्याबरोबर आपल्याकडे यावे लागले. तो रडत होता व आपण त्याला विचारीत होता. "तुझा दाखला तयार आहे. हा पहा. पण माझी शाळा तुला का सोडावीशी वाटली. त्याचे कारण सांग. म्हणजे मी त्याचे कारण दुरुस्त करण्याचा प्रयत्न करीन." यावेळी आपला आवाज अत्यंत मृदू होता. अर्थात् तो सांगू शकला नाही व मलाही आपल्या त्या शब्दांची किंमत त्यावेळी कळली नाही. पण बी. टी. चा अभ्यास करताना Education is a living process या उक्तीशी त्याचा पूर्ण संबंध आहे हे ज्यावेळी मी अभ्यासिले त्यावेळी आपणही कसे **'बनत'** गेलात हे मला कळले.

□ □ □

७९. काही गुण काही दोष

श्री. वा. रा. शिदोरे, एम्. ए., एम्. एड्.

व्यवसाय : मुख्याध्यापक, महाराष्ट्र विद्यालय, पुणे

आजीव सेवक–अ. वि. गृह

शिक्षणकाल १९४४ ते १९५२

अ. वि. गृहाचे नव्या पिढीतील आजीव सेवक

दोन तपे निकट सान्निध्य सुमारे २० वर्षांच्या कालखंडात माध्यमिक शाळेतील व वसतिगृहाचा विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, पुढे नवीन शिक्षक, सहकारी आणि आता विद्यालयाचा मुख्याध्यापक म्हणून अण्णांना मी विविध प्रसंगी विविध कामांच्या निमित्ताने अगदी जवळून पाहिले आहे. अनुभवले आहे. त्यांच्या सुखदुःखाचे प्रसंग पाहिले आहेत. हा सर्व योग मी विशेष मानतो.

मी विद्यालय मंत्री एकदा परीक्षा निकालाच्या वेळी विद्यालयाचे वर्ग वेळेवर न उघडल्यामुळे अण्णांनी कडक शब्दांत समज दिल्याचे आठवते. विद्यालयाची दैनंदिनी काही दिवस न दाखवल्याने आठ दिवस राममंदिरात गीतावाचन करण्याची शिक्षा (ही शिक्षा की गीताधर्माची दीक्षा !) दिल्याची स्मृती कायम आहे. शासनाचे अण्णांचे प्रकार हे असे आमच्या व नंतरच्या पिढीच्या अनुभवाला आले. त्यामुळे आम्हाला ते कधीच मारकुटे वाटले नाहीत.

अभ्यासात मार्गदर्शन १९५२ चा मार्च महिना असावा. मी दादांच्या कार्यालयाबाहेर कार्यालयपाळी करीत बसलो होतो. दादांच्या कार्यालयाकडे लक्ष ठेवावयाचे,

त्यांना मदत करावयाची, आल्यागेल्याची चौकशी करावयाची असे काम असे. काही वेळाने अण्णा आले. मी बी. ए. च्या शेवटच्या वर्षास होतो. वार्षिक परीक्षा फार जवळ आली होती. माझी चौकशी करून अभ्यास कसा करावा, स्मरणात राहाण्याकरिता काय करावे, उत्तरपत्रिका आकर्षक, मुद्देसूद व उठून दिसेल अशी कशी लिहावी याबद्दल त्यांनी आपणहून बऱ्याच सूचना दिल्या त्या मला कायम उपयोगी पडल्या आहेत.

अनुभवाची संधी ३ ते १२ नोव्हेंबर १९५५ या कालखंडात महाबळेश्वर येथे मुंबई राज्यातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे कार्यसत्र होणार होते. (Camp-cum-Seminar) त्याचे डायरेक्टर म्हणून अण्णांची नेमणूक झाली होती. त्या सेमिनारमध्ये टिळक महाविद्यालयातील प्रा. गद्रे, डांगे, मराठे यांना भाग घेण्यास अण्णांनी सुचविले होते. त्या कामासाठी अण्णांकडे प्रा. गद्रे आले होते. 'मी माझा चिटणीस म्हणून शिदोरे यांना महाबळेश्वरला आणणार आहे. सध्या आमच्या विद्यालयाची सगळी व्यवस्था तेच पाहातात' असे अण्णांनी प्रा. गद्रे यांना सांगितले तेव्हा 'आपल्या हाताखालची माणसे तयार करण्याची दृष्टी आपणास आहे आणि आपण तशी संधीही देता; असे उदाहरण क्वचितच पाहावयास मिळते' असे उद्‌गार प्रा. गद्रे यांनी काढले.

अध्ययनातही स्वावलंबनावर भर माणसाने स्वतःच्या प्रयत्नानेच प्रत्येक गोष्ट शिकावी, शिक्षणातही स्वावलंबी होता येते यावर अण्णांचा फार कटाक्ष आहे. ते आम्हास इंग्रजी शिकवीत तेव्हा जोड्या लावून संवाद करावयास लावीत. मी एम्. एड्.ला असताना मला वरच्या पातळीला हाच अनुभव आला. त्यांनी २–२, ३–३ जणांचे गट करून एकेका देशाच्या शिक्षणपद्धतीवर प्रदीर्घ निबंध लिहिण्याचे काम आम्हांस दिले होते. एवढेच नव्हे तर व्याख्यान देण्याची संधीही ते देत. विद्यार्थ्यांस कार्यप्रवृत्त—क्रियाशील बनवणारे अण्णांसारखे आचार्य फार विरळ !

१९५५ साली सेमिनारचे डायरेक्टर महाबळेश्वर येथील सेमिनारला सुमारे ७५ मुख्याध्यापक आले असावेत. शिक्षणाधिकारी, अनुभवी मुख्याध्यापक, अभ्यासू शिक्षणतज्ज्ञ यांच्या त्या विद्वत्सभेत अण्णांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव लोकांवर फार पडतो असे मला आढळे. लागोपाठ कार्यक्रम असत. सकाळची प्रदीर्घ बैठक संपून भोजनोत्तर जेमतेम १५–२० मिनिटे विश्रांती घेणे शक्य असले तर तेवढ्यात डोळे मिटून अण्णा डुलकी घेत व मला विशिष्ट वेळी उठण्यास सांगत. पण तेवढ्या शांत विश्रांतीनंतर ते तरुणाला लाज वाटेल अशा उत्साहाने काम करीत. ही त्यांची मनःशांती, कार्यसत्रातील त्यांची योजकता, मनमोकळेपणा, सहजता, आत्मविश्वास, विनोदवृत्ती या गोष्टी पाहून मी अगदी दिपून गेलो. त्या ज्ञानसत्राचा समारोप अण्णांनी " We had a sort of ज्ञानयज्ञ, intellectual sacrifice here for the last ten days, the पसाय Gift of which will remain with you for a long time " या शब्दांनी केला, तेव्हा सर्वजण मंत्रमुग्ध झाल्यासारखे दिसले.

विनोदाचे मासले त्यांचे विनोद तर फारच मार्मिक असतात. महाबळेश्वर-सेमिनारच्या वेळी फोटोसाठी मंडळी उभी होती. स्त्रिया थोडचाच होत्या. त्या पुरुषांच्या खुर्च्यांपुढे खाली बसल्या होत्या. अण्णा चटकन म्हणाले,"You are always at the feet of men." भगिनींचे चेहरे फोटो काढण्यासारखे झाले असल्यास त्यात काय नवल ! पुण्यातच सेवासदनमध्ये मुख्याध्यापकांची एक सभा चालू होती. काही वेळानंतर चहाच्या वेळी पाय मोकळे करण्याकरिता काहीजण बाहेरच्या बाजूस उभे होते. एक मुख्याध्यापक म्हणाले, "अण्णासाहेब, आपले जीवन फार रुक्ष बनत चालले आहे. आपण कलेपासून दूर दूर चाललो आहोत असे मला वाटते." अण्णा म्हणाले, " अकलेपासून दूर नाही ना चाललो ?" संरक्षणमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण सप्टेंबर १९६४ त संस्थेत तीन इमारतींच्या अनावरण समारंभास आले होते. 'आश्वासन दिल्याप्रमाणे मी माझा शब्द खरा केला आहे' (' I have kept my word ') असे ते येताच अण्णांना म्हणाले. प्रास्ताविक भाषणात अण्णांनी वरील वाक्याचा उल्लेख केला आणि ते म्हणाले, " I am sure, you will also keep your sword. " कोटचा-प्रतिकोटचा करण्याच्या बाबतीतील हें त्यांचे चातुर्य पाहून ते रसिक व विनोदप्रिय नाहीत असे म्हणणाऱ्यास काय म्हणावे ?

फक्त सुसंस्कार करणे हाच स्थायीभाव अण्णांचे व्यक्तिमत्व अशा प्रकारे बहुविध गुणांनी मंडित असले तरी काहींना त्यात काही उणीवा जाणवल्या तर त्यात तरी काय अस्वाभाविक आहे ? एखादा फसवा व अप्रामाणिक आहे असे लक्षात आले तर त्याच्याविरुद्ध त्यांना सात्त्विक संताप येऊन त्यांनी त्यास चांगला धडा दिला आहे व माझ्या संबंधात तू आहेस तोवर तरी मी तुला गैर वागू देणारच नाही अशा दृढ निश्चयाने उभे राहिलेले अण्णा मी क्वचितच पाहिले आहेत. सुसंस्कार करणे हा त्यांचा स्थायीभाव. दुराचाऱ्यास कडक शासन करण्यात ते उदासीन !

शाबासकी देण्यात हात आखडता चांगले काम करणाऱ्यास त्याच्या कामाबद्दल पदोपदी उत्तेजन देण्यात अण्णा थोडे कमीच पडतात की काय अशी शंका मनात येऊन जावी असे केव्हा केव्हा जरूर घडते. उत्तेजनाचे काही अधिक शब्द अथवा चेहऱ्यावर अनेक प्रसंगी साफल्याची–समाधानाची भावरेखा त्यांनी दर्शविली असती तर कामास दुप्पट हुरूप आला असता.

डोक्यावरून जाणारे उपदेश अण्णा भाषण करतात तेव्हा ते फार तळमळीने बोलतात. त्यांची भाषणे प्रौढांच्या दृष्टीने फारच प्रभावी व उपयुक्त वाटतात. पण १५–१६ वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या ती डोक्यावरून कधी कधी जात असावी.

थोर समाजशिक्षक 'सदाचार चिंतनी'तील त्यांचे विचार ही समाजाला लाभलेली बहुमोल देणगी आहे. विद्यार्थ्यांना हस्तलिखितांतून व वेळोवेळी सभांतून दिलेले गेल्या चार तपांतले सुविचारच 'समाचार' मासिकाच्या संपादकीय लेखनातून आपणाला

गंगाजलाप्रमाणे लाभले आहेत. 'सदाचार चिंतनी' हे त्यांच्या अनुभवाचे सार आहे— गीता आहे. 'माणसे जोडा. तोडू नका', 'खुर्ची मिळते, गुण मिळवावे लागतात', 'स्वार्थाकरिता तरी नीट वागा', 'अश्व, वृषभ व गर्दभ वृत्ती', 'तीन पैशात सोळा आणे काम' यासारखे किती उत्कृष्ट विचार सांगावे ?

अष्टपैलू व्यक्तिमत्व एक आदर्श अध्यापक म्हणून तुम्ही अण्णांना मानणार की, एक कुशल संस्थाचालक म्हणून त्यांचे अनुकरण करणार ? एक समाजसेवक म्हणून स्फूर्ती घेणार की, एक प्रभावी लेखक म्हणून त्यांच्या ग्रंथांचे अध्ययन करणार ? अण्णांचे व्यक्तिमत्व हे बहुविध आहे. त्यांच्या गुणांचे अंशतः अनुकरण जरी आपण करू शकलो तरी आपण स्वतःस धन्य समजावे.

८०. आता आपण उपास सोडू

श्री. एच्. के. साळुंखे, बी. ए., बी. एड्.

व्यवसाय : मुख्याध्यापक, विद्याविकास मंदिर, कलेढोण

शिक्षणकाल १९४६ ते १९५०

ग्रामीण शिक्षणास व सेवेस वाहिलेले जीवन

शिस्तीची समस्या गेली पाच-सहा वर्षे मी माझ्या शाळेत शिस्त निर्माण करण्याच्या दृष्टीने निरनिराळे प्रयोग करीत आलो आहे. परंतु आजकाल शाळांतून पौगंडावस्थेत असणाऱ्या विद्यार्थ्यांत शिस्त निर्माण करणे व त्यांचे चारित्र्याची जडण-घडण करणे हे दिवसेंदिवस फारच त्रासाचे होऊ लागले आहे हा अनुभव बहुतेकांना येऊ लागला आहे. अशा या काळात गुरु. अण्णांनी आमच्यावर केलेले संस्कार हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांचे त्या काळातील प्रयोग आज फारच उपयोगी आहेत.

जन्माची शिदोरी मला १९४६ ते ५० या काळात महाराष्ट्र विद्यालयात व अनाथ विद्यार्थी गृहात विद्यार्थी म्हणून राहण्याची संधी लाभली होती. आज जीवना-मध्ये जे काही थोडे फार चांगले आहे त्याचा वाटा याच काळातील संस्कारांकडे जातो हे कबूल करण्यात कसलाही संकोच नाही. याच काळात जी शिदोरी बांधून घेतली तिच्यावरच आजचा प्रवास चालू आहे.

अनभ्यासी आम्ही अण्णांच्या एका तासाला गेल्या आठवड्यातील झालेल्या भागावरचे माझे 'स्पेलिंग' पाठ नव्हते. माझ्याबरोबर माझ्या वर्गातील श्री. वि. सि. पाटील आणि मु. अ. जोशी यांचे पण पाठ नव्हते. आठवड्याचा अवधी आणि अवघे १०–१२ शब्द, आणि तेही आम्ही केले नव्हते. अण्णांचा राग अनावर झाला. अभ्यास न करण्याचे कारण त्यांनी विचारले ! आमच्याजवळ कसलेही सयुक्तिक कारण नव्हते. योग्य कारण असेल तर अण्णा कधीच शिक्षा करीत नसत. परंतु आमच्याकडे कारण काहीच नव्हते. गुरु. अण्णा फारच चिडले होते, खूप रागावले होते हे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्टपणे प्रतीत होत होते. आता काय शिक्षा होणार याकडे आमचे लक्ष होते. फार मोठी शिक्षा होणार असे वाटत होते. छडी मागविली होती. परंतु का कुणास ठाऊक, छडीचा प्रसाद अगदीच थोडा मिळाला. गुरु. अण्णा क्षणभर थांबले आणि त्यांनी सांगितले "शाळा सुटताच राममंदिरात जा आणि गीता पठण करा."

गीतापठण व भूक आम्ही श्रीमत्भगवद्गीतेचे पुस्तक हातात घेतले आणि धनुर्धारी राम-मंदिरात जाऊन गीता-पठणास सुरुवात केली. आश्रमातील मुले मंडपात आली. प्रार्थना झाली. भोजनास गेली. दुपारी १ वाजला. २ वाजले. जसजसा वेळ जाऊ लागला तसतसे चित्त स्थिर ठेवणे अवघड होऊ लागले. गीता-पठणावरील ध्यान भुकेकडे जाऊ लागले. परंतु राम-मंदिर सोडणे शक्य नव्हते. आम्हांला आमच्या कृत्याची लाज वाटू लागली होती. पण काय करणार ? सायंकाळचे सहा वाजले. व्यायाम सुरू झाला. पुन्हा आश्रमवासीय मंदिरात जमले. सायंकाळची प्रार्थना झाली. भोजने झाली. आम्ही मंदिरातच गीता-पठण करीत होतो. रात्रीचे आठ झाले. नऊ झाले. काहीच हालचाल दिसेना. आमचा धीर सुटत चालला. गुरु. अण्णांची शिक्षा ! अन्य कोण लक्ष घालणार ? काय करावे हेच कळेना. आम्हाला शंका येऊ लागली. गुरु. अण्णा विसरले तर नाहीत ना ? त्यांना आठवण करून कशी द्यायची ? कोणी द्यायची ? आपण तर राममंदिर सोडून चालणार नाही. काय करावे ?

अण्णांचाही उपास सुटला मनात नाना विचार येत होते. तोच गुरु. अण्णांचा निरोप आला. "जा जेवण करा. तुमची जेवणे झाल्याशिवाय मी जेवणार नाही." निरोप आणणाऱ्या विद्यार्थ्याने गुरु. अण्णा सकाळपासून न जेवल्याचे सांगितले ! आम्ही खूप शरमिंदे झालो. खूप खूप शिक्षा झाली असती तरी मनाला वाटले नसते त्यापेक्षा अधिक परिणाम झाला. आपल्या चुकीसाठी अण्णांना दिवसभर उपवास काढावा लागला. केवळ आपल्या चुकीसाठी त्यांना शिक्षा ? खूप वाईट वाटले आणि त्या दिवसापासून अशी पाळी येऊ द्यायची नाही असा निश्चय केला. माझ्या जीवनावर त्या प्रसंगाचा फार मोठा परिणाम झाला. तो प्रसंग मी कधीच विसरणार नाही.

□ □ □

८१. 'देवापुढे निश्चय करा'

श्री. एम्. बी. थोरात

व्यवसाय : ग्रेडर, अॅग्रि. प्रो. मार्केट कमिटी

शिक्षणकाल १९४७ ते १९५२

सुस्वभावी सौजन्य वृत्तीचे नागरिक

आश्रमाची देणगी माझे शिक्षण अ. वि. गृहात झाले. मला या आश्रमात जे शिकावयास मिळाले त्याचा आज मला व्यवहारात फार उपयोग होत आहे. मी जर आश्रमात शिकलो नसतो तर माझ्या आयुष्याला निराळेच वळण लागले असते. तेव्हा मला माझ्या आश्रमाचा व गुरुजनांचा फार आदर आणि अभिमान आहे. मला चांगले गुण आमचे परमपूज्य गुरुवर्य अण्णासाहेब यांचेपासून मिळाले.

चोरून सिनेमाला गेलो सन १९५१ सालची गोष्ट असेल. त्या वेळी आम्ही १० वी इयत्तेत शिकत होतो. आश्रमाच्या नियमाप्रमाणे सिनेमाला परवानगीशिवाय जाता येत नसे. परंतु मी आणि माझ्या दोन मित्रांनी सिनेमा चोरून पाहावयाचे ठरविले. त्याप्रमाणे एके दिवशी आम्ही रात्री नऊ वाजता आश्रमातून बाहेर पडलो. परंतु आम्ही सिनेमाला गेल्याचे आश्रमात तावडतोब निदर्शनास आले. दुसरे दिवशी सकाळी आम्ही गुरु. अण्णासाहेब आल्यानंतर त्यांना भेटण्यास गेलो. आम्हांला झालेल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला होता.

देवाची क्षमा मागा आम्ही सर्व हकीकत अण्णासाहेबांना सांगितली व आम्ही क्षमा मागितली. गुरु. अण्णासाहेब शांत वृत्तीने पाहात होते व त्यांनी आम्हांला क्षमा केली. त्या वेळी त्यांनी म्हटलेले शब्द अजून आठवतात. ते म्हणाले होते की "एखाद्या माणसाने जर गुन्हा केला तर आपण त्या गुन्ह्याबद्दल तिटकारा करावा, परंतु ज्याने गुन्हा केला त्या माणसाबद्दल नेहमी दयाळू व सहानुभूतीच्या वृत्तीने पाहावे. गुन्हा करणे ही गोष्ट कोठल्याही माणसामध्ये जन्मतः आलेली नसते. पुष्कळदा ह्या चुका अजाणतेपणाने घडतात आणि म्हणूनच त्या वेळच्यावेळी सुधारल्या पाहिजेत. झाले ते झाले, आता ते विसरून जा आणि राममंदिरात जाऊन देवाची क्षमा मागा आणि तेथेच निश्चय करा की यापुढे असा प्रसंग येणार नाही." त्याप्रमाणे आम्ही रामापुढे निश्चय केला व तो मी आजपर्यंत टिकविला आहे.

□ □ □

८२. अध्यापकांचे प्राध्यापक पण माझे बंधू

डॉ. गं. श्री. कोशे, एम्.ए., डॉक्टर ऑफ एज्यु. (कोलं. युनि.)
व्यवसाय : अ. वि. गृहाचे कार्यकर्ते
सहकारी कार्यकर्ते १९४८ ते १९५५ व १९६४ पासून—
शिक्षण, प्रकाशन, परदेश–शिक्षण–विभाग इ. कामे

जीवनात परिवर्तन गुरु. अण्णांची व माझी पहिली भेट मुंबईस श्री. मु. ल. जोशी यांच्या घरी झाली. एम्. एड्. च्या अभ्यासासाठी दिल्ली येथील सेंट्रल इन्स्टिटचूटमध्ये जाण्याचा माझा विचार मी त्यांना बोलून दाखविल्यावर त्यांनी अल्पावधीतच माझा विचार बदलून पुण्यास संस्थेमध्ये येण्यास सांगितले आणि पुण्याच्या टिळक कॉलेज-मध्ये माझ्या एम्. एड्. च्या शिक्षणाची सोय केली. माझ्या आयुष्यक्रमात गुरु. अण्णांनी केलेले हे महत्त्वाचे परिवर्तन.

आमच्या चर्चेतील माझ्या अजून लक्षात राहिलेले गुरु. अण्णांचे वाक्य म्हणजे, "सरकारला कामासाठी माणसे मिळू शकतात. खाजगी संस्थांना माणसे मिळणे कठीण जाते." माझे शिक्षण समर्थ विद्यालयात झालेले. तेव्हा तेथे झालेले संस्कार मी सरकारी नोकरीत फुकट घालवू नयेत, कारण तेथे त्यांचे चीज होणार नाही या त्यांच्या विचारांचा परिणाम माझ्या मनावर झाला आणि सेंट्रल इन्स्टिटचूट ऑफ एज्युकेशनमधील एम्. एड्. चा अभ्यासक्रम पूर्ण करून सरकारी नोकरीत शिरण्याचा माझा विचार मी रहीत करून दुसरेच दिवशी संस्थेत दाखल झालो.

एम्. एड्. प्राध्यापक त्यानंतरच्या वर्षात टिळक कॉलेजमधील शिक्षणक्रमात 'कम्पॅरेटिव एज्युकेशन' या विषयात गुरु. अण्णांचा विद्यार्थी म्हणून आणि महाराष्ट्र विद्यालयात त्यांच्या मार्गदर्शनाखाली उप-मुख्याध्यापक म्हणून असे माझे दुहेरी नाते त्यांच्याशी निर्माण झाले.

'कम्पॅरेटिव एज्युकेशन' या विषयावरील गुरु. अण्णांची भाषणे ऐकताना, त्यांच्या व्यासंगाबद्दल मला नेहमी आदर वाटे. त्यांच्या अध्यापनात विषयप्रतिपादनाबरोबरच संस्कार करण्याचा हेतू असे. मौल्यवान शैक्षणिक विचारांचा ठसा शिक्षणात वावरणाऱ्या व्यक्तींच्या मनावर उमटल्याशिवाय शिक्षणात सुधारणा होणार नाही या श्रद्धेने अण्णा शिकवीत. माझी खात्री आहे की त्यांची भाषणे ऐकलेल्या विद्यार्थ्यांच्या हातून शिक्षण-क्षेत्रात काही ना काही चांगले खास होत असले पाहिजे. आमच्या वर्गाच्या वार्षिक संमेलनप्रसंगी गुरु. अण्णांनी केलेल्या भाषणात शैक्षणिक वाङ्मयाचे विपुल वाचन

करण्याचा उपदेश विद्यार्थ्यांना दिला. 'सतत वाचन आणि लेखन केल्याने विचार प्रगल्भ होतात. परीक्षेला नेमलेल्या पुस्तकांचा अभ्यास हा सर्वसाधारण दिशा दाखविणारा आहे. त्यात परिपूर्णता मानू नये.' मला आठवते की त्या वेळी काही विद्यार्थ्यांनी या विचारांचे महत्त्व नीटसे जाणले नाही. शिक्षकीय जीवनातील नेहमीच्या तक्रारी पुढे करून, अशा वाचनास लागणारे मनःस्वास्थ्य व वेळ शिक्षकास मिळत नाही म्हणून हा उपदेश व्यवहार्य नाही असे एकजण म्हणाले. जीवनात होणाऱ्या संस्काराची रीत ही अशी असते. सुसंस्कार करणाऱ्या व्यक्तींचे साहचर्य जीवनात प्रत्येकाला थोडे फार लाभते, नाही असे नाही. पण काहींना त्याचा उपयोग होतो, काही त्यापासून अलिप्त राहतात. त्यांची मनोवृत्ती त्यांना अलिप्त ठेवते.

माझ्यावर झालेल्या या संस्कारांचा परिणाम म्हणजे शैक्षणिक वाङ्मयाच्या वाचनात मी आजपर्यंत ठेवलेले सातत्य. विपुल वाचन करण्याची हौस निर्माण झाली· मात्र लेखन जेवढे व्हावे तेवढे माझ्या हातून अजून झाले नाही. गुरु. अण्णा वरचेवर प्रेरणा देतात. पण लेखनाची बैठक अजून जमली नाही हे खरे.

तत्त्व सांगून स्वातंत्र्य महाराष्ट्र विद्यालयात गुरु. अण्णांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापकाचे काम करीत असताना, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे व शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे माझ्या मनावर झालेले परिणाम मला फार मोलाचे वाटतात. कारण प्रत्यक्ष काम करीत असताना ज्या तत्त्वांची प्रचीती येते ती तत्त्वे महत्त्वाची वाटतात आणि आचरणात उतरतात.

शासन-व्यवस्थेच्या धोरणातील एक महत्त्वाचे तत्त्व असे सांगितले जाते की, एखाद्या कामासाठी योग्य व्यक्तीची निवड केल्यावर त्या व्यक्तीस संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याने कामातील कार्यक्षमता वाढते. नामवंत शासक म्हणून ज्यांनी लौकिक मिळविला त्या सर्वांना या तत्त्वाची प्रचीती आलेली असली पाहिजे. गुरु. अण्णांच्या धोरणात या तत्त्वाचा मला वरचेवर अनुभव आला. त्यामुळे विद्यालयात माझ्या कामाला सुरुवात झाल्यावर अल्पावधीतच माझा जम बसला. माझे स्वातंत्र्य मर्यादित झाल्याचे मला कधीही वाटले नाही किंवा माझ्या निर्णयांना कधी विनाकारण विरोध झाला नाही. काही निर्णय पुरेशा अनुभवावर आधारलेले नसल्यास त्यांची तात्त्विक पार्श्वभूमी समजाऊन सांगून त्यांतील दोष मला पटवून दिले गेले. काम करीत असताना शिक्षणाची संधी मिळते ती ही अशी. मला वाटते अशी संधी फार थोड्यांना मिळत असावी.

सर्व शाळा आपल्याच अध्यापकीय जीवनास मी सुरुवात केली तेव्हा मी फार रागीट होतो. अध्यापनाचा आणि उपदेशाचा परिणाम विद्यार्थ्यांवर चटकन व्हावा अशी माझी अपेक्षा असे. या अपेक्षेस न उतरणाऱ्या विद्यार्थ्यांवर मी चडफडे. प्रसंगी कमी अधिक शिक्षाही माझ्याकडून होई. पण संतापून केलेल्या शिक्षेचाही परिणाम जेव्हा दिसत नसे त्या वेळी विद्यार्थ्याला शाळेतून हाकलून देण्याचा माझा निर्णय घेऊन मी गुरु. अण्णांकडे जाई. अशा काही प्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले विचार माझ्या अजून

लक्षात आहेत. ते म्हणत, "या मुलांना हाकलून दिल्यावर ती जाणार कोठे ? दुसऱ्या एखाद्या शाळेतच ना ? तेथे ती सुधारतीलच असे नाही. शेवटी ती न सुधारताच समाजात जाणार. म्हणून या मुलांचा विचार करताना, ती पुढे समाजाचा घटक होणार आहेत आणि त्यांना शक्य तितके सुधारून समाजात सोडायला पाहिजे या भावनेने पाहणे जरूर आहे. नाही तर अप्रत्यक्ष रीतीने आपणच आपल्या समाजात प्रश्न निर्माण करतो असे होईल." तेव्हापासून मुलांना हाकलून देण्याची माझी भाषा बंद झाली. एवढेच नव्हे तर या विद्यार्थ्यांकडे पाहण्याची माझी दृष्टी आमूलाग्र बदलली. समाजातील सर्व विद्यार्थ्यांची मिळून एकच शाळा आहे असे मानले तर विद्यार्थ्याला हाकलून तरी देणार कोठे ? शिक्षणाचा सर्वकष विचार करण्याची शाळेची ही 'वसुधैव कुटुंबकम्'सारखी व्यापक कल्पना माझ्या मनावर तेव्हापासून बिंबली. निकटवर्ती व्यक्तिमत्त्वाच्या अनुभवी विचारांचे संस्कार हे असे असतात. त्यांचा एकच स्पर्श विचार-परिवर्तनाला पुरेसा होतो.

प्रयोगवृत्तीला चालना विद्यार्थ्यांच्या शिस्तीच्या बाबतीत गुरु. अण्णांनी मला प्रयोगशील बनविले. त्यांच्या वाचनात कोठे एखादा नवा प्रयोग आला तर त्याची माहिती ते मला देत. त्यामुळे तो प्रयोग करून पाहावासा वाटे. शनिवारची विद्यालयसभा हे त्या वेळी माझे प्रयोग-क्षेत्र होते.

व्यक्तीशी संबंध निर्माण करणे आणि तो टिकविणे या कलेचे तंत्र गुरु. अण्णांपासून शिकावे. विशेषतः शिक्षकांशी वागताना मला जे प्रश्न निर्माण होत त्या प्रश्नांवर चर्चा करताना या तंत्राची शिकवण मला मिळाली. एखादा मनुष्य नको असला तरी त्याच्याशी स्नेह ठेवून त्याला निरोप द्यावा, एकमेकांची तोंडेसुद्धा न पाहण्याइतके संबंध विकृत होण्याची पाळीच आणू नये हा संस्कार जीवनात कोणालाही उपयोगी पडेल.

प्रोत्साहन शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण करावे असा गुरु. अण्णांचा आग्रह असे. त्याप्रमाणे हे निरीक्षणाचे काम मी अधूनमधून करीत असे. निबंधाच्या अध्यापनाचा पाठ पाहिल्यावर एका शिक्षकबंधूस त्यासंबंधी काही सूचना देत असताना एक दोन मुद्द्यांवर आमचा थोडा वादविवाद झाला. गुरु. अण्णांचे कार्यालय शेजारीच असल्याने त्यांच्या कानांवर ही चर्चा गेली. चर्चेतील माझ्या भूमिकेचे व विधानांचे त्यांनी-मागाहून कौतुक केले. निरीक्षणाच्या माझ्या कामात मला त्यामुळे अधिक आत्मविश्वास वाटू लागला.

प्रगतिशीलता वाढवा शिक्षकाची बौद्धिक आणि व्यावसायिक प्रगती व्हावी यासाठी गुरु. अण्णा नेहमी दक्ष असतात. शैक्षणिक वाङ्मयाचे वाचन, पदवी-परीक्षेचा अभ्यास, एखाद्या परकीय भाषेचा अभ्यास, सभा-संमेलनात प्रत्यक्ष भाग घेणे, भाषणांना जाणे इत्यादी गोष्टींत त्यांचे नेहमी उत्तेजन असे. त्यांच्याकडे येणारी पुस्तके व मासिके यांच्यातील महत्त्वाच्या भागावर खुणा करून ते शिक्षकांकडे पाठवितात. शिक्षकांनी निदान तेवढे तरी वाचावे अशी त्यांची अपेक्षा असते.

'माझा लहान भाऊ' परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची प्रेरणा गुरु. अण्णांच्या साहचर्यामुळे मला मिळाली. परदेशी जाण्याचा विचार १९५५ मध्ये जेव्हा मी निश्चित केला त्या वेळी अगदी आपुलकीने त्यांनी मला मार्गदर्शन केले. निरोपसमारंभाच्या भाषणात 'माझा लहान भाऊ' असा उल्लेख करून त्यांनी मला १०१ रु. ची रक्कम दिली. तो प्रसंग अविस्मरणीय आहे.

गुरु. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य मला जर कोणी विचारले तर मी म्हणेन की त्यांनी स्वतःच्या संस्कारक्षम जीवनात चांगले संस्कार घेतले आणि नंतरच्या जीवनात इतरांना ते निरलसपणाने दिले. जेथे जेथे त्यांचा संबंध येतो तेथे तेथे ते संस्कार-दान करीत असतात.

□ □ □

८३. विचारांची जोपासना करीत आहे

प्रा. प्र. र. जोशी, बी. ए., एम्. कॉम्.
व्यवसाय : प्राध्यापक, एम्. एल्. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स, विलेपार्ले
शिक्षणकाल १९४८ ते १९५६
व्यापारशास्त्राच्या अध्ययन-अध्यापनाची अत्यंत आवड

दहा वर्षांनंतरची दृष्टी जवळ जवळ दहा वर्षांनी आश्रमातील आयुष्याविषयी प्रामुख्याने गुरु. अण्णासाहेब खैर यांचेकडून मिळालेल्या शिक्षणाविषयी मी लिहीत आहे. वयाच्या १२ ते २० या वर्षांत मिळालेल्या अनुभवांविषयी वयाच्या ३० व्या वर्षी लिहीत आहे. कदाचित् मी त्या गोष्टी नीट समजावून घेऊन लिहीन अथवा नसलेला अर्थ चिकटविण्याचा प्रयत्नही करीन. हा गुण तसाच दोषही.

समाजाच्या मदतीची जाणीव १९५० ते १९५२ च्या काळात त्यांनी केलेल्या शिक्षेची आठवण होते. न विचारता सिनेमा पाहिल्याबद्दल एक महिना बाहेर राहा असे मला सांगितले गेले. मी समाजाच्या मदतीवर राहात होतो हे फार जारीने कळले. शिक्षेचे महत्त्व कळले, कटुता निर्माण झाली नाही, आणि आज ती गोष्ट नमूद करताना आनंदच होतो. हे सर्व अण्णांचा मोठेपणा दर्शविणारे असेच आहे.

एस्. एस्. सी. होईपर्यंत याहून जास्त काही कळले नाही. स्मृती पुसट आहेत. जे कळले ते दूरान्वयाने. कदाचित त्यांनी एखादा तास वर्गावर घेतला असता तर बरे, असे आज वाटते खास.

पत्रलेखनाचे शिक्षण चार वर्षांच्या महाविद्यालयीन जीवनात अण्णांचा जास्त जवळचा संबंध आला. त्यांना भेटण्याची, त्यांचेबरोबर बोलण्याची संधी मिळाली. भीती कमी झाली व त्यामुळेच आम्हांला अण्णा जास्त कळू लागले.

एका वर्षी फार मोठे काम मिळाले ते म्हणजे अण्णांच्या पत्रलेखनाचे. ते सारांश सांगत, मसुदा उतरवून देत नसत. लेखनकला निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. स्वतंत्र बुद्धीने काम करावे, प्रयत्न करावा, याकडे त्यांचा विशेष कल. शाबासकी त्यांनी दिली नाही त्यामुळे आज बरे वाटते, पण त्या वेळी त्याची गरज वाटे; प्रोत्साहन मिळविण्याकरिता.

येथपर्यंत मी केवळ स्थूल आढावा घेतला आहे. यानंतर लिहिणार आहे ते माझ्या मतांसंबंधी.

नैतिक धैर्याची देणगी माझ्या आश्रमातील वास्तव्यात मला मोठी शिकवण मिळाली ती म्हणजे नैतिक धैर्याची. गुरु. अण्णांनी देऊ केलेली ही देणगी. सर्व अडी-अडचणींना तोंड देऊन, येणारे आघात आनंदी वृत्तीने सहन करीत, पुढील मार्ग आक्रमण करावा. स्वतःला एक नैतिक बैठक निर्माण करून त्यापासून किंचितही न ढळण्याचा प्रयत्न करण्यात मोठा आनंद आहे. खऱ्या अर्थाने मी अण्णांकडून घेतलेली ही जीवनाची शिदोरी.

अढळ निश्चयाची शिकवण त्याचप्रमाणे कुठलीही गोष्ट करताना निश्चयात्मक बुद्धीने, दृढ विश्वासाने करणे ही त्यांचीच आणखी एक शिकवण. कोठल्याही गोष्टीचा सांगोपांग विचार करून, सखोल अभ्यास करून, त्यासंबंधी घेतलेल्या निर्णयात निश्चयाचे बळ असते. शिक्षकास लागणारा सभाधीटपणा त्या निश्चयातूनच निर्माण होतो हा माझा एक वैयक्तिक फायदा.

बारीकसारीक, अनावश्यक तपशिलात लक्ष न घालता मुख्य गोष्टीचा हव्यास धरणे, त्याकरिता शक्तीचा वापर करणे, हीही शिकवण अण्णांचीच.

काही गोष्टी खटकल्या. त्याविषयी प्रामाणिकपणाने लिहावेसे वाटते. हे दोष-दर्शनाकरिता नसून लिखाण पुरे होण्याकरिता आहे.

कार्यापेक्षा शिस्त गौण कडक शिस्त जितकी आवश्यक तितकीच अनावश्यक पण. अनावश्यक अशाकरिता की, एखाद्या कार्याकरिता, कार्यपूर्तीकरिता कसलेच बंधन चालत नाही. शिस्त त्या कार्याच्या आड येऊ शकते. शिस्त पाळण्यातच बरीचशी शक्ती वाया जाते. अशा वेळी शिस्त गौण ठरते व हाती घेतलेले कार्य मुख्य बाब होऊन बसते.

गरिबीचे काही दोष दारिद्र्य, गरिबी यांतून निर्माण होणारी प्रवृत्ती दुहेरी असू शकते. लाचारी वा वृथा अहंकार, थोडीशी कटुता. या दोन्ही प्रवृत्ती टाळण्या-करिता स्वतःलाच झटावे लागते. या दोन्ही गोष्टी नीट बाजूला ठेवून योग्य अशी प्रवृत्ती निर्माण करणे आवश्यक आहे. या वृत्ती लादल्या गेल्या असे मला म्हणावयाचे नाही पण त्या दूर करण्याकरिता स्वतः झटावे लागले.

जवळ पण दुर्लभ आश्रमात असेतोपर्यंत अण्णा आम्हांला फारसे लाभले नाहीत. अनेक विद्यार्थी, अनेक लोक यांचे अण्णांवर हक्क. त्यात प्रत्येकाच्या वाटचाला ते येणार कितीसे ! त्यांची शिकवण वैयक्तिक संदर्भात जरूर ते फेरफार करून अमलात आणावी लागली.

विचारांची जोपासना हीच गुरुदक्षिणा त्यामुळे आश्रमात असेतो अण्णा कळले फार थोडे. त्यांच्या विचारांचे अनुकरण केले, पण त्यांच्या भोवतालचे वलय, भीती व त्यामुळे निर्माण होणारे त्यांच्यातील व विद्यार्थ्यांतील अंतर पूर्णत्वाने कमी झालेच नाही. May be, it was too much of a reward for us then.

अण्णा खरे भेटले आणि कळले आश्रमातून बाहेर पडल्यानंतरच. त्यांचेबरोबर मोकळ्या मनाने एखाद्या विषयावर चर्चा करीत असता; त्यांचे 'समाचार'मधील विचार प्रत्यक्षात अनुभवीत असता. त्यांनी देऊ केलेल्या शिदोरीची मी जोपासना करीत आहे हीच माझी गुरुदक्षिणा !

□ □ □

८४. पंधरा वर्षांनंतर : माझे प्राध्यापक

प्रा. चंद्रकुमार डांगे, एम्. ए., एम्. एड्.
व्यवसाय : प्राचार्य, शिक्षण महाविद्यालय, बार्शी.
शिक्षणकाल : एम्. एड्. विद्यार्थी १९४९–१९५०
यशस्वी लेखक, वक्ते आणि प्राचार्य

तटस्थ आत्मपरीक्षण काही तैलचित्रे विशिष्ट अंतराहून आणि विशिष्ट दृष्टिकोणातून पाहिली तरच त्या चित्रातील छायाप्रकाश, रंग-संगती, सौंदर्यकारक अनुभव देऊ शकतात; तर वर्तमानकालीन घटना काही वर्षांनंतर पुनः पाहिल्यावर त्यांचे सम्यक् दर्शन होऊन पूर्वग्रहही निवळतात, नवे दर्शन घडू शकते. इतिहासाच्या बाबतीत पुनर्लेखनाला मूलगामी महत्त्व असते ते यामुळेच. अगदी तसेच शिक्षकाच्या जीवनासंबंधीही असते. बाल्य, तारुण्य या अवस्थांमधून दिसणारे त्याच शिक्षकाचे चित्र, आणखी कालांतराने पाहिले तर कसे दिसते हे त्या विद्यार्थ्याला आणि शिक्षकालाही प्रत्ययकारक ठरावे. असे वस्तुनिष्ठ पाहणे अध्ययन-अध्यापन क्षेत्रातील सर्वांनाच उपयुक्त. कारण ते एक प्रकारचे तटस्थ आत्मपरीक्षण असते.

प्राध्यापक म्हणून पहिले दर्शन ८ ऑगस्ट १९४८ ला मी टिळक शिक्षण महाविद्यालयात नोकरीस रुजू झालो आणि १९४९ च्या जूनमध्ये एम्. ईडी. च्या पदव्युत्तर शिक्षणवर्गाच्या अभ्यासासाठी नाव घातले.

अनेक पाश्चिमात्य देशांतील शिक्षण-पद्धतींचा अभ्यास असलेल्या दोन प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमात होत्या. केवळ या बाह्य आकर्षणामुळे मी हाच Comparative Education चा अभ्यास निवडला. या विषयाची व्याप्ती कल्पनेत नव्हती. आणि मग एका पावसाळी सकाळी, फ्लॅनेलचा नाजुक हिमानी रंगाचा मफलर घातलेले, डॉ. खैर वर्गात आले. अति वेधक नजरेच्या, नाजुक पण काटक शरीरयष्टीच्या गुरुजींनी विषयाचा उपन्यास केला.

ते बोलणे आजही कानात आहे त्या वर्षभरातल्या व्याख्यानांनी काय साधले ? कोणता चिरंतन ठसा उमटवून ठेवला ? हे पाहायचे ठरवून हा पंधरा वर्षांचा कोपरा किलकिला केला तो तेच घन चकाकत असलेले पाहून विस्मयाने मन न्हाऊन गेले. महाराष्ट्रीय माणसे कोणतीही परभाषा बोलू लागले, विशेषतः इंग्रजी बोलू लागले की जो अकारण द्राविडी प्राणायाम करतात, तो तर नव्हताच पण अनावश्यक आघातही नव्हते. बाह्यतः सोपे वाटणारे पण अर्थपूर्ण शब्दांनी मंडित केलेले डॉ. खैरांचे बोलणे आजही कानात जागे आहे. सुमारे पन्नास विद्यार्थ्यांच्या वर्गाला पुरेल असाच बेताचा आवाज होता, त्याची मृदुता कमावलेल्या तंतूवाद्याप्रमाणे होती. या सर्वांला लपेटून टाकणारे त्यांचे हास्य विलक्षण रम्य वाटे. या बहिरंगाला शिक्षकाच्या संस्कार करण्याच्या सामर्थ्यात फार मोठे स्थान आहे.

कोण येतोय यावर लिहायला ? तौलनिक शिक्षण म्हणजे पाश्चिमात्य देशांशी तुलना करून भारतीय शिक्षणाचे न्यून सतत उघडे करणे नव्हे हा मोलाचा निकष डॉक्टरांनी पहिल्याच वाक्यात सांगितला. पण आपले ऐतिहासिक परीक्षण करताना ते अवाजवी मृदू झाले नाहीत. आपले दोष, उणिवा परखडपणे त्यांनी व्यक्त केल्या. त्यामागे पराभूततेचा मागमूस नव्हता. हिटलरच्या जर्मनीने केलेल्या प्रचंड प्रगतीचे दौर्बल्य कुठे आहे हे सांगून देखील ते हेही सांगायला विसरत नसत की त्यातही जे सुवर्ण आहे ते आपण स्वीकारलेच पाहिजे.

बोलताना सहज ओघ आला युवक चळवळीवर. पौर्वात्य, विशेषतः भारतीय आणि पाश्चिमात्य युवकांच्या शिक्षणासंबंधी ते इतके मोहरून बोलले की मी त्याच विषयावर प्रबंध लिहायचा ठरविले.

असे एक नव्हे तर कितीतरी विषय ते सांगत आणि लगेच पुस्तकांची नावे सांगून, मंद स्मित करून म्हणत, 'बोला, कोण येतोय यावर लिहायला ?' १९४१ चा इंग्लंडमधील शिक्षणाचा कायदा, अमेरिकेतील बहूद्देशीय शाळा, जपानमधील मुलींचे हस्तव्यवसाय, इंग्लंडमधील अभिजात भाषा (ग्रीक, लॅटिन) आणि आधुनिक

युरोपीय भाषा यांचे अध्यापन, रशियातील सांस्कृतिक चळवळी असे शेकडो विषय डॉक्टर सांगत.

सारे जग पाहिलेले प्राध्यापक पण त्यांचे भारतविषयक भान, संदर्भ कधी सुटलेला नसे. परदेशातील कोणताही प्रश्न असो, भारताच्या दृष्टीने त्याचे स्वरूप सतत हाताळले गेल्याने, भारतातील प्रश्नांचे वास्तव रूप आमच्या पुढून कधी ढळले नाही. त्यातही नमूद करण्यासारखा विशेष असा की, भारतातील प्रश्न कितीही अवघड असला तरी त्याच्या सोडवणुकीबद्दल डॉक्टर कधी निराश दृष्टीने बोलत नसत. हे फार फार महत्त्वाचे आहे. एक चैतन्यमय आशावाद विवेचनामागे डॉक्टर राखीत. याचा झालेला संस्कार इतका खोलवर गेला आहे की, शिक्षणाच्या दृष्टीला आम्हाला मरगळ कधीही जडली नाही. सतत चौफेर पाहून, संयत वृत्तीने पाहण्याची निरोगी सवय जडली. पदव्युत्तर अभ्यासात जी जागृत तटस्थता आणि सहानुभूतिपूर्ण बौद्धिक दृष्टी लागते त्याचे वरदान लाभले. याची साक्ष आपल्या संरक्षणमंत्र्यांनी, श्री. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या अ. वि. गृहाच्या भेटीच्या वेळी डॉक्टरांच्याबद्दल बोलताना स्पष्टपणे दिली. श्री. यशवंतरावांचे ते वाक्य असे "डॉ. खैर कौन्सिलमध्ये आमच्याबरोबर होते. जरी ते विरोधी, दुसऱ्या बाजूच्या बाकावर बसत (हशा) तरी ते आम्हाला कधी परके वाटले नाहीत. टीका विधायक करीत, सरकारी बाजू समजून घेत." ही साक्ष फार मोलाची आहे. याचा अनुभव डॉक्टरांनी सतत दिला. आणि अगदी दुर्मिळ पण फार आनंददायक झटका त्यांच्या या वाक्याने जो मिळे, तो तर अवर्णनीय आजही आहे. विवेचन करताना म्हणायचे, 'जपानमध्ये मला एकदा हे दिसले की...' त्या वेळी सर्रकन् अंगावर रोमांच मोहरून जायचे. समोर बसलेले आपले प्राध्यापक सारे जग बघून आलेत, या प्रत्ययाच्या दाखल्याने सारा वर्ग अवाक् होई. कारण या भ्रमंतीच्या खुणा पोषाखात नव्हत्या, बोलण्यात नव्हत्या, उच्चारात नव्हत्या. प्रदर्शनीयतेचा दूरचा स्पर्शदेखील त्यात नव्हता. शिक्षणावरचे ज्यांचे पुस्तक सरकार जप्त करते (जपानची जीवनक्रांती) त्यांच्या बोलण्यातली दाहकता, शमीच्या वृक्षाखाली लपेटलेल्या शस्त्राप्रमाणे भासे पण चटका कधी देत नसे.

ती देखणी व्याख्याने मनाचे क्षितिज विस्तारणे, वास्तवातून आदर्शाचा वेध घेणे आणि हे सारे आत्मपरीक्षण करीत करीत करणे, हे जर पदव्युत्तर अध्यापनाचे श्रेय मानले तर ते डॉक्टरांनी प्राप्त करून आम्हांला दिले. भारत सरकारच्या शिक्षणखात्यात उच्चाधिकारावर आज असलेले डॉ. द. वि. नवाथे, त्यांचा हा विषय नसूनही आमच्या वर्गात येऊन बसत आणि तेही माझ्या बाकावर. डॉक्टरांची जर्मनीवरची व्याख्यान ऐकताना काही आवडले की मला चिमटा काढीत. स्वतःची आवड व्यक्त करण्याची त्यांची खरी तऱ्हा पाठीत बुक्का मारायचा ही होती. वर्गात ते शक्य नव्हते म्हणून हा चिमट्याचा गनिमी कावा. असे चिमटे खुणा न ठेवता गेले खरे पण जर्मनीवरची ती देखणी व्याख्याने हरीभरी, हिरवी बनून आज मनात डोलत आहेत. कारण त्याला नवदर्शनाची

(interpretation) बरसात लाभली होती. नवदर्शन हा तर पदव्युत्तर अध्यापनाचा प्राण होय. हे डॉक्टरांनी नुसते घडविले नाही तर तसे करण्याची दृढ सवय मनात कोरली. अशी कोरीव लेणीच विद्यार्थ्यांच्या मनात नवा 'प्राप्तकाल' निर्माण करून 'सुंदरतेची लेणी' खोदायला प्रवृत्त करतात.*

हा गृहस्थ इतका समधात कसा ? 'डॉ. खैर आदर्श शिक्षक होते' या झिजून गुळगुळीत झालेल्या शब्दसंहतीने मला त्यांचे वर्णन करायचे नाही. आदर्शावस्थेकडे झुकणाऱ्या मनोवृत्तीतून आम्ही पार झालो होतो. परीक्षार्थी होतो हे तर खरेच. तसे असण्यात गुन्हा नाही. विद्यार्थी प्रथम परीक्षार्थी असतो आणि मग सर्व काही. पण हे साधताना जे लाभते ते 'अक्षर' ठरते. हे देताना जर गुरू स्वतःचा कडवटपणा, निराशा दूर करू शकला नाही तर त्याचे अध्यापन 'प्रवचन' होणार नाही. पदव्युत्तर अध्यापन करणारे शिक्षक 'प्रवचनकार' असले पाहिजेत, कीर्तनकार नव्हेत. कारण दोहोंच्या भूमिकाच वेगळ्या, उद्दिष्टे वेगळी. त्यात उण्या-अधिकाचा प्रश्न नाही. प्रवचनात गृहीत पुष्कळ असते ते श्रोत्यांच्या वाजूने. पण निखळ अनुभूतीच्या द्वारे जो निरामय सत्य, आशेने भिजून चिंब झालेले सत्यदर्शन घडविण्याच्या मार्गावर हात धरून नेतो तो प्रवचनकार.

नेहमी मला मनात वाटायचे की ज्यांच्या मातोश्रींनी साधन म्हणून पत्रावली गुंफण्याचा मार्ग देखील अनुभवला, अनाथ या विशेषणाने सुरू होणाऱ्या संस्थेत ज्यांचा जन्म गेला, तो हा गृहस्थ इतका समधात (poised) कसा राहू शकतो ? पण हे घडले खरे.

दारिद्र्याच्या वेदना बहुस्पर्शी असतात. पण त्यांच्या खुणा अंगावर लेवून, त्याला आशेने झाकून, इतरांना प्रवृत्तीकडे नेणारे अत्यल्पच असतात. ना गरिबीचा वृथा अभिमान, ना त्या झळाबद्दल खंत, ना वर्तमानातील स्थितीबद्दल आत्मसंतुष्टता. या साऱ्या कालप्रवाहात आम्ही खूप वेचले, टिपले, जपले. असे जे कोणी या अध्यापनाच्या विशाल क्षेत्रात असतील त्यांचे एक प्रतीक, एक प्रतिनिधी डॉ. खैर. गुरुऋण फेडायचे नसते हा भारतीय संस्कृतीचा बहुमोल संकेत आहे. गुरु दक्षिणा मागतो तीही पुनः परीक्षा व्हावी या हेतूने. असे गुरुजी भेटावेत असेच आम्ही म्हणणार. पण असे शिष्य भेटावेत का हे त्यांनी मोकळेपणाने सांगायचे आहे. गुरूप्रमाणे सर्वच शिष्य आदर्श कुठून असायचे ? आपण त्या यादीत नाही ही जाणीव असणे हा देखील गुरूच्या वाणीचा प्रभाव. अशी खोल जाणीवच प्रेरक ठरते. ती झाली आहे हे कबूल करायला संकोच कसला ?

□ □ □

---

* प्राप्तकाल हा विशाल भूधर
निजनामे त्यावरती नोंदा...(तुतारी) केशवसुत.

८५. घडा घडा बोलायला शीक

श्री. म. द. कस्तुरे, बी. ए. (ऑ.); बी. एड्.

व्यवसाय : आजीव सेवक, पुणे अ. वि. गृह

शिक्षणकाल १९४९ ते १९५४

नव्या पिढीतील अ. वि. गृहाचे सौजन्यशील कार्यकर्ते

डोळे उघडा आणि पाहा संध्याकाळची साडेसातची वेळ होती. आश्रमातील सर्व विद्यार्थी प्रार्थनेसाठी राममंदिरात जमले होते. दैनंदिन व्यवहारातील कामे संपल्यावर नेहमीप्रमाणे एका विद्यार्थ्याने सुविचार सांगितला, "टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही." त्यावर मनन करण्यासाठी सर्वांनी वीरासन घातले व डोळे मिटले. सभोवार पूर्ण शांतता होती. काही वेळानंतर "डोळे उघडा, हा पाहा हार नि हा गुच्छा मला आज मिळाला. माझा आज बाहेर एका ठिकाणी सत्कार झाला." असे शब्द एकदम आमच्या कानावर आले. आम्ही डोळे उघडून पाहिले तो समोर गु. अण्णा हातात गुच्छ व हार घेऊन उभे होते. वडिलांच्या ममतेने व शिक्षकाच्या तळमळीने गुरु. अण्णांनी आम्हाला आवाहन केले. "तुम्ही खूप अभ्यास करा. विद्वान् व्हा, तुमचाही सत्कार समाज करील."

आज मर्म कळते गुरु. अण्णा असे मधूनच सुसंगतीस येत असत व एखादा नवीन विचार सांगत असत. त्यांचे विचार त्या वेळेस आम्हांस पचत होते असे नाही, पण त्यांतील महत्त्व मात्र आम्हांस काही काळ का होईना गंभीर बनवी, विचार करावयास लावी. आजही गुरु. अण्णांचे हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एखाद्या बाबतीत त्यांचा सल्ला विचारण्यास त्यांच्याकडे कार्यालयात गेल्यावर पहिला प्रश्न ते विचारतात, "तुम्ही यावर काय विचार केला आहे ? तुम्हांला तुमच्या स्वतःच्या विचारांची एक दिशा हवी." त्यांचा हा प्रश्न आमच्यांतील बौद्धिक उदासीनतेला धक्का देतो. विचारांना चालना देतो, कृतीला आवाहन करतो, आणि त्यामुळे साहजिकच आमच्या हातून कामे व्यवस्थित पार पडतात.

घडा घडा बोल आश्रमातील एक प्रसंग आठवतो. अण्णांनी मला नाव विचारले मी "कस्तुरे" म्हणून थांबलो. "तुझे नाव काय ?" याही प्रश्नाला मोजकेच उत्तर दिले. "तुला भाऊ किती ?" मी "तीन" म्हणून उत्तरलो. "घरी कोण कोण आहेत ?" 'आई" म्हणून मी थबकलो. "आणखी ?" यावर मी "वडील" म्हणून सांगितले. गुरु. अण्णा माझी ही मुग्धता पाहून साहजिकच संतापले. "अरे तू घडाघडा बोलत का नाहीस ?" एखादे माणूस आत्मीयतेने चौकशी करीत असताना अपेक्षित ती सारी

माहिती नको का सांगायला ?" गुरु. अण्णांनी मला घडाघडा बोलण्याचा घडा त्या दिवशी दिला.

वटवृक्षाप्रमाणे गुरु. अण्णांच्याकडून शिकण्यासारखे खूपच आहे. ज्ञानाचा सागर मोठा आहे. मी काही ओंजळी भरून घेतल्या एवढेच. आज गुरु. अण्णांच्याकडे पाहिले म्हणजे मला प्रचंड वटवृक्षाची आठवण होते. आजवर शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या शेकडो माजी विद्यार्थ्यांमुळे त्यांचे जीवन कृतार्थाने नटले गेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी आणि त्यांच्या अनुभूतीपूर्ण ज्ञानाचा थोडा तरी लाभ व्हावा या हेतूने अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित होत आहेत.

आपल्यांपैकीच एक गुरु. अण्णा हे विद्यार्थ्यांना प्रेमळ शिक्षक, सहकाऱ्यांना समर्थ मार्गदर्शक, नागरिकांना आदर्श समाजसेवक आणि शिक्षणतज्ज्ञांना अनुभवी दिग्दर्शक वाटतात आणि म्हणूनच बालांप्रमाणेच थोरांना व घरच्याप्रमाणेच परक्यांनाही ते आपल्यांपैकीच एक आहेत असे वाटते. गुरु. अण्णांच्या बाबतीत 'आपल्या मोठेपणावर संस्थेलाही मोठे करणारा मोठा माणूस' असे मूल्यांकन केल्यास वावगे ठरणार नाही.

८६. बागवान आणि पालक

श्री. त्र्यं. ग. बापट, बी. ए., बी. टी.

व्यवसाय : अध्यापक आणि लेखक

महाराष्ट्र विद्यालय शिक्षक १९४९–१९५०

संस्कारप्रधान शिक्षण देणारे यशस्वी शिक्षक

१९६१ सालचा मे महिना होता. त्या वेळी मला भावे स्कूलच्या मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक नेमले आहे, असा हुकूम मिळाला. तो हुकूम पाहिल्यावर आनंदापेक्षा इतर भावनांची मनामध्ये गर्दी उसळली. मी गोंधळलो, भयग्रस्त झालो. आता काय करावे ? कोठे जावे ? असा विचार मनात आला.

बागेतली भेट अनेक मुख्याध्यापक, सन्मित्र, नातेवाईक, ओळखीचे, पाठचे भाऊ असे होता होता शेवटी माझ्या नशिबाने माझ्यावर खैर केली आणि अ. वि. गृहात रात्रंदिवस कष्ट करणारे माननीय अण्णासाहेब खैर यांची उग्र गंभीर मूर्ती माझ्यापुढे उभी राहिली. मी एका सुप्रभाती त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या पत्नी, मुलगी, सून या सर्वांनी आपलेपणाने माझे स्वागत केले. कन्या म्हणाली, "अण्णा बागेत काम करीत आहेत." हे ऐकून मुलांच्या स्वभावाची मशागत करणारा हा बागवान मातीच्या बागेत कसा दिसतो, हे पाहायला मी बागेत गेलो. अर्धी विजार घातलेली, वर एक गंजिफ्रॉक, डोक्याला हॅट, जाड भिंगांचा चष्मा, फाटका पाय-

मोजा "नीकॅप" म्हणून एका गुडघ्यात अडकविलेला आणि हातात फावडे अशा थाटात अण्णासाहेब खैर यांनी माझे स्वागत केले.

"या बापट, संपलेच माझे काम !" असे आपल्या अगदी हळुवार आवाजात ते म्हणाले. अ. वि. गृहात ज्याप्रमाणे पैशांची काटकसर, त्याप्रमाणे येथे आवाजाची काटकसर. त्यांनी आपले काम संपविले आणि आम्ही त्यांच्या वसण्याच्या खोलीत आलो. बागेत वाढलेली दोन केळी माझ्यापुढे आली. चहा तयार झाला आणि मी त्यांना म्हणालो, "मुख्याध्यापक म्हणून माझी नेमणूक झाल्यामुळे मी गोंधळून गेलो आहे, तुम्ही मार्गदर्शन करा."

मला केव्हाही भेटा तेव्हा सावकाशपणे चहाचा घुटका घेता घेता अण्णासाहेब सौजन्याने आणि आत्मविश्वासाने बोलू लागले. ते म्हणाले, "बापट, तुम्ही माझ्या शाळेत शिक्षक होता, माझ्या मुलींचेही तुम्ही शिक्षक आहात, मी तुमचा स्वभाव ओळखला आहे. तुमच्यासारख्या सरळ माणसाला येथे भिण्यासारखे काही एक कारण नाही. मी मुख्याध्यापक झाल्यावर दर आठवड्याच्या कामाचे कसे विभाग केले हे तुम्हांला सांगेन."

पालक असा असावा अण्णासाहेबांची मोठी मुलगी सुधा अकरावीमध्ये माझ्या वर्गात होती. त्या काळात मी १० वी ११ वीचे इंग्रजीचे वर्ग माझ्या घरी घेत असे. त्या वर्गांना एकही पैसा फी म्हणून मी घेत नसे. त्या वेळी पुण्यात इतर मोठमोठे इंग्रजीचे क्लासेस यशस्वी प्रकारे चालू असताही अण्णांनी आपल्या कन्येला इंग्रजी शिकायला माझ्याकडे धाडले. हा माझा बहुमान झाला असे मला वाटते. अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना भेटायचे, हा माझा कार्यक्रम आज तीस वर्षे चालू आहे. त्या कार्यक्रमामध्ये माझी विद्यार्थिनी सुधा खैर हिच्या पालकांना भेटण्यासाठी मी गेलो, आणि बोलता बोलता म्हणालो, "तुम्हांला सांगू का नको, तुम्ही तर असे कडक आहा ! परवाच्या रविवारी तुमच्या कन्येने निबंध लिहिला नाही."

तेव्हा अण्णासाहेब मनापासून मोठ्याने हसून म्हणाले, " अहो बापट, मी शाळेत मोठा आहे, पण घरात मुले माझे ऐकत नाहीत." यानंतर गप्पांमध्ये आणि 'महाभारतातील कथा' या 'प्रसाद' मध्ये आलेल्या माझ्या लेखांवर चर्चा, यात हा प्रसंग संपला. सुधाची विनयशीलता पाहून मला तिला शिकवावेसे वाटे. शेवटी वर्ष संपले आणि अण्णांच्याकडून मला चहापानास बोलावणे आले. मी घरी गेलो. एक तासभर मनमोकळ्या गप्पांमध्ये आणि शिरा खाण्यात वेळ कसा गेला ते कळाले नाही. त्या वेळी माझ्याशी एक मुख्याध्यापक बोलत नसून एक पालक बोलत आहेत असा भास होत होता. मला निरोप देताना अण्णांनी भेट म्हणून स्टेनलेसचे तांब्याभांडे दिले. ती आठवण माझ्याजवळ कायमची आहे.

आजही या सर्व आठवणी झाल्यावर डोळ्यांच्या कडा ओलावतात.

साध्या आठवणी । खळा खळा पाणी ।।
आणिती नयनी । नाही काय ।। १ ।।

□ □ □

८७. 'माझेही पब्लिक स्कूल, गरिबांकरता'

लेफ्ट. प. भ. कुलकर्णी, बी. ए. (ऑ.), बी. एड्.
सी. पी. एड्., एफ्. सी. पी. टी. जी.
व्यवसाय : आजीव सेवक पुणे अ. वि. गृह
शिक्षणकाल १९४९ ते १९५५
लष्करी शिक्षण, मुद्रणविद्यालय इ. खातेप्रमुख

अध्यापनाचा ठसा गुरु. अण्णा अखिल भारतीय कीर्तीचे शिक्षणतज्ज्ञ असले तरी ते हाडाचे शिक्षक आहेत याचा प्रत्यय आम्हांला विद्यार्थिदशेत वारंवार येई. त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे ते दैनंदिन तास जरी घेत नसले तरी आठवड्यातून एखादा तास तरी सुदैवाने आम्हांला मिळत असे. सर्व भाषाविषयांवरील त्यांचे प्रभुत्व, विद्यार्थ्यांविषयी असलेली आत्मीयता व शिकविण्याची आवड या सर्व गोष्टी वारंवार आमच्या प्रत्ययास येत. त्या वेळी 'सोहराब अॅण्ड रुस्तुम' हे खंडकाव्य आमच्या अभ्यासासाठी लावले होते. हे काव्य ते आम्हांला शिकवीत. त्यांच्या या तासाची आम्ही आतुरतेने वाट पाहात असू. हे काव्य शिकवीत असताना ते तल्लीन होऊन जात. वर्गात 'पिन-ड्रॉप सायलेन्स' असे. अस्खलित, सात्त्विक व गोड असे गुरु. अण्णांच्या मुखांतून बाहेर पडणारे शब्द टिपून घेण्याशिवाय आम्हांला कशाचेही भान राहात नसे. दूरवर पसरलेल्या वाळवंटात दुपारच्या उन्हात सोहराब आणि रुस्तुम प्राणपणाने लढत आहेत, असे मूर्तिमंत चित्र ते आपल्या शब्दकौशल्याने उभे करीत.

कुलगुरुपद्धती गुरु. अण्णांच्या कल्पकतेतून जन्म पावलेली 'प्रासंगिकी' व 'कुलगुरुपद्धती' ही शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वांगीण मार्गदर्शन करण्यासाठी फारच उपयुक्त ठरली. शिक्षक या नात्याने या दोन्ही पद्धती मी चांगल्या राबवून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास त्या पद्धतींचा मला चांगलाच उपयोग झाला. कुलगुरू वा शिक्षक यांनाही माहिती नसणारी विद्यार्थ्यांची सर्व माहिती गुरु. अण्णांच्या 'प्रासंगिकी'त दोन मिनिटांच्या आत मिळत असे. शाळेतील कोणत्याही विद्यार्थ्याची सर्व माहिती मिनिटा दोन मिनिटांत देणारे गुरु. अण्णा पाहिल्यानंतर अनेक पालक आदरभावाने आश्चर्यचकित होऊन गेलेले मी पाहिले आहेत.

मुलाने कोठे जावे ? "या राज्यात न्याय मिळेल" असे गुरु. अण्णा विद्यार्थ्यांना सांगत. खट्याळांतील खट्याळ मुलालाही गुरु. अण्णांच्या राज्यात न्याय मिळालेला आहे व त्याची सुधारणाही अण्णांनी केली आहे. खट्याळ व उनाड मुलांना काढून टाका असा विद्यालय समितीने आग्रह धरल्यास गुरु. अण्णा हलकेच आम्हांला सांगत की तुम्ही काढून टाकल्यावर या मुलाने कोठे जावे ? आपणच त्याचे मातापिता आहोत, ही जाणीव

ठेवा. त्याला काढून टाकल्यास आपण आपल्या कामात अयशस्वी झालो असे समजावे लागेल." गुरु. अण्णांचा हा मानसशास्त्रीय व विशाल दृष्टिकोन आमच्या अंगी येण्यास खूपच उशीर लागला.

माझेही पब्लिक स्कूलच ! पण गरिबांकरिता गुरु. अण्णांना संस्थेबद्दल व विद्यालयाबद्दल फार मोठा अभिमान वाटतो. पब्लिक स्कूल हे समाजातील अति श्रीमंतांचे वसतिस्थान तर अण्णांची संस्था समाजातील अति गरीब विद्यार्थ्यांचे आश्रयस्थान. श्रीमंतांच्या पब्लिक स्कूलमध्ये मिळणाऱ्या शिक्षणापेक्षाही माझ्या संस्थेतील शिक्षण सर्वश्रेष्ठ व सर्वांगीण कसे असेल याचा त्यांनी अहोरात्र विचार केला. पब्लिक स्कूलसारखे येथे घोडचावर बसण्याचे शिक्षण दिले जात नसेल पण दोन पायांवर ठामपणे उभे राहून जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात न डगमगता ध्येयवादावर दृष्टी ठेवून निष्काम कर्म करण्याचे शिक्षण येथे निश्चितपणे दिले जाते.

अपक्षीय दृष्टिकोन संस्थेचा कारभार पक्षीय राजकारणापासून अलिप्त असावा असा गुरु. अण्णांचा कटाक्ष असतो. त्या दृष्टीने गुरु. अण्णांनी आमची संस्था पक्षातीत ठेवली आहे. शिक्षणक्षेत्रात निवडणूका व राजकारण शिरल्यामुळे अनेक संस्थांचा कार्यनाश झाला आहे. कोणत्याही पक्षाच्या राजकारणाशी संबंध न ठेवल्यामुळेच संस्थेची सर्वांगीण प्रगती झाली आहे व होत आहे हे विसरून चालणार नाही.

कर्तबगार शासक गुरु. अण्णांची काम करण्याची पद्धती रेखीव व कार्यक्षम आहे. त्यांच्या कामाचा उरक दांडगा आहे. कोणतेही काम पद्धतशीर व योजनापूर्वक करण्यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्यांनी जिंकलेली विधानपरिषदेची निवडणुकही याच कार्यक्षमतेचे द्योतक मानावी लागेल. मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, विधान परिषद, विविध शैक्षणिक समित्या, एस्. एस्. सी. ई. बोर्ड व अनेक संस्थांची सल्लागार मंडळे यांवर ते सभासद म्हणून काम करीत. त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा, वक्तृत्वाचा व प्रभावी मार्गदर्शनाचा ठसा उठविला आहे. एवढे करूनही त्यांचे संस्थेकडे कधीही दुर्लक्ष झाले नाही. त्यांची कामाची बैठक फार दांडगी आहे. ऑफिसमध्ये या वयातही एका वेळी ४–५ तास बैठक मारून तरुणांनाही लाज वाटावी इतकी कामे भराभर उरकून घेतात व घरी जाऊन बागकामात पुन्हा मग्न होतात. दूरच्या प्रवासाहून आल्यानंतरही ताबडतोब संस्थेत येऊन सर्व गोष्टींची चौकशी करून कामाला लागतात. या वयातील त्यांच्या या कार्यक्षमतेबद्दल मला तरी त्यांचे कौतुक वाटते. सहकाऱ्यांशी वागताना सुद्धा ते अत्यंत खेळीमेळीने वागतात. छोट्यामोठ्यांना काम सांगण्याची, ते करून घेण्याची व पटवून देण्याची त्यांची पद्धती वैशिष्ट्यपूर्ण असते.

संस्थेचे हे सुवर्णयुगच ! अलीकडे संस्थेची झालेली सर्वांगीण वाढ हे या युगाचे वैशिष्ट्य होय. आध्यात्मिक, भौतिक, आर्थिक व औद्योगिक या सर्वच दृष्टींनी संस्थेची प्रगती या काळात झाली आहे. आध्यात्मिक दृष्ट्या विचार करता या काळात गुरु. अण्णांनी 'सदाचार चिंतनी' व 'गीतेतील मुख्य विचार' ही पुस्तके लिहून आध्यात्मिक व

नैतिक जीवनाचा आदर्श सर्वांसमोर ठेवला. भौतिक व आर्थिक दृष्ट्या विचार करता संस्थेने बांधलेल्या इमारती डोळ्यांसमोर येतात. गुरु. अण्णांच्या हातात समाजाने दिलेली थैली त्यांनी अत्यंत जबाबदारीने सांभाळली व समाजाच्या आदरास ते पात्र झाले.

गुरु. अण्णांनी संस्था चालविण्यास कार्यकर्ते मिळविण्यासाठीही पुष्कळच प्रयत्न केले. त्यागी, विद्वान् व उद्योगी कार्यकर्त्यांच्या तीन पिढ्या मिळविण्यात गुरु. अण्णा यशस्वी ठरले.

ती. सौ. ताईंचाही वाटा मोठाच ! या महर्षींच्या यशात व कर्तबगारीत ती. सौ. ताईंचाही वाटा फार मोठा आहे. गुरु. अण्णांच्या छोट्याशा घरकुलात प्रेम, शांती, व समाधान यांचे साम्राज्य ती. सौ. ताईंनी निर्माण केले आहे. सहकाऱ्यांच्या व संबंधितांच्या सुखदुःखात ती दोघेही तत्परतेने समरस होतात व मार्गदर्शन करतात. आमच्याकडील मंगळागौरीच्या पूजेसाठी गुरु. अण्णा स्वतः फुले घेऊन आलेले पाहून मला संकोच व कौतुक वाटले.

८८. तुला विद्वान् करून मगच सोडणार

श्री. गो. शं. तांबे, आयुर्वेदप्रवीण, डी. एस्. ए.

व्यवसाय : अध्यापक, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

शिक्षणकाल १९५१ ते १९५५

मधुर स्वभाव व सेवावृत्तियुक्त डॉक्टर

"काय रे, तुला इथे राहायचे नाही. खरे का ?" असे बोलून अण्णांनी उत्तराच्या अपेक्षेने माझ्याकडे पाहिले.

"होय खरे आहे ते. मला मुळीच राहायचे नाही इथे." मी पुटपुटलो.

"फायनलला किती टक्के गुण मिळाले ?" पुनः प्रश्न.

"६५ टक्के."

"मग हीच का अक्कल शिकलास ? उपयोग काय त्या मार्कांचा ?"

एक मिनिटभर सारे काही स्तब्ध होते. नंतर अण्णा म्हणाले, "तुला इथे ठेवलाय तो शिकण्यासाठी. घरी पळण्यासाठी नव्हे. तुला मी विद्वान् करून पाठविणार आहे." आणि मी आश्रमात राहून एस्. एस्. सी. झालो. अजूनही जेव्हा केव्हा अण्णांची भेट

होते तेव्हा ते विचारतात, "काय, विद्वान् होतोयस ना ? मी तुला विद्वान् करायचे ठरविले होते !" मी स्मितहास्यापलीकडे सध्या तरी काय उत्तर देणार ? खरोखरच त्यांचे बहुत उपकार आहेत. विद्यार्थ्यांच्या मनोभावनांच्या संवेदना त्यांच्या अंतःकरणापर्यंत पोचतात, त्यांची सुखदुःखे अण्णा अनुभवतात. म्हणूनच ते माझ्या बाबतीत असा निर्णय घेऊ शकले. आज या क्षणी मला हा प्रसंग मोलाचा मार्गदर्शक वाटतो.

घरातील वेळापत्रक एक दिवस सकाळीच मी अण्णांच्या घरी गेलो. कार्यालयातल्या काही कामासंबंधी विचारायचे होते. मी त्यांच्या घरी गेलो तेव्हा ते माडीवर त्यांच्या खोलीत होते. म्हणून मी स्वयंपाकघरात त्यांच्या मंडळीशी गप्पा मारीत उभा होतो, व बोलता बोलता स्वयंपाकघराचे निरीक्षणही करीत होतो. निरीक्षण करता करता एके ठिकाणी दृष्टी थांबली. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या तासांचे साप्ताहिक वेळापत्रक असते ना तसे ते एक वेळापत्रक होते. मी वाचू लागलो. आठवड्यातल्या प्रत्येक दिवशी घरातले कोणते काम कोणत्या व्यक्तीने करायचे, याचा निर्देश त्यात होता. घरातल्या सर्व मुलांचा समावेश त्यात होता. प्रत्येकाला प्रत्येक कामाचा सराव व्हावा अशी व्यवस्था त्यात आळीपाळीने करण्यात आली होती. दळणापासून बागेला पाणी घालणे, शौचकूप घुणे येथपर्यंत ती कामे होती. मुलींना स्वयंपाकाची पण पाळी होती; आणि विशेष हा की, अभ्यास सांभाळून हा सर्व कार्यक्रम बिनबोभाट चालत असे. त्यानंतर मी अण्णांच्या घरी अनेकवार गेलो; पण कधीही शांत वातावरणात विक्षेप आलेला दिसला नाही. मुलांचे आपापसात मतभेद झाल्याने परस्पर शब्दाशब्दी, किंवा मुले ऐकत नाहीत म्हणून मोठी माणसे रागावताहेत असे दृश्य पाहायला मिळाले नाही. सारे कसे बिनतक्रार, समंजसपणे चाललेले असे.

मला खूपच समाधान वाटले, आणि मनातल्या मनात खजीलही झालो. खजील अशासाठी झालो की, अण्णांनी स्वतःच्या घरापासून तो आश्रमातल्या मुलांपर्यंत एकाच नियमपद्धतीचे नित्याचरण ठेवले होते. पण आम्हा विद्यार्थ्यांना या क्षणापावेतो असे दर्शन झाले नसल्याने, येता जाता हे लोक स्वतः मुलांसह आरामात असतात, व आम्हांला मात्र छळतात असा आक्रोश करीत होतो.

समाधान वाटले ते अशासाठी की वरील समजुतीला अपवाद सापडला होता. या प्रसंगाने जीवनातील नित्यानंदाची वाट मला सापडली होती. घरात वातावरण असावे तर असे. त्यामुळेच गृहस्थाश्रमाला धन्यता येते.

□ □ □

८९. अस्सा राग यायचा !

श्री. चंद्रकांत अंबाडे

व्यवसाय : नोकरी, हेवी व्हेइकल्स् फॅक्टरीज, मद्रास

शिक्षणकाल १९५१ ते १९५६

स्वावलंबन व कष्ट यांतून चिकाटीने वाटचाल

जबाबदारीचे शिक्षण "अरे अंबाडे, ऊठ. रस्त्यावर काय झोपलास ? पुष्कळ रात्र झालीय. जा. जाऊन झोप आता. पुष्कळ झाला अभ्यास !" कुणीतरी मला डिवचले आणि जागा होऊन मी पाहू लागलो तो समोर गुरु. अण्णा, सौ. ताई, सुधा, उषा, भास्कर सारे उभे ! मी स्वप्नात तर नाही ना ? पण माझ्या मनातले ओळखून अण्णांनी पुन्हा जागे केले. "अरे, जागा झालास का ?" १० वी ला असताना मी विद्यालयमंत्री होतो. त्या वेळी अर्धवेळ शिक्षक असत आणि सकाळ-दुपार विद्यालय भरे.

असा राग यायचा मला अण्णांचा त्या वेळी ! एखाद्यावर एखादी जबाबदारी टाकायची म्हणजे पूर्णपणेच टाकायची ही अण्णांची पद्धत. पण त्याच वेळी स्वतः बाजूला राहून लक्ष ठेवीत असत हे लक्षात येत असे माझ्या. जबाबदारीने काम करणे, कामात सुधारणा घडवून आणणे आणि नीट व्यवस्थितपणाने संघटन करणे हे शिक्षण मला आश्रमात मिळाले आणि तेच आज मला इथे मद्रासला उपयोगी पडते आहे ! मध्यवर्ती सरकार बांधीत असलेली ही नवीन फॅक्टरी ! उष्ण हवा, भाषा, जागा, जेवण इ. साऱ्याच अडचणी ! सगळेच नवे. तुमचा तुम्हीच निर्णय घेऊन विचार करून काम करायचे. पण आश्रमातील शिक्षणाने मद्रासला टिकून राहण्यास मदत केली हे मात्र खरे !

गुणग्राहकता व प्रोत्साहन शाळेत असताना वक्तृत्वस्पर्धेत विद्यालयाला पहिला क्रमांक आणि तो पहिल्याच वर्षी मिळवून दिल्याबद्दल घरी बोलावून मला जेवायला बसविल्याचे मी कधी तरी विसरेन का ? तेच प्रोत्साहन आज इकडे तामीळ, मल्याळम्, तेलगू भाषेतील लोकांशी व्यवहार करताना उपयोगी पडते आहे.

विद्यालय-मंत्री, वाचनालय-मंत्री, रुग्णालयाचे काम ह्यासारख्या कामामुळे कमीत कमी लोकांना दुखवून व गोड बोलून काम करण्याचे शिक्षण आश्रमात मिळाले. वाणी-विकाससभामंत्री होतो म्हणून निरनिराळ्या क्षेत्रातील प्रसिद्ध लोकांकडील कामांचा अनुभव आला. हे सारे मद्रासला उपयोगी पडते आहे.

विचारच केला तर मी काहीही असाधारण करू शकलेलो नाही. पण जे काही आहे, त्याचे सारे श्रेय गुरु. अण्णांकडे, त्यांच्या शिक्षणास, शिस्त आणि संस्कारांस जाते हे मात्र खरे !

९०. सोन्यासारखी दानत

श्री. मा. श्री. देशपांडे, बी. एस्सी. (ॲग्रि.)
व्यवसाय : शेतकी अधिकारी, महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशन
शिक्षणकाल १९५२ ते १९६०
कृषिशास्त्राच्या रूपाने समाजाची सेवा

हजेरीचे महत्त्व पटविले एक दिवस असेच गुरु. अण्णा हजेरीपट तपासू लागले व हजेरीपटावर सर्व मुले हजर असल्याचे त्यांनी पाहिले. श्री. भंडारी नावाचा एक महाविद्यालयीन विद्यार्थी हा आदले दिवशीच काही कारणानिमित्त परगावी गेला होता. गुरु. अण्णांनी मला त्याची अनुपस्थिती न दाखविल्याबद्दल विचारले. अर्थात तो गेल्याचे मला माहीत नव्हते आणि माझी चूक माझ्या लक्षात आल्यावर मी खूपच घाबरलो. दुसऱ्याच क्षणी ती. अण्णांनी शांततेने हाक मारली, "माधव" मी तर त्यांची ती हाक ऐकून थंडच झालो. त्यांनी मला सांगायला सुरुवात केली, " हजेरीला फार महत्त्व असते. कायद्याच्या दृष्टीने देखील आपला हजेरीपट बिनचूक राहिला पाहिजे, याची जबाबदारी तुझ्यावर आहे."

सोन्याची दानत आणि सोनकेळ एकदा ती. गुरु. अण्णांच्या बागेतील सोनकेळाच्या घडातील एकच पिकलेले सोनकेळ चोरीस गेले. झाले ! सगळीकडे चौकशीस सुरुवात झाली. त्या दिवशी रात्री व त्यानंतर ३–४ दिवस 'सुसंगती'च्या वेळेस तोच खालील सुविचार सांगण्यात आला. "एक सोनकेळ गेल्याचे दुःख नाही, पण मुलांची सोन्यासारखी दानत गेली." रोज आम्ही तोच विचार करू लागलो. किती परिणाम झाला याचा माझ्या मनावर ! खरोखरच आमची नैतिक पातळी वाढवायला गुरु. अण्णांचे सुविचार आणि शिकवण फार कारणीभूत आहेत. कर्मधर्मसंयोगाने त्या चोरीचा निकाल लागला की आमच्या येथील एका मजुराने ते केळ खाल्ले होते. त्याने ते कबूल केले. गुरु. अण्णांना एखादे वेळी जास्ती राग आला तर ते एकदम शांत डोळे मिटून बसत असत; त्या वेळी समजावे की ती. अण्णा मनातले मनात राग शांत करून घेत आहेत. खरे बोलायचे व स्पष्ट सांगायचे तर ती. सौ. ताई खैर ह्याच खऱ्या कारणीभूत आहेत ती. अण्णांचा राग शांत व कमी करण्याकरिता ! मी माझ्या तेथील वास्तव्यात असे पाहिले आहे की, जेव्हा जेव्हा मी ती. अण्णांच्या घरी जात असे तेव्हा सौ. ताईंच चेहरा सतत हसतमुख असे. त्यांचे हास्यवदन पाहून आमच्याच मनात येई की, "ती.

सौ. ताईंनी काही तरी काम सांगावे." मी ती. ताईंना कधीही रागावलेल्या पाहिलेल्या नाहीत. फार तर त्या घरात एखादे वेळी मुलींवर ओरडत, व तेवढ्यात जर आम्ही तेथे गेलो तर त्यांचा राग कुठल्या कुठे पळून जाई. लगेच हसून खेळून बोलायला त्या तयार! आमच्या आजारपणात त्यांनी आमची स्वतःची आई घेईल त्यापेक्षा जास्त काळजी घेतलेली आहे. ते त्यांचे ऋण आम्ही आजन्म विसरू शकणार नाही. आमची नैतिक, बौद्धिक व सामाजिक पातळी उंचवायला ती. अण्णांनी फार मदत केली. आम्हांला त्यांच्या शिकवणुकीची पदोपदी आठवण येते. गुरु. अण्णांना भरपूर आयुरारोग्य लाभो हीच सदिच्छा व्यक्त करितो.

□ □ □

९१. जेवणाप्रमाणे व्यायाम आवश्यक

श्री. व. खं. कुलकर्णी, डी. सी. ई.
व्यवसाय : इंजिनियर
शिक्षणकाल १९५२ ते १९६०
संस्था व गुरुजन यांविषयी अगत्य

वाचनाची गोडी लागली टाईम्स वृत्तपत्रातील रोज सुमारे पंधरा-वीस शब्दांवर अण्णा स्वतः त्यांचे मराठी अर्थ लिहीत व ते हायस्कूलच्या वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगत. त्यामुळे अभ्यासाशिवाय जे नवीन शब्द येत ते वाचनात व लिहिण्यात आल्याने अनायासे इंग्रजी वाचनाची आवड निर्माण झाली व शब्दसंग्रहात वाढ झाली. तसेच दर पंधरा दिवसांनी गुरु. अण्णा सायंप्रार्थनेच्या वेळी येत व एखाद्या प्रचलित विषयावर माहिती विचारीत. वेगवेगळचा विद्यार्थ्यांना माहिती सांगावी लागे. त्यामुळे प्रत्येक जण वृत्तपत्रे वाचण्याचा प्रयत्न करी. त्यामुळे वाचनाची आवड लागण्यास मदत झाली.

साप्ताहिकातील प्रेरक विचार एकदा मी बरीचशी माहिती जमा करून माझा साप्ताहिकाचा अंक सुवाच्य व नीटप्रकारे लिहून काढला. त्या अंकास मला "अंक चांगला आहे" असा अभिप्राय मिळाला व सुविचार पुढीलप्रमाणे होता––"संधी सदासर्वदा येत असते. कर्तबगार मनुष्य तिचा फायदा घेत असतो. नादानाला ती दिसत नाही. यावर प्रत्येकाने विचार करावा कोणतीही संधी दवडू नये."

परीक्षेपूर्वीही व्यायाम आवश्यक एके दिवशी खेळाच्या वेळी काही विद्यार्थी खोल्यांतच अभ्यास करीत होते, कारण परीक्षा चार-पाच दिवसांवर होती. त्या वेळी त्यांची चौकशी करता विद्यार्थ्यांनी 'परीक्षा आहे' म्हणून सांगितले. अण्णांनी विद्यार्थ्यांना परीक्षेकरताच व्यायामाचे महत्त्व पटवून दिले व प्रत्येकास पन्नास जोर काढण्यास सांगितले.

□ □ □

९२. कुतुबमिनारावर माझ्या फुल्या

श्री. बा. ल. ओक

व्यवसाय : रेल्वे टेलिग्राफ ऑफिस, पुणे

शिक्षणकाल १९५२ ते १९५५

सुसंस्कार टिकवून सेवा करणारे नागरिक

अण्णांचा एक तास मी १० वीत होतो. नुकताच तास संपवून विद्यार्थी पुढच्या तासाची प्रतीक्षा करीत होते व त्यातूनच गडबड व गोंधळ निर्माण झाला होता. आणि अचानक गुरु. अण्णांची प्रेमळ मूर्ती वर्गात अवतरली. मंत्रवत भारल्याप्रमाणे एकदम शांतता झाली व मुले उभी राहिली. गुरु. अण्णा मुले खाली बसल्यावर मगच खुर्चीवर जाऊन बसत. पुस्तक टेबलावर ठेवून त्यांनी वर पाहिले आणि. . .

"जे गैरहजर असतील त्यांनी उभे राहावे"—गुरु. अण्णा. त्यांच्या या विनोदाने वर्गात हास्याची लाट उसळली. पण क्षणिकच. परत वर्ग गंभीर झाला. अत्यल्प परंतु प्रासंगिक विनोदामुळेच जणू अण्णांनी मुलांची मने जिंकून टाकली असावीत. वर्ग शांत झाला आणि वर्गमंत्री उभा राहिला. आणि परत वर्गात खसखस पिकली. याचे कारण अण्णांनी त्याकडे पाहून केलेली मुद्रा ! "तू गैरहजर का आहेस ?" अण्णा म्हणाले. आज फक्त एकच विद्यार्थी हजर नाही असे सांगून वर्गमंत्री खाली बसला. आणि त्यानंतर अण्णांच्या अनुभवपूर्ण शिकवण्यात आम्ही तासभर बुंडत होतो. अण्णांचा असा अवचित झालेला तास म्हणजे आम्हांला—मला तर ती मोठी पर्वणीच वाटायची.

न्याय्याची पद्धत उन्हाळ्याचे दिवस आणि दुपारी २–३ ची वेळ. आश्रमातील नुकतीच गाळ काढून स्वच्छ केलेली विहीर निळ्या पाण्याने पूर्ण भरली होती. आंब्याच्या झाडातून उन्हाचे कवडसे निळ्या पाण्यावर तरंगत होते आणि त्यांना साथ देण्यासाठी आम्ही सात आठ विद्यार्थी पंपाच्या तळाचा गाळ काढण्यासाठी आणि झाडे-झुडुपे व पाचोळा काढण्यासाठी विहिरीत उतरलो होतो. साहजिकच थोडीशी गडबड व गोंधळ चाललाच होता. गुरु. अण्णा कार्यालयातून बाहेर येऊन एकदा कानोसाही घेऊन परत आत गेलेले होते आणि त्यानंतर लगेच १०–१५ मिनिटांनी झालेल्या गोंधळामुळे त्यांना काम सोडून बाहेर यावे लागले. गुरु. अण्णा रागावले असले तरी त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता कमी होत नसे. एका विद्यार्थ्यास बोलावून त्यांनी बाकी सर्व विहिरीवरच्या विद्यार्थ्यांस त्यांच्या कार्यालयासमोर रांगेत उभे राहण्यास सांगितले. दोन-चार मिनिटात सारे जण कपडे चढवून, एक-एक, दोन-दोन छड्या बसणार या विचारात कार्यालयासमोर उभे राहिले. आणि साऱ्यांचा अपेक्षाभंग झाला. याचे कारण

अण्णांची न्यायप्रियता व विद्यार्थ्यांवर त्यांचे असलेले ममत्व असेच म्हणावे लागते. एकवार सर्वजणांवर नजर फिरवून, आम्ही सर्वजण परवानगी न घेता विहिरीत उतरलो याचे माप प्रथम त्यांनी आमच्या पदरात घातले, व नंतर ओरडला कोण? म्हणून विचारले. त्या विद्यार्थ्यानेही जे घडले होते ते सांगितले. परंतु गुरु. अण्णांनी अचूक न्याय दिला. विनाकारण ओरडल्यामुळे त्या विद्यार्थ्यास एक छडी हातावर मिळाली व चमत्कार व्हावा त्याप्रमाणे मुग्ध होऊन माझ्यासहीत, बाकीचे सर्व खोल्यात परतलो!

विद्वान व्हा ही शिकवण अशा या उदार, विशाल, संयमी व विद्वान शिक्षकाचे शाबासकीस मी कधीही पात्र झालो नाही याचे मला राहून राहून वाईट वाटते. पण "विद्वान व्हा" ही त्यांची शिकवण मला जन्मभर मार्गदर्शक ठरेल. दिल्लीचा कुतुब-मिनार पाहण्यास मी तीन-चार वेळा जाऊन आलो. मिनाराच्या पायाशी मी उभा होतो व त्याची उंची अजमावण्याचा मोह मला झाला. मी मान उंच करू लागलो. मिनारा-वरील सौंदर्याची एक-एक शलाका मी खाली खाली टाकत चाललो. मान उंच उंच होतच होती पण मिनाराची उंची मात्र संपत नव्हती आणि शेवटी ज्या वेळी माझ्या मानेने जमिनीशी पूर्ण काटकोन केला तेव्हाच मला मिनाराचा सर्वोच्च बिंदू दिसला! पण छे! त्या बिंदूचे सौंदर्य मला इतके खालून दिसणे कसे शक्य होईल? आणि म्हणून मी माझ्या हातातील खडूने मिनाराच्या पायावर माझ्या उंचीवर फुल्या मारल्या. मिनाराच्या सौंदर्याचा मी अपमान करीत आहे याची मला जाणीव होती, पण बाण सुटला होता, खडूच्या रेघा तेथे उमटल्याच होत्या. गुरु. अण्णांच्या या विशाल व्यक्तिमत्त्वावर माझ्या शाईचे चार शिंतोडे उडवून मी मोकळा झालो होतो.

□ □ □

९३. माझे मानलेले गुरू

डॉ. पां. वि. जायदे, डेंटिस्ट, हुबळी

व्यवसाय : दवाखाना

शिक्षणकाल—परिचयानंतर मानलेले गुरुशिष्य नाते

मित्रत्वाचे संबंध ठेवणारे व दंतयज्ञद्वारे अनेकांची सेवा करणारे डॉक्टर

मानलेले गुरू डॉक्टर अण्णासाहेब खैर यांनी मला शाळा-कॉलेजात कधीच शिकविले नाही. परंतु मी त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकलो. म्हणून मी त्यांना गुरू मानतो. माझे अनेक गुरुवर्य आहेत. त्यांतच गुरु. अण्णांचे स्थान फार मोठे आहे. त्यांनी माझ्या मनावर फार मोठे संस्कार केले आहेत. त्यांचे जीवन म्हणजे शिक्षणक्षेत्रातील एक महान तपश्चर्या आहे. खरा आदर्श शिक्षक कसा असावा याचे ते एक प्रतीक आहेत.

प्रथम परिचय दंतयज्ञाकरिता पुण्यात जागा कशी मिळवावी हा माझ्यापुढे मोठाच प्रश्न होता. गुरु अण्णांनी "अनाथ विद्यार्थी गृहाची जागा मे महिन्यात आपणास

दंतयज्ञाकरिता देऊ" असे कळविले. माझा आनंद गगनात मावेना. एका अनोळखी गृहस्थांनी माझ्या कार्याकरिता ही जी सहानुभूती दाखविली त्यामुळे त्यांच्या मनाच्या मोठेपणाची मला योग्य कल्पना आली व त्यांच्याविषयी आदरभावना मनात दृढ झाली.

दंतयज्ञाच्या वेळी पुण्यात असताना मी मधून मधून माझ्या कामानिमित्त त्यांना भेटत असे. ते आपल्या कामात दंग असत. ते वर मान करून पाहितोपर्यंत मी स्वस्थ बसून राहात असे. काम संपताच ते माझे काम करीत असत. अण्णांची ही शिस्त मला फार आवडली. त्यांचा 'बी ब्रीफ'चा आदर्श प्रत्येकाने घेण्यासारखा आहे. ते सदा हसतमुख असतात. स्वतः हसतात व दुसऱ्यांना हसवितात. त्यांच्याशी संभाषण करणाऱ्यांना हा अनुभव नित्य येतो. त्यांच्या बोलण्यात सहज प्रासंगिक विनोद असतो.

आश्रमातील श्रमदान मे महिन्यातील कडक उन्हाळा. उष्णतामान १०८–१० अंशांपर्यंत चढत असे. अंगाची लाही लाही होत असे. अशा त्या कडक उन्हात आश्रमीय मंडळी, कोवळ्या वयाचे विद्यार्थी श्रमदान करत असलेले पाहून मात्र माझ्या मनाला वाईट वाटे. ते सर्व कौलांची शाकारणी करीत. इतरही मोठमोठी श्रमाची कामे करीत. त्यांची सुकुमार तोंडे उन्हाने काळवंडून जात. काही मुले रात्रभर पहारा करीत. हे सर्व शांतपणे व बिनतक्रार चालत असे. कडक शिस्तीतून बाहेर पडलेले विद्यार्थी पुढे निश्चितपणे वर येतात यात शंका नाही. जीवनातील कोणत्याही अडचणीतून ते निश्चितपणे मार्ग काढतात.

आदर्श गृह, आदर्श पालक गुरु. अण्णांचे गृह एक आदर्श गृह वाटते. ते सतत काम करीत असतात. मुले, मुली आपापली कामे व अभ्यास बिनतक्रार करीत असतात. सौ. ताई एक दक्ष गृहिणी आहेत. त्या घरची कामे करून शिवाय वॅकेची कामे करीत असताना मी त्यांना पाहिले. मुली सुटीत पोहायला जात. शिवाय आमच्या दंतयज्ञात 'स्वयंसेविका' म्हणूनही त्यांनी काम केले. मला फारच आनंद वाटला. त्यांच्या घरातील शिस्त, वळण व संस्कार खरोखरच अनुकरणीय आहेत. ते एक आदर्श पालक आहेत.

शिक्षकांचा आदर्श अण्णासाहेबांनी खऱ्या शिक्षकाचा आदर्श निर्माण केला. ते अत्यंत कळकळीने शिकवितात. आपल्या शिष्याचे कल्याण नेहमी त्यांच्या दृष्टीसमोर असते. बेळगावच्या ट्रेनिंग कॉलेजातील त्यांची एम्. एड्. ची व्याख्याने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना फारच आवडतात. ते अत्यंत लोकप्रिय शिक्षक आहेत, असा त्यांचा लौकिक सर्वत्र ऐकू येतो. इतक्या तळमळीने शिकविणारे शिक्षक किती असतील ? सर्व शिक्षकांनी गुरु. अण्णांचा आदर्श दृष्टीसमोर ठेवावा.

साधी राहणी ते त्यागमय जीवन जगत आहेत. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' हे सूत्र त्यांनी आचरणात आणले. आपले तन-मन-धन व सर्वस्व त्यांनी अनाथ विद्यार्थी गृहाला अर्पण करून शिक्षणक्षेत्रात भारतमातेची फार मोठी सेवा केली आहे.

□ □ □

९४. तेजस्वी दर्शन

प्रा. य. ज. घारूरकर, एम्. ए., एम्. एड्., एल्एल्. बी.

व्यवसाय : मुख्याध्यापक, सोलापूर

शिक्षणकाल–एम्. एड्. वर्गातील विद्यार्थी १९५३–५५

शिक्षणशास्त्राची अध्यापन-लेखन द्वारा सतत सेवा

प्रथम दर्शनी सन १९५३ च्या ऑक्टोबरमध्ये पुण्याच्या टिळक अध्यापन महाविद्यालयात एम्. एड्.साठी आल्याचे वेळी गुरु. अण्णांचे पहिले व्यक्तिदर्शन झाले. उच्च प्रकारच्या पाश्चिमात्य शिक्षणाने संपन्न असून देखील गुरुवर्य अण्णांचा भारतीय सांस्कृतिक व वैचारिक दृष्टिकोन बदलला नाही; उलट त्यांच्या विचारात व वागणुकीत एक प्रकारचा लोभसपणा व आगळेपणा दिसून आला.

स्वभाव विशेष शिस्त व सौजन्य यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे गुरु. अण्णा ! जिथे कठोरपणाची जरुरी आहे तिथे डॉ. खैर कधीही अकारण सौजन्य दाखविणार नाहीत, मग तो कोणताही प्रसंग असो, अथवा केवढीही मोठी व्यक्ती असो. समता हा अण्णांचा स्थायीभाव आहे म्हटल्यास अतिशयोक्ती बाटू नये. अण्णांच्या जीवनात अनेक संकटांनी ऊन-सावलीप्रमाणे सतत पाठपुरावा केला परंतु अण्णांच्या चित्ताची समता व प्रसन्नता क्वचितच ढळली असेल ! स्वतः उल्हसित राहून इतरांना कार्यप्रवण करणे ही किमया अण्णांना एवढी साधून गेली आहे की आपण इतरांसाठी काही खास गोष्ट करीत आहोत याची त्यांना थोडीशी देखील कल्पना नसते.

मार्गदर्शक विचार गुरु. अण्णा प्रत्येक महिन्याच्या 'समाचार'मधून एक क्रांतिकारी विचार देत असतात. बकुळीच्या फुलाप्रमाणे या विचारांचा सुगंध दीर्घकाळ टिकणारा आहे. जीवनात नेकी व सचोटीला फार मोठे स्थान आहे हे बिंबविण्याची एकही संधी अण्णा कधीच दवडीत नाहीत. पसंतीचे कार्यक्षेत्र निवडा आणि त्यामध्ये सर्वोच्च प्रावीण्य मिळविण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करा असे अण्णांचे आग्रहाचे सांगणे आहे.

ज्योतीने ज्योत गुरु. अण्णासाहेब हे हाडाचे शिक्षक आहेत. राष्ट्रपतींनी त्यांना आदर्श शिक्षक म्हणून यापूर्वीच गौरविले आहे. विद्या आणि विनय यांचा मनोहर संगम अण्णांमध्ये घडून आल्याचे दिसेल. सोन्याला सुगंध लागला आहे. जातिवंत शिक्षक हा परिणामकारी असतो. लोहचुंबकाचा हा विशेष गुण असतो की लोहकण तो आपल्याकडे खेचून घेतो. त्यांना काही काळ का होईना आपलेसे करितो. गुरु. अण्णा हे महाराष्ट्राचे सांदीपनी आहेत. एखादी व्यक्ती स्वपराक्रमाने व कर्तबगारीने यशाच्या उत्तुंग शिखरावर जाऊन बसते हा चमत्कार तर खराच ! परंतु त्याहीपेक्षा आपल्यासारखे किंवहुना काकणभर अधिक सरस शिष्य निर्माण करणे हा त्याहून मोठा चमत्कार मानला पाहिजे. गुरु. अण्णांनी हा चमत्कार लीलया करून दाखविला आहे.

अध्यापनातील व्यक्तित्व गुरु. अण्णांची अध्यापनशैली विशेष वाखाणण्यासारखी आहे. त्यांचे सांगणे ऐकणाराचे अंतःकरणास भिडते असा माझा अनुभव आहे. एम्. एड्. सारख्या पदव्युत्तर शिक्षणासाठी दूर दूर अंतरांवरून आलेल्या उच्च पदवीधर व सुशिक्षित विद्यार्थ्यांना शिकविणे सोपे नाही. त्याहून अवघड त्यांचेवर कायम परिणाम करणे ही गोष्ट आहे. अण्णांचे व्यक्तिमत्त्व चंद्रप्रकाशाप्रमाणे शीतल व प्रसन्न आहे. त्यांच्या निरागस हास्यात उद्याची खडतर वाटचाल सह्य करण्याचे व संकटांना हसतमुखाने समोरून तोंड देण्याचे सामर्थ्य आहे असा अनेकांचा विश्वास आहे. प्रस्तुत लेखकावर अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचा दाट ठसा उमटला आहे.

शिक्षण म्हणजे संस्कार अण्णांच्या काही कल्पनांचा प्रत्यक्षात उपयोग करण्याचे व त्याचा फायदा विद्यार्थ्यांना झाल्याचे लेखकास दिसून आले आहे. भगवद्-गीतेमधील विचार नित्य प्रार्थनेच्या वेळी सांगण्याने एक प्रकारच्या मंगल व पवित्र वातावरणाची सहजच निर्मिती होते व हा आनंद दिवसभर टिकतो असा सोलापुरातील एका प्रख्यात मुलींच्या शाळेचा मुख्याध्यापक म्हणून माझा अनुभव आहे. 'शिक्षण म्हणजे संस्कार' हे गुरु. अण्णांचे आवडते तत्त्वज्ञान सर्व शिक्षकांनी आत्मसात केले पाहिजे. शीलवान व सदाचार संपन्न नागरिक ही आजची फार मोठी शैक्षणिक व सामाजिक गरज आहे.

दीपस्तंभ गुरु. अण्णा हे दीपस्तंभाप्रमाणे आपल्या विचारांशी व वर्तनाशी एकनिष्ठ आहेत. त्यांचेकडे पाहून वाटचाल न कळत केली जाते. गुरु. अण्णांच्यामुळे मी या पेशात राहिलो व मर्यादित क्षेत्रात काम करीत आहे. शिक्षकाची लहानशी कृतीही अनेक प्रसंगी विद्यार्थ्यांच्या मनात क्रांती करून जाते. डॉ. खैरांनी ही मानसिक क्रांती अनेकांमध्ये केली आहे ही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष होय.

□ □ □

९५. चार वर्षांत एकदाच दर्शन

श्री. म. बा. बरवे

व्यवसाय : सीनियर क्लार्क व टंकलेखन शिक्षक, दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

शिक्षणकाल १९५३ ते १९५७

नव्या पिढीतील सुसंस्कृत विद्यार्थी

मी अकरावीत असताना शिष्यवृत्तीच्या संबंधात मला अण्णांच्याकडे जावे लागले होते. त्या वेळी तेथील माझ्या सहाध्यायाला उद्देशून ते म्हणालेसुद्धा 'बघ ! चार वर्षांत माझ्यापुढे हा विद्यार्थी प्रथमच आला.' गुरु. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सहजतेने प्रगट होणाऱ्या आविष्कारामुळे मी प्रभावित होतो. ते ते गुण अंगीकारण्याचा माझा सतत प्रयत्न असतो.

आम्हांला गुरु. अण्णांसारखे विद्वान् व विद्याभूषित मुख्याध्यापक आहेत याचा अभिमानच नव्हे तर गर्व वाटे. त्यांच्या साधेपणाचा, टापटिपीचा, शिस्तबद्धतेचा, नीटनेटकेपणाचा प्रत्यय त्यांच्या वेशभूषेतून किंवा त्यांच्या कार्यालयातील टेबलावरील वस्तू पाहूनच येईल. या साधेपणाचा, शिस्तबद्धतेचा व टापटिपीचा माझ्यावर मनस्वी परिणाम झालेला आहे. ज्या विद्यालयात आपण चार वर्षे मुक्त शिक्षण घेतले, तेवढे शुल्क तरी आपण कमीत कमी संस्थेस द्यावयास हवे ही जाणीव अंशतः पूर्ण होऊन अवशिष्ट पूर्णतेच्या मार्गावर आहे.

इतर शाळांतून बाहेर पडलेल्या किती विद्यार्थ्यांसमोर असा आदर्श असतो ? तेवढा तरी फरक आमच्या व त्यांच्या जीवनात आहेच. यामुळे कुणाकुणाच्या जीवनात काय बदल होतो कुणास ठाऊक ! तो चांगलाच होईल अशी अपेक्षा करावयास काय हरकत आहे ?

We live in our desires rather than in our achievements.

९६. संस्थाचालकांचे गुरू

श्री. भा. द. राव, बी. ए. (ऑ.), बी. कॉम्.
व्यवसाय : आजीव सेवक पुणे अ. वि. गृह
शिक्षणकाल १९५४ ते १९५६
नव्या पिढीतील अ. वि. गृहाचे कार्यकर्ते
व्यापार, कार्यालय, जमाखर्च इ. खातेप्रमुख

व्यवस्थापकांचे शिक्षण गुरु. अण्णांचा रूढ अर्थाने मी विद्यार्थी कधीच नव्हतो. परंतु गेल्या सहा वर्षांत त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत कार्य करीत असताना शालेय विषयांच्या शिक्षणापेक्षा अधिक उपयुक्त व म्हणूनच अधिक मोलाचे असे शिक्षण मला व सर्व नव्या कार्यकर्त्यांना लाभत आहे, असे मी मानतो. हे शिक्षण व्यवहाराचे आहे, मानवी स्वभावाचे आहे, शिक्षणशास्त्राचे आहे, तसेच संस्था-व्यवस्थापनाचे व समाजसेवेचेही आहे. हाडाचे जन्मजात शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांचा सतत शैक्षणिक पाठपुरावा व पाठाराखणही कशा रीतीने करतात व वैचारिक धनाची मुक्त हस्ताने उधळण करीत असताना स्वतःही संपन्न व्यक्तिमत्त्वाचे धनी होतात याचे उत्कृष्ट दर्शन गुरु. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वात होते.

संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आग्रह असे संपन्न व्यक्तिमत्त्व संस्थेच्या कार्यकर्त्यांना लाभावे असा गुरु. अण्णांचा अहर्निश प्रयत्न असतो, ध्यास असतो. 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' असे ध्येयवाक्य अभिमानाने मिरविणाऱ्या संस्थेचे कार्यकर्तेही विद्वान व व्यासंगी असावेत आणि खऱ्या अर्थाने ते शिक्षक असावेत अशी गुरु. अण्णांची नव्या कार्यकर्त्यांपासून अपेक्षा

असते. ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रेरणा, मार्गदर्शन व मदत द्यायला ते नेहमीच तयार असतात.

बौद्धिक जिवंतपणाची प्रेरणा कार्यकर्त्यांनी सतत नवीन प्रसिद्ध होणारे ग्रंथ वाचावेत, बहुश्रुत व्हावे, वाचलेले-ऐकलेले इतरांना सांगावे व "शहाणे करोनि सोडावे सकळ जन" यासाठी त्यांचा अट्टाहास असतो. त्यासाठी अनेक उपक्रमांची ते जाणीवपूर्वक योजना करतात.

अशा अनेक योजना व अनेक उपक्रम आखून व त्यांत सर्व कार्यकर्त्यांना आग्रहाने सहभागी करून घेऊन त्यांची बौद्धिक उंची वाढावी व त्यांचे संपन्न व्यक्तिमत्त्व संस्थेस साहाय्यभूत व्हावे, ही त्यांची दृष्टी असते.

प्रभावाच्या विस्तृत कक्षा एकदा गुरु. अण्णांच्या सान्निध्यात विद्यार्थी आला की, त्यांच्या संस्कारांच्या प्रभावापासून दूर राहणे त्याला अत्यंत कठीण होते. संस्था सोडून विद्यार्थी स्वतःच्या व्यवसायाला लागला तरी हा प्रभाव कमी होत नाही, हे विशेष आहे. मासिक 'समाचार' किंवा 'सदाचार-चिंतनी' यांसारख्या माध्यमांतून आपल्या विचारांची व संस्कारांची शिदोरी ते विद्यार्थ्यांपर्यंत पोचवीत असतात.

व्यापक लोकसंग्रह त्यांचे असे जिव्हाळ्याचे संबंध फक्त माजी विद्यार्थ्यांशीच आहेत असे नाही. या विशाल 'लोकसंग्रहात' 'ऑनररी माजी विद्यार्थी, संस्थेचे हित-चिंतक, देणगीदार, सहकारी प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, संपादक, समाजसेवक, उद्योगपती, सरकारी अधिकारी अशा कित्येकांचा भरणा झालेला सापडतो. किंबहुना सार्वजनिक संपर्काचे एक पद्धतशीर शास्त्रच त्यांनी बनवलेले दिसते. "मित्र जोडता आले नाहीत तरी निदान शत्रू तरी वाढवू नका" असे ते नेहमी सांगतात. भेटायला येणाऱ्या व्यक्तींशी बोलताना किंवा संपर्क साधू इच्छिणाऱ्या व्यक्तींशी पत्रव्यवहार करताना मानवी स्वभावाच्या त्यांच्या ज्ञानाचे हृद्य दर्शनही कित्येकदा घडते. इतरांच्या भावनांची हळूवार हातांनी जपणूक करण्याचा प्रयत्न त्यात दिसतो.

तात्त्विक भूमिकेवर आग्रह कोणत्याही घटनेबाबत वा बाबीसंबंधी निर्णय घेताना त्यामागे तात्त्विक बैठक असावी व हे तात्त्विक निकष कार्यकर्त्यांनीच विचारपूर्वक ठरवावेत, अशी त्यांची इच्छा असते. नव्या कार्यकर्त्यांनी असा शास्त्रीय पद्धतीने विचार करण्यासाठी ते अनेकदा चर्चेचे 'प्रास्ताविक' करून त्यांना विचारप्रवण करतात. हा त्यांच्या शिक्षणकार्यक्रमातील फार महत्त्वाचा भाग आहे, असे मला वाटते. कोणताही निर्णय घेताना संबंधित प्रश्नासंबंधी साधकबाधक चर्चेला पूर्ण अवसर दिला जातो. अगदी विरोधी मत असले तरी ते मांडणारासंबंधी गैरसमज करून न घेता त्याचा दृष्टिकोन समजाऊन घेतला जातो. त्यामुळेच मतभेद असूनही परस्परांसंबंधी पूर्ण आदर बाळगला जातो; हार्दिक सौहार्द्र कायम राहते.

निर्णय घेण्याच्या पद्धती कार्यकर्त्यांनी घाईने व भावनेच्या भरात महत्त्वाचे निर्णय घेऊ नयेत, यासाठी क्वचित कार्यकर्त्यांच्या इच्छेविरुद्धही काही निर्णयांचे 'प्रथम वाचन', 'द्वितीय वाचन' अशी 'वाचने' केली जातात. त्यामुळे अखेरच्या निर्णयाला

येईपर्यंत भावनांचा जोर कमी होऊन विचारांना अवधी मिळतो. प्रश्नाचे सर्वांगीण स्वरूप ध्यानी यायला मदत होते. कोणत्याही प्रश्नाचा असा साकल्याने विचार करणे नेहमी एकाच व्यक्तीला शक्य होत नाही; तसेच तो मोठ्या सभेतील समूहालाही शक्य होत नाही. म्हणून मर्यादित सभासदांची, शक्यतो एकापेक्षा अधिक व्यक्तींची 'समिती' नेमण्याची पद्धतीही त्यांनी रूढ केली आहे. Two heads are always better than one हे त्यांचे या बाबतीतील नेहमीचे सूत्र आहे.

चालकांच्या एकजुटीवर भर अशा पद्धतीने संस्थेचा संसार सांभाळीत असताना अनेक धोरणे, अनेक व्यवधाने सांभाळावी लागतात. भिन्न स्वभावांच्या, भिन्न कुवतींच्या व भिन्न स्थितीतील माणसांना सांभाळून ठेवावे लागते. अशा सर्वांना एका ध्येयासाठी प्रेरित करावयाचे, कृतिशील करावयाचे काम अत्यंत अवघड आहे. पण या बाबत तपश्चर्येने व अनुभवाने आत्मसात झालेला त्यांचा आत्मविश्वास जबर आहे. कार्यकर्त्यांतील मतभेद ज्यामुळे वाढीला लागतील असे कोणतेही कृत्य त्यांना खपत नाही. मतभेदांची जाणीव ठेवून ते कमी कसे होतील व संस्थेचे कार्य अखंड कसे चालू राहील याचा प्रत्येकाने विचार करावा ही त्यांची अपेक्षा असते. उणीवा, दोष प्रत्येकात असतात; त्यांचा प्रत्येक वेळी उल्लेख न करता, त्यांचा उपद्रव कमी कसा करता येईल, याचे त्या व्यक्तीला फारसे न दुखवता शिक्षण देण्याचाही त्यांचा प्रयत्न असतो.

संस्था चालकांना वस्तुपाठ अशा प्रकारचे श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व आदर्श म्हणून डोळ्यासमोर असल्यामुळे त्याच्याच 'संस्कारां'मुळे 'शिस्त व शील' यांची विद्यार्थी व कार्यकर्ते यांच्यांत जोपासना होणे कठीण नाही. नैतिक शिक्षणातील हा सर्वांत मोठा वस्तुपाठ आहे असे मी मानतो.

□ □ □

९७. भाववाचक संस्कार

श्री. ज. र. जोशी, एम्. ए.

व्यवसाय : ज्यूनियर रीसर्च स्टायपेंड होल्डर

शिक्षणकाल १९५४ ते १९५८

वैदिक संशोधनाची आवड असलेले विद्यार्थी

मला चीड आली आमचा वेद म्हणजे अण्णांच्या स्मृती ! माझी पहिलीच स्मृती मोठी अविस्मरणीय आहे. कोकणातून आलेला मी पंगू मुलगा. वडील भिक्षुक. ते मासिक फक्त रु. वीस पाठवीत असत. मला गुणही बरे मिळाले होते, पण काही कारणामुळे मला नादारी मंजूर झाली नव्हती. मला काहीशी चीड आली. मी एक अर्ज तयार केला व मुख्याध्यापकांना भेटण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी आवारात फिरत

असलेली व्यक्ती मुख्याध्यापकच असल्याची खात्री करून घेऊन पुढे गेलो व अर्ज दिला. अण्णांनी तो वाचला व प्रेमळपणे पाठीवर हात ठेवून मला कार्यालयात नेले व उप-मुख्याध्यापकांना सांगितले, 'ह्याला नादारी द्या !' त्या वेळचा माझा आनंद आज वर्णिताही येणार नाही तर अनुभविण्याला कसा मिळेल ?

हवा आणि प्रकाश प्रत्येक वर्गाला एक 'अण्णांचा तास' असे. आल्याबरोबर प्रथम ते सर्व खिडक्या उघड्या असल्याची खात्री करून घेत. 'भरपूर सूर्यप्रकाश व मोकळी हवा यांची मला आवड आहे' हे त्यांचे वाक्य मी सक्रिय उच्चारीत असतो. त्यांची आवड तीच माझीही ठरली. ह्या मोकळेपणामुळे मनालाही मोकळेपणा येतो असा माझा अनुभव आहे. ह्याच मोकळेपणामुळे सत्याची बाजू घेऊन भांडताना मला माझ्या शारीरिक असमर्थतेचा विसर पडतो. असमर्थ माणसाने नेहमी नमते घेऊन वागावे हा शहाणपणाचा उपदेश मला कधीच रुचला नाही.

प्रश्नाने पदवी महत्त्वाची परीक्षा उत्तीर्ण झालो की, अण्णांना पेढे द्यायचा माझा परिपाठ. मी येताना दिसलो की, 'आता कोणती परीक्षा उत्तीर्ण ?' ह्या त्यांच्या प्रश्नानेच आणखी पदवी मिळाल्याचा आनंद व्हावा ! रस्त्यात गाठ पडली की, प्रेमळ चौकशीचे चार शब्द कानी पडावे व पुढील मार्गक्रमणेची शिदोरीच गवसावी. नियतकालिकातून अण्णांचे छायाचित्र वा लेख दिसताच दृष्टी थबकावी—आमचे अण्णा काय म्हणतात ते पाहावे. समाचारमध्ये अण्णांच्या यशाचा समाचार वाचावा. जीवनाच्या ओघात धडपडताना क्षुद्र कीटकाला एखादे सुवर्णपर्ण जवळून तरंगतांना दिसावे—कीटकाला वाटावे, सुवर्णपर्णालाही जीवनौघ सुटला नाही, मग मला तरी का खंत ?

व्यक्तीकडे दुर्लक्ष पण एवढाच दिलासा ! अधिक काही नाही. अण्णा हे शालेय जीवनाला दिलासा देणारी भव्यता निर्मिणारे खरे, पण ही भव्यता केवळ भाव-वाचकच—तेथे व्यक्तिवाचकाला स्थान नाही. चांगले निबंध गुरु. शुक्ल वर्गात वाचून दाखवीत; उलट गुरु. अण्णा प्रबंधांची नावे वाचून प्रबंध खाली ठेवीत. एक छोट्याशा निबंधाचीही तारीफ करी; दुसरा परिश्रमपूर्वक लिहिलेल्या प्रबंधाचे नुसते शीर्षकच वाचून आम्हांला नाउमेद करी. वर्गात मी सतत प्रथम क्रमांक टिकविला होता. पण अण्णांकडून कधी शाबासकी मिळालेली आठवत नाही. 'अण्णांच्या तासा'च्या आरंभी अण्णा डोळे, तोंड, हात, पाय यांना हुषारी येण्यासाठी विशिष्ट हालचाली करण्यास सांगत. बैठका काढणे मला कितपत झेपेल इकडे त्यांचे लक्ष नसे. भाववाचकाच्या भव्यतेत व्यक्तिवाचकाचा पंगूपणा दुर्लक्षित होई. शालान्त परीक्षेत विशेष यश मिळविण्यासाठी विशेष विद्यार्थ्याला विशेष मार्गदर्शनाची जरुरी असते. पण अण्णांच्या सामान्य वाचकांत असल्या विशेषवाचकाला स्थान नाही. मी वर्गसभेचे प्रात्यक्षिक एकदा रंगभूमीवर करून दाखविले होते. प्रात्यक्षिक सुरू होण्यापूर्वी गुरु. शिदोरे रंगभूमीवर आले व त्यांनी मला प्रोत्साहन दिले. पण वर्गसभेच्या उपक्रमाचे जे उद्‌गाते त्यांच्या समाधानाचा प्रत्यय येऊ शकला नाही.

अण्णांची शाबासकी जशी भाववाचक, तसा उपदेशही नभोवाणीवरील उपदेशासारखा सार्वजनिक ! शालेय कार्यक्रमात 'आमच्या अण्णां'चा आवाज ऐकण्यासाठी जसे आम्ही राममंदिरात जमत असू, त्याच भावनेने निरोपसमारंभातही !

अपुरे पडले व्यक्ती घडविण्यात अण्णा अपुरे पडले. व्यक्तिशः दखल घेऊन जो परिणाम झाला असता, तो चारित्र्यवत्ता, सुविचार, आत्मवृत्ते ह्या भाववाचकांनी कसा होणार ? अर्थात, व्यक्तिशः दखल म्हणजे छडचा नव्हेत. नराधम बनून नराचा नारायण होऊ शकत नाही—शकला नाही. उलट, काही गुरुजींच्या हातातील छडी अण्णा मोडून टाकीत आहेत असे भव्य चित्र दिसायला हवे होते. अन्यायापुढे कणखरपणे उभे ठाकलेले अण्णा आम्ही कधी पाहिले नाहीत.

डहाळी आणि वृक्ष आम्ही कुठेही भराऱ्या मारल्या अगर भरकटत गेलो, तरी त्या वृक्षराजाला कसे विसरू ? आमच्या चिमुकल्या नयनात जेवढी डहाळी साठविता आली, तेवढी आम्ही साठविली. सारा वृक्षराज साठविता आला असता, तर आम्ही सारे धन्य झालो असतो. पण ते झाले नाही—का ? 'वृक्ष भव्य म्हणून की आमची दृष्टी कोती म्हणून ?'

□ □ □

९८. त्रिंबक खुशाल आहे

श्री. त्रि. द. ताम्हनकर, डी. सी. ई.
व्यवसाय : इंजिनियर ला. इं. कॉर्पोरेशन
शिक्षणकाल १९५६ ते १९५८

संस्थेविषयी आत्यंतिक प्रेम व कृतज्ञता

देवघरी घंटेचा प्रभाव धनुर्धारी राममंदिरात समोरून जात असताना, एकदा देवघरातल्या घंटेसारखा आवाज आला. वळून पाहतो तर हातात घंटा घेऊन गुरु. अण्णा कार्यालयाच्या दारात विद्यालयाकडे पाहात उभे होते. काही सेकंदातच विद्यालयात एकदम शांतता झालेली पाहिली. आरडाओरड न करता, विद्यालयात शिपाई नसताना, कोणत्याही शिक्षकास न बोलावता, साध्या घंटेच्या साहाय्याने सबंध विद्यालयात शांतता निर्माण करणारे हेडमास्तर डॉ. ग. श्री. खैर मला असे दिसले व अजून ते तसेच आहेत.

त्रिंबकची खुशाली मला घरून एकदा मनिऑर्डर आली होती व मी बरेच दिवसात घरी खुशाली न कळविल्यामुळे वडिलांनी काळजी व्यक्त केली होती. मनिऑर्डर

अर्थातच "कार्याध्यक्ष पुणे अ. वि. गृह" या पत्त्यावर होती. गुरु. अण्णांनी त्यावर सही करून "चि. त्रिबक खुशाल आहे". असे शब्द लिहिले होते. दिवाळीत घरी गेल्यावर मला ते कुपन पाहावयास मिळाले व मी ओशाळलो. माझे वडील म्हणाले "पहा, डॉ. खैर किती तत्पर आहेत ! त्यांनी आम्हांस तुझी खुशाली कळविली".

हातात केरसुणी दिली आम्ही सावरकर मंदिरात राहात असताना, असेच एकदा अण्णा मंदिरात आले. मंदिरपाळी साधारण दोन-तीन दिवसात झाली नव्हती व विद्यार्थी गैरशिस्तीने जागेवर बसले होते. अण्णा म्हणाले, "अरे, आजतरी मंदिरपाळी कुणी करणार आहे की नाही ? का मी करू ?" ह्या शब्दांबरोबर सर्व विद्यार्थी अपराधी चेहरे करून उभे राहिले व गुरु. अण्णांनी अक्षरशः माझा कान धरून माझे हाती केरसुणी देऊन मंदिरपाळी करवून घेतली.

रुद्रावतारही दिसला गुरु. अण्णांचा रुद्रावतार मी एकदाच पाहिला आहे. माझी पहारापाळी होती व तिसरा पहारापाळीवाला आजारी असल्यामुळे झोपला होता. गुरु. अण्णा फेरीवर होते. रात्री १०।।–१०।।। ची वेळ असेल. त्यांनी त्या विद्यार्थ्यास उठवून बेदम चोप दिला. त्यानंतर त्याने पुढे कधीही नियमबाह्य वर्तन केले नाही.

प्रवासात आठवण ज्या ज्या वेळी अण्णा सोलापुरात येत, त्या त्या वेळी मला कळवीत व मी स्टेशनवर आलो, गेलो आहे. जणू काही आपले घरचेच कोणीतरी येत जात आहे असे वाटते.

नागपुरास श्री. गायकवाड यांच्याकडे मा. वि. संमेलन गुरु. अण्णांचे उपस्थितीत भरले होते. तेव्हा अण्णांनी सर्वांची आस्थापूर्वक व्यावसायिक व कौटुंबिक चौकशी केली. ते म्हणाले, "माझी जगात खूप घरे आहेत". ते त्यांनी बांधलेल्या "विद्या" घराबद्दल बोलत होते. "मा. वि. चे घर म्हणजे माझे त्या त्या गावातील घरच. असेच एकत्र जमत जा. संस्थेत कळवीत जा".

मला दिसलेले विशेष गुरु. अण्णांच्याबद्दल मला एकच सांगावयाचे की ते इतके मोठे आहेत, पण केव्हाही माजी विद्यार्थी भेटल्यावर त्यांच्याकडे ते अभिमानाने पाहतात.

असे दिसतात अण्णा अण्णांच्या नियमित जीवनाबद्दल मला आदर वाटतो. मी रात्री त्यांना प्राणायाम करताना व सकाळ-सायंकाळ नियमितपणे फिरावयास जाताना पाहिले आहे. माझ्या चार वर्षांच्या, वास्तव्यात ते आजारी पडल्याचे मी कधीच पाहिले नाही. त्यांचा चेहरा इतका तेजःपुंज आहे की सकाळी सहा वाजता जरी त्यांना स्नानाचे आधीही संस्थेच्या आवारात पाहिले, तरी ते आंघोळ केल्यासारखे दिसतात. त्यांच्या साध्या राहणीतच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

□ □ □

९९. कोलंबसाजवळ पत्ताही नव्हता

श्री. श्री. वि. कुलकर्णी
व्यवसाय : विद्यार्थी, इंजिनियरिंग कॉलेज
शिक्षणकाल १९५७ ते १९६१

सदाचार व सद्विचार यांची आवड

काही बारकावे गुरु. अण्णांना एकदा प्रसाद मासिकात लेख द्यावयाचा होता. त्यांनी तो सांगितला व मी लिहिला. परंतु अगोदर वर आणि उजव्या बाजूला जागा सोड, शुद्ध लिही, अक्षर स्वच्छ काढ इत्यादी बारीक-सारीक सूचनाही देण्यास ते विसरले नाहीत. ही एक माझ्या दृष्टीने चांगली सवय आहे. गुरु. अण्णांना बागकामाची आवड आहे. त्यांनी मला कार्यालयासमोर गुलाब लावायला सांगितले. सध्याही त्यांच्या 'विद्या' बंगल्यात प्रवेश करण्यापूर्वी रंगीबेरंगी फुले आढळल्याशिवाय राहणार नाहीत.

गुरु. अण्णा मोजकेच बोलतात. त्यांचा चिंतनावर दृढ विश्वास आहे, म्हणूनच ते गंभीर दिसतात असे वाटते. परंतु मूर्ती पाहिल्यावर मात्र मनात आदर, निर्माण होतो. ते विशेषतः कुलगुरु-सभेत वा सुसंगतीत आपला जीवनाविषयीचा दृष्टिकोन सांगत असत.

कोलंबसाजवळ पत्ताही नव्हता इतिहासकार प्रा. रा. वि. ओतूरकर यांच्या घरी गुरु. अण्णांचे काही टपाल पोचवायचे होते. ते पोचविण्याची पाळी माझी होती. पाकिटावर, श्री. रा. वि. ओतूरकर, 'स्वातंत्र्य', पी. वाय्. सी. ग्राऊंडजवळ, असा पत्ता होता. मी खूप शोधला तरी मला सापडेना. शेवटी कंटाळलो. गुरु. अण्णांच्याजवळ "सापडत नाही" म्हणून केविलवाण्या चेहऱ्याने सांगावयास आलो. गुरु. अण्णा म्हणाले, "कोलंबसाला अमेरिका शोधण्यासाठी कुणी पत्ता दिला होता का ? हे टपाल आधी पोचव. नंतर जेवण कर." मी ना. कृ. शिंदे या विद्यार्थ्याला विचारून ते पत्र पोचविले. तेव्हापासून, कुठलीही गोष्ट तन-मन लावून केली की आपोआप होते; चिकाटीसुद्धा आवश्यक आहे, अशा तऱ्हेचा धडा मी शिकलो. सध्याच्या आयुष्यात हरघडी हे गुण उपयोगी पडतात.

हरिश्चंद्राविषयी वाद आम्हाला ११ वीला मराठी शिकविण्यासाठी श्री. सोमण गुरुजी होते. वर्गात "हरिश्चंद्र तारामती" हा धडा शिकविताना मराठीच्या शिक्षकांनी हरिश्चंद्राचे चरित्र दुसऱ्याला बोध घेण्यासारखे नाही, पूर्वीच्या इतिहासात त्याचे तितके महत्त्वाचे स्थान नाही, अशा तऱ्हेची विचारसरणी मांडली. परंतु माझ्या एका मित्राच्या बुद्धीला ते पटेना. मग हा धडा ११ वीच्या पुस्तकात का घातला ? शेवटी आम्ही परीक्षार्थीच्या दृष्टिकोनातून गुरु. अण्णांकडे गेलो. त्यांनी हरिश्चंद्राचे चरित्र उत्कृष्ट असल्याचे सांगितले. ते अनेक उदाहरणांनी पटवून दिले. आमचे मन शांत झाले. त्या गुरुजींना आम्ही पुन्हा भेटलो. ते म्हणाले, "प्रत्येकाची विचारसरणी वेगवेगळी असते".

१००. चिंतनाची किंमत आता कळली

श्री. वा. म. सिधये, बी. एस्सी, डी. आर्. ई.
व्यवसाय : अ. वि. गृह यांत्रिक विभाग-शिक्षक
शिक्षणकाल १९५७ ते १९६१
अभ्यासू वृत्ती ब सौजन्यशील स्वभावाचे अध्यापक

पंगत परिचय आश्रमबंधूंच्या सूचनेवरून सरळ टोपी डोक्याला घालून गुरु. अण्णांच्या कार्यालयात शिरलो. गुरु. अण्णांना सरळच टोपी घालणे का आवडत होते, हे मात्र मला अजूनही गूढच आहे. एक मात्र खरे की मी स्वत: गुरु. अण्णांच्या डोक्यावर तिरकी टोपी कधीच पाहिली नाही. आत घाबरत घाबरत शिरताच त्यांनी विचारले, "काय हवय ?" मी म्हणालो की, "तुमच्या कार्यालयाचे काम मला सांगितले आहे". त्यावर ते म्हणाले, "ठीक आहे. तुला जो वेळ मोकळा असेल त्यातून फक्त एक तास यायचे, वरंच शिकायला मिळेल"; आणि चक्क त्यांनी रात्री आपल्या घरी जेवायला बोलावले. मला त्यांनी सर्वांत मध्ये बसविले अन् जेवणाला सुरुवात झाली. घरातील सर्वचजण मोकळेपणी बोलत होते. मला प्रश्न विचारीत होते. पण मी आपला प्रश्नाला उत्तरच देत होतो. मला नवीनच प्रसंग होता तो; आणि प्रथमत: मी बराच लाजराही होतो. गुरु. अण्णांची ही घरी परिचय करून देण्याची पद्धत मात्र नि:संशय चांगली होती.

अपराधावर चिंतन असेच एकदा अण्णा गावाला गेले असताना मीही कामाला गुंगारा दिला. अण्णा यायला चांगले चार दिवस होते. पण अचानक एके दिवशी अण्णा गावाहून आले नि मला बोलावून घेतले. माझे काम अपूर्णच होते. त्या वेळीच अण्णा माझ्यावर प्रथम रागावले. मी खालच्या मानेनेच अपराधाची कबुली दिली. मला म्हणाले, "राममंदिरात जा, चिंतन कर नि मग ये". मी रामापुढे गेलो नि अपराधी मनाने उभा राहिलो एवढेच. पण चिंतनाचा खरा अर्थ त्या वेळी मात्र मला मुळीच कळला नाही. इतर सीनिअर मुलांच्या सल्ल्याने मी माफीपत्र लिहून, एक तासाने अण्णांकडे गेलो. त्यांनी वाचून पाहिले नि त्याच्यावर लिहून ठेवले की, "जपून ठेवणे व दर शनिवारी वाचणे". अजूनही कधीतरी ते मी वाचतो. पण त्या चिंतनाची खरीखुरी किंमत मात्र कळली ती आताच.

खटकणारे थोडे एक गोष्ट जी नेहमी मला खटकत आली आहे ती म्हणजे, अण्णांची खोलीत फेरी असो वा कार्यालयात गाठ असो, नेहमीच ते अभ्यासाची चौकशी करायचे. आज तू काय जेवलास ? चांगले होते का ? व्यायाम घेतलास का ? असे कधीच विचारले गेले नाही.

इंग्लिश सुधारले आश्रम सोडला नि स. प. महाविद्यालयात मी डेमॉन्स्ट्रेटरची नोकरी पत्करली. मला पहिली अडचण भासली ती इंग्रजीची; आणि जशी मुलांची ओढ मातेकडे असते तसा मी गुरु. अण्णांकडे गेलो. त्यांनी मला फार उत्तम उपाय सांगितला. माझ्याकडून मात्र तो शंभर टक्के अमलात आणला गेला नाही, पण जो थोडा फार आणला गेला, त्याचा फारच उपयोग झाला.

अशा प्रकारे माझ्या आयुष्याला जे काही वरेवाईट वळण मिळाले आहे, त्यात बराचसा वाटा गुरु. अण्णांचाच आहे. वाईट वाटते ते एवढेच की, अण्णांची शिस्त नि संस्कार जर शंभर टक्के आचरणात आणले असते, तर जो मी आज आहे, त्यापेक्षा निश्चितच वेगळा दिसलो असतो.

□ □ □

१०१. स्वत:ला प्रायश्चित्त

श्री. वा. श्री. देशपांडे, बी. ई.
व्यवसाय : इंजिनियर, एस्. टी. कॉर्पो० (रत्नागिरी)
शिक्षणकाल १९५८ ते १९६१
नव्या पिढीतील कर्तबगार इंजिनिअर

चुकीच्या शिक्षेबद्दल प्रायश्चित्त १९५८–६१ मे हा इंटर-सायन्सनंतरचा माझा आश्रमातील वास्तव्य-काल. गुरु. अण्णांच्या कार्याचा व्याप शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात वरचेवर वृद्धिंगत होत गेल्याने, त्यांच्याशी म्हणावा तेवढा निकट संबंध येऊ शकला नाही.

नुकत्याच नवीन बांधलेल्या वसतिगृहाच्या इमारतीमध्ये विद्यार्थी राहावयास गेल्यानंतरचा प्रसंग ! सकाळच्या ६।। च्या सुमाराच्या फेरीमध्ये काही विद्यार्थी हे उशिरा उठले व पहाटे ५ ला उठण्याचा नियमभंग त्यांनी केला म्हणून, गुरु. अण्णांनी त्यांची मुखश्री सुशोभित केली. अर्थात् वस्तुस्थिती तशी नसल्याने त्या दोन विद्यार्थ्यांनी लगेच कार्यालयात जाऊन आपण उशिरा उठलो नसल्याचे सप्रमाण सिद्ध करून दाखविले. तेव्हा पश्चात्ताप वाटून अण्णांनी त्यांच्या देखत तीन वेळा आपल्या तोंडात मारून घेतली. टिपून घेण्यासारखा हा प्रसंग होता.

तिरस्काराचा प्रसंग थोडासा तिरस्कार यावा असाच प्रसंग आहे हा. अण्णांच्या घरच्या मंगलकार्य-प्रसंगी श्रीराममंदिरात पन्हे-पान समारंभ झाला होता. यावेळी पन्ह्याची बरणी हातगाडीवरून आणताना एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या हातून फुटली. याप्रसंगी भावनात्मक व समयोचित प्रतिक्रिया सोडून अण्णांनी कठोर व्यावहारिक भूमिकेतून त्या बरणीची किंमत त्या विद्यार्थ्याकडून घेतली. माझ्या आठवणीप्रमाणे अण्णांनी आपल्या निर्णयात बदल केलेला नाही.

□ □ □

१०२. गृहशिक्षणाचा एक नमुना

कुमारी प्रभा गजानन खैर, बी. ई. (इलेक्ट्रिकल)
व्यवसाय : ज्यूनियर इंजिनियर, लार्सेन टुब्रो, मुंबई
शिक्षणकाल—१९४३ साली कुटुंबात जन्म झाल्यापासून
डॉ. खैर यांची कनिष्ठ कन्या
महिला यंत्रज्ञांची पहिली पिढी

स्वावलंबी सुख हा लाभ पूर्व सुकृताविण काय होतो ! जेव्हा बाहेरच्या जगाशी संबंध आला, रोज नवीन नवीन ओळखी होऊ लागल्या, बऱ्यावाईट गोष्टी समजण्याइतकी अक्कल आली, तेव्हा साहजिकच भेटलेल्या व्यक्तीच्या परिस्थितीशी स्वतःची तुलना करण्याचा छंद लागला, आणि मग पदोपदी ही उक्ती आठवू लागली· कोणी पैसा नाही म्हणून, कोणी बुद्धी-शिक्षण नाही म्हणून, कोणी संधी नाही म्हणून, तर कोणी सर्व काही असूनही समाधानी वृत्ती नसल्याने दुःखी ! आणि हे सर्व पाहिल्यावर अण्णांनी आमच्यात जी समाधानी वृत्तीची जोपासना केली, तिला तोड नाही असेच म्हणावे लागते. सुख आजूबाजूच्या परिस्थितीपेक्षा स्वतःच्या मनावर अवलंबून असते, याचे शिक्षण आम्हांला लहानपणापासून प्रात्यक्षिकासह मिळाले आहे.

जेवताना गप्पागोष्टी रात्री साडेआठ-नऊच्या सुमाराला आमच्याकडे येणाराला आम्ही सगळेजण एका टेबलाभोवती बसून गप्पा मारीत जेवत आहोत, हेच दृश्य बघावयाला मिळेल. दिवसभर प्रत्येकजण आपापल्या उद्योगात ! त्यामुळे दुसरा काय करतो हे बघायचे म्हटले तरी फुरसत नाही. प्रत्येकाच्या घरी असण्याच्या वेळा अशा विचित्र की एकमेकाची भेट झाली तरी चार-दोन वाक्यांच्या देवाण-घेवाणी पलीकडे बोलायला वेळ नाही. अशा परिस्थितीत रात्रीची जेवणाची वेळ हीच काय ती सर्वांनी एकत्र येण्याची सुवर्णसंधी ! कारण त्यानंतर परत प्रत्येकजण आपल्या अभ्यास-वाचनात गढणार ! जुन्या काळी अशी पद्धत असे की जेवताना कोणीही बोलावयाचे नाही. आमच्याकडे या उलट नियम. प्रत्येकाने काही ना काही बोलावे, यासाठी अण्णा नेहमी निरनिराळे विषय शोधून काढीत असतात. कधी स्वतः बागेत काय काय काम केले त्याचा आढावा घेऊन इतर कोणी काय केले ते विचारतात ! तर कधी त्या दिवशी किंवा आठवड्यात शाळा-कॉलेजमध्ये घडलेल्या गमती सांगायला सांगतात. कधी राजकारणातील एखाद्या चालू प्रश्नावर चर्चा सुरू करून देतात तर कधी स्वतः वाचलेली माहिती आम्हाला सांगतात. काव्यशास्त्र, विनोद, राजकारण, नाटक, सिनेमा कोणताही विषय वर्ज्य नव्हता. अनोळखी माणसांना अण्णा जितके गंभीर वाटतात तितकेच आम्हाला विनोदी म्हणून माहीत आहेत. अण्णांजवळ

चांगल्या विनोदांचा संग्रह आहे आणि हे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. कोणत्याही माणसाला आपलेसे करावयाला विनोदासारखे प्रभावी अस्त्र नाही हे अण्णांनी त्यांच्या आयुष्यातील प्रसंग वेळोवेळी सांगून आम्हाला पटवून दिले आहे. 'हसतमुख चेहरा हे यशाचे निम्मे रहस्य' हे ब्रीद आमच्या अगदी रोमरोमी भिनले आहे. या वयातही प्रवासाची दगदग–कामाचा शीण सहन करूनआल्यावर अण्णा उत्साहाने जे वर्णन करतात, जेथे जेथे गेले असतील तेथील चांगल्या गोष्टींचे तपशील इतके खुलवून सांगतात की, एखाद्या तिऱ्हाईताला ते प्रवासातून दमून आले असतील अशी शंकासुद्धा येणार नाही.

घरकामाचे आमचे वेळापत्रक मुले घरात काम करीत नाहीत ही घरोघर ऐकू येणारी ओरड ! पण आमच्या घरी मात्र कधी ऐकू आली नाही. कारण, मला आठवते तेव्हापासून आमच्या घरी कामाचे वेळापत्रक भिंतीला लटकलेले आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत करावी लागणारी विविध कामे,केर काढण्यापासून ते दूध आणणे, स्वयंपाकघरातील बारीक सारीक कामे, बिले भरणे, भाजी व बाजार आणणे, पत्रे लिहिणे ही सर्व कामे वाटून दिलेली होती. त्यात परत एकावर अन्याय होऊ नये म्हणून, दर महिन्याला पाळी बदलत असे. दोन-तीन वर्षे तर स्वयंपाक, अर्थात् संध्याकाळचा, सुद्धा अंतर्भूत केलेला मला आठवतो. पण अर्थातच तेव्हा मी लहान असल्याने स्वयंपाक तयार होतो की नाही हे बघण्याची नैतिक जबाबदारी फक्त माझ्यावर आली होती. विशेष म्हणजे या सर्वांतून कधी भाऊ सुटला आहे असे मला आठवत नाही. मुलगा-मुलगी हा भेद अशा बाबतीत तरी न केल्यामुळेच, बदलत्या काळाला यशस्वी रीतीने तोंड देण्याचे सामर्थ्य आज आमच्यात आले आहे, असे निश्चितपणे म्हणावे लागेल. घरातील लोकांच्या सोयीप्रमाणे वेळोवेळी बदल केल्याने हे वेळापत्रक नुसते भिंतीवर न राहता आचरणात आणले गेले. ज्याला बंधनाची सवय नाही त्याला हे ऐकायला कसेसेच वाटेल. पण यामुळे होणारी सोय पाहिली म्हणजे त्याची महती कळते. कामांचे स्वरूप माहीत असल्याने अभ्यास व उनाडक्याशी त्याचा व्यवस्थित मेळ घालणे शक्य होते. नाहीतर गणित अर्धे सोडवून झाले की आई कामाला हाक मारते आणि मग कोणत्यातरी एका पक्षाची आरडाओरड ! अर्थात् या वेळापत्रकामुळे एक तोटाही झाला. वेळापत्रकात दिलेले काम तेवढे करावयाचे या सवयीमुळे इतर कामे पडलेली असून आम्हाला दिसत नसत अथवा एखादे लक्षात आले तरी 'हे माझे नव्हे' म्हणून पुढे जाण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. पण आम्ही जसजसे मोठे होत गेलो तसतसे कधी अण्णांनी सांगून––विशेषतः सौ. ताईची कामे करण्याबद्दल–तर कधी इतरत्र बघितल्याने व वयाबरोबर समज आल्याने ही सवय नष्ट झाली.

स्वतःच्या पायावर चालू युगाचा स्वावलंबनाचा घडाही आम्ही घरीच गिरविला. जसजशी घरकामात सुलभता आणणारी यंत्रे निर्माण होतील, तसतसे हे स्वावलंबन वाढतच जाणार. आश्रमातील मुले स्वतःचे धुणे स्वतः धुतात, म्हणून आम्ही सर्वजण बारा वर्षांचे झाल्याबरोबर आपापले धुणे धुवू लागलो. शाळा-कॉलेजचा अभ्यास याच्या

आड कधीच आला नाही. मोऱ्या आणि संडास धुवायलाही आम्हाला कधी लाज वाटली नाही. स्वत:ची सर्व कामे स्वत: करण्याचे फार मोठे शिक्षण अण्णांनी आम्हाला दिले आहे. प्राथमिक शाळेपासून ते कॉलेजपर्यंत मला पैसे संभाळता येणार नाहीत म्हणून कोणी माझी फी भरायला शाळेत आल्याचे मला आठवत नाही किंवा माझी फीही कधी हरवली नाही. शाळेला लागणारी वह्या-पुस्तके व इतर सामान–सर्व खरेदी आम्हीच करीत असू. कॉलेजमध्ये प्रवेश घेताना व इतर वेळी प्रमाणपत्रे मिळविताना अण्णांनी आम्हांला मार्गदर्शन जरूर केले. पण चालता येणाऱ्या बालकाला ज्याप्रमाणे आधाराकरिता एक बोट धरू देणे इष्ट, कडेवर घेतल्यास ते आळशी लोळागोळा बनते, त्याप्रमाणे मार्गदर्शनाचा योग्य तेवढाच आधार आम्हांला मिळाला आणि स्वत: चालताना होणारा वालिश आनंद आम्हांला त्या वयातही वेगळ्या स्वरूपात अनुभवायला मिळाला.

स्वभावाची घडण स्वावलंबनावरोवरच दुसरा कोणता ठेवा मिळाला असेल तर तो शील आणि चारित्र्य यांचा ! वयानुसार आम्ही एकमेकांशी भांडलो, क्वचित्-प्रसंगी का होईना—मारामारीही केली, पण अपशब्द मात्र कधीच उच्चारले नाहीत. 'तात्त्विक चर्चा' या नावाखाली मोडणारे सर्व प्रकार आम्ही हाताळले. मला अजूनही पक्के आठवते की, आम्ही भांडू लागलो की सौ. ताई आम्हाला रागाने भांडू नका म्हणून सांगे. अण्णा मात्र 'आणखी जोरात भांडा' म्हणून सांगत. जोडीला आणखी स्वत: लहानपणी केलेल्या भांडणांचे वर्णन ऐकवीत. साहजिकच ते ऐकण्याच्या नादात मूळ भांडणाचा मुद्दा कोठल्या कोठे गायब होत असे. पण तरीही भांडण जरी नाही तरी मुद्देसूद वादविवाद करणे हीही एक कला आहे आणि जोपर्यंत एखादी गोष्ट आपल्याला बरोबर वाटते तोपर्यंत तिचे समर्थन करण्याची रग अंगात असणे हा एक अत्यावश्यक गुण आहे, हे ज्ञान अशाच अनुभवांतून पक्के झाले. आपल्या-पेक्षा ज्येष्ठ लोकांना त्यांचा मान राखून, आदर ठेवून, आपले म्हणणे पटवून देण्याचे बाळकडूही अण्णांनीच आम्हांला दिले. जेव्हा एखादी गोष्ट करण्याची परवानगी आम्ही अण्णांकडे मागतो, तेव्हा अण्णा झटकन् निर्णय कधीच देत नाहीत. आधी इत्थंभूत माहिती विचारून घेऊन मग त्या गोष्टीच्या दोन्ही बाजू व परिणाम समजावून सांगतात. जर अण्णांच्या मनाजोगी गोष्ट असेल तर चर्चा येथेच थांबते. पण मनाविरुद्ध असेल तर ती न करण्याचा सल्ला देतात. पण त्याचबरोबर हेही सांगतात की, 'या उपरही विचारांती तुझे म्हणणे बरोबर आहे असे तुला वाटत असेल तर जरूर तुझ्या मनाप्रमाणे वाग'. अशाच प्रसंगांतून मी सायकल वापरात आणली व बोटिंग शिकले. पण एकदा परवानगी दिल्यावर अण्णांनी एका अक्षराने कधी तक्रार केल्याचे मला आठवत नाही; आणि यातूनच आपल्याला न पटणाऱ्या गोष्टी इतरांनी केल्या तरी आपला शांतपणा किंवा सद्भावना न सोडण्याचे शिक्षण साहजिकपणे मिळाले.

आदराची शिकवण सर्वसाधारणपणे मुलींना रीतिरिवाजाचे वळण आई लावते. पण नव्या युगात स्त्रीचे विश्व चार भिंतींपुरते सीमित नसल्याने त्याबरोबरच चार लोकांत कसे वागावे याचे शिक्षणही आपल्या कन्यारत्नांना दिले पाहिजे हे अण्णांनी

निबंध. क्रमांक ६५५८ दि. 20/3/07 2003

वेळीच ओळखले. पूर्वीच्या काळी पाहुणा आला तरी, स्त्रीने स्वयंपाकघराच्या बाहेर यावयाचे नाही असा नियम होता. पण आता जर गृहिणीने येऊन दारातच स्वागत करून, पाहुण्याच्या हातातले ओझे हलके केले तर पाहुण्याला आपले आपुलकीने–अगत्याने–स्वागत झाल्यासारखे वाटते, हे अण्णांनी अनेक वेळा घडलेले प्रसंग सांगून आमच्या मनावर पुरते बिंबविले आहे. अण्णांनी खूप प्रवास केला असल्याने व त्याचबरोबर अनेक घरचे रीतिरिवाज पाहिलेले असल्याने त्यातील चांगल्या गोष्टींचे वर्णन ते साहजिकच आम्हाला सांगतात. पाहुणा म्हणून गेल्यावर केवळ हक्क म्हणून जेवून परत येण्यापेक्षा जेवण झाल्यावर अथवा सोयीप्रमाणे जर पदार्थांची स्तुती केली, घरातील लोकांची आस्थापूर्वक विचारपूस केली, तर साहजिकच असा पाहुणा हवासा वाटतो हे अण्णांना येणाऱ्या 'आमच्याकडेच उतरावयाला आले पाहिजे' या मजकुराच्या कार्डांनी आम्हाला शिकविले. रस्त्यात भेटणारे, अण्णा ज्यांना ओळखतही नाहीत असे, अण्णांचे विद्यार्थी जेव्हा वाकून नमस्कार करतात, हातातील छोटीशी असलेली पिशवीही घेतात, आणि असे प्रसंग जेव्हा अण्णा मोठ्या अभिमानाने सांगतात, तेव्हा आम्हीही आमच्या शिक्षकांबद्दल असाच आदर दाखवावा, हीच अण्णांची मनापासूनची इच्छा असते. आणि अण्णांच्या आणि आमच्या सुदैवाने खरोखरच त्यांना तशी मुले मिळाली आहेत. कारण प्राध्यापकांना अरे-तुरे म्हणणाऱ्यांच्या या काळात आमच्या घरी मात्र त्यांचा योग्य तो आदर कटाक्षाने राखला जातो.

आईवडिलांची ऐच्छिक निवड सर्व विषयांचे, सर्व क्षेत्रांचे, जगातील चालू घडामोडींचे ज्ञान असणे ही गोष्ट चार लोकांत मिसळताना हितावह ठरते. चार वर्षांच्या मुलीपासून ते म्हाताऱ्यापर्यंत, एखाद्या वुरुडिणीपासून ते केमिस्ट्रीच्या प्राध्यापकापर्यंत, कोणीही भेटला तरी त्याच्याशी गप्पा मारून, त्याला नाना प्रश्न विचारून अण्णा त्याची माहिती मिळवितात. अर्थात् हा गुण पाहिजे त्या प्रमाणात आमच्यात उतरलेला नाही. परंतु त्या दृष्टीने प्रयत्न करावयाला पाहिजेत हे पदोपदी लक्षात येते. अनेक जणांना अण्णा फार गंभीर-रागीट असतील असे वाटते. पण वेळप्रसंगी आमच्यांत ते तितकेच मिळून-मिसळून मित्रत्वाच्या नात्याने वागतात. असाच एकदा अण्णांनी आम्हांला प्रश्न केला की 'जर तुम्हाला आपले आईवडील पुनः निवडण्याची संधी मिळाली तर कोणते गुण असलेले आईवडील तुम्ही निवडाल ?' आणि आम्हीही बेधडकपणे आम्हाला जे वाटत होते ते सांगितले. पण यात आमच्या धैर्यापेक्षा अण्णांनी निर्माण केलेल्या वातावरणालाच जास्त श्रेय आहे हे कबूल करावेच लागेल. साहजिकच अशा वेळी मनात येते की, किती जणांना असे समजूतदार वडील मिळाले असतील ? आणि किती पित्यांना अशी समजूतदार (?) कन्यारत्ने लाभली असतील ?

उपेक्षिलेला उपदेश एका गोष्टीचे शिक्षण मात्र अण्णांनी आम्हाला दिले नाही किंवा आम्ही घेतले नाही असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल आणि त्याबद्दल अण्णा कायम तक्रार करीत असतात. शाळा-कॉलेजमध्ये लागणाऱ्या इंग्लिश-संस्कृतच्या

अभ्यासात आम्ही अण्णांचे मार्गदर्शन किंवा मदत कधीच घेतली नाही, पण अण्णा म्हणतात त्याप्रमाणे 'अण्णांच्या ज्ञानावर आमचा विश्वास नसल्यामुळे नव्हे, तर नेहमीच वर्गाबरोबर असल्याने तशी जरूरच भासली नाही. शाळेतील आमच्या अभ्यासाची अण्णांना यथार्थ कल्पना असली तरी मुद्दाम त्याकरिता अण्णांना त्रास द्यावा, इतर महत्त्वाची कामे बाजूला सारायला लावावे असे वाटत नसे. या संदर्भात मला एक गोष्ट अजून चांगलीच आठवते. मी शालान्त परीक्षेची तयारी करीत असताना कधी नव्हे ती एक दिवस शांत संध्याकाळ वघून एक निबंध तपासून घेण्याकरिता अण्णांकडे गेले. अण्णा पडून पोट शेकत होते म्हणून त्यांनी मलाच निबंध मोठ्याने वाचायला सांगितला आणि ते चुका दुरुस्त करू लागले. त्याच वेळी तेथे एक म्हातारेसे शिक्षक अण्णांकडे काही काम असल्याने येऊन बसले. माझा निबंध वाचून झाल्यावर त्यांनी अण्णांना विचारले, 'कितवीत ? आठवीत का आहे ?' परत त्या वाटेने जाण्याचे धैर्य मला झाले नाही. इंग्लिश संभाषणाच्या बाबतीत मात्र अण्णा नेहमी म्हणत असत की, आतापासून बोलायची सवय करा, म्हणजे पुढे जड जाणार नाही. पण तेव्हा दुर्लक्ष केले आणि त्याची फळे आता आम्ही भोगीत आहोत. आता पदोपदी जेव्हा इंग्लिश बोलताना अडखळायला झाले नाही तरी ज्ञान तोकडे पडते तेव्हा खरोखरच पश्चात्ताप होतो. पण पश्चात्ताप नेहमीच पश्चात् होत असल्याने निरुपयोगी ठरतो. जी गोष्ट इंग्लिश संभाषणाची, तीच हिंदीची ! आमचीच पुस्तके वाचून थोडक्या वेळात अण्णा आमच्यापेक्षा चांगले भाषण करता येईल इतके चांगले हिंदी बोलू लागले. पण आम्ही मात्र, आहोत तेथेच आहोत.

वाचन-लेखनाची आवड मराठी साहित्याच्या बाबतीत मात्र अण्णांनी आम्हाला खूपच आवड लावली. घरात आमच्या डोळ्यासमोर नेहमी निरनिराळी मासिके, पुस्तके असल्याने, व त्यावर चर्चा होत असल्याने आपणही वाचून मत दिले पाहिजे, ही भावना निर्माण झाली व यातूनच साहित्याबद्दल गोडी उत्पन्न झाली. निबंधाच्या जुन्या वह्या जपून ठेवा, म्हणजे प्रगती कशी होते ते तुमचे तुम्हाला कळेल आणि त्याचबरोबर भविष्यकाळात चांगली करमणूक होईल, असे अण्णांचे नेहमी सांगणे असे. आता जेव्हा मी सातवीच्या वह्या काढून बसते, तेव्हा खरोखरच मन वर्तमान विसरून भूतकाळात रमून जाते. कोठे प्रवास-कँप करून आल्यावर प्रवासवर्णन लिहून ठेवा म्हणून अण्णांचे सांगणे असते. अशाच सांगण्यातून मूर्त झालेले स्वप्न म्हणजे 'साठीचा संसार !' अण्णांच्या षष्टयब्दीच्या निमित्ताने आम्ही सर्वांनी मिळून तयार केलेले हे हस्तलिखित पुस्तक म्हणजे आमच्या संबंधितांना एक मेजवानीच वाटली ! परत अशा काही गोष्टी असतात की, ज्या स्पष्टपणे सांगता येत नाहीत पण लिहिता येतात. अशा गोष्टींना या निमित्ताने वाचा फुटली. उत्तान मासिके अनिष्ट म्हणून त्यावर संपूर्ण बंदी घालणे म्हणजे फाजील उत्सुकतेला निमंत्रण हे माहीत असल्याने तशी बंदी कधीच घातली गेली नाही. पण त्याचबरोबर इष्ट असेच वाङ्मय घरात आल्याने क्लिष्ट प्रश्न निर्माण होण्याची वेळही आली नाही. आमच्या घरी नाना विषयांवरच्या पुस्तकांचा

इतका संग्रह होता की त्या वयात पुस्तके सोडून इतरत्र वळण्याची कधी इच्छाच झाली नाही.

छंदांचा आग्रह व उदाहरण व्यायाम आणि संगीत या दोन गोष्टी अशा आहेत की ज्या अण्णांनी आम्हाला मुक्त हस्ते देऊ केल्या, पण आम्हीच घेऊ शकलो नाहीत. बरींच वर्षे—जवळ जवळ सर्वांचे बालपण संपेपर्यंत—आम्ही सर्वजण स्काऊट चळवळीत भाग घेत असल्याने नियमित व्यायाम आपोआपच होत असे. आता मात्र अजूनही अण्णा नियमित व्यायाम करतात तो बघण्यापलीकडे आम्ही काही करीत नाही. संगीताच्या जोपासनेकरिताही अण्णांनी घरात रेडिओ, रेकॉर्ड प्लेअर, हार्मोनियम आणला. स्वतःजवळ असलेल्या गाण्यांच्या संग्रहात अण्णा नेहमी भर घालीत असतात. संध्याकाळी व रात्री आमच्याकडे येणाऱ्याला अण्णांचे आणि त्याचबरोबर इतर एक-दोन सूर तरी ऐकू येतील. अण्णांजवळ नाट्यसंगीताबरोबर शास्त्रोक्त व इतर गाण्यांचाही संग्रह आहे. निवडक सिने-संगीतही अण्णांना आवडते.उलट वेचक अशी गाणी पाठ करण्याबद्दल अण्णा आम्हांला नेहमी सांगतात. आम्ही दाखवीत असलेल्या निरुत्साहाबद्दल नाराजी व्यक्त करतात. पूर्वग्रह मनात घरून आमच्या घरात येणाऱ्याने सिने-संगीताच्या लकेरी कानावर आल्या तरी दचकून जाण्याचे काही कारण नाही. रात्रीच्या वेळी रेडिओ संगीत ऐकत कॅरम किंवा जास्त लोक असल्यास पत्ते खेळणे हा अण्णांचा आवडता छंद आहे.

किंमत कळते ! कधी सांगून, कधी रागावून, कधी प्रात्यक्षिकाने, कधी आचरणाने, नाना तऱ्हेने अण्णांनी आम्हांला शिक्षण दिले. पण आजपर्यंतच्या आयुष्यात शिक्षेचा प्रसंग मात्र कधीच आला नाही. आम्हीही सर्वजण अण्णांचीच समंजस मुले असल्याने व त्यांतूनही कधी वेळ आली तरी अण्णांनी संयम राखल्यानेच असे प्रसंग टळले. आता तर आम्ही सर्वजण मोठे झालो आहोत. लौकिक अर्थाने शिक्षा करण्याचे सर्वांचे वय संपलेले आहे. आणि म्हणूनच मिळालेल्या शिक्षणाची आता किंमत कळते. जेव्हा शिक्षणाबरोबरच साधेपणा असल्याबद्दल कौतुक होते, तेव्हा मनात एकच विचार असतो—याचे पूर्ण श्रेय माझे नाही, यातील सिंहाचा वाटा अण्णांचा आहे.

□ □ □

१०३. फलश्रुती

डॉ. गं. श्री. कोशे, एम्.ए., डॉक्टर ऑफ एज्यु. (कोलं. युनि.)
व्यवसाय : अ. वि. गृहाचे कार्यकर्ते
सहकारी कार्यकर्ते १९४८ ते १९५५ व १९६४ पासून—
शिक्षण, प्रकाशन, परदेश–शिक्षण–विभाग इ. कामे

राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमी महाराष्ट्रात ज्या काळी राष्ट्रीय शिक्षणाचे प्रवाह प्रकर्षाने वहात होते त्या काळात अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना झाली. राष्ट्रीय शिक्षणाच्या उद्दिष्टांनी प्रेरित झालेल्या अनेक संस्था त्यावेळी महाराष्ट्रात निघाल्या. ज्या जोमाने त्या निघाल्या तो जोम, पुष्कळांचा फार काळ टिकला नाही. ज्या एका विशिष्ट वातावरणात या संस्था जन्माला आल्या त्या वातावरणातील प्रेरक शक्तीने काही ध्येयवादी व्यक्तींना एकत्र आणले. पण ती प्रेरणा आणि तो ध्येयवाद या व्यक्तींना फार काळ एकत्र ठेवू शकला नाही.

अ. वि. गृह ही संस्था याला अपवाद ठरली. हे पुस्तक जे काळजीपूर्वक वाचतील त्यांच्या लक्षात येईल की, ध्येयवाद ज्या प्रेरणेतून निर्माण होतो ती प्रेरणा टिकविण्याचे काम अण्णांनी केले. त्यांनी जी प्रेरणा घेतली ती दुप्पट करून पुढच्या पिढीस दिली. म्हणून संस्थेच्या कार्यात अखंडत्व राहिले, एवढेच नव्हे तर उत्तरोत्तर कार्याचा विस्तार होत गेला.

शिक्षणाची वैशिष्ट्ये त्यावेळी शिक्षणाची वैशिष्ट्ये शिक्षणशास्त्रावर किंवा मानसशास्त्रावर आधारलेली नव्हती. राष्ट्राच्या गरजेचा त्यात प्रामुख्याने विचार होता. तरुण पिढीला राष्ट्रीय पुनरुत्थापनाच्या कार्यात सहभागी होण्यासाठी कार्यक्षम करणे हे शिक्षणाचे ध्येय होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत जे कार्यकर्ते उत्साहाने व तळमळीने पुढे सरसावले त्यांनी तरुण पिढीवर संस्कार करण्याचे प्रभावी मार्ग शोधून काढले. अण्णा हे अशाच कार्यकर्त्यांपैकी होते. त्यांनी केलेल्या संस्कारांचा प्रभाव वाचकांना या पुस्तकात ग्रथित केलेल्या अनुभवांत ठिकठिकाणी पाहावयास सापडेल.

राष्ट्राची सेवा त्यागपूर्वक करता यावी आणि त्यासाठी आवश्यक गुणांची जोपासना व्हावी हे उद्दिष्ट मनात धरून क्रमिक पुस्तकांची व अभ्यासक्रमाची योजना केलेली होती. शिवाय अभ्यासक्रम हा क्रमिक पुस्तकांच्या पुरताच मर्यादित नव्हता. अवांतर वाचनास महत्त्व होते. भारतातील महान् व्यक्तींची चरित्रे विद्यार्थ्यांकडून वाचून घेण्यात येत असत. एक लेखक लिहितात, "विशेषतः विद्यार्थीदशेतील थोरांच्या चरित्र-वाचनाचा माझ्यासारख्या भावनाविवश मनावर फार परिणाम झाला." (पृ. ७१)

अनेक प्रसंगी थोर पुरुषांना संस्थेत आणले जात असे. त्यावेळच्या राष्ट्रीय संस्थांचे हे वैशिष्ट्य होते. थोर नेत्यांनाही या संस्थांतील कार्य जवळून पाहाण्याची इच्छा असे.

त्यामुळे संस्थेस ते मोठ्या आस्थेने भेट देत असत. थोर पुरुषांना जवळून पाहिल्यामुळे झालेल्या सुसंस्कारांचा अनुभव काही विद्यार्थ्यांनी लिहिलेला आहे.

धार्मिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान होते. नैतिक आचरण आणि शीलसंपन्नता यांची जोपासना करावयास धार्मिक शिक्षण हा प्रभावी मार्ग होता. गीता समजावून सांगण्यासाठी केसरीचे संपादक कै. ज. स. करंदीकर हे संस्थेत येत असत (पृ. ३५). धार्मिक शिक्षणामुळे झालेल्या चांगल्या संस्कारांचा अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेख केला आहे.

शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांच्या फावल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी निरनिराळ्या उपक्रमांची योजना असे. हस्तलिखित मासिके, साप्ताहिके, वाणीविकास सभा इत्यादी उपक्रमांच्या मागे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट होते. या उपक्रमांमुळे शिक्षणाला व्यापकता मिळाली आणि भावी जीवनात उपयोगी पडणाऱ्या संस्कारांचे ते एक माध्यमही झाले. माजी विद्यार्थ्यांपैकी भावी आयुष्यात जे लेखक झाले त्यांनी आपल्या लेखनकलेचे श्रेय संस्थेतील प्रबंध-लेखनाच्या उपक्रमास दिले आहे. सभाधीटपणा, निर्भीडपणा, समाजात वावरताना लागणारा आत्मविश्वास इत्यादी गुणांची बीजे संस्थेत रुजविली गेली अशी कबुली अनेकजण देतात. विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड घालवून टाकून त्यांना स्वतंत्र भारताचे स्वाभिमानी नागरिक बनवावे हे उद्दिष्ट पुष्कळ अंशी साध्य झाले असे हे पुस्तक वाचल्यावर कोणाचेही मत होईल.

राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रयत्नांचे प्रयोगशीलता हे एक प्रमुख वैशिष्ट्य होते. शिक्षणाचा संस्कार हा अधिकाधिक प्रभावी व्हावा ही या प्रयोगांची भूमिका होती. अण्णांनी सुरू केलेल्या शैक्षणिक प्रयोगांत एक तऱ्हेची पद्धत होती आणि त्यांच्या यशस्वितेसाठी ते स्वतः जातीने झटले. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रयोगांचा अभिमानपूर्वक उल्लेख केलेला आहे.

लोकशाही वृत्ती आणि तदनुषंगिक गुण यांची वाढ व्हावी यासाठी वर्गसभा आणि विद्यालयसभा हे उपक्रम अण्णांनी सुरू केले. वर्गसभेत विद्यार्थी प्रतिनिधींपुढे विद्यार्थ्यांच्या गैरवर्तनाची शहानिशा होत असे. इतर अडीअडचणींचा विचारही वर्गसभेत होत असे. लोकशाहीत आवश्यक असलेली सामुदायिक निर्णयाची पद्धती या वर्गसभांतून विद्यार्थ्यांना शिकायला मिळाली. विद्यालयसभा हे तर सामुदायिक संस्कारांचे एक प्रभावी साधन होते.

विद्यालयात काम करणारे शिक्षक पूर्ण वेळ काम करणारे नसल्यामुळे अनुपस्थित शिक्षकांच्या तासांची व्यवस्था करणे कठिण होऊन बसले. याच अडचणीतून स्वाध्यायमालेचा जन्म झाला. एका तासात वाचता येतील अशा, विविध विषयांवरील या छोट्या पुस्तिका इतर शिक्षणसंस्थांतही लोकप्रिय झाल्या.

शैक्षणिक प्रतिभा या सर्व शैक्षणिक उपक्रमांचा उगम अण्णांच्या शैक्षणिक प्रतिभेत आहे. शैक्षणिक समस्यांच्या नित्य विचाराने आणि चिंतनाने त्यांना नवीन मार्ग दाखविले. त्या मार्गांवर त्यांची श्रद्धा होती. पण या सर्व उपक्रमांची कार्यवाही कार्यक्षमतेने करण्यासाठी आवश्यक असे मनुष्यबळ त्यांना लाभले नाही. शिक्षक अर्धवेळ काम

करणारे. पुष्कळांची या उपक्रमांवर तितकीशी श्रद्धाही नव्हती. पण असे असूनही अण्णा कधी निराश झाले नाहीत हे त्यांचे वैशिष्ट्य.

या शैक्षणिक प्रयोगांचे उद्दिष्ट अण्णांनी आपल्या प्रस्तावनेत नमूद केले आहे ते शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. "महाराष्ट्र विद्यालयात निरनिराळे प्रयोग केले त्यांचा उद्देश प्रांतातील व देशातील सर्वसामान्य शाळांकरिता व शिक्षणाकरिता एक चांगला आदर्श निर्माण करावा असा होता". (पृ. ६) असा आदर्श निर्माण करण्यात अण्णा यशस्वी झाले हे कबूल करावे लागेल. अनेक शाळांतून त्यांच्या प्रयोगांचे अनुकरण झाले. शिवाय या प्रयोगांमुळे संस्थेला एक प्रकारचे व्यक्तिमत्त्व आले. शिक्षणक्षेत्रात अधिकाराच्या जागेवर असलेले एक माजी विद्यार्थी लिहितात, "मी शेकडो संस्थांची ही घडविलेली व्यक्तिमत्त्वे अगदी जवळून पाहिली आहेत पण अ. वि. गुहासारखे निश्चित, प्रभावी व प्रखर व्यक्तित्व मी एकाही संस्थेत पाहिले नाही". (पृ. ७४).

तळमळजन्य शिक्षण आणि संस्कार राष्ट्रीय शिक्षणाची उद्दिष्टे कार्यवाहीत आणण्यासाठी अवलंबिलेल्या पद्धती या नेहमीच शिक्षणशास्त्राधिष्ठित किंवा मानसशास्त्राधिष्ठित होत्या असे नाही. राष्ट्रीय शिक्षणात वावरणारे कार्यकर्ते शिक्षणशास्त्रज्ञ नव्हते. त्यांच्या तळमळीने त्यांना ज्या प्रेरणा दिल्या त्या प्रेरणांनुसार ते वागले. विद्यार्थी राष्ट्राचे भावी आधारस्तंभ व्हावे आणि त्यासाठी आवश्यक अशा सवयी आणि शक्ती त्यांना प्राप्त व्हाव्या ही तळमळ प्रकर्षाने होती. या तळमळीचे त्यावेळचे वैशिष्ट्य म्हणजे अधीरपणा. विद्यार्थ्यांमध्ये ही सुधारणा जितक्या लवकर होईल तितक्या लवकर राष्ट्राचा अभ्युदय साधणार असल्याने ही सुधारणा शक्य तितक्या लवकर व्हावी असे तळमळीच्या शिक्षकास वाटत असे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या आड जो जो दुर्गुण येईल त्याचा बंदोबस्त कठोरतेने करण्यात येई. कडक शिस्तीचा अवलंब यासाठी करण्यात आला.

अण्णांनी आपल्या शिक्षकीय जीवनाचे जे तीन खंड पाडले आहेत त्यांतील पहिल्या खंडात त्यांनी स्वीकारलेली भूमिका वरील विवेचनाशी जुळते. विद्यार्थीदशेत त्यांना ज्या पद्धतीने शिक्षण मिळाले त्याच पद्धतीचा त्यांनी स्वतः शिक्षक झाल्यावर अवलंब केला. ते लिहितात, "शिक्षणाचे संक्रमण गुरूकडून माझ्यासारख्या विद्यार्थ्याकिडेही छडीच्या माध्यमानेच झाले !" (पृ. ५) पण केवळ ही परंपरा पुढे चालू ठेवायची म्हणून अण्णांनी कडक शिस्तीचा अवलंब केला असे म्हणणे चुकीचे होईल. शिक्षक स्वतःच्या विद्यार्थीदशेत जसा शिकतो तीच पद्धत त्याच्या अध्यापनात नकळत वापरली जाते हे जरी खरे असले तरी या पद्धतीबरोबर जुन्या पिढीतील शिक्षकांची तळमळ ओतली नाही तर कडक शिक्षा करूनही विद्यार्थी कृतज्ञ राहिले हा अण्णांना आलेला अनुभव आला नसता. म्हणून स्वतःच्या विद्यार्थीदशेत अण्णांना आलेला अनुभव त्यांच्या विद्यार्थ्यांनाही आला. अण्णा सांगतात, "त्या वेळी मला शिक्षा करणारांनी ती कर्तव्यबुद्धीने व माझ्या हिताकरता केली. या श्रद्धेमुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात कधी अनादरवृत्ती आली

नाही. हेच गुरु-शिष्य संबंध स्वाभाविक आहेत अशी माझी धारणा होती" (पृ. ५). हे पुस्तक वाचताना अण्णांच्या शिष्यांची हीच धारणा आहे असे दिसून येईल.

शिक्षेचे अनुभव शारीरिक शिक्षेच्या आठवणी या पुस्तकात अनेक ठिकाणी आहेत. शिक्षेविषयी दिलेल्या अनुभवांत विविधताही बरीच आहे. शिक्षेविषयी व्यक्त केलेल्या मतांतही खूप भिन्नता आढळते. मला वाटते शिक्षकांनी या अनुभवांचा आणि मतांचा विचार बारकाईने केल्यास तो त्यांना खास मार्गदर्शक ठरेल. काही अनुभव पाहा.

"हातात वेताची लांब छडी घेतलेली, अंगात नुसता सदरा व धोतर नेसलेली, आमच्या हॉलमधून हिंडत असलेली अण्णांची मूर्ती अद्यापि समोर दिसते. जे विद्यार्थी झोपले असतील त्यांच्या पायांवर सपासप छड्या ओढीत असत. अण्णा आले अशी आम्हाला चाहूल लागली की कोण आमची धांदल उडत असे...ऐन थंडीचे दिवस असले तरी अण्णांचा हा प्रसाद मिळत असे. त्यामुळे कोण हा त्रास, नको हे शिक्षण असे वाटल्यावाचून राहात नसे" (पृ. ४१). "संस्थेतील आश्रमीय जीवनाची ही झाली एक झगझगीत व प्रकाशमान बाजू. याचबरोबर आश्रमीय जीवनाला दुसरीही बाजू आहे. ती म्हणजे कडक व कडव्या शिस्तीची. हा कडकपणा व कडवेपणा व पर्यायाने कडवटपणा देखील संस्थेच्या पूर्व आयुष्यात अतिरेकाला गेलेला होता". (पृ. ७५). "गुरुवर्यांत ऋषिमुनींची प्रचंड उग्रताच असे. त्यामुळे जुन्या विद्यार्थ्यांत, आश्रमीय राहणीच्या, गोड ऐवजी कटू भावना फार असत. माझ्यावर चौदाव्या रत्नाचे फार प्रयोग झाले नसतानाही, आश्रमाबद्दल कटू भावना सुरुवातीला होती हे नाकबूल करण्याचे कारण नाही. परंतु ती लवकर मावळली आणि त्याला कारणही अण्णांचा बदललेला स्वभाव असावा". (पृ. १०४). "गुरुवर्य अण्णांनी आपल्याला कधी बोलावूच नये असे मला वाटत असे. थोडेसे कोठे चुकले की, ते रागावतात व शिक्षा करतात. रागावल्यावर मानसिक त्रास होत असे. गुरुवर्य अण्णा छड्या मारतात, उपवास करायला सांगतात, संडास झाडायला लावतात. आपला लहानसा अपराध त्यांना त्यांच्या दुर्बिणीतून मोठा दिसतो. तेव्हा त्यांचा संबंध येऊ नये असे त्यावेळी मनात येऊन जाई". (पृ. १२२). "अजूनही गुरुवर्य अण्णांना पाहिल्याव आपणास काही शिक्षा वगैरे तर करणार नाहीत ना अशी भीती वाटते". (पृ. १२२). "या सर्वांतून विद्यार्थी सुधारण्याचा हेतू होता हे निःसंशय. परंतु ते वय असे असते की, अपमानाची तीव्र बोच कोवळ्या मनाला चटकन वाटते. त्यामुळे जेथे शिक्षेचा अतिरेक होई, चारचौघांत अपमान होई तेथे विद्यार्थी अण्णांच्या विषयी अनादराने बोलताना पण दिसे. अर्थात् तो बालसुलभ राग पुढे किती काळ टिकला असेल कोण जाणे." (पृ. १४९). "कार्यापेक्षा शिस्त गौण. कडक शिस्त जितकी आवश्यक तितकीच अनावश्यक. पण अनावश्यक अशा करता की, एखाद्या कार्याकरिता, कार्यपूर्तीकरिता कसलेच बंधन चालत नाही. शिस्त त्या कार्याच्या आड येऊ शकते. शिस्त पाळण्यातच बरीचशी शक्ती वाया जाते. अशा वेळी शिस्त गौण ठरते व हाती घेतलेले कार्य मुख्य बाब होऊन बसते". (पृ. १६९).

वरील उदाहरणांवरून असे दिसून येते की, कितीही तळमळीने व सद्धेतूपूर्वक शिक्षा केली तरी तिचा मनावर थोडा तरी व्रण राहातोच. अण्णांसारख्या विचारी आणि काटेकोरपणे वागणाऱ्या शिक्षकाच्या बाबतीत हा अनुभव, तर अविचाराने शिक्षा करणाऱ्या शिक्षकाच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या भावना किती कटू होतील याची कल्पनाच करणे बरे. शिक्षकीय जीवनात विद्यार्थ्यांवर चिरकालीन संस्कार करण्याचे कार्य जिद्दीने करणाऱ्या शिक्षकांनी वरील अनुभव लक्षात घेण्याजोगे आहेत.

स्वभावाची दुसरी बाजू तथापि उठल्या सुठल्या क्षुल्लक कारणांवरून शिक्षा करणे आणि त्यात एक प्रकारचा आनंद मानणे हा अण्णांचा स्थायीभाव नव्हता. हेही विद्यार्थ्यांनी कबूल केले आहे. वरील उदाहरणे ज्या कालखंडातील आहेत त्याच कालखंडातील दोन विद्यार्थ्यांचे अनुभव दुसरी बाजू दाखवितात.

"गुरुवर्य अण्णांच्याकडून शिक्षा करून घेण्याचा प्रसंग माझ्यावर आला नाही. माझ्या नऊ वर्षांच्या आश्रमीय आयुष्यात दुसऱ्या कोणाला पण शिक्षा करताना मी पाहिले नाही". (पृ. ६५). "गुरु. अण्णा मुलांना फार कडक शिक्षा करीत असे ऐकले होते पण आमच्या वाटचाला आला तो त्यांच्या मनाचा प्रसन्नपणा नि नर्म विनोद". (पृ. ८६).

अण्णांच्या स्वभावाची ही दुसरी बाजू, सहृदयता, आपुलकी, जिव्हाळा, प्रेमळपणा, आस्थेवाईकपणा अशा अनेक शब्दांनी अनेकांनी वर्णिलेली आहे. आणि शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट अशी की, शिक्षा केल्यानंतर विद्यार्थ्याबद्दल मनात आकस न धरता, शिक्षेमागील सद्धेतू त्याला पटवून दिला तर शिक्षेचा सुपरिणाम होतो. कालान्तराने का होईना पण विद्यार्थ्याला पटते की शिक्षा झाली हे योग्य होते. त्यामुळे माझ्यात सुधारणा झाली. अण्णांच्या बाबतीत हा अनुभव जवळ जवळ सर्वजण सांगतात. शिक्षा करताना अण्णांची भूमिका पुष्कळांनी जाणली होती. ज्यांनी ती जाणली त्यांनी शिक्षेबद्दल अण्णांना धन्यवाद दिले आहेत. " अत्यंत तळमळीने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी झटत असताना आपल्या कष्टांचे चीज विद्यार्थ्याकडून झाले नाही तर किती निराशा होते व त्या निराशेच्या पोटी कसा राग येतो याची जाणीव प्रत्येकास असतेच. मी जे सांगतो ते मुलाच्या कल्याणाचे आहे व ते करणे त्याचे कर्तव्य आहे, ते त्याने केलेच पाहिजे अशी आग्रही वृत्ती त्यांची असे. नैतिक वर्तन, शिस्तपालन, अभ्यासू वृत्ती हे गुण जेथे दिसतील तेथे ते अतिशय प्रेमळ असत. पण या बाबतीत थोडीशीही शिथिलता आली की ते अतिशय कठोर होत." (पृ ३६). "काही विद्यार्थ्यांस शिस्तभंगाबद्दल अण्णांनी कडक शारीरिक शिक्षा केल्याचे आठवते. पण अशा प्रसंगी अण्णांच्या अंतःकरणात होणारी कालवाकालव त्यांच्या चर्येवर दिसत असे" .(पृ. ३८). " लहानपणी मला त्यांच्या या कडक शिस्तीचा काही काही वेळा फार राग येत असे, परंतु आज एकंदर जगातील व त्यातल्या त्यात विद्यार्थी-जगातील बेशिस्तीचे प्रकार पाहून असे वाटते की, इतकी कडक शिस्त असेल तरच मुलांच्या मनावर संस्कार दृढ होत जातात व खऱ्या आयुष्याचा पाया मजबूत बांधण्यास त्याची फार जरुरी असते."

(पृ. ३९). "मला शाबासकी देणारे गुरु. अण्णाच व क्लासला गेल्यामुळे, शाळेत उशिरा आल्याबद्दल दोन छड्या लगावणारे गुरु. अण्णाच. पोटात मातृतुल्य माया असल्याशिवाय असा विरोधाभास अशक्यच!" (पृ. १५२) "चांगल्या गोष्टीच्या वेळी पाठीवर थाप मारावी अण्णांनी व चुकीच्या वेळी पाठीवर तडाखे मारावे अण्णांनीच". (पृ. १५४).

शिक्षकाने केलेल्या शिक्षेचे खरे श्रेय वरील अनुभवांत आहे. शिक्षेचा परिणाम विद्यार्थ्याला स्वतःचा दोष कळण्यात व्हावा. त्यामुळे विद्यार्थ्याने मनाशी नवे निश्चय बांधावेत. एक नवी शक्ती त्याला प्राप्त व्हावी. शिक्षेचा प्रसंग पुनः येऊ नये ही शिक्षेची खरी फलश्रुती. शिक्षा केल्यावर शिक्षकाला थोडी जरी अपराधीपणाची जाणीव झाली तरी शिक्षेचा परिणाम विकृत झाला असे समजावे. अण्णा या बाबतीत फार जागरूक राहिले. शिक्षा अयोग्य झाली असे त्यांना जेव्हा जेव्हा वाटले तेव्हा तेव्हा त्यांनी स्वतःला शिक्षा करून घेतली, उपोषण केले. याचा विद्यार्थ्यांवर फार खोल परिणाम झालेला दिसतो.

स्वभावातील परिवर्तन शिक्षेच्या बाबतीत अण्णा पुढे पुढे अंतर्मुख झाले. सुधारणेसाठी शिक्षेशिवाय दुसरा एखादा मार्ग आहे का याचा ते शोध घेऊ लागले. प्रयोगशील झाले. १९२८–२९ च्या सुमारास त्यांच्यात बदल झालेला दिसतो. या कालानंतरच्या विद्यार्थ्यांचे अनुभव त्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे दिसतात.

"अण्णांचा स्वभाव फार रागीट आहे याची आम्हाला कल्पना होती. आता ते आपल्याला चांगलीच शिक्षा करणार याची आम्हांस भीती वाटू लागली. परंतु प्रत्यक्षात निराळाच प्रकार घडला. प्रत्येकाने स्वतःच्या मनाने शिक्षा घ्यावी असे सांगितले." (पृ. ७२). "मात्र अपराध्याला किती शिक्षा करावी यावर अण्णांनीही पुढे विचार केला असावा. परदेशगमनामुळे मिळविलेली अनुभवसंपन्नताही त्यांचा दृष्टिकोन विशाल बनविण्यास कारणीभूत झाली असावी व त्याप्रमाणे त्यांनी आपल्या वागण्यात बदल केला असावा". (पृ. ७९). "तरुण वयात मुलांशी वागताना अण्णा कठोर झाले असतील ! पण पुढे पुढे संस्कार करण्याचे साधन 'शिक्षा' या विचारावरून संस्कार करण्याचे एकमेव व अमोघ साधन म्हणजे 'स्वतःचे सुसंस्कारसंपन्न आदर्श जीवनच' या विचाराप्रत ते आले असले पाहिजेत. शिक्षण म्हणजे संस्कार या तत्त्वाचे मूर्तिमंत साकार प्रतीक म्हणजे अण्णांचे आदर्श जीवन". (पृ. ८२). "...परंतु गुरु. अण्णांनी प्रसंगावधान राखून व रागावर ताबा ठेवून मला एक साष्टांग नमस्कार घालावयास व यापुढे 'मी खोटे कृत्य करणार नाही' अशी प्रतिज्ञा कर म्हणून सांगितले...या प्रसंगी घातलेल्या साष्टांग नमस्काराचा माझ्या विद्यार्थी-जीवनावर व भावी आयुष्यावर खरोखर चांगला परिणाम झाला". (पृ. १४३).

वरील अनुभवांत दिसून येणारा अण्णांच्या संस्कार-पद्धतीतील बदल त्यांनी बुद्धचा घडवून आणला. ते लिहितात, "आपल्या वागण्यामुळे मुलांच्यावर काय परिणाम होतो, मानसिक प्रतिक्रिया काय होते, सुधारणा कितपत होते, गुरूविषयी त्यांची भावना काय

होते इत्यादी गोष्टींचा मी विचार करू लागलो आणि मला नवीन मार्ग दिसू लागले. या चिंतनाच्या जोडीला शिक्षणशास्त्रावरील वाङ्मयाच्या वाचनाचीही जोड मिळाली." (पृ. ५).

योजनाबद्ध प्रयत्न शिक्षकाजवळ तळमळ असली म्हणजे तो साहजिकच परिवर्तनशील बनतो. तळमळीच्या शिक्षकालाच आपल्या वागण्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर होणाऱ्या परिणामांची जाणीव होते. हे परिणाम चांगले व्हावेत अशी त्याची श्रद्धा असते. पण ते चांगले होत नाहीत असे दिसू लागल्यावरोबर आपले कोठेतरी चुकत असावे असे त्याला वाटू लागते. मग आत्मनिरीक्षण सुरू होते. आत्मनिरीक्षणाचा परिणाम परिवर्तनात होतो. पण या परिवर्तनास परिश्रम लागतात. आत्मनिरीक्षणात सातत्य हवे. गुणदोषांचे पृथक्करण करून ते आजमावता आले पाहिजेत. इष्ट परिवर्तन घडवून आणण्यास निर्धारही पाहिजे. अण्णांनी हे सगळे केले आणि योजनापूर्वक आपल्यात बदल घडवून आणला हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत अशा योजनाबद्ध प्रयत्नांचा वाटा केवढा मोठा आहे हे नवोदित शिक्षकांनी अवश्य ध्यानात घ्यावे.

दोन व्यक्तिमत्वांतील प्रक्रिया आपल्यातील परिवर्तनाचे श्रेय अण्णा विद्यार्थ्यांनाही देतात. ते म्हणतात, "मी विद्यार्थ्यांना शिकविले, घडविले आणि बनविले; तितक्याच प्रमाणात विद्यार्थ्यांनीही मला शिकविले, घडविले आणि बनविले". (पृ. ४).

अध्यापन व्यवसायातील एक फार मोठे तत्त्व या सोप्या शब्दांत अण्णांनी सांगून टाकले आहे. दोन व्यक्तिमत्त्वांतील प्रक्रियेतून व्यक्तिमत्त्वाची घडण होत असते व्यक्तिमत्त्व जितके संवेदनाशील तितकी ही प्रक्रिया अधिक प्रभावी असते. शिक्षक-विद्यार्थी संबंधात ही प्रक्रिया सतत होत असते. ही प्रक्रिया होत असताना, शिक्षक ज्या प्रमाणात सृजनशील चिंतनाचा आणि बौद्धिक प्रगल्भतेचा उपयोग करील त्या प्रमाणात त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होत जाईल. शिक्षकातील परिवर्तन म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास. म्हणूनच वैचारिक उत्क्रांतीने झालेले परिवर्तन हे पश्चात्तापाने झालेल्या परिवर्तनापेक्षा वेगळे असते. शिक्षेचा दुष्परिणाम होतो आहे म्हणून पश्चात्तापाने अण्णा बदलले असे नाही. तसे असते तर केवळ शिक्षेचा त्याग एवढाच बदल त्यांच्यात दिसला असता. उलट त्यांनी शिक्षेला विधायक पर्याय शोधून काढले. राममंदिरात जाऊन चिंतन करणे, देवाची क्षमा मागणे, निश्चय करणे, पाठांतर करणे इत्यादी मार्गांचा अवलंब पुढे पुढे अधिक प्रमाणात केला. वर्गातून नकाशा परत नेत असताना तो लाठीसारखा फिरवीत चाललेल्या विद्यार्थ्यास पूर्वीच्या अण्णांनी शिक्षा केली असती. पण बदललेल्या अण्णांनी त्याला उलट लाठीचे चार हात शिकविण्याची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांच्या प्रेरणेला व सुप्त शक्तीला योग्य वाव करून देऊन त्यांचे उदात्तीकरण करणे या एका मानसशास्त्रीय तत्त्वाचा त्यांनी वापर केला.

दृष्टिकोनातील विशालता विशेषत: अण्णा अमेरिकेला जाऊन परत आल्यानंतर त्यांच्यात झालेल्या बदलाचा उल्लेख अनेक विद्यार्थी करतात. पण अण्णा म्हणतात

की, अमेरिकेला जाण्यापूर्वीच त्यांच्यात बदल झालेला होता. अमेरिकेला गेल्यामुळे व तेथून आल्यामुळे ते बदलले असे झाले नाही. उलट ते बदलले म्हणूनच अमेरिकेला गेले (पृ. ५) तथापि अमेरिकेत त्यांनी घेतलेले शिक्षण आणि इतर अनेक देशांना त्यांनी दिलेल्या भेटी यामुळे त्यांचा अनुभव संपन्न झाला आणि दृष्टिकोनात विशालता आली हे निःसंशय. अमेरिकेहून परत आल्यावर त्यांचा ज्या विद्यार्थ्यांशी संबंध आला त्यांचे अनुभव पूर्वीच्या विद्यार्थ्यांहून बरेच वेगळेच वाटतात. १९३४ नंतर त्यांनी महाराष्ट्र विद्यालयात सुरू केलेले विविध उपक्रम, त्यांच्या कामात आलेला एक तऱ्हेचा जोम आणि अध्यापनाच्या नव्या पद्धती यामुळे विद्यार्थ्यांना अण्णा नवे वाटले. परदेशाहून पदवी संपादन करून परत आलेल्या व्यक्तीभोवती जे एक वलय निर्माण होते ते वलय विद्यार्थ्यांना अण्णांभोवती दिसू लागले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव वाढला. एक प्रकारचा विश्वास निर्माण करण्याची त्यांची भावना विद्यार्थ्यांना जाणवू लागली. (पृ. ६६).

अमेरिकेत उच्च शिक्षण संपादन केल्यावर अण्णा कृतकृत्य झाले नाहीत. उलट त्यांच्या विद्यार्थीदशेला पुनः जोमाने सुरुवात झाली. शिक्षण-विषयक समस्यांचे चिंतन, वाचन व लेखन त्यांनी सतत चालू ठेवले आणि शिक्षणक्षेत्रात एक मानाचे स्थान प्राप्त करून घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी ही जाणीव व्यक्त केली आहे की, अण्णांना शिक्षण-क्षेत्रात मिळालेल्या मानाच्या स्थानाचा उपयोग एखाद्या मोठ्या पगाराची जागा मिळविण्याकडे सहज करून घेता आला असता. पण संस्थेसाठी सर्व आयुष्य वेचण्याच्या निश्चयापासून ते कधी ढळले नाहीत. या स्वार्थत्यागाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वास एक निराळाच उजाळा दिला. स्वतःचा मोठेपणा हा स्वार्थासाठी नसून तो संस्थेच्या उत्कर्षासाठी आहे या अण्णांच्या श्रद्धेत त्यांचे खरे मोठेपण आहे.

व्यापक क्षेत्र अमेरिकेहून परत आल्यावर अण्णांचे कार्यक्षेत्र व्यापक झाले. संस्थेपुरतेच ते मर्यादित राहिले नाही. त्यांनी "एक पाय संस्थेत ठेवून दुसरा पाय महाराष्ट्रातील व भारतातील शिक्षणक्षेत्राचे कार्य करण्यासाठी उचलला". (पृ. ७) विविध संघटनांत त्यांनी स्वतः कार्य केले आणि संघटकांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. सतत एका कार्याचा ध्यास असला म्हणजे परिस्थितीवर मात करून शिक्षक आपले कार्यक्षेत्र किती विस्तृत करू शकतो याचे अण्णा हे एक आदर्श उदाहरण आहे. संधी मिळत नाही अशी पुष्कळ शिक्षकांची तक्रार असते. पण संधी उपलब्ध व्हावी यासाठी धडपड करणारे खरोखर कितीजण असतात ? अण्णांनी केलेल्या धडपडीची कल्पना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून तर येईलच पण विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या अनुभवांतही ती प्रतीत झालेली आहे.

अण्णांनी संस्थेबाहेरच्या क्षेत्रात आपला व्याप वाढवून जो वेळ खर्च केला तो जर त्यांनी संस्थेतच खर्च केला असता तर संस्थेचा अधिक उत्कर्ष झाला असता असा काही जणांचा आक्षेप असण्याचा संभव आहे. पण विशाल समाजाशी संस्था आणि व्यक्ती

यांचे असणारे नाते त्यांनी समाजावून घेतले नाही असेच म्हणावे लागेल. संस्था आणि तिच्या मागची प्रेरक शक्ती यांचा विकास परस्परावलंबी आहे. व्यक्तीचे मोठेपण संस्थेच्या मोठेपणास कारणीभूत झाल्याची उदाहरणे भारतात अनेक आहेत. व्यक्तीचा मोठेपणा संस्थेच्या संकुचित क्षेत्रातून बाहेर पडल्याशिवाय सिद्ध होत नाही. व्यापक क्षेत्रात होणाऱ्या मोजमापाने व्यक्तीचा मोठेपणा सिद्ध झाला म्हणजे तो सर्वमान्य होतो. अशा मोठेपणातून एक सर्वंकष शक्ती निर्माण होते. ही शक्ती कार्यकर्त्यांना कार्य करण्यास प्रेरणा देते. अशा व्यक्तीच्या नव्या कल्पना, नवे प्रयोग, नवे विचार हे ग्राह्य वाटतात. तिचे मार्गदर्शन स्वखुषीने स्वीकारले जाते. कार्याला एक तऱ्हेचा उठाव मिळतो. गरीब विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या संस्था अनेक आहेत. पण अ. वि. गृह संस्थेला समाजात मिळालेली प्रतिष्ठा फार थोड्यांच्या वाट्याला आली. व्यक्तीच्या विचारांतून संस्थेच्या कार्याचा प्रसार होत असतो. अण्णांनी केलेला हा प्रसार ते संस्थेच्या बाहेर पडले नसते तर झाला नसता. एकूण संस्थेच्या बाहेरील व्यापात अण्णांनी दाखविलेल्या कार्यक्षमतेमुळे संस्थेला जो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदा झाला तो ते केवळ संस्थेतच राहिले असते तर झाला नसता.

दुसरी गोष्ट अशी की, अण्णांच्या अभ्यासूपणाने त्यांनी बाह्य क्षेत्रात ज्या सुधारणा घडवून आणल्या त्या पर्यायाने महाराष्ट्र विद्यालयातही अमलात आल्या. माध्यमिक शिक्षण मंडळाचे सदस्य असताना त्यांनी अभ्यासक्रमात ज्या सुधारणा केल्या त्या सुधारणांचा परिणाम शाळेतील अभ्यासक्रमावरही झाला. अण्णांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या सर्व सुधारणांच्या मागे त्यांचा प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव असे. शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांनी जाणल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या अनुभवास आणि मतास त्यांचे सहकारी मान देत.

उदार दृष्टिकोन शाळेबाहेरील जगात वावरल्यामुळे अण्णांच्या विचारांत आणि शिक्षणविषयक दृष्टिकोनात व्यापकता आली. कोणतीही शैक्षणिक समस्या आपल्या शाळेपुरतीच सोडवावी अशी मर्यादा त्यांच्या विचारांना राहिली नाही. विशेषत: गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आणि त्यांच्यांत असलेला दारिद्र्यजन्य न्यूनगंड काढून टाकून त्या ठिकाणी स्वयंचलित प्रेरणेची प्रस्थापना कशी करावी हा प्रश्न, यांचे व्यापक स्वरूप त्यांनी जाणले. म्हणून गरीब विद्यार्थ्यांचा विचार करताना सारा गरीब समाज त्यांच्यासमोर येई. दुर्वर्तनी मुलांना हाकलून देण्याचा विचार त्यांना पटत नसे. कारण हाकलून दिलेली मुले शेवटी समाजात जाणार आणि सुधारणा न होता ती समाजात गेली तर अप्रत्यक्ष रीतीने आपण समाजातील प्रश्न वाढवितो असे होईल. शिक्षणक्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तींचे विचार असे व्यापक होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अभ्यासक्रमास नेमलेली पुस्तके वर्गात शिकविणे ही शिक्षणाची कल्पना फार संकुचित आहे. शिक्षणाकडे समाज-परिवर्तनाचे माध्यम किंवा साधन म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षणातील ही विशाल आणि उदार दृष्टी अण्णांनी आपल्या सहकाऱ्यांना दिली.

सहकाऱ्यांचे शिक्षण अण्णांचे विद्यार्थी म्हणून नव्हे तर सहकारी म्हणून ज्यांचा संबंध आला अशांचेही काही अनुभव या पुस्तकात आहेत. अण्णांचे सहकारी अनेक आहेत. सर्वांनीच आपले अनुभव लिहून पाठविले नाहीत. पण या पुस्तकात समाविष्ट झालेले अनुभव प्रातिनिधिक आहेत असे म्हणावयास हरकत नाही. यावरून एक गोष्ट ध्यानात येईल की, अण्णांनी सहकाऱ्यांवरही संस्कार केले. अण्णांच्या सान्निध्यात आल्यावर कोणी शिकला नाही असे व्हायचे नाही. योजनाबद्धता, अभ्यासूपणा, प्रयोग-प्रवृत्ती, प्रयत्नप्रवणता अशा अनेक गुणांचे संस्कार, त्यांच्या सान्निध्यात जे आले त्यांच्यावर झाले. शिक्षकीय जीवनात या गुणांचे सामर्थ्य फार मोठे आहे. अण्णांनी प्रयत्नपूर्वक हे गुण आपल्या अंगी बाणवले. त्याचा त्यांना भरपूर उपयोग झाला. तसाच उपयोग व्यक्तिविकासासाठी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी इतरांनाही व्हावा या श्रद्धेने ते सहकाऱ्यांकडे पाहतात.

अडचणीत असलेल्या शिक्षकांना त्यांनी नेहमीच आसरा दिलेला आहे. अडचणीच्या काळात त्यांच्याकडे शिक्षक आले म्हणजे त्यांचा समावेश ते महाराष्ट्र विद्यालयात करून घेत. अन्यत्र त्यांना चांगली संधी मिळाल्यावर तितक्याच आनंदाने ते त्यांना निरोप देत. जीवनात स्थिर होण्यासाठी अण्णांनी दिलेल्या या मदतीबद्दल अनेकजण त्यांचे ऋणी आहेत.

स्वतःच्या उदाहरणाने आणि सहवासात दिलेल्या प्रेरणेने समाजाला निष्ठावंत कार्यकर्ते अण्णांनी दिले. आज आम्ही करीत असलेल्या कार्याची प्रेरणा आम्हाला अण्णांकडून मिळाली असे अनेकजण कबूल करतात. समाजाला एक निष्ठावंत कार्यकर्ता देणे हे एक शाळा काढण्यापेक्षा मोठे कार्य आहे. कारण अशा कार्यकर्त्यांच्या द्वारा निष्ठेचे प्रवाह समाजात दूरवर पोचतात. एम्. एड्. चे विद्यार्थी म्हणून अण्णांच्या सान्निध्यात आलेले आणि सध्या एका शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य असलेले प्रा. डांगे लिहितात, "भारतातील प्रश्न कितीही अवघड असला तरी त्याच्या सोडवणुकीबद्दल डॉक्टर कधीही निराश दृष्टीने बोलत नसत. हे फार फार महत्त्वाचे आहे. एक चैतन्यमय आशावाद, विवेचनामागे डॉक्टर राखीत. याचा झालेला संस्कार इतका खोलवर गेला आहे की, शिक्षणाच्या दृष्टीला आम्हाला मरगळ कधीही जडली नाही. सतत चौफेर पाहून, संयत वृत्तीने पाहण्याची निरोगी सवय जडली. पदव्युत्तर अभ्यासात जी जागृत तटस्थता आणि सहानुभूतीपूर्ण बौद्धिक दृष्टी लागते त्याचे वरदान लाभले". (पृ. १७२).

व्यक्तिमत्त्वातील विविधता शिक्षणक्षेत्रात जे जे उत्तम आहे, जे जे प्रभावी आहे ते ते अण्णांनी वेचले. या उत्तमाच्या संग्रहाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वास विविधता आली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सगळेच पैलू सर्वांनी जाणले असे नाही. ज्यांना जे आकर्षक वाटले त्यांनी ते भारावून गेले, यासाठी अण्णांच्या व्यक्तिमत्त्वातील विविधतेचे दर्शन विद्यार्थ्यांच्या अनुभवांतून घेणेच अधिक बरे.

"नम्रता, निर्भयता, शिस्त, सहृदयता, स्वावलंबन व संग्राहकता आदि गुणांचे दर्शन त्या बालवयातही मला पूज्य अण्णांच्या संचालकत्वात दिसत होते." (पृ. ५३).

"अण्णांचे व्यक्तित्व म्हणजे मानवी जीवनातील अनेक मूल्यांचा व सद्‌गुणांचा सुरेख संगम. त्या व्यक्तिमत्वाचे शब्दांत वर्णन करणे कठिण आहे. ते व्यक्तित्व त्यांच्या सहवासात हरघडी जाणवते" (पृ. ७५). "अण्णांच्या व्यक्तिमत्त्वांतील स्थायीभाव म्हणजे सौम्यता, शांतता, सोज्वळपणा व धीरेदात्तपणा. या सर्वांबरोबरच अत्यंत परिश्रमाने प्राप्त केलेली विद्वत्ता." (पृ. ७७). "अण्णांची आजची विद्वत्ता, शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांनी मिळविलेली विद्वन्मान्यता, त्यांचा विनय, त्यांची शालीनता, चारित्र्य-संपन्नता, साधी, संयमी, निग्रही व निर्व्यसनी राहाणी इ. गुणांची जोपासना, त्यांनी आपल्या जीवनात पद्धतशीरपणाने व निर्धारपूर्वक केलेली आढळते." (पृ. ८०). "गुरु. अण्णांचे व्यक्तित्व प्रसन्न आणि शीतल वाटे. त्यांच्या बोलण्यात विद्वत्तेची छाप जाणवते. अंतःकरणाला हात घालणारी आपुलकी त्यांच्या बोलण्यात वागण्यात प्रत्ययास येई." (पृ. ९२). "शिस्त व सौजन्य यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे गुरु. अण्णा ! जेथे कठोरपणाची जरुरी आहे तेथे डौ. खैर कधीही अकारण सौजन्य दाखविणार नाहीत. मग तो कोणताही प्रसंग असो, अथवा केवढीही मोठी व्यक्ती असो. समता हा अण्णांचा स्थायीभाव आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये." (पृ. १८७).

असे अनुभव या पुस्तकात अनेक ठिकाणी सापडतील. विविधतेच्या कल्पनेसाठी काही वर उद्धृत केले आहेत. या अनुभवांतील विविधता पाहिली म्हणजे केवळ स्तुती करण्याच्या उद्देशाने ते लिहिले आहेत असे वाटत नाही. त्यांत एक अभिप्रेत मूल्यमापन आहे. स्वतःवर झालेल्या संस्कारांनी हे मूल्यमापन केले आहे. स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात अण्णांचा निर्धार आणि परिश्रम काहींच्या प्रत्ययास आला ही गोष्ट महत्त्वाची आहे. निर्धाराने आणि परिश्रमाने व्यक्तिमत्त्वात उत्क्रान्ती होऊ शकते हा संस्कार जीवनात अत्यंत महत्त्वाचा आहे.

विद्यार्थी-संबंध अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय, संस्था सोडल्यावरही त्यांच्याशी विद्यार्थ्यांनी ठेवलेल्या संबंधात दिसून येतो. संबंध निर्माण करणे आणि तो टिकविणे हे अण्णांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्याच्या जोरावर त्यांनी निवडणुका जिकल्या. साध्या पत्रद्वारे निवडणुकीच्या कामात मदत करण्यासाठी त्यांनी प्रचंड सेना उभी केली. स्नेह निर्माण करता आला नाही तरी शत्रुत्व नसावे, एकमेकांची तोंडेसुद्धा पाहू नयेत इतके संबंध विकृत होऊ देऊ नयेत असे त्यांचे धोरण असे. देणगीदार, सहकारी विद्यार्थी, संस्थेला भेट देण्यासाठी आलेले पाहुणे या सर्वांना आपुलकीने ते जोडून घेत.

पण माजी विद्यार्थ्यांशी संबंध ठेवण्याचे अण्णांचे तंत्र सर्व संस्थाचालकांनी व शिक्षकांनी अभ्यासावे असे आहे. संस्थेच्या उद्दिष्टांशी जे एकरूप झाले आहेत असे विद्यार्थी पुढे संस्थाचालक म्हणून लाभले तर संस्थेच्या कार्यात सातत्य राहू शकते. संस्था-चालनातील हे एक महत्त्वाचे अंग, माजी विद्यार्थ्यांशी अण्णांनी ठेवलेल्या संबंधांमुळे आतापर्यंत संभाळले गेले आहे. संस्थेच्या कार्यात ज्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नाही त्यांनी संस्थेबद्दल आस्था व कळकळ मनात बाळगलेली आहे आणि आपापल्या परीने 'ऋण-

विमोचन' केलेले आहे. "या संस्थेतून बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या पहिल्या प्राप्तीतून संस्थेला पहिली प्रेमाची गुरुदक्षिणा पाठविली आहे आणि नंतर ती नियमितपणे चालू ठेवली आहे." (पृ. १०). माजी विद्यार्थी-संबंधांतूनच 'ऋणविमोचन' आणि 'गुरुदक्षिणा' या कल्पना निघाल्या. या उपक्रमांतून माजी विद्यार्थ्यांना अण्णांनी कृतज्ञतेचे शिक्षण दिले.

कौटुंबिक स्नेह माजी विद्यार्थ्यांशी घनिष्ठ संबंध निर्माण होण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे, संस्था सोडल्यावरसुद्धा त्यांना चालू राहिलेले अण्णांचे मार्गदर्शन. पुष्कळांना अडीअडचणीत त्यांनी मदतही केलेली आहे. त्यांच्या कुटुंबियांशी सुद्धा ते समरस झाले. काही वेचक अनुभव विद्यार्थ्यांच्या तोंडूनच ऐका.

"व्याख्यानाच्या निमित्ताने गु. अण्णा त्या गावी आले म्हणजे 'तुझ्याकडे येणार आहे' असे पुण्याहून पत्र पाठवून येत असत. ते आले म्हणजे आम्हां सर्व कुटुंबियांना किती आनंद होत असे म्हणून सांगू ! घरी आले की अण्णा सर्वांशी मिळून मिसळून राहतात." (पृ. ६४). "गुरु. अण्णांनी माझ्यावर पुत्रवत् प्रेम केले व संस्थेने माझे आईसारखे पालन केले. संस्था म्हणजे माझे माहेर. त्यामुळे वर्षांतून एकदा तरी मी तिला भेट देतो". (पृ. ७३). "अण्णा प्रत्येकाच्या सुख-दुःखात समरस होऊ शकतात. ते माझ्या घरी अनेक वेळा आले. ते आले म्हणजे मला माझ्या वडिलांचेच दर्शन व्हावे यात काही वावगे नाही. पण माझ्या पत्नीलाही श्वशुर घरी आल्यासारखे वाटावे व मुलांना आजोबा घरी आल्यासारखे वाटावे यातच अण्णांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य आहे. अंतःकरणातल्या जिव्हाळ्याच्या व प्रेमळपणाच्या जोरावर हजारो विद्यार्थी त्यांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्य बनविले. हजारो विद्यार्थी अण्णांना आपापल्या कुटुंबात पितृस्थानी व गुरुस्थानी मानतात." (पृ. ७६).

वरील स्वरूपाच्या भावना वाचकांना या पुस्तकात ठिकठिकाणी वाचावयास मिळतील. अण्णांच्या शिक्षेबद्दल कटुतेने लिहिणारे विद्यार्थी वरीलप्रमाणे जिव्हाळ्याने लिहितात यात अण्णांच्या शिक्षकीय जीवनाची परिणती आहे. अण्णांच्या कठोरपणाच्या गाभ्यात ममतेचे स्फुलिंग आहेत हे भावी जीवनात सर्वांना कळून चुकले म्हणून अण्णांचे शिक्षण शाळेपुरते मर्यादित राहिले नाही. त्यांच्या शिक्षणाचा व संस्कारांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या साऱ्या जीवनात टिकून राहिला.

माजी विद्यार्थ्यांशी निर्माण झालेल्या संबंधांत अण्णाही समाधानी व कृतार्थ आहेत. "व्यक्तिशः माझ्या विषयी अनेक विद्यार्थ्यांनी अलोट प्रेम, कृतज्ञता आणि कौटुंबिक आपलेपणा ठेवलेला आहे. त्याचे मोजमाप करता येत नाही...माझ्या माजी विद्यार्थ्यांच्या प्रेमामुळे, कृतज्ञतेमुळे व गुरुदक्षिणेमुळे मी ऐश्वर्यसंपन्न झालो आहे" (पृ. ११). शिक्षकाच्या जीवनात खरोखर या आनंदाला तोड नाही.प्रारंभी विद्यार्थ्यांशी वागताना, अननुभवाने झालेल्या प्रमादांचे व्रण या कृतकृत्यतेच्या आनंदाने बुजून जातात. किती शिक्षकांना हा आनंद मिळतो ? पण हा आनंद म्हणजे योगायोग नव्हे. शिक्षकीय

जीवनात त्याची पूर्वतयारी होत असते. ही पूर्वतयारी कशी करावी ते शिक्षकांनी या पुस्तकात शिकावे.

'समाचार' द्वारा संबंध विद्यार्थ्यांची संख्या मोठी असली म्हणजे सर्वच विद्यार्थ्यांना वरचेवर भेटून संबंध राखणे कठिण होते. ही अडचण अण्णांनी 'समाचार' काढून सोडविली. 'समाचारा'च्या माध्यमातून संस्थेचे कार्य माजी विद्यार्थ्यांपुढे व संस्थेच्या हितचिंतकांपुढे त्यांनी सतत ठेवले व संस्थेचा विसर पडू दिला नाही. "समाचार या रज्जूने आमची सर्वांची मने आमच्या मातृसंस्थेकडे पुन्हा आकृष्ट करून घेतली. संस्थेच्या प्रगतीबद्दल एक प्रकारचे औत्सुक्य निर्माण केले. संस्थेच्या जीवनात परत आणले". (पृ. ८५). माजी विद्यार्थ्यांची संघटना उभी करायला सुद्धा 'समाचारा'चा उपयोग चांगला झाला. 'समाचार'मध्ये अण्णा लिहीत असलेला विचार सर्व माजी विद्यार्थी काळजीपूर्वक वाचतात. या विचारांचे अजूनही आमच्या जीवनात परिणाम होत असतात असे अनेकांनी कबूल केले आहे. वैचारिक संबंध कायम ठेवण्याचा अण्णांचा हा उपक्रम अनुकरणीय आहे. 'समाचार'ने केलेल्या कार्याचा इतर संस्थाचालकांनी जरूर अभ्यास करावा.

सुसंस्कारांची पावती संस्था सोडून अनेक वर्षे झाल्यावर स्वतःच्या जीवनाचे, हे माजी विद्यार्थी जेव्हा पृथक्करण आणि मूल्यमापन करतात तेव्हा त्यांना प्रामाणिकपणे वाटते की, आपल्याला जीवनात जे काही थोडेफार यश लाभले आहे त्याचे श्रेय संस्थेत घडलेल्या संस्कारांकडे आहे. प्रभावी संस्कारांची ही पावती अनेकांनी कृतज्ञतापूर्वक दिलेली आहे. या पावतीचे काही नमुने पाहा. "आयुष्याची दोन-चार वर्षेच का होईना पण वरीलप्रमाणे सर्वांगीण व सुसंस्कारी शिक्षण मिळाल्यामुळे आजपर्यंतच्या ४० वर्षांत मला माझे आता कसे होईल असे कोणत्याही प्रसंगी वाटले नाही" (पृ. ३३). "माझ्या यशामागच्या मूलभूत प्रेरणेचा उगम आश्रमीय जीवनात रुजलेल्या ज्ञानाकरिता धावपळ करण्याच्या प्रवृत्तीत आहे असे मी निःसंदिग्धपणे म्हणू शकतो" (पृ. ४७). "माझ्या सर्व कार्याची प्रेरणा अण्णांनी मला दिलेल्या संदेशात व दीक्षेतच आहे" (पृ. ८१). "माझ्या व्यक्तिगत योग्यतेच्या मानाने किंचित् वरच्या स्थानापर्यंत मी पोचलो आहे आणि त्याचे श्रेय संस्थेतील शिक्षणपद्धतीला आहे अशी माझी श्रद्धा आहे" (पृ. ९२). "देशासाठी, समाजासाठी काही करावे हा विचार माझ्या मनात आश्रमात असताना उगवला व अण्णांच्या ध्येयवादी जीवनाकडे पाहून दृढ झाला" (पृ. १०४). "माझी जी काय घडण-जडण झाली आहे त्यात बराचसा मोठा वाटा गुरु. अण्णांच्या शिक्षणाचा, संस्कारांचा, प्रोत्साहनांचा, सांभाळून घेण्याच्या वृत्तीचा, विद्यार्थ्याला आपला धाकटा भाऊ मानून केलेल्या कर्तव्यकर्माचा आहे" (पृ. १४२).

शिक्षण घेत असताना झालेल्या संस्कारांची कसोटी प्रत्यक्ष जीवनात ते कितपत उपयोगी पडतात यावर अवलंबून आहे. वरील उतारे ग्वाही देतील की, अण्णांनी केलेले संस्कार या कसोटीला उतरले. ज्यांनी आपल्या लेखनात कटू अनुभवांचा उल्लेख केलेला आहे त्यांनीसुद्धा वरीलप्रमाणे ग्वाही दिलेली आहे हे विशेष होय. विद्यार्थ्यांच्या

भावी आयुष्यात ज्यांचे असे मूल्यमापन होईल अशा तऱ्हेचे संस्कार आपण आज विद्यार्थ्यांवर करीत आहोत का ? असा प्रश्न प्रत्येक शिक्षकाने स्वतःला विचारावा.

यशस्वी जीवनाचे क्रमिक पुस्तक. या पुस्तकाकडे शिक्षकांनी व पालकांनी यशस्वी जीवनाचे क्रमिक पुस्तक म्हणून पाहावे व ते संग्रही ठेवावे. यशस्वी व्यक्तिमत्वाचे घटक कोणते आणि त्यांचा विकास प्रयत्नपूर्वक कसा साधावा याचे शिक्षण या पुस्तकात मिळेल. या पुस्तकाचे वाचन शिक्षकांना सावध करील, अंतर्मुख करील, प्रयोगप्रवण करील, संस्कारांच्या प्रेरणांचे उगम शोधायला लावील, स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीव करून देईल, व्यक्तिमत्वाच्या उत्क्रांतीची वाट दाखवून देईल, निष्ठा आणि कळकळ यांच्या शक्तींची प्रचीती देईल, आदर्श व्यक्तिमत्वाच्या सान्निध्याचा विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वावर काय परिणाम होतो याचे प्रत्यंतर मिळेल, निराश झालेल्या शिक्षकांना उत्साह मिळेल, शिक्षकीय जीवनातल्या आनंदाचे उगमस्थान सापडेल.

पालक हेही काही अंशाने मुलाचे शिक्षक असतात. संस्कारांचा वाटा त्यांनाही उचलावा लागतो. म्हणून त्यांना हे पुस्तक अनेक दृष्टींनी मार्गदर्शक ठरेल. विशेषतः अण्णांची पदवीधर सुकन्या प्रभा हिने लिहिलेला लेख (पृ. १९८) पालकांनी जरूर वाचावा. हा लेख म्हणजे गृहशिक्षणाचा आदर्श नमुना आहे.

या ग्रंथात शिस्तीच्या कडकपणाबद्दल व त्यामुळे निर्माण झालेल्या कटुतेबद्दल जितके उल्लेख आहेत तितकेच, किंबहुना जास्त, उल्लेख अण्णांच्या प्रेमळपणाबद्दल व सहृदयतेबद्दल आहेत. शिक्षकांनी व पालकांनी' ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे. योग्य संस्कारांसाठी कडकपणा लागतो तसाच प्रेमळपणाही लागतो. दोघांचाही उपयोग विचारपूर्वक करणे जरूर असते. दोघांमध्ये समतोलपणा ठेवला म्हणजे त्याचे सुपरिणाम कसे होतात ते या पुस्तकातील अनुभव सांगतील.

संस्कारांचा प्रभाव हा प्रत्येक व्यक्तीवर सारखाच असू शकत नाही. दोन व्यक्ती (शिक्षक व विद्यार्थी) ज्या प्रमाणात एकमेकांशी एकरूप होतील त्या प्रमाणात संस्कार प्रभावी ठरतात. निष्ठा, तळमळ आणि आत्मविश्वास ही एकरूप होण्याची भावनात्मक साधने आहेत. या साधनांचा उपयोग अण्णांनी कसा केला त्याचे दिग्दर्शन या पुस्तकात सापडेल.

शिक्षकाशी विद्यार्थ्याचा जेव्हा प्रथम संबंध येतो त्यावेळचे त्याचे व्यक्तिमत्त्व आणि जीवनात स्वतःचे मूल्यमापन करावयास तो जेव्हा समर्थ होतो त्यावेळचे त्याचे व्यक्तिमत्व यांची वजाबाकी शिक्षकाचे कर्तृत्व दर्शविते. प्रत्येक शिक्षकाने हे गणित करून पाहावे. सरतेशेवटी शिक्षण म्हणजे आयुष्यात जे टिकते ते. असे टिकाऊ स्वरूपाचे आपण विद्यार्थ्याला काही दिले का ? या प्रश्नाचा शोध प्रत्येक शिक्षकाने घ्यावा. हा शोध घेण्यास हे पुस्तक मदत करील.

निष्ठावंत व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने ज्या विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्वे घडतात त्यांच्या आचारां-विचारांवर एक विशिष्ट तऱ्हेची छाप असते. 'हा अमक्या अमक्या

शाळेचा विद्यार्थी' अशी ती छाप समाजाला त्या शाळेची ओळख करून देत असते. अशा एका विशिष्ट छापाचा विद्यार्थी अण्णांनी घडविला. या पुस्तकातील अनुभव वाचताना याचा प्रत्यय वाचकांना येईल.

उत्कृष्ट इमारती, साधनसामग्री आणि उपकरणे उपलब्ध असलेल्या श्रीमंतांच्या शाळांनाही असे प्रभावी व्यक्तिमत्व क्वचितच लाभते. एका गरिबांच्या शाळेला अण्णांसारखे व्यक्तिमत्व लाभले हे समाजाचे भाग्य नाही का ?

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
क्रमांक ६५५६.१८ दि: निर्लेखित
आवक २०१३ दो. दि: २०१३/२/१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५१५१

REFBK-0015151

डॉ. ग. श्री. खैर

यांची

संग्राह्य पुस्तके

सदाचार-चिंतनी

(द्वितीय आवृत्ती)

समाजातील आबाल, तरुण, वृद्ध, स्त्री-पुरुषांनी, मुलांनी, विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षकांनी, सर्वांनी वाचावे, मनन करावे अशा—

व्यवहारात आलेल्या अनुभवांच्या, निरीक्षणाच्या व चिंतनाच्या मुशीतून बाहेर पडलेल्या, सदाचारास उपयुक्त, मार्गदर्शक, चिरंतन चालनादायक विचारांचा संग्रह

किंमत रु. २.००

गीतेतील मुख्य विचार

प्राचीन भारतीय तत्त्वाची आणि विचार-प्रणालीची ओळख करून देणारे, मन व आचार शुद्ध आणि सात्त्विक घडविणारे, प्रत्येक व्यक्तीने, कुटुंबप्रमुखाने, शाळाचालकाने एकट्याने अगर सामुदायिक पद्धतीने वाचावेत, मुखोद्गत करावेत, मनन करावेत अशा विचारांचा संग्रह.

किंमत :

कागदी बांधणी रु. १.५०

कापडी बांधणी रु. २.००

अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.